१६८४
७०७४

शन, पुष्प-१९

महानुभाव कवि

श्री संतोषमुनि कृष्णदास विरचित

# रुक्मिनी-सैंवर

## (रुक्मिणी-स्वयंवर)

(विस्तृत प्रस्तावना, पाठभेद, परिशिष्टें व शब्दकोशासह)

पुरस्कार

डॉ. वि. भि. कोलते

REFBK-0014078

संपादक

नारायण बळवंत जोशी

: :

आठ रुपये

आध्यात्मिक साहित्य प्रकाशन, पुष्प–१९

४००५० वि. ९६८ क्रां. दि. २८।१।५६

महानुभाव कवि

श्री संतोषमुनि कृष्णदास विरचित

# रुक्मिनी-सैंवर

## (रुक्मिणी-स्वयंवर)

(विस्तृत प्रस्तावना, पाठभेद, परिशिष्टें व शब्दकोशासह)

पुरस्कार

डॉ. वि. भि. कोलते

(स्थळ

REFBK-0014078

संपादक

नारायण बळवंत जोशी

किंमत : : आठ रुपये

प्रकाशक :

कृष्णदास महानुभाव
संस्थापक आणि संचालक
**श्रीगीता-आश्रम**
तिलकरोड, हैदराबाद-१
(आंध्र-प्रदेश)

प्रथमावृत्ति :
श्रीदत्त जयन्ति
शा. शके १८८६

सर्वाधिकार :
प्रकाशनाचे
प्रकाशकाधीन
शेष सर्वाधिकार
संपादकाधीन

प्रति :
एक हजार

मूल्य :
आठ रुपये

मुद्रक :

१. प्रस्तावना पृष्ठ १७ ते ८०
हिंदी प्रेस, हैदराबाद

२. मूळ ग्रंथ पृष्ठ १ ते १२८
श्री लक्ष्मी आर्ट प्रेस
गौळीगुडा, हैदराबाद

३. पृष्ठ १२९ ते २२४ व प्रारंभिक
कर्मशियल प्रिंटिंग प्रेस
बेगमबाजार, हैदराबाद

४. पृष्ठ २२५ ते शेष संपूर्ण
दक्षिण भारत प्रेस
खैरताबाद, हैदराबाद

२००५० वि: ०२।०४
१६८४ नोंद वि: २८।११।५९

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| समर्पण | | |
| संक्षेप व चिन्हांचा खुलासा | | |
| प्रकाशकीय निवेदन | ... | १–८ |
| पुरस्कार | ... | १–८ |
| संपादकीय निवेदन व ऋणनिर्देश | ... | ९–१४ |
| प्रस्तावना | ... | १७–८० |
| रुक्मिनी-सैंवर | | (१ ते २९७) |
| प्रसंग पहिला | ... | १ |
| ,, दूसरा | ... | ६ |
| ,, तिसरा | ... | १८ |
| ,, चौथा | ... | २८ |
| ,, पांचवा | ... | ३६ |
| ,, सहावा | ... | ४७ |
| ,, सातवा | ... | ५७ |
| ,, आठवा | ... | ६६ |
| ,, नववा | ... | ७३ |
| ,, दहावा | ... | ९२ |
| ,, अकरावा | ... | १०६ |
| ,, बारावा | ... | ११९ |
| ,, तेरावा | ... | १२९ |
| ,, चौदावा | ... | १३३ |
| ,, पंधरावा | ... | १५७ |
| ,, सोळावा | ... | १६३ |
| ,, सतरावा | ... | १७० |
| ,, अठरावा | ... | १८१ |
| ,, एकोणिसावा | ... | १९० |
| ,, विसावा | ... | २०१ |
| ,, एकविसावा | ... | २११ |
| ,, बावीसावा | ... | २३७ |
| ,, तेवीसावा | ... | २५० |
| ,, चोवीसावा | ... | २७७ |
| ,, पंचविसावा | ... | २८५ |

परिशिष्ट १ ... २९८
परिशिष्ट २ ... ३०१
परिशिष्ट ३ ... ३०३
पाठभेद ... ३०७
शब्दकोश ... ३३४
शुद्धिपत्र ... ३४९

ग्रंथप्राप्ति-स्थान :

१. श्रीगीता-आश्रम
तिलकरोड, हैदराबाद–? (आंध्र-प्रदेश)

२. श्रीकृष्ण ज्ञान-मंदिर
२५४, वडाळा, मुंबई–३१

३. मुनि प्रकाशन
११२७०, डोरीवालां, करोलबाग,
नयी–दिल्ली–५

४. महानुभाव-आश्रम
पैठणरोड, औरंगाबाद (महाराष्ट्र)

५. प. श्री. पंत बाबा महानुभाव
नाका नं. ३ वार्ड नं. ७
श्रीरामपूर जि. अहमदनगर

६. श्री. अवेराजदादा दर्यापुरकर महानुभाव
श्रीकृष्णाश्रम, राजापेठ, अमरावती

८००५० वि: का।०९
१६८४ नों० दि:


*माता-पित्यांच्या पुण्यस्मृतीस*

सादर समर्पण

**—नारायण**

अनुक्रमांक ४०७५० वि: ३१.०९...
१६६२ नों: दि: २...
क्रमांक ........

# संक्षेप व चिन्हांचा खुलासा

जो. श्री. भी. ना. जोशी गळाठ्यांतील प्रत.

गो. गोपीराज महानुभाव संग्रहातील सांकेतिक लिपीतील प्रत.

मू. मूळाकरितां धरलेली भा. इ. सं. मंडळातील प्रत.

* जोशी प्रतीतील घेतलेल्या पाठाबद्दल.

±; $\phi$ गोपीराज प्रतीतील घेतलेल्या पाठाबद्दल.

△ जोशी व गोपीराज दोन्ही प्रतीतील पाठाबद्दल.

○ पाठ स्वतंत्ररीत्या सुचविल्याबद्दल.

\+ कमी जास्त शब्द अथवा ओव्या संबंधी. याचा खुलासा पठाभदांत दिलेला असतो.

कांहीं वेळां १ टाईप कमी पडल्यामुळे ृ घातला आहे.

आत्मतीर्थ-प्रकाश व रुक्मिणी-स्वयंवर ग्रंथाकरिता
प्रारंभी मिळालेले

# द्रव्य सहाय्य

| | |
|---|---|
| २००.०० | प. म. श्री. पंतबुवा महानुभाव |
| ८६३.०० | ई. श्री. ऋषिराजदादा महानुभाव ऊर्फ श्री. श्रीनिवासराव मदनूरकर (अॅडव्होकेट) |
| ७००.०० | श्री. प्रेमदासजी आर्किटेक्ट (हैदराबाद) |
| ८००.०० | श्री. गोपाल गंगाधर सेठी |
| ५२०.०० | मुंबईची सेठ मंडळी |
| ३०८३.०० | |

ह्या सर्व निस्वार्थ व विद्याप्रेमी सहाय्यकांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे व ह्यांचेकडून सदैव असेच ज्ञानप्रचारार्थ सहाय्य होत रहावे, अशी प्रभूचरणी नम्र प्रार्थना आहे.

— कृष्णदास

---

**विशेष सूचना :**—ह्यापैकी एक रुपया देखील मला दान म्हणून मिळालेला नाही तर काही रुपये ग्रंथविक्रीनंतर परत करावयाचे असून काहींच्या मोबदल्यात ग्रंथ द्यावयाचे आहेत.

— कृष्णदास

## प्रकाशकाचे निवेदन—

ऐसा दोनीं सत तीन सहस्त्र ग्रंथु : सीधो पावला माघ मासा मेकांतु ॥
कवी संतोषमुनी म्हने श्रीकृष्णनाथु : पावो प्रीति स्वामि माझा ॥
(रुक्मिनी-सैंवर, प्रसंग २४ ओ. १२७)

तीन हजार दोनशे तीन ओव्या महाकवि श्री संतोषमुनि कृष्णदास यांनी एका महिन्यात लिहिल्या, हे या रुक्मिणी-स्वयंवर ग्रंथाच्या समाप्तीच्या वरील ओवीवरून दिसते. एखाद्या चतुर शीघ्रलेखकाला देखील एका महिन्यात इतके लिखाण केवळ लिहून काढणे जिथे जड जाईल तिथे या तपस्वी महात्म्याने ते केवळ लिहिलेच नाही तर स्वयं काव्यरचना करून एका महिन्यात लिहून पूर्ण केले. असा हा विक्रम या महात्म्याने कशाच्या बळावर केला ? केवळ आपल्या कुशाग्र बुद्धीच्या बळावर ? नाही. त्याच्या पाठीशी श्रीचक्रधरस्वामींचा कृपाप्रसाद असाल्यामुळेच ही महनीय घटना त्यांच्या हातून घडली, हे सत्य श्रद्धाळु आस्तिक अंतःकरणें सहज ओळखतील पण बुद्धिवादी विद्वानांनी सुद्धा ही अंधश्रद्धा समजून दुर्लक्षिण्याचे काहीच कारण नाही. कारण 'मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम्' सारखे अद्भुत चमत्कार घडवून आणणारी एक अदृश्य शक्ति विश्वात असल्याचा साक्षात्कार आइन्स्टीन सारख्या संशोधकाला देखील या शब्दात व्यक्त करावा लागला कि, 'या विश्वात जे चैतन्य आहे त्याचा पूर्ण शोध माझी बुद्धि घेऊ शकली नाही. याबाबत अधिक विचार करण्याची आवश्यकता मला भासते'. त्यांची आपल्या बुद्धीच्या अपूर्णतेची ही जाणीव कशी यथार्थ होती हे फ्रेड हॉयल व जयंत नारळीकर यांनी

आपल्या गुरुत्वाकर्षणाबाबतच्या × नवीन सिद्धांताने जगाला पटवून दिले आहे.

यावरून आजचा भौतिक अविष्कार उद्या असिद्ध होत होत शेवटी हे सर्व संशोधन सर्वव्यापी अशा सच्चिदानंद चैतन्य शक्तीच्याच स्वाधीन करून व तिलाच शरण जाऊन संशोधकांना चराचर विश्वाचे कोडे उकलता येईल, असे निदर्शनास येते. शिवाय महाकवि कालिदासाप्रमाणे इतर कित्येक विद्वानांना देखील दैवी शक्तिमुळेच विश्वाला विमोहित करणारे अमर साहित्य निर्माण करता आले, असे इतिहासावरून कळते. श्री संतोषमुनि कृष्णदास यांना देखील हा प्रभूप्रसाद कसा प्राप्त झाला त्याची हकीकत, अनेक मंदिरांचे संस्थापक व जीर्णोद्धारकर्ते, ज्ञानसिंह मासिकाचे विद्वान् व बहुश्रुत संपादक आणि पंथीय तत्त्वज्ञानाचे वयोवृद्ध मर्मज्ञ महंत श्री. गोविंदराज बुवा महानुभाव यांनी लिहिलेल्या रुक्मिणी-स्वयंवर-पारायणावृत्तीच्या पुरस्कारात सविस्तर आलेली आहे. त्याची येथे पुनरुक्ति न करता, अशा या महनीय काव्यग्रंथाच्या प्रकाशनाची माझी मनिषा आता पंधरा वर्षांनंतर ईश्वर कृपेने कशी पूर्ण झाली, त्याचा संक्षिप्त वृत्तांत येथे लिहीत आहे.

इ. सन १९४९ साली महानुभाव मासिकाचा पहिला अंक संपादित करतांना मी असे ठरविले होते कि, हा ग्रंथ मासिकातून प्रत्येक अंकात क्रमशः देत जावा पण पंथीय तत्त्वज्ञानाचे व्यासंगी संशोधक व ग्रंथ लेखक माझे परमस्नेही कै. महंत श्री. बाळकृष्ण शास्त्री महानुभाव

---

× न्यूटन व आइन्स्टीन यांच्या दृष्टिकोणातून व भूमिकेतून पाहिल्यास बाकीचे विश्व नाहीसे झाले तरी सूर्यमालेच्या बाह्य भौतिक स्वरूपांत म्हणण्यासारखा कसलाच फेरबदल होणार नाहीं परंतु या नव्या सिद्धांताप्रमाणें विश्वाचा अर्धा भाग जरी नाहींसा केला तरी पृथ्वी करपून जाईल व तिच्या घड्या पडतील............

लोकसत्ता, दि. २४ जून १९६४.

यांनी तेव्हां सुचविले कि, हा ग्रंथ असा त्रोटकपणे छापल्यास पंथीयांस नित्य पारायणाकरिता त्याचा उपयोग होणार नाही म्हणून तो स्वतंत्र ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणेच आवश्यक आहे. त्यांच्या या उपयुक्त सूचनेनुसार मी सदर्हु ग्रंथ स्वतंत्रपणे प्रकाशित करण्याची सूचना पण महानुभाव मासिकातून दिली होती, पण 'मनसा चिन्तितं कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत्' या उक्तिप्रमाणे मनुष्याच्या सर्वच मनोकामना एकतर, त्याच्या मनाप्रमाणे कधीच पूर्ण होत नसतात; दुसरे कोणतेहि कार्य त्याची वेळ येईल तेव्हांच पूर्ण होत असल्यामुळे, त्याकाळी हे कार्य पूर्ण होउ शकले नाही. नंतर नागपूर येथील मुद्रणालय, होमिओपॅथिक व बायोकेमिक मेडिकल ग्रंथांचे § प्रकाशन व हैदराबाद येथे श्रीगीताआश्रमाची स्थापना इत्यादि कार्यांच्या व्यापात हे प्रकाशन मागेच पडत गेले ते इ. सन १९६२ च्या नोव्हेंबर महिन्यात पुनः हाती घेतले. हा योग देखील भगवान श्रीकृष्णाच्या कृपेमुळे अचानकपणेच घडून आला.

श्रीगीता-जयन्ति उत्सवाच्या आमंत्रण-पत्रिका छापण्यास लोकविजय मुद्रणालयांत गेलो असता 'लोकविजय' साप्ताहिकाचे संपादक श्री. वा. ल. फाटक यांनी विजापूरचे विद्वान संशोधक श्री. ना. ब. जोशी यांचा परिचय करून देत असता सांगितले कि, 'श्री. नानासाहेबांनी ऋक्मिणी-स्वयंवर नांवाचा महानुभावीय ग्रंथ संपादित केला आहे.' मी तो पहाण्याची इच्छा व्यक्त केली पण तेव्हां ते आपल्या नातीच्या लग्नानिमित्त हैदराबाद येथे आले असल्यामुळे त्यांचेजवळ ग्रंथ नव्हता, तो त्यांनी पुनः विजापूर येथून आवर्जून आणून दाखविला. स्वतःच्या व्यापाराचा व कुटुंबाचा व्याप सांभाळून, साठी उलटल्यानंतर त्यांनी सतत चार वर्षे परिश्रमपूर्वक संशोधन केले व शेकडो पानें लिहून काढली. त्यांच्या या दीर्घ व्यासंगाबद्दल माझ्या मनांत सादर कौतुक निर्माण झाले, त्याबरोबर पंथीयेतर विद्वानांनी आमच्या ग्रंथाकरिता

---

§ या प्रकाशनाची ग्रंथसूची रुक्मिनी-स्वयंवर ग्रंथाच्या शेवटी पहावी.

असे वर्षानुवर्षे परिश्रम घ्यावे आणि आम्ही महानुभावांनी मात्र तिकडे दुर्लक्ष करावे या गोष्टीचे दुःख पण वाटले; त्यामुळे आर्थिक सामर्थ्य नसतांना देखील मी हा ग्रंथ छापण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांनी ती उदार अंतःकरणाने मान्य करून, आपले हे बहुमोल परिश्रम माझ्या स्वाधीन केले जे आपण आज ग्रंथरूपाने पहात अहात. मी ते महानुभावीय वङ्मयाचे विद्वान संशोधक व संपादक, विद्यारत्न डॉ. वि. भि. कोलते यांना दाखविले असता त्यांनी कांही उपयुक्त सूचना केल्या. त्याप्रमाणे श्री. नानासाहेब जोशी व मी मिळून पुनः एकदा हा ग्रंथ दुसऱ्या पोथ्यांशी तपासून पाहिला. तपासण्याचे काम चालू असताच प्रारंभीची आठ पानें छापून कांही विद्वान मंडळीकडे मी पाठविली होती. ती वाचन 'ब्रह्मवाणी' मासिकाचे नवोदित संपादक म. श्री. कृष्णमुनि प्रभाकर यांचे दिल्लीहून पत्र आले कि, 'आप इस ग्रंथ को अशुद्ध क्यों छाप रहे हैं ? शुद्ध करके क्यों नहीं छापते ?' या पत्राने पुनः मन साशंक झाल्यामुळे प्रयत्न करून मी १७ पोथ्या अधिक मिळविल्या व श्री. नानासाहेब जोशी यांच्या हस्तलिखिताशी ताडून पहाण्यास प्रारंभ केला असता, मला या गोष्टीचे आश्चर्य वाटले कि, अडीचशे वर्षांपूर्वीच्या जुन्या पोथ्यांचा पाठ जितका नानासाहेबांच्या संपादित प्रतीशी जुळतो आणि जुन्या पोथ्यांचे जितके परस्पर सर्व दृष्टीने साम्य आहे तितके अलिकडे लिहिलेल्या नव्या पोथ्यांचे नाही. उलट उत्तरोत्तर त्यात भाषेचा आधुनिकपणा व लेखनदोष वाढतच गेले असून ओव्यांची संख्या पण कमी अधिक झाली आहे म्हणून मला नंतर त्यांत कोणत्या च प्रकारचा बदल करण्याची आवश्यकता भासली नाही. येथे ही गोष्ट देखील नमूद करणे आवश्यक वाटते कि, पथात सध्या प्रचलित असलेल्या नव्या पोथ्यांचा पाठ अभ्यासण्याची व पारायणाची पंथीयांना संवय झाली असून आणि त्यांत प्राचीन शब्दांची आधुनिक रूपें लिहिलेलीं असल्यामुळे ती समजण्यास सोपी जात असल्याकारणाने पंथीयांना या पोथीचा पाठ दुर्बोध व क्वचित् अशुद्ध वाटण्याचा संभव आहे पण वस्तुस्थिती तशी नाही,

कारण श्रीचक्रधर लीळाचरित्र व सूत्रपाठादि प्राचीन धर्मग्रंथ जसे प्राचीन भाषेतच अभ्यासिणे आपण धार्मिक दृष्टीने पुण्यदायक आणि प्राचीन साहित्याच्या दृष्टीने उपयुक्त समजतो त्याप्रमाणे श्रीचक्रधर-स्वामीच्या वरदानाने श्री संतोषमुनि कृष्णदास यांनी रचलेला व त्यांच्याच मुखाच्या शब्दांत असलेला रुक्मिणी-स्वयंवर ग्रंथ पुण्यप्रद अर्थात् सकल मनोरथ पूर्ण करणारा असू शकतो. त्या ग्रंथाचे जर आजच्या भाषेप्रमाणे शुद्धिकरण केले तर त्या ग्रंथाभोंवती असलेले धार्मिक वलय नष्ट होऊन त्याचे साहित्यिक महत्त्व देखील रहाणार नाही. याकरिता जुन्या पोथ्यांचा पाठच छापला आहे. आद्य कवयित्री महादंबा यांच्या धवळयांत, कवि श्री नरेन्द्रमुनि यांच्या रुक्मिणी-सैंवरात व स्मृतिग्रंथादि बहुतेक सर्व प्राचीन ग्रंथात या आख्यानास रुक्मिणी-सैंवर याचे नांवाने संबोधिले असल्यामुळे या ग्रंथाचे नांव देखील 'रुक्मिणी-सैंवर' असेच ठेवले आहे. केवळ पारायणावृतीच्या मुखपृष्ठावरच तेवढे 'रुक्मिणी-स्वयंवर' हे सध्या प्रचारात असलेले नांव छापले आहे. प्राचीन पोथ्यात 'प्रसंगु २५' अशाच प्रकारचे संक्षिप्त-समाप्ति लेख आढळनात म्हणून छापील पोथीतील अथवा काही अर्वाचीन पोथ्यांतील लांबलचक समाप्ति-लेख प्रसंगच्या शेवटी न देता 'प्रसंग पाहिला समाप्त' अशा प्रकारचे जुन्या प्रतींना जवळचे समाप्ति-लेख प्रसंगांच्या अंती सर्वत्र दिले आहेत. या ग्रंथाच्या शेवटी प्राचीन मराठी भाषेच्या दुर्बोध शब्दांचा शब्दकोश संपादकांनी जोडला असल्यामुळे सर्वसाधारण वाचकांना देखील त्यावरून अर्थ सहज समजून घेता येईल.

अठ्ठावीस अध्यायांचे ‡ रुक्मिणी-स्वयंवर इ. स. १८९१ साली प्रसिद्ध झाले होते. त्यांत २५ अध्यायांचेच २७ अध्याय केले असून अंतिम २८ वा अनुक्रमणिकाध्याय कोणत्याहि जुन्या पोथीत आलेला

‡ छापील पोथीत प्रसंगांना अध्याय म्हटले आहे पण प्राचीन पोथ्यात सर्वत्र आलेला 'प्रसंग' शब्दच आम्ही या आवृत्तीत घेतला आहे.

नाहीं. तरी तो ग्रंथातील परिशिष्टात ग्रंथ समाप्तिनंतर दिला आहे. २३ व्या अध्यायात मूळमहादेवाजवळ म्हटलेली मंगळाष्टकें पण कोणत्याहि प्राचीन पोथीत नाहीत ती देखील परिशिष्टांत दिली आहेत.

हैदराबाद आंध्रप्रदेशाच्या राजधानीचे केंद्र झाल्यापासून बरीच मराठी जनता येथून महाराष्ट्रात गेली त्यामुळे मराठी कंपाझिटर येथील प्रेसमध्ये मिळणे दुर्मिळ झाले आहे. तशात शालेय पुस्तकांची छपाई देखील मध्ये आडवी आली त्यामुळे चार छापाखान्यातून मला हा ग्रंथ छापावा लागला आणि विजापूर येथून श्री. नानासाहेब जोशी यांना येथे येऊन प्रूफ तपासण्यात मला सहाय्य करावे लागले, तरीहि आलेल्या मागणीप्रमाणे वेळेवर ग्रंथ पाठविता आला नाही याबद्दल मला वाईट वाटते. दिवसेदिवस मजूरी, कागद व इतर कच्चा माल या सर्वांच्याच किंमतीत वाढ होत असल्याने जरी गतवर्षी पारायणावृत्तीची किंमत रु. ४.५० व बृहदावृत्तीची किंमत रु. ७.०० ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती तरी एकंदर परिस्थितीच्या अनुरोधाने किंमतीत बदल करावे लागत आहेत त्याबद्दल आम्हास अत्यंत दुःख होत आहे. पण इतर पुस्तकांच्या सध्याच्या किंमतीच्या मानाने आम्ही किंमती शक्य तितक्या कमीच ठेवल्या असून कागद, छपाई, बांधणी वगैरे सर्व बाबतीत मुक्तहस्ताने खर्च केला असल्याचे वाचकांच्या ध्यानात आल्याशिवाय रहाणार नाही.

सारांश, विद्वान संपादकाने या ग्रंथास सर्व दृष्टीने उपयुक्त बनवण्यात कोणत्याहि प्रकारची उणीव ठेवली नाही आणि आम्ही देखील त्याला सर्वांग सुन्दर सजवण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे तरीहि वाचकांस ज्या उणीवा दिसतील त्या त्यांनी सुचविल्यास पुढील आवृत्तीत योग्य सुधारणा अवश्य करण्यात येईल.

रत्नाकर समुद्राच्या उदरातून रत्नें मिळविण्यास द्राविडी परिश्रम करावे लागतात पण या ग्रंथाच्या अभ्यासाने प्राचीन मराठी भाषेची

शब्दरूपि अमूल्य रत्नें अनेक अलंकारात कोंदलेली जिथे साहित्यिकांना सहज मिळतील तिथे श्रीकृष्णभक्तीच्या त्यातून उसळणाऱ्या सात्विक उर्मींवर भाविक भक्तांची अंतःकरणें आंदोलित होऊन त्यांना या काव्याचा अनुपम व अलौकिक आनंद अनुभविता यईल, त्याबरोबर लौकिक व पारलौकिक श्रेय पण लाभेल. त्याचा अत्यल्प-अंश भगवान श्रीकृष्णाच्या कृपेनें आम्हास लाभावा, अशी त्या जगन्नियंत्या प्रभूचरणी शेवटी प्रार्थना करून, हे निवेदन संपवितो.

## आभार व ऋणनिर्देश

वयोवृद्ध विद्वान साहित्यिक श्री. ना. ब. जोशी यांनी हा ग्रंथ प्रकाशनार्थ मला दिला; प्राचीन मराठी भाषेचे व महानुभाव तत्त्व-ज्ञानाचे व्यासंगी संशोधक विद्यारत्न डॉ. वि. भि. कोलते यांनी मार्ग-दर्शन केले व पुरस्कार लिहून दिला; पूर्वाश्रमीचे श्री. श्रीनिवासराव मदनूरकर (ॲडव्होकेट) व आता संन्यासाश्रमी झालेले श्री. ऋषिराज दादा महानुभाव यांनी कागद खरीदण्यास प्रारंभी द्रव्यसहाय्य केले; महोपदेशक श्री. शहापुरकर बुवा महानुभाव, ब्रह्मवाणी मासिकाचे तरुण व तडफदार संपादक श्री. कृष्णमुनि प्रभाकर, श्री. मुकुंदराजदादा जामोदेकर आणि बेल तरोडा येथील श्रीकृष्णमंदिराचे महंत श्री. प्रभा-कर बुवा महानुभाव यांनी पोथ्या मिळवून देण्यात सहाय्य केले; याबद्दल या सर्व हितचिंतकांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

हैदराबाद येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. र. म. भुसारी, प्रा. रा. ब. माढेकर, प्रा. भा. शं. कहाळेकर व श्री. वा. ल. फाटक आणि महानुभाव मासिकाचे बहुश्रुत विद्वान संपादक श्री. चन्द्रकांत निभोरकर, डॉ. अण्णासाहेब अडसोड व श्री. नारायणराव गं. मडघे; तसेच श्री. व. स. पाटील तोंडोळीकर व प. श्री. सिन्नरकर बुवा महानुभाव आणि मुंबईचे नवे नवनीतकार श्री. ज. शा. देशपांडे इत्यादि प्राकाशन कार्यात सदैव सहाय्य करणाऱ्या स्नेही मंडळींचा देखील मी चिर

ऋणी आहे. या सर्वांच्या ऋणात आजन्म राहणेच मी माझ्या हिताचे समजतो.

'आध्यात्मिक साहित्य प्रकाशन' संस्थेतून यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या सर्व ग्रंथांचे मराठी वाचकांनी व पंथीयांनी जसे स्वागत केले तसे या ग्रंथाचे देखील व्हावे, ही प्रार्थना.

श्रीगीता जयंति १९६४. कृष्णदास महानुभाव

# पुरस्कार

संतोषमुनीविरचित "रुक्मिनी-सैंवर" या काव्याच्या प्रस्तुत संपादनाला पुरस्काराचे हे चार शब्द लिहितांना मला विशेष आनंद होत आहे. कारण या निमित्ताने महानुभाव वाङमयाच्या संशोधनाला एका नवीन अभ्यासकाचा लाभ होत आहे. डॉ. य. खु. देशापांडे, वा. ना. देशपांडे, ना. ब. भवाळकर, ह. ना. नेने इत्यादि मान्यवर संशोधकांनी अविश्रांत परिश्रम करून महानुभाव वाङमयाच्या समृद्ध पण अज्ञात दालनातील अनेक गद्य पद्य रत्न उजेडात आणली हे खरे. पण त्यांचे कार्य पुढे चालविण्यासाठी साक्षेपी असे नवीन अभ्यासक व संशोधक मात्र उदयाला आलेले नाहींत. या क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या काही व्यक्तींना महंतांनी मार्गदर्शन करून पोथ्या पुरविल्या, पण त्यातून फलनिष्पत्ती फारशी झाली नाही. उलट त्या महत्त्वाच्या पोथ्या मात्र अडकून पडल्या. हैदराबाद (आंध्र) येथील काही अभ्यासकांनी थोडेफार कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे तथापी त्यांच्या कार्यात जो साक्षेप पाहिजे तो आढळत नाही आणि त्यामुळे एक प्रकारची अपरिपक्वता व अपूर्णता आढळते. अन्यत्र काही जण, जुन्या संशोधकांच्या श्रमांचा अनायासप्राप्त लाभ घेऊन त्यांच्या पूर्वप्रसिद्ध ग्रंथांना आपल्या टीका टिप्पणीची जोड देऊन शालेय संपादनाच्या कार्यात लागलेले आहेत. नवीन ग्रंथ संशोधून ते संपादन करण्याची पात्रता असूनहि तिकडे ते अजून तरी वळत नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट होय. नाही म्हणायला, काही महानुभाव स्वतः आता या कार्याकडे वळले आहेत. अशा स्थितीत श्री. ना. ब. जोशी यांच्यासारखे संशोधक या कार्याकडे आपले तन, मन, धन खर्च करीत असल्याचे पाहून आनंद व अभिमान वाटणे स्वाभाविक नाही काय? त्यांच्या श्रमांचे पहिले फळ म्हणून

संतोषमुनीच्या 'रुक्मिनी-सँवराची' प्रस्तुत संपादणी अभ्यासकासमोर येत आहे. ही खरोखरच अभिनंदनीय घटना होय.

श्री. नारायण बळवंत जोशी हे विजापूर येथें राहणारे. त्यांचा नित्याचा व्यवसाय रेडीयो, ग्रामोफोन इत्यादी वस्तूंच्या खरेदी विक्रीचा. भोवतालचे वातावरण मराठी भाषेला आणि मराठी संस्कृतीला पारखे होत चाललेले. बरे जवळपास महानुभाव महंतांचा किंवा पंथीयांचा सहवास सहज होऊ शकेल असेहि नाही. अशा परिस्थितीत महानुभाव वाङमयाच्या संशोधनाकडे ते आकृष्ट झाले हा एक नवलाईचा योगायोग म्हटला पाहिजे. प्राचीन वाङमयाच्या अभ्यासाची त्यांना मूळापासून आवड. आणि मनाची प्रवृत्ती गंभीर, चिंतनपर व संशोधनात्मक. महाराष्ट्र साहित्य पत्रिकादि मासिकांत त्यांनी लिहिलेल्या लेखांवरून याची साक्ष पटेल. या त्यांच्या स्वाभाविक सिद्धतेला प्रस्तुत काव्याच्या संपादनाचे क्षेत्र योगायोगाने का होईना प्राप्त झाले आणि त्यात त्यांनी यथाशक्ति खूप मेहनत केली. त्याचे दृश्य फळ म्हणजे आता प्रसिद्ध होत असलेली ही संपादणी.

तसे पाहिले तर संतोषमुनीचे हे काव्य अगदी पहिल्याने प्रसिद्ध होत आहे असे नाही. सन १८९१ मध्ये म्हणजे ७३ वर्षांपूर्वी ते प्रथम छापून प्रसिद्ध झाले. ते कोणी कुठे छापले याचा, सध्या पहावयास मिळणाऱ्या त्याच्या प्रतींवरून स्पष्ट बोध होत नाही. ही मुद्रित प्रत कधीपासूनच दूर्मिळ झाली आहे. त्यामुळे वाङमय-अभ्यासकांच्या दृष्टीने त्याच्या पुनर्मुद्रणाची आवश्यकता होतीच. शिवाय पुर्वी प्रसिद्ध झालेली मुद्रित संहिता भाषेच्या दृष्टीने अधिकृत होती असे म्हणता येत नाही. तीत बरेच हस्तक्षेप झालेले असावेत असे मानण्याला जागा आहे. उदाहरणार्थ, पहिल्या अध्यायातील मराठी भाषेचे महत्त्व वर्णन करणारा मुद्रित प्रतीतील पुढील उतारा पहा.

पूर्वीं व्यासादिक महामुनी । कथा बोलिले संस्कृत वाणी ।
ते आतां प्राकृत करोनी । सांगताहे ॥४१॥

अपभ्रंश पिशाच जाणो । माघदी आणि सुरसेन ।
संस्कृत आणि प्राकृत मिळवून । आणि छपन्न भाषा ।।४२।।
या भाषेचा पाकविस्तार । करावया एक प्राकृत चतुर ।
तिचेनि प्रसादें जाणिती विचार । सर्व भाषांचे ।।४३।।
म्हणौनि संस्कृताची टीका । प्राकृत म्हणती ऐका ।
जैशी हेमाची मुद्रिका । वरी गरुडपाच ।।४४।।
ऐशी छपन्न भाषांचीमे मगुटी । शोभे सुहावी मराठी ।
आणि संस्कृत वागविलें पोटीं । वाढवा पुढें करोनी ।।४५।।

हा उतारा श्री. जोशी यांनी संपादिलेल्या प्रस्तुत संहितेतील उताऱ्याशी तुळून पाहावा. म्हणजे मुद्रित प्रतीतील भाषेत फेरबदल कसे झालेले आहेत याची थोडी कल्पना येईल. काही ठिकाणी शब्द बदललेले आहेत, काही ठिकाणी जास्तीचे शब्द घातलेले आहेत तर बऱ्याच ठिकाणी व्याकरणाच्या रूपात परिवर्तन करण्यात आले आहे. त्यामुळे सामान्य वाचकांच्या दृष्टीने ग्रंथ कदाचित सुबोध झालाहि असेल पण भाषाभ्यासकांच्या दृष्टीने तो निरुपयोगी ठरतो. मूळातील भाषेत फेरफार किंवा संस्कार न करता प्राचीन ग्रंथ प्रसिद्ध होणे जरूर असते. या दृष्टीने संतोषमुनीच्या प्रस्तुत काव्याची अधिकृत संपादणी प्रसिद्ध होणे अत्यावश्यक होते. हे कार्य पार पाडल्याबद्दल श्री. ना. ब. जोशी यांचे आभार मानले पाहिजेत.

प्राचीन ग्रंथांच्या संपादनाच्या ज्या प्रमुख पद्धति आहेत, त्यांपैकी उपलब्ध अशी सर्वांत जुनी प्रत आधाराला घेऊन, अन्य प्रतीतील पाठ तळटीपांत नमूद करणे ही एक पद्धति होय. या पद्धतीचाच श्री. जोशी यांनी स्वीकार केला आहे. या पद्धतीनुसार संपादन करीत असता मुळाशी प्रामाणिकता राखणे हे संपादकाचे प्रमुख कर्तव्य असते. तथापी मूळ हस्तलिखिताच्या लेखनात सुद्धा 'यदक्षरपदभ्रष्टं मात्राहीनं च यत्' असे जे असेल ते दुरुस्त करून घेण्याची आवश्यकता असते. उदा०

प्रस्तुत संहितेत 'आपभ्रंस पीसा जानें : मागधी आणि सुरसेनि :' या ४२ व्या ओवीच्या पूर्वार्धात 'पीसा' शब्द आलेला आहे. तो 'पीसाचि किंवा 'पासाचिका' असा असला पाहिजे, कारण ते एका भाषेचे तसे नाव आहे पूर्वी मुद्रित झालेल्या आवृत्तीत 'पिशाच' असा तो आलेलाहि आहे. अमरावती येथील महानुभाव ग्रंथसंग्रहालयात या काव्याच्या सात आठ पोथ्या आहेत. त्या सर्वांत 'पिशाचि' किंवा 'पिशाचिका' असाच पाठ आहे तेव्हा श्री. जोशी यांच्या प्रस्तुत आवृत्तीतील या शब्दातील 'चि' निश्चित गळला आहे. आश्चर्य असे कीं त्यांना मिळालेल्या एकाहि पोथीत 'पिसाचि' हा पाठ नसेल हे संभवत नाही. पण पाठभेदात तरी तसा पाठ त्यांनी दिलेला नाही.

महानुभावीय ग्रंथांच्या संपादनात आणखी एक विशेष काळजी घ्यावी लागते ती वाचनाची. कारण ह्या बहुतेक पोथ्या सांकेतिक लिपीत लिहिलेल्या असतात. त्यातील सांकेतिक अक्षरांचे आणि चिन्हांचे वाचन करतांना अनेक प्रकारच्या चुका होण्याची शक्यता असते. चुकांचे वाचन करून छापलेला पाठ हा अर्थ लावण्याच्या दृष्टीने अभ्यासकांना घोटाळ्यात टाकतो. उदा: प्रस्तुत संहितेतील दुसऱ्या प्रसंगाच्या ३० व्या ओवीत 'ते आपणेयातें घीग्ये करीती : कुरूळें देखोनियां' असे चरण छापलेले आहेत. 'घीग्ये' म्हणजे काय, याचा विचार करताना बुद्धीला भ्रम पडतो. 'घिक्' शब्दाचे ते रूप असावे, असे वाटते. आणि मग कल्पना सुचते की हा शब्द 'धिक्करीती' किंवा 'धीग करीती' असा काहीसा असला पाहिजे. 'घीग्ये' हा पाठ संकेताच्या चुकीच्या वाचनातून निर्माण झाला असावा असे वाटते.

ण-न, श-स यांच्या वाचनातहि बरेच तारतम्य बाळगावे लागते मूळ नकलकाराच्या उच्चारात आणि म्हणून लेखनात या बाबतीत अनिश्चितता असणे शक्य असते. त्यामुळे या वर्णांच्या वाचनात काही विशिष्ट धोरण बाळगणे अवश्य असते. पोथी लेखकाची या बाबतीतील

वैशिष्टये लक्षात घेऊन ती नमूद करून ठेवली म्हणजे काम भागेल. एरवी, तत्कालीन सर्वसाधारण उच्चार लक्ष्यात घेऊनच त्याची रूपे छापणे इष्ट ठरेल. 'आनि-आणि' या रूपांच्या बाबतीत ती काळजी प्रस्तुत संपादकांनी घेतलेली आहे. तशी ती आणखी अनेक ठिकाणी घेतली असती तर बरे झाले असते असे वाटते. उदा: 'ऊन' किंवा 'औनि' प्रत्ययांत रूपांच्या बाबतीत. 'धरोनि' (२-१०९), 'देखौनि' (२-११६), 'फेडुनि' (२-१२३), 'उवडौनि' (२-१२७), इत्यादि रूपे आणि 'आदिकरुणि' (१-३४), 'घालौणि' (१-३७), 'लागौणि' (२-७), इत्यादि रूपे पहावी. तिसऱ्या प्रसंगातील २० व्या ओवीतील दुसऱ्या चरणात छापलेला 'मीळौणि' हा शब्द चौथ्या चरणात 'मीळौनि' असा छापला आहे. सांकेतिक लिपीत लिहिताना मुळांत लेखकाकडून हे शब्द असे लिहिलेले असतात हे खरे; पण ते वाचून संहिता तयार करताना तारतम्य वापरले म्हणजे ही विसंगती राहू शकणार नाही.

असे काही प्रकार प्रस्तुत संपादनात झाले असले तरी एकंदरीत श्री. जोशी यांनी काळजीपूर्वक काम केले आहे असे म्हणावयास हरकत नाही. विशेषत: आधाराला घेतलेल्या मूळ पोथी व्यतिरिक्त इतर पोथ्यातून महत्त्वाचे पाठभेद नमूद करून, शेवटी का होईना पण ते जोडल्याने अभ्यासकांची चांगली सोय झाली आहे. आता महत्त्वाचे पाठभेद कोणते या विषयी फारतर विद्वानात मतभेद असू शकेल पण केवळ अर्थलापनिकेकडे लक्ष देऊन पाठभेद नमूद करण्याने भाषाशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणारांचे समाधान होणार नाही. विशिष्ट कालखंडातील आणि समाजातील भाषिक आणि उच्चाराच्या प्रवृत्ती अभ्यासण्यासाठी आवश्यक ठरतील अशी पाठांतरे त्यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील. ही पाठांतरे, ग्रंथाच्या शवटी जोडण्याऐवजी त्याच पानावर देणे हेहि अभ्यासकांना सोयीचे ठरते. श्री. जोशी यांनी 'वाचकांच्या' म्हणजे सर्वसाधारण वाचकांच्या सोयीसाठी. अर्थात त्यांना पाठभेदांचा फारशी

गरज नसते म्हणून ते शेवटी दिले आहेत. पण ते दिले आहेत, हीच गोष्ट महत्त्वाची होय.

या काव्याच्या संपादनासाठी श्री. जोशी यांनी फार परिश्रम केले आहेत यात शंका नाही. त्यांनी या संपादणीला जी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे त्यावरून याची कल्पना येऊ शकेल. मिळालेल्या हस्तलिखितांचा आरंभी तपशील देऊन नंतर संहिता संपादनाच्या आपल्या धोरणासंबंधी स्पष्टीकरण दिलेले आहे. 'रुक्मिनी सँवर' हे ग्रंथनाम आपण का निश्चित केले या विषयीचे त्यांचे विवेचन सर्वांना पटेलच असे नाही. शिवाय ग्रंथकाराने स्वतः हेच नाव योजलेले आहे हा त्यांचा दावाहि टिकण्यासारखा नाही. प्रासा (यमका ?) साठी कवी 'रुक्मिणी' असा शब्द वापरतो एरवी बहुतेक सर्वत्र तो 'रुक्मिनी' शब्द योजतो असे त्यांचे म्हणणे आहे. ण-न या अक्षरांच्या संकेत लेखनाविषयी व वाचनाविष ी वर जे विवेचन केले आहे ते लक्ष्यात घेतल्यास हे म्हणणे मान्य करणे कठीण आहे. शिवाय, संतोषमुनीने स्वतः लिहिलेले हस्तलिखित उपलब्ध नसून त्याच्या नकला तेवढ्या उपलब्ध आहेत हे विसरता कामा नये. हा एक प्रश्न वगळला तर रुक्मिणी-स्वयंवर काव्यासंबंधी त्यांनी केलेले विवेचन सर्वांनी अभ्यासण्यासारखे उतरले आहे. संस्कृत भाषेत ही कथा कुठे-कुठे आली आहे, चक्रधरांनी ती कशी निरूपिलेली आहे, यातून संतोषमुनीने काय-काय स्वीकारले स्वतंत्र रचना त्याने कोठे व का केली, इतरांनी त्याचे अनुकरण कसे केले इत्यादि प्रश्नांची चर्चा श्री. जोशी यांच्या सूक्ष्म अभ्यासाची साक्ष देते. ही चर्चा उद्बोधक झालेली आहे. या सर्वसामान्य स्वरूपाच्या चर्चेनंतर प्रत्यक्ष या काव्यातील निरनिराळ्या प्रसंगाच्या अनुषंगाने श्री. जोशी यांनी संतोषमुनीच्या कर्तृत्वावर चांगला प्रकाश टाकला आहे त्याने निर्माण केलेली व्यक्तिचित्रं, वर्णन केलेला विवाहप्रसंग, दिलेले पौराणिक कथांचे दाखले, उल्लेखिलेली तत्कालीन नावे इत्यादि पाठविषयांचे मथळे जरी पाहिले तरी श्री. जोशी

यांच्या विवेचनविस्ताराची कल्पना येऊ शकेल. संतोषमुनीच्या तत्त्वज्ञानाची त्यांनी करून दाखविलेली मांडणी व्यवस्थित आहे. याच संदर्भात श्री. जोशी यांनी 'महानुभावीयांना द्वैती अथवा फार तर विशिष्टाद्वैती म्हणू शकू (प्रस्तावना पा. ३२) म्हणून जे मत सहज जाताजाता मांडले आहे, ते मात्र चिंत्य आहे. अद्वैताचा कोणताही प्रकार, आहे त्या स्वरूपात महानुभावियांना मान्य होईल असे वाटत नाहीं. पण हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे आणि महानुभाव तत्त्वज्ञानाच्या सूक्ष्म व सखोल अध्ययनानेच त्याची चर्चा करता येऊ शकेल. श्री. जोशी यांनी प्रस्तुत काव्याची 'थोडी' भाषिक पाहणीही केले आहे. ती सविस्तर केली असती तर अभ्यासकांना चांगली मदत झाली असती.

एकंदरीत या काव्याची प्रस्तुत संपादणी समाधानकारक झालेली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. विशेषतः श्री. जोशी यांचा कोणत्याहि काव्याच्या संहितासंपादनाचा हा पहिला प्रयत्न आहे हे लक्ष्यात घेतले म्हणजे त्यांनी या कार्यात मिळविलेल्या यशाची कल्पना येऊ शकते. त्याबद्दल मी पुन्हा त्यांचे अभिनंदन करतो. महानुभाव वाङमयाच्या संशोधनाला एक कळकळीचा व साक्षेपी अभ्यासक लाभला याबद्दल माझ्याप्रमाणेच इतरानाही खचित आनंद होईल. त्यांच्या हातून प्राचीन वाङमयाच्या सेवेचे हे कार्य उत्तरोत्तर अधिकाधिक यशस्वितेने संपन्न होवो ही इच्छा व्यक्त करून महानुभावांच्या व प्राचीन मराठी काव्याच्या अभ्यासकांना मूळ ग्रंथाच्या द्वारात प्रवेश करण्याची विनंती करतो.

आणखी एका गोष्टीचा निर्देश केल्याशिवाय पुरस्काराचे हे चार शब्द संपविणे योग्य होणार नाही. ती गोष्ट म्हणजे प्रस्तुत आवृत्तीच्या प्रकाशकासंबंधी. अनेकदा कार्य करणारे संशोधक किंवा लेखक आपले कार्य खूप मेहनतीने करतात. पण प्रकाशकाच्या अभावी त्यांचे सुभाषित त्यांचे अगातच जिरून जाते. मला स्वतःला याचा चांगला अनुभव आहे.

अशा स्थितीत श्री. जोशी यांना श्री. कृष्णदासदादा यांच्या रूपाने एक महानुभाव ग्रंथ प्रकाशनासाठी मिळाले हे त्यांचे व मराठी भाषाभ्यासकांचे भाग्य होय असे मी समजतो. श्री. कृष्णदास महानुभाव स्वतः व्यासंगी संशोधक आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या आध्यात्मिक ग्रंथ प्रकाशन संस्थेतून त्यांनी इतर ग्रंथाबरोबर स्वतः संपादन केलेले 'आत्मतीर्थ प्रकाश' हे काव्य प्रसिद्ध केले आहे. शिवाय महानुभावीय स्तोत्रांचे व आरत्यांचेहि काही संग्रह त्यांनी उजेडात आणले आहेत. महानुभाव वाङमयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने हे ग्रंथ कमी महत्त्वाचे नाहीत. त्यांनी संतोषमुनीचे हे काव्य प्रकाशनासाठी घेऊन फार मोठे कार्य केले आहे. एरवी, आजच्या काळात या ग्रंथाची उपलब्धी मराठी वाचकांना होणे दुरापास्त झाले असते. मराठीच्या या सेवेबद्दल त्यांचेहि मी मनःपूर्वक अभिनंदन करतो व पुरस्काराचे हे चार शब्द संपवितो.

उमरावती
दि. २७-१०-६४

—वि. भि. कोलते.

# संपादकीय निवेदन व ऋण निर्देश

इ. स. १९५७ मध्ये विजापुरांतच श्री. भी. ना. जोशी यांच्या घरांतील व त्यांच्या गळाठ्यांत 'रुक्मिनी-सैंवर' काव्याची पोथी कशी मिळाली याची माहिती प्रस्तावनेंत दिली आहेच. त्याची पुनरावृत्ति येथें करण्याचें कारण नाहीं. या काव्याचें संपादन कै. ह. ना. नेने यांनी केलें असते तर फार बहार झाली असती कारण महानुभावीय वाङ्मयाचे ते व्यासंगी अधिकारी होते. पण दुर्दैवानें तसें घडावयाचें नव्हते. काळानें त्यांचेवर झडप घातली नसती तर मराठी वाचकांच्या हातीं एक निर्दोष व अप्रतिम संपादन पडलें असते. कै. ह. ना. नेनेंच्या मृत्यनंतर कांही मंडळी हें काम करण्याच्या तयारींत होती असें कळलें पण तेंही अद्याप न झाल्यानें केलेल्या अभ्यासाचें फळ जनतेच्या हातीं द्यावें. पुढे मागे एखादा अधिकारी प्राध्यापक अथवा साहित्यिक यापेक्षां सुंदर व स्वादिष्ट फळ जनता जनार्दनास अर्पण करील असा विचार करून हा प्राचीन ग्रंथ आज मराठी वाचकांच्या सुपूर्त करीत आहे.

प्रथम पोषदाख्यानें शके १६४१ मध्ये केलेल्या वाढाव्यासह मुद्रणप्रत तयार केल्यानंतर याच्या प्रसिद्धीची व्यवस्था करण्याचा प्रश्न आला, माझ्या कांही मित्रांच्या सल्ल्यानुसार हें काव्य 'महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे' या संस्थेतर्फे व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचें अनुदान मिळवून प्रसिद्ध करावे असें ठरलें. त्याप्रमाणे म. सा. परिषदेकडे मुद्रणप्रत पाठविली. तिनें प्रा. रा. श्री. जोग व डॉ. वा. दा. गोखले यांची एक द्विसदस्य समिति नेमिली. त्या समितिनें हा ग्रंथ प्रकाशनयोग्य असल्याचा आपला अभिप्राय म. सा. परिषदेस कळविला. नंतर म. सा. परिषदेमार्फत तो म. रा. सा. आणि सं. मंडळाकडे अनुदाना-करितां नियमाप्रमाणे पाठविण्यांत आला. त्या मंडळानेंहि ग्रंथप्रकाशनास

अनुदान देण्याचा निर्णय घेतला व तसे म. सा. परिषदेस कळविण्यांत आलें. पण दरम्यान मी हैद्राबादेस कांही खाजगी कामाकरितां गेल्यावेळीं लोकविजय छापखान्याचे मालक श्री. वा. ल. फाटक यांच्यामुळें तेथील श्रीगीताश्रमाचे संस्थापक व संचालक श्री. कृष्णदास दादा महानुभाव यांचा परिचय झाला. बोलण्याचे ओघांत मी संपादणी केलेल्या 'रुक्मिनी-सेंवरा'चा माहिती दिली. त्यांनी आग्रहानें तो ग्रंथ पाहण्याचो व तदनंतर त्याच्या प्रकाशनाची इच्छा प्रदर्शित केली. 'रुक्मिनी-सेंवर' हा ग्रथ एका महानुभाव कवीचा असल्यानें त्यांना आपणच तो प्रसिद्ध करावा असें वाटणे स्वाभाविक आहे. त्यांनी यापूर्वी बरेच महानुभावीय वाङमय प्रसिद्ध केलें असल्यानें मलाही तो त्यांना प्रकाशनाकरितां देणे योग्य वाटलें, व तसें ठरविलें. म. सा. प. नें व म. रा. सा. आ. सं. मंडळानें माझ्या संपादणीस प्रसिद्धियोग्य व अनुदानास पात्र ठरविलें या बद्दल मी त्या दोन्ही संस्थांचा अत्यंत ऋणि आहे. प्रा. रा. श्री. जोग व डॉ. वा. दा. गोखले यांच्या सारख्या प्रथितयश साहित्यिकांनी संपादणी योग्य प्रकारे झाल्याचा अभिप्राय दिल्यानें माझा अभ्यास इष्ट मार्गानें होत असल्याचें समाधान लाभलें. प्रा. जोग व गोखले यांचा मी कृतज्ञ आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध होत असल्याचें पहाण्यास दुर्दैवानें डॉ. वा. दा. गोखले हयात नाहींत याबद्दल मात्र अत्यंत दुःख होते. त्यांचा स्वभाव नवोदित लेखकांना व संशोधकांना प्रोत्साहन देण्याचा व हरप्रकारे सहाय्य करण्याचा होता. हा स्वानुभवच मी सांगत आहे. असो.

वर लिहिलेच आहे कीं पोषदाख्याच्या वाढाव्यासह हें काव्य प्रसिद्ध करावयाचा बेत होता. परंतु जास्त विचार करतां असें दिसून आलें की पोषदाख्याची पुस्ति अगदीं सामान्य प्रतीची असल्यानें ती देऊन पृष्ठसंख्या वाढविण्यापेक्षा जास्त कांही होणार तर नाहींच उलट मूळ काव्याचा हानीच होणे शक्य आहे म्हणून तो विचार बदलावा लागला. अभ्यासूंची इच्छा दिसली तर पुढे मागे तो भाग पुरवणि पुस्तिका रूपांत स्वतंत्रपणे छापून काढतां येईल.

७६८० नों: दि: २८।१२।६०

संतोषमुनीचें हें काव्य महानुभावीयांच्या नित्य पाठांतलें असल्यानें फक्त संहिता व शब्दकोश एवढाच भाग पारायणावृत्ति म्हणून काढावा अशी कल्पना श्री. कृष्णदासदादांनी मांडली व ती मला पसंतहि पडली. तें पुस्तक यंदाच्याच गोकुळाष्टमीस प्रसिद्ध झालें. या नव्या बदलामुळें तळटीपांत द्यावयाचे पाठभेद स्वतंत्र बाजूला काढून द्यावे लागले. या छपाईच्या सोयीमुळें अभ्यास करणाऱ्या व चिकित्सक वाचकांची थोडी गैरसोय झाली आहे. त्यावद्दल क्षमस्व.

महानुभावीयांच्या पंथीय दृष्टीनें संहितेंत कांही दोष नसल्याची खात्री श्री. कृष्णदास दादांनी करून घेतली त्यामुळे फक्त साहित्यिकांसच नव्हे तर पंथीयांनाहि याचा फायदा होणार आहे. श्री कृष्णदासांचा महानुभावीय वाङ्मयाचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यासहि चांगला असल्यानें त्यांच्या नजरेखालून ग्रंथ जाण्याने मला बरेच सहाय्य झालें आहे. त्यांनी घेतलेल्या या श्रमाबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

मूळ काव्य बरेच मोठें आहे. अभ्यासाच्या दृष्टीनें संशोधनपर प्रस्तावना, पाठभेद व शब्दकोश या आवृत्तींत देणें अवश्य होते नव्हे त्याच करितां हा सर्व खटाटोप होता. यास पुन्हां टिप्पण्या जोडण्यानें पृष्ठसंख्या बरीच वाढली असती व नंतर तो छापणे व विकला जाणे दोन्ही गोष्टी कठीणच होत्या. या करितां टिप्पण्या जोडल्या नाहींत. प्रस्तावना लिहतांनाहि हात आंखडता घ्यावा लागला. कारण व्यवस्थित-पणे व सविस्तर ती लिहिली असती तर तिचीच पृष्ठसंख्या २००-२२५ च्या घरांत गेली असती. अभ्यास करतां असें दिसून आलें कीं मराठीतील स्वयंवर काव्यें व विशेषतः रुक्मिणी-स्वयंवर काव्यें हा विषय फार मोठा असून वैशिष्ठ्यपूर्ण आहे. कोणी विद्वान् प्राध्यापक वा साक्षेपी व संशोधनशील साहित्यिक या विषयाचा परामर्श घेतील अशी आशा बाळगतो.

संहिता तयार होऊन ती छापली जात असतां श्री कृष्णदास दादांनी आणखी कांही पोथ्या मिळविल्या. त्यांतील जुन्यांत जुन्या पोथ्यांशीं

ताडून पाहतां मी सिद्ध केलेली संहिता बरीच मिळती जुळती असल्याचें दिसून आलें. कांही ठिकाणी थोडंफार पाठभेद दिसले नाहीं असे नाहीं पण ते विशेष महत्त्वाचे होते असे नाही. हें काव्य पुन्हां लवकरच छापण्याचा योग आला तर त्या पाठभेदांचाहि अंतर्भाव अवश्य केला जाईल, न जाणो यांच्याहून एखादें जुनें हस्तलिखित तोपर्यंत मिळून या पेक्षां मूळाच्या जास्त जवळ जावयास सांपडेल. संतोषमुनीच्या हातचा पोथी उपलब्ध नसल्यानें आज जरी ७० टक्के मूळाच्या जवळ गलो असलो तरी मी समाधानी आहे.

महानुभावीय वाङ्मयाचे गाढे विद्वान् प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांचा या प्रकाशनास पुरस्कार मिळावा अशी इच्छा होती व त्याप्रमाण माझे मित्र डॉ. म. स. मोडक यांचे जवळ ती मी बोलून दाखविली. त्यांनी डॉ. कोलतेना मजतर्फे विनंति केली. डॉक्टर कोलतेंचा कामाचा व्याप पहातां त्यांना या कामास सवड मिळेल कां नाही याची मला शंका वाटत होती परंतु त्यांनी वेळांत वेळ काढून पुरस्कार लिहिला याबद्दल मी त्यांचे कोणत्या शब्दांत आभार मानावेत तें समजत नाहीं. त्यांनी पुरस्कारांत माझ्या कामाचें मूल्यमापन केलें आहे त्यांनी गुणांचे कौतुक केलें आहे तसे कांहीं मतभेदांचा निर्देश केला आहे. कांही त्रुटिहि दाखविल्या आहेत. या सर्वांत त्यांचा हेतु संशोधनकार्य शक्य तों पायाशुद्ध व अत्यंत काळजीपूर्वक व्हावें हे दर्शविण्याचाच आहे. यांचा उपयोग मला पुढील अभ्यासाच्या वेळीं होणार आहे व शिवाय महानुभावीय वाङ्मयाच्या इतर नवोदित संशोधकांनाही होणार आहे. संशोधन कार्यांत कितीहि काळजी घेतली तरी कांही ना कांही मतभेद हे व्हाणारच. तसेच कांही त्रुटिहि राहणे शक्य आहे. प्रथितयश संशोधकांच्या लिखाणावर जरा बारकाईनें नजर टाकल्यास याचा प्रचीति सहज यईल. तरीपण जास्तीत जास्त मेहनत घेणे अवश्य आहे हें खरेच आहे. डॉ कोलतेंनी भाषाशास्त्र दृष्ट्या विस्तृत पहाणी केली असती तर बरे झाले असते असें म्हटलें आहे. पण आतां याबाबतीत एक ठराविक

साचा निर्माण होऊं लागला आहे व त्यामुळे त्यावर किती भर द्यावा हा प्रश्नच होऊं पहात आहे हें एक कारण व भाषाशास्त्राचा माझा अभ्यास परिमित आहे हे दुसरे कारण की ज्यामुळे मला ही पाहणी आंखडती घ्यावी लागली. शिवाय नरेंद्र केसोबास, भास्करभट्ट, महिंद्रभट्ट, चोंभा वगैरेंची भाषा जास्त वैशिष्ठ्यपूर्ण व जुनी आहे तशी संतोषमुनीची नाहीं. त्या मानानें ही बराच आधुनिक वळणाची आहे. शिवाय मी ऐतिहासिक व इतर भागावर जास्त भर दिला आहे व तो अभ्यासहि फार महत्त्वाचा आहे. डॉ. कोलतेंनी मन:पूर्वक पुरस्कार लिहिला याबद्दल त्यांचे मी पुनश्च आभार मानतो.

रुक्मिनी-स्वैंवर काव्याच्या या संपादणीच्या कामास अनेकांची मदत झाली आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाचे श्री. ग. ह. खरे यांनी मंडळांतील हस्तलिखित मिळवून दिले इतकेच नव्हे तर कांही तिथ्या निश्चित करण्यास मदत केली याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. त्याचप्रमाणे येथील विजय कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक श्री. गो. म. कुळकर्णी यांनी वेळोवेळीं चर्चा करून, काम चालू असतां तें नजरेखालीं घालून व उपयुक्त सूचना करून मला उपकृत केले आहे. त्यांच्या सौजन्याचा मी पुष्कळच फायदा घेतला आहे खास. त्यांचे आभार मानण्याबरोबरच ते मला पुढील अभ्यासाच्या वेळीही असेच सहाय्य करतील अशी आशा बाळगतो. श्री. भामाजी नागेश जोशी यांनी पोथ्यांचा गळांठा दिल्याबद्दल, अहमदनगरचे प्राध्यापक श्री. स. वा. मुळे यांनी भैरवी टीकेच्या अ. ५२-५३-५४ चें हस्तलिखित दिल्याबद्दल, श्री. ज. शा. देशपांडे यांनी गोपीराज संग्रहांतील हस्तलिखित व पोषदारूयाच्या ग्रंथाची स्वतः व कांही मित्रांच्या सहाय्यानें करून घेतलेली प्रत दिल्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

प्रकाशक श्री. कृष्णदास महानुभाव रहात असल्यानें व त्यांना सोयिस्कर जावे म्हणून त्यांनी हैदराबाद मध्येंच ग्रंथ छापून घेण्याचें

ठरविलें. आंध्र प्रदेशाच्या निर्मिती पासून हैदराबाद मधील मराठी छपाईची परिस्थिति फार बदलली आहे. यामुळें चार निरनिराळ्या छापखान्यांतून, त्यांच्या त्यांच्या सवडीनें, छपाईचें काम पूर्ण करून घ्यावे लागले. त्यांतील तेलगु कंपाझिटर्समुळे ग्रंथांत भाषा विषयक बरेच दोष (विशेषतः प्रस्तावनेत) राहिले आहेत त्यांजकडे वाचकांनी हंसक्षीर न्यायाने पहावे. छापखान्यांच्या व्यवस्थापकांनी न त्रासता काम पूर्ण केल्याबदल व श्री. कृष्णदास दादांनी तें चिकाटीनें पूर्ण करून घेतल्याबद्दल त्यांचेहि आभार मानणे माझें कर्तव्य आहे.

वास्तविक हें पुस्तक गेल्या वर्षीच्या गीताजयंतीस प्रसिद्ध व्हावयाचे. परंतु छापखान्यांच्या अडचणी, कागदांची टंचाई, श्री कृष्णदास दादांची प्रकृति व पंथीय कामाचा व्याप वगैरे कारणांमुळें हें आतां प्रसिद्ध होत आहे. त्याबद्दल वाचकांनी क्षमा करावी.

विजापूर (म्हैसूर राज्य) नारायण बळवंत जोशी
गीता जयंति १९६४

# रुक्मिनी-सैंवर

(रुक्मिणी-स्वयंवर)

## आवश्यक सूचना—

बृहदावृत्तीत विस्तृत प्रस्तावना, पाठभेद, शब्दकोश व तीन परिशिष्ट दिले असून, पारायणावृत्तीत संक्षिप्त प्रस्तावना, शब्दकोश व एक परिशिष्ट दिले आहे. याशिवाय बृहदावृत्ति व पारायणावृत्ति या दोहोंची मूळ संहिता अगदी सारखीच आहे. तेव्हां बृहादावृत्तीच्या मूळ संहितेत शब्दांच्या शिरोभागी असलेले पाठभेद दर्शक आंकडे व चिन्हें वाचतांना दुर्लक्षिले तर बृहदावृत्तीचा देखील पारायणाकरिता उपयोग करता येईल, हे लक्षात घ्यावे.

—कृष्णदास

# प्रस्तावना

## साधन सामुग्री—

रुक्मिनी-सैंवराची संहिता तयार करतांना ज्या ज्या प्राचीन हस्तलिखितांचा उपयोग केला त्यांची कांहीं माहिती देणें अवश्य आहे. एकंदर सहा पोथ्यांचा उपयोग केला. त्या पैकीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या पोथीचा मूळ म्हणून उपयोग केला असून इतर पोथ्या पाठभेदा करितां व परिशिष्टां करितां वापरल्या आहेत.

( १ ) भारत-इतिहास-संशोधक-मंडळांतील प्रत. हिला मंडळाच्या हस्तलिखितांच्या सूचींत २२, ७४ असा क्रमांक दिला आहे.

प्रत लेखन काल–संवत १७७१ जयेनाम संवत्सर माघ मासे शुक्लपक्षे तिथी द्वितीया भौम दिन, म्हणजे विक्रम संवत १७७१ मधील ही पोथी आहे. तिथी वगैरे सर्व तपशिलाचा श्री. द. वें. केतकर यांनीं पडताळा पाहिला असून ती बरोबर असल्याबद्दलचा निर्वाळा दिला आहे. संवत १७७१=शके १६३६= इ. स. १७१४. पोथीचा आकार २५×१४·५ सेंटीमीटर्स. पानें १७१=१७१×२ पृष्ठें. पहिलें पान गहाळ असल्यानें पहिल्या १२½ ओव्या नाहीत. प्रत्येक पृष्ठावर अजमासे १३ ते १४ ओळी. पोथी जीर्ण झाली असल्यानें फार सांभाळून हाताळावी लागते. अक्षर ठसठशीत व सुवाच्य; पोथी त्या मानानें पुष्कळच शुद्ध.

( २ ) विजापुरांतील श्री. भीमाजी नागेश जोशी यांच्या कडून आणलेल्या गळाठ्यांतील पोथी. पूर्ण पण बरीच अशुद्ध. ओव्यांची संख्या ३१८०+३. लेखन काल शके १६७७ वीवानाम संवत्सर आश्विन वद्य १ सोमवारी प्रथम प्रहरी. डोमेग्राम या गांवी लेखन. मुळामध्ये हिचा उपयोग केल्यावेळीं पाठ * अशा फुलीनें दिला आहे. हिला पाठभेदांत दिलेला संक्षेप 'जो'.

( ३ ) गोपीराज महानुभावांच्या संग्रहांतील वही प्रमाणे बांधलेली

'सकळी' लिपीतील पोथी. ही श्री. ज. शा. देशपांडे यांचे कडून मिळाली. पोथी निदान दोनशे वर्षांची तरी जुनी असावी. या पोथींतील प्रसंग २ ते ५ चीं पानें कोणीतरी कापून नेलेली आहेत. या पोथीवर एक छापील मलपृष्ठ आहे. त्यावर शाईनें लिहिलें आहे "इति श्री कवि कृष्णदास संतोषाचाय शिष्य, मुनि संतराज लासूरकर महानुभाव कृत." मुळामध्यें हिचा उपयोग केल्यावेळीं पाठ + अशा चिन्हानें दिले आहेत. हिला पाठभेदांत दिलेला संक्षेप 'गो'

(४) महाराष्ट्र साहित्य परिषदेतील क्रमांक ११६ ची पोथी. वही प्रमाणे बांधलेली. ही मूळ सटाणे, जिल्हा नासिक, येथील चांदोरकर घराण्यांतील. पोथीचा लेखनकाल शके १७०८ पराभव संवत्सर चैत्र शुद्ध पंचमी सोमवार. पोथी सुवाच्य व बरीच शुद्ध. या प्रतींत कांहीं वैशिष्ट्यें आढळली. प्रत्येक अध्यायाचे शेवटीं त्या त्या अध्यायांतील प्रतिपादित विषय संक्षेपानें दिले असून संकल्प दिला आहे. पंचविसाव्या अध्यायाच्या शेवटीं दिलेला मजकूर देतो म्हणजे कल्पना येईल. "इति श्री भागवते माहा पद्मपुराणे दशम स्कंदे शुक परीक्षीती संवादे : श्री कृष्णलीळामृतः किं षड्रस आन्नाची युक्ती श्रीकृष्ण रुक्मिणी आण भीमक यादव भोजण आवस्वर निर्णयोः हरिवंस सहीतां रुक्मिणी सैंवर वर्णनो नाम पंचवीशवाध्याया गोडहाः ॥"

या पोथींतील हरिवंशाचा उल्लेख महत्त्वाचा आहे. असा उल्लेख इतर पोथ्यांत नाहीं. हा नाथांच्या रुक्मिणी स्वयंवराचा परिणाम दिसतो. या पोथींत कांहीं ओव्या जास्त आहेत. त्या कोणीतरी रचून घुसडल्या असाव्यात. या पोथींत श्रीकृष्ण रुक्मिणी विवाहाची मिति दिली असून मंगलाष्टकें दिली आहेत. ती अर्थात् मागाहून कोणीतरी घातलेली दिसतात. तीं परिशिष्टांत दिली आहेत.

(५) म. सा. परिषदेंतील क्रमांक ११९ ची वहीप्रमाणे बांधलेली पोथी. ही हि वरील प्रमाणे चांदोरकर घराण्यांतीलच. पोथी लेखन कालांत शक दिला नाहीं फक्त मिति आहे. पोथी त्रुटित व अशुद्ध. नं. ४ व ही पाठांत बरीच सारखी. हिच्यांत मंगलाष्टकें आहेत पण विवाह मिति नाहीं.

( ६ ) पौषदाख्य गोपाळदासानें, त्याच्या समजुती प्रमाणे, शुद्ध केलेली प्रत. या प्रतीची नक्कल श्री. ज. शा. देशपांडे यांचे कडून मिळाली. शेवटीं प्रत्येक प्रसंगाची ओवी संख्या देऊन बेरीज ३७४३ दिली आहे. मूळाचा लेखन काल—पौषदाख्याच्या लेखनाचा–"शके १६४१ वीकारी नाम संवत्सरी आणि माघे मासे शुक्ल पक्षीं प्रतिपदा तिथी शुक्रवार जये प्रहरी." हा ग्रन्थ पौषदाख्यानें "बीडकीण ग्रामाहुनी वाव्ये कोणी: माले वीहीरे कोश प्रमाणे असे तीये स्थानी: तेथें पौषदाख्यें मुणी गोपाळें वास्तव्ये करुनी: ग्रंथें शोधला तये स्थळी: ॥१७५॥" याने आपली स्वत:ची माहितीहि दिली आहे. ज्या प्रतीवरुन प्रत करून घेउन मजकडे श्री.ज. शा. देशपांडे यांनीं पाठविली ती "सुमासण ११८२" मधील आहे. सुमासण म्हणजे शुहुर सन असल्यास ही प्रत शके १७१४ मधील ठरते.

एक गोष्ट यथेंच विचारा करितां ठेवावीशी वाटते. महानुभाव पंथाची स्थापना वऱ्हाडांत झाली. त्याचा प्रसार वऱ्हाड, खानदेश, नगर, मराठवाडा या भागांत झाला. विजापूर या परिसरा पासून 'बरेंच दूर आहे. शिवाय येथें महानुभावांचे मठ असल्याचें दिसत नाहीं, असें असतांना त्यांचे ग्रंथ येथें का मिळावे ? मला दोन तरी असे ग्रंथ येथें मिळाले. एक संतोषमुनीचें 'रुक्मिनी सैंवर' व दुसरा मुनी दिवाकराचा 'मत्त प्रबोध'. मत्त प्रबोधाची प्रत विजापूर जिल्ह्यांतील आलमेल येथील एका वैदिक घराण्यांतील गृहस्थानेच करून घेतलेली आहे. तो म्हणतो कीं ती त्यानें एका जीर्ण ग्रंथावरुन करून घेतली. ती नक्कल त्यानें शके १७०७ शुभकृत नाम संवत्सर निज ज्येष्ठ शु. १५ मूळ नक्षत्र ब्रह्म नामा योगावर केलेली आहे. या वरून एक गोष्ट दिसते कीं पूर्वीं महानुभावीयांच्या ग्रंथाविषयीं, मध्यंतरी होता तितका, दुस्वास नसावा. असो.

वर ज्या सहा पोथ्यांचा निर्देश करण्यांत आला आहे त्या पोथ्यांच्या आधारेंच ही शुद्ध पाठाची आवृत्ति तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. ही शुद्धावृत्ति सिद्ध करतांना काय धोरण ठेविलें आहे अथवा कोणत्या पद्धतीनें संशोध न केलें आहे तें वाचकांचे समोर ठेवणें अवश्य आहे.

प्राचीन ग्रंथांचें संशोधन करतांना अनेक अडचणी निर्माण होतात. एक तर स्वतः ग्रंथकाराच्या हातची पोथी सहसा मिळत नाहीं. त्यांत पुन्हां ज्यांच्या जवळ प्राचीन ग्रंथांचा संग्रह आहे ते लोक आपला संग्रह दाखविण्यास राजी नसतात. तशांत महानुभाव मंडळी तर फारच नाखूष असतात. त्यांच्या वृत्ती-मध्यें अलीकडे, विशेषतः गेल्या तीस चाळीस वर्षांत, फरक पडत चालला असला तरी तो फारच मंदगतीचा आहे. त्यामुळें एकाच ग्रंथाच्या दहा वीस प्रति मिळणे अगदीं दुरापास्त आहे. यांचे संग्रह ही खेड्यापाड्यांत विखुर-लेले आहेत त्यामुळें अडचणींत आणखी भर पडते. अशा प्रसंगीं ज्या दोन चार पोथ्या मिळवितां येतील त्या मिळवूनच गुजारा करण्याचा प्रसंग येतो. असो.

प्राचीन ग्रंथांचें संशोधन करतांना शक्य तो सर्व जुन्या पोथ्या एकत्र करणे अवश्य होय. मिळतील तितक्या प्रति जमवून त्या कालक्रमा प्रमाणे लावून त्यांची यादी करणे व सर्वांत जुनी पोथी अभ्यासा करितां प्रथम हातीं घेणे अवश्य आहे. पुष्कळदां अशा जुन्या पोथ्या त्रुटित असतात अशा प्रसगी काला दृष्ट्या त्यांतल्या त्यांत जुनी पण संपूर्ण पोथी प्रथम पाहून, विषयाची कल्पन-पूर्णपणें आल्यावर मग इतर सर्व हस्तलिखितांच्या सूक्ष्म अभ्यासास सुरवात करावी. हस्त लिखितांत मूळ कोणत्या पोथी वरुन पुढें कोण कोणत्या प्रती मागे प्रति झाल्या असाव्या यांचा अंदाज करुन त्यांचे ‘वंशवृक्ष’ तयार करावे. पुन्हां त्यावेळींहि स्थल व काल दोन्ही बाबींचेकडे लक्ष्य पुरवावयास पाहिजेच. कारण स्थल परत्वें व काल परत्वें प्रतीमध्यें बदल होत जातात. शास्त्रीय दृष्टया हा मान्य मार्ग होय. परंतु यांत व्यापाचे मानानें पूर्ण फल प्राप्त होईलच अशी खात्री देतां येत नाहीं. हा मार्ग अवलंबणे एकाद्या व्यक्तिचें काम नव्हे. त्यास याच कामाची हौस असलेले व आशानिराशेस न जुमानणारे असे संशोधकांचें एक मंडळच हवे. शिवाय पैशाचीहि भरपूर मदत हवी. अद्यापि मराठी ग्रंथ संशोधना बाबत या प्रकारचे प्रयत्न होऊं शकले नाहींत. इतकेच नव्हे तर चार दोन संशोधक एकत्र येऊन एखाद्या प्राचीन ग्रंथाची शुद्ध आवृत्ति तयार करतानांहि दिसत नाहींत. कांहीं साहित्य संस्थांच्या तर्फे ग्रंथ प्रसिद्ध होत असले तरी संपादनाचें काम सहसा एकाच व्यक्तिकडून झालेलें आढळतें.

वर दिलेल्या पद्धति पेक्षां निराळी पद्धत म्हणजे आपणांस मिळालेल्या प्रतींतील कालदृष्टया जुनी प्रत ( अर्थात शक्य तों पूर्ण प्रत ) आधार प्रत म्हणून स्वीकारून शुद्ध प्रत तयार करण्याचा प्रयत्न करणे. अशी प्रत तयार करतांनां पुढील गोष्टींच्याकडे लक्ष्य देणे अवश्य आहे.

( १ ) आपण जें काव्य अथवा इतर लिखाण अभ्यासा करितां घेतो त्याचा विषय काय आहे व लेखकाचा त्या विषयावर अधिकार काय प्रकारचा आहे तें प्रथम पहाणे अवश्य आहे.

( २ ) वर्ण्यविषयाचें मूळ कोठें आहे तें पहाणे हें नंतरचें काम.

( ३ ) ग्रंथकार सुसंस्कृत व समाजांतील वरच्या थरांतील असेल तर तो कोणत्या प्रकारची भाषा वापरेल याचा कयास करावयास पाहिजे.

ग्रंथकार स्वतः सुसंस्कृत पंडित असून सुद्धां तो ज्या समाजा करितां आपलें लेखन करीत असतो त्यास अनुसरूनच त्या ग्रंथांत भाषा वापरावी लागते हें ध्यानीं घेऊनच त्याची भाषा, मांडणी, उपमा, दाखले वगैरे योग्य आहेत कीं नाहींत हें पहावे लागते.

( ५ ) लेखक आपल्या पूर्वसूरीनां बाजूला सारून अगदीं स्वतंत्र प्रकारें लेखन करतो काय हें पाहिले पाहिजे. सहसा असा प्रकार घडत नाहीं, बदल सावकाशच होत असतात तरीपण याकडे लक्ष्य पाहिजेच; किंबहुना अशा लेखन प्रकारानें मन वेधतें हि.

(६) या नंतर आपणांस मिळालेल्या सर्व प्रतींत जुनी पण भाषा दृष्टया व प्रतकृतिदृष्टया जास्तीत जास्त शुद्ध प्रत कोणती आहे तें ठरविणें जरूर आहे. पुष्कळ वेळां आपणांस प्रथम मिळालेली प्रतच आधारप्रत म्हणून धरण्याचा मोह होतो पण तो दूर सारला पाहिजे. प्रस्तुत शुद्ध प्रत तयार करतांना असाच प्रकार घडला. प्रथम मला विजापुरांतच एक प्रत (जोशी प्रत) मिळाली. तिचाच आधार प्रत म्हणून उपयोग करण्याचें

ठरविलें व त्याप्रमाणे बरेच कामहि केलें परंतु पुढें भा. इ. सं. मंडळांतील प्रत मिळाल्यावर व ती कालक्रमानुसार जुनी व भाषेच्या दृष्टीनें जोशी प्रतीपेक्षां चांगली असल्याचें आढळून आल्यानें केलेले श्रम विचारांत न घेतां मला ती जोशी प्रत बाजूला सारावी लागली.

(७) पोथ्यांच्या शेवटीं व कधीं-कधीं मधेच काल निर्देश येतात, ते गणीता प्रमाणे बरोबर आहेत कीं नाहींत हें नीट पाहिलें पाहिजे. अनेकदां गणीत न करतांच संशोधक ती बरोबर असावी असें गृहीत धरुन चालतो पण ती फसगत ठरते. संतोषमुनीच्या या ग्रंथाबाबतहि असेंच घडलें आहें. त्याचा उहापोह पुढें योग्य जागीं केला आहेच

(८) प्रतकार स्वतः सुशिक्षित नसेल तर तो आपल्या तोंडीं बसलेले अथवा त्यास चांगले वाटणारे शब्द अथवा प्रयोगहि वापरतो, त्यामुळें ग्रंथ अशुद्ध बनतो तेव्हां मूळ ग्रंथकाराचा दर्जा, त्याच्या काळची भाषा वगैरे गोष्टि लक्षांत घेऊन शुद्ध प्रत तयार करावी लागते. महानुभावीय ग्रंथांत तर याचा नेहमी प्रत्यय येतो. सुरुवातीस महानुभावीयांत चांगले पंडित होऊन गेले व त्यांचें लेखन त्या-त्या कालांतील भाषा पद्धती प्रमाणे शुद्धहि होते. पण पुढें-पुढें त्या पंथांत अशिक्षितांचाच भरणा फार होऊं लागल्यानें व फक्त भाविक-पणानें नित्यपाठाकरितां नकला होउं लागल्यानें त्या नकलकारांनीं त्यांच्या तोंडी असलेले शब्द नकलांत घातले व त्यामुळें अनेक दोष निर्माण झाले.

(९) नित्य पाठांत असलेले ग्रंथ पुष्कळ वेळां जवळ-जवळ मुखोद्गत होतात व नंतर त्या वरुन नकला झाल्या वेळीं ज्याच्या तोंडीं ज्या पद्धतीनें उच्चारांत तो ग्रंथ असतो त्या प्रमाणं तो उतरुन घेतला जातो अशा वेळीं चुकांमध्यें आणखी भर पडते. उदाहरणार्थ एकच शब्द निरनिराळ्या रीतीनें लिहिला जाणे, जसें ना--ना (नाहीं-नाहीं या अर्थी) हा शब्दच ना णा, णा ना, णा णा असे एकाच नकलकाराकडून लिहिले जातात. आणि-आनि, प्राण-प्रान वगैरे अनेक उदाहरणे देतां येतील. अशा प्रसंगीं एकाच योग्य पद्धतीनें शब्द लिहिण्याचा स्वीकार केला पाहिजे.

(१०) ग्रंथकाराची मूळ भाषा जुनी झाल्यानें समजेनाशी होते व ग्रंथ सर्व सामान्य लोकांना समजणे हा उद्देश असतो तेव्हां तर ग्रंथाचें पुष्कळच आधुनिकीकरण होतें. या प्रकाराकडेहि लक्ष्य देणे जरूर आहे हें लिहिले पाहिजे असें नाहीं.

(११) नकलकाराच्या अनवधानानें, लेखनिकाच्या कांहीं अक्षरांच्या वळणामुळें व काहीं सवयीमुळें दोष निर्माण होतात. उदा. लिहितांना आडवी बारकी रेघ मारीत लिहिणे, मात्रा अथवा काना देत लिहिणे, अनुस्वार देत लिहिणे. आपली प्रत तयार करतांना याकडे पाहिले पाहिजे.

(१२) जिल्हानिहाय अथवा जातिनिहाय व्याकरण भेद आढळतात त्यांचा शुद्ध प्रत तयार करण्यापूर्वी अभ्यास व्हावा लागतो.

वर ठोकळ मानानें ज्या गोष्टींकडे संशोधकाचें लक्ष्य असावयास पाहिजे त्या निर्देशिल्या आहेत. शुद्ध प्रत सिद्ध करतांना या सर्व बाबी ध्यानांत घेणे जरूर असते.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे मूळ ग्रंथकाराचा ग्रंथ कसा असणे शक्य आहे तें ध्यानीं घेऊन पाठ सिद्ध करणे हा संशोधना बाबतचा एक प्रकार झाला. आणखी एक प्रकार हि आहे व तोहि फार महत्त्वाचा व पुष्कळ संशोधकांना मान्य असल्यानें त्याच्या संबंधि थोडेसे लिहिणे अवश्य आहे.

प्रथम मिळतील तितकी हस्त लिखितें एकत्र करून त्यांत पूर्ण व जुनें कोणते आहे तें पाहून त्यास आधार प्रत समजण्याची, व ती जशी आहे तशीं काना मात्रेचाहि फरक न करतां—वर छापावायाची व खालीं इतर प्रतींतील पाठ नोंदावयाचे. वर मूळात जो पाठ अशुद्ध अथवा अग्राह्य वाटतो त्याच्या खालीं नागमोडी रेघ काढावयाची व खालील पाठभेदांतील जो पाठ योग्य वाटतो त्याचे खालीं सरळ रेघ द्यावयाची.

कांहींची पद्धत अशी कीं आपण सिद्ध केलेली संहिता वर छापावायाची पण असें करतांना इतर प्रतींतील जे पाठ स्वीकारिले असतील ते पाठ निरनिराळ्या प्रकारांच्या कंसांत द्यावयाचे व खालीं पाठ भेदांत त्या-त्या ठिकाणचे

सर्वांत जुन्या व साधारणतः आपण आधार प्रत म्हणून स्वीकारलेल्या प्रतींतील पाठ जसेच्या तसे द्यावयाचे.

वर, संशोधना नंतर व आधीं काय-काय काळजी घ्यावी लागते व प्रत सिद्ध झाल्यावर ती कसकशी छापली जाणे शक्य आहे ते सांगितले. शुद्ध प्रत सिद्ध केल्या नंतर ती छापतानां कोणताहि प्रकार अवलंबिला तरी प्रत्येक प्रकारांत कांहीं गुण व कांही दोष हे असणारच. पूर्णपणें निर्दोष असें काम होऊंच शकत नाहीं, शक्य तों तें निर्दोष करण्याचा प्रयत्न करणे एवढेच संशोधक करुं शकतो. असें करतांना आपण कोणती पद्धत अवलंबिली आहे तें सांगणें संपादकास अवश्य असते व म्हणून मी कोणत्या प्रकारें प्रत सिद्ध केली व छापली आहे तें आतां लिहितो.

## मी अवलंबिलेली सम्पादनाची व छपाईची पद्धत—

भा. इ. सं. मंडळाची प्रत ही आधार प्रत म्हणून कशी स्वीकारण्यांत आली तें वर सांगितलें आहेच. प्रथम ती वर देऊन व जे शाब्दिक दोष ते साध्या कंसांत सुरुवातीस कांहीं ओव्यांत द्यावयाचे ठरविले. त्याचप्रमाणे मूळांत जे शब्द अथवा ओव्यांचे चरण सुटले ते इतर प्रतींतून ठराविक निरनिराळ्या कंसांत द्यावयाचे ठरवून त्या प्रमाणे मुद्रण प्रत हि तयार केली पण ती महानुभावीय वाङ्मयाचे अधिकारी संपादक प्राचार्य डॉ० वि० भि. कोलते यांच्या नजरे खालून गेल्यानंतर त्यांनीं कांहीं सूचना केल्या त्यांचा मी यथामति स्वीकार केला. त्या प्रमाणे सुरुवातीस कांहीं ओव्यामध्यें कंसांत शब्द शुद्ध करून देण्याचे ठरविले होते ते सोडून मूळांतच शब्द शुद्ध करूनच दिले आहेत. उदाहरणार्थ मूळांत 'आणि' हा शब्द आनि व आणि या दोन्ही प्रकारांनीं लिहिलेला तो 'आणि' करून शक्य तो सर्व ठिकाणीं लिहिला आहे. त्याच प्रमाणे 'ना ना' चा 'ना णा' अथवा 'णा णा' असलेला सर्व जागीं 'ना ना' असा केला आहे. या प्रमाणे बऱ्याच दुरुस्त्या केल्या आहेत पण असें करतांनां मूळ भाषेस धक्का न लागेल याची काळजी घेण्यात आली आहे. जे शब्द अथवा चरण अथवा ओव्या सुटल्या आहेत त्या इतर प्रतींतून घेऊन, प्रतींनां दिलेल्या

चिन्हां प्रमाणे प्रत समजण्या करितां चिन्हें देऊन, मूळांत घातल्या आहेत. पाठभेदांत आधार प्रतींतील बदलेले शब्द, चरण अथवा ओव्या जशाच्या तशा दिल्या आहेत. वाचकांच्या सोई करितां पाठभेद खालीं न देतां स्वतन्त्र पणे दिले आहेत.

संतोषमुनीनें आपल्या काव्याच्या ३२०० ओव्या असल्याचा स्पष्ट उल्लेख शेवटीं केला आहे. हस्तलिखितें तपासून पहातां त्यांत कमी जास्त ओव्या आढळतात. पण शेवटीं मात्र ३२०० चा उल्लेख बहुतेक सर्व पोथ्यांतून आहे. त्यामुळें ३२०० ओव्यांची निश्चिति करणें अवश्य होते व ती तशी केली आहे. असें करतांना पुनरुक्ति असलेल्या व अप्रस्तुत आढळलेल्या ओव्या काढून टाकल्या आहेत व अवश्य पण गळलेल्या ओव्या घेतल्या आहेत. रचना, स्थल व काल निर्देशक ओव्या मूल ग्रन्थापेक्षां निराळ्या मानल्या आहेत.

संतोषमुनीचें हें काव्य इ. स. १८९१ मध्यें कोणी छापलें आहे. त्यांत प्रसंगास अध्याय म्हटलें असून ते त्यांत २८ आहेत. २८ प्रसंगांची एकच एक हस्तलिखित प्रत असल्याची नोंद माहुरच्या श्रीदत्तलक्षराज कवीश्वर महानुभावांनी केलेल्या महानुभाव हस्तलिखितांच्या यादींत आढळते. ही यादी श्री. कृष्णदास महानुभावांच्या संग्रहातून मिळाली ही एक पोथी सोडली तर इतर सर्व पोथ्या पंचवीस प्रसंगांच्याच आहेत. छापील प्रत तपासतां असें आढळून आलें कीं मूळांतला २१ वा प्रसंग "आतां असो हा वीररसु अती" (प्र. २१ ओ. २०६) या ओवीनंतर तोडून पुढील भागाचा २२ वा अध्याय केला आहे. त्याच प्रमाणे २३ व्या प्रसंगाचेहि, ओवी १२७ नंतर तोडून, २४ व २५ असे दोन अध्याय केले आहेत. या प्रमाणे २५ प्रसंगाचेच २७ अध्याय झाले असून शेवटीं २८ वा अध्याय जास्तीचा जोडला आहे. तो ३५ ओव्यांचा अनुक्रमणिकाध्याय आहे. मूळ काव्याच्या मात्र ३२०० च ओव्या आहेत. या छापील प्रतीच्या अध्याय रचने वरुन असें वाटतें कीं ग्रंथाच्या सप्ताहास रोजचे चार अध्याय व अजमासे ४५० ओव्या बसाव्यात असा यांत प्रयत्न केला आहे. ही छापील प्रत बरीच अशुद्ध आहे शिवाय कांही ओव्या

स्वतंत्रपणे रचून घातलेल्या आहेत. मात्र इतक्या पूर्वी ती छापण्याचें धैर्य दाखविल्या बद्दल त्या प्रकाशकास धन्यवाद देणे जरूर आहे. ही प्रतहि आतां दुर्मिळ झाली आहे. ही श्री. कृष्णदास महानुभावांनी श्रमपूर्वक मिळवून मला पहावयास दिली या बद्दल त्यांचा मी आभारी आहे. असो.

**ग्रंथनाम–**

या ग्रंथास रुक्मिणी स्वयंवर असें नांव न देतां "रुक्मिनी सैंवर" असें दिलें आहे त्याचा खुलासा येथें करणेंच योग्य होईल असें वाटते. प्राचीन महानुभावीय वाङ्मयांत स्वयंवर या शब्दाच्या ऐवजी "सैंवर" हा प्राकृत शब्दच वापरलेला बहुधा आढळतो. नरेंद्र (ओ. ४९), महदंबा (मातृकी स्वयंवर ओ. १०७) यांनीं "सैंवर" शब्दाचाच आपल्या काव्यांत उपयोग केल्याचा आढळ होतो. संतोषमुनीनें आपल्या या काव्यांत स्वयंवर हा शब्द कोठेहि लिहिला नसल्याचें आढळून येईल. तो "सैंवर" हाच शब्द केवळ सर्वत्र लिहितो. त्याच प्रमाणे तो "रुक्मिणी" च्या ऐवजी "रुक्मिनी" च बहुतेक सर्वत्र लिहितो, फक्त प्रास साधावयाचा असेल तर मात्र तो "रुक्मिणी" असा योजतो. शेंकडा ८० पेक्षां जास्त वेळां त्यानें "रुक्मिनी" असेंच नांव योजिलें आहे. शिवाय प्रसंगांचे शेंवटीं संकलनांत तो "रुक्मिनी सैंवर" अशीच शब्द योजना करतांना आढळतो. सर्व जुन्या हस्त लिखितांत हेंच नांव दिसून येतें. हा संतोषमुनीचा–कदाचित् त्याच्या तोंडांत बसलेला अथवा अन्य कांहीं कारणामुळें प्रिय झालेला-विशेष असल्यानें तो जशाचा तसा ग्रंथनामा करितां नियुक्त करावा हें योग्य वाटलें. अजून आपणांस वृद्ध स्त्रियांच्या तोंडीं असाच शब्द प्रयोग आढळून येतोच. ग्रंथकारानें स्वतः योजलेल्या नांवांत आपण विनाकारण ढवळाढवळ कां करावी ?

असो, येथवर संशोधनाची दिशा व मी अवलंबिलेली पद्धति यांचा विचार केला. आतां पुढील विषयाकडे वळूं.

## महानुभावीयांची ग्रंथ निर्मिति :—

मराठीतील पहिला ग्रंथ 'विवेकसिंधु' समजला गेला आहे. तो शके १११० मधील असल्याबद्दलचा समज तूर्त कोणत्याहि वादांत न पडतां मान्य

करून त्यानंतर लवकरच झालेले ग्रंथ कोणते असावेत या बद्दल विचार करतां महानुभावांनीं लिहिलेल्या ग्रंथांकडेच वळावें लागेल. विवेकसिंधु व भास्करभट्ट बोरीकराचें 'शिशुपाल वध' यांच्या दरम्यान बरीच मराठी ग्रंथरचना झाली. त्यांत महानुभावांचा भाग फार मोठा होता या बद्दल शंका नाहीं. या सवाशे वर्षांच्या काळांत ( शके ११९० ते १२३५ ) जी ग्रंथ निर्मिति झाली तीकडे पाहातां त्याचे अगोदरहि बरीच वाङ्मय निर्मित्ति असावी. पण काळाच्या उदरांत ती गडप झाली असावी. निदान आज तरी ती उपलब्ध नाहीं. महानुभावीय व महानुभावेतर मंडळींनी आपापलें तत्त्वज्ञानपर दृष्टिकोन जनतेमध्यें प्रसृत होण्या-करितां मराठीचीच कांस धरली. महानुभावीयांच्या काय अथवा इतरांच्या काय, ग्रंथांमध्यें भाषेबद्दलचा विशेष व योग्य अभिमान दिसतो.

## प्राचीन मराठी वाङ्मयाचा आधार—

प्राचीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास करतांना असें दिसून येतें कीं बहु-संख्य लिखाण महाभारत, रामायण व भागवतादि पुराणें यांच्यावर आधारित आहे. भारतीय साहित्याचा इतिहास पहातां असें स्पष्ट दिसतें कीं या प्राचीन संस्कृत साहित्याचा आधार घेऊन मराठी भाषेमध्यें जितकें वाङ्मय लिहिलें गेलें तितकें इतर भारतीय भाषांमध्यें लिहिलें गेलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांचा दर्जाहि मराठी इतका उच्च नाहीं सर्वसाधारणपणें असेंहि दिसून येतें कीं स्वयंवर आख्यानांवर मराठींत जितकी रचना झाली आहे तितकी इतर कोणत्याहि भाषेंत झाली नाहीं. शिवाय त्यामध्यें छंद, रचनापद्धति वगैरे दृष्टीनें विविध ताहि चांगलीच आहे पुन्हां बारकाईनें पाहिल्यास असें दिसून येतें कीं 'रुक्मिणी स्वयंवर' आख्यानावर जितकी काव्यरचना झाली आहे तितकी इतर स्वयंवराख्यानांवर झाली नाहीं. "रुक्मिणी स्वयंवराख्यानें" हाच एक अभ्यासा करितां मोठा विषय होऊं शकेल इतके महत्त्वपूर्ण व विपुल लेखन त्यावर झालें आहे. सीतास्वयंवराख्यानाचा क्रमांक त्या खालोखाल लागेल.

श्रीचक्रधरांनीं सुरू केलेल्या महानुभाव-पंथांत श्रीकृष्णाच्या उपासनेस विशेष महत्त्व आहे. त्यामुळें श्रीकृष्णचरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांवर पंथीयांनीं

वरीच ग्रन्थरचना केली आहे. श्रीकृष्णांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार त्यांनीं आपल्या दृष्टिकोनांतून उद्धव गीता, भगवद्गीता, ज्ञान प्रबोध वगैरे ग्रंथ लिहून केला तर भागवत, पद्मपुराणादींच्या आधारें श्रीकृष्णांच्या लीलांचीं वर्णनें, भक्तिभावपूर्ण अंतःकरणानें, निरनिराळी काव्यें लिहून केली आहेत. श्रीकृष्णचरित्रांतील रुक्मिणी स्वयंवर कथेवर त्यांचा विशेष भर दिसतो. महदंबेचे धवळे प्रासंगिक गीतांच्या स्वरूपाचे असून सुद्धां त्यांत काव्यगुण विशेषत्वानें दिसतात. स्त्रीगीतांत यांना फार वरचें स्थान देणे प्राप्त आहे. त्यांत रुक्मिणी स्वयंवराचें कथानक संपूर्णपणें पण थोडक्यांत गाइलें गेलें आहे तरी त्यांत आगळी गोडी आहे. नरेंन्द्र हा एक अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा कवि होऊन गेला. यानें पंथामध्यें जाण्याच्या अगोदर रुक्मिणी स्वयंवरावर शके १२१४ मध्यें आपलें प्रसिद्ध काव्य लिहिलें. मूळांत तें १८०० ओव्यांचे होते असें म्हणतात पण आजतरी त्याच्या फक्त ८७९ ओव्याच उपलब्ध आहेत, तरीपण त्या काव्यानें आपलें असें स्वतन्त्र स्थान मराठी वाङ्मयांत मिळविलें आहे. महानुभावीयांचे रुक्मिणी स्वयंवर आख्यानावर खालील ग्रंथ सध्यां ज्ञात आहेत.

१ महदंबेचे धवळे. रचन शके १२१०
२ रुक्मिणी सैंवर-नरेंद्र-रचना शके १२१४
३ नारो व्यासकृत रुक्मिणी सैंवर, रचना शके १२८० सुमारे.
४ नारोव्यास कृत रुक्मिणी पत्रिका रचना शके १२८० सुमारे
५ नृसिंह कवीकृत रुक्मिणी सैंवर रचना शके १३२५
६ संतोषमुनि कृष्णदास कृत रुक्मिनी सैंवर र. श. १४१६
७ एल्हण कवीकृत अष्ट विवाह र. श. १४८० सुमारे
८ कृष्णमुनि अथवा कवि डिंभकृत रुक्मिणी सैंवर र. श. १५२४
९ गोपाळ कवीकृत रुक्मिणी सैंवर
१० लक्ष्धीर कृत रुक्मिणी सैंवर र. श. १५४५ सुमारे
११ मंडळीक एल्हण कृत रुक्मिणी सैंवर र. श. १५८०

१२ आयमुनि कारंजकर कृत रुक्मिणी सैंवर र. श. १५८४ सुमारे

१३ प्रेमाबाई कपाटीन–रुक्मिणी स्वयंवर ओव्या १०१

१४ बालकृष्ण कवी संन्यासी–रुक्मिणी स्वयंवर अध्याय २०

१५ मलयनाथ तळेगांवकर–रुक्मिणी स्वयंवर ओ. ३७०

१६ चिमाबाई पाळेकर–रुक्मिणी–स्वयंवर ओव्या १२३

१७ विधीचंद शर्मा–रुक्मिणी विवाह–हिंदी

१८ बहादूर–रुक्मिणी विवाह–उर्दु

१९ माहिंभटानें धवळे उत्तरार्ध लिहिला आहे.

महानुभावांच्या प्रमाणे महानुभावेतर मराठी कवींनीहि रुक्मिणी स्वयंवर कथेवर बरीच रचना केली आहे. त्यांतील मुख्य मुख्य काव्यांचा निर्देश करणे आहे.

१ एकनाथ महाराजकृत रुक्मिणी स्वयंवर. श. १४९३

२ सामराजकृत रुक्मिणीहरण.

३ विठ्ठलकवीकृत रुक्मिणी स्वयंवर र. श. १५९६.

४ जयराम स्वामी वडगांवकर कृत रुक्मिणी स्वयंवर.

५ नागेश कवीकृत रुक्मिणी स्वयंवर

६ सखारामतनयकृत रुक्मिणी स्वयंवर.

७ अनंतसुत मुद्गलकृत रुक्मिणीहरण.

८ मोरोपंत कृत रुक्मिणीहरण गीत.

९ वामनपंडितकृत रुक्मिणीपत्रिका.

१० कृष्णात्मज कृत रुक्मिणी स्वयंवर.

या शिवाय अजून प्रकाशात न आलेलीं बरीच काव्यें असण्याचा संभव आहे. भागवत दशम स्कंधावर ज्या-ज्या टीका आहेत त्या-त्या मध्यें रुक्मिणी स्वयंव-

रावर लेखन आहेच. यामध्यें बहिरा जातवेद, गंगाधर, शिवकल्याण, माधवात्मज, मोरोपंत, श्रीधर (हरिविजय) वगैरेंचे ग्रंथ येतात. श्रीचक्रधर निरूपित श्रीकृष्णचरित्रांत ही कथा आली आहेच.

याप्रमाणे पाहूं जातां रुक्मिणी स्वयंवरावर मराठी मध्यें लहान मोठीं कमीत कमी पंचवीस तीस तरी काव्यें आहेत हें निःसंशय. दुर्दैवानें यापैकी निम्मी रचना सुद्धां अजून छापून प्रसिद्ध झालेली नाहीं.

**रुक्मिणी स्वयंवराकडे विशेष ओढा कां ?**

पुराणांतरीं इतकी निरनिराळी स्वयंवरावर आख्यानें, उपाख्यानें असतांना रुक्मिणी स्वयंवरावरच मराठी मध्यें विपुल रचना आढळते यांचें कारण काय असावें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. श्रीरामचंद्रप्रभु व श्रीकृष्ण या दोन्ही देवतांच्या उपासना सबंध भारतांत सर्वत्र आढळतात, असें असतांना सीता-स्वयंवरावरील काव्यांची संख्या मोजकीच आहे त्यामानानें रुक्मिणी स्वयंवरावर विविध प्रकाराचें व विविध कालीं लेखन झालें आहे. हें असें कां याचा थोडासा विचार येथें केल्यास योग्य होईल असे वाटते.

श्रीरामचंद्र व श्रीकृष्ण या दोन अवतारांची कार्यक्षेत्रें भिन्न आहेत. त्यांचे अवतार अगदीं भिन्न कालीं व भिन्न परिस्थितींत झाले आहेत. श्रीरामचंद्र प्रभूंचा स्वभाव व श्रीकृष्णांचा स्वभाव यामध्येंहि फार फरक आहे. श्रीरामचंद्र आदर्श पुरुष आहेत. त्या आदर्शाप्रमाणे मनुष्यानें व्हावें हें योग्य असले तरी अत्यंत कठिण किंबहुना अशक्य आहे. श्रीरामचंद्र व सीता यांच्या स्वयंवरांत गुंतागुंत बिलकुल नाहीं. सर्व कांहीं व्यवस्थित व धोपटमार्गानें घटना घडत आहेत. त्यामुळें सीतास्वयंवराचें कवीनां, भक्तिभाव सोडला तर, विशेष आकर्षण वाटत नाहीं. तसें श्री कृष्ण चरित्राचें व विशेषत: रुक्मिणी स्वयंवराचें नाहीं. श्रीकृष्णाचें सबंध जीवन व्यावहारिक आहे. नुसतेंच आदर्श नाहीं. त्यामुळें आपल्या रोजच्या व्यवहाराशीं कृष्णचरित्र अगदीं संबंधित वाटतें. असें असून सुद्धां त्यांत अद्भुतताहि भरली आहे.. त्याच्या जन्मदिनापासून किंबहुना त्याच्या जन्माच्याहि अगोदर पासूनच त्याच्या चरित्रांतील गुंतागुंत सुरू होते म्हटलें तरी

चालेल. जन्म झाला एकाचे पोटीं, वाढला दुसऱ्याकडे, व उपयोगी पडला तिसऱ्यांनां असें जें त्याचें वर्णन आहें ते अगदीं यथार्थ असून त्यामुळेच त्याच्या कडे सर्व जनमानस आकर्षिलें जाते. त्याच्या बाललीला, त्याचे तारुण्य सुलभ शृंगारिक खेळ त्याची आबाल वृद्धांशीं व निर्धन श्रीमंतांशीं मैत्री, स्त्रीस्वभावाचें त्याचें अवलोकन व त्या त्या स्वभावा प्रमाणे त्यांचे त्यांचेशीं त्याचें वर्तन वगैरे गोष्टी रोजच्या व्यवहारांतील दर्शन घडवून देणाऱ्या आहेत. तो जसा व्यवहारी तसा तत्त्वज्ञहि होता. नुसता पढ़िक तत्वज्ञ नव्हे तर तत्त्व व व्यवहार यांची उत्तम सांगड घालणारा कृतिशील असा तो असल्यानें सामान्य व असामान्य दोन्ही तऱ्हेच्या लोकांची मनें त्याच्या चरित्रानें आकर्षून घेतली असली तर नवल नाहीं.

रुक्मिणी स्वयंवर प्रसंग अशाच प्रकारें मनास आकर्षणारा आहे. आधुनिक नवल कथाच आपण जणूं वाचतो असें वाटावें इतकें तें स्वयंवराख्यान नवल पूर्ण आहे. नुसतें नवलपूर्णच नसून सर्व घटना सत्यकथेंतीलहि आहेत. या आख्यानास स्वयंवराख्यान म्हटलें असलें तरी पूर्वीं राजे लोक वधूगृहीं एकत्र जमत व त्या जमलेल्यांतून वधू आपला पति निवडीत असे, तसा प्रकार येथें नाहीं. तरीपण हें स्वयंवरच आहे कारण रुक्मिणी श्रीकृष्णाची निवड स्वयं करते. फक्त निवड करते इतकेंच नव्हे तर आई वडिलांच्या परोक्ष श्रीकृष्णाकडे सुदेवास पत्रिका देऊन पाठविते व त्यास बोलावून घेते. हा प्रकार एखाद्या आधुनिक कादंबरींत शोभण्या जोगा आहे. इतकें करून पुन्हां कुलाचाराच्या मर्यादा ओलांडित नाहीं. मोठा भाऊ विरुद्ध असतांना व त्याच्या आग्रहास पिता बळी पडला असतांना तिनें कुशलतेनें आपलें कार्य तडीस नेलें आहे.

या आख्यानांत जशी अद्भुतता आहे तसा काव्यांमध्यें अवश्य असा रसपरिपोषहि उत्तम तऱ्हेनें साधण्यास संधि आहे. शृंगारा पासून शांता पर्यंत सर्व रसांनां वाव मिळण्याजोगा या कथेंत लवचिकपणा आहे.

विवाह संस्थेतील दोन टोंकें, राक्षस विवाह व ब्राम्ह विवाह हीं दोन्ही या कथानकांत मिळतात. राक्षस विधींत सांगितल्या प्रमाणे श्री कृष्णानें रुक्मिणीस

पळवून नेऊन विवाहाचा एक प्रकार साधला पण समाजामध्यें स्थैर्य व नीतिमत्ता यांची आवश्यकता असल्यानें त्यांच्या परिपोषास अवश्य असा वेदोक्त विवाहहि त्यानें केला. अशीं या कथेंत अनेक वैशिष्टयें आहेत. त्यामुळें कवीनां आपली प्रतिभा प्रगट करण्यास इच्यांत पूर्ण संधि आहे. श्री कृष्णाच्या लीलामय चरित्रानें भारावलेल्या भक्तास या कथेचें विशेष आकर्षण वाटलें तर नवल काय ?

सर्व पुराणामध्यें भागवताचें स्थान कांहीं आगळें आहे. व्यासांना भारत लिहूनहि मानसिक समाधान वाटलें नाहीं, कांहीं तरी सारखी हुरहुर वाटूं लागली तेव्हां नारदांनी त्यास कोरड्या तत्त्वज्ञानानें अथवा ऐहिक व्यवहार कुशलतेनं खरें सौख्य लागत नाहीं, भक्तीची जोड नसेल तर सर्व व्यर्थ आहे म्हणून कृष्णभक्तिकरितां श्रीकृष्णाचें चरित्र गाण्याच्या दृष्टीनें भागवत रचना कर असें सांगितल्या वरून व्यासांनीं भागवत लिहिलें. त्याच भागवतांतील हें गोड आख्यान मराठी कवीनीं विशेषत्वाने निवडलें हें योग्यच केलें असेंच म्हणावें लागतें.

महानुभाव पंथामध्यें कृष्णभक्तीवर फार भर आहे. त्यांनीं श्रीकृष्णाच्या आयुष्यांतील एक अत्यंत रमणीय प्रसंग निवडून श्रीकृष्णाचें गुणगान करण्याकरितां त्याचा उपयोग केला. त्यांच्या रुक्मिणी स्वयंवर काव्यांनीं विशेषतः संतोषमुनीच्या काव्यानें सर्व मराठी घरांत प्रवेश केला असें दिसतें. महानुभावीयांना द्वैती अथवा फारतर विशिष्टाद्वैती म्हणू शकूं. त्यांच्या काव्यांनीं न कळत त्यांची विचारसरणी मनावर–विशेषतः स्त्रियांच्या—परिणाम करित आहे हें पाहून नाथांनीं आपलें अद्वैत मत प्रतिपादक असें रुक्मिणी स्वयंवर लिहिलें. व नाथांनीं लिहिल्या नंतर इतरांनां स्फूर्ति होणे साहजिक आहे. अशा रीतीनें मराठींत रु. स्व. काव्येंच फार दिसतात.

**संतोषमुनी व रुक्मिनी सैंवर रचना—**

महानुभाव कवींनीं रचलेल्या रक्मिनी सैंवर काव्यांत संतोषमुनि कृष्णदासाच्या काव्यास फार महत्त्व आहे. साती ग्रंथांत नरेंद्राच्या रुक्मिनी सैंवरास

क्र. ९६८८ नों. दि. ८८११।५४

जरी स्थान मिळालें असलें तरी तो ग्रंथ अपूर्ण आहे. संतोषमुनींनें एकेपरीं नरेंद्राचेंच कार्य पूर्ण केलें आहे असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. नरेंद्र व संतोषमुनि यांच्या रचना पद्धतींत विलक्षण साम्य आहे. संतोषमुनींच्या ग्रंथास 'प्रसाद ग्रंथ' मानला जातो तसा स्पष्ट उल्लेख पौषादाख्यानें आपल्या ग्रंथांत केलाच आहे 'आनि हा वरेंदी असे ग्रंथेः म्हनौनी मार्गी प्रतीती जालीया असती बहुतेः' (२५-१५९) संतोषमुनि विरक्त असल्यानें ते तीर्थ यात्रा करीत आपला काल घालवीत असेंहि पौषदाख्यानें म्हटलें आहे. या संतोषमुनींची विशेष कांहीं माहिती मिळत नाहीं. त्यानें आपला ग्रंथ गोदातीरावरील कुंकुमठाण येथें लिहिण्यास प्रारंभ केला व श्रीनगर (सिन्नर) येथें लिहून संपविला. कुंकुमठाण हें गांव अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत संवत्सरच्या दक्षिणेस १ मैल आहे. येथें श्री चक्रधरांनीं वस्ति केली होती यामुळे पंथीयांत त्यास तीर्थस्थानाचें महत्त्व आहे. (स्थान पोथी पान ३४). श्रीनगरी अथवा सिन्नर हें गांव नासिक जिल्ह्यांत नासिक शहरा पासून आग्नेय दिशेस २० २१ मैलावर आहे. या गांवीं भीलमठींत श्रीचक्रधरांनीं वस्ति केली होती (स्थान पोथी पा. २८)

संतोषमुनि कृष्णदासाचें नांव काय असावें या बद्दलहि निश्चितता नाहीं. त्याचें नांव संतोषमुनि कां कृष्णाचादास संतोषमुनि ! कृष्णाचादास म्हणजे कृष्ण परमात्म्याचा दास कां कृष्णमुनि नांवाच्या गुरुचा दास ? या बाबत विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. मात्र 'संतोष' हें त्याचें नांव असावें असें म्हणावयास जागा आहे. खुद्द कवीनें, ओव्या २४.८८ २५.११३ २५.१२२ व शेवटीं, "कवि संतोषमुनी म्हणे" असें म्हटलें आहे. संतोषा मुनीनें आपली गुरुपरंपरा रुक्मिणी स्वयंवरांत दिली नाहीं. हा पारमांडल्य-आम्नांयांतील भानोव्यासाचा शिष्य असल्याचें श्री य. खु. देशपांडे त्या आम्नायाच्या वंशवृक्षांत दाखवितात (महानुभावीय मराठी वाङ्मय). महंत गोपीराज महानुभावांच्या संग्रहांतील सकळी लिपीतील पोथीच्या छापील मलपृष्ठावर "कवि संतराज लासूरकर कृत" असें हातानें लिहिलें आहे अर्थात् ही माहिती नंतरची दिसते. तिच्या बद्दल कोठे खुलासा मिळत नाहीं.

पौषदाख्यानें अ. २५ ओ. १५५ मध्यें "लासूरोंर्गें संज्ञा जाणा: संतोषाचार्य मुणी मणा:" असें म्हटलें आहे त्यावरून शके १६४१ मध्यें त्यास संतोषमुनीच म्हणत असत, कृष्णदास हें त्याचें नांव समजत नसत असें स्पष्ट दिसतें. पौषदाख्यानें त्याची गुरुपरंपरा अथवा वंश-संबंध दिला नाहीं. इतरहि कोणती माहिती अद्याप उजेडांत आली नाहीं.

रू. सैं. रचनाकाल–

संतोषमुनीच्या 'रुक्मिनी सैंवर' काव्याच्या रचना काला बद्दलहि थोडा घोटाळा झालेला दिसतो. कै. वि. ल. भावे, पांगारकर वगैरेंनीं शके १४७६ मध्यें याचें लेखन झालें असें म्हटलें आहे. परंतु असें म्हणतांना संतोषमुनीनें ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या मिति व वार यांचेशीं शकाचा मेळ बसतो कीं नाहीं याचा नीट विचार केला गेला नाहीं असें म्हणावें लागते. संतोषमुनि आपल्या ग्रंथांत लेखन काल नमूद करतो तो असा–

"गुरुवार सुद्ध फाल्गुनु: द्वितीया तीथी आनंद दीनु :
तैं श्रीनगरीं ग्रंथ जाला संपुर्नु: श्री रुक्मिनी सैंवर: ।। ३२०२ ।।
ऐंसा समग्र हीं जाला ग्रंथु: सीध्द पावला मासा येका आंतु:
कवी संतोषमुनी म्हने श्री कृष्णनाथु: पावो प्रीती स्वामि माझा: ।।३२०३।।"

पौषादाख्यानें शोधन केलेल्या ग्रंथांत "शके चवदा सतें पच्याहत्तरी: १४७५ द्वितीया तीथी फाल्गुन मासाभीतरी: शुद्धें पक्षें गुरुवारी: आनंद संवत्सरे जाणे:" (१५४-२५) असें म्हटलें आहे. यांत "आनंद दीन" याचें स्पष्टीकरण "आनंद संवत्सर" असें आलें आहे. पौषदाख्यानें शके १४७५ लिहिल्यामुळें, पण त्यावर्षी आनंद संवत्सर न येतां तो १४७६ मध्यें येत असल्यानें, बहुतेकांनीं शके १४७५-७६ असा जोडशक दिला आहे. (म. सा. पान ९३७). भारत इतिहास संशोधक मंडळातील प्रसिद्ध संशोधक श्री. ग. ह. खरे यांनीं पिले जंत्रीवरून मला जी माहिती कळविली तिच्या प्रमाणे शके १४७६ मध्यें आनंद संवत्सर येतो, परंतु फाल्गुन शुद्ध द्वितियेस शनिवार येतो, गुरुवार येत नाहीं तो फक्त शके १४१६ मध्यें येतो. शके १४१६ मध्यें फाल्गुन शुद्ध द्वितिया गुरुवारीं १ घटिका ४४ पळानंतर येत असल्यानें ग्रंथ-

कारानें द्वितिया चालू झाल्यानंतर ग्रंथ संपविल्या कारणानें द्वितियाच आपल्या ग्रंथांत निर्दिष्टिली आहे हें उघड आहे. (त्या दिवशीं दिनांक २६ फेब्रुआरी १४९७ हा येतो). तेव्हां शके १४१८ फाल्गुन शुद्ध द्वितिया गुरुवार हा रुक्मिनी सैंवराच्या रचनेचा समाप्तिदिन समजणें प्राप्त आहे. हा ग्रंथ त्यानें फक्त १ महिन्यांत लिहून संपविल्याचेंहि आपल्या ग्रंथांत म्हटलें आहे.

संतोपमुनि विरक्त होते व ते आपला काल तीर्थयात्रा करीत घालवीत असत अशी माहिती पौपदाख्यानें दिली आहे. सिन्नर मधील भीलमठींत त्यांनीं आपला ग्रंथ लिहून संपविला व त्याच वेळीं त्यांनीं आपला देह ठेविला असावा असें दिसतें, कारण पौपदाख्यानें ग्रंथ शोधनाची त्यास आवश्यकता कां भासली हें सांगतांना म्हटलें आहे—

"जरी म्हणालें अशोधी ग्रंथें काय म्हनौनी होता :
तरी ते वीरहे पुरुषें होते ग्रंथकर्ता :
म्हनौणी ते देवदर्शना गेले शीघ्रता :
तयासी वीसरें वीयोग ण साहे :" ।। अ. २५ ओवी १५८ ।।

मार्गीयांस परंपरेनें ही गोष्ट माहीत असावी म्हणूनच पौपदाख्यानें ती नमूद करून ठेविली आहे. भोलमठींत श्रीचक्रधरांनीं कांहीं काल वास्तव्य केलें होतें व त्यामुळें त्या मठास तीर्थस्थानाचें महत्त्व प्राप्त झालें होतें. संतोपमुनीस काव्य समाप्त करून श्रीकृष्ण सेवा केल्याचा, व तोहि त्या पवित्र क्षेत्रांत, आनंद इतका झाला असावा कीं त्यानीं त्या भरांत देह ठेवला असावा असें वरील उल्लेख पाहातां वाटते.

## रुक्मिणी स्वयंवर कथेचे आधार—

संतोपमुनीच्या जीवन कथेचा व त्याच्या ग्रंथाच्या रचनाकालाची चर्चा केल्यानंतर रुक्मिणी स्वयंवराच्या आधारांचा शोध घेणें अवश्य आहे. रुक्मिणी स्वयंवर काव्यांचे मुख्य आधार भागवत, पद्मपुराण, विष्णुपुराण, ब्रह्मवैवर्तपुराण, हरिवंश वगैरे प्राचीन ग्रंथ होत. त्यांत श्रीकृष्णचरित्राचा विशेष भर भागवताच्या दशम स्कंधावर असून त्यांतील तीन अध्यायांमध्यें (५२-५३-५४)

श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या विवाहाची कथा आली आहे. इतर पुराणांत थोड थोडे फरक हि आहेत. प्रथम भागवतांत ही कथा कशी आली आहे तें थोडक्यांत पाहूं व नंतर इतर ग्रंथांत कायकाय महत्त्वाचे फरक दिसतात तेहि संक्षेपानें पाहूं.

## ( अ ) भागवत

भीष्मक नांवाचा विदर्भ देशाचा राजा होता. त्यास पांच मुलगे व सहावी मुलगी होती. मोठ्या मुलाचें नांव रुक्मि व मुलीचें नांव रुक्मिणी. आपल्या घरीं आलेल्या सत्पुरुषांनीं केलेली श्रीकृष्णाच्या सौंदर्य, पराक्रम, ऐश्वर्य वगैरेंची वर्णनें ऐकून तोच आपल्यास योग्य पति होय असें तिनें मनाने ठरविलें. श्रीकृष्णानेंहि तेंच ठरविलें होतें. रुक्मि व श्रीकृष्ण यांचें वैर असल्यानें रुक्मिणीनें त्याचा मित्र शिशुपाल याच्याशींच रुक्मिणीचा विवाह ठरविला व भीमकानें नाइलाजानें त्यास संमति दिली. रुक्मिणीस हें कळतांच ती खिन्न झाली. तिनें श्रीकृष्णाकडे एक ब्राह्मण निरोप देऊन पाठविला कीं तिची इच्छा श्रीकृष्णाशीं विवाह व्हावा अशी आहे, परंतु रुक्मी तिच्या इच्छेच्या आड येत असून त्यानें तिचा विवाह शिशुपालाशीच करावयाचें निश्चित केलें आहे. तरी श्रीकृष्णानें कुंडिनपुरास तात्काळ येऊन ती गिरिजेच्या दर्शनास कुलाचारा प्रमाणे येईल तेव्हां तिचें हरण करावें व तिजशीं राक्षस विधीनें विवाह करावा. असें जर न घडेल तर ती प्राणत्याग करील. श्रीकृष्ण, विवाह नक्षत्र ध्यानांत आणून, त्या ब्राह्मणासह आनर्त देश ओलांडून एका रात्रींतच कुंडिनपुरास पोंचला.

इकडे भीष्मक व शिशुपालपिता दमघोष आपापल्या राजधान्यांत विवाहापूर्वीची धर्मकृत्यें करूं लागले. ती आटोपल्यावर दमघोष, शिशुपाल व इतर राजांसह, कुंडिनपुरास आला.

श्रीकृष्ण व तो ब्राम्हण कुंडिनपुरास आल्यावर ब्राम्हणानें चिंतातुर अशा रूक्मिणीस श्रीकृष्ण आल्याचें सांगितलें. ब्राम्हणास देण्यास योग्य असें पारितोषिक न दिसल्यानें तिनें त्याला नुसता नमस्कारच केला.

श्रीकृष्ण एकटाच गेलेला पाहून व युद्धाची शक्यता ओळखून

बळराम सैन्यासह कुंडिनपुरास आला. भीष्मकानें श्रीकृष्ण व बळराम यांचें स्वागत करून त्यांस राहण्यास योग्य अशी जागा दिली. श्रीकृष्णास पहाण्यास सर्व नागरिक स्त्री पुरुष आले व रुक्मिणीस श्रीकृष्णच योग्य पति आहे असें म्हणूं लागले.

इतक्यांत रुक्मिणी अंतःपुरांतून संरक्षित अशी बाहेर पडून अंबिकेच्या मंदिरास गेली. तिच्या बरोबर तिच्या मैत्रिणी व दासीहि होत्या. मंदिरांत आल्यावर तिनें हातपाय धुतले व शुद्ध आणि शांत अंतःकरणानें ती अंबिके जवळ गेली व तिची तिनें मनोभावें प्रार्थना केली कीं श्रीकृष्णाशींच तिचा विवाह व्हावा. नंतर एका दासीचा हात धरून ती मंदिरांतून बाहेर पडली. तिच्या सौंदार्यानें तेथें जमलेले वीर मूर्च्छित पडले. श्रीकृष्णानें तिला आपल्या रथांत घेतली व तो निघून गेला.

तो अपमान सहन न होऊन जरासंधादि सर्व राजे श्री कृष्णाचा पाठलाग करीत निघाले. परन्तु बळाराम, गदादि यादवांनीं त्यांचा पराभव केला. त्यामुळें रुक्मि चिडून श्रीकृष्णावर चाल करून आला. त्याचा श्रीकृष्णानें पराभव केला व त्यास, रुक्मिणीच्य विनंतिवरुन ठार न मारतां फक्त अवमानित करून, सोडून दिला. रुक्मिणीस फरवाईट वाटलें. त्यावेळीं बळरामानें तिला उपदेश केला व तिचें सांत्वन केलें.

नंतर ते सर्व द्वारकेस आले व श्रीकृष्ण व रुक्मिणी यांचा यथाविधि विवाह झाला. लक्ष्मी स्वरूपीं रुक्मिणीशीं लक्ष्मीपति श्रीकृष्ण युक्त झालेला पाहून तेथें जमलेल्या कुरु, सृंजय, विदर्भ, यदु आणि कुंति कुलांतील मंडळींना व द्वारकेतील सर्व नागरिक स्त्रीपुरुषांना अत्यंत आनंद झाला. या प्रमाणें भागवतांतील अगदीं महत्त्वाचा असा कथाभाग आहे.

## (आ) पद्म पुराण—

भागवता नंतरचा आधार पद्मपुराणाचा. महानुभावी या दोन पुराणांचाच उल्लेख करतात. पद्मपुराणांत ही कथा उत्तर कांडांत अध्याय २७४ व २७५

अशा दोन अध्यायांत आली आहे. दोन्ही अध्याय मिळून या कथेला ४९ श्लोक दिले आहेत. मूळ भागवताशीं या कथेचा फरक पाहूं.

रुक्मीनें रुक्मिणीचा शिशुपालाशीं विवाह ठरविला होता तो तिला पसंत नव्हता, कारण ती बालपणापासूनच विष्णूवर प्रेम करीत होती. तिनें पुरोहितपुत्राला द्वारकेस कृष्णाकडे पाठविला. त्यानें बलराम व कृष्ण या दोघांना एकांतांत सर्व कांहीं सांगितलें. राम व कृष्ण दोघेहि कुंडिनपुरास गेले. तेथें सर्व राजे विवाहसोहळा पहावयास आले होते. विवाहसमयीं रुक्मिणी दुर्गेची पूजा करावयास गेली असतां संध्याकालाचा फायदा घेऊन श्रीकृष्णानें त्या रथस्थ रुक्मिणीचें हरण केलें. जरासंध प्रभृति युद्धास सज्ज झाले त्यांचा बलरामानें पराभव केला. रुक्मीचा कृष्णानें पराभव केला व त्याचें मुंडण करून त्यास सोडून दिलें. रुक्मि कुंडिनपुरास न जातां तेथेंच राहिला.

श्रीकृष्ण बलरामासह रथांत बसून आपल्या वाड्यांत गेला. नंतर द्वारकेमध्यें त्यानें समारंभपूर्वक वेदोक्त विधीनें रुक्मिणीशीं विवाह केला. तें दांपत्य द्वारकेंत सुखानें राहिलें.

### (इ) विष्णुपुराण–

विष्णुपुराणांत पांचव्या अंशांत २६ व्या अध्यायांत फक्त ११ श्लोकांत ही कथा आली आहे. त्यांत रुक्मिणीनें निरोप पाठविला वगैरे कांहीहि मजकूर नाहीं. फक्त श्रीकृष्ण, बलराम वगैरे यादवांसह, रुक्मिणीचा शिशुपालाशीं होणारा विवाह पाहण्याकरितां आला होता. त्यानें विवाहाच्या आदलें दिवशींच रुक्मिणीचें हरण केलें तेव्हां युद्धहि झालें. सर्वांचा यादवांनीं पराभव केला. रुक्मीलाहि जिंकलें व राक्षस विधीनें रुक्मिणीशीं श्रीकृष्णानें विवाह केला. फक्त एवढीच कथा विष्णुपुराणांत आहे.

### (ई) हरिवंश–

हरिवंशामध्यें विष्णुपर्वांत रुक्मिणी स्वयंवराची एक निराळीच कथा सत्तेचाळीस ते बावन्न या सहा अध्यायांमध्यें आली आहे. तिचा मूळ रुक्मिणी स्वयंवराशीं विशेषसा संबंध नाहीं. श्रीकृष्ण व बलराम गप्पा गोष्टी करीत

असतां गुप्तचरांनीं येऊन सांगितलें कीं कुंडिनपुरांत रुक्मीची धाकटी बहीण रुक्मिणी इचें स्वयंवर होणार असून त्याकरितां तेथें अनेक देशांचे राजे सैन्यासह जमले आहेत. तें ऐकून श्रीकृष्ण यादववीरांसह, सैन्य बरोबर घेऊन विदर्भास गेला. श्रीकृष्णाच्या पराक्रमाची माहिती असलेल्या जरासंधादि वीरांनीं श्री कृष्णाचें वैर यावेळीं न साधतां स्वयंवर निर्विघ्नपणें पार पडावें असें मनांत आणलें. पण श्रीकृष्णाच्या चतुराइनें सर्वच गोष्टीनां कलाटणी मिळाली. भीमकानें स्वयंवर न करतां तिचा योग्य अशा वराशीं विवाह करण्याचें ठरविलें. त्यामुळें श्रीकृष्ण व सर्व इतर राजे आपापल्या देशास निघून गेले. श्रीकृष्णाच्या चातुर्याची रुक्मिणीस कल्पना आली व त्याच्याशींच आपला विवाह व्हावा अशी आपली इच्छा असल्याचें सखींचे जवळ तिनें बोलून दाखविलें.

श्रीकृष्णानें कांहीं कालानंतर रुक्मिणीस मागणी घातली पण रुक्मीनें कंसाचा वध करणाऱ्या श्रीकृष्णास आपली बहीण द्यावयाची नाहीं, ती शिशुपालासच द्यावयाची असा निश्चय केला. जरासंधानें शिशुपाला करितां रुक्मिणीस मागणी घातली व भीमकानें त्या मागणीला कबुली दिली. चेदि देशाचा राजपुत्र शिशुपाल यास बरोबर घेऊन जरासंध विदर्भनगरीस आला.

बलराम व श्रीकृष्णहि, सर्व पराक्रमी यादवांना बरोबर घेऊन विदर्भनगरीस पोंचले. क्रथ व कैशिक यांनीं त्यांचें स्वागत केलें व गांवाबाहेर त्यांची राहण्याची व्यवस्था केली.

दुसरे दिवशीं विवाह व्हावयाचा असल्यामुळें चार घोड्यांच्या रथामध्यें बसून इंद्रइंद्राणींच्या दर्शनास कुलाचारा प्रमाणें रुक्मिणी, परिवार व सैन्य बरोबर घेऊन, आली असतां ती श्रीकृष्णाच्या नजरेस पडली तिचें सौंदर्य पाहून तो मोहित झाला व बलरामाशीं संकेत करून रुक्मिणीचें हरण करण्याचें त्यानें ठरविलें. रुक्मिणी देवदर्शन घेऊन देवालयाच्या बाहेर येतांच एकदम तिला उचलून श्रीकृष्णानें आपल्या रथांत घेतली व बलरामादींच्यावर चैद्यांचे बरोबर लढण्याचा भार टाकून त्यानें द्वारकेचा रस्ता सुधारला.

रुक्मीस झाला प्रकार कळल्या बरोबर तो संतप्त झाला व श्रीकृष्णाचा पराभव करून रुक्मिणीस परत न आणल्यास कुंडिनपुरांत पाय ठेवणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून त्यानें श्रीकृष्णाचा पाठलाग केला. नर्मदातटाकीं दोघांची गांठ पडून तुमुल युद्ध झालें व रुक्मीचा पराभव झाला. रुक्मिणीच्या विनंती-वरून श्रीकृष्णानें त्यास जीवदान दिलें. रुक्मी भोजकटक नगर स्थापून तेथें राज्य करूं लागला व श्रीकृष्ण रुक्मिणीसह द्वारकेस आला. बलराम वगैरे वीर, जरासंध वगैरेंचा पराभव करून, द्वारकेस आले. नंतर श्रीकृष्णानें रुक्मिणीचें यथाविधि पाणिग्रहण केलें.

हरिवंशांतील या कथेंत रुक्मिणीची पत्रिका नाहीं व त्यामुळें ब्राम्हणहि नाहीं. भीमक स्वयंवरांतील दोष दाखवितो व साध्या विवाहाची महति गातो हा भाग यांत जास्त आहे. याचा उपयोग महानुभावीय कवींनीं कसा करून घेतलेला आहे हें पुढें दिसेलच.

(५) ब्रम्हवैवर्तपुराण—

ब्रम्हवैवर्त पुराणांत कृष्णजन्म खंडांत अध्याय १०५ ते १०९ मध्यें श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह कथा आली आहे. इतर पुराणापेक्षां यांत कांहीं निराळ्या गोष्टी आहेत.

भीमक सभेंत बसला असतां रुक्मिणी विवाहास योग्य झाली आहे तरी कोणता वर तिला योग्य होईल असें तो सर्वांना विचारतो. गौतम पुत्र शतानंद जो कुलपुरोहित होता, तो सांगतो "परमेश्वरी इच्छे प्रमाणें पूर्वीच ठरलें आहे कीं द्वारकाधीश श्रीकृष्णाबरोबरच हिचा विवाह व्हावयाचा. तरी तूं तिकडे ब्राम्हणास पाठवून त्याला बोलावून घे व त्याचेशीं इचा विवाह करून दे." शतानन्दाच्या भाषणानें भीमक प्रसन्न झाला. यामुळें रुक्मी रागावला व जर कृष्ण या नगरींत विवाहाच्या इच्छेनें आला तर त्यास ठार मारीन, शिशुपाल शूर आहे त्यासच रुक्मिणी देणं योग्य होय असे तो म्हणाला. त्यानें कृष्ण निंदाहि बरीच केली. मुलाच्या इच्छे प्रमाणे राजानें सर्व राजांनां बोलाविलें सुधर्मा नांवाचा विप्र उग्रसेनाकडे पत्रिका देऊन पाठविला उग्रसेनास फार

आनंद झाला व श्रीकृष्णास उत्तम पोषाख देऊन कुंडिनपुरास जाण्याची त्यानें तयारी केली. बरोबर शेष, ब्रम्हा, गणेशवगैरेना हीं घेतले. बलदेव, वसुदेव, नंद, अक्रुर, सात्यकी, सर्व कौरव व पांडव, भीष्म, द्रोण, कर्ण वगैरे सर्वांसह तो गेला. ते सर्व कुंडिनपुरास आले तेव्हां आठी दिशांना सुसज्ज सैन्य दिसलें. बलरामानें त्या सर्व सैन्याचा पराभव केला. शस्त्रें व अस्त्रें यांच्या सहाय्यानें युद्ध झालें. नंतर या मंडळींनीं नगरांत प्रवेश केला. कृष्णास पहाण्यास देवकन्या आल्या. श्रीकृष्णाचें रुप पाहून देवतादिकांनां मूर्च्छा आली. रुक्मिणी बरोबर श्रीकृष्णाचा समारंभ पूर्वक विवाह झाला. त्याचे मातापितादि सर्व त्या लग्नास आले होते. रुक्मिणीस भीमकाच्या सात मुलांनीं आपली असें म्हटले. या पुराणांत रुक्मिणीच्या आईचें नांव सुभद्रा असें आले आहे. यांत मंगलाष्टकांचीहि कल्पना आली आहे (अ. १०९ श्लो. ९–१०). या पुराणांत बलरामानें कुंडिनपुराच्या आठी दिशानां असलेल्या सैन्याचा, विवाहाच्या अगोदर, पराभव केल्याचें सांगितलें असून रुक्मिणीहरणाचा प्रकार यांत नाहीं. रुक्मिणीचा निरोप घेऊन जाणारा ब्राह्मण नाहीं, रुक्मीशीं युद्ध नाहीं, उलट भीमकाचे सात (?) मुलगे विवाहास अनुकूल दाखविले आहेत. एकंदरींत ब्रह्मवैवर्त पुराणांत रुक्मिणी विवाह कथा इतर पुराणा पेक्षां अगदींच निराळया तऱ्हेनें सांगितली आहे. या पुराणांतील कांहीं कल्पना महानुभावीयांनीं उचललेल्या दिसतात उदाहरणार्थ श्रीकृष्णाच्या माता, उग्रसेन, वसुदेव, सात्यकी, नंद, पांडव–अर्जुनच फक्त–कुंडिनपुरास श्रीकृष्ण बलराम वगैरेंच्या बरोबर असल्याचा उल्लेख. या मध्यें महानुभावीयांनीं आणखी कांही भर घातली आहे ही गोष्ट वेगळी. आठी दिशांना सुसज्ज सैन्याची कल्पनाहि त्यांनीं उचललेली आहे.

### श्री चक्रधर निरूपित रुक्मिणी स्वयंवर–

स्थूल मानानें वर दिल्याप्रमाणें पुराणांमध्यें रुक्मिणी स्वयंवर कथा कशा सांगितल्या आहेत तें आपण पाहिलें. महानुभावीय व तदितर कवींनीं यावरच मूलतः आपलीं काव्यें आधारिलीं असलीं तरी महानुभावीयांनीं इतरहि बरेच फरक केले आहेत व त्या फरकापैकीं कांहीं फरक महानुभावीयेतर

कवींनीं स्वीकारले आहेत. त्याचें मूळ आपणांस, नुकतेच (१९५९) सालीं मुंबईच्या मराठी संशोधन मंडळानें प्रसिद्ध केलेल्या, "श्री चक्रधर निरूपित श्रीकृष्ण चरित्र" या ग्रंथांत मिळणार आहे. हें चरित्र महंत गोपीराज महानुभाव यांनीं संशोधन करून प्रसिद्ध केलें असल्यानें तें विश्वसनीय आहे हें निराळे सांगावयास नको. मराठी संशोधन मंडळानें हें प्रसिद्ध करून मोठीच कामगिरी केली आहे. हें श्रीकृष्ण चरित्र म्हणजे मराठी भाषेंतील भागवत दशम स्कंधावरील पहिली टीका होय. या चक्रधर निरूपित श्रीकृष्ण चरित्रापैकीं रुक्मिणी स्वयंवर कथेचा जरूर तेवढाच भाग येथें द्यावयाचा आहे. हें चरित्र महदंबा व श्रीचक्रधर यांच्या प्रश्नोत्तर रुपानें आहे. रुक्मिणी स्वयंवराचा भाग पृ. ८१ ते ८५ मध्यें आहे. तो मूळांतच वाचावा इतका तो महत्त्वाचा आहे, पण स्थलाभावीं येथें संक्षेपानें अवश्य तेवढाच तो देत आहे.

विदर्भदेशाचा राजा भीमक. त्याची राजधानी कौंडण्यपुर. त्यास त्याच्या सुधामती राणी पासून पांच पुत्र व एक कन्या झाली. मोठ्या मुलाचें नांव रुक्मि व मुलीचें नांव रुक्मिणी. रुक्मिणीस सातव्या वर्षी सुदेव ब्राह्मणाजवळ त्यानें शिकण्यास ठेविले. तिनें सातव्या वर्षापासुन तीसवर्षेपर्यंत विद्याभ्यास केला. मग एकदां ती सभेस आली. भीमकानें तिला उजव्या मांडीवर बसविली. तिचें उद्धात लावण्य पाहून त्यास चिंता वाटूं लागली. तों तेथें नारद आला. त्याला रुक्मिणीचें लावण्य पाहून विस्मय वाटला. तो भीमकास म्हणाला "राजा तुझिये कुमारीचें अनुपम्य लावण्यः हे श्रीकृष्णा योग्य:" इतक्यांत तेथें रुक्मिणीदेवीचीं "विद्यावंतें" सामोरी आलीं. तिनें रुक्मिणीदेवीच्या वर्णनपर गीत म्हटलें. तें ऐकून नारदास फार आनंद वाटला व श्रीकृष्णास हीच योग्य पत्नी आहे असें भीमकास सांगून तो द्वारकेस गेला. "नारदाचें वचन आइकौनि रुक्मिणीदेवीसि श्रीकृष्ण चक्रवर्तीचि आवडी संचरैली:" तिनें मदनमुद्रा या नांवाच्या दासीस बोलावून तिला द्वारकेस जाऊन श्रीकृष्णाचें लावण्य, चातुर्य, सौंदर्य पाहून येण्यास सांगितले. ती मदनमुद्रा द्वारकेस गेली. इकडे नारदानें श्रीकृष्णास रुक्मिणी संबंधी माहिती सांगितली. त्याच वेळीं कल्याणकीर्ति भाट, वेदघोष नांवाच्या किन्नरासह तेथें आला. श्रीकृष्णानें त्याचें उत्तम प्रकारें

आदरातिथ्य केलें. कल्याणकीर्तीनें श्रीकृष्णाची प्रशंसा केली किन्नरानें गायन केलें. इतक्यांत मदनमुद्रा तेथें आली. नारदानें तिला रुक्मिणी प्रबंध गाण्यास सांगितलें. पण ती म्हणाली कीं आम्ही तो नेहमीच गातो आज तुम्ही गा. नारदानें तो गाइला. श्रीकृष्ण प्रसन्न झाला. त्यानें सर्वांस 'बहुडा' दिला व आपल्या महालांत गेला. मदनमुद्रा तेथून कौंडिण्यनगरास आली व तिनें रुक्मिणीस श्रीकृष्णाचे षड्गुण सांगितले. रुक्मिणीस श्रीकृष्णाचा अधिकच वेध लागला. या प्रमाणे वर्ष गेलें.

"मग एकु दीं वैशाखीं पूर्णमेचां दिवशीं रुक्मिणीदेवी सखिआं सहितु सभेसि गेली: भीमकें पाचारौनि सव्य जानूवरि बैसविली: उपवर देखौनि राआसि चिंता प्रवर्तली; मग रायें प्रधानाकडे पाहिलें: प्रधानें चिंता जाणौनि भणतलें: जी जी देवा कुमरीचें स्वयंवर करावें: रायें न्यायें मार्गें स्वयंवर निराकरिलें: तंव सकल देश हिंडत हिंडत किन्नरासहित कल्याणकीर्ति वैदर्भासि आला: रायें तेयासि आफाउनि थोरु मानु केला: रुक्मिणीदेवीचें रूप देखौनि कल्याण कीर्ति संतोखला:" भीमकानें त्यास हा किन्नर कोण म्हणून विचारलें. त्यानें किन्नराचा वृत्तांत सांगितला. भीमकाच्या इच्छेवरून किन्नरानें भरतखंडांतील अनेक राजांची माहिती सांगितली रुक्मिणीनें त्यांच्या बद्दल औत्सुक्य दाखविलें नाहीं. तेव्हां श्रीकृष्णाची गुण कीर्ति त्यानें वर्णिली. रुक्मिणीनें तें कृष्णवर्णनपर गायन मोठ्या उत्कंठेनें व भावनेनें ऐकिलें. भीमकानें "कल्याण कीर्तिसि त्यागु दिन्हला: रुक्मिणीदेवींहि दिन्हला:" मग कल्याण कीर्ति किन्नरासह आपल्या बिन्हाडीं गेला.

"मग रायें प्रधानासि संप्रधारु केला: जे कुमरी श्रीकृष्णासि देआवी: तें रुक्मिअें मोडिलें: शिशुपाळु वरु मानिला: तआसि मूळ पाठविलें: मग रुक्मिणी देवी विरहज्वरेंसिं आपुलेआ गारुळगणासि गेली: तिअेसी भावकळना प्रधानकण्या अनेक उपचारु केले:" उपचारांचा उपयोग न झाल्यानें भावकळनेनें मनोगत जाणलें, रुक्मिणीनेंहि सांगितलें. भावकळनेनें रुक्मिणीचा पुरोहित जो सुदेव त्यास बोलाविलें, त्यास सर्व हकीकत सांगितली व श्रीकृष्णास आणण्याची कामगिरी त्याचेवर सोंपविली. त्यानें श्रीकृष्णास चारदिवसांत

आणण्याचें अभिवचन दिलें. मग रुक्मिणीनें पत्रिका लिहिली, त्याचे हाती दिली व निरोपहि सांगितला. त्याचे बरोबर लवाजमा दिला व त्यास द्वारकेस पाठविला. सुदेव द्वारकेस आला. राजवाड्यांत त्यानें प्रवेश केला. सभामंडपांत श्रीकृष्णाची भेट झाली. श्रीकृष्णानें सुदेवाचें स्वागत केलें. "सुदेवें अेकांतु मागतैला मग रुक्मिणीदेवीचा वेधु सांगौनि श्रीकरीं ताडपत्रिका ऊळगविली: श्रीचक्रवर्ती पत्रिका व चितांची बीजें करावयाचि प्रवृत्ति जाली: सुदेवें भणतलें: जी जी: चौ दिवसां मो सर्वज्ञास आणीन अैसी प्रतिमाकु केली से: चौ दिवस उपरी सर्वज्ञ बीजें करिति तरि रुक्मिणी देवी प्राणु न राखे:" श्रीकृष्णानें सुदेव निघते वेळीं रुक्मिणीची कशी अवस्था होती असें विचारतां तो म्हणाला "जी जी: मी निगालां तेंव्हेळि नीगतां रुक्मिणी देवीं मज वीडा देओं आदरिला तिअें हातिचीं पाणें सूकिलीं करपैलीं: अेका धूं निगाला भणऔनि दूसरा वीडा देओं आदरिला तव तेंही सूकलीं करपैलीं: तेथही धू निगाला भणऔनि सांडौनि: तोहि तैसाचि जाला: पाणें पळवा केलीं भणऔनि हडपनीसि कोपिन्हली. मग कर्पुरें वीडा देऊं आदरिला: तंवं हाति जाळु जाला: तेणें करूनि जय जय मंगळ मंगळा श्रीपरममंगळरूपा हे जति भणऔनि तुमतें ऊवाळिलें: अैसा अवस्वरू होता जी:" रुक्मिणीच्या विरहाची दहावी अवस्था आहे, उशीर केल्यास ती प्राण सोडील हें जाणून श्रीकृष्ण सुदेवासह द्वारकेस जाण्यास निघाला. बळराम, उग्रसेनादीनां ही बातमी गुप्तहेरांनीं कळविली. "मग उग्रसेन: बलभद्रदेऊं : उद्धवदेऊं पालाणौनि चातुरंग सैण्येंसीं वैदर्भासि चाली केली: श्रीकृष्णचक्रवर्तीचीअे भेटी अर्जुनदेऊं आले होते: तेही आपुलेनि सैण्येंसिं सवें चालीले: अेरे दिवसीं अर्जुनदेव उग्रसेनु मुख्य समस्तां यादवां मार्गी श्रीकृष्णचक्रवर्तीसीं भेटी जाली:" इकडे शिशुपालादिकांसह दमघोष कौंडण्यपुरास आला. सुदेव नगरा जवळ येतांच रुक्मिणीस श्रीकृष्ण आल्याची बातमी सांगण्या करितां पुढे गेला. त्यानें रुक्मिणीस ती वार्ता सांगितली. रुक्मिणीस फार आनंद झाला. श्रीकृष्ण कुंडिनपुरात आल्या वेळीं ती बाहेर सज्जांत त्यास पहाण्यास उभी होती. सुदेवाने बोटानें त्यास दाखविलें. आतुरतेनें तिकडे पहात असतां तिची झेंप गेली. सुदेवानें तिला सांवरलें. श्रीकृष्ण आल्याचें

अ.क्र. ८००५० दि: ०११०४ ... ८८४ नों. दि: २८।१५५८

ऐकून भीमक सामोरा गेला. त्यानें श्रीकृष्णाचें यथोचित आतिथ्य केलें व त्यास अंबिकेच्या देवळाजवळ जानोसा दिला. मग रात्रीं रुक्मिणीनें सुदेवाहातीं श्रीकृष्णास रुखवत पाठविलें. सुदेवा बरोबर श्रीकृष्णानें प्रसाद पाठविला.

"एरीकडे रुक्मिआचेनि निरूपें साभूत होऊनि चैद्यादि राजे जागे घालु लागिले: एरीकडे पाहातांचि यादवीं सैन्य पालाणिलें: इतुकेनि चैद्यादि राज्य गजबजलें: मग उग्रसेन मुख्य यादव सर्व सैण्येसी गेले तें गुप्तियें येऊनि जरासंधासि जाणविलें: इतुकेनि तआंसि संदेहो पडला: श्रीकृष्णु आला काई: आणि गेला काई: तंव रुक्मि तेथ आला: तआसि जरासंधें पुसिलें: रुक्मिअें भणतलें: कृष्ण भेउनि पळाला: सत्य जाणा असआं उदेआं कृष्ण कासील तरि तआसि मीचि अेकला पळवीन: अैसे बोलोनि गेला:"

उग्रसेनादि यादव गेल्या नंतर श्रीकृष्ण बलराम व अर्जुन अंबिकेमागे झाडांच्या आड लपून राहिले. प्रातःकाळीं सुदेवाच्या सल्ल्याने अंबिकेच्या यात्रेस जाण्याचा बेत करून तिनें आईस विचारलें. सुधामतीनें राजास विचारलें व त्यानें प्रधानाच्या विचारानें रुक्म नसतांना आपल्या धाकट्या भावा बरोबर सन्य वगैरे देऊन रुक्मिणीस अंबिकादर्शनास पाठविलें. बरोबर सुदेव होताच. रुक्मिणीच्या लावण्यानें सर्व "विरहातें पावले". रुक्मिणीनें यथाविधि देवीची पूजा केली. सुवासिनींना वायनें दिलीं. "मग रुक्मिणी देवी सुदेवाचा करू धरुनि अंबिकेसि प्रदक्षिणा केली: तंव अंबिकेमागें सुदेवाचेनि विचारें रुक्मिणी देवीचें सैन्य राहिलें होतें तआंत श्री कृष्णचक्रवर्ती बळभद्रदेव अर्जुन मिळाले: रुक्मिणी देवी सुदेवेंसीं अंबिकेमागें प्रदक्षणे लागी गेली: मग सुदेवें श्रीकृष्ण चक्रवर्तीतें भणतलें: जी जी आपुली राणीं संभाळंजो: इतुकेनि श्रीकृष्णचक्रवर्ती रुक्मिणी देवीसी श्रीकर देऊनि रथीं वाइलें: मग रुक्मिणीदेवीं श्रीकृष्णचक्रवर्तीसि माळ घातिन्हलीं: एरीकडे किन्नराचें कवच फिटलें:" नंतर श्रीकृष्णानें चैद्यादिकांना आव्हान देऊन रुक्मिणीस घेऊन तो यादवां मध्यें गेला. इकडे बळराम व अर्जुन दोघेहि तेथेंच थांबले. त्या दोघांनींच सर्व शत्रुसैन्याचा धुव्वा उडविला. इतक्यांत उग्रसेनप्रमुख सर्व सैन्य तेथें आले. जरासंधादिकांशीं युद्ध झालें. "मग श्रीकृष्णचक्रवर्ती बळभद्रदेव

अर्जुन देवीं अघवे राजे पराभविले: मग रुक्मिआ आला: तो श्रीकृष्ण चक्रवर्तीसि जुझेला: मग तेआतें धरीनि विटंबीनि सोडिलें: ऐसें जयतवादी होऊनि श्रीकृष्ण चक्रवर्ती यादवांसि द्वारावतीये चालिले: सर्वेचि मागौनि भीमकु सर्व सैन्येंसीं चालीला: भीमकें मूळ महादेवीं मेल्यकारु दिन्हला: लग्न लाविलें.···· मग श्रीकृष्णचक्रवर्ती समस्तां सहितु द्वारकेसि बीजें केलें: तेथ महोत्साहो जाला: मग भीमकु आपुलेआं नगरासी आला:अर्जुनदेवादि मग आपापुलेआं नगरासी गेले, श्रीकृष्णचक्रवर्त्ती द्वारावतीए राज्य करूं लागले ।।”

श्री चक्रधरांनीं निरुपिलेल्या रुक्मिणी स्वयंवराचा मुद्दामच एवढा विस्तृत सारांश दिला आहे. मूळांतील सबंध भागच अत्यंत महत्वाचा आहे. रुक्मिणी स्वयंवर काव्यांच्या अभ्यासास, विशेषतः महानुभावीय कवींच्या कृतींच्य अभ्यासास, याचा फार उपयोग होणार आहे. यांतील बऱ्याच कल्पना महानुभावेतर कवींनीं उचललेल्या दिसतील. विशेषतः कल्याणकीर्ति भाटव किन्नर महानुभाव यांनीं घेतलेले दिसतील तर त्यांतील कल्याण कीर्तिस जरा नांव बदलून तदितरांनीं घेतला दिसेल. श्रीचक्रधरांनीं सांगितलेला नारद भेटीचा भाग, नरेंद्र, संतोषमुनि वगैरेंनीं अथवा एकनाथ, सामराज वगैरेंनीं घेतला नाहीं पण तो भाग बहिरा पिसा यानें आपल्य भैरवी टीकेंत घेतलेला दिसेल. (भैरवी टीका. अध्याय ५२ ओव्या ७९–८३).

भागवतादि पुराणांत किन्नराचें पात्र नाहीं. तें श्रीचक्रधरांनीं निर्माण केलें आहे पण ती कल्पना त्यांना तरी कोठून सुचली असावी याचा छडा लावण्याचा प्रयत्न मी माझ्या “कवि नरेंद्राचा किन्नर” (म. सा. पत्रिका जुलै १९६२) या लेखांत केला आहे. त्याचप्रमाणे रुक्मिणीनें श्रीकृष्णाकडे निरोप देऊन पाठविलेल्या ब्राह्मणाचें नांव श्रीचक्रधर ‘सुदेव’ असें देतात. तें त्यांना कसें सुचलें असेल व पत्रिकेची कल्पना सुद्धा त्यांनीं कोठून घेतली असेल याचा शोध मी माझ्या “सुदेव व रुक्मिणी पत्रिका–थोडा शोध” या लेखांत लावण्याचा प्रयत्न केला आहे (म. सा–पत्रिका आक्टो-डिसेंबर १९६० सुदेव हें नांव सर्व मराठी कवींनीं स्वीकारलें आहे. तीच गोष्ट पत्रिकेची श्री चक्रधरांनीं रुक्मिणी सभेंत आल्या वेळीं भीमकाच्या मांडीवर बसली असें म्हटलें

आहे. सर्व महानुभावीय कवी तसेच वर्णन करतात व पंथीय याद्दष्टीनें बरोबरहि वाटते. महानुभावेतर कवींमध्यें फक्त वहिरा जानवेद (पिसा) सोडला तर इतर कोणीहि तें मत स्वीकारलें नाहीं. व तें योग्यच होय. असो.

रुक्मिणी स्वयंवर काव्यांचे मुख्य मुख्य आधार येथवर पाहिले. महानुभावीय व तदितर कवींनीं कोणता भाग कोठून घेतला, त्याचा काव्याचा परिपोष होण्याच्या दृष्टीनें कोणी कसा वापर केला, कोणी कोणाचें किती अनुकरण केलें, कोणी कोठे नवीन कल्पना उपयोगांत आणिल्या वगैरे सर्वच अभ्यास फार उपयुक्त व मनोरंजक आहे. परंतु या सर्व विषयांचा सविस्तर उहापोह करण्यास अवकाश नसल्यामुळे कांहीं ठळक गोष्टींचा, व विशेषिकरुन संतोषमुनीच्या काव्याच्या दृष्टीनें, फक्त निर्देशच करणें प्राप्त आहे.

## आधारांचा वापर —

संतोषमुनीनें आपण भागवत व पद्मपुराण यांच्या आधारावरच रुक्मिनी सैंवर काव्य लिहीत असल्याचे म्हटले असलें तरी वस्तुस्थिति तशी नाहीं. त्यानें या पुराणांचा आधार घेतला आहेच परंतु श्री चक्रधर निरुपित श्रीकृष्ण चरित्रांतील रुक्मिणी स्वयंवर प्रकरणाचा विशेषत्वानें उपयोग केला आहे. या शिवाय नरेंद्राच्या रुक्मिनी सैंवराचें त्यानें बरेच अनुकरण केले आहे. असे असूनहि त्यानें आपली स्वतंत्र प्रतिभा अनेक ठिकाणीं दाखविली आहे. संतोषमुनीचे अनुकरण एकनाथ महाराज व इतर कवीनीं केलेलें दिसून येईल.

संतोषमुनीच्या रुक्मिनी सैंवराची सुरवात नरेंद्राप्रमाणेच होते, तरीपण तो स्वतंत्रपणा अनेक ठिकाणी दाखवितो. उदाहरणार्थ भीमकास स्वयंवराची कल्पना पसंत नव्हती, ही हरिवंशांतील माहिती नरेंद्र आपल्या काव्यांत मांडतो हें खरें, पण तो तें वाईट कां यास इतिहासाचे दाखले देत नाहीं तर संतोषमुनि कांहीं उदाहरणेंहि देतो. श्रीचक्रधरहि म्हणतात "रायें न्यायें मार्गें स्वयंवर निराकरिलें" कदाचित् या वाक्याचाच खुलासा नरेंद्र व संतोषमुनि आपापल्या रीतीनें करीत असावेत. नारद श्रीकृष्ण भेटीचें वर्णन नरेंद्र किन्नराचें तोंडी कालतो व नारदानें देवीचा प्रबंध गाइला हें सांगतो (ओवी ३४१) तर

संतोषमुनि तो भाग सांगत नाहीं; फक्त दोन ठिकाणीं श्रीकृष्णानें किन्नरास दिलेल्या माळेचा उल्लेख करतो (प्र २ ओ १२५ व प्र ६ ओ ९४) त्यावरून किन्नराची व श्रीकृष्णाची भेट सुचवितो. असे नरेंद्र व संतोषमुनि यांच्यांत फरक दिसतील. नरेंद्रानें निरनिराळया देशांचें व तेथील राजांचेंच फक्त वर्णन केलें आहे. संतोषमुनि पुराणांच्या पंचलक्षणानुसार खंड उपखंड वगैरेंच्या व्याख्या, त्यांची नांवे, लांबीरूंदी व वजनांची कोष्टकें देतो. नवद्वीप, सप्तसागर पर्वत, देवतादिकांची वस्तिस्थानें हीं सर्व देऊन आपल्या काव्यास पुराणाची प्रतिष्ठा आणण्याचा प्रयत्न करतांना तो दिसतो. नरेंद्र इतका महत्त्वाकांक्षी दिसत नाहीं.

संतोषमुनि, नरेन्द्रा प्रमाणें, फक्त राजेरजवाडे यांचीं वर्णनें करून थांबत नाहीं. तो भीमकाच्या सभेचें वर्णन व त्यांतील भीमकाचें स्थान, कुसभा व सुसभा, देव, दैत्य व मानवसभा यांचेंहि वर्णन करतो. असें करतांना राजाचे प्रधान कसे असावेत, स्वतः राजा कसा असावा, त्यांचें आचरण कसें असावें, त्यांची कर्तव्यें कोणती वगैरे अनेक विषयानां तो स्पर्श करतो. हा सर्वच भाग संतोषमुनीच्या काव्यांत स्वतंत्र असून एकनाथ महाराज, अथवा विठ्ठल या पैकीं कोणीही त्याचें अनुकरण केलें नाहीं. रुक्मिणीची विरहावस्था, त्यावरील उपचार, ते करणाऱ्या दासींचीं नांवें वगैरे सर्व संतोष मुनि व नरेंद्र सारख्याच रीतीनें करतात. त्यांत जो थोडा फार फरक आहे तो विशेष महत्त्वाचा नाहीं. श्रीचक्रधरांनीं भावकळना तेवढीच सांगितली आहे. मदनमुद्रा ही ही एक सखी व नृत्यांतील रुक्मिणीची सहाध्यायिनी श्रीचक्रधरांनीं सांगितली आहे पण तो भागच नरेंद्र व संतोषमुनींनी गाळला असल्यानें तिची दासीमध्यें गणना केली नाहीं. नरेंद्र मदनमुद्रेचा फक्त एकदां ओझरता उल्लेख करतो ( ओ. ३४० ). बहिरा जातवेद रुक्मिणीच्या मुख्य दासीचें नांव 'जयंति' असें देतो.

महानुभावीयांनी, श्रीचक्रधरांनीं सांगितल्या प्रमाणें, रुक्मीनं शिशुपाळाशीच रुक्मिणीचा विवाह व्हावा असा आग्रह धरल्यामुळें व भीमकानें त्यास होकार दिल्यामुळें रुक्मिणी मूर्छित पडली असें सांगितलें आहे. एकनाथ

महाराजांनीं मात्र अगदीं निराळें कारण दिलें आहे. ते म्हणतात श्रीकृष्णाचें वर्णन ऐकून रुक्मिणीची बाह्यस्फूर्ति मावळली. हृदयांत श्रीकृष्णाची मूर्ति आविर्भवलि व त्यामुळें ती मूर्च्छित पडली ( प्र. १ ओ ८७-८८ ). पहाण्याजोगे आहे कीं बहिरा जातवेदहि तसेंच लिहितो.

## सुदेव व त्याची कामगिरी—

भावकळनेनें रुक्मिणीचें मनोगत ओळखिलें व सुदेव ब्राम्हणास बोलाविलें. रुक्मिणीनें सुदेवाचे हातीं ताडपत्रावर पत्रिका लिहून श्रीकृष्णास देण्याकरितां दिली व निरोप सांगितला एवढेच श्रीचक्रधर सांगतात. याचा नरेंद्र व संतोषमुनि काव्यमय भाषेंत विस्तार करतात. शकुंतला पत्रलेखनाच्या कालीदासानें केलेल्या वर्णनाची येथें आठवण होते.

सुदेव कुंडिनपुरांतून द्वारकेस जाण्यास निघाल्यावेळीं त्यास अनेक शुभ शकुन होतात त्यांचें सविस्तर वर्णन संतोषमुनि करतो. नरेंद्रानें फक्त सुदेव निघाल्यावेळीं सुवासिनीनीं आरति केली व शकुनफळें दिलीं एवढेंच एका ओवींत सांगितलें आहे ( ६५२ )

सुदेव द्वारकेस जात असतां आपल्या दहा सेवकांना, ( जे त्याचे बरोबर रुक्मिणीनें दिले होते ) श्रीकृष्ण दर्शनाचा महिमा सांगतो असें नरेंद्र व संतोषमुनि दोघेहि लिहितात. सामराजानें एक निराळाच प्रकार सांगितला आहे. तो म्हणतो सुदेव आपल्या मनास बोध करीत चालला होता. त्यानें तो मनोबोध दिला आहे. एकनाथ महाराजानीं अशा स्वरूपाची एक ओवीहि लिहिली नाहीं. त्यांचा सुदेव रुक्मिणीच्या विनंतिवरून निघतो तो द्वारके जवळच येतो. असो.

नरेंद्राप्रमाणेच संतोषमुनि सुदेव द्वारके जवळ सीमेवर आल्या पासून त्यानें जें जें पाहिलें त्याची फार बारकाइनें वर्णनें देतो. इतकी उत्तम वर्णनें दुसऱ्या कोणत्याहि कवीनें केलीं नाहींत. सुदेवाच्या नजरेंतून कोणतीहि बारीक सारीक गोष्ट सुद्धां सुटली नाहीं. स्वतः तो अत्यंत चौकस बुद्धीचा दाखविला आहेच पण त्याच्या बरोबरच्या सेवकांची कुशाग्रबुद्धिहि प्रत्ययास येते. द्वारके भोंवती लागणारीं वनें, उपवनें, त्यांतील निरनिराळया प्रकारच्या

वनस्पति, फुलें, फळें, पक्षी वगैरेंचीं सविस्तर वर्णनें संतोषमुनि करतोच परंतु कांहीं ठिकाणी त्यानें नैसर्गिक गोष्टींची लाविलेली उपपत्तिहि मोठी मनोरंजक वाटते. निरनिराळ्या जातींच्या कापरांची उत्पत्ति व त्यांचे गुणधर्म त्यांत कसे आले तें संतोषमुनीनें काव्यमय रीतीनें वर्णिलें आहे. (प्र. १० ओ. ८० ते ९४) हरिचंदनाची थोरवी, हरिचंदनाची उपत्ति, त्याचच प्रमाणे बावन जातीचें चंदन कसें निर्माण झालें तो प्रकार, चंदनाच्या झाडा भोंवतीं सर्पांची वस्ति असावयाची पण येथें ते दिसत नाहीत तें कां असें सवैल विचारतो तेव्हां त्याचें कारण सुदेव सांगतो तें समर्पक तर आहेच पण त्यांत संतोषमुनीच्या बुद्धीचें जें चातुर्य दिसते तें विशेष वाटतें (प्र. १० ओ १०९ ते १३४). कस्तूरीची उत्पत्ति कशी झाली हें ही त्यानें सांगितलें आहे (प्र १० ओ १३६). येथील नागवेलीचीं पानें चंद्रापेक्षां उज्ज्वल तर आहेतच पण त्यांना कात चुना वगैरे ची जरूर नाहीं. तो तांबुल खाल्ल्या बरोबर रंगतो व तोहि चौपट (प्र १० ओ १४३). असे एक ना दोन अनेक प्रकार त्यानें सांगितले आहेत. सबंध दहावा प्रसंगच यासाठीं मुळातून वाचावा.

द्वारके भोंवती लागणारे खंदक, तट, दोनतटांमधील निरनिराळया जातींच्या लोकांची वस्ति, त्यांचीं वसतिस्थानें, त्यांतील बाजारहाट वगैरेंचीं वर्णनें संतोषमुनीच्या सूक्ष्म अवलोकनाची साक्ष देतात. बाजाराचें वर्णन करतांना तो सांगतो कीं हिरे माणकें विकावयास बसलेले व्यापारी ओंजळनें तीं गिऱ्हाइकांस देत. जवळच कोंपऱ्यांत सोनारहि अलंकार तयार करून देण्यास बसले आहेत वगैरे वाचताना वाटते कीं यानें विजयनगराचेंच वर्णन चालविलें आहे. परदेशी प्रवाश्यांनीं विजयनगरच्या बाजाराचें असेंच वर्णन लिहून ठेविलें आहे. संतोषमुनि यात्रा करीत हिंडत असे अशी माहिती पौषदाख्यानें दिली आहे. संतोषमुनि विजयनगरच्या भरभराटीच्या काळींच होऊन गेला असल्यानें त्यानें तें पाहिलें असणें अगदीं शक्य आहे. संतोषमुनि माळिणी, शिंपिणी, तांबोळणी यांची वर्णनें करतो, त्यांचे स्वभावविशेषहि सांगतो, त्यावेळीं त्याची विनोद बुद्धिहि जागृत असल्याचें दिसून येते.

संतोषमुनि द्वारकेंतील निरनिराळ्या इमारतींचें फार बारकाईनें वर्णन करतो, त्यांची रचना, त्यामधील कोरलेली चित्रें, खांबांची रचना—हीं वर्णनें वाचतांना पट्टदकल, वेरुळ, अजिंठा वगैरे जुन्या शहरांतील वास्तूंची आठवण झाल्या शिवाय रहात नाहीं. हीं सर्व संतोषमुनीनें स्वतंत्रपणें दिलीं आहेत. त्यास नरेंद्राचा आधार नाहीं.

सुदेव द्वारकेमध्यें येतो त्यावेळीं त्यास श्रीकृष्णदर्शनार्थ अनेक देशाचे राजे आपापल्या लव्याजम्यासह आलेले दिसतात. नोकर चाकरांची धांवपळ, हत्ती, घोडे, रथ, सैनिक यांची एकच गर्दी तेथें असते. तो भाग वाचतांना सुद्धां प्रत्यक्ष एका मोठ्या राजधानीमध्येंच आपण आहों असें वाटल्याखेरीज रहात नाहीं.

सुदेव श्रीकृष्णाच्या दर्शनास एकटाच जातो. संतोषमुनि म्हणतो तेथें दशेंद्रियांचें काम नाहीं (सुदेवा बरोबर दहा नोकर होते), फक्त मनच पाहिजे.

श्रीकृष्णाच्या सिंहासनाचें संतोषमुनींनें केलेलें वर्णन विक्रमाच्या बत्तीस पुतळ्यांच्या सिंहासनाची आठवण करून देतें (प्र १२ उगे ४९). सभेमध्यें कृष्णापुढें बसलेल्या वीरांचीं नांवें संतोषमुनि देतो तीं सर्व महाराष्ट्रीय आहेत. द्वारकेमध्यें मराठेवीर असण्याचें कारण एकच कीं संतोषमुनि मराठी संस्कृति, मराठी भाषा, मराठी लोक यांचा अभिमानी आहे. श्रीचक्रधर स्वतः गुजराती असतां त्यांनीं आपल्या पंथीयांना हें बाळकडूच पाजलें होतें.

सुदेव व श्रीकृष्ण यांची भेट झाल्यावरचा वृतांत जवळ जवळ श्रीचक्रधरांनी सांगितल्या प्रमाणें आहे तरी पण तो लिहितांनां संतोषमुनि श्रीकृष्ण व सुदेव यांच्या स्वभावांतील सूक्ष्म छटा दाखविल्या शिवाय रहात नाहीं. सुदेवानें पत्रिका श्रीकृष्णाच्या हातीं दिली ती त्यानें वाचली. त्यांत नरेंद्रानें लिहिल्या प्रमाणेच मायना आहे. म्हणजे मायन्यांत दोनशे वर्षांत विशेष फरक झाला नव्हता असें दिसतें.

सुदेव व श्रीकृष्ण कुंडिनपुरास जाण्यास निघतात तें कोणासहि न कळविता; दूतांनीं ते गेल्याचें कळविल्यावर बळराम, उग्रसेन वगैरे सर्व मंडळी सैन्य घेऊन निघतात. विशेष म्हणजे बरोबर देवकी, यशोदा, रोहिणी, सुभद्रा व इतर काहीं स्त्रिया हि घेऊन निघतात. सर्वांची भेट मूळ महादेवास होते तेव्हां सुभद्रा श्रीकृष्णास कोंपरखळी देते कीं "दादो आइकोनि स्त्रीयेचा हांकारा: मग सांडुनि सखियां सोहोदरा: येकलाची निगालासी सारंगधरा हे स्नेह कार्ये:" प्र. १३ ओ ३६. त्यावर श्रीकृष्णानें म्हटलें 'सुभद्रे पुरे. कारण नमतांना मध्येंच कां बोलतेस'? त्यावर बळराम दादा म्हणतो कीं सर्वांनां सोडून कृष्ण निघाला याचें खरें कारण हें कीं आमचा सर्वांचा खर्च मासन्यावर पडेल. असे घरगुति व विनोद निर्माण करणारे प्रसंग संतोषमुनि मोठ्या मार्मिकपणें रेखाटतो.

सुदेवानें कुंडिनपुर जवळ आल्यावर श्रीकृष्णाची परवानगी घेतली व श्रीकृष्ण आल्याची वार्ता रुक्मिणीस जाऊन सांगितली, हा भाग व त्यापुढील भाग श्री चक्रधरांनीं सांगितल्या प्रमाणेच आहे.

**श्रीकृष्णाचें कुंडिनपुरांत, आगमन—**

श्रीकृष्ण नगरांत आल्यावर त्याला पहाण्या करितां सर्व नागरिक स्त्रीपुरुष उत्सुक होते. ते रस्त्याच्या दुतर्फा, खालीं, माडीवर, खिडक्यांत सर्वकडे उभे होते. येथें संतोषमुनि म्हणतो सर्वांनां आपलें दर्शन घडावें म्हणून श्रीकृष्णानें अनंत रूपें धरिलीं—याच करितां त्यास 'विश्वतोमुख' असें वेद म्हणतात. सर्वांना श्रीकृष्णच रुक्मिणीस योग्य पति असें वाटलें. भीमकानें श्रीकृष्णाचें स्वागत केलें व त्यास अंबिकेच्या मंदिरा जवळ जानोसा दिला.

**रुखवत—**

रात्रीं रुक्मिणीनें सुदेवा बरोबर श्रीकृष्णास रुखवत पाठविलें. रुक्मिणीच्या मुख्य मुख्य दासी सुदेवा बरोबर होत्याच. येथें एक वेळापत्रक आता बदललें आहे असें दिसतें. हल्लीं नवरामुलगा लग्नास निघतो त्या वेळीं रुखवत असतें. पूर्वी सीमांत पूजन झाल्या बरोबर तें असे असें दिसते. बहिरा जातवेद आपल्या टीकेंत तसेच लिहितो. वेणाबाईहि सीता स्वयंवरांत असेच सांगते.

संतोषमुनीनें रुखवतानंतर रुक्मिणीच्या दासी परत येतात तेव्हां रुक्मिणी त्यानां श्रीकृष्ण कसा दिसला असें विचारते, असा एक प्रसंग निर्माण करून श्रीकृष्णाचें सुंदर वर्णन केलें आहे. विशेषतः त्यास पहिल्यावर त्या दासींची वृत्ति कशी झाली हें फार आल्हाददायक रीतीनें लिहिलें आहे. तें प्र. १५ ओव्या २ ते ५३ मध्यें आहे. वाटतें कीं संतोषमुनीस जसा साक्षात्कार झाला तसाच तो त्यानें नमूद केला आहे "चैतन्यें वेधलें देखत क्षेवोः आंतु बाहीरीं देखों तो श्रीकृष्णरावोः तुं आपनयां जवळीं पाहे वो देवोः काये पुरुसी मायेः" प्र. १५ ओ ५४ हा द्वैतांतला अनुभव कीं अद्वैतांतील हा भ्रम पडतो. इतकें विस्तृत व सुंदर वर्णन करून सुद्धां कवी म्हणतो "तें अतीसें सुंदर श्रीकृष्ण मुर्तिः परी मां बोलीला अशीखां उपपतीः तें मज उपसाहावें संतींः म्हने कवी कृष्णदासुः" प्र. १५ ओ. ५९

**फळ प्रदान प्रसंग—**

नंतर फळप्रदानाचा प्रसंग वर्णिला आहे त्यांत भीमक प्रथम श्रीकृष्णाकडे येऊन त्याची पूजा करून नंतर फळप्रदान विधीला जातो असें दाखविलें आहे. कवीनें भीमकाचा श्रीकृष्णाकडे असलेला ओढा दाखविण्याचा एकहि प्रसंग वगळला नाहीं. फळप्रदान म्हणजे वाङ्निश्चय विधि. यावेळीं वधूची वरपित्यानें पूजा करावयाची असते व तिला वस्त्रें व अलंकार द्यावयाचे असतात. ती लेवून वधूनें पुन्हां तेथें यावयाचें असते. हा विधि चालू असतांना कवीनें म्हटलें आहे कीं दमघोष पूजा करीत असतां एक नग्न कुमारी तेथें येऊन शिंकली. हा मोठा अपशकून आहे. पण प्रश्न असा कीं राजवाड्यांत एवढा मोठा समारंभ इतक्या बंदोबस्तांत चालू असतांना तेथें नग्न कुमारी येईल कशी ? पण कांहीं संकेत पाळावयाचेच असल्यानें अशा असंभाव्य गोष्टी सांगाव्याच लागतात असें दिसतें. बहिरा जातवेदानें सुद्धां, दमघोष आपल्या राजधानींत कुंडिनपुरास येण्याच्या अगोदर कांहीं विधि करीत असतांना तेथें नग्न कुमारी येऊन शिंकल्याचें दाखविलें आहे. असो. याच प्रसंगांत भावकल्पनेची दूरदृष्टि व प्रसंगावधान कवीनें दाखविलें आहे. दमघोषाकडून आलेलीं वस्त्रें रुक्मिणीनें नेसावयाचीं असतात. श्रीकृष्णाशीं एकनिष्ठ असलेली रुक्मिणी

तीं कशी नेसेल याचा विचार अगोदरच भावकळनेनें केलेला असतो. ती कोंगतीं, काय वाणाचीं वस्त्रें तिला द्यावयास आणिलीं आहेत तें पाहून ठेविते व रुक्मिणीनें आपल्यावरील संकटाचा परिहार कसा होईल असें भावकळनेस विचारल्या वेळीं सांगते कीं नेमकी त्याच वाणाची वस्त्रें आपल्या भांडारांतून अगोदर काढून ठेविलीं आहेत व दमघोषानें दिलेली वस्त्रें नेसण्या करितां आंत आल्यावेळीं रुक्मिणीस तीं बदलून द्यावयाची व्यवस्था केली आहे.

**रुक्मिणीची चिंता–**

फळप्रदानादि विधि झाला. आतां आपली व श्रीकृष्णाची भेट कशी होणार, कां आपला शिशुपालाशींच विवाह होऊन आपली जन्माची विटंबना होणार या चिंतेंत रुक्मिणी असणार हें जाणून श्रीकृष्णानें सुदेवास बोलावून घेतलें व अंबिकेच्या दर्शनास रुक्मिणीनें कांहीहि युक्ति करून यावें व श्रीकृष्णानें तेथून तिचें हरण करावें असा आपला विचार सुदेवास सांगितला. सुदेवास ती युक्ति पसंत पडली व तो रुक्मिणीकडे आला. श्री कृष्ण व सुदेव यांच्या वाटाघाटींत काय करावयाचें तें ठरलेलें त्यानें रुक्मिणीस सांगितलें. युक्ति चांगली असली तरी अंबिकेच्या दर्शनास जाण्यास आईवडिलांची परवानगी कशी मिळवावयाची हा प्रश्न रुक्मिणी पुढें येऊन पडला. या वेळींहि भावकळना रुक्मिणीच्या मदतीस आली. तिनें सुचविलें कीं रुक्मिणीनें आईस सांगावे कीं देवी स्वप्नांत आली होती व तिनें ववाहापूर्वी दर्शनास यावयास आज्ञा केली आहे. ही युक्ति उपयुक्त ठरली. भागवतांत रुक्मिणीनेच आपल्या पत्रिकेंत श्री कृष्णास लिहिलें होते कीं कुलाचारा प्रमाणें ती अंबिकेच्या दर्शनास जाईल तेव्हां तेथून तिला त्यानें पळवून न्यावी व राक्षस विधीनें तिजशीं विवाह करावा. येथें श्रीचक्रधरांनी सांगितल्या प्रमाणे संतोषमुनि बदल करीत आहे. शिवाय स्वतःचा असा एक फरक त्यानें केला आहेच. चक्रधर म्हणतात कीं सुदेवाच्या सल्ल्याप्रमाणें रुक्मिणीनें सुधामतीस अंबिका दर्शनास जाण्या-बद्दल विचारले. सुधामतीनें भीमकास विचारिले व भीमकानें प्रधानाचा विचार घेऊन संमति दिली. पण संतोषमुनिनें येथें भावकळनेनें स्वप्नाची युक्ति सुचविली असा फरक केला आहे.

**अंबिका दर्शन–**

रुक्मिणी अंबिकेच्या दर्शनास जाणार. कदाचित् श्रीकृष्ण कांहीं तरी विघ्न आणील व विवाहाच्या वेळींहि कांहीं अनुचित प्रकार घडूं नये म्हणून रुक्मीच्या सांगण्या प्रमाणें चैद्यादि सर्व राजे आटहि दिशांचा बंदोबस्त करून पहारा करूं लागले. कोण कोठे किती सैन्य बरोबर घेऊन शहराच्या रक्षणाचें काम करीत होता याचा सविस्तर तपशील संतोषमुनीनें दिला आहे.

या प्रमाणें सर्व दिशांना शत्रुसैन्यानें वेढाच जणूं दिला आहे असें पहातांच श्रीकृष्णानें एक गनिमी कावा रचला. त्यानें कृतवर्म्याबरोबर सर्व स्त्रिया तापीतीराबर पाठविल्या. बंदोबस्ता करितां बरोबर कांहीं सैन्यहि दिलें. याच्या अगोदर श्रीकृष्णाचे विवाहापूर्वीचे सोहळे त्याच्याकडे झाल्याचें संतोषमुनि सांगतो व त्याच करितां त्यानें यादव स्त्रियाहि बळरामाबरोबर कुंडिनपुरास आणल्या आहेत. वास्तविक पहातां भागवतांत अथवा श्रीचक्रधरांनीं सांगितलेल्य कथेंतहि हें नाहीं. मात्र ब्रम्हवैवर्त पुराणांत असें थोडेसें आहे हें मागे दाखविलें आहेच.

कृतवर्मा, श्रीकृष्णाच्या आज्ञे प्रमाणे सर्व स्त्रियांना घेऊन, तापीतीरावर जाऊन श्रीकृष्ण दिकांची वाट पहात बसतो. येथें संतोषमुनीनें श्रीचक्रधरांनीं सांगितल्यापेक्षां बराच फरक केला आहे. श्रीचक्रधर म्हणतात वसुदेव उग्रसेनादि यादवांना श्रीकृष्णानें बरोबर सैन्य देऊन दूर पाठविलें व चैद्यादींच्या बरोबर युद्ध सुरूं झाल्याबरोबर एकदम शत्रुसेनेवर तुटून पडण्यास सुचविलें. ही गनिमी काव्याची लढाई संतोषमुनीला बदलावी लागली आहे. कारण युद्ध होणार हें निश्चित असल्यानें व स्त्री समाज तेथें आणला असल्यानें, त्यांची सुरक्षित जागीं रवानगी करण्याची दक्षता घेणें क्रमप्राप्तच आहे. शत्रु-सैन्यावर परिणाम मात्र अपेक्षित झाला. चैद्यादींना गुप्तहेरांनीं येऊन सांगितलें कीं श्रीकृष्णादि सर्व कुंडिनपुर सोडून निघून गेले, कारण तसा आभास निर्माण केला गेला होता. त्यामुळें जरासंघ, रुक्मी वगैरेंना कळेना कीं श्रीकृष्ण आला कशाकरितां व गेला कां ? या श्रीकृष्णाच्या युक्तीनें शत्रु सैन्य गाफील राहिलें.

**रुक्मिणी हरण–**

ठरल्या प्रमाणे रुक्मिणी अंबिकेच्या दर्शनास आली. सुदेवही बरोबर होताच. भावकळनाहि होतीच. अंबिकेची पूजाअर्चा झाली. अंबिकेस रुक्मिणीनें प्रार्थना केलीं कीं श्रीकृष्ण आपणांस पति मिळू दे. अंबिकेनें अशरीरी वाणीनें–तिची इच्छा पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला व आपल्या हातांतील माळ प्रसाद म्हणून रुक्मिणीला दिली. रुक्मिणी तेथून भावकळनेचा हात धरून माडीवर गेली. सुदेव बरोबर होताच. त्यानें शत्रू पैंकी कोण कोण राजे, देवळा भोवंती, कोठे कोठे उभे आहेत तें सांगितले. रुक्मिणी अधीर झाली. तिला इतर राजांचीच माहिती सुदेव देत होता. श्रीकृष्ण अजून आला नाहीं आतां कसें असें तिला वाटलें. सर्व राजांनी व त्यांच्या सैन्यानें रुक्मिणीस पाहिले. संतोषमुनि म्हणतो मदनानें आपला प्रताप दाखविला. सर्व शत्रु सैन्य व राजे तिचें रूप पाहून मोहित झाले. व त्यानां मूर्छा आली. हा भाग भागवतांत असाच आहे. लग्न घटिका जवळ येत चालली अजून श्रीकृष्ण दिसेना त्यामुळें ती फार व्याकुल झाली आहे असें सुदेवानें पाहिलें त्यालाहि काळजी वाटूं लागली. आकाशांत याच वेळीं विमानांचा आवाज येऊं लागला त्यांत देव तो सोहळा पहाण्यास आलेले दिसले. नंतर थोड्याच वेळांत पांचजन्य वाजूं लागला व श्रीकृष्ण रथांत बसून येत असल्याचें सुदेवानें रुक्मिणीस दाखविलें. रुक्मिणीनें हात जोडून भक्तिभावपूर्वक श्रीकृष्णास नमस्कार केला. देवळाच्या महाद्वारा जवळ रथ आला. रुक्मिणी रथा जवळ आली. श्रीकृष्णानें अलगत उचलून तिला रथांत घेतली. रुक्मिणीनें श्रीकृष्णास माळ घातली. इकडे किन्नराचें कवच फिटलें.

या प्रमाणें संतोषमुनीनें तो प्रसंग वर्णिला आहे. श्री चक्रधरांनीं सांगितल्या पेक्षां यांत संतोषमुनीनें बरेच निराळया प्रकारें सांगितलें आहे. श्रीकृष्ण व अर्जुन देवच्या मागें, रुक्मिणीच्या सैन्यामध्यें घुसून तिची वाट पहात होते व अंबिकादर्शन होतांच सुदेवानें तिचा हात धरून तिला नियोजित स्थळीं आणिलि व ही तुझी राणी तुझ्या ताब्यांत घे असें म्हणून त्यांनें तिला श्रीकृष्णाच्या स्वाधीन केली असें श्रीचक्रधर सांगतात.

युद्ध प्रसंग—

श्रीकृष्ण रुक्मिणीस घेऊन आपल्या निवासस्थानीं जातो. चैद्यादिकांशीं कसें युद्ध करावयाचें, कोणी कोणाबरोबर लढावयाचें याची व्यवस्था तो ठरवितो, असें संतोषमुनि सांगतो नंतर त्या त्या योध्यांचीं युद्धें होनात. युद्धांची त्यावेळचीं शस्त्रें, अग्नें, चिलखते वगैरेंची माहिती संतोषमुनीच्या काव्यांत भरपूर मिळते. युद्ध करण्याच्या पद्धति सुद्धां ठरून गेल्या प्रमाणेच होत्या. एकमेकांना शह काटशह देणारी अस्त्रें, परिणाम वगैरे सर्व वर्णनें सर्व प्राचीन कवि जरी जवळ जवळ सारख्याच पद्धतीनें करीत असले (चौंभा पृष्ठ १४९ अ व आ ते १६० अ व आ. विष्णुदास नामा आदि पर्व अ. ३० व द्रोणपर्व,) तरी संतोषमुनि अस्त्रांचे प्रकार अनेकविध सांगतो. प्रत्येक अस्त्र सोडल्या नंतर त्या अस्त्रानें घातलेला धिंगाणा व शत्रूची उडविलेली घाबरगुंडी तो फार उत्कृष्ट रीतीनें रंगवितो. पौंड्रिक व अर्जुन यांच्या युद्धांत पौंड्रिकानें ब्रम्हशक्ति सोडल्या वेळीं त्या शक्तीनें धारण केलेली विक्राळ रुपें व त्या शक्तीवर अर्जुनानें सोडलेलें भैरवास्त्र व त्यामुळें निर्माण झालेले भैरव व शक्ति यांच्या मधील झुंज (प्र. २१ ओ ८९ ११०) वगैरे सर्व वर्णनें वाचनीय आहेत. भागवत अथवा श्रीचक्रधर निरूपित कृष्णचरित्रांतील रुक्मिणी स्वयंवराचा भाग यांत, श्रीकृष्ण व शिशुपाल यांचें युद्ध सांगितलें नाहीं. तरीपण संतोषमुनि त्यांचें युद्ध घडवून आणतो. संतोषमुनीला श्रीकृष्ण व शिशुपाल या प्रतिस्पर्ध्यांनी युद्ध न करतां इतरांनीच युद्ध करणें पसंत न पडून त्यानें दोघांमध्यें आव्हान प्रति आव्हान करवून युद्ध करविलें आहे. शिशुपालहि उत्तम योद्धा व अस्त्र विद्येंत प्रविण दाखविला आहे. निरनिराळ्या अस्त्रांचा श्रीकृष्णानें प्रति अस्त्रें सोडून छेद केल्यावर शिशुपाळ श्रीकृष्णाच्या सैन्यावर 'मदन मोहनास्त्र' सोडतो त्यामुळें अनेक सुंदर तरुण स्त्रिया निर्माण झाल्या व त्या यादव वीरांच्या बरोबर क्रीडा करूं लागल्या. विषयोपभोगांत यादववीर कसे रंगले यांचें वर्णन संतोषमुनि सारखा संन्यासी सुद्धां मोठे बहारीनें करतो (प्र. २१ ओ २३३ ते २४४). सबंध यादव सैन्यांत श्री कृष्ण व उद्धव दोघेच या मोहांस बळी पडले नाहींत. सर्व प्रकार पाहून

“श्रीकृष्ण म्हणे चैद्या तु देखणां भला: आजी नीका सैंन्यासीं उपेगु केला: जो यादवांचा श्रमुं हरीला: झुंझतां रनांमाजी: ॥ प्र २१ ओ २४८ ॥ आणि तुं भला होसी संपत्तिमतुं रावो: जो आवघेयां यादवांचा केला वीव्हावो: या स्त्रीदांणावस्थे दावो: कवनुं थोरु असे: ॥ प्र २१ ओ २४९ ॥

असा विनोद, युद्धामध्यें सुद्धां, समर्पकपणें संतोषमुनि निर्माण करूं शकतो.

संतोषमुनीनें युद्ध भूमीचें नदीच्या रूपकानें केलेलें वर्णन जसें वास्तववादी आहे तसें भयानकहि आहे ( प्र. २१ ओ १९१ ते २०३). अशा या भयानक युद्धांत आशेचा धागाहि कोणता असतो तें संतोषमुनि सांगतो,

“ऐसे ते देवाचेणी संबंधें: भवसींधु उतरताति वीणोदें:
आवघे वैकुंठा नीगाले आनंदें: वीरगंगें न्हांउणीयां: ॥” प्र. २१ ओ २०३.

शिशुपाळाचा श्रीकृष्णानें पराभव केला तेव्हां शिशुपाल श्रीकृष्णास म्हणतो,

“तवं चैद्य म्हनें आजि फावलें जाये कृष्णां:
ये वेळेचें येंश म्यां दीधलें तुम्हासि जाणां:”
तेव्हां देवो म्हनें “आजी उदारु तुज येसणां: कवन असे.” प्र२१ओ२५९॥

या प्रमाणे यादवांनीं सर्व शत्रूंचा पराभव केला, यादव सैन्य चैद्यादींच्या सैन्याचा पाठलाग करूं लागलें तेव्हां चैद्यसैनिक आपण युद्धांत कसे ओढवले गेलों तें सांगतात व आपणांस जीवदान कां द्यावें याची कारणें सांगतात तीं वस्तुस्थिति निदर्शक आहेत. संतोषमुनीचें अवलोकन किती सूक्ष्म होतें व त्याच्या काळची परिस्थिति काय होती तें कळते.

“येक म्हणती आम्हां लागौणी: घरीं स्त्री आसे तरुणीं:
नको करूं वीधवणीं: अवंदाचि वीव्हावो जाला: प्र. २१ ओ २६७
येक म्हणती आम्ही क्षेत्री रजपुत: आमचें नीकें मरण जीवीत:
परीं असों ब्राम्हणांचे रीणाइत: सोडा उत्तीर्ण होआवया:” प्र.२१ ओ२६९

या प्रमाणें चैद्यसैनिकांनीं आपापल्या अडचणी सांगितल्या व यादवांना

शरण येऊन ते श्रीकृष्णाचें भजन करूं लागले. त्या भजनाचें वर्णन वारकरी मंडळी भजन करतात त्या प्रमाणेच आहे. ध्वजास्तंभ मोडून त्याचे गरुडटके केले, ढालींच्या टाळा केल्या व सर्व सैन्य नाना तऱ्हेचें वेर धरून "आम्हां धेण्णवांना वांचवा" म्हणूं लागले. या तऱ्हेचें वर्णन फारच क्वचित पहावयास सांपडेल.

## रुक्मिणीचें दयालु अंतःकरण—

या नंतर श्रीकृष्ण व रुक्मि यांचें निकराचें युद्ध झालें. एकमेकांनी प्राणपणानें हल्ले केले पण शेवटीं रुक्मीचा पराभव झाला व रुक्मिणीच्या विनंती वरून श्रीकृष्णानें—फक्त त्यास अवमानित करून—जीवदान दिलें हा कथा-भाग आहे. त्या सर्व युद्धांत जे सैनिक कामास आले अथवा घायाळ झाले त्या सर्वांची भीमकतनयेस कणव उपजली व तिनें श्रीकृष्णास विनविलें,

"परीयेसी जी आणंता:
यांचीया स्त्रीया बाळें माता पीता: दुःख आक्रंदती: प्र. २२ ओ. १११
तरी तुं कृपाळु गोपाळुः करीसी जीवां आनंदाचा सुकाळुः
तुं आर्तादाणिं दयाळुः देवो देवा: ११२
तरी वीणती परीयेसी जी जगजेठी: करी आंमृतची दृष्टी:
सकळै आनंदाची श्रृष्टिः करी देव देवा: ११३
श्रृष्टी संहारु रचना: तुझीये प्रवृत्तीसवें होये क्षेणा:
तरी हे सैन्ये उठवावें जी जगजीवंणा: देवा कृपाळुवा:" ११४

रणामध्यें मृत्यु आल्यास वैकुंठसुख मिळते याची आठवण श्रीकृष्णानें दिल्यावेळीं रुक्मिणीनें म्हटलें,

"यांसी वैकुंठसुख भोगवावें सारंगपाणी:
आणि हें संसारीकु सुख देउनि: सुखिये करी:" ११८

या वेळीं ज्ञानेश्वरांची

किंबहुना सर्वसुखीं। पूर्णा होउनि तिहिं लोकीं।
भजिजो आदिपुरुषीं। अखंडित ॥ अ. १८ ओ १७७८.

ही ओवी आठवल्याशिवाय रहात नाहीं.

संतोषमुनीस श्रीकृष्णाकडून हिंसा अशक्य वाटली असावी व तीही स्वयंवराच्या मंगल प्रसंगीं हें तर त्याहून अशक्य म्हणून रुक्मिणीच्या विनंतीची त्यानें योजना केलेली दिसते. यामुळें श्रीकृष्ण व रुक्मिणी दोघेहि कृपाघन कशीं आहेत हें हि त्यास दाखवावयाचें आहे.

## मूळमहादेवास आगमन व विवाह—

श्रीकृष्ण युद्धांत विजयी होऊन तापीतीरीं गेले. तेथें कृतवर्म्यांबरोबर अगोदरच येऊन वाट पहात असलेल्या स्त्रीपरिवाराची भेट झाली. देवकी, यशोदा वगैरेंनी रुक्मिणीस प्रथम पाहिली तेव्हां तिचें सौंदर्य पाहून सर्वांनां अतिशय आनंद झाला. सर्व मंडळी तेथून पुढे मूळमहादेवास जाण्यास निघाली. तीं मूळमहादेवा जवळ पोंचली तों मागोमाग भीमक सर्व परिवार व विवाहाची सामुग्री बरोबर घेऊन तेथें आला, व तेथेंच श्रीकृष्णाच्या संमतीनें वेदोक्त विधि प्रमाणें कृष्ण-रुक्मिणीचा समारंभपूर्वक विवाह झाला. मूळमहादेव क्षेत्रीं विवाह झाल्याचें फक्त श्रीचक्रधरांनीच प्रथम सांगितलें आहे. कोणत्याहि पुराणांत असा उल्लेख नाहीं. महानुभावीय कवीनीं त्या प्रमाणे लिहिणे योग्यच आहे. पण ही कल्पना महानुभावेतर सर्व कवीनीं उचलली आहे. बहिरा जातवेदानें एक मधला मार्ग काढला आहे. भागवतांत द्वारकेंत विवाह झाल्याचें आहे व महानुभावांनीं तो मूळ महादेवास झाल्याचें समाजांत रूढ केलें तेव्हां बहिरा जातवेद म्हणतो मूळमहादेवा पासून द्वारके पर्यंत बारा योजने मंडप घातला. ( अ. ५४ ओ ५८४-८५ ) ही तडजोड मोटी मनोरंजक आहे.

## विवाहांतील सोहळे—

संतोषमुनीनें, मूळमहादेवा जवळ विवाह झाला त्या वेळचे सोहळे फार बारकाइनें सांगितले आहेत. त्यांतील जवळ जवळ सर्व सोहळे आजहि पहाव

यास मिळतात. बहिरा जातवेद, एकनाथ महाराज अथवा विठ्ठल कोणीहि इतक्या सविस्तरपणें वर्णन करीत नाहींत. विवाहाच्या सोहळयांच्या सर्वांत आधी 'घाणा' भरण्याची प्रथा कांहीं समाजांत महाराष्ट्रांत रूढ आहे पण याचा निर्देश संतोषमुनि अगर इतर कवि करतांना दिसत नाहीत. संतोषमुनीनें दिलेल्या सर्व सोहळयांचे वर्णन करीत बसणे शक्य नाहीं पण ते सर्व अभ्यासण्या योग्य आहेत हें खरें.

कांहीं समाजांत विवाहा नंतर घेंडा नाचविला जातो. त्याचें सविस्तर वर्णन नाथांनीच प्रथम केलें असल्याचें समजले जाते. पण खरा प्रकार असा आहे कीं नाथांच्या अगोदर बहिरा जातवेदानें त्याचें वर्णन रूपकानेंच केलेलें आढळेल. बोधानें कृष्णास खांद्यावर घेतला व भावानें रुक्मिणीस, असें जातवेद सांगतो (अ. ५५ १२३-३२१) एकनाथ बोधानें श्रीकृष्णास व देहाभिमानानें रुक्मिणीस खांद्यावर घेतल्याचें सांगतात. (प्र. १७ ओ. ५-९)

ही घेंडा नाचविण्याची पद्धत श्री चक्रधरांच्या पूर्वींहि रूढ होती असें दिसतें. त्यांनी देवकी व वसुदेव यांचा विवाह झाल्या नंतर घेंडा मिरविल्याचें सांगितलें आहे (च. नि. श्री कृ. च. पान ३). या रूढीचा इतिहास शोधण्या-योग्य आहे. हा घेंडानाच फक्त महाराष्ट्रांतच व कांहीं विशिष्ट जातींतच रूढ आहे कीं काय हेंहि पहावयास पाहिजे.

मूळमहादेवा जवळ विवाह झाल्यावर भीमकानें कुंडिनपुरास जाण्याची इच्छा दर्शविली परंतु द्वारका पाहून जाण्याचा कृष्णाचा आग्रह झाला तो त्यास मोडवेना. नंतर द्वारकेंत वरात जाते. त्या वेळीं द्वारका शृंगारलेली होती स्त्री पुरुषांची श्रीकृष्णास पहाण्यास चिक्कार गर्दी होते. एकनाथ म्हणतात या मध्यें संन्यासीहि होते. संन्यासी व वेश्या यांची 'मंडप घसणी' होते त्यावेळीं संन्यासी रागावतो व हातांतल्या दंडानें वेश्येला मारतो. तेव्हां वेश्या संन्याश्यास अजून क्रोध गेला नाहीं, दंड व कांसोटी उगाच विटंबिलीत, अभेदज्ञान झालें नाहीं तेव्हां हा संन्यास व्यर्थ आहे असें म्हणते. असाच प्रसंग नाथांनी भावार्थ रामायणांत सुद्धां वर्णिला आहे. हा संन्यास व स्त्री यांचा एक-

मेकांस लागलेला धक्का व त्या नंतरचा दोघांचा संवाद बहिरा जातवेदानेंहि नेमका यात्र संदर्भांत दिला आहे. एकनाथ महाराजांनीं बहिरा जातवेदाच्या भैरवी टीकेचा व संतोषमुनीच्या रुक्मिनी सैंवराचा उत्तम अभ्यास केला होता हें या वरून स्पष्ट होत आहे.

## विवाहांतील मंगलाष्टकें :—

विवाहाच्या वेळीं मंगलाष्टकें म्हणण्याची प्रथा आजहि सर्वत्र दिसते. ती निदान बहिरा जातवेदाच्या कालीं किंवा त्या पूर्वीं कांहीं काल असावी. भैरवी टीकेंत अध्याय ५४ मध्यें ओ. १०९ नंतर मंगळाष्टकें आहेत. ती आठ नसून अठरा आहेत व शार्दूल विक्रिडितांत नसून ओव्यांतच आहेत. एकनाथ महाराज मात्र मंगलाष्टकें देत नाहींत. संतोषमुनीनें दिली नाहींत. पीपदाख्यानें शोधित आवृत्तींत ती दिली नाहींत पण सटाण्याच्या दोन्ही प्रतींत तीं आढळतात. कोणी तरी तीं तेथें घुसडल्याचें दिसते. तीं मंगलाष्टकें मुद्दाम एका परिशिष्टांत दिलीं आहेत. श्रीचक्रधरांनीं मंगलाष्टकें म्हटल्याचें सांगितलें नाहीं, महदंबेनें श्रवळ्यांत अथवा मातृकी रु. स्वयंवरांत हि त्यांचा उल्लेख केला नाहीं. या वरून असें अनुमान करावयाचें काय कीं मंगलाष्टकें म्हणण्याची प्रथा शके १२१० नंतर व शके १३५० चे अगोदर केव्हां तरी सुरू झाली ?

## कृष्ण–रुक्मिणी विवाह दिन—

मंगलाष्टकांचें विषयीं थोडे विवेचन केल्या नंतर श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाहाची तिथि कोणती याचा थोडा विचार करणें प्राप्त आहे. पुराणांत निश्चित अशी तिथि उल्लेखिली नाहीं. श्रीचक्रधरांनीं म्हटलें आहे "एकुदीं वैशाखीं पूर्णमेचां दिवशीं रुक्मिणीदेवी सखियां सहितु सभेसि गेली" त्याच वेळीं लवकरच किन्नरानें श्रीकृष्णाचें वर्णन केलें, त्यामुळें "रुक्मिणीदेवीसि श्रीकृष्णचक्रवर्तीचां गुणगान श्रवणीं वेधु संचरैला" या दिवसा पासून सुदेवास पाठवून द्वारकेहून बोलावून घेण्यास लागलेले चार दिवस वगैरे लक्षांत घेऊन पीप्रदाख्यानें, रुक्मिणी अंबिकेच्या देवळा जवळ श्रीकृष्णास माळ घालते ती तिथि व मूळमहादेवा जवळ वेदोक्त विवाह होतो ती तिथि, अशा दोन्ही तिथ्या

दिल्या आहेत. माळ घातलेली तिथि वैशाख वद्य पंचमी शुक्रवार धनिष्ठा नक्षत्र असून प्रत्यक्ष विवाह वैशाख वद्य सप्तमी रविवार, भरणी नक्षत्रीं झाला असें त्याचे म्हणणे आहे. सटाण्याच्या प्रतींत फक्त दुसरी तिथि दिली आहे. ती बहुधा पौषदाख्याच्या ग्रंथातून घेतली असावी.

श्रीकृष्ण रुक्मिणी विवाहाची तिथि एकनाथ महाराजांनीं दिलेली कांहीं थोड्या पोथ्यांत आढळते. श्री. आजगांवकरांनीं ती ओवी दिली आहे. 'माघ शुद्ध पंचमीसी। भृगु रेवती नक्षत्रासी ।शुद्ध पंचक विवादेसी। द्विज देवासी सांगितलें" (अ. ५ ओ. ७). ही तिथि नाथांनीं कोठून घेतली तें कळत नाहीं. मी नाथांच्या रुक्मिणी स्वयंवरा संबंधी एक लेख प्रसाद मासिकाच्या फेब्रुवारी १९६० च्या अंकांत लिहिला आहे. त्यांत म्हटलें आहे कीं शके १४९२ च्या मार्गशीर्षात नाथांच्या मोठ्या मुलीचें (मुक्तेश्वराच्या मातेचें) लग्न झालें असावे व माघ महिन्यांत ते काशीस जाण्यास निघाले असावे व वाटेंत रुक्मिणी स्वयंवराचें लेखन चालू करून तें चैत्र शु. ९ शके १४९३ रोजीं काशीमध्यें संपविलें असावे. पुन्हां नीट विचार करतां असें वाटतें कीं वर दिलेली 'माघ शुद्ध पंचमी' हीच लीळाच्या विवाहाची तिथि असावी, म्हणून त्यांनीं ती मुद्दाम रुक्मिणी स्वयंवरांत नमूद करून ठेविली असावी. प्रसाद मधील उपरोक्त लेख वाचावा म्हणजे माझी त्या बाबतची विचार-सरणी कळेल.

## संतोषमुनीनें दिलेली बहुविध माहिती :—

संतोषमुनीनें आपल्या या काव्यांत जी अनेक विषयांची, पदार्थांची, वनस्पतींची, देशांची माहिती दिली आहे त्या सर्वांचा परामर्ष घेणे, या प्रस्तावनेच्या मर्यादा लक्षांत घेतां, शक्य नाहीं. कांहीं गोष्टींचा नुसता निर्देश करणेच शक्य आहे. त्यानें संगीत शास्त्रासंबंधीची राग रागिण्यांची दिलेली माहिती नरेंद्राचें अनुकरण आहे असें म्हटलें व राजे रजवाडेचें वर्णन तो नरेंद्रावरूनच करतो असें समजले तरी, त्यानें निरनिराळ्या वनस्पति, प्राणी, त्यांची वैशिष्ठ्यें ही स्वतन्त्रपणें वर्णन केलीं आहेत. त्यानें वेषभूषा, स्त्रियांच्या व

पुरुषांच्या-वर्णिल्या आहेत त्या फार सूक्ष्मपणें वर्णिल्या आहेत असें दिसेल. अनेक तऱ्हेच्या अलंकारांची एकत्र यादी केली व त्यांचा अभ्यास केला तर त्यांची केलेली वर्णनें व तीं उपयोगांत कोणी कशी आणावयाची यांची त्यानें दिलेली माहिती उपयुक्त ठरेल. त्यानें जितके निरनिराळे अलंकार वर्णिले आहेत तितके दुसऱ्या कोणीहि वर्णिल्याचे दिसत नाहीं.

जेवण्याच्या पंक्तीचें वर्णन, त्यांतील निरनिराळीं उपकरणें, रांगोळ्यांची सजावट, दिव्यांची व्यवस्था वगैरे त्याने इतकी वास्तवतेनें दाखविलीं आहेत कीं त्यानें राजेरजवाड्यांच्या अशा प्रसंगांचे अनुभव घेतले आहेत अशी खात्री होते. जेवणावळीचे वेळीं कोणाचा कसा मान त्या प्रमाणे त्यास पंक्तीत स्थान असे, ही गोष्ट तो सांगण्यास विसरला नाहीं. जेवण्याचे वेळीं, अशा मेजवानींच्या प्रसंगांचा अनुभव नसलेल्या मंडळींची कशी कुचंबणा होते हेहि त्यानें सांगितले आहे. ब्राम्हणांची भोजनप्रियता व आधाशी वृत्ति यांचें पण तो विनोदीं भाषेंत वर्णन करतो. निरनिराळ्या खाद्यपदार्थांची त्यानें दिलेली माहिती हीं त्याचें सूक्ष्म अवलोकन व अनुभव दर्शवितात.

संतोषमुनीनें मिरवणुकींचीं वर्णनेंहि फार उठावदार केलीं आहेत. मिरवणुकींतील सजविलेले हत्ती, घोडे, रथ वगैरेंचीं वर्णनें, पायघड्या घालीत विहिणींना नेणे, मंडपांत निरनिराळ्या प्रसंगास साजेशा बैठका, पानसुपारीची व्यवस्था वगैरे सर्व गोष्टी संतोषमुनि फार व्यवस्थित पणें सांगतो. संतोषमुनीनें हे फक्त पुस्तकी ज्ञानावरून लिहिलें असेल हे शक्य दिसत नाहीं.

येथें एका मुद्याचा विचार करणे योग्य होईल. सुख समृद्धीच्या कालांतच कवी भोजन समारंभ वगैरेंची वर्णनें करूं शकतात कारण ते तसा अनुभव घेत असतात असें राजवाडे, पांगारकरांनीं म्हटलें आहे तें कितपत बरोबर आहे ! प्राचीन काव्यें वाचणारांस हा अनुभव आहे कीं ज्या ज्या वेळीं एखादा भोजन समारंभाचा प्रसंग येतो त्या त्या वेळीं त्या कवीच्या मगदुराप्रमाणे तो त्याचें सविस्तर वर्णन करतो. त्या कवीच्या वेळची राजकीय परिस्थिति तो लक्ष्यांत घेत नाहीं. भोजन समारंभास स्वयंवर काव्यांत विशेष अवसर असतो.

नरेंद्राचें काव्य अपुरेंच असल्यानें त्यांत असा प्रसंगच आला नाहीं. बहिरा जातवेदानें दशम स्कंदाच्या टीकेंत रु. स्व० आख्यानांमध्यें अशा भोजनादि समारंभांची विस्तृत वर्णनें दिली आहेत. त्याचा काल पहातां—शके १३५०—तो अत्यन्त धामधुमीचा होता. शके १३१८ (इ. स. १३९६) मध्यें सुरुं झालेल्या बारा वर्षांच्या दुर्गादेवी दुष्काळानें सर्व आर्थिक व्यवस्था बिघडली होती. बहामनी राजांनी चालविलेल्या हिंदूंच्या छळानें समाज अत्यंत विपन्नावस्थेंत होता विजयनगरच्या राजांच्या बरोबर सारख्या लढाया चालावयाच्या. बहामनी राजांच्या आपापसांतील वैरामुळें त्यांच्या सरदारांमध्यें तट पडून त्याचा उपद्रव प्रजेसहि व्हावयाचा. अशाच वेळीं बहिरा जातवेदानें मूळ भागवतांत नसले तरी—अनेक समारंभ, मेजवान्या, सोहळे वगैरेंची विस्तृत वर्णनें दिलीं आहेत. तोच प्रकार संतोषमुनींच्या काव्यांतील व त्या वेळच्या राजकीय परिस्थितींतील. संतोषमुनींच्या कालीं तर बहामनी राज्य मोडकळीस येऊन त्याचे तुकडे व्हावयास लागले होते व त्यांमुळें सर्व परिस्थिति अस्थिर झाली होती. विजयनगरमध्यें सुद्धां बंडाळ्या चालू होत्या शिवाय मुसलमान शाह्यांच्या बरोबर युद्धें चालू होतीच. मुसलमानांनीं चालविलेला बाटवाबाटवीचा व हिंदूंच्या छळाचा कार्यक्रम तर सततचा होता. अशा परिस्थितींत सुद्धां संतोषमुनीनें केलेली समारंभांची वर्णनें अतिशय भव्य व आल्हादकारक आहेत. याचें कारण कवि आपल्या विषयाशीं इतका एकजीव झालेला असतो कीं कांहीं काल तो आपल्या कालांतील सार्वजनिक व वैय्यक्तिक दुःखें विसरतो, शिवाय अशा प्रसंगीं भोजनादि प्रकारांचे वर्णन करण्याचा संकेतहि दिसतो, त्यामुळें त्यांच्या काव्यांत अशीं वर्णनें विस्तारानें येतात.

## संतोषमुनीनें केलेलीं स्वभाव चित्रणें—

कथा काव्यामध्यें निरनिराळी पात्रें असतात व त्यांचे स्वभावहि भिन्न असतात. त्या त्या स्वभावामुळें कथेमध्यें गुंतागुंत निर्माण होते, रंगहि भरतो. रुक्मिणी स्वयंवरामध्यें भीमक, रुक्मि, शिशुपाल, बलराम, सुदेव व श्रीकृष्ण ही पुरुष पात्रें सुभद्रा(?)ती, भावकळना, रुक्मिणी ही स्त्री पात्रें महत्त्वाची आहेत.

संतोषमुनीनें या सर्वांच्या स्वभावांतील सूक्ष्म छटा सुद्धां उत्तम रीतीनें रंगविल्या आहेत. भीमकाचें श्रीकृष्णाविषयींचें स्वाभाविक प्रेम पण मनो-दौर्बल्यामुळें रुक्मीच्या इच्छेस मानावें लागणें, पण रुक्मीचा पराभव झाल्या वेळीं त्यास मनोमन आनंद होणें व आपली अंतरींची इच्छा पूर्ण झाल्याचें समाधान मानणें या गोष्टी संतोषमुनीनें चांगल्या दाखविल्या आहेत.

रुक्मिणीचा वडील बंधु रुक्मि हा या कथेचा खलनायक आहे. तो श्रीकृष्णाचा अत्यंत द्वेष्टा, श्रीकृष्णाच्या वैऱ्यांचा मित्र, अहंमन्य व आपली इच्छा माता पित्यांवर लादणारा असा आहे. तो दीर्घद्वेषि परंतु शूर व अस्त्र विद्येंत निपुण आहे.

सुधामती (शुद्धामति) भीमकाची राणी. पुराणांत हिचा कोठें उल्लेख नाहीं. ब्रम्हवैर्तांत हिचें नांव सुभद्रा असें दिलें आहे. ही भीमका प्रमाणेंच श्रीकृष्णास रुक्मिणी द्यावी या मताची. स्वभावांत कणखरपणा नाहीं फक्त सदिच्छा आहे अशी दाखविली आहे. रुक्मिणीस अंबालयास पाठविण्याची भीमकाकडे ती परवानगी मागते व त्यांत ती यशस्वी होते एवढीच कामगिरी तिजकडे संतोषमुनि देतो.

शिशुपाल शूर खरा पण परिस्थितीमुळें जरासंध व रुक्मि यांच्या हातांतील बाहुलें बनलेला आहे. त्याला स्वतंत्र कर्तृत्व दाखविण्यास कवीनें कोठेंच जागा ठेविलेली नाहीं. मूळांत नसतानां श्रीकृष्णा बरोबर लढाई घडवून कवीनें तो शस्त्रास्त्र विद्येंत प्रविण पण कृष्णाच्या तुलनेनें फिक्का दाखविला आहे.

बलरामाकडे फक्त लढाई जिंकण्याचें काम दिलें होतें तवढें तो उत्तम रीतीनें पार पाडतो एवढेंच त्याचें कतत्व. नाहीं म्हणतां तो रुक्मीचा पराभव झाल्या-वेळीं रुक्मिणीच्या सांत्वनार्थ थोडा तिला तत्त्वज्ञानपर उपदेश करतो एवढें मूळ भागवतांतच आहे तेवढेंच काम संतोषमुनि त्यास देतो.

श्रीकृष्ण व रुक्मिणी यांचे स्वभाव कवीनें फार उत्कटतेनें दाखविले आहेत. त्यांचे स्वभावांचे सर्व पैलू संतोषमुनि आविष्कृत करतो यांत विशेष

कांहीं नाहीं तसें त्यानें केलें नसतें तरच आश्चर्य. कारण त्यांच्या स्वभावांच्या दर्शनार्थच भागवत पुराण आहे व तें काम त्या पुराणानें उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे.

परंतु संतोषमुनीचें कौशल्य सुदेव व भावकळना यांचे स्वभाव दर्शन घडवून आणण्यात दिसतें. सुदेव ब्राम्हण हा फक्त रुक्मिणीस श्रीकृष्ण आल्याची वर्दी देणारा जवळ जवळ निरोप्याच भागवतांत व इतर पुराणांत दाखविला आहे. भावकळना कोणत्याहि पुराणांत नाहीं. श्रीचक्रधरांनीं सुदेवास आणखी कांहीं कामें केल्याचें श्रेय दिले आहे. सुदेवानें श्रीकृष्णाकडे रुक्मिणीनें दिलेलें रुखवत पोंचविलें. श्रीकृष्णाशीं त्यानें संगतमत करून रुक्मिणीनें देवीच्या दर्शनार्थ अंबिकेच्या देवालयास जावे असें ठरविलें, त्याच्या सांगण्यावरून रुक्मिणीनें आपल्या मातेचें मन वळविलें व ती देवीदर्शनार्थ गेली, त्यानेंच रुक्मिणीस श्रीकृष्णाच्या स्वाधीन केली असें श्रीचक्रधरांनीं सांगितलें आहे. भावकळने बद्दल तें एवढेच सांगतात कीं ती प्रधान कन्या रुक्मिणीची विरहावस्था पाहून तिनें रुक्मिणीशीं हितगुज केलें व सुदेव पुरोहितास बोलावणें पाठविलें. त्यास तिनें रुक्मिणीच्या मनःस्थितीची कल्पना दिली.

संतोषमुनीनें या चक्रधर निरूपित भागांध्यें कांहीं फरक करून सुदेव व भावकळना या दोन्ही व्यक्तींना महत्त्वाचीं स्थानें मिळवून दिलीं आहेत तीं इतकी की या दोन व्यक्ति गाळल्या तर सबंध कथानकच नीरस होऊन जावें.

भावकळना ही रुक्मिणीची श्रेष्ठ सखी असून ती रुक्मिणीच्या सर्व भावनांशीं एकरूप झालेली आहे. रुक्मिणीच्या संकटकालीं धांवून येणारी, वेळोवेळीं सल्ला देणारी, चाणाक्ष दूरदृष्टीची व नम्र अशी संतोषमुनी दाखवितो. सुदेव श्रीकृष्णाशी मसलत करून रुक्मिणीनें अंबिकेच्या दर्शनास जावें असें ठरवून आल्या वेळीं ती कामगिरी कशी पार पाडावयाची हा रुक्मिणी पुढें प्रश्न पडतो. त्या प्रश्नाची सोडवणूक करण्याची कामगिरी भावकळनाच करते सुधामतीला ती रुक्मिणी कडून मांगवते कीं. रुक्मिणीस अंबिकेचा दृष्टांत झाला

असून आपल्या दर्शनास रुक्मिणीनें विवाहापूर्वी यावें असें बजावलें आहे. या भावकळनेच्या युक्तीनें अंबिकादर्शनास जाणें रुक्मिणीस शक्य होतें. याचे अगोदर भावकळनाच रुक्मिणीस एका संकटांतून सोडविते. ते म्हणजे फळ-प्रदानाच्या वेळीं शिशुपाला कडील आलेलें वस्त्र बदलून आपल्या भांडारांतील वस्त्र रुक्मिणीस नेसावयास देणें. या गोष्टी स्त्री स्वभावास योग्य अशाच आहेत. व या संतोषमुनींनें मार्मिकपणें स्वभावदर्शनार्थ निवडल्या आहेत. भावकळना मनकवडी आहे. अनेक दासींनीं रुक्मिणीस ज्वर कां आला आहे तें ओळखण्याचे प्रयत्न केले पण तो कां आला तें फक्त भावकळनेनेंच ओळखलें व त्यावर बिनतोड उपायहि तिनेंच सुचविला.

संतोषमुनीनें सुदेवाचें चित्र तर फारच सुंदर रेखाटलें आहे. सुदेव प्रथम भावकळनेच्या बोलावण्यावरून रुक्मिणीकडे येतो व तिची अवस्था जाणतो. त्या नंतर त्यानें रुक्मिणीची व श्रीकृष्णाची चार दिवसांत भेट करविण्याचें रुक्मिणीस दिलेलें अभिवचन तो पूर्ण करतो इतकेंच नव्हे तर रुक्मिणी श्रीकृष्णाची पत्नि होईतोंपर्यंत सर्व जबाबदारी तो स्वीकारतो व मोठ्या युक्तीनें, धैर्यानें व कर्तव्यबुद्धिनें ती तो पार पाडतो. सुदेव हा एक आदर्श ब्राम्हण .व कृष्ण भक्त दाखविला आहे. तो कुंडिनपुरा पासून द्वारकेचा प्रवास आपल्या बरोबरच्या दहा सेवकांसह करतो त्या वेळीं त्या सेवकांना तो श्रीकृष्णाचा व द्वारकेचाहि महिमा काय आहे तें सांगतो. इतर कोणत्याही विचारास तो थारा देत नाहीं. द्वारकेजवळ आल्या पासून तों श्रीकृष्णाची भेट होईपर्यंत त्याच्या पुढें अनेक मोह येतात पण कोणत्याहि मोहास तो बळी पडत नाहीं. तो विलक्ष आत्मसंयमीहि आहे. त्यास द्वारकेतल्या सुंदर स्त्रिया सुद्धां वश करूं शकल्या नाहींत व हा म्हातारा आहे याला कृष्णाची भेटच महत्वाची वाटते यास सोडून द्या असे निराशेचे उद्गार त्या काढतात. सुदेव चौकस बुद्धीचा, हजरजबाबी, बहुश्रुत, आपली जबाबदारी ओळखणारा कर्तव्य निष्ठ, प्रसंगावधानी व श्रद्धाळु असा रंगविला आहे.

संतोषमुनीनें एकेका व्यक्तीची चित्रें जशी उठावदार रंगविली आहेत, त्यांच्या स्वभावांतील गुणदोष जसे बारकाईनें दाखविले आहेत तसे सामुदायिक

स्वभाव दर्शनहि त्यानें, एक प्रसंग निर्माण करून, चांगलें घडविलें आहे. रुक्मिणी श्रीकृष्णासह मूळ महादेवाहून द्वारकेस जाण्यास निघते तेव्हां तिच्या पांचशे दासी तिजपाशीं येतात व ती आतां कुंडिनपुरामध्यें असणार नाहीं, त्या ठिकाणी आपणांस तरी कसे राहवेल ! जेथें रुक्मिणी तेथें आपण असणे हेंच योग्य, तसें होऊं शकलें नाहीं तर प्राणतरी कशास ठेवावयाचे ! असें रुक्मिणीस म्हणतात व तिची काकुळतेनें विनंति करतात कीं तिनें श्रीकृष्णास विनंति करून आपल्यास बरोबर नेण्याचीं कृपा करावी. रुक्मिणीनें त्या प्रमाणें श्रीकृष्णास विनंति केली ती कृष्णानें मानली व त्यानें अर्जुनास त्या पांचशे दासीनां बरोबर घेण्यास सांगितलें असा तो प्रसंग आहे. (प्र. २३ ओ २९८ ते ३०३) या मध्यें त्या सर्व दासींचे रुक्मिणीवरील शुद्ध प्रेम, रुक्मिणीचीहि त्याचे विषयींची आपुलकी, श्रीकृष्णाचें सौजन्य व स्त्री दाक्षिण्य असे अनेक गुण संतोषमुनीनें उत्कर्षानें दाखविले आहेत.

**संतोषमुनि व पौराणिक उल्लेख–**

संतोषमुनीनें श्रीकृष्ण-कथा श्रवण केल्यानें सर्व पापांचा नाश होतो हें सांगतांना कांहीं पौराणिक दाखले दिले आहेत. उदाहरणार्थ, जनमेजयाच्या अठरा हत्यांचें पातक भारत—जी कृष्ण कथाच आहे—ऐकल्यानें नष्ट होणे (ओ. २७). महाभारत श्रवण करणाऱ्या जनमेजयाच्या हातून अठरा हत्या घडल्याचा उल्लेख महाभारतांत दिसत नाहीं. शांति पर्वांत (आध्याय १५०–१५२) एका जनमेजयाच्या ब्रम्हहत्येचें पातक कसें नष्ट झालें हें सांगणारी एक कथा आहे पण तो जनमेजय भारत श्रवण करणारा नव्हे. तो पांडवांच्या अगोदर फार प्राचीन काळीं होऊन गेलेला एक जनमेजय होय. जनमेजयाच्या हातून ब्रम्हहत्या कशा झाल्या व त्या भारत श्रवण केल्यानें कशा नष्ट झाल्या या विषयींची एक कथा विष्णुदास नाम्यानें आपल्या भारताच्या आदि पर्वांत पहिल्या चार अध्यायांत सांगितली आहे. तिचाच उल्लेख संतोषमुनि आपल्या या काव्यांत करतो असें दिसतें. या वरून विष्णुदास नामा संतोषमुनीच्या अगोदर निदान ५०–७५ वर्षें तरी होऊन गेला असावा असें वाटतें. या बाबतची चर्चा मी 'जनमेजयाच्या अठरा ब्रम्हहत्या व विष्णुदास नामा' या लेखांत

केली आहे. (म. सा. पत्रिका अंक १४२ आक्टोबर १९६२). ज्ञानेश्वरी मध्यें (आ. १ ओ. ३७) "म्हणोनि जन्मेजयाचे अवलीळा। दोष गेले" असा उल्लेख आहे. ते दोष सर्पकुल संहाराचे, अठरा ब्रम्हहत्त्यांचे नव्हत.

त्याच प्रमाणे ऋतुध्वजाच्या राणीस-मदालसेस-महाविषाची बाधा (३०-३१), मंदोदरीच्या मुखावरील कुष्ट (२८), जयमुनीचे कुष्ट (२७) वगैरे गोष्टींचे उल्लेख संतोषमुनीनें केले आहेत पण त्या कथा कोणत्या पुराणांतील आहेत तें कळत नाहीं. कदाचित् त्यांचा उगम महानुभावांच्या कांहीं जुन्या ग्रंथांत असावा पण ते ग्रंथ अजून उजेडांत यावयाचे आहेत. जैनांच्या प्रमाणे महानुभावीयांनी कांहीं पुराणें तयार केली होती काय असा एक प्रश्न असून तो सुटावयाचा आहे. श्रीचक्रधरांनी सांगितलेल्या श्रीकृष्ण चरित्रांत भागवतादि पुराणां मध्यें नसलेल्या अशा गोष्टि जशा आहेत तशा त्यांच्या इतर आचार्यांनी कांहीं गोष्टि सांगितल्या असणें शक्य आहे व त्या रुढ झाल्या असतीलहि पण त्यांचे संशोधन अद्याप झालेलें नाहीं. जैनांच्या प्रमाणें महानुभावीयांनी पुराणे रचली काय अशी शंका येत असली तरी दोघांच्या विचार सरणींत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. जैनांनी वैदिकानुयायांच्या पुराणांतील कथांचें विडंबनच अनेक वेळां केलें आहे. पण तसा प्रकार महानुभावीयांचा नाहीं. ते वेद व पुराणें मानणारे असल्यानें त्यांनी पूरक-बदलच केले आहेत.

**संतोषमुनीच्या काव्यांतील कांही इतर उल्लेख :—**

संतोषमुमीनें आपल्या या काव्यांत अनेक गोष्टींचे उल्लेख केले आहेत. त्यांत अनेक देशांची नांवे, राज्यांची नांवें, देश वा प्रांत, विशिष्ट स्वभाव, व्यक्ति विशिष्ट स्वभाव वगैरे पुष्कळच प्रकार आहेत. त्यांचा सूक्ष्म अभ्यास होणे जरूर आहे. येथें तसा अभ्यास व त्याचें फलित मांडण्यास अवकाश नाहीं फक्त कांही महत्वाच्या अशा एक दोन गोष्टींचाच निर्देश करणें शक्य आहे.

कवीनें किन्नराच्या तोंडीं निरनिराळ्या देशांतील लोकांचीं वर्णनें घातलीं आहेत तशीच त्यांची नांवेहि दिली आहेत. त्यांत हरमुंजे (३६५) व फिरंगी (३६४) हीं दोन नांवें आहेत. हरमुंजे म्हणजे इंग्रज व फिरंगी म्हणजे पोर्तुगीज असे या नांवांचे अर्थ कांहीं संशोधकांचे कडून लाविले गेले आहेत. विशेषतः

मुक्तेश्वराच्या आदिपर्वातील शब्दांच्या निर्देशांचे असे अर्थ लाविले गेले असून तेच आतां रूढ झाले असल्यानें त्यांचे या ठिकाणी काय अर्थ अभिप्रेत आहेत तें स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण संतोषमुनीनें हें काव्य शके १४१६ मध्यें लिहिलें व पोर्तुगीज त्याच वर्षी कालीकत बंदरांत आले. कालीकत बंदर मलबारांत आहे. संतोषमुनि मराठवाडा, नाशिक जिल्हा याचे आसपास काव्य रचनेच्या सुमारास यात्रा करीत हिंडत होता. त्यामुळें पोर्तुगीजांचें हिंदुस्थानांतील आगमन त्याच्या गांवींहि असणे शक्य नव्हते. इंग्रज तर फार नंतर आले. त्यामुळें या दोन जमातींचे नांवाचें स्पष्टीकरण होणे अवश्य आहे. हीं दोन नांवें सिंध, कंभोज, मळोवाड (मारवाड) वगैरे देशांच्या जवळ असलेल्या प्रांतांतल्य लोकांची म्हणून आली आहेत याकडे लक्ष्य वेधणे अवश्य आहे. ती स्थलें व पठाण वगैरेंचा त्या जवळचे म्हणून उल्लेख (प्र. ४ ओ. ४१) विचारांत घेतां हे मुसलमानी लोक स्पष्ट दिसतात व त्यामुळें हीं दोन नांवे हार्मुझ कडून आलेल्या लोकांची अभिप्रेत आहेत. हिंदुस्थानांत अनेक तऱ्हेचे मुसलमानी लोक आले होते व ते दक्षिणेतील लोकांच्याहि, संतोषमुनीच्य काळीं परिचयाचे झाले होते, कारण दाक्षिणेंत मुसलमानांची राज्यें प्रस्थापित होऊन बरीच म्हणजे दोनशे वर्षे झाली होती. त्या मुससमानी जमातींतील फिरत्या जमातीनां फिरंगी म्हणत असत असें दिसते. हार्मुझ वगैरे कडच्या लोकांचे वर्ण हुरमुंजी असल्यानें त्यांनां हरमुंजे म्हणत हें उघडच आहे.

संतोषमुनीनें 'बेदर' शहराचाहि उल्लेख केलेला दिसून येईल (प्र.४ ओ-४९) व तो दक्षिणे कडच्या देशांत आहे उदाहणार्थ करनाटक (प्र ४ ओ.४७) (प्र.४ ओ४८) हा उल्लेख काल विपर्यासाचें एक उदाहरण आहे. असे बरेच काल विपर्यास या काव्यांत आढळतील. श्रीकृष्णाच्या दरबारांत मराठे वीर हा त्याचाच प्रकार आहे.

संतोषमुनि क्षत्रियांच्या छत्तिसकुळींचाच निर्देश करतो शाहण्णव कुळींचा करीत नाहीं. त्या काला पर्यंत तरी क्षत्रियांच्या छत्तिस कुळोच समजल्या जात असावेसें दिसतें. एकनाथ महाराजहि शहाण्णव कुळींचा कोठे उल्लेख करतांन दिसत नाहींत. या वरुन या शाहण्णव कुळींची गणना पुढें—विशेषत: मराठ्यांत

सुरु झालेली असावी. वास्तविकपणें पाहतां श्रीकृष्णाच्या काळीं क्षत्रियांत फक्त दोनच भेद होते एक सूर्यवंशी व दुसरे चंद्रवंशी. या नंतर काल महात्म्यानें भेद वाढत गेले आहेत.

श्रीकृष्णाच्या दरबारांतील क्षत्रियांची आडनांवे व शहांणव कुळीं मध्ये दिलेली आडनांवे यांची पहाणी अवश्य व्हावयास पाहिजे. या विषयाचा उहापोह येथें करणें योग्य नव्हे.

या काव्यांत प्र. ५ ओ. ३ मध्यें वायव्य देशीचा राजा मानसिंग याचा उल्लेख आला आहे. हा मानसिंग ग्वाल्हेर शहर वसविणारा मानसिंग होय, अकबर कालीन मानसिंग नव्हे.

### संतोषमुनीचा महाराष्ट्र :—

संतोषमुनीनें महाराष्ट्राचा उल्लेख केला आहे तो 'देसु मऱ्हाटा' या शब्दांत प्र. ४ ओ. २७ मध्यें. त्यानें महाराष्ट्राच्या मर्यादा सांगितल्या आहेत. ओ. २९ मध्यें महाराष्ट्र शब्दाचाहि उल्लेख आहे. या देशाच्या त्यानें सांगितलेल्या मर्यादा पहातां तो पश्चिमेस नाशिक पासून पुढें पूर्वेस समुद्रापर्यंत गोदावरीच्या उभय तीरा जवळील बारा बारा योजने असा दिला आहे. वास्तविक पहातां या महाराष्ट्राच्या खऱ्या मर्यादा नव्हत. परन्तु हा कवि महानुभावीय असल्यानें त्याच्या काळीं महानुभावांच्या विशेष वस्तीचा भाग तेवढाच त्यानें सांगितला आहे. गोदावरी नदीला पुण्य पावन भागीरथीचें स्थान त्या काळच्या बहुतेक कवींनीं दिलेलें दिसेल. श्री ज्ञानेश्वर महाराज सुद्धां तिला गंगेसमान मानतात. "गंगा तटी महाराष्ट्रीं: वसिजे पुन्यास्तव: प्र. ४ ओ. २९ तीये महाराष्ट्रीं गंगातीर महंत: तेथ सदा ईश्वर अवतार असती क्रीडत: म्हणौनिं सर्व तीर्थें देवता सहीत: येती तयासिं वोळगावया" अशा शब्दांत कवि महाराष्ट्राची महति गातो. प्र. ४ ओ. ३०

### संतोषमुनि व मराठी भाषा :—

श्रीकृष्ण–रुक्मिणी विवाहाची कथा मूळांत संस्कृत मध्यें आहे. संस्कृत भाषेविषयीं लोकांना अतीव आदर व मराठी भाषेस साधारणतः दुय्यम स्थान. पंडित लोक तर मराठींत लिहिणे अपमानास्पद मानीत. ही स्थिति अकराव्या

बाराव्या शतकांतच नव्हे तर सोळाव्या शतकांत सुद्धां फारशी बदललेली नव्हती. संतोषमुनींच्या कालीं मराठी मध्यें लेखन करणें गौणच समजले जाई. संतोषमुनीनें यामुळेंच मराठीची हिरीरीनें तरफदारी केली आहे. त्यानें 'संस्कृत देवानें केली व मग मराठी काय चोरा पासून झाली !' अशा कठोर शब्दांत आपला मराठी भाषेचा अभिमान व्यक्त न करतां मोठया खुबीनें संस्कृतास कमीपणा दिला आहे. त्याचेंच शब्दांत सांगावयाचें झाल्यास "छपन भाषांचिये मुगुटिं: सोभे सुहावि सुंदर मऱ्हाटी: आणि संस्कृत वाढवीलें पोटिं: वागवि पुढां करुणि प्र. १ ओ ॥४५॥ जैसी स्नेहाळु जननि: आपत्यें वागवी करीं धरुनि: तैसी सद्भाषांलागौनि: व्यापारवींत असे ॥प्र. १ ओ ४९॥

व्याकरणांत संस्कृत शब्द नपुरुकलिंगी आहे व मराठी शब्द स्त्रीलिंगी आहे याचा कवीनें फायदा घेतला असून संस्कृत हें मराठीचें अपत्य आहे असें म्हणून मराठीची थोरवी त्यानें दाखविली आहे. इतकेंच नव्हे तर मराठी खेरीज इतर सर्व भाषांना तो मराठीची लेंकरेंच म्हणतो "ऐसी ते सर्व भाषांची जननि: उत्तम पवित्र मऱ्हाष्टी वाणि:" (प्र. १ ओ ५०) मराठीचा इतका जाज्वल्य अभिमान असतांना सुद्धां संतोषमुनीनें विनय सोडला नाहीं हें विशेष आहे,

## संतोषमुनि व तत्त्वज्ञान —

एकनाथ महाराजांनी आपलें रुक्मिणी स्वयंवर लिहून अशी एक समजूत निर्माण केलेली आहे कीं हें आख्यान केवळ तत्त्वज्ञान सांगण्या करितांच वापरावयाचें. नाथ महाराजांचा रूपकें करण्याबाबत हातखंडा आहे व त्याचा त्यांनीं इतका उपयोग केला आहे कीं या त्यांच्या स्वयंवर आख्यानास त्यांनीं अगदीं रुक्ष बनवून टाकलें आहे. वास्तविक कृष्णचरित्रांतलि हा प्रसंग अत्यंत काव्यमय व स्त्रियांना तर अगदीं प्रिय वाटण्याजोगा. पण नाथांनीं तो अशा पद्धतीनें लिहिला आहे कीं स्त्रियांना तो समजण्यास फारच कठीण झाला आहे नाथांनी लिहिलेला व प्रसाद ग्रंथ म्हणूनच तो केवळ वाचला जातो. यास कारणहि काय आहे ते मी मागे सांगितलें आहेच. संतोषमुनीनें लिहिलेलें

रुक्मिनी सैंवर घरोघर नाचलें जात असावें, ते द्वैती विचारसरणीवर आधारलेले व तसा त्याचा परिणाम, भावना प्रधान अशा स्त्रीसमाजावर, होणे योग्य नव्हे असें वाटून हें अव्हैत तत्त्वज्ञान प्रतिपादक असें काव्य एकनाथ महाराजांनीं लिहिलें असावें.

संतोषमुनीचा उद्देश श्रीकृष्णगुणगान हा आहे. असें करीत अतांस श्रीकृष्णाच्या स्वरूपाचें यथार्थ दर्शन घडविणें क्रम प्राप्त आहे. हें स्वरूप आपल्या सांप्रदाया प्रमाणेच घडविणार. त्यामुळें तत्त्वज्ञान सांगावेंच लागतें. हें सांगण्याचा प्रकार ज्याच्यां त्याच्या प्रकृति प्रमाणें असतो. महानुभावियांच्या तत्वज्ञानांत ज्ञान व प्रेम यास महत्त्वाचें स्थान आहे. परमेश्वराचें यथार्थ ज्ञान व त्याच्या वर अनन्य प्रेम यामुळें जीवास सेवा सन्निधान मिळतें, व हाच मोक्ष असा त्यांचा स्थूलतः सिद्धांत आहे. श्रीकृष्ण हाच परमेश्वर व यामुळें त्याचीच भक्ति विहित आहे. इतर देवतांना महानुभावियांच्या मतें गौण स्थान आहे. सर्व देवता, ऋषि, मुनि या कृष्णाचें सन्निधान इच्छितात (प्र. ६ ओ ८३) असें सन्निधान मिळण्यास पुण्य करावें लागतें. पण पुण्याचरण करावयाचें तर प्रथम शास्त्रश्रवण करावें लागतें. गुरुमुखानेच मिळालें पाहिजे नाहींतर सर्व करणें व्यर्थ जातें (प्र. ओ १०३) अशी कायकारण परंपराहि संतोषमुनि सांगतो. श्रीकृष्णाचें एकदां सन्निधान मिळाल्यावर त्याची सेवा करावी लागते व त्याच्या पुढची पायरी त्याचें दास्य करणें होय. दास्य करण्यानंच पुढें त्याचें याथार्थ ज्ञान होते असाहि एक क्रम संतोषमुनीनें सांगितला आहे. (प्र. ७ ओ. ७५)

संसारांतील त्रिविध तापावर परमेश्वराचें नामस्मरण हाच एक उपाय आहे. (प्र. ९ ओ. ९२) श्रीकृष्णाच्या भेटीनें अनादीची व्यथा म्हणजे अज्ञान नष्ट होतें असें तो सांगतो (प्र. ९ ओ. १३२) परमेश्वर सर्व विषयांच्या पासून दूर असल्यानें त्याच्या चिंतनानें विषयभाव मनांत येत नाहींत. श्रीकृष्ण हा सर्वात्मा, सर्वज्ञ व भक्तवत्सल आहे. तोच सृष्टि-स्थिति-संहारकर्ता आहे. योगाचें कार्य श्रीकृष्ण दर्शन होणे हेंच आहे (प्र. १४ ओ. १७१). पण

श्रीकृष्णाचें दर्शन संपूर्णतया होणे शक्य नाहीं कारण ज्या ठिकाणीं (अवयवावर) दृष्टी पडते त्या ठिकाणींच ती खिळून राहते, तिला तेथून हलावेसें वाटतच नाहीं (प्र. १५ ओ. ४). आपला जसा भाव तसा देव होतो (प्र. १५ ओ. ५३) श्रीकृष्ण व रुक्मिणी यांचें स्वरूप संतोषमुनि कृष्ण करुणाकर रुक्मिणी करुणा, तो कृपासागर ही कृपा, तो परब्रह्म ही ब्रह्मविद्या या शब्दांत सांगतो. संतोष–मुनींनें अद्वैताला एके ठिकाणीं कोपरखळी दिली आहे. तो म्हणतो ज्यांच्या येथें एका ताटांत सुद्धां श्रीकृष्ण रुक्मिणींचें भोजन नाहीं तेथें एकत्व तरी कोठून येणार ? (प्र. २३ ओ. २०७). परमेश्वर मानवांना ज्ञानभक्तिचें परमसुख देण्याकरितां मनुष्यवेशांत अवतार घेतो (प्र. २४ ओ. ६५).

संतोषमुनि एवढे सर्व सांगतो तें इतक्या सहज रीतीनें कीं तो कांहीं तरी तत्त्वज्ञान, नीति नियम सांगत आहे असें कळूं सुद्धां नये. निरनिराळ्या व्यक्तींच्या संवादामध्यें तो सर्व कांहीं तत्त्वज्ञान सांगतो. त्यास अतिरेक बिलकुल माहीत नाहीं त्यामुळें न कळतच वाचकांच्या मनावर परिणाम होतो. एकनाथ व संतोषमुनि यांच्या काव्यांत हा महत्त्वाचा फरक आहे.

संतोषमुनि रूपकें करीत नाहीं असें हि पण नाहीं. सुदेव व त्याचे दहा सेवक हे दहा इंद्रियें व अकरावें मन याचेंच रूपक आहे.

बहिरा जातवेदानेंहि आपल्या रुक्मिणी स्वयंवर अध्यायांतील टीकेंत अद्वैत वेदांतच सांगितला आहे पण त्यानें काव्याची कोटिहि हानि न होईल याकडे लक्ष्य दिलें आहे. त्यानेंहि कांहीं रूपकें केलीं आहेत पण तीहि अगदीं थोडीं त्यामुळें रसहानि कोठेहि होत नाहीं. तत्त्वज्ञान व काव्य यांची सांगड कशी घालावी तें संतोषमुनि व बहिरा जातवेद उत्कृष्टपणें दाखवितात.

## थोडी भाषिक पहाणी—

संतोषमुनि शके १४१८ मधील लेखक असल्यानें त्याच्या भाषेवर यादव–कालीन ग्रंथांचा प्रभाव विशेष दिसतो. दोनशे वर्षां मध्यें (१२००–१४००) सहाजिकपणें जो भाषेंत फरक पडतो तोही त्याचे ग्रंथांत दिसतो. त्यांचा सूक्ष्म अभ्यास व त्याचीं फलितें मांडण्याचें हें ठिकाण नव्हे-सामान्य वाचकांस

त्यामध्यें गोडी वाटत नाहीं. परीक्षांच्या दृष्टीनें विद्यार्थीवर्गासच त्याचा उपयोग आहे व ती दृष्टि येथें अभिप्रेत नाहीं. त्यामुळें फार खोलांत न शिरतां त्याच्या भाषेचीं वैशिष्ट्यें स्थूलपणें देणेच योग्य होईल.

(१) स्वर प्रक्रिया—अनेक ठिकाणीं अचा आ होतो.

उदा० :—आगाध (प्र. १ ओ. ४) आखंड (प्र. १ ओ. ७) आज्ञानतम (प्र. १ ओ. ९) आपमृत्ये (प्र. १ ओ. २२).

अचे ऐवजी ए—नायेकु (प्र. १ ओ. ४२) होये (प्र. १ ओ. ३८) कौंडिन्येपुरीं (प्र. २ ओ. ३).

विचे ऐवजी इ—इद्रुम (प्र. २ ओ. १९).

ऋ चे ऐवजी रु—विद्रुम चे ऐवजी इद्रुम.

न चे ऐवजी ण—पावण (प्र. १ ओ. ३४) माणवि (प्र. १ ओ. ३४) आपमाण (प्र. १ ओ. २९) जनणि (प्र. १ ओ. ३४).

ळ चे ऐवजी न—वाखानीताती (प्र. १ ओ. ३४).

र्‍हस्व व दीर्घ यांच्या उलटा पालटी अनेक वेळां झाल्या आहेत — वीसाळ, (प्र. २ ओ. १९) वाखानीताती (प्र. १ ओ. ३४).

शचे ऐवजी स—वींसाळपणें (प्र. २ ओ. २१) आद्य सक्ति (प्र. ५ ओ. ९५) अतीस (प्र. ५ ओ. ८१).

अर चे ऐवजी र—प्रतै (प्र. २१ ओ. ११५) सुद्रसेन (प्र. ५ ओ. ५२).

ओ ऐवजी औ—

म्हणौनि (प्र. २ ओ. ४७) भरौनि (प्र. २ ओ. ४७) उचलौनि (प्र. २ ओ. ५६) देखौनि (प्र. २ ओ. ५९)

**जुने शब्द** :—वास=बाजू (प्र. २ ओ. ५९) गोसांवीण=मुख्य (प्र. २ ओ. ५८) थीरु=अवकाश (प्र. २ ओ ५५) हवाव=सौंदर्य (प्र. ३ ओ ७३) सांपे=आतांच, सध्यां (प्र. ५ ओ ९१) गीत सुद=गवाडा (प्र. ५ ओ ८२)

वरील बहुतेक सर्व शब्द यादव कालीन वाङ्मयात आढळतात. असे पुष्कळच शब्द या काव्यांत दिसतील.

एकनाथ महाराजांनीं मराठी भाषेत बरीच क्रांति केली. त्यांनीं जुने वळण बदलून नवे वळण लावलें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी जें कार्य एकोणिसाव्या शतकांत केलें त्याच प्रकारचें कार्य नाथांनीं पंधराव्या शतकाचे अखेरीस केले. त्यांच्या भाषासुधारणेचा काल संतोषमुनीच्या नंतर पाऊणशे वर्षांनीं येतो त्यामुळें संतोषमुनींत अजून जुने शब्द, जुने प्रयोग दिसतात. त्यांचेवर ज्ञानेश्वरीचा विशेष प्रभाव दिसतो. त्याची कांहीं उदाहरणे पुढे देत आहे तींवरून कळून येईल.

| संतोषमुनि | ज्ञानेश्वर. |
|---|---|
| १ अमृत आश्वादणेंः फावती सकळै रस प्र. १ ओ ॥३५॥ | १ नातरि अमृतरसास्वादनीं । रस सकळ १-२६ |
| २ जैसी सर्व तीर्थें समुद्री स्थाणी प्र. १ ओ ३९ | २ कां तीर्थें जियें त्रिभुवनीं । तियें घडति समुद्रावगाहनीं १-२६ |
| ३ ऐसी त्रिभुवर्णि पवित्र पावण प्र. १ ओ ३४ | ३ तेथ भुवनैक पवित्र १८—१७८२ |
| ४ सिद्ध रसाचीये मुसे वोतीली प्र. २ ओ १० | ४ सिद्धरसाचे वोतीव ९—२५५ |
| ५ जैसी गिरी दुर्गे चालती प्र. १४ ओ ३५ | ५ गिरि दुर्ग जैसें चालते १—९६ |
| ६ सैन्यें सिंधु प्र. १९ ओ. ३० | ६ सैन्य सिंधु १—९५ |
| ७ वेसणा वरपडा हो आल प्र. १९ ओ. ५५ | ७ पापा वरपडा होसील २—२०१ |
| आपुलेनि नांवेः गवसुनि घेतील जीवें. प्र. २० ओ. ३४ | ८ गिवसूनि घेति तेयातें ३—११३ |

| | |
|---|---|
| ९ राये मीनले असती बहुत प्र. २२ ओ. १३२ | ९ हे सकळ ही महारथी वीर। मीनले असति १—१०२ |
| १० उपनला वेधु प्र. १ ओ. ३३ | १० जेथ कामु उपनला २—३२२ |

या वरून असेंहि दिसून येईल कीं भिन्न सांप्रदायाच्या लेखकास सुद्धां ज्ञानेश्वरीचा अभ्यास आवश्यक वाटत होता. असो.

### ओव्यांची रचना :—

संतोषमुनि रुक्मिनी सैंवरांत निरनिराळ्या रचनेच्या ओव्या लिहितानां आढळतो. त्यांत कांहीं साडेतीन चरणि तर कांहीं चार चरणीहि आढळतील. त्यांतील अक्षर-संख्याहि फार अनियमित आहे. ओवीस तसे पाहतां अक्षरें किंवा मात्रा कशाचेंच बंधन नाहीं तरी त्यांत हि कांहीं सुसूत्रता असते पण तशी ती संतोषमुनींत कमी आढळते. त्याच्या कांहीं ओव्यांत ३२ (७५) अक्षरें असतील कांहींत ३६ (प्र. १ १०) तर कांहींत ५२ (प्र. २ ओ. ७) अक्षरेंहि मिळतील. चरणांच्या लांबी मध्येंहि नियमितपणा असतोच असें नाहीं. प्रास दोष सहसा आढळत नाहींत. प्रास जमविण्या करितां शब्दांची ओढाताण कोठे आढळत नाहीं किंवा त्या करितां बोजड शब्द वापरले गेले नाहींत. ओवीचा अनियमितपणा भाषेच्या ओघाच्या सहसा आड येत नाहीं.

### समारोप—

प्रस्तावना बरीच लांबत चालली. पृष्ठ मर्यादा ध्यानांत घेऊन ती येथेंच थांबविणे जरूर आहे. हें संतोषमुनीचें काव्य म्हणजे अनेक विषयांची खाण आहे. त्यांतील सर्व विषयांची चर्चा करावयाची तर मूळ काव्या पेक्षां प्रस्तावना मोठी व्हावयाची इतकी त्यांत सामुग्री भरली आहे. पण कोठे तरी आळा घालणे भाग आहे. आतां पर्यंत जे विषय या प्रस्तावनेंत चर्चेस घेतले ते थोडेच व महात्त्वाचे तेवढेच घेतले. त्यावरील विवेचनहि, तसें पहाता, पूर्ण पणे करूं शकलों नाहीं. तरी पण या साडे चारशे वर्षां पेक्षां जास्त जुन्या काव्याचें महत्त्व अनेक दृष्टिनें पाहू गेले तरी, किती आहे हें कळून येईल अशी खात्री

वाटते. मराठींतील स्वयंवर काव्यांत संतोषमुनीच्या या काव्यास फार वरचे स्थान देणे भाग आहे. हें काव्य त्यानें फक्त एका महिन्यांत लिहिलें यावरून त्याची लेखन शक्ति दिसून येते. संतोषमुनीचें हें रुक्मिणी स्वैवर काव्य वाचल्यावर विचार येतो कीं एवढें सुंदर काव्य, इतक्या साध्या व ओघवती भाषेंत लिहिणाऱ्याची ही पहिलीच व शेवटचीच कृति असेल काय ? तर्क आहे कीं याची आणखी कांहीं रचना असावी, एक तर ती उजेडांत आली नसेल किंवा या काव्याकडेच पंथीयांचा विशेष ओढा असल्यानें त्याची ती इतर रचना नष्ट झाली असावी. कसेहि असलें तरी आज त्याचें हें एकच पण अतीव सुंदर लेणे महाराष्ट्र सरस्वतीच्या अंगावर लेइलेलें पहावयास सांपडत आहे.

रुक्मिणी स्वयंवर काव्यांची रत्नखचित माला सरस्वतीच्या कंठांत घालावयाची ठरविल्यास या संतोषमुनीच्या काव्यास मधल्या मोठ्या पदकाचें स्थान द्यावें लागेल. एका श्लोका पासून रुक्मिणी स्वयंवर काव्यें रचिली गेली आहेत. त्यांत गुणाप्रमाणेच मोठेपणाच्या दृष्टीनें याचाच क्रम सर्वांत वर लागेल. भाषा, लालित्य, उपमा, अलंकार वगैरेंनीं सुशोभित असें हें काव्य मराठी भाषेचें एक भूषणच ठरावे. पुराणांची प्रतिष्ठा असलेलें पण महाकाव्यांत शोभेल असेच हें काव्य रचून संतोषमुनीनें मराठी सारस्वतास शोभा आणिली आहे. संबंध रुक्मिणी स्वयंवर काव्यांचा अभ्यास करणाऱ्यास या काव्यास महत्त्वाचें स्थान द्यावे लागेल. महानुभावीय कवींनी मराठी भाषेंत जी भर घातली आहे त्यांत हें काव्य एक महत्त्वाचें स्थान पटकावील यांत बिलकुल शंका नाहीं.

याच्या अगोदरच वास्तविक हें काव्य व्यवस्थितपणें संपादून प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होते इतकें तें वरच्या दर्जाचें आहे. परंतु पंथीय मंडळी आपलें ग्रंथ प्रसिद्ध करण्यासच काय पण कळूं देण्यासहि नाखूष होते, त्या मुळें मराठी जनतेच्या हातांत पडूं शकले नाहीं. महानुभावीय मंडळी आतां कोठे आपले ग्रंथ दाखविण्यास व प्रसिद्धहि करण्यास तयार होऊं लागली आहेत. डॉ. वि. भि. कोलते, श्री. ह. नेने, श्री. य. खु. देशपांडे वगैरे मंडळींनीं या कार्यास हात घालून कांहीं महत्वाचे ग्रंथ प्रसिद्धहि केले आहेत. असें कळते कीं के. ह. ना. नेने हा ग्रंथ प्रसिद्ध करणार होते व या दृष्टीनें कांहीं कामहि त्यांनीं

केलें होते पण दुर्दैवानें त्यांचें वर काळाची झडप पडल्यानें तें काम पूर्ण होऊं शकलें नाहीं. दुसरे कोणी अधिकारी संपादक हें प्रसिद्ध करतील असेंहि वाटत होते पणत मे होण्याची चिन्हे न दिसल्यानें व शक्य तितक्या लवकर—आतां अधिक न थांबतां—प्रसिद्ध व्हावें अशी मनाने ओढ घेतल्यानें हें काम हातीं घेऊन पूर्ण करीत आहे.

संपादनाच्या कामांत मी किति यशस्वी झालो आहे तें मराठी वाचकांनी ठरवावयाचें आहे. माझ्या मर्यादांची जाणीव मला आहे. पण अशा तऱ्हेच्या कामाची हौस असल्यानेंच केवळ हें काम करण्याचें ठरविलें व पूर्ण केले. आज जवळ-जवळ पांच वर्षें--मध्यें-मध्यें खंड पडत कां होईना-या ग्रंथाच्या अभ्यासांत घालविली व त्यांतील काव्याचा आनंदहि लुटला. आतां त्यांत माझे मराठी बांधव सहभागी होणार असल्याचा आणखी आगळा आनंद वाटत आहे. याचें योग्य तें चीज होईल अशी आशा बाळगून ही प्रस्तावना येथेंच संपवितो.

श्री चक्रधर जयंती
भाद्रपद शु.२ शके १८८५

—नारायण बलवंत जोशी

अनुक्रम ...........
क्रमांक ........

# रुक्मिनी-सैंवर

## प्रसंग पहिला

श्रीपरमात्मने नमः

स्वस्ति श्री भागवती कथा उद्धरण : शुभमंगलकारण
रुक्मिनी सैंवरु श्रीकृष्ण स्तुति श्रवण : गुणकीर्ती वर्णीन ॥

जय जय आगाधा आनंता आपारा : जय जय परब्रह्मा परात्परा
जय जय जीवोद्धरणा श्रीचक्रधरा : नमो आदि पुरुषा ॥ १
फेडावया सृष्टीचा भारु : जेणें यदुकुळीं केला अवतारु
तो वंदू कृपेचा सागरु : श्रीकृष्णरावो ॥ २
जेणें पवित्र केली द्वारावती : जीव उद्धरिले देखा नाहीं मिती
आणि विद्यामार्ग प्रगटिले क्षितीं : तेया नमो श्रीसर्वेश्वरा ॥ ३
जो आगाध न कळे वेदश्रुति : तो आत्माराम होऊनि क्रीडे क्षितीं
तया साष्टांगीं नमो कैवल्यपती : श्रीप्रभुराया ॥ ४
जेणें उभयशक्ति स्वीकरोनी : जीवां केली ज्ञानप्रेमाची धवधनी
तो करुणाकरु आर्तादानी : वंदू श्रीचक्रधर ॥ ५
आतां वंदू अत्रिअनुसुयेच्या सुता : जो आर्तादानी सर्वसिद्धीचा दाता
तया साष्टांगीं श्रीदत्ता : नमन माझें ॥ ६
सकळ वेदविद्या देवतागण : अखंड वोळगती जयाचे चरण
तया साष्टांगीं नमन : श्रीदत्तात्रया ॥ ७

जे शब्दब्रह्मीची कुळेश्वरी स्वामिनी :
ते ब्रह्मविद्या लोटताये जयाचा चरणी
तया श्रीदत्तात्रया लागौनि : नमन माझें ॥ ८

ऐसा वंदू तो श्रीदत्तात्रय देवो : जो शब्दब्रह्मी बोलतां पडो नेदी संदेहो
आणि फेडी अज्ञानतमाचा ठावो : परानंद तरणी ॥ ९

आतां वर्णावया श्रीकृष्णकथा : मज वाक्सिद्धी देई श्रीदत्ता
आर्तादानी अनाथनाथा : देवदेवा ॥ १०

जी तूं जरी होसी प्रसन्न : तरी मुकेया जोडे सारस्वत ज्ञान
आणि अंध देखती नीधान : गत पाताळीची ॥ ११

तरी आतां मज होईजी प्रसन्न : देई अवलीळा मतिज्ञान
करावेया श्रीकृष्णकथावर्णन : देई वाक्सिद्धी ॥ १२

मग प्रसन्न जाला श्रीदत्तात्रयदेवो : दीधला तांबोळदान पसावो
म्हणे आतां वर्णी रे श्रीकृष्णरावो : सांघे रुक्मिनी–सैंवर ॥ १३

आतां नमीन श्रीगुरु कर जोडोनि :
जेंहि तो दाविला देवो श्रीचक्रपाणि
तयांचा[1] उपयोग मी काईसेनि : नव्हे उत्तिर्ण ॥ १४

आतां नमीन कवी ब्रह्मवीद समस्त :
जे वीतराग ज्ञानिये श्रीकृष्णभक्त
तया साष्टांगी प्रणिपातु : केला मीयां ॥ १५

आतां परीयेसा श्रीकृष्णकथा गहन : जे आइकतां निवारे जन्ममरण
आणि सर्व कल्मषा करी क्षाळण : श्रवणमात्रें ॥ १६

पुराणामाजि श्रीभागवत थोर : तयामाजी रुक्मीनी सैंवर कथासार
ते आतां आइकते श्रोते नर : आवधान देउनियां ॥ १७

हे शब्दब्रह्म[1] मुद्रीका नद्यावर्त[2] : तयावरी वेदपुराणें रत्नें समस्त
तयामाजी माणिक तें श्रीभागवत : उत्तम श्रीकृष्णकथा ॥ १८

तया माणिकांमाजी किळ पडखर : तैसें श्रीभागवतीं रुक्मीनी सैंवर
उत्तम पवित्र परीकर : दुर्लभ तीहिं लोकीं ॥ १९

हें आइकतां रुक्मीणि–सैंवर : सर्वसीद्धी पावती नारी नर
आणि रोग दोष नासती थोर : जे जोडीले कल्पांतिचे ॥ २०

आणि नीपुत्रिकां पुत्र होंति : निर्धना होइल[1] धन संपत्ती
आणि इच्छीलें मनोरथु पुरती[2] : सकळ जनांचे ॥ २१

विखारांचि माहाविषें हरती : जोडीले आपमृत्ये चुकती
आणि पुढीलें माहावीघ्ने लोटतीं : हे आइकतां श्रीकृष्णकथा २२

"पठतेयां वाचा जन्म होईल सुफळ :"*
आणि आइकतां नासति रोग दोष सकळ
शेंखिपद पावती केवळ : श्रीकृष्णगती ॥ २३

कां जे ये ग्रंथीं ग्रंथाधीपती : आपण कथा नायकु श्रीकृष्णचक्रवर्ति
म्हणौनि माहापातकें भंगाजाति : हे आइकतां श्रीकृष्णकथा २४

जरी म्हणाल कथे दीधली वाळगी महंती :
तरी तुम्हां दाखविन[1] दृष्टांती
ज्या ज्या जालीया प्रतिती : तें आइका पां ॥ २५

हेचि श्रीकृष्णकथा श्रीभागवती : शुक हरीवंसु बोलिला परीक्षीती
तें आइकतां तया जाली मुक्ति : सप्त आहो रात्रिमाजी ॥ २६

आणि हेचि कथा बोलतां भारत : जयमुनीचें कुष्ट गेलें नीभ्रांत
आठरा हत्या फीटलीया त्वरीत : जन्मोजयाचिया ॥ २७

आणि हेचि कथा आइकीली मंदोदरी :
तीचें कुष्ट गेलें जें होतें मुखावरी
येक[1] येका श्लोकाचि[2] थोरी : श्रीकृष्ण वाखाणीतां ॥ २८

आणी दाटी पडीली राजसयेग्नि : तैं आपमानले भीष्म नारद मुनि
ते स्पर्शें* ततक्षेणि : श्रीकृष्णें उठवीली दाटी ॥ २९

आणि आइका राया रीतेध्वजाची राणि
मदळसे पान लागले पाताळ भुवणीं :
तीयेसि काइसेणहि नव्हेची धावणि : त्रैलोक्येमाजी ॥ ३०
तेव्हेळीं कमळ स्वेतरु दोघीजणि : श्रीकृष्णनामीं केली झाडणि[1]
तेणें मदळसा वांचली[2] ततक्षेणि : हरलीं माहाविष ॥ ३१
म्हणौनि हे श्रीकृष्णकथा नारद महामुनी
स्वर्गि वाखाणिते इंद्रभुवनि :
आणि कैलास वैकुंठ सत्येलोकस्थानि
पढताति ब्रह्मादिक : हरीहर ॥ ३२
आणि हेचि कथा क्षीरसागरीं : शेषु सहस्रमुखें स्तुति करी
तें आइकोनि लक्ष्मीयेसि अवधारी : उपनला वेधु ॥ ३३
ऐसी त्रीभवनि पवित्र पावन : वाखाणीताती श्रीकृष्णकथा गहन
ब्रह्मादिक रुषी सुरगण : मानव आदिकरुणि ॥ ३४
सर्व तीर्थें क्षेत्रें व्रतें दानें : ये आवघिची होती येके श्रीकृष्णनामें
जैसें कां अमृत आश्वादनें : फावती सकळै रस ॥ ३५
जैसिं सर्व तीर्थें समुद्रीस्थाणि : किं सर्व रस अमृत स्वादणि
तैसी श्रीकृष्णकथा श्रवणि : होती सर्व पुण्यें फळें ॥ ३६
आइका जें गंगातीर्थ सीरोमणि : ते सदा असे श्रीकृष्णाचा चरणि
तेची ब्रह्मा वाहे कुमंडलीं घालौणि : महेशें धरीली सीरीं ॥ ३७
म्हणौनि तो श्रीकृष्ण सर्व तीर्थांचा रावो :
तयातें वर्णितां महापातकां होये क्षेवो
म्हणोनि त्रीभुवनि वाखाणीती[1] देवो : मुरारी पवित्रपणें ॥ ३८
ऐसा हा तरावया भवसागरु : श्रीभागवतीकथा मोक्षाचें तारु
जीवांस उतरी पैलपारु : ने कृष्णुपद[1] परंदीपासि[1] ॥ ३९

ऐसी हे पवित्र परीकर : श्रीकृष्णरुक्मीनी–सैंवर
तें आतां आइका[1] श्रोतेनर : दत्तचीत देउनियां ४०

मागां व्यासादीकिं मुनि : कथा बोलीली संस्कृतवाणि[1]
ते आतां म-हाटीया करौनि : सांगीजतायें ॥ ४१

आपभ्रंस पीसा जानै : मागधी आणि सुरसेनि
संस्कृत प्राकृत वाणि : आणि[1] छपंन भाषा ॥ ४२

या भाषांचे पाक वीस्तार : करावेया येकी म-हाटीचि चतुर
तीयेचेनि प्रसादें जानीजेती वीचार : सर्वभाषांचे ॥ ४३

म्हणौनि संस्कृताची टीका : म-हाटी म्हणिजतांये आइका
जैसी हेमाचि मुद्रीका : वरीं गरुडपांचि ॥ ४४

तैसी छपंन भाषांचियें मुगुटि : सोभे सुहांवि सुंदर म-हाटी
आणि संस्कृत वाढवीले पोटिं : वागवि पुढां करुनि ॥ ४५

जैसी स्नेहाळु जननिं : आपत्यें वागवी करीं धरुनिं
तैसी सडु[1] भाषां लागौनि : व्यापारवीत असे[2] ॥ ४६

येणे श्रोते कोपती झणिं : म्हणती संस्कृत तवं देववाणि
तीयेसीं उपमा कां रे साणि : दीधली तुवां ॥ ४७

तरी सांघैन येकु परीहारु : आइका करुनियां वीचारु
हा सहजचि शब्द उचारु : घटणा यैसीचि असे ॥ ४८

म-हाटी स्त्रीलिंग वाइक्ये[1] आणि संस्कृत तवं नपुंसक
म्हणोनि बाळकत्व आइक : तेयासिचि साजे ॥ ४९

ऐसी ते सर्व भाषांची जननि : उत्तम पवीत्र म-हाष्टी[1] वाणि
आदी पुरुषें अंगीकरीली म्हणौनी : आन्नावर हें[2]ब्रीदें[2]जालें ५०

तीया म-हाष्टी[1] टीका[1] : रुक्मीनी–सैंवर[2] आइका
जे श्रवण जालेया महापातकां : क्षाळण करी ॥ ५१

ऐसी रुक्मीनी–सैंवर कथा सुहांवी[1] :
आतां श्रोता प्रसन्न होउनि आइकावी
मी सांघैन बोबडां बोली म्हणे कवी : कृष्णदासू ॥ ५२

**प्रसंग पहिला समाप्त**

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

## प्रसंग दुसरा

श्रीपरमात्मने नमः

बोंले परीक्षीती रावो : सुकदेवा माझा मनि ऐसा भावो
जो आइकावा श्रीकृष्ण वीव्हावो : सांघै रुक्मीनी–सैंवर ॥ १
सुक म्हणे परीक्षीता : नीकी पुसली तुवां कथा
तो दसमस्कंदु होये सांघैन आतां : हरती महापातकें ॥ २
आइका त्रीभुवनकिर्तिचा सुतु : भीमकु राणीवें समर्थु
तो कौंडन्येपुरी असे राज्ये करीतु : देखा वैदर्भदेसीं ॥ ३
तया रायासि पाटाची आंतौरी : सुधामती नांवें सुंदरी
तीयेसीं पांच पुत्र साहावी कुमरी : जाली रुक्मीनीदेवी ॥ ४
वडील रुकमीया तया धारा रुक्मबाहो वीरु :
रुक्मरथु रुक्ममाळी रुक्मकेशरु
या पांचांचा पुरुसार्थ सांगता थोरु : वीस्तारु होइल ॥ ५
येक येक त्रीभुवनातें जीगें भुजाबळि : ऐसे ते शूर माहाबळी
तयांपस्यें क्षेत्री उदार भुतळी : कव्हणि[1] देखिजती[2] ना ॥ ६

तया पांचा धारी जाली देवी रुक्मीणि :
ते लावण्याची नीद्धि की सौभाग्याची खाणी
ना ना की ते श्रीकृष्णां आदिपुरुषा लागौणि :
अवतरली आदी[1] शक्ति ते ॥ ७

तीयेसि वर्णितां उपमा नाहि क्षीती : ते केवी मज वर्णवे अल्पामती
जे सर्व सौभाग्याची संपत्ती : मुर्त जाली ॥ ८

ते सर्व कळा लक्षेणिं[1] युक्त : चतुर सीहाणि गुण आमीत
ना ना किं ते वीश्वमोह्नी जाली मुर्त : मज पातां ॥ ९

ते जैसी सिद्धरसाचीये[1] मुसे[1] वोतीली : किं[2] सत्रावीयेपस्ये चांगली
ना ना कीं ते मन्मथाची माउली : वीश्वमाता ते ॥ १०

जैसा चंद्राचा कामवीला[1] गाभा : वरीं दीजे[2] पन्हरेयाची शोभा
जांबुनदापस्ये आधीक दीसे प्रभा[3] : कैसी चांपेगौर ॥ ११

तीयेची चांपेगौर कांती देखा : आरक्तां[1] चरणीं सोभे उर्द्धरेखा
आंगुळीया जैसीया चांपेकळीका : नखें नक्षत्रें जैसीं ॥ १२

गुल्फें वर्तुळें कनक गौरें : रुणझुणीती दसांगुळें नेपुरें
घवघवीती आंदु वांकी वरीं गजरें : चरणि भीमकन्ये[1] ॥ १३

कासे कासीला क्षीरोदकु पाटोळा : तो सपुरचंद्रापस्ये उजळा
वरीं गाढिला[1] नवरत्नांचा[2] मेखळा : मध्यप्रदेसीं ॥ १४

आंगी चोळी लेइली सोनेंसळी : भुजावरीं रत्नांची हंसें आकारीली
कसेया मुक्ताफळें वोवीलीं : बरविं सोभताती ॥ १५

कसेयां पाठीसीं दीधलिया गांठी : बीरडेयांचा[1] हीरा झळके कंठी
करीं कांकणें कळांवीया गोमटीं : पुढां हातसर ॥ १६

आंगुळीयां मीरवती मुद्रिका : बरवीया नद्यावर्ता आइका
तुळबंधीया रत्नाचीया झळका : प्रभा फांकतांये ॥ १७

कंठीं रत्नांचे हार मुक्तांची येकावळी :
चितांग चौसरा सरी सांखळी
पदकीं नवरत्नांची झळाळी : जैसें भानुबिंब १८
मुखें जितला चंद्र हीरे दशनी : ईद्रुम लाजीनला आधर देखौनी
बोल सुरस मधुर वाणी : अमृतापस्ये ।। १९
प्रहसीतमुखि मीरवे तांबोळ : सरळें नासापुटीं सोभें मुक्ताफळ
आधर बिंबलें सोहृज्वळ : प्रभा फांकतांये ।। २०
जैसें हेमाचे आरीसे : तैसें कपोळद्वयें दीसे
नयेनि जींतलींया मृगी आतीसें[१] : वीसाळपणें ।। २१
कैसें हेमसळें करुनि : नयेनीं आंजन लेइली रुक्मीनी
देखावया सुखनिधान श्रीचक्रपाणी : पराकैवल्ये नीद्धी ।। २२
भ्रूभंग सुरेख * सानट : कैसे मीरवताती वंकट
वरीं नितळ लल्हाट : सोभे मळीवटु ।। २३
श्रवणीं झाली नंदी [१] उरंग तनया : फुलें पनक सरें चांपेकळीया
हीरयांचे कळस भ्रमरीया : वरीं सोभताती ।। २४
लवती[१] श्रवण होतील वांकुडे :
म्हणौनि भ्रंमरीया[२] कळसिं लावीले आंकुडे
मांगें कुरुळेसी कळसीले[३] गाढे : वरीं हंसतलगें ।। २५
आवघयां मुक्ताफळें सोभती : मध्यें रत्नकीळा फांकती
तें कपोळ कांती बिंबती[१] : सोहृज्वळपनें ।। २६
लल्हाटीं अर्धचंद्र मीरवे देखा : जैसी द्वीतीयेची मयंकरेखा
वरीं भांगटीळा नेटका : सोभे अतीमाने[१] ।। २७
सीसफुल झळके अतीमानें : माथां मोतीयांची जाळी मीरवे तेणें
भंवतीया हांसोळीया खिळीती[१] रत्नें : जैसीया दीपकळीका २८

वि: ....... क्रमांक: ........ नों दि: ........

कैसी वेणीं[1] खोवीली नेहटी :
जैसी लावण्यें नीद्धि वरीं सौभाग्ये–भुजंगाची पुटी
चांपेकळीया केतकीदळें धाकुटी : बीरीली[2] पाय्यतिके[3] ॥ २९

राखडीये हीरे झळकती : आणि वरीं भ्रमर देखा भवंतीं[1]
ते आपणेंयातें धीग्ये करीती : कुरुळें देखौनियां ॥ ३०

ऐसा श्रृंघारु केला रुक्मीनि : आणि चढली देखा सुखासनि[1]
सवें धाकुटीया चालती परी कवणीं : श्रृंघार करौनियां ॥ ३१

येकीं कासीले सोनसळे : येकीं क्षीरोदक पाटोळे
येकीं श्वेत उजळे येकीं नीळे : येकीं मंदवीयेचे. ॥ ३२

येकीसिं सेंदुरीया सुरेखा : येकीं वालीपे वेढलीं देखा
येकीसिं मंजीष्ट मीश्रीतें[1] आइका : नानापरींचीं ॥ ३३

येकीसिं श्वेता चोळीया : येकीसिं कृष्णवर्ण येकीसिं नीळीया
येकीसिं मंजीष्टा येकीसिं पींवळीया : कनकवर्णा ॥ ३४

आणि नवरत्नांचे अळंकार कुसरी : वीचीत्रें लेइलीया सुंदरी
माथां कुसमें आंगीं चंदनाचीया भौरी : ल्ल्हाटीं पत्रवेली ॥ ३५

चरणीं आंदु नेपुरें आइका : करीं कांकणें कळाविये मुद्रीका
हातसर तुळबंधीया कंठीं पदकां : वरीं येकावळी ॥ ३६

श्रवणीं झाली फुलें भ्रमरीया : माथां मोतीयांचिया जाळीया
नासापुटीं मुक्ताफळें आवधीया : वदनीं सुगंधें तांबोळें ॥ ३७

यैसीया श्रृंघारौनीयां सकळां : भीमकीये जवळीं मीनलीया बाळा
आंगें स्वरुप सुंदरा वेल्हाळा : वीद्याधरी तीया ॥ ३८

ऐसी भीमका जवळीं रुक्मीणि : नीघाली परी कवणि
आणि तीया कवणी कवणी सोवासणी : तीया परीयेसा पां ॥ ३९

बारा सोळा आठ नव आणि च्यारी :
दाहा च्यारी येकी तीनीयां आठरा नारी
सर्व कळाकुसळा अवधारी : आनिकी चौदा ॥ ४०

रवी शशीचीया बारा सोळा :
चौदा वीद्या च्याऱ्ही मुक्ती मिळौनियां सकळा
अष्टमाहासीद्धी नवही नीद्धी जालिया बाळा :
वोळगती भीमतनयासि ॥ ४१

जागृती स्वप्न सुषुप्ती तुरया : श्रृता दृष्टा रुता उन्मनीया
आणिकीही दाहा अठरा या : सर्वे मुर्ता अवस्था ॥ ४२

आणिकीही मीनलीया बहुबहुता सुंदरी : तयाची गनीत* कवण करी
या जीवलगा वीसा च्यारी : येकी आगळीया ॥ ४३

वामें चालती सोळा दक्षीणें बारा : जीवलगा आंगेसि तीया अठरा
चौघीसि गोष्टी करीताये अवधारा : आठ नव दोहिं बाहि ॥ ४४

चौदा अती कुशळा सुंदरी : तेहिं मांडिलें गायन नृत्ये नानापरी
रीझवीताती भीमकुमरी : कळा दावीताती ॥ ४५

तयामाजी रुक्मीनी जैसी आद्यसक्ति :
ना ना ते ब्रह्मवीद्या जाली वीग्रहवंती
भोगावया श्रीकृष्ण आनंदमुर्ति : ते आली सहपरीवारेंसीं ॥ ४६

भानु रश्मि न साहे रुक्मिनी : म्हणौनि येकी सांथी[1] धरीली कामीनी
येकीं हेमकळस घेतले भरौनी* : सर्वे कर्पुर उदकें ॥ ४७

येकी चवरें देखा ढाळीती : येकी विजणवारा घालीती
येकी ताळघोळ वाती : येकी मृदांग काहाळा ॥ ४८

येकी सुरस मधुर वीने वाती : येकी सुहांवि श्रीकृष्णरुपकें गाती
येकी प्रवर्तलीया देखा नृति : भीमकुमरी पुढां ॥ ४९

आणि सवें हडपीनीं वीडीया देती : येकी तेंळ उपर जाणवीती
सभा देखौनि उतरली डोलीये खालुती[1] : भीमकुमरी ॥ ५०

ऐसी रुक्मिणि सखिजनेसीं : आली पीतया भीमकापासिं
सभा–ठकली ठेली* कैसी : जैसीं चीत्रींचीं लेपें ॥ ५१

अवघें थीरू जाले क्षेत्री अति : मग वीचारीताती चीत्तिं
म्हणें हे वीश्वमाता अवतरली क्षीती : जगत्रजननी ॥ ५२

ऐसी आली देखौनियां[1] ते जगदंबा : मग कैसी वोसरली देखा सभा
स्थानामाजीं आली लावन्येप्रभा : रुक्मीनि देवी ॥ ५३

भीमकें पाहीली देखा नयेनीं : तवं हांस्ये केलें रुक्मीनी
दंतपंक्तिचेनी तेजस्थानिं : उजळली सभा ॥ ५४

तवं भीमकु म्हणे हळुहळु माये : थीरु थीरु येइजो बळीये[1] पायें[1]
मग कर जोडौनियां[2] पसरीले[2] रायें : भीमसेनें :: ५५

ऐसी उचलौनि दोहिं हातीं : रायें कन्या बैसवीली पालखतिं
भेटीं कनकसरें आलीं होतिं[1] : तीये दीधलीं करीं ॥ ५६

तें मज कैसें गमलें अवधारी : जें लक्षमि पुजीली कनकसरीं
कां जे गुरु नृप देवता रीतें करीं : भेटों नये ॥ ५७

तरी ते आदी लक्षमी जानें : रीद्धिसीद्धिची गोसांवीनि
म्हणौनि रायें कनकफळीं पुजौनि : नमस्करीली ॥ ५८

असो हे कन्या देखौनियां रूपस : रायाचें मग संतोसलें मानस
उपवर जाली म्हणौनि पाहीली वास : सुमती मंत्रीयाची[1] ५९

उपवर देखौनियां कन्यारत्न : रावो सुमती प्रधानेंसीं बोलीला वचन
म्हणे तुम्हि कैसे पां आझुन : निश्चित असा ॥ ६०

उपवर जाली हे कुमरी[1] : आतां वरु मेळवा झडकरीं
गुपतीये पाठवावे अवधारी[2] : देसोंदेसीं ॥ ६१

पाह्यावया रायांचे राजकुमर : खांडेश्वरीयें[1] सप्रतापीये थोर
संपतीपुर्ण ज्ञान चतुर : सुंदर वयसायुक्त ॥ ६२
ऐसा रुक्मीनी पाह्यावा वरु : जो त्रीभुवनि समर्थु आणी थोरु
तयाचा धरीलेया आधारु : आपणयां श्रये ॥ ६३
ज्ञनि सैंवर मांडाल ये कुमरी : आकुळा विद्या सामर्थ्यें असे अवधारी
ते विज्ञानें हीरौनि नेती नोवरी : कुवाडे उगउनीयां ॥ ६४
तया कुळ वर्ण नसे जाती : आणि रुप गुण ना संपत्ती
ऐसी कन्या पडे हीन वराचा हातीं : तेथें भोग कैंचे ॥ ६५
मग येरां रायां होये आपमानु : आभीमानें येकमेकेंसी मरीती जुंझौन
"सबळ नीबळातें" * गांजौन : नेती कन्यारत्न ॥ ६६
ऐसी बळीया हीरौनि नेइजे बाळा : तेथें कैंचा सुख सोहळा
बहुतां रायां होये अवकळा : आणि पीतयासि आपमानु ॥ ६७
तीया लाजा करौनि : येकमेकेसीं मरती जुंझौनि
प्राण वेंचीती स्त्रिये लागौनि : नर* कामातुरु ॥ ६८
जैसा बहुतां पंचानना : मध्यें गज सांपुडे साना
मग ते रुसती प्राणां : येकमेकांचीया ॥ ६९
कीं जैसे दाणें टाकौनियां परीवरी : पांखिरुवें जुंझवीजेती अवधारी
तैसें मांडुनी कन्येचा सैंवरीं : मारीजे[1] क्षेत्रीयांतें ॥ ७०
मागां अह्मोल्येचा सैंवरी जांन : समस्तां देवां[1] जालें आपमान
आणि तें लागौनि इंद्रा आंगीं लंछन : अद्यापीं असे ॥ ७१
सीतेचा सैंवरीं आइका : जनकें मांडोलें त्रींबका
तेथें रावणादीका : अपमानलें ॥ ७२
तें धनुस्ये रामचंद्रें मोडीलें : मग सीतेतें देखा प्रणिलें
तवं पुढां यौध्ये मांडलें : परसरामेसीं ॥ ७३

आइका तो अवतारु परसरामु : म्हणौनि योगु घडला उत्तमु
येन्हविं घडला होता आपमानु : सीधची पैं ७४

सापें कासीश्वरें कासीये माझारीं : सैंवर मांडीलें तीघी कुमरी
तेथें राये मीनले होते अवधारी : अमीत्ता कोडी ॥ ७५

तयावरीं घातलें भीष्म[१]–गंगासुतें : घडें मुंडें पाडीलीं आमीत्यें
यापरीं बळीया हीरौनि तीघीतें : घेउनी गेला ॥ ७६

तेथें चीत्रा विचीत्रा लागौनि : माळा घातलीया दोघीजनीं
तीसरी ते अंबा भीष्मावांचौनि : न वरी कव्हणातें ॥ ७७

तवं तो भीष्म ब्रह्मचारी : तो न अंगीकरी कव्हणेंपरी[१]
मग ते शरण गेली अवधारी : परसरामासिं ॥ ७८

तेव्हेळीं गुरु आणि शिष्या : संग्रामु मांडला देखा
तवं तो भीष्मु न ये लेखा* फरसरामासिं ॥ ७९

मग तेणें भीष्में रेनुकानंदनु[१] : आंकणा घातला जीनौनु
मग येरी प्रान त्यजौनु : केला अपमृत्यु ॥ ८०

आणि येरी दोहीं जोडीले वर : ते नीन्हां देखा गवांर
लाउनी आपणेयांसीं[१] जोहर : दोघै मेले ॥ ८१

ऐसी सैंवरीं कव्हणी : सुख नाहिं पावली कामिनि
हा बोल देवा लागौनि : कवणें[१] ठेवावा ॥ ८२

आणि जेतुके राये क्षीतीवरीं : गवांर असती बहुतींपरी[१]
सैंवर मांडौनियां दवडती कुंवरी :
आणि जोडीती अपीमानातें ॥ ८३

तैसें न करावें तुम्हीं कव्हनी* : वरु बरवा पाहावा त्रीभुवनी
जो माने गोता[१] कन्ये लागौनि : तोची कीजे ॥ ८४

म्हणौनि तुम्हीं आपुलीया बुद्धि बरवा :
रुक्मीनीसिं वीव्हावो मांडावा[१]
जैणें सुख सोहळा फावे सुहांवा[२] : उभयेवर्गासीं ॥ ८५
ऐसें रायाचें बोलणे आइकौनी : मानीये मंडळीक तोखले[१] मनिं
म्हणती हें चातुर्ये त्रीभुवनिं : आजी देखिजेना ॥ ८६
ऐसी नृपसीहानीवें तोखली सभा : मंत्री कर जोडौनि राहीलाउभा
म्हणें भलें पाहों राया वैदर्भा : तुमची आज्ञा जाली ॥ ८७
मग पाचारीले वीप्र महंतु[१] जांन[१] : जे वीत्पन्न सीहाणे शास्त्रवान[२]
चतुर वक्ते दुतलक्षेनि नीपुन : आणि कळावंत जे ॥ ८८
तयासीं केले आदर सन्मान : भोमकें आज्ञा देवों आदरीली आपण
तेव्हेळीं कैसें बोलीला वचन : भावसींधु अवस्वरीया ॥ ८९
मग भावसिंधु म्हणें नृपती : आतां परीयेसै भीमचक्रवती
भाटु येतांये कल्याणकीर्ति : कासीश्वरां रायाचा ॥ ९०
तया सवें आयुथ* येक कुंजर : प्रयोथ येक राहांवर
आणि लक्ष येक जोधे* थोर : चालताती ॥ ९१
आणि सवें चालती लक्ष दाहा घोडे : छतीस लक्ष पायेंदळ पुढें
यैसें येकी क्षौनि सैन्ये अतिगाढें : असे तयासवें ॥ ९२
आणि सहश्र येक बंदीजन : ते डोळीयांवरीं आरोहण
आणि सहश्र दोनि वीप्र विद्वांस जाण* :
सवें चालती[१] सुखासनी[१] ॥ ९३
आणि तयासवें पांखिरुं वीत्पन्न : तयासि सकळ कळा त्रीकाळ ज्ञान
ते चक्रवती वांचौनि दर्शन : न घे कव्हणाचें ॥ ९४
ऐसें सकळां वीद्या वीत्पन्न : बडीवारें येतांये बंदीजन
वरीं छत्रें श्रीगीरी नीशान : वाजती संख भेरी ॥ ९५

तो बहुत हिंडींनला असे देसाउरें : तयासि पुसों रायांचीं राजकुमरें
मग गुपतीये पाठउं चतुर* : देसोंदेसिं ॥ ९६
तवं बोलीला भीम चक्रवती : म्हणे हें आम्हीं आइकीलें असे श्रृति
जो भाटु येतांये कल्याणकीर्ति : भेटी आमचीये ॥ ९७
तरीं आम्हां आधिंचि आवडे कीर्ति : वरीं हा कीर्तिपात्र कल्याणकीर्ति
तरीं तो आदरें बहुतें प्रीती : आम्हां आणावा लागैल ॥ ९८
मग उठवीला सोहदरु : आपनेयां धारा नरपुरंधरु
तया धाकुटा संगीत सुधाकरु : हे दोघै जन* ॥ ९९
आणि सवें दीधले सोळासे चौदंता : दांडीया डोलीया आमीता
छत्रें श्रीगीरी ध्वजा फरारे रथां[१] : नीसान शंख भेरी ॥ १००
आणि दीधलीं वस्त्रें आळंकरणें : म्हणें आधिं पुजावा सन्मानें
राजबनिं मेळीकारु देउनि आणणें : भेटी आमचीये ॥ १०१
ऐसे कुमर दोघै वहीले : बंदीजनां सामोरे नीगाले[१]
ते बहुतें आदरें भेटले : कल्याणकीर्तिसि ॥ १०२
ऐसे राजकुमर सामोरे आले जाणौनि[१] : बंदीजन संतोसला मनीं
मग कर उभारुनि : आसीस[२] पढींनला ॥ १०३
राणे उतरले घोडेया[१] खालीं : बंदीजणां क्षेमाळिंगनें* जालिं
मग लेनी लुगडीं वाइलीं : आले राजबना ॥ १०४
तेथें सैन्या मेळीकारु जाला : मग भाट रायाजवळीं आला
रायें आदरें बैसवीला : सीहासनिं[१] वीद्रुमांचा[१] ॥ १०५
ऐसा रायाचा देखौनि अतीभावो : भाटें करु उभारुनि केला ब्रम्हावो
आणि आशि* पढौनि वाखाणिला रावो : भीमसेनु ॥ १०६
वाखाणिला प्रताप[१] येश[१] कीर्ति[१] : सोमवंसु पढिनला नीगुती
तवं राये वारीला उचीति : पुरे म्हणौनियां ॥ १०७

मग स्वस्त क्षेम पुसोलें भीमसेनें : तवं कैसें बोलीले बंदीजनें
म्हणे राया तुझेनि दरुशनें : आम्ही सकळै क्षेम ॥ १०८
तवं कन्येचा हातु धरोनी* रायें : पुनरपी भाटातें प्रष्णु केला पाहे
म्हणे तुवां कवण देखिले राणे राये : आणि देस कवण कवण ॥
जया बहु संपती कुळें थोरु : रुपस क्षेत्री सुजाण चतुरु
वयेसा युक्त सर्व कुसळ सुंदरु : ऐसा सांघै कवण असती[१] ॥ ११०
आणि तुवां कीती दीवस[१] सोडीलें घर :
आणि कीती हिंडीनलासी देशाउर
आणि काइ जोडलें आपूर्व थोर : तें सांघावें आम्हा ॥ १११
तवं तो बंदीजनु सीहाना चतुरु : म्हणे रावो मज पुसतांये वरु
कन्यें आनुरुप सुंदरु : उपायें मज ॥ ११२
भाटु म्हणे राया द्वादस वरुसे : मीया आपुलें घर सोडीलें असे
बहुत देस देखिले आतीसें : भुमंडळीचे ॥ ११३
भ्रमतु राया मी मधुवनासीं गेला : तेथ थोरु लाभु जाला
जो पक्षीया कीन्नरु जोडला : मज माहा उत्तमु ॥ ११४
गरुड रुपसु परी वीशाळ थोरु : आणि हा युक्त सुरेखु अतीसुंदरु
सीहाना बोलीका चतुरु : ऐसा दुसरा नाहि क्षीती ॥ ११५
ब्रह्मेयाचा हंसु वानिती पुराणे : तेणे याचें रुप देखौनि मानीलें उणे
गांधर्व्ये कळे तें गंधर्वातें* जीणे "स्वरेंसि तरी तया"* ॥ ११६
जगीं नारद तुंबर सरस्वती : ये गाइनपणें[१] आतीसें वानीजती[२]
तीयें याचीया गमकाचिया[३] वीत्पती : पुरतीनां ॥ ११७
कमळ स्वरतरु गायेन : हे पाताळलोकिं असती जाण
हा तयातें हांसे आपण : आरीखपणें ॥ ११८

आधि या रुषी कुळि जाले जन्म : वेदघोषु यैसें याचें नांव
येणें स्वर्गा केले प्रयाण* : तें जिंतलीया अष्टनायेका ॥ ११९

रंभा भाळली लावन्यें गुणासि : मग रती मागों आदरीली तयासि
तेणें अव्हेरु केला तीयेसि : मग तीया दीधला श्रापु ॥ १२०

रंभा म्हणें तरी श्रापु घेइ रे मुनी : तु कीन्नरु होइ[1] मधुवनि
जैं श्रीकृष्णासीं माळ घालील रुक्मीनि :
तैं फीटेल कीन्नरकवच ॥ १२१

ऐसा रंभेचा श्रापु रुषीनें मानिला :
येन्हवि[1] हा सामर्थ्ये त्रीलोकीं वाखाणीला
किन्नरु कवच ठेवी घे हे कळा : आवघी जाणतु असे ॥ १२२

वर्णिता* श्रीकृष्णाचे गुण[1] कीर्ति : तेव्हेळीं फेडुनि ठेवी[2] घे[2] पुडती
ऐसी आनंत सामर्थ्ये शक्ति : यासि[3] असे देखा ॥ १२३

तेणें श्रापें हा किन्नरु जाला : तो मज मधुवनि जोडला
याचेनि[1] प्रसादें मी* सरता जाला : भुतळीं रायांमाजी ॥ १२४

जो त्रीभुवनिचिया कळावंतासि : पाहा श्रीकृष्णु न मनीची कव्हणासि
तो यासि तोखला रुषीकेशी : उचितां दीधली माळ ॥ १२५

तवं रावो म्हणे वेगीं आणि बंदीजना :
कैसा पाहों तो तुमचा पक्षीराणा
बंदीजनें सन्मानें आणिला जाणा : डोलीये कनकाचीये ॥ १२६

पांजरा उघडौनि सभेमाजी आणिला : पांख फडकारुनि उभा ठेला
क्षेणु येकु निश्चळ राहीला : स्मरीलें श्रीकृष्णनाम ॥ १२७

तेणें कृष्णनामें माहामंत्रें[1] : आकर्शिली सभेजनांचि[2] चीत्तें[3]
येकाग्नें[4] जालीं समस्ते : पाहाती किन्नराकडे ॥ १२८

तवं सभेमाजी जन बोलती : म्हणती हा पांखिरु नव्हे हे सत्ये
हा नवरत्नांचा आकारीला असे निगुती :
कुसरी विश्वकर्मेनी ॥ १२९
ऐसा देखौनि पक्षीरावो : सभेजन पावती[1] वीस्मयो
म्हणती हा बरवेंपणाचा नवलावो :
न[2] देखिजे[2] पाखिरुंवासि[2] ॥ १३०
ऐसी सभे पडली भ्रांती : तवं बंदीजन म्हणे खगपती
तुवां देखिले राये सप्तदीपावती : ते सांघै आतां ॥ १३१
आतां किन्नरु वर्णिल रुषीकेशु : हा पद्मपुराणीं असे इतीहासु
आणि श्री भागवता पासुनि व्यासु : बोलीला असे ॥ १३२
आतां श्रीकृष्णकथा रुक्मीणि सैंवर : कीन्नरु बोलैल सवीस्तर
तें आइका[1] श्रोते नर : म्हणे कवी कृष्णदासु ॥ १३३

**प्रसंग दुसरा समाप्त (ग्रंथसंख्या १८५)**

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

## प्रसंग तिसरा

श्रीपरमात्मने नमः

ऐसें भाटाचें बोलणें आइकौनिं : मग मौन्यातें वीसर्जुनि
नेटका रंग[1] जाणौनि[1] स्थांनि[1] : कीन्नरु उभा ठेला ॥ १
दोहिं हातातळि कुंसीसि सुरेख : मीरवती बरवे कुंकुमवर्ण पांख
म्हणौनि पांखिरुं ऐसें लक्ष : दीसे तयाचें ॥ २

येऱ्हवि पाहातां तरी बतीस लक्षेणु नरु :
आणि पांखातवं दीसे जैसा कीन्नरु
म्हणौनि येणें अंगें[१] कीन्नरु : ऐसें म्हणीजे तयातें ।। ३

ऐसी ते कीन्नराची खुण : येऱ्हवीं मनुष्यापस्यें सलक्षेणु जाण
आतां कैसा लेइला अळंकरण[१] : तें परीयेसा पां ।। ४

पांइं नेतवटा पादुका * : वांकीवरीं तोडरु नेटका
बाउलीं काढीली ब्रीदें आईका * : गानावरीं ।। ५

कासे कासीला सोनेसळा : वरीं रत्नखंचितु मेखळा
कंठी सोभे पदक वरीं माळा : जे दीधली श्रीकृष्णरायें ।। ६

हातीं बरवे हातसर सोभती : मुद्रीका रत्नें देखा झळकती
तुळबंधीयाचे कीळ फांकती : पातां मुंडपांवरीं ।। ७

श्रवणीं कुंडलांची फांकते कीळ : मुखि मीरवे सुरंग तांबोळ
नेत्र सुनिळ वीशाळ : नीऱ्हां सोभताती ।। ८

माथां इंद्रनीळांचा मुगुटु : वरीं मणी झळके अती चोखटु
लल्हाटीं हरीचंदनाचा उभा निटु · टीळकु सोभे ।। ९

आंगीं हरीचंदनाची भौरी : उतरी[१] येज्ञोपवीतें[१] अवधारी
मग ब्रह्मवीणा घेतला करीं : तेणें कीन्नररायें ।। १०

खुणावीले श्रृतीकार काहाळीं : तवं ताळ वाउनि उभे ठेले[१] मांदळी
भाटांची कुमरें डोळसें सांवळीं : राहीलीं पाठीसीं उभी ।। ११

ऐसा कीन्नरु रंगी राहीला उभा · मग अवलोकीली भीमकाची सभा
म्हणे आतां परीयेसै राया वैदर्भा : दतचीत देउनीयां ।। १२

रागांरावो श्रीरागु आळवीला · श्रीये सहीतु इश्वरु आधि नमीला
मग दाखवीली गंधर्वकळा . तीहिं लोकींची ।। १३

सुध संकीर्न साळंक : हे तीहिं लोकीचें गायेन आइक
स्वर्गीं सुध मृत्येलोकीं साळंक : संकीर्न तें पाताळीचें ।। १४

ग्राम जाती मुर्च्छना दृष्टी रागु :
पन्नास रुपकें सप्तताळ च्यारी साळांगें
आठ आठ आंगें च्यारी आभंगें : दोनि दृपदा[1] आंगें[1] ॥ १५
ऐसा साळांकु मार्ग दाखवीला आइका : मग गीत सुड म्हणितला नीका
म्हणे आतां परीयेसै राया भीमका : सांघैन त्रीलोकु हा ॥ १६
आतां परीयेसै चक्रवर्ति : नव खंडें सप्तदीपावती
सप्तलोकु हेम[1]पर्वतु[1] मेरुची नीगुती : सांघैन तुज ॥ १७
हे छपन कोडी वसुंधरा : असे चौपट चौरंगाकारा
चौदा चौदा कोडी अवधारा : भुजा च्यान्ही ॥ १८
ते मीरवे अष्टकुळ पर्वतीं : माजी सप्तसागरु हेलावती
तीयेवरीं नवखंडें सप्तदीपावती : परीयेसै राया ॥ १९
आठां प्रमाण करुनी होये त्रीरेणु : तया आठां मीळौणि होये रेणु
तया आठां रेणु तरी म्हणीजे केसाग्र जाण :
आणि लीख तयां आठां मीळौनि ॥ २०
आठां लीखां मीळौनि रचना : तीळ येकु होये गणना
तयां आठां तीळा जव येकु जाणा : आतां तयाची संख्या आइका ॥
त्री* जवा आंगुळ येक : चतुर आंगुळीं मुष्ट आइक
सटु मुष्टीं हस्त येक* : आणि धनुस चौंहस्तांचें ॥ २२
ऐसी या धनुसां सहश्रां दोनि : क्रोसु[1] येकु होये जानै
तया चौक्रोसां मीळौनि : होये योजन येक ॥ २३
तया योजना सहश्रां दोनि : येक मंडळ म्हणीजे मेदनि
तया सहश्रादों मंडळां मीळौनि : होये येक दीप ॥ २४
ऐसीयां दीपां दों सहश्रां : खंड येक अवधारा
ऐसी नवखंडे वसुंधरा : गणना मुनी[1] केली ॥ २५

आइका नावें सप्तसागरा : लवण इक्षु आणि सुरा
सर्पी दधी साहावां क्षीरा : सातवा नीर समुद्र ॥ २६
येक येकां समुद्रा जवळि* जे भूमीका : ते मुख्ये सप्तदीपें आइका
तयांची गणीत सांगता अवांका : वीस्तारु होइल ॥ २७
पहीलें जांबुदीप अवधारी : दुसरें पलासदीप मीरवे अतीकुसरी
तीसरें सालमलीदीप नीर्धारी : चौथें कुस दीप ॥ २८
क्रौंचदीप पांचवें : साकदीप साहावें
पुष्करदीप* सातवें : ऐसीं सप्तदीपें ॥ २९
इळावृत भद्र सवृष : केतमाल्ये रंम्येक
हीरन्ये पुरहरी पुर्ष : नवावे भरतखंड ॥ ३०
आइका सप्तदीपामाजी परीकर : जांबुदीप असे वर्तुळाकार
तयां माजी कनकांचे गीरीवर : मेरुसहीत ॥ ३१
तो कैसा मीरवे कनकांचा मेरु : पातां[१] उभवीला छत्राकारु
तळिं साना सीरीं थोरु : पद्माकृती* ॥ ३२
उंच यौजनें सहश्र चौरासी : सीरीं बत्तीस सहश्र वीकासी
मुळिं सोळा सहश्र परीयेसी : मर्यादा नवसहश्र ॥ ३३
तया मेरु भोंवतें चहुंफेरीं : अष्टकुळ पर्वतु अवधारी
तयाची गणीत संख्या कुसरी : सांघैन आतां ॥ ३४
तया मेरुसिं मांदारु पूर्वदीसें : दक्षीणे गंधमादनु असे
वीमळ पश्चीम दीसे : उत्तरे पासु[१] जाना ॥ ३५
हे अष्टकुळा वेगळे च्यान्ही पर्वत : म्हणौनि यांचें नाहिं आलें गणीत
आतां अष्टकुळांचि संख्या त्वरीत : परीयेसा पां ॥ ३६
तया मेरूसिं उत्तरमान : तीन पर्वत असती जाण
नीळ श्वेतुगीरी शृंगावत हे वीस्तीर्ण : वाढिनले पुर्व पश्चिमु ॥ ३७

याचीपरी मेरु दक्षीणें गीरीवर : तीनी असती परीकर
नीषध हेमकुट हीमांचळ हे थोर : लांब पुर्व पश्चिम ॥ ३८
हे साही पर्वत वाढिनले थोर : येक येकु यौजने दाहा दाहा सहश्र
आणि रुंदी यौजनें सहश्र : दोनी दोनी ॥ ३९
आणि मेरुसि गंधमादनु पुर्वे : पश्चिमे माल्येवन मीरवे
हे सैंग लांब वाढिनले बरवे : उत्तर दक्षीण ॥ ४०
आणि हे दोन्हि लांब वाढिनले कैसे : चौतीस सहस्र योजनें समसरीसे
रुंदी दोनि दोनि सहश्र पातां दीसे : उंच सहश्र दाहा ॥ ४१
आइका चैत्रारन्ये वन पुर्वे : दक्षीणें गंधमादनु मीरवे
वैभ्राज पश्चिमें सुहावे : उत्तरे नंदारन्य ॥ ४२
ये उत्तमें वनें च्यान्ही : तेथची सांघतां कळाकुसरी
तरीं कथा चालैल वीस्तारीं : ग्रंथु आंवरेना ॥ ४३
आणिकें द्वादश उद्वसें[१] वने : तें आइका सांघैन आनुमानें
तीयें माहा भयानकें दारुणें : तेथ कव्हणांसीं रीगवेना ॥ ४४
प्रथम आपारन्ये : दुसरें दीसारन्यें
तीसरें तमारन्ये : चौथें लोकारन्यें ॥ ४५
त्रीकुटारन्यें पांजवें : स्वर्गारन्यें साहावें
आंतरारन्यें सातवें : आठवें येक्षारन्यें[१] ॥ ४६
मानसारन्यें[१] नववें : वीध्यारन्यें दाहावें
कर्मारन्यें अकरावें : बारावें तुळारन्यें ॥ ४७
यें द्वादश आरन्यें अवधारी : उद्वसें असती पृथवीवरीं
यांचि गणीत संख्या मुनेश्वरीं[१] सांघीतली नाहिं ॥ ४८
आतां मेरुचा सीखरीं[१] गीरीवर[१] : असती अमीत्ये अपार
परी मुख्यत्वें थोर थोर : ते सांघैन आतां ॥ ४९

आइका सीतासु शुक्त अवधारी : कुरवी माल्यवंत वैकुंठ मुख्येगीरी
आणि केशराचळ हे वरीं : पूर्व दीसे ॥ ५०

चीत्रकुट सीसीरु[१] पर्वतु : पतंगु रुचीकु नीषदावृतु[२]
आणि केसरु असे मीरवतु : हे दक्षीण दीसे ॥ ५१

सीहींवासु वैडुर्ये गीरीवरु : कपील गंधमादनु अतीथोरु
जांबुधीं केशरी[१] याचा वीस्तारु : पश्चिम दीसे ॥ ५२

शल्कुटु रीषभुगीरी : हंसु नाग काळंचु अवधारी
आणिकु परीयेसा केशरी : हे उत्तर दीसे ॥ ५३

हे मेरुपंकजांचें अष्टदळ देखा
तेथें आठांहीं दीसां अष्टदीसापाळ आइका
तयाचा खणोखणिं सप्तलोका : वस्ती जाणावी ॥ ५४

येकु आइका भूर्लोकु : दुसरा भुवर्लोकु
तीसरा स्वर्लोकु : चौथा महर्लोकु ॥ ५५

जनलोकु पांचवा तपलोकु साहांवा
सत्येलोकु सातवा आतां आइका लोकपाळ ॥ ५६

इंद्र वन्ही* येमु वरुण : मरुतपती कुबेरु इशान्य
हे सप्तलोक आणि देवतागण असती मेरुभंवते ॥ ५७

आणि मेरुचीया सीखरावरीं कैळास वैकुंठ सत्येलोकु नगरी
तेथ हरीहर ब्रह्मादीक अवधारी : राज्ये करीताती ॥ ५८

आइका वैकुंठीचा वीष्णु राजा तया गरुड वहन चतुर्भुजा
इंद्रनीळ कांती रुपसु दुजा : नाहिं तयापस्ये ॥ ५९

तया विष्णुसिं असेल लक्ष्मी राणि : तो दुजी न करी कामीनि
कां जें अती प्रीती दोघां लागौनि म्हणौनियां ॥ ६०

आणि सत्येलोकीचा ब्रह्मा अवधारी :
तया हंस वहन सावीत्री कांता घरीं
तोही सोहदरु परनारी : म्हणवीतु असे ॥ ६१

कैळासीचा महेशु जाण : तो कर्पुरगौर वृषभवहन
आणि सदा वाघांबर प्रावर्ण : गळां मुंडमाळा[१] ॥ ६२

तया नावडे कर्पुर कस्तुरी चंदन : काखे वाहे भस्म उधळण
आणि सदा करी वींभुती वीलेपन : आंगि आपणयांसि ॥ ६३

आणि वामांगीं जानुवरीं : बैसवीली असे पार्वती सुंदरी[१]
तीयेसीं तो कहिं न वीसंबे त्रीपुरारी : आंगा वेगळी ॥ ६४

तो करुं पाहे नारी बहुती : परी ते नीन्हा वीसाळु पार्वती
तीयेसीं दुजी नावडे सवती : दोहिं डोळां ॥ ६५

तीचेनी[१] धाकें देखा धुरजेठी : गंगा लपवीली असे मुगुटिं
ऐसेनहिं[२] देखैल म्हणौनि जटाजुटीं : झांकीली[३] असे ॥ ६६

ऐसा तो पार्वतीचेनि धाकें कांपतु : आपण महेसु असे वर्ततु
आधीनत्वें आज्ञानुलंघीतु चाळी घरवातेतें ॥ ६७

आइका स्वर्गि अमरावती : तेथीचा इंद्र नृपती
तया अधीन चंद्र सूर्ये वर्तंती : आणि देवो तेतीस कोडी ॥ ६८

तयाचा घरीं कामधेनु चिंतामणि : कल्पतरु या रीद्धी[१] आदीकरुनि
आणि तयासि राणीयां इंद्रायेणी : अष्टनायेका ॥ ६९

घरीं असतां रंभा उर्वसी : किं तेनें व्रतभंग केला अहील्येसि
मग सर्वांगि भगें तया इंद्रासि : पाडीली[१] गौतम रुषीं[२] ॥ ७०

आणि आइका चंद्रु बरवा स्वर्गीं* परीं तयासिहीं कळंकु लागलाआंगि
हें तवं प्रतक्षासि जगीं : प्रमाण नलगे ॥ ७१

सूर्ये नी:कळंकु तेजें आगळा : तयांचा आंगीं दहकत्वाचीया कळा
तीया साहों न सकेती बाळा : मृत्य लोकींचीया ॥ ७२

ऐसे ते स्वर्गिचे राया देव : तयांचा आंगिं बरवेपनांची हवाव
परी तेही इछीती आहार स्वभाव : मनुष्यांचे ॥ ७३

म्हणौनि ते अवघे येती मृत्य लोका : द्वारेंसि उभे राहाती आइका
आपेक्षाभूत शितां* येका : अन्नाकारणें ॥ ७४

ऐसे ते अन्नाकारणें राया : येती मनुस्यांचिया ठायां
मग वीधी मंत्र नीरुपीती तयां : आपुले ते ॥ ७५

ऐसे आपुले बीजमंत्र नीरुपीती : आणि चतुर्विध यज्ञे करवीती
तेथ आहुती आवदाने देववीती : नर[1] पसुवांचीया ॥ ७६

वृक्षांचि फळें पुष्पें पत्रें : आणि नर पसुचि अस्ति मांसें सीरें
यें[1] कलसुनि[1] घालवीती रुधीरें : येज्ञामाजी ॥ ७७

तेथें आपण रीगौंनि वह्नीं[1] : मध्यें ग्रासु घेताती वदनिं
तयासाटिं देताती आपुली* इंद्रायेणि : स्वर्गासकट ॥ ७८

ऐंसि आपुलिं फळें संपादीती : आपण सेवक होउनि वर्तती
अंतु पुरलयां[1] आपणचि नीरयें भोगवीती : उभे ठाकौनियां ॥ ७९

आणीक तेतीस कोडी देव जाणां : परी तेही लागले येकाकु[1] वेसणां
घरी आमुर्ता सारीखि वरो परी[2] वासणां[2] : सेवीताती[2] ॥ ८०

ते सेवीतां मदीरापान[1] : देहो चैतन्ये होये वीभ्रम
तेथ अष्टभोग चातुर्येवीण : वायांचि जाती ॥ ८१

ऐसे ते कठीण कर्कस जाणां : परीं देवची म्हणावें भीमसेना
नाहिं प्रौढी पुरुसार्थ आंगवणां : बीहीती[1] दानवासीं ॥ ८२

मागां रावणें घातले बांदवडी : काये वानुं तयांची प्रतापु आणि प्रौढी
आपणचि पडले सांकडी : काये तारीती सेवकातें ॥ ८३

आपुलें बंधन जया न सुटे : तयासि आणिकाचें सांकडें केवी फीटे
म्हणौनि तयांचि सेवा केलीयां नाहिं गोमटें : क्षीती प्राणियांसीं ॥
आणि तयां बहुतें सीरें येक सरीर : देव्हडे हातांचे फडदर
ऐसे ते नव्हती साळंकृत सुंदर : देव स्वर्गिचे राया ॥ ८५
येकां दस भुजा येकां वीस : येकां सा येकां द्वादस
आणि दाहा पांच सीरें ऐसे वीभंस[१] : देखलयां भये उपजे ॥ ८६
आणि बहुतें पाडें तयापस्ये : मृत्यलोकीचें मनुस्यें
हस्तपादि युक्त रुपसें : जांण राया ॥ ८७
आणि तयां तेतीस कोडी देवांचें मुख : आग्नी* म्हनीजतांये देख
परी तेणें बहूत[१] देखीलें दुख : घरीं रावणाचिया ॥ ८८
तो आपण करी राक्षेसांचें धुणें : थोर पीडला कष्टें तेणें
आणि पाणि मागौनि करी पारणें : घरीं राक्षेसांचा ॥ ८९
मग अवतरला रामु दसरथी : तेणें तो वधीला लंकापती
तें लागौनि सुखें राज्ये करीताती : देव स्वर्गामाजी ॥ ९०
आणि तया स्वर्गा आइला शिखरी* : तेथें सेवंती* वसतांये नगरी
तेथें राजा येमु राज्ये करी : प्रतापें आपुलेनि ॥ ९१
आणि दुसरी वसतांये येमपुरी : तें तयाचें बंदीखान अवधारी
तेथें पचीजतांये दुराचारी : मृत्य लोकींचे ॥ ९२
जे मृत्यलोकीं आचरती दुःकृत : तयां तेथें जाचीताती[१] येमदुत
आतां असो हे वीवंचना तेथ : सांघतां बहुत असे ॥ ९३
तीये यमपुरीचें दर्सन : माहा पापातवं होये जांन
म्हणौनि सुकृत आचरती जन : तें चुकावया ॥ ९४
ऐसा जो येमु गाढा त्रीभुवनिं : तेणें रावणाचा घरीं वाहिलें पाणि
पांच प्रयुथें सवें घेउनि : येमदुत ॥ ९५

माता पीता कोपती[१] कन्येसि : म्हणती तुज काइ देउं वो यमासि
म्हणौनि त्रीभुवनिं तया यमासीं : कव्हणि इछीतनां ॥ ९६
तया आइलीकडे गंधर्व गण : आष्टभोगी* नांदताती परीपुर्ण
आणि हे गांधर्व कळा गायेण : तयापासौनि ॥ ९७
ऐसें सांघीतलें अवघें स्वर्ग : आतां पाताळीचे पन्नग
ते वीखार भयंकर भुजंग : राया काळीयेणे ॥ ९८
ते आइका मेरुचीया तळवटी : सप्तपाताळें असती नीहटीं
तेथें नागकुळें वसताती गोमटीं : ते आइका पां ॥ ९९
महीतळ आतळ* वीतळ : सुतळ तळातळ महातळ
सातवें आइका रसातळ : हे सप्त पाताळें ॥ १००
तेथें असती उत्तम भोग : स्वर्गापस्ये अती चांग
परीं तया नाहिं पुरुषाचें आंग : नाभीतळिं ॥ १०१
माथां फडकरें करीती फुत्कारु : नभीतळीं पुसांची फुटी थोर
ऐसे ते देखिलेयांचि भयेकर : पोटीं पाये रींगती ॥ १०२
ते धुदांती नाग[१] मुखि[१] निगताती ज्वाळा :
वोमीती हळाहळें सांडीती गरळा
ऐसे ते देखिलेयां डोळां : भये उपजे ॥ १०३
ऐसेयां वीखारां जरी : राया दीजेती राजकुमरी
तेणें पातकें अवधारी : कें[१] रींगावें[२] ॥ १०४
ऐसेनहि पाहातां ये श्रृष्टीं : जरी पुरुषासि पडली[१] तुटी
तरी काये राजकुमरीचा पाटीं : बैसावें काळीयेणें ॥ १०५
ऐसे ते पाताळीचे फणिद्र भीमा : तयापस्ये हा मृत्यलोकु अती बरवा
परी यें मनुष्यें आधिन जालीं स्वभावां : आणि वीचीत्रा खावणिं ॥

कवी कृष्णदासु करीतो वीनती : आतां सांघैन मृत्यलोकींची स्थिती
परी श्रोतां न करावी खंती : तचित्ति आइकावें ॥ १०७

**प्रसंग तिसरा समाप्त** (ग्रंथसंख्या २९२)

श्रीकृष्णार्पणमस्तु

## प्र सं ग चौ था

श्रीपरमात्मने नम :

मग कीन्नरें आळवीली[1] धनाश्री : म्हणें राया भीमसेना अवधारी
आतां मृत्यलोकीची कुसरी : सांघैन आइका[2] ॥ १
या मृत्यलोका माझारीं : सप्तदीपें नाना देस वसताती भीतरीं
तेथेंची मनुष्यें भाषा अवधारी : वीचीत्रापरीचिं ॥ २
आइका जांबु दीपाचा सेवटिं : सप्तसमुद्राचा आवांती[1] पोटिं[1]
तेथीचे लोकु पाहातां ये दृष्टीं : जीविं भये उपजे ॥ ३
तेथेंची मनुष्यें माहावीशाळें : पाहातां वीकटें आणि वीडुळें
अणि नसती वर्ण जाति कुळें : तेथेंचीया रायांसीं ॥ ४
येकांची रुपें ताडा येव्हडी : येकें खुजि कुन्हि वांकुडीं
येकें नीन्हां वीशाळें दीघडीं : यैसि अन्येकधा ॥ ५
येकें सुताळे येकें वीताळें : येकांची महाप्रचंडें बुबुळें
येकांची लांब वांकुडे डोळे : भींगुलवाणें ॥ ६

येकें दों तीं ताडा येसणि वीसाळें : आणि आरक्त गंगाळा येसणे डोळे
लांबु मुखाबाहीरीं जीव्हा लोळे : नाभीमंडळावरी ॥ ७
येकें वीहिंगम मुखें पाहे : आणि अश्वाचेया सारीखे दोन्ही पाये
गजकर्ण लांबु काटीतांये : चालतां भुमीवरीं ॥ ८
येकां माथां सिंगें मुखें मृगांचि : येकां गजमुखें सरीरें मनुष्यांचि
येकें सुकरमुखें येकां मुखें सींहाचि : येकां जंबुक मुखें ॥ ९
येकें अजामुखें येकें गौमुखें : येकां महीकमुखें येकां सर्प मुखें
येकां पुष्टीकडे मुखें वीमुखे : येकां माथा मुखें ॥ १०
येक मंडळ येक लक्ष अकरासहश्र : तयां मनुष्या येक पांवो दोनी कर
ते विकट नव्हे सुंदर : तेथ भोग काइसे ॥ ११
निपांतीका देस येक लक्ष तीन सहश्र : तेथचीया मनुष्यां नसे आधद्वार
पेज पीती सांडीती कुर : ऐसिं[1] येकें[1] असतिं[1] ॥ १२
मेंडुका देसु येक्यासी लक्ष : तेथचीया मनुष्यां दर्दुराचें मुख
येर्‍हवि हस्तपादिं सुरेख : मनुष्या सारीखें ॥ १३
चौपंन लक्ष देसु मुंजकानि[1] : तेथचीया मनुष्याचे वाढले कान दोन्हि
चालतां खालिले फर्डाकि काढीती भुमीं : वरीलें मीनलि सीरावरी ॥
आणि मार्गि चालतां जरीं : तरी दोन्हि वळोनि* धरीती सीरीं
सयेनि येकु आंथुरती सेजेवरीं : दुजा करीती प्रावर्न ॥ १५
देखती सुदेसीचियां मनुष्यासिं : तरी म्हणती नीकानि आलि देसासिं
भेडसावीताती[1] लेकुरवांसि : म्हणति मुंढये[2] आलि[2] ॥ १६
चौपंन सहश्र हयेवदन : तीयें मनुष्यें घोडमुखें जाण
तयां बरवे हात पांये परीं करीती भक्षण : येरां मनुष्यांचें ॥ १७
आतां असो येक रुपें मनुष्यें : ऐसिं वीचीत्रें असती असेसें
आतां सुदेसीचि सुरेषें : सांघैन जाना ॥ १८

बारा सहश्र बद्रीका आश्रम येर बहुवसु : तयामाजी सात सहश्र रुषीवासु
तेथ रुषीमुनि केला रहीवासु : वीद्या सीधी लागी ॥ १९

तेथें फुलें फळें उत्तमें आमीत्यें : येक बोर सेविलेयां हरी क्षुधेते*
तेणे गोडीयां जींतलें साकरेतें : करीतें तुष्टी पुष्टी ॥ २०

कंनोज[१] देसु छतीस लक्ष : तेथचे राये सुंदर सुरेख
सुभट क्षेत्री उदार देख : चतुर सीहानें ॥ २१

माळीवा[१] अठरा लक्ष ब्यांनौ सहश्र : तेथचे राये अती सुरेख सुंदर
परी वाचा नव्हे सह्योत्तर : आरीख आभीमानिये ॥ २२

नवकोटी मारुवाड : तेथचे राये धर्मज्ञ धड
ते नेणती कपट कुड : यैसे पुन्येवंत ते ॥ २३

आणि सतरी सहश्र गुजरात : तेथचे राये सुखिये श्रीमंत
सगात्र* डोळस पुन्येवंत : भावीक भक्ती भोळे ॥ २४

चोवीस सहश्र आहीर : तेथीचे राये क्षेत्री सुभट सुंदर
परी कर्कश भाषा उत्तर : कठीण तयांची ॥ २५

कोकण चौदा ताळ : तेथचे राये श्रीमंत अती व्याळ[१]
अष्टभोगें पुरंधर प्रबळ : आणि समुद्र भांडारी ॥ २६

सात लक्ष देसु मऱ्हाटा : तेथीचे राये सीहाने सुभट
आणि वेदशास्त्रें चातुर्येंची[१] पेंठ : भरली तीये देसिं ॥ २७

यैसे ते मऱ्हाटे राये सुंदर : वरीं मऱ्हाटीया भाषा पढखर[१]
तेहिं वसवीलें गंगातीर : क्षेत्र त्रिंबकु ॥ २८

पश्चिमें त्रिंबकु पुर्वे सागर वेऱ्हीं : आणि द्वादस द्वादस योजनें उभयेंतीरी
यैसेयां गंगातटीं माहाराष्टरीं : वसीजे पुण्यास्तव ॥ २९

तीये माहाराष्टरीं गंगातीर महंत :
तेथ सदा इश्वर अवतार असती क्रीडत
म्हणौनि सर्व तीर्थें देवतांसहीत : येती तयासि बोळगावया ॥ ३०

तेथें रुषी मूनि देवता सूर : अखंड सेवीताती गंगातीर
तेथ जे अनुष्टान करीतील नर : ते पावतील इछीलीं फळें ॥ ३१

मनुष्यत्वें जन्मलीयां संसारीं : तरी सदा असावें गंगातीरीं
भ्रमण न करावें क्षीती माझारीं : न सेवावि अन्येकें[1] तीर्थे ॥ ३२

दुसरें मातापुर प्रसीध तीये देसिं : तें सेवीलीयां माहापातकें नासी
तेथें नीत्ये वासु श्रीदत्तात्रयासि : म्हणौनियां ॥ ३३

जे योग* युक्त उर्धरेते वर्तती : ते तपें अनुष्टानें पावती मुक्ती
तेची मातापुरनीवासीया सर्वंगती : क्रीमी जंत* आदी करुनीयां ॥

तें मातापूर देखिलेयां नयेनी : मागीला माहापातकां होये धुनि
आणि पुढां आपुर्व नीफजे ततक्षेनिं : मनि चिंतीलीं फळें ॥ ३५

तेथें अत्री अनुसयेचा सुतु : राज्ये करीतांये श्रीदत्तु
तेणें अळर्कु नीववीला जळतु : त्रीवीधा तापापासौनि ॥ ३६

आणिं सासार्जुनासिं उचीतिं : सहस्र भुजा देऊनि स्थापीला क्षीती
फरसरामाचीया* मातापीतयां दीधली मुक्ति :
आणि स्थापीले रेनुकेतें ॥ ३७

ऐसा तो दत्तात्रय देवाधीदेवो : आर्तजनांसि दे मनें[1] चिंतीला दावो
तेणें पवीत्र केला मातापुर ठावो : तयासि नमन माझें ॥ ३८

ऐसें श्रीदत्तात्रयाचें नाम उचारीलें : तवं रायें करसंपुष्ट जोडीले
जये जये म्हणौनि ललहाटिं वंदीलें : म्हणें देवो आतांचि आले येथ ॥

तीया मातापुरा इसान्ये दीसे : हें प्रसीद्ध कौंडन्यापुर नगर असे
तया[1] ब्यांनौ अठरासें : लागलि गावें ॥ ४०

देसा नावें वराड जाना : तेथीचा भीमसेनु राना
तुझेया रुपगुणांचि वर्णना : वर्णुं कवणु जाणें ॥ ४१

तुवां सिंधु जितला आगाधपणें :
आणि द्रव्ये संपती कुबीरा अनिलें उणे
तुझेनि प्रतापे कांपती राणे : भुमंडळीचे ॥ ४२

तुझें रुप गुण वर्णितां : परीं पुढील ठाकैल कथा
म्हणौनि परीयसैं भीमका आतां : सांघैन आणिक देस ॥ ४३

मीयां सवाये लक्ष देखिलें जांबुदीप : तेथीचे राजे सीहांने सुरुप
परी वीचीत्र भाषा देस आमुप : ते सांघैन आतां ॥ ४४

द्रावड देस लक्ष तेरा : तेथीचे राये सुंदर अवधारा
तयांचीया खांडेयांचा भेदारा : लागला दानवांसि ॥ ४५

नवलक्ष देसु तेलंग : तेथचें रायें सुखिये[१] संभोग
परी भाषा नव्हे चांग : बोलतां तयांची[२] ॥ ४६

नवलक्ष देसु करनाटक[१] : तेथीचे राये सुंदर परीं उमेट[२]
आणि सौरे क्षेत्री सुभट : जगामाजी ॥ ४७

सवाये लक्षु देसु वोडीया : बहुत हस्ती तेथीचीया राया
द्रव्यें संपती पाहातां तयां : संख्या नाहीं ॥ ४८

अठरा सहश्र देसु म्हणिजे बदर* : तेथीचे राये माहासूर
योद्धीं देखा आतुर : न गणीती रणातें ॥ ४९

अठरा सहश्र वैरागर : तीयें भुमीवरीं रत्नांचे आगर
तया रायांचे अळंकार : अवघे हीरेयांचे ॥ ५०

लांजी चोवीस[१] सहश्र : तेथचे राये भागीये चतुर
तयां वोडन खांडे हातीयेर : आंगीं चंदन भोंरी ॥ ५१

पंचगौड देसु पांच लक्ष : अठरा[१] लक्ष बंगाळ असेख
नवलक्ष कांऊरूळ तेथीचे लोक : अवघे कुड[२] नाटकी ॥ ५२

-६००५० वि: ७१०५ ३८१ नों. दि:


चक्रकोटु देसु तेवीस सहश्र : आणि सतरा[1] सहश्र जाज[2] नगर
चोहोंडलक्ष क्षीन्नझीन[3] गोरक्षपुर[3] : चोवीस सहश्र ॥ ५३

आणि चौतीस[1] सहश्र जाळांधर : मृगमंडळ नव्हांनौ सहश्र
गौडौरा[2] देसु देखिला मीयां सहश्र : बत्तीस जानां ॥ ५४

नवसहश्र नेपाळ : तेथ कस्तुरीचे वेल्हाउळ
आणि कास्मीर कामरुळ : कस्तुरी तीचा ठाइं ॥ ५५

नेपाळीची सुभ्र जाण : कास्मीरीची पीत[1] वर्ण
कामरुळीची कृष्ण : ऐसी वोळखावी त्रीवीधापरी ॥ ५६

नेपाळीं भद्र मुस्ताखानें[1] मृगासि : कास्मीरीं जटामासि
कामरुळीं गुंठि[2] परीयेसी : ऐसे आहार तीघां ॥ ५७

पंचवीस सहश्र रुवंस : आणि नीषेध सहश्र त्रेताळीस
आतां कास्मीर देसु परीयेस : अवघा दीड लक्ष ॥ ५८

बतीस सहश्र नीमीक्षारन्ये[1] : चोवीस लक्ष उंच मुलतान
बेताळीस लक्ष हस्तिनापुर जान : गांजना बेताळीस सहश्र ॥ ५९

अठरा लक्ष भींगनापुर[1] : अकरा सहश्र वैश्वांनर
सात लक्ष हबसीकार : आरब बारा लक्ष ॥ ६०

त्रेताळीस लक्ष त्रेहत : वस्ती[1] चोवीस प्रगनि[2] तेथ
आणि खसीये[3] देसिं समस्त : सवाये लक्ष ॥ ६१

स्याहानौ लक्ष खुरासान : त्रेताळीस लक्ष खुपरदेसु जान
तेनिये देसींचे उतारन : सात लक्ष ॥ + ६२

सोळा लक्ष आसुर मंडळ : अकरा लक्ष दरीद्रताळ
आतां परीयेसा आवघे सिंगळ : चौदा सतें ॥ ६३

ब्यांनौ सहश्र गांधार : सवाये लक्ष मधुरापुर
नव लक्ष जाळांधर : मधिवासु[1] सासष्टि सहश्र ॥ ६४

नव्हांनौ सहश्र भूमंडळ : नव लक्ष डाहाळ
पाहातां चीन[1] सकळ[1] : सहश्र त्रेताळीस ॥ ६५

चौताळीस सहश्र जाल्हौर : बेताळीस सहश्र वेताळपूर
पांच लक्ष मलपांचौर[1] : पाडीये[2] येकुनीस[3] सहश्र ॥ ६६

पांच लक्ष मुलमंडळ : अकरा[1] लक्ष हरीताळ
बाहात्री सहश्र चंद्रमंडळ : गजकर्न अठरा[2] लक्ष ॥ ६७

येक्यांनौ सहश्र गौमुख : स्याहासी सहश्र काळाक्ष
तीरासी[1] सहश्र महीख[2] : रावन नव लक्ष ॥ ६८

तीन सहश्र दासर : सात लक्ष नीतंबपुर
तेतीस लक्ष संहपंचौर : गंधर्व अकरा लक्ष ॥ ६९

सेताळीस लक्ष कमुंड[1] : असी सहश्र साहामुंड
पांच लक्ष णहाड : हजस[2] साटि लक्ष ॥ ७०

आसी सहश्र येमुख : बारा सहश्र बाहाळीक
साठी सहश्र पठान आइक : सिंध सतरी सहश्र ॥ ७१

बारा लक्ष बांकनौर[1] जान : सवाये लक्ष कर्दळी वन
तेवीस सहश्र[2] त्रीगुळ[3] ठाण : फीरंग पंधरा लक्ष । ७२

हुरमुंज लक्ष आठ : सात लक्ष मळीवाड नीट
कंभुज देसु संपीठ : तेरा लक्ष ॥ ७३

सात लक्ष सोरठ : नव सहश्र नंमीयाड[1] नीट
सोळासे रनावट : ढोला सहश्र सतरा ॥ ७४

छतीस लक्ष[1] स्त्रीमंडळ : तेथें वीसयें भोग अती बहळ
पुरुष गर्भ गळेती सकळ : वाढती स्त्रियांचे * ॥ ७५

तेथचा राजा मनमोहणि : जवळि सुबुद्धिका[1] मंत्रीणि[1]
घोडां चढती सोळा लक्ष सोवासणि : सोडस वरुसांचिया ॥ ७६

तया माजी सात लक्ष पद्मीनि : नव लक्ष चितीनि
हस्तीनि संखिनि : तेथ न वर्तती ॥ ७७
आणि बाळा प्रौढा मुग्धा जाना : ऐसीया बहुत असती आंगना
तेथ सा क्षेउनी सैन्ये : अवघीया कामीनींचि ॥ ७८
आणि जरी तयांचें सांघों गुण रेखा रुप : तरी कथा ठाकैल[१] आमुप
आणि देश घरें सांडौनि नृप : जातील तया देसा ॥ ७९
ऐसे हे मृत्यलोक्रीं देस असती बहुत : परी मीयां सांघीतले संकळीत[१]
ते दोसें सितले समस्त : ते तुज काये सांघों ॥ ८०
दोसेंवीण कवण कुळ असे राया : आणि व्यधीवीण कवणु वर्ते देहीया
नीरंतर सुख कव्हणांहीं प्राणीयां : देखिजेना ॥ ८१
पतीत्वाचा धाकु अष्ट लोकपाळां :
आणि हा मृत्यलोकु दाढें सांपडला काळां
पाह्यातां कव्हणीं न देखों वेगळा : काळवदनां पासौनि ॥ ८२
ऐसाही जो इश्वरभक्तिशीळु : तो संसारामाजी जांनावा हरळु
तो दांतु पाडील म्हणौनि काळु : तया आंतुळे ना ॥ ८३
ऐसी मृत्यलोकींची स्थीती : राया आमीत्यें देखा वर्तती
परी येक येक अवगुण असती : आवघयांसीं ॥ ८४
ऐसें देस दीप ग्राम सांघीतले तुजप्रती : परी नाहिं बोलीलों भुपती
कां प्रमयें वाढवीलें म्हणौनि हांसती : श्रोते सभेमाजी ॥ ८५
तरी आठांही दीसांचे राये वेगीं : झडकरी अनुक्रमें सांगै
रसु आंवरी प्रक्रन न भंगी : कवी कृष्णदासा ॥ ८६

**प्रसंग चौथा समाप्त** * (ग्रंथसंख्या ३७८)

श्रीकृष्णार्पणमस्तु

## प्रसंग पांचवा

श्रीपरमात्मने नमः

मग कीन्नरु म्हणे भीमनृपती : मीयां सांघीतले देश दीपें तुजप्रती
"तर आतां"* परीयेसै भूपती : जे वीक्षातु जगीं ॥ १
मग तेणे कीन्नरें कळावीदें : मंगळरागाचेनि सादें
राये सांघों आदरीले वीनोदें : वाव्ये उत्तरेचे ॥ २
आइकै वाव्ये[1] देसीचा[2] माणसींग राजा :
तेनें बरवें पाळीलें सैन्ये परीवार[3] प्रजा
आपनयां सारीखें वोजा : अवघेयांतें पाहे ॥ ३
आणि प्रजेतें नेघे करभारु : परीवाराचा न पाहे वोळग जोहारु
तो आंगें चक्रवर्ति तयाचा बडीवारु : काइ सांघों ॥ ४
तो जवं चिंती आपुला मनीं : रीद्धि सिद्धी पावती कामधेनु चिंतामनि
मग सैन्ये परीवारा प्रजेसीं वांटौनि : आपुनची दे ॥ ५
आणि सुरत्वें त्रीलोक्यातें जीनें : उदारपणें कल्पतरुसि आणी उनें
पात्रापात्र नाहिं पाहानें : वेंची सर्व[1] संपती ॥ ६
आइकै मानसरोवर उत्तर दीसे : तेथ गीतसंकरु* रावो असे
तयाचीया रूपगुणाचें पीसें : लागलें गंधर्वकन्यासि ॥ ७
आइका हृटक[1] देसीचा भुपती : पुरुसुधर्माचा गुह्येकु[2] चक्रवर्ति
तयातें समर्थपणें वोळगती : वीद्यावंत देवांचे ॥ ८
आणि सीहुंपुरी नगरी : राजा चीत्रयोधु[1] राज्ये करी
आणि दुसरा अवधारी : दधीकोसळु[2] ॥ ९
हे आपुलेनि समर्थवादें : काळावरी पढवीताती ब्रीदें
तयासि कव्हनि न पुरेती युध्यें : राये भुतळीचे ॥ १०

आणि द्रीग[1] देसीचा नृपनाथु : सुवर्मा क्षेत्री देखा वीक्षातु
तयाचा हृदइं धाकु असे वाहातु : येमु सैवंतीयेचा ॥ ११

जयाचें खांडें पवीत्र अतीसयेसीं : उत्तमपणें म्हणवी दुसरी कासी
धारे पडे तो स्वर्ग पावे अन्यासि : चुके अधपातातें ॥ १२

आणिकु परीयेसै नृपसेना : मेघमाळांधरु पर्वत जाना
त्यासि पांचसतें योजना : वीस्तारू वरीं ॥ १३

तयावरीं मेघमाळांधर पुरी : सात योजनें वसतांये अवधारी
तेथें मेघनादु[1] वीरु राज्ये करी : वंसीं टवीटाळकांचा ॥ १४

कास्मीरांचा नादमुर्ति सुजान : तो साहीतिं संगीतीं नीपुन
ऐंसिया सकळ कळा जानें म्हणौन : नावें नादमुर्ति ॥ १५

तेनें सकळ कळा जानण्या[1]येका[2] : पाठवीली होती आपुली दुतीका
पाहावया लागौनि आइका : देवी रुक्मीनीतें ॥ १६

दीव्ये "प्रहस्त लोहीत"* देसिं : तेथचा रावो सेंनांदी[1] परीयेसी
तयाचीया खांडेयांचा कींकसि : राये रेवले भुतळीचे ॥ १७

बहीरगीरीचे[1] क्षेत्री आमीतु[2] : तयाचेनि धाकें कैळासु असे कांपतु
तयासिं प्रजी ऐंसा रावो त्वरीतु : न देखों भुमंडळीं ॥ १८

महीवनींचा महीपती पाहे : तयासि योद्धि[1] पुरे[1] ऐंसा कवनु आहे
महेशा सारीखा धाकु वाहे : गणांसहीतु ॥ १९

तयाचे सदा सारसी देतु चौदंत : तेणें गजरें आकास असे गर्जत
जैसीया कोडी येकी विजु असेती आदळत[1] : वसुंधरेवरी ॥ २०

भुमाचा[1] भगदंतु अवधारी : राये बुडाले जयाचीये खर्गधारेचा पुरीं
आणि अद्यापीं इंद्र सींहासनावरी : बैसों न सके ॥ २१

आइका सत्यमंडळीचा वैध्वज* राजा : तो पृथ्वीतें रत्नें घे खांडें पुजा
आणि सहश्र कीर्णाचीया कांपती भुजा : तयातें देखौनियां ॥ २२

बाहाळीकु पर्वतुरावो सोमवंसी : आणि कीर्तिदेवो नेपाळ देसिं :
ते दोघै साधनां करीति आकासिं : गरुडी सूर्याचीये ॥ २३

म्लेंछ* मंडळीचा भुपाळु : काळीयवनाचा सैवयवनु[१] अती बळु
तो दक्षीणेचीया रायांवरी माहाकाळु : यें श्रीदें पढवीतांये ॥ २४

आणिकु आइका वज्राधीपु तुडकाण देसिं :
असिवारां समुद्र म्हणवी[१] आपनयांसी
तेणें वीरेसिं येकाकीं कासी : ऐसा कवणु आसे ॥ २५

तयाचीया खांडेयाचीया प्रताप आग्नी : आसुरांचि आयोध्यें आटौनीं
तेणें तळ[१] बांधले खुरासनिं : जाणति तीन्हि लोक ॥ २६

इद्रकार देसिं दंतवक्र माहाबळी : जो काळेसीं कासी भुजाबळीं
तयाचा प्रतापु न संटे भुतळीं : धाकु लोकपाळां ॥ २७

अस्थीतु[१]जाळीचा नरेंद्रु : कंभोजु कोपकाळाग्नि रुद्रु
तयाचा रथु प्रकास तेजांचा सुधु[२] : जैसें भानुबींब ॥ २८

महष्मामतीचा[१] हैहय[२] राजु क्षेत्री : जयाचा धाकु वाहे धरत्री
तेणे अरी[३] जिंतले शस्त्रि : भुमंडळीचे ॥ २९

तेणें बाणांचेनि प्रतापें : नंदनवन जीणौनि कोपें
तेथचि आणौनि दीव्यें पुष्पें : पुजीताये श्रीदत्तात्रयासि ॥ ३०

त्रीपुरारीचा प्रतापलोचनु[१] : जो क्षेत्रीयांसीं म्हणवी पंचाननु
तेणें येकाकीं जिंतला इसानु : समरंगणि रायांमाजी[२] ॥ ३१

राया धृतराष्टराचा[१] सुतु : हस्तनापुरीं दुर्योधन वीख्यातु
तो कौरवकुळिं समर्थु : आणि रुपसु जगीं ॥ ३२

तो नवनाग सहश्र बळु : आणि भुजाबळें माहाकाळु
तयासि प्रजी यैसा भुपाळु : न देखों भुमंडळीं ॥ ३३

वृंदानवृंदु रावो[1] असे उजेनिं : तयाचा प्रतापु न सामाये त्रीभुवनिं
तो समुद्रातें रत्नें घे खांडे धुवुनि : आमुलेपणें ॥ ३४

तया नवरत्नांचे करुनि नंदी : महेशासि पाठवीले वीनोदिं
ऐसा तो रावो रायासि आदी : वृंदुसेनु ॥ ३५

हे वाव्ये उतरेचे राये सांघीतले जांना :
आतां इसान्यें पुर्वेचे परीयेसै भीमसेना
तयाचेया रुपगुणांची वर्णना : आतां आइकतु ॥ ३६

मग पडीघाउनि[1] खगपती : देसांकु आळवीला वीत्पती
राये सांघों आदरीले नीगुती : इसान्यें पुर्वेचे ॥ ३७

आइका इसान्येचा वज्रकेतु : तयाचा मंत्री ज्ञानभैरव नीतीमंतु
तया राया सारीखा क्षेत्री समर्थु : न देखों त्रीभुवनिं ॥ ३८

आइका महेसाची श्रोनीतापुरी : तेथें सहश्रबाहो* राज्ये करी
तेणे प्रसंन केला त्रीपुरारी : भक्तीभावें ॥ ३९

येका रथा कारणें रावणसुतें : इंद्रजीतें हवन मांडीलें होतें
ते बाणासुराचा घरीं पांचसतें : रथ नंदीघोष ॥ ४०

पातां येक सीर तया : आणि सहश्रभुजा देव्हडीया
पातां वीकट दीसे राया : नव्हे सुंदरु तो ॥ ४१

कार्तीक* मंडळीचा भुपती : राजपुत्रु वीक्षांतु क्षीती
तेणें आपुलीया प्रतापसक्ती : जींतलें फनींद्रातें[1] ॥ ४२

वंग देसीचा समुद्रसेनु : तयाचा प्रतापु अती गहनु
जयाचिये धाडी बीहे त्रीनयेनु : महेशु कैळासीचा ॥ ४३

चंद्रयोध्यु वीरु अवधारी : तयासि आमीतें रथ संख्या कवण करी
ते न समाती प्रथवीवरीं : चालती अंतराळिं ॥ ४४

क्रोंस[१] देसीचा नृपवरु : गरुडध्वज वीख्यात वीरु
तयासि प्रजी यैसा जुंझारु : दुसरा नाहिं ॥ ४५

तो पौंडरीकु[१] राजा : बांधौनि दोनि काष्टाचीया भुजा
आपनेयातें वीष्णु म्हनवीतांये दुजा : ये क्षीतीमाजी ॥ ४६

ऐसें तेणें आपुला ठाइं कैसें : पुरुषत्वें देवपणाचें लावीलें पीसें[१]
अरीरायांवरीं ब्रीदें पढवीतु असे : सेवक म्हणौनियां ॥ ४७

आइका जयाचा पीता सहश्रकीर्णु : तो रुपें कैसा वर्नावा कर्णु
आणि उदार तयाहुनु : दुसरा नाहिं ॥ ४८

"जो पांच नीज वारु श्रृंघारुन"* :
सींगुळें[१] गाइ लक्ष* आनि भार सुवर्ण
इतुकें जो प्रतदीनिं दे दान : मग बैसे सींहासनिं ॥ ४९

आणि उचीतिं दे दक्षेना : तयासि कवन करी गणना
आणि प्रतापें या त्रीभुवनां : माजी वीक्षातु तो ॥ ५०

बृहद्रथा रायाचा कुमरु : राजग्रहीचा जरासुतु[१] वीरु
तयापासि देखा दळभारु : तेवीस क्षेवनीं ॥ ५१

तो वैरीयां काळकेतु : भुतळीचीयां क्षेत्रीयां[१] कृतांतु[२]
यें ब्रीदें जरासुतु असे पढवीतु : जगांमाजीं ॥ ५२

रत्नसेखरु रावो मनिपुरीं : तयाचा वज्राक्ष कुमरु अवधारी
तेणें सुधाकरु जितला क्षीतीवरीं : कीर्ति उदारपणें ॥ ५३

झाडीमंडळीचा सबळवाहांनु[१] रावो : तेणें वैरीयांचा फेडीला ठावो
आणि आदटां रायां घनघावो : म्हनवी तो आपणयातें ॥ ५४

प्रथवीपाळु महीषदेसीं : तयाचा प्रतापु न सामाये दाहिं दीसिं
तयातें देखौनि करपे मीसी : धाकें वैरीयांची ॥ ५५

आइका सुवर्णपुर नगरी : तेथें नरनाथु वीरु राज्ये करी
तो रुपें सुंदरु अवधारी : जगामाजी ॥ ५६

तो मछदेसीचीया रायांवरी : ब्रीदें पढवी वीचीत्रांपरीं
तयाचीया गजमदाचेनि पुरीं वाहावे[१] वैरी : संग्रामसमुद्रिं ॥ ५७

अयोध्येचा ब्रहद्रथु[१] नृपवरु : तो सुर्यवंसी रावो सुंदरु
तयाचीया रुपाचा वेधु थोरु : लागला सुरंगनासि ॥ ५८

मेघध्वजु रावो मल्ये देसीं : प्रतापें रुद्र म्हणवी वैरीयांसि
तयाचीया खांडेयांची घेउनि वीवसी : रीपु लंघीले गीरीकंदर ॥ ५९

वारानसीचा कासेश्वरु : तो मुक्तिक्षेत्रींचा रावो थोरु
तयासि बहुत अहंकारु : क्षेत्रीपणाचा ॥ ६०

तेणें आपुलेनि प्रतापें करून : आणिला मळयागीरीचा चंदन
मग प्रसादु केला वीश्वेश्वरालागौन : सोळा खणांचा ॥ ६१

तो कासीराजु वीरु : सुबाहो कीर्तिचंद्राचा कुमरु
तयाचेया खांडेया समोरु : कव्हणि उभा न राहे ॥ ६२

दमघोषु रावो चेद्य देसिं : शृतुशृवा[१] राणि तयासि
सीशुपाळु कुमरु उपनला तीयेंसि : तो अती रुपसु जगीं ॥ ६३

तया चैद्या रायासि समरंगणि : जुझतां न पुरवे कव्हणि
म्हणौनि माहाबाहो ये त्रीभुवनि : म्हणवीतांये ॥ ६४

पंडुरायाचा युधीष्ठीरु : तो आगाध[१]सत्वांचा[१] सागरु :
नुलंघी नीती मर्यादा तया नसे वीकारु : भक्तीभावें[२] ॥ ६५

तो अतीसुंदरु धर्मु राना : तयाचा वेधु लागला देवांगनां
आणि क्षेत्री ऐसा* या त्रीभुवनां : माजी दुसरा नाहिं ॥ ६६

तयाचा दुसरा बंधु भीम सुभटु : तो अरीरायांचा भरी घोंटु
तयासि भीडे यैसा नीटु : क्षेत्री नाहीं ॥ ६७

तीसरा अर्जुन क्षेत्रीया सीरोमनि : जेनें स्वर्गीं शरीं सेतु बांधौनि
ऐरावती आणीला माते लागौनि : सीद्धी नेला वोवसा ॥ ६८

चौथा साहादेवो चांग जोतीसी : त्रीकाळज्ञान वर्ते तयासिं
जेणें युधि जींतले भद्रेसिं : समरंगणिं ॥ ६९

पांचवां नकुळ तो अती सुंदरु : तयासिं सामास करीतां लागे श्रृंगारु
मग बाहीरीं नीगौनि दे अवस्वरु : वंधुवर्गा[१] ॥ ७०

तेणें नकुळें आपुला कांति : सूर्यो कोंडीला नव दीवस[१] केली रात्री
मग तया अर्जुनाचा हातिं : वधीलें टवटाळक ॥ ७१

ऐसे ते पांचही सोहृदरु : राया पंडुचे कुमरु
तयापस्ये गुणें रुपें सत्वें थोरु : न देखों भुमंडळीं ॥ ७२

मीथुळेचा जनकु चक्रवर्ति : तयाचा कीर्तिरुप कुमरु सुंदर अती
तेणें आपुलीया लावण्यें संपती : जितला रतीकांतु ॥ ७३

आणि महार्नवीचा* सुश्रमा : तयाचीया क्षेत्रीपणा नाहीं उपमा
तयाचा धाकु सदा सूर्याचीया मनां : आणि गर्गानिं राहों न सके ॥

पंचाळदेसिं दृपदु वीरु : तो अती रुपें सुंदरु
तयाचीया क्षेत्रीपणाचा बडीवारु : धाकु इंद्रलोकीं ॥ ७५

मग आळउनि मल्हाराचें मान : म्हणे भीमका होइ सावधान
आतां अग्ने दक्षीणेचे राये सांघैन : ते आइकतु ॥ ७६

अंगरागु[१] आग्नेय दीसेचा राजा : तेणें बहुत जिंतीले पैजा
तयाचीया भुर्ताळि तपती भुजा : प्रतापें क्षेत्रीयांवरीं ॥ ७७

आणिकु आइका रावो रत्नध्वजु : जो संग्रामी सौर्या अवकाळ वीजु
तेणें क्षेत्रीयांचा झाडीला माजु : प्रतापें खांडेयाचेनि ॥ ७८

कीर्तिधवळु समुद्रदेसिंचा राणा : मीती नाहिं तयाचेया लावण्या
तेणें वेधीलीया नागकन्या : आपुलेनि बरवेपणें ॥ ७९

आणि मळयााचळ रावो क्षीरसागरीं : नीं दि
काइ सांघों तयाचीया औदार्याची थोरी
राया[१] मागते केले अवधारी : भुतळीचे ॥ ८०

त्रीमुर्तिरावो पागारीं वसे : तयाचा कुमरु त्रीकाळु क्षेत्री अतीसें
राये बळीयाडे तया ऐसे : न देखों क्षीतीमाजी ॥ ८१
तेणें आपुला भुजाबळीं जांना : धरौनि पाखरीले पंचानना
तेंचि करुनियां आपणयांसीं[१] वहन : आणि पुढां खांसीले चालवी ॥ ८२

आणि मेखळा रत्नरथांचा : चंद्रसेनु कुमरु तयाचा
तेणें मदु झाडीला क्षेत्रीयांचा : बाणांचा घाइं ॥ ८३

तो पर्वतीचीया कीन्नरां करवी : आपुलें गीत सुड गाववी
आणि बरवेपणें म्हणवी : आनंगरावो ॥ ८४
द्रावड देसिंचा भास्वतु सुजान : चातुर्यें सकळै[१] नीपुन[२]
आणि नीतमंतु तयाहुन : दुसरा नाहिं ॥ ८५

मलवाळ[१] देसिंचा नृपवरु : वीक्रमुकेतु रावो थोरु
तयापासि आमीत दळभारु : संख्या कवण जांणे ॥ ८६

पांडीये देसिंचा वीख्यातु : दंतपाळ क्षेत्री समर्थु
तो भुतळीचीया रायांवरीं कृदांतु : म्हणवीतु असे ॥ ८७
तयावरीं प्रतापें गुणि : सहस्रधा पढवीतांये आंकणि
जो रावो देखा नंदनवनि : मळयानीळु ॥ ८८

महीपाळ रावो देखा चौडदेसि : तो वडवानळु म्हणवी वैरीयांसि
तयाचीया खांडयांची घेउनी वीवसी : क्षेत्री लंघीले गीरी ॥ ८९

सीसैंलीचा[१] सींह सालु चंद्रवीक्रमु : तया तीघां बंधुचा सांघता प्राक्रमु
तया भेणें कांपे येमु : रावो सैवंतीचा ॥ ९०

जेणें आपुलेनिं प्राक्रमें जान : उपडौनि चौदंताचे दसन
त्रीपुरुषालागि[१] केलें सींहासन : सांपें[२] जोतीवटीकेसिं[३] ॥ ९१

मछदेसीचा वैराटु गहनु : तो अरीरायां म्हणवी वडवाग्नु
तेणें पाचारुं धाडीला होता भीमसेनु : युध्यालागी ॥ ९२

आइका खर्गकेतुचा कुमरु : उदोदासु* क्षेत्री थोरु
तो रीपुचा करी संहारु : हातीयेरेंवीण ॥ ९३

कांवोरु करनाटकींचा : तो वज्रवीजयो बापु क्षेत्रीयांचा
असो हें प्रतापु सांघता तयाचा : बहुत असे ॥ ९४

तेणें आपुलेन बाणें आलोट : आकासासिं करुनि वाट
आणिले घोडेयांचे थाट : खेंचरांचे ॥ ९५

चांपावतीयेचेनि रत्नसेखरें* भुपती : क्षेत्रीयांची हरौनि सर्व संपती
मग याचकें केलीं संत्रुप्ती : भुमंडळींचि ॥ ९६

द्राक्षरायाचा[१] कुमरु : आणि संखरु[२] वीरु
तो अरीरायांसीं अढळगीरीवरु : असे गुनिंद्रदेसीं ॥ ९७

आइका मही⸆ मंडळीचा भुपाळु : प्रतापें दुसरा वडवानळु
आणि तेजें प्रकासें बहळु : म्हनवी द्वादस आदीत्ये ॥ ९८

आंध्र* देसिचा भुपाळि : फनिंद्र जितले पाताळीं
वीषार आपुला मंडळीं : रीगों नेदीती ॥ ९९

कर्निकेचेनि रत्नतीलकें राणे : प्रथवीये लेववीलें कीर्तिचें लेणे
"येशाची बुंथ"* वाइली तेणें : आकास मंडळासिं ॥ १००

भद्रकानंदीश्वराचा कुमरु : सशांकरावो माहावीरु
तेणे ब्रीदांचा घातलासे तोडरु : गगनिंचेया राहोवरी ॥ १०१

पंडुचे पांचही राजकुमर देखा : तेहिं बरवेंपणें जितीले त्रीलोक्या
तयांचीं खांडी प्रणीताति आइका : देवकन्यासिं ॥ १०२

इतुला अवस्वरीं कीन्नरें जान : आफार्उनि रामगीरीचें मान
म्हणे भीमका आतां आइक सांघैन : राये नैरुत्ये पश्चिमेचे ।। १०३
आतां नैरुत्ये दीसे जाने : चौंदा सतें सींगळ⸗ तेथें रत्नाची खानि
आणि समुद्रा आंतुला वेलाउळां लागौनि : संख्या नाहीं ।। १०४
कुळ नाहिं तेथीचेयां रायां : ते काइसयां बोलों वायां
आतां सांघैन पुढीलां रायां : तया चीत्त देइ ।। १०५
आंइका महद्‌माचा सुतु : माहाबाहो उदारपनें वीख्यातु
तो सदा कनकधारीं असे वर्षतु : न पाहे पात्रापात्र ।। १०६
आतां आइका कोकनीचे क्षेत्री : जे मेरुतें भेदुं पाहाती सस्त्रि
तेहिं अष्ट⸗ भोगें वसंतु जिंतला ऐसी कीर्ति : पढवीताती ।।१०७
आणि सुवर्णुपागारीचा[१] राजा : श्रीमंता सारीखा नाहिं दुजा
जेणें मदनु जिंतला पैजा : रुपें आपुलेनि ।। १०८
आहीर[१] देसींचा रुद्र भुपती : तेणे कुबेरु जिंतला द्रव्ये संपती
आनार्थें[२] केलीं मागतीं : वैरीयां वडवानळें ।। १०९
आइका कोळंमीरीचा* रुद्र : तेने कीर्ति येसें जींतला चंद्र*
तयाचेया खांडयां कांपे इंद्र : अमरावतीयेचा ।। ११०
वीजयो वसे* सागरामाजी भुवनि : तयाचा येसु श्रृंघारु आइकोनि
भाळली अमरावतीची इंद्रायेनी : वरु पांती असे ।। १११
जो उभये तीरीं भोगी सागरु : तो चंद्रसेनु उदारां सुधांकरु
तयाचे घरीं[१] तुरंग[१] वारु : चालती उदकावरीं ।। ११२
मुनिराज सिंधु⸗ देसिचा भुपती : तेणें नवरत्नें जिंतलीं आंगकांती
तयाचे वारु पाणियां जाती : गगनगंगेचीया ।। ११३
आक्षेरीं[१] कीर्तिकेचा[१] नृपनाथु : जेणे आंकणा घातला कृतांतु
आणि मेरु मंडळीचेया रायांसि असे मागतु : खांडेपुजा ।। ११४

सोरठी मनिंद्र रावो ब्रह्मवंसी : तेणें रुपें जींतले मनमथासीं
उणें आनीलें कल्पतरुंसि : उदार्ये आपुलेंनिं ॥ ११५
आइका सुळ[1] मंडळीचा नृपती : जो सकळ कळा जांणे वीत्पती
तया सारीखा बोलीका चतुर भुपती : नाहीं क्षीतीमाजी ॥ ११६
आणि माहाराष्टरींचा रत्नायुध± भुपती :
तो मेघातें मुक्ताफळें घे प्रताप शक्ति
तें श्रीकृष्णांसि पाठवीलीं उचीत्ति : सुमैत्रु म्हनौनियां ॥ ११७
प्रागजोतीचा भुमासुरु : तो प्रतापें क्षेत्री थोरु
तयाचा भुमीं न सामाये दळभारु : म्हणौनि वसे अंत्राळीं ॥ ११८
ऐसा राया मी हिंडींनला त्रीभुवनिं : आमीत राये देखिले नयेनिं
तयामाजी येकही माझा मनीं : न बैसे देखा ॥ ११९
वय रुपें गुणें संपुर्ण : येकुही न देखों जाण
येक येक[1] अवगुण : येक येका[2] असती ॥ १२०
वये असे तरी रुप नाहिं : रुप असे तरी नीधंन पाहीं
धन असे तरी मुर्ख कांहिं : नेणती शास्त्र ॥ १२१
शास्त्रें प्रवीण ते द्रव्यें हीन : द्रव्यें प्रवीण[1] तयां नसे शास्त्रज्ञान
द्रव्यें शास्त्रें पुर्ण : ते वीरुळे दैवें आथीले ॥ १२२
ऐसे सांघीतले पृथवीचे भुपती : परी येकुही न लगे देवीचा चीत्ति
रुक्मीनि दृष्टी अव्हेरौनियां आनौती : पाहीलें आपनयां हारें[1] ॥
तो कीन्नरें दृष्टीचा आव्हेरु जाणौनि :
मग म्हणें येकुही न येची देवीचा मनीं
आतां सांघों श्रीसारंगपानि : कृष्ण लावण्येसींधु ॥ १२४
मग कीन्नरु म्हणे भीम नृपती : म्यां त्रैलोकीचे राये सांघीतले तुजप्रतीं
परी येकु वसतांये माझा चीत्ति : तो आइकै श्रीकृष्ण रावो ॥

वयें रुपें सर्वगुणें संपुर्ण : तो येकुची मीया देखिला श्रीकृष्ण
ये त्रीभुवनिं तया वांचौन : न ये माझीया मनां ॥ १२६
जवं वर्णिले पृथवीचे भुपती : तवं भीमकी वास पाहात होती खालौती
वर्णु आदरीला श्रीपती : मग पाहीले कीन्नराकडे ॥ १२७
ऐसें जवं श्रीकृष्ण नाम उचारीलें : तवं भीमकीया सन्मुख पाहीलें
कीन्नरु म्हणें देवी आवधान दीधलें : देवो लागला चीत्तिं ॥ १२८
ऐसी सकळ सभा भीमकें सहीत : कीन्नरासिं दीधलें दतचीत्त
जाणौणि भीमकी[१] आर्तवंत[१] : मग कैसें बोलता जाला ॥ १२९
श्रीकृष्णाचे गुन कीर्ति आतां± : कीन्नरु वर्णिल वक्ता
ते पुढील सांग रे कथा : कवी कृष्णदासा ॥ १३०

**प्रसंग पांचवा समाप्त** * (ग्रंथ संख्या ५०८)

श्री कृष्णार्पणमस्तु

---

# प्र सं ग स हा वा

श्री परमात्मने नम:

मग कीन्नरें आळवीला वसंतु : वर्णु आदरीला श्री आनंतु
म्हणे राया ये त्रीभुवनिं वीक्षांतु : आइकै श्री कृष्णदेवो ॥ १
आजी सोमवंसि राये भुतळीं : यादव नांदताती माहाबळी
तयाची तुज सांघैन वंसावळी : आइकै सोमवंसु ॥ २
आदि क्षीरसागरु : क्षीरसागराचा चंद्र उदारु
चंद्राचा बुद्धी कुमरु : बुद्धीचा पुरीरवा ॥ ३

पुरीरवाचा अयो[1] रावो : अयोचा कुष्टी महाबाहो
कुष्टीचा नघोकु अरीघनघावो : नघोकाचा येदु ॥ ४

येदुचा दुंदुभी वीक्षांतु : दुंदुभीचा रावो सीतु
सीताचा कुमरु सहीतु : सहीताचा ससीवृंदु ॥ ५

ससीवृंदाचा ज्यामुकु वीरु : ज्यामुकाचा क्रेतु[1] माहासुरु
क्रेताचा कमळी कुमरु : कमळीचा कमळबाहो ॥ ६

कमळबाहोचा भुतु[1] : भुताचा येदु वीक्षांतु
येदुचा वैदर्भि सुतु : वैदर्भिचा सुरु ॥ ७

सुराचा सुरसेन वीरु : सुरेसेनाचा वसुदेवो कुमरु
तो लावण्ये रुपें सुंदरु : जगामाजी ॥ ८

तया वसुदेवाचे[1] सुतु : राम कृष्ण दोघे कुमरु वीक्षांतु
तयाचे गुण पवाडे आमीतु : ते कवणां वर्णवेतीना ॥ ९

वडील कुमरु बळीभद्र देवो : तो असुरा△ आडदरु माहाबाहो
कोपें तरी फेडी ठावो : या त्रीभुवनाचा ॥ १०

तो नांगराचीया प्रौढी : आवघीये श्रृष्टीची घडी मोडी
मुसळांचा घाइ फोडी* : ब्रह्मांडें आनेकवीधें ॥ ११

तया पुढां दैत्ये दानव काइसे : ब्रह्मादीक न पुरेती आवेसें
तया धारा श्रीकृष्ण तयाचे प्रतापु यैसे : ते शेसा वर्नवेती नां ॥

तया श्रीकृष्णाचीये प्रवृत्तीसरीसिं : येकीचि शक्ती ये श्रृष्टीतें ग्रासी
तया देवांचा प्रतापु कवणासि : वर्णवे प्राकृता मती ॥ १३

राया पश्चिमें श्रीद्वारकापुरी : तेथ यादवेंसीं श्रीकृष्ण राज्ये करी
तयाचीये राणीवेची थोरी : तुज काइ सांघों ॥ १४

तया देवांचे वर्निता गुन कीर्ति : वेदु श्रृती म्हनती नेती नेती
आणि सहश्रमुखांची असतां संपती : परी शेसा वर्नवेती[1] ना ॥ १५

तयातें आगम पुराणे नेणती : ब्रह्मादीकां रुषीचीया न कळे मती
तयासि काइ वर्नाल वीत्पती : मनुष्ये देखा ॥ १६
आकाशाही घालीजैल गवसणि : सागराचें चुळीं मवीजैल पाणि
परी श्रीकृष्णांचे गुन कवणा लागौनि : वर्नवेती ना ॥ १७
तयांमध्यें मि येकु त्रीयेंच जाणां : मज केवी वर्नवे तो श्रीकृष्णराणा
परी तोचि मज जाला प्रसंन : मज दीधली वाक्सीद्धी ॥ १८
स्वतंत्रु रावो येकु श्रीकृष्ण ये क्षीती : येर येकमेकेंसि आधीन वर्तती
आणि गीरी सैन्यें बळें ब्रीदें पढवीती : जगामाजी ॥ १९
पाइकि राखिजेती रणि : करभारें घेती ± प्रजेचि पोसनी
यैसे राये ये त्रीभुवनिं : देखिजताती ॥ २०
सेवकु आरीचि जीनेती सैन्यें : आणि राये आपणयां पढवीती आंकने
आजये आलेयांवरीं करीती कोपणे : भृत्यांवरीं ॥ २१
सैन्ये जुंझि[1] पुढां रीगे : आपुण हांकीती मागें
काइ धाकडपण सांगे : जे लाठे पुढीलावरीं[2] ॥ २२
तैसा तो नव्हे श्रीकृष्णरावो : प्रजेसि आपुला दे पासावो
भृत्यां पाठीसिं घालौनि दे[1] घावो : वैरीयांसीं ॥ २३
आपुणचि आरी आरुनीतें जीनें : आणि भृत्यासि येस दे पढवी आंकनें
समस्तां आपुणचि पुरुनि[1] उरणें : ऐसी सक्ती देवाची ॥ २४
तो जपें तपें येज्ञें न पवीजे जगजीवनु :
आणि तो पावीजे यैसा नाहीं योगधर्मु
तोची जरीं कृपा करी आपुनची होउनु : तरी सेवा लाभे ॥ २५
दुल्लभ राया संसारी मनुष्ये जन्म : तयामाजी दुल्लभ वीवेक ज्ञान
दुल्लभ श्रीकृष्ण भक्ती आणि तया देवांचें सन्निधान :
न पवीजे दैवेंवीण ॥ २६

ऐसा तो दैवेंवीण मुरारी : न पवीजे ये संसारी
तो जीयेसि करी आंतौरी : तेची धन्ये जगीं ॥ २७

माता वरु पाहे संपतीमंतु : पीता वरु पाहे क्षेत्री समर्थु
कन्या वरु पाहे वैसा युक्तु : आणि रुपसु जगीं ॥ २८

येहिं सर्व गुनि संपुर्न अवधारी : येकु मीयां देखिला रावो मुरारी
आणि समर्थु या त्रीभुवनां माझारीं : दुसरा नाहीं ॥ २९

तो आवघयांमाजी वडील वृध थोरु :
आणि वयेसा पाहातां तरी शोडसु सुंदरु
पहीला तारुण्याचा भरु : नीमासुरु ॥ ३०

तेणें रुपें तरी जींतला मदनु : तो गेला पुत्रत्वाचा पुढार मागौनु
वेधें वेधवंती देहें भावो वीसरौनु : पाठीं नग्न धावे ॥ ३१

जो नरामाजी बरवा नारायेण : तो संतोसला श्रीकृष्णमुर्ति देखौन
तेणें आपणयातें धीस्ये[१] करुन : मग तुकीला माथा : ३२

तवं लक्षमी म्हने नारायेणा : मी काये चुकलीये तुमची सेवना
कां मुगुटु तुकीला कार्या कवणा : तें सांगावें मज : ३३

तवं नारायेणु म्हणे सुंदरी : मृत्यलोकीं सुंदरु मुरारी
तयाचीया नखा[१]:इतुलें अवधारी : कहिं लावण्ये नसे ॥ ३४

तो देखौनियां श्रीकृष्णरावो : स्त्रिया△ वेधती हा काइ नवलावो
परी पुरुषासि उपजे भावो : कामीनिपणाचा ॥ ३५

तवं लक्षमी म्हणे तुजहुन : आणिक बरवा असे कवन
म्हणौनि नरामाजी नारायेण : यैसें म्हणीजे तुज ॥ ३६

तवं नारायेणें बोलीलें कैसें : म्हनें तया देवाचेया नखांचेनि दसांसे
आम्हां बरवेपण नसें : हें सत्ये जाणा ॥ ३७

मग लक्षमीयां घेतला आग्रहो : सेषें उपायें केला श्रीकृष्णरावो
मग तीया पुजीनि मागीतला पासावो : सेवा सन्यधान ॥ ३८
तीयेसीं पुढारु दीधला असे मुरारी : ते जन्मली असे मृत्यलोकां माझारीं
तें राया आतां मज अवधारी : उघडें अनुवादों न ये ॥ ३९
तया देवाचें बरवेपन सांघों म्हणे : तरी मदनाची उतरीजेती निंबलोणें
आनि सौभाग्याचेनि गुणें : तरी श्रृष्टीसिं वेधु ॥ ४०
ऐसा तो श्रीमंतु सुंदरु : राया वसुदेवाचा कुमरु
तयापस्ये आणिकु संपती[1] थोरु[1] : न देखों त्रीलोक्यामाजी ॥
जरी सुवर्ण संपती म्हनों आइका :
तरी तयाचिये नगरी कनकाची भुमीका
समस्त रत्नखचीत द्वारका : आवघी हेमबंध ॥ ४२
जरी चिंतामणि नीधी द्रव्ये देणे :
तरी तयांचा नगरीं तयांचिची भुवनें
कामधेनु दे वीचीत्रें अन्ने : तरी तीया घरोंघरी ॥ ४३
कल्पतरु दे फळें आणि वस्त्रें : आनेकधा वीवीधें आणि वीचीत्रें
तरी ते श्रीकृष्णें समर्थें : लावीले घरोघरीं ॥ ४४
ऐसीया रीधी सीद्धी अनेका : अवघीया तयाचीया परीचारीका
आणि प्रतापें तरी ब्रह्मादीकां : नेमुनि वर्ते ॥ ४५
तो आपणयां ब्रीदें न पढवी हृषीकेसी :
त्रीभुवनिं सरी नाहीं देखा कव्हणेसीं
जीव भृत्ये* देवता दासी : आणिक कवणु असे ॥ ४६
तो म्हणवीतांये सरणागतां वज्रपंजरु : आर्तादानि कृपेचा सागरु
अनाथां नाथु करुणाकरु : ये ब्रीदें अनादीचिं ॥ ४७
आणि दैत्ये दानव रुळताती तोडरीं : ब्रीदाइतां रायांचा नोवरा मुरारी
आणि त्रीभुवनिं तपतेयां रायावरीं : प्रतापु भास्करु ॥ ४८

आणि सोमवंसा वांचौनिं करीं : जेतुका रावो हातीयेरु धरी
तेतुकेयांचा नोवरा मुरारी : राया चौहातमल्लु ॥ ४९
म्हणौनि सौजन्य सीळां[1] वांचौनिं : जेतुका श्रीदें पढवी मेदनि
तेतुकेयांचा आमुला सारंगपानि : आरी खांडेंनि पेंडारु ॥ ५०
तया खांडा पाणीयां चांग : त्रीभुवनां दीधलें असेती अष्टभोग
ऐसेनहीं न वळे तयालागी वाहे डांग : करीं सुद्रसेनाची ॥ ५१
आनि ऐसेनहीं वोढाळ जे न राहाती : येकमेकांचे ग्रास हीरौनि खाती
तयांचे दांत उपडीतांये श्रीपती : सुद्रसेनें करुनी ॥ ५२
आतां परीयेसैं भीम चक्रवर्ति : जे बाळपणिं कृष्णें केली ख्याती
दैत्ये मारीले नाहिं मीती : तें आतां सांघैन तुज ॥ ५३
,पुतनां नवनागसहस्रबळ : ते श्रीकृष्णासीं देवों आली हळाहळ
मग देवें तीयेसिं सोकुनी दीधलें फळ : वैकुंठीचें ॥ ५४
माहाबळा दीधलें पीढें दान : ते देवें कौतुकची केलें जान
करूं न ये वीप्रहनन : म्हणौनीया ॥ ५५
त्रुणावर्तु मारीला सुभटु : बकाचा मोडीला कंठु
आवघीया पावकाचा भरीला घोंटु : तेनें यादवरायें ॥ ५६
चरणीं मोडीला गाडा : रीठासुरु फोडीला दाढां[1]
काग उतटुनीं घातला देव्हडा : चांचपुटीं धरुनीयां ॥ ५७
वछासुरु भवंडीला सींगीं धरुनि : केसीया मारीला रागां दाटुनि
धेनुकासुरु मोडीला ताडवनिं : श्रीसारंगधरें ॥ ५८
आघासुरें गीळीलें वछ गोपाळ : तयाचें फोडौनि कळेवर
आपुलें राखिलें सकळ : श्रीकृष्णें पवाडमल्लें ॥ ५९
आणि ब्रह्मयां केला आपमान : जें तेणें वछें नेली हीरुन[1]
तें देवें बहुरुपें धरुन : ब्रह्मा भुलवीला ॥ ६०

आइका कोपौनियां गोकुळावरीं : इंद्र वरुसला सीळां धारीं
तें गोवर्धनु धरीला[१] वामकरीं : राखिलें गौळीयातें ॥ ६१
यापरी राखिलें गोकुळ : आणि इंद्राचें झाडीलें बळ
तें लागौनि देव सकळ : वोळगती श्रीकृष्णातें ॥ ६२
देवें रीगौनि जमुनेचा जळीं : काळीया जिंतला माहाबळी
तो नाथुनि आणीला भुवस्तळीं : तेणे पवाडमल्लें ॥ ६३
मग कोपौनियां मथुरेवरीं : चालीला रावो मुरारी
गजघंटु रीठां[१] मारीला तीरीं : देवें यमुनेचिये ॥ ६४
मग गोपाळीं वेढीली देवांगें : कुबजीके लावन्यें दीधलें श्रीरंगें
पुढें झडकरीं चालीले[१] वेगें : देवो माहाद्वारीं ॥ ६५
तवं कुवलया पीलहाती : बांधौनि दंतासुळ कांती
तो लोटीला माहामंती : श्रीकृष्णावरीं ॥ ६६
तो येतुची धरीला पाइं : उचलुंनि[१] आकासीं भवंडीला[२] पाही
त्राहाटौनि पौळीसीं येकेचि घाइं : सतचुर[३] केला ॥ ६७
तवं चालीले साटि सहश्र मेघळ : जे मदोन्नमत[१] माहाबळ
तयावरीं वाजवीलें मुसळ : बळीभद्र देवें ॥ ६८
मग येउनि धनुससाळें : कोपें धनुस् मोडीलें गोपाळें
तेथ वीभांडीली भडखळें[१] : माहावीरांचि ॥ ६९
चानौर वधीला मुरारी : तो सळु[१] सीसळु[१] बळभद्रें[२] अवधारी
मग धाडी घातली कंसावरी : श्रीयादवरायें ॥ ७०
मग कंसु धरुनियां केसीं : श्रीकृष्णें उपटीला भुमीसिं
कोपें आवेसला हृशीकेसी : क्रोधें मेलाची मारी ॥ ७१
ऐसा वधीला कंसासुरु : वीजया जाला सारंगधरु
देविं केला जये जयेकारु : पुष्पि वरुसताती ॥ ७२

मग भेटला उधवदेवो वीरु : तयाचा देवें धरुनि करु
दृष्टीसीं[१] केला प्रेमाचा[२] संचारु : मग नीगते जाले ॥ ७३
पुढां फोडीली बंदीसाळा : श्रीकृष्णें तोडीलीया सांखळा
वसुदेवा देवकीये गोपाळा : भेटी जाली ॥ ७४
मग तें राज्ये दीधलें उग्रसेना : तवं चालीला जरासंदु रानां
अवघें घेउनीयां सैन्या[०] : तेवीस क्षेवनि ॥ ७५
तेणे येउनि वेढीली मथुरा : तवं कोपु चढला सारंगधारा
तें आवघें सैन्यें वधुनीयां अवधारा : बांधला ध्वजास्तंबेसीं ॥ ७६
ऐसा तो जरासंदु सतरा वेळां : देवें बांधौनीया सोडीला
परी तो नीसांकु[१] दादुला : जो चाले वेळोवेळां ॥ ७७
आणि काळीयेवनाचें भस्म केलें : मचकुंदा मोक्ष दान दीधलें
ऐसे देवाचे वर साच केले : तेणे यादवरायें ॥ ७८
ऐसे बहुत दैत्य वधीले मुरारी : मग तेणें सागरांचा तीरीं
रचवीली[१] द्वारकापुरी : विश्वकर्मयां करवी ॥ ७९
मग कैसी रात्रीमाजि तेणे : नगरी रचीली[१] विश्वकर्मेनें
समस्तें वनें उपवनें : आणि पौळी पागार ॥ ८०
मग तेणे मथुरेचा समस्त : जन नेउनीयां नीद्रीस्त
अवघा घातला द्वारके आंत : निसीये माजी ॥ ८१
आतां तेथें जरा मृत्ये वीवर्जितु : राज्ये करीतांये श्रीआनंतु
वीघ्नें न रीगती द्वारके आंतु : तयासीं काळ आंकना△ ॥ ८२
तया श्रीकृष्णाचें लाहावया[१] सन्येधान : इछीताती सकळै देवतागन
आणि ब्रंह्मादीक देवता[२] सुरगण : रुषी समस्त ॥ ८३
आतां सत्ये जाणा भीमनृपती : श्रीकृष्णा सारीखा दुजा नाहिं क्षीती
मी बोलीला प्राकृता मती : म्हणे कीन्नरु ॥ ८४

ठा. स्थळप्रत
दि: ०७।०५
क्रमांक २८।१७।८५



तो देवो श्रीसारंगपाणी : जरीं यें रुक्मीनीसें प्रेणीं
तरी हेची ये त्रीभुवनिं : दैवाची जाणा ॥ ८५
परी इयेची लक्षणे राया : देखतक्षेवो वोळखिलीं मीयां
हे राणि होइल भीमतनया : आदि पुरुषाचि ॥ ८६
जरी तुज दैव असेल नृपती : तरी कन्या देइ श्रीकृष्ण चक्रवर्ति
मग अद्यापी[1] तुमतें पढती : रुषी पुराणे देखा ॥ ८७
आणि तुमतें वारीती बहुतें मीळौन : तऱ्ही रुक्मीनी प्रणील श्रीकृष्ण
अरीरायांचा तोंडीं खांडें सुन : नेइल भीमकीबाळा ॥ ८८
राया गत भवीष्ये वर्तमान : आणि रुषीसीं त्रीकाळ वर्ते ज्ञान
तेहिं भाषीलें असे पुराण : जे रुक्मीनी हरील श्रीकृष्णु ॥ ८९
जरी तुं सीहाना चतुर जान : तरी चुकवी[1] हा आपमान
रुक्मीनि देउनियां जगजीवन : जोडी सोयरा ॥ ९०
हे मीं पुढील भवीष्ये बोलीला ; तुं हाचि मंत्रु करी वहीला
तवं उचीतीं रायें वारीला : कीन्नर देखा ॥ ९१
ऐसा तो कीन्नरु पक्षीरावो : तेणे वर्निला श्रीकृष्ण देवो
सभे नवरसिं केला वरुषावो : वेधली भीमकुमरी ॥ ९२
ऐसी आइकौनि रुप गुण कीर्ति : रुक्मीनी संतोषली चीत्ति
कंठीचा हारु दीधला उचीतीं : देवी कीन्नरासिं ॥ ९३
तो कीन्नरें घेतला करकमळीं : मग वंदीला नीडळीं
कंठीं घातला माळेतळीं : देवाचीये ॥ ९४
तो हारु आनर्घ्य रत्नांचा जाणँ : मध्यें पदकिं क्षेवनीला चिंतामणि
तो इछीलें देत ततक्षेणिं : मनें चींतीला दावो ॥ ९५
मग कीन्नरु म्हणे भीमकुमरी : तुं होसील उदारा रायाची आंतोरी
तुं उचीता न चुकेसी अवधारी : मज दीधला दावो ॥ ९६

तुझीया हातापुढें : कल्पतरु चिंतामणि बापुडें
कामधेंनुचें फेडी[1] सांकडें : तुं भीमकुमरी ॥ ९७

माये तुंतें वर्नितां उपमां : सरी न पवे महेशाची उमा
कां ते इशाळ माहातमा[1] : तीचीया ठाइं ॥ ९८

सावीत्री ब्रह्मेयांची राणि : जरी तुजसि सरी घालुं रुक्मीणि
तरी ते नव्हे चतुर सीहांनी : तुजपस्ये ॥ ९९

सीता रुपस परी नव्हे सीहांनी : पती आज्ञा भंगीली नेणौनीं
म्हणौनि अपयेस आले टाकौनि : आंगा तीचेया ॥ १००

आणि अहील्या ब्रह्मतनया जान : परी तेही येकि अज्ञान
इंद्रा लागलें लंछन : तीचेंनि योगें ॥ १०१

ऐसीया पतीव्रता बहुता असती : परी सज्ञाना[1] ब्रम्हवीदा[1] नव्हेती[1]
म्हणौनि पावलीया अपकीर्ति : अज्ञान वसें ॥ १०२

जरी आचरों आदरीजे पुण्य : तरी आधि करावें सास्त्र श्रवण
नाहीं तरी अवघें गुरुमुखेंवीण : करणें वायांचि जाये ॥ १०३

जैसें कोसकीटकीया आपणयां भलें : सुख भोगावया मंदीर केलें
तवं तेंचि तया बंधन जालें : मेलें गुंतौनियां[1] ॥ १०४

तैसें पुण्ये म्हणौनि△ जें आचरिजे : तयाचेंची पाप नीफजे
म्हणौनि आधि सास्त्र श्रवण कीजे : मुखें सद्‌गुरुचेंनि ॥ १०५

परी तुं सर्वकुशळ सीहांनी : सज्ञान चतुर माये रुक्मीनी
तुज सारीखि ये त्रीभुवनीं : न देखों नारी ॥ १०६

ऐंसी वर्णिली भीमकुमरी : कीन्नरें नाना उपपती अवधारी
आतां असो हें बहुत वीस्तारु न करी : कवी कृष्णदासा ॥ १०७

**प्रसंग सहावा समाप्त** * (ग्रंथ संख्या ६१५)

श्रीकृष्णार्पणमस्तु

# प्र सं ग सा त वा

श्री परमात्मने नमः

सुक म्हणे परीक्षीता : ऐसी ते वर्णिली वीश्वमाता
कैसें सभा माहात्म[1] सांघीतलें आतां : आइकै भीमकाचें ॥ १

कीन्नरु भीमकातें म्हणे : मीयां सांघीतले पृथवीचे राणे
परी नाहीं वर्णिले तुजकारनें : ते अवस्था असे माझा जीवीं ॥ २

तरी तुझे धर्म गुण : मी आतां करीन वर्णन
तें परीयेसै सावधान : होउनीयां ॥ ३

मग कीन्नरु म्हणे भीमसेना : तु समुद्राचा अवतारु जाना
कां जे लक्षमी उपनली कन्या : तुज लागौनीया ॥ ४

तरी लक्षमी जया कुमरी : तोची दैवाचा ये संसारीं
म्हणौनि रीद्धि सीद्धी रीगालीया घरीं : तुज वोळगावया ॥ ५

तुझें नेणीजे महीमान : सागरापस्ये आगाधपण
आणि आधीक उदार्ये जाण : कल्पतरुपस्ये ॥ ६

तुझें उदार्ये आइकौनि राया : आदि पुरुष येइल मागावेया
लक्षमी देसील पासाया : तु तयालागी ॥ ७

तरी आदि पुरुषु होये[1] मागता : यैसा कवणु असे दाता
म्हणौनि त्रीभुवनिं समर्थता : आइकीजे तुझी भीमा ॥ ८

तळि हात वोडवी मांगता : दातेयाचा वरीं हातु दान देता
म्हणौनि जगीं थोरु दाता : दीसतु असे ॥ ९

परी दातेयापस्ये माझेया मती : मांगता थोरु दीसतांये क्षीती
कां जे दान देउनियां नृपती : पायां लागताती ॥ १०

म्हणौनि मागता थोरु संसारी : जो दान घेउनि कलमक्षा हरी
आणि दातेयासी अवधारी : ने मोक्षपदा ।। ११

आतां असो हें नृपती : तुझीया ठायां येइल कैवल्यपती
लक्षमी देऊनी तयाचा हातीं : पायां लागसी तुं ।। १२

तरी परीयेसै भीमसेना : मीयां बहुती सभा देखिलीया जाना
परी हे सुसभा नृपसेना : तुझी दीसतांये ।। १३

आतां आइकै चक्रवर्ति : त्रीवीधा सभा बोलीलीया असती[०]
देव दैत्य आणि तीसरी क्षीती : मनुष्यांची ।। १४

तरी देवसभे साती रसु सत्ये वचन :
दैत्य सभे रुद्र वीरु भयानक वीभंछ अद्‌भुत कथन
श्रृंगारु हास्ये करुणा : क्षीती मनुष्य सभे ।। १५

आणि येकी सभा असुरा असती : कव्हणीमध्यें रीगों न सकती
देखिलयां भये उपजे चीत्ति : ऐसीया असुरासभा ।। १६

जैसे मदोन्मत्त कुंजर : बहुत मीनले असती अपार
तयांमध्यें रीगालेयां सरीर : उरो न सके ।। १७

कीं मीनलीया बहूता पंचानना : ते येकमेकांचे घेवों पाहाती प्राणा
तयांमध्यें गेलेया जाणा : होये जीवीता हानि[१] ।। १८

कीं आवेळें गेलेयां समसानि : तेथें खावों गीळों करीते उठती भुतेनी[२]
बळी घेतलेयां वांचौनि : तयातें सोडीति ना ।। १९

तैसीया सभा येकी आसुरा : येकी भयानका खेंचरा
आणि येकी मुर्खा अवधारा : परीयेसै राया ।। २०

जे सभे नाहिं वेद शास्त्र पुराण : धर्मु उपनीषेद प्रबंध व्याकरण
ते सभा जाणावें गोठाण[१] : पसु प्राणीयांचें ।। २१

जैसीं पसुवें बैसती वृक्षातळीं : जुंझती खुरीं उधळीती धुळी
खेंटीती झाडें मोडीती डाहाळी : उडवीती गोमासीया ।। २२

तेथें सभापती गोपाळ चांग : भडभडां पाठीवरीं वाजवीती डांग
घालीती हमामा हुंमली मांडीती रंग : शुकावडी धांगड तुतु[1] ॥

आतां असोत या कुसभा जान : सांघैन सुसभेचें महीमान
तें आइक तु सुजाण : आवधाण देउनीया ॥ २४

जे सभे गीत नाद सुस्वर वाद्य : धर्मशास्त्र पुराण व्याकृण प्रबंध
राजा वीवेकी लोक[1] सुबोध : ते सुसभा ॥ २५

जे सभे नाचणि नाटके[1] श्रृतीकार : भागवती बहुरुपी चतुर
वैष्णव पुराणिक संगीतसार : ते सुसभा ॥ २६

जे सभे बंदीजन सुजान : पढते वक्ते वीत्पन
वानीते वाखांनीते सज्ञान : मागधीभाषा ॥ २७

तुडीपाड[1] नोकु बडीवारु आंकने[2] :
छतीसां कुळीयांची ब्रीदावळी वाखाने
भाषा चीत्रें भासा[3] कैंवाड[4] जाने : ऐसे भाट ते सुसभा ॥ २८

ते सोभे° चातुरंग सैन्य : जैसे अमीत वाजती नीसान
तैसे सभेमाजी पढते बंदीजन : ते सुसभा ॥ २९

तैं सोभे कांकण करीं : जै अनर्घ्ये क्षेवनीजेती वरीं
तैसी श्रोतां वक्तां अवधारी : सभा सोभे ॥ ३०

तैं सोभती सरीता सरोवर : जैं भीतरीं जळ भंवते[1] उत्तम[1]तरुवर
तैसे सभेमाजी पढते वक्ते चतुर : तैं सभा सोभे ॥ ३१

जे सभे चौघ वेदवीदु पांच शास्त्रज्ञ : सात सत्येवादी येकु अध्यात्मींनीपुण
ऐसे सतरा सार[1] ते सुसभा जाण : बोलीजे जगीं ॥ ३२

जे सभे संत सुवीज्ञ कवी पुरानीक वीद्वांस :
वैद्य उपाध्ये दीक्षीत अग्नहोत्री तापस
षड्दर्शनवेत्ते मीमांसीक सुरस : ते सुसभा ॥ ३३

तरी तुझीये सभे अवघेचि वेदवीद शास्त्रज्ञ:
आणि अवघे सत्यवादी सुज्ञान
आणि अवघे अध्यात्मीं नीपुन : अज्ञान असतीची[१] ना ॥ ३४

आनि छतीसां राजकुळीयांचीया राजकुमरां :
अवघेयां दीव्ये सींहासनें अवधारा
ऐसे ये सभे पांच शतें नृपवरां : कनकदंडीं वीजयेमान ॥ ३५

आणि शतां[१] सहश्रां रायां : चाउरी पडली असे तयां
पातां देशमुखां मानीयां* : संख्या नाहीं ॥ ३६

सहश्र येक वेदवीदु ब्राह्मण : सहश्र दोनि विद्वांस वीत्पंन
जे ब्रहस्पतीतें हांसती आपण : यैसे बोलीके सतें सात ॥ ३७

तया माजी मी येक पांखिरुं : येथ माझा काइसा बडीवारु
परी तुं* याचकांचा न करीसी अव्हेरु : म्हणौनि रीगु जाला ॥ ३८

यैसी तुझी सुसभा उत्तम सज्ञान : देखिलयां महापातका होय क्षाळण
तयांमध्यें तुं सभापती[१] तुज उपमा कवण : देवों जानें ॥ ३९

तरी आरीखां बोलीं आतां : तुज उपमा देईन नृपनाथा
तें आइकावें श्रोतां : दत्तचीत्त देउनीयां ॥ ४०

भीमा तुं क्षीरसागरु ये सभे[१] माझारी :
वेद जळ सास्त्र तरंग पुराण लहरी
पुर्वोत्तर मीमांसा उभये तीरीं : सदा सत्वाचे भरीते ॥ ४१

नीगम कलोळ आगम उभड सरीसे : चौदा वीद्या आवर्त तर्क वळसे
कीर्ति तुसार दाटले दाही दीसे : त्रैलोक्यामाजी ॥ ४२

तेथें वडवानळ ज्ञानदीपु जान । तेणे सोखिलें तम अज्ञान
प्रकासे बाहये[१] आंतर सोभायमान : उजळलें दीसे ॥ ४३

पुरुषार्थ द्वीपें खंडें वेलाउळें षट्कर्म :
नीत्ये नैमीत्यक काम्ये हेमपर्वत गहन
ब्रह्मवीद्या रत्नखानि चींतामणि प्रमाण : सीद्धांतु आनर्घे रत्नें ।। ४४
तेथ गोत्र सजन परीवार सैन्य : तेची वीचीत्र जळचर मीन
संपती जळीं धाले आनंदपुर्न : सुखें वीचरताती ।। ४५
तेथें द्वैत अद्वैत खोली न कळे थोर : परीणाम वीवर्तु रुंदी न कळे पार
तेथ गुण भाव धर्मांचे तरुवर : फुलले पर–उपकारीं ।। ४६
तेथें उद्यमी सतपात्रें याचक जन : श्रद्धा प्रव्हानेंसीं चालीले आपुन
तया मनोर्थुसीधीचें केणें पुर्न : कुंठलीया येरझारा ।। ४७
तुं सदा सदोदीतु नुचंबळसी कहीं : धर्म नीती मर्यादा लंघनें नाहिं
हृदइं क्षीराब्दी तेंथ सदा लक्षमी नारायेनु पाही : तेनें आगाधु तुं ।।
नातरी[1] कल्पतरु अवधारी : वेद शास्त्र शाखा पुराण पत्रें वरीं
वीद्या पुष्पें प्रमाण फळा भीतरीं : सीधांतु रसु ।। ४९
पुरुषार्थ मुळीं दृढ सबळ : परोपकार छाया अती बहळ
श्रोता△ वीश्रामु सेवीतां पावती फळ : इछेचीं तेथ ।। ५०
आतां आसो हा वीस्तारु अती : कैसी उपमा देइन सभे आणि सभापती
तें आइकौनि न कोपावे संती : सभेमाजी ।। ५१
सभामंडपु हे हेमाची मुद्रीका : मध्यें माणिक सभापती आइका
भवंतीं नवरत्नें तेवी सभेचीया लोका : उपमा साजे ।। ५२
कीं सभामंडपु तो नवरत्नांचा हारु जानै :
मध्यें सभापती जैसा पदकीं चिंतामनी
भवंतीं आनर्घे रत्नें तेवी जानै : सभेचे लोक ।। ५३
ना तो सभामंडपु तेची कासी : वीश्वेश्वरु म्हणो सभापतीसीं
भवंती तीर्थें तेवी सभेचीया जनांसीं : उपमा साजे ।। ५४

कीं सभामंडपु तेचि गोदावरी : मध्यें त्रेंबकु सभापती अवधारी
भोवंतीं सर्व तीर्थें तेवी सभे माझारीं : जन सोभताती ॥ ५५

कीं सभामंडपु ते वसुंधरा परीकर :
सभापती मेरु मानीये मंडळीक गीरीवर
खंडें द्वीपें देशमुख माहाजन सागर : पाटील देस प्रजा ग्राम नगर ॥ ५६

ना ना सभामंडपु तें नंदनवन : सभापती कल्पतरु मंत्री चंदन[1] जाण
भवंते सुरतरु तेवी सकळ जन : याचक पक्षीकुळें ॥ ५७

कीं सभामंडपु तें गगनमंडळ : मध्यें सुर्यो सभापती केवळ
भवंतीं सहश्र कीर्नें तेवी जन सकळ : सभे सोभताती ॥ ५८

कीं सभामंडपु तें अष्टभोगांचें गगन : सभापती पुर्णचंद्र मंत्री शुक्र जान
पढते वक्ते ब्रह्स्पती सज्ञान : जन तारांगनें ॥ ५९

कीं सभामंडपु तेचि अमरावती : इंद्र तोचि सभापती
भवंते तेतीस कोडी देव तेवी मीरवती : सभेचे लोक ॥ ६०

कीं सभामंडपु तो सत्यलोकु जाण : सभापती चतुराननु आपुण
भवंते सनकादीक तेवी सभेचे जन : मीरवताती ॥ ६१

कीं सभामंडपु तो कैळासु : सभापती म्हणों महेसु
भवंते गण तयापस्ये हा लोकु[1] रुपसु : मीरवी तो सभेमाजी ॥

कीं सभामंडपु तेंची वैकुंठभुवन : सभापती वीस्नु आपुण
भवंते देव सुरगण : तेवी सभेचे लोक ॥ ६३

कीं सभामंडपु तो क्षीरसागरु जान :
सभापती नारायणु सेसु तेंची सींहासन
भवंते नर सुर पन्नग रुसीगन : तेवी सभेचे लोक ॥ ६४

ऐसी मीयां सभेसीं दीधली उपमा : परी येकीही न ये माझीया मना
येथ येकु येकु अवगुण जाना : येक येका असती ॥ ६५

सर्व तीर्थें जडें न बोलती कांहीं :
आणि पाषाणाचिया मुर्ति तया वाचा नाहीं
हे चालती बोलती सभा पाही : म्हणौनि तेहीं न घडे ॥ ६६

नवरत्नें चींतामनि मुख्ये पाषाण : कल्पतरु झाड सुरतरु काष्टें जान
म्हणौनि ते ही उपमा सान[1] : हे सभा पाहुनियां ॥ ६७

मेरु मुख्ये पर्वतु आवघे जड : समुद्र क्षार जळ नव्हे गोड
म्हणौनि ते ही उपमां नव्हे धड : सभा पाहुनी ॥ ६८

इंद्रा आंगीं पडलीं भगें : आणि चंद्रा कळंकु देखिजतांये जगें
सुर्यो पोळे सर्वांगें : म्हणौनि हे ही उपमा ना ॥ ६९

ब्रह्मा म्हणों नीतमंतु गाढा : परी तो कामातुरु धावे सारजा पळे पुढां
यैसी रीगौनी श्वपचवाडा : राखिलें आपणयातें ॥ ७०

माहादेवो तवं तमाची रासी : तमें तपतु परीवारु तयापासीं
आणि हे सभा सत्वगुणें अतीसयेसीं : नीरुपम ॥ ७१

वीष्णु वैकुंठीचा राणा : तेथौनि वैखरी कुंठली जाणा
आणि वैखरीयेवीण वेदां पुराणां : महीमा कैंची ॥ ७२

आणि नारायणु शयनस्थितु△ : सदा शेषाचा अरुवारीं नीद्रीस्तु
ऐसा नीश्चळु असे वर्ततु : तो चालता नव्हे ॥ ७३

म्हणौनिया अवघेयापस्ये अती : मनुष्य सभा उतम क्षीती
ते आजी तुझा ठाइं नृपती : देखिली मीया ॥ ७४

ऐसा मी हींडींनला त्रीभुवन : बहुत राये देखिले जाण
परी हे तुझे न देखों गुण : कवणि ठाइं ॥ ७५

तुतें देखौनि भीमसेना : संतोसु जाला माझेया मना
आतां असो हे वर्णना : कीती बोलों ॥ ७६

मग आळउनि ळळीत : म्हणे सकळां क्षेम हो सुख श्वस्त
हे सभा * सभापती हो चीरंजीवीत△ : जवं तपती शशि भानु ॥

ऐसा वाखांनीला भीमकु रावो : भाटें करु उभारुनि केला ब्रह्मांवो
मग आसनिं बैसला कीन्नरु देवो : रायें म्हणतीलें पुरे ॥ ७८

जो पदकीं होता चिंतामणी : तो हारु करीं घेतला रुक्मीणी
उचीतां दीधला ततक्षेणी : देवी कीन्नरासीं ॥ ७९

आतां सोडश उपचारीं राजा : स्वहस्तीं कीन्नरासि केली पुजा
त्याचिपरी पुजीला वोजा : भाटु कल्याण कीर्ति ॥ ८०

साटि कनकांचे परीयेळ अवधारीं : भरुनीं लेंनि लुगडीं दीव्ये अळंकारीं
तें लावीलें भाटाचा करीं : बहुतें मानें ॥ ८१

आणिकही बंदीजन वीप्र बैकार : पढते वक्ते कळावंत साने थोर
ते आवघे रायें केले आभर[१] : दीव्याळंकारीं ॥ ८२

सभे केली सुवर्नाची रासी : घ्या* म्हनीतलें जें उचले ज्यासि
ऐसी सेल समस्तांसीं : दीधली रायें ॥ ८३

असो हें सभेमाजी तेथ : पडलें रायां मंडळीकांचे उचीत
तयासीं संख्या गणीत : कवण करी ॥ ८४

जया रुक्मीयासि देतां पृथवी थोडी :
तो भाटासि नेदीची फुटकी कवडी
राये द्रव्याचीया कोडी : वर्षताती ॥ ८५

रायें येक लक्ष येक वर्ण श्वेत घोडे : आणौनि सपलानि उभे केले पुढें
आणि गुढरौनि चौदंत चोखडे : आणिले सहश्र दाहा ॥ ८६

आणि चौदा सहश्र रथ : दीव्यांभरणीं भरौनियां समस्त
आणौनि उभे केले त्वरीत : तेजीयां[१] सहीत[१] ॥ ८७

आणि सुवर्ण भरौनियां उष्ठर : आणिले देखा बारा सहश्र
हे आवघे पाठवीले जेथें होतें बीढार : कल्याण कीर्तिचें ॥ ८८

राये जींतले होते बहुत : तयाचे देस दीधले समस्त
आणि खंडलेंन[1] मीयाडा[2] सहीत : दीधलें धुळी झाडवना ॥ ८९

आनि बहुतें आदरें : पाहुनरु पाठवीला नृपवरें
तें सांघतां वीस्तारें : ग्रंथु आवरेना ॥ ९०

ऐसें सन्मानें बहुतें : तोखवीलें भाटातें
असो हें नीगतां तेथें : कैसें बोलीला रावो ॥ ९१

रावो म्हणे भाटासी : हें तुळसी पत्र दीधलें तुम्हासी
तुमची पाठवणी असे आम्हांपासीं : ते नीगतां पाहीजे ॥ ९२

भाट म्हने रायातें : माझा मनोर्थु दडपला तुझेनि दत्तें[1]
हे हात न चलती मागुते : आणिकातें मागावया ॥ ९३

आसो हें नीगाले बंदीजन : नीगतां रायें केलें आनुवर्जन
ऐसे मागतेंसि[1] सन्मान : देवोंचि जाणे ॥ ९४

मग जाउनि मेळीकारीं : भाटें कीन्नरु पुजीला वीचीत्रांपरीं
बहुतें सन्मानें आदरीं : तोखवीला ॥ ९५

बहुतें अस्तुती स्तवन : बंदीजनें केलें आपुन
मग कैसें बोलीला वचन : कीन्नर देवो ॥ ९६

कीन्नरु म्हणे भाटा लागौनि : आपुण येथ असों जवं ये श्रीचक्रपानि
तो हे प्रणील रुक्मीनी : हे सत्ये जाना ॥ ९७

ये अंबीके देवीचे भुवनीं : श्रीकृष्णासीं माळ घालील रुक्मीनी
तइं आमचीया शापासि होइल धुनी : फीटैल कीन्नर कवच ॥ ९८

मग दोघै जन हरुसेसीं : उभये वर्ग जावों कासीयेसीं
भेटों कासेश्वरा रायासि : आणि कुटुंबा तुझेया ॥ ९९

तवं बंदीजनु म्हणें श्रीगुरु : मी तुझेनि प्रसादें जालो थोरु
तुझा सब्द नव्हेरुं : श्रीगुरुराया ॥ १००

ऐसें येकमेकां मानलें : मग सुख श्वस्ती राहीले
आतां भीमकें कैसें वीचारीलें : ते सांघै कवी कृष्णदासा ॥ १०१

**प्रसंग सातवा समाप्त** * (ग्रंथसंख्या ७१६)

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

## प्रसंग आठवा

श्रीपरमात्मने नमः

सभे बोलती जन समस्त : म्हणे हें पांखिरुं नव्हे नीभ्रांत
स्वयें शेषचि आला येथ : वर्णविया देवातें ॥ १

कीं हा देवगुरु ब्रहस्पती : कीं हा चतुराननु होये सती
येऱ्हवी पांखिरुवांसीं वीत्पती : यैसी कैंची ॥ २

ऐसें आइकतां श्रीकृष्णाचे स्तुती स्तवन :
सभेमाजी आनंदु वोसंडतांये जान
परी रुक्मीया आंगीं परश्री[1]ज्वराचें[2] वेसन[3] : पेटत आसे ॥ ३

जैंसा चंद्र उदैलेयां पुर्ण तीथी : सोमकांतु सप्रेमें द्रवती
आनि चुनखडे धडधडां फुटती : जळती चंद्रामृतें ॥ ४

तैसें रुक्मीयासि जाले सभे : डोळांहुनी जाळ[1] सांडीतो[2] क्षोभें[3]
तो भुमीची वास पाहतांये दंभे : न पाहे कव्हणीकडे[4] ॥ ५

## प्रसंग आठवा

असो हें रावो सुमती प्रधानातें म्हणे :
आतां न लगती आणिक राये पाहाणे
तो श्रीकृष्णचि वरु[1] करणे[1] : भीमकीयेसी ॥ ६

आतां द्वारावतीये जाइ प्रधाना : वीनवावा तो श्रीकृष्णराना
म्हनावें जी अंगीकरावी कन्या : भीमकाची ॥ ७

आम्ही देउनि वीनवणी : वरीं तु सीहांना बहुते[1] गुणी
श्रीकृष्ण आंगीकरी रुक्मीणी : तें करावें तुवां ॥ ८

तवं बोले प्रधान सुमती : नीकें वीचारीलें नृपती
सोइरा होये श्रीकृष्ण चक्रवर्ति : तरी दैवां दैव ॥ ९

तवं सुबुधी प्रधान बोले दुसरा : जी सोयेरीक कीजे सारंगधरा
तरी राया हेळामात्रें तरा : संसारु हा ॥ १०

तीसरा बोले सतकीर्ति : जरी सोयरा होये यदुपती
तरी त्रीभुवनीं कीर्ति : तुमची पढतील देवो ॥ ११

चौथा बोले बुधीसींधु : जरी सोयेरा होये गोवींदु
तरी उभये वर्गा आनंदु : होये राया ॥ १२

सभे बोलती राये राजकुमर : जरी सोयेरे होती यादव वीर
तरी तुमचें भाग्ये थोर : भीमसेना ॥ १३

ऐसें आलें अवघेयांचा चित्ति : रायें लीहीली वीनती
उभा केला प्रधान सुमती : तवं हांसीला[1] रुक्मीया ॥ १४

रुक्मीया भीमकातें म्हणे : तुम्हीं भले सज्ञान सीहाने
परी आदि अंतु नाहीं पाहाणे : भलतयाचा ॥ १५

हें आधींचि भाट म्हणीजे वोस : आणि लटीकें बोले बहुवस
तयाचे बोलणे सांच : केवी मानीजे ॥ १६

वरी हें पांखिरुं भकाळाचें भकाळ : भलतेंची बोले बरळ
आमचें तेव्हांची उठीलें कपाळ : परी उगेची राहीलों ॥ १७

भाटातें बोलतां वारीजे सभ : तरी पोटीं सुरी[१] शस्त्रें घालीती क्षोभें
आणि अपकीर्ति बोलतां सभे[२] : कांटाळा न ये ॥ १८

म्हणौनि बीहीजे या बंदीजना : भलतेंची बोलती जाना
जे न मीळे वेदां पुराणां : तेंची भाषीती ॥ १९

आणी हा वेदघोषु रंभेनें शापीला : तैं लागौनि मतीभ्रष्ट जाला
तेथौनि याचिया बोला : कव्हनी पातायेना[१] ॥ २०

वरीं हा आधींची[१] जीभटु : आणि भलतेंची बोले धीटु
आम्हां तेव्हांचि आला वीटु : परी उगेचि राहीलों ॥ २१

राया रंग मोडैल म्हणौनि : आम्हीं उगेचि राहीलों दांत चाउनी
येऱ्हवीं नींदा आइकीजे कानीं : हें कांइ नीके ॥ २२

तुम्हीं नेणा तो कौसाल्येचा[१] कृष्ण :
हा कीन्नरु तेणेचि पाठविला आसैल* सीकउन
जें तुमचा हृदइं भये घालौन : प्रणावी भीमकी बाळा ॥ २३

जरी कीन्नराचेनि बोलें संबंधु करणे : तरी तुम्हां हांसती सकळै राणे[१]
म्हनती कन्या दीधली कृष्णा कारणे : भीमकें घरा जाउनीयां ॥ २४

ऐसें जगीं होइल बोलणे : आणि अद्यापी पढती पुराणे
मग नाहिं ये संसारीं राहाणें : या लोकांमाजी ॥ २५

आणि तया कृष्णासी जाती ना कुळ : पाहातां ठावो ना मुळ
तयासी चोजवीताती देवो सकळ : परी ठाइं न पडे ॥ २६

तो जाती कुळा वेगळा : आणी नाहिं कवणापासौनि जाला
अवचीतां उमटला : नंदाचा घरीं ॥ २७

सवेंचि म्हनती येसोदे नंदाचा : सवेंचि म्हनती वसुदेव देवकीचा
परी हा काहींचि नव्हे कवणाचा : मज पातां ॥ २८

आणि हा दस अवतारा आंतु : यैसें बोले तो भ्रांतु
हा दाही वेगळा नीभ्रांतु : यैसें शृती बोलती ॥ २९
तयातें वेद सास्त्रें नेणती : तया कृष्णाचा वर्ण आणी व्येक्ती
आणि तयातें मनुष्यें भावें भावीती : ते ही भ्रांत देखा ॥ ३०
तयाचा ठाइं सकळ वीद्या असती :
आणि तेणे मंत्रा आधीन केलीया शक्ती
म्हणौनियां त्रीभुवना वेधवंती : तयाचिया[1] नामाची[1] ॥ ३१
यैसी तो आवघीं कुजांतरें जाणे : म्हणौनि सकळै वेधीली तेणे
ये धांवताती रुषी मुनी जने : अष्टभोग सांडुनियां ॥ ३२
आणिक येक नवल जाणा : सांडौनि धन पुत्र आंगना
कैसे रुषीचि[1] रीगाले वना : ऐसा वेधकु तो ॥ ३३
कैसें तया कुजांत्राचें सामर्थ्य : जे देखिलेया पुरुष[1] इछीत[1] स्त्रीत्व*
तया नारी△ वेधती हें वीस्मित : काइ सांघो ॥ ३४
आणि तया कृष्णाची जया उपजे चाड : तया आणिक न लगे गोड
लटकें तरी या घालुं होड : पुसों ब्रह्मवीदांतें ॥ ३५
तो सकळांची आणि वीकृती : आपुलीची उपजवी प्रीती
म्हणौनिया पुरुषचि धांवती : न[1] देखौणियां ॥ ३६
मा भेटलेयां काई करील तें नेणें : दृष्टीं फेडील[1] अवीद्येचें ठाणें
अनुसरलेयां आपणयांतें[2] देणें : आन बोलोंचि न ये ॥ ३७
आणि तयाचेनी गुणें जे वर्तती : तयासी वीषइं गोडी नाहीं प्रीती
अखंड तोचि संचरे चीतिं : हृदइं आन न रीगे ॥ ३८
राया ऐसेया कौसाल्ये मल्ला : केवी देइजे भीमकी बाळा
कृष्णा वांचौनि येरां सकळां : गोता मुचैल ॥ ३९

राया तो आकुळ जाणौनियां पैं : कव्हणी न करी आपुला जांवाइ
तयासि बळीया कन्या द्यावी काइ : हे नीकें सीहानेपण ॥ ४०
राया तुम्ही नीके सीहांनें जाण : जरी कृष्णेसीं करुं पाहातां संनिधान
तरी तुमचें जाइल माणुसपण : आणि तुटैल संसारु हा ॥ ४१
आणि सीहाना म्हणों तरी गोवळा : रुपें तरी काळा नीळा
गौळणी येकी मेली तरळा : तीतें पुतना म्हणती ॥ ४२
खातां दधीभातु गुंतला गळां : तेणें आपसेयांचि मेला काउळा
आणि बकाचा मोडीला गळा : तयातें म्हणती बकु ॥ ४३
गाडा येकु मोडीला जुनटु : तरी म्हनती येणे मारीला ± संकटु
रुख मोडीलें तरी म्हणती हा धीटु : येनें मोडीले येमळार्जुन ॥ ४४
मेलें गोकुळीचें वासरुं : तयातें म्हणती वछासुरु
दाटौनि मारीलें येक सींगरुं : तयातें केशीया म्हणती ॥ ४५
आपसया वणवा वीझाला : तरी म्हणती येणें वन्हि गीळीला
अजगरु येकु मारीला : तयातें म्हणती आघासुरु[१] ॥ ४६
यमुनेचा वीरुळा मारिला : तरी म्हणती येणें काळीया नाथीला
ऐसा गौळीं सब्दीं शब्द वाढवीला : तेणें चढलें बीक ॥ ४७
मामां मारुनि पढवी ब्रीदें : तवं भवंडीला जरासंदें
मग समुद्र वसवीला गोविंदें : राखिलें आपणयातें ॥ ४८
ऐसें तयाचें दादुलेंपण : जरी तयासीं कराल सौजन्य
तरी पाणि घातलें जाण : तुम्ही या संसारासी ॥ ४९
आतां राया आन मनि[२] वीचारी : दमघोषुसुत अवधारी
तो सीसुपाळु ये कुमरी : वरु कीजे ॥ ५०
"रुपें सळें प्रतापु आणीक बळें : कवण सिसुपाळापस्ये आगळें
तेयासि मानितातिं अवधीं राजकुळें : तो सोयेरा कीजे ॥ ५१

ऐसा वर्णिला बहुती परी : तो मी वीस्तारु न करी
कां जे देवाचा वैरी : म्हनोनिया ॥ ५२

ऐसें रुक्मीयें बहुतीं परीं जाणा : आणिलें भीमकाचीया मनां
जैसें तर्क वीर्तकिलें जाणा : वेदश्रृतीतें ५३

कीं जैसा उदो जालेयां भास्करु : धुइं आड रीगौनि पाडी आंधीकारु
तैसा लोंपौनि श्रीकृष्ण आनंद दीनकरु:
दावीलें चैंदद्या खदद्योतातें ॥ ५४

कीं जैसा येकाधा धन[1] परतें सारी : आणि वीवसी नेउनी घाली घरीं
तैसें तेणें रुक्मीयें केलें अवधारी : नीदैंवें दैवहृतें ॥ ५५

कीं येकाधा कल्पतरु मोडुनी : तेथें धोतरा लावी[1]आणौनि
तैसें रुक्मीयें बैसवीलें मनीं : भीमकाचा ॥ ५६

कीं जैसा पतंगु दीप दवडी : आणि आपणयांतें जीवें धाडी
आणि घरचीयां घाली सांकडी : अंधकाराचीये ॥ ५७

तैसें तेणें रुक्मीयें केलें : बहुतां भवंतें कांतीलें
सीशुपाळा आपयेस आणीलें : आपणयां सकट ॥ ५८

तो रुक्मीया वडील पुत्र म्हणौनि : भीमकु भीडांचि वचन मानि
परी ते सभे कवणांचा मनीं : बैसेचि ना ॥ ५९

असो हें सीशुपाळ मानवीला चीत्तीं : भीडांची हो म्हणीतला नृपती
तें जाणौनि सकल जनां वर्तिली खंती :
म्हणती कुडें केलें कुमरें ॥ ६०

म्हणती सांडौनि अमृताचा गळाळा* ·
हा भौमकु मुख पसरीतो हळाहळा
हे भौमकी लावण्यें मुक्तांची माळा : केवी चैंद्या मर्कटासीं ॥ ६१

केवी वृषभा पांखरा : कीं श्वाना आंगीया सपुरा
कीं सेजे पुश्वांचे आरळ सोरा : केवी कीजे ॥ ६२
कीं मर्कटा मुक्तांचे हार कंठीं : कीं जंबुख षटुरस वाढीजेती ताटीं
कीं रुद्राक्षांची जपमाळा गांठी : हातीं वेश्येचीया * ॥ ६३
कीं चंदनें उटी उष्टरा : कीं सींहासण घालीजे खरा
कीं सकर्पुरें वीडा अवधारा : महीषा दीजे ॥ ६४
असो हें सभे बोलती ज्ञानिये जन : हा रुक्मीया पावैल आपमान
आणि रुक्मीनी साधैल सन्निधान : श्रीकृष्ण यादवरावो ॥ ६५
ऐसा सीशुपाळ मानला अवधारी : मग बोलाउनि रत्नसेकरु भांडारी
तो आणुं पाठवीला झडकरी : देसा चैद्याचिया ॥ ६६
सवें दीधलें चातुरंग सैन्य : छत्रें श्रीगीरी नीसान[1]
असो हें नगर ठाकीलें जान : राया चैद्याचें ॥ ६७
तो भेटला दमघोषा नृपनाथा :
म्हणे शीसुपाळु नोवरा आला भीमकाचीया चीत्ता
तरी वेगीं चालावें नृपनाथा : आपुलीये आइतीसीं ॥ ६८
तेणें रायासीं सुख जालें मानसीं : सीशुपाळा बहुत संतोसु परीयेसी
मग मुळें पाठवीलीं देसों देसीं : इष्ट सोयरेयां ॥ ६९
असो हें येरीकडे भीम चक्रवती : वन्हाडीकेची केली आइती
मुळें पाठवीलीं भावें प्रीती : सखेयां[1] सोहोदरासीं[2] ॥ ७०
यैसा सीशुपाळु वरु मानला : रुक्मीयासि बहुत संतोसु जाला
तवं कैसा रुक्मीनी वीरोहो[1] उपनला : तो सांघै कवीकृष्णदासा ॥ ७१

**प्रसंग आठवा समाप्त** * (ग्रंथ संख्या ७८७)

श्रीकृष्णार्पणमस्तु

# प्र संग न व वा

श्री परमात्मने नमः

ऐसा सीशुपाळु वरु आइकौनि : वीरहो उपंनला रुक्मीनि
तो मी आतां सांघैन प्राकृता वाणि . तुम्ही न लवावी संका[१] ॥ १

कैसा रुक्मीयां शब्दबाणें : खडतरला अती तीक्षणें
लोटली देखा संधानें : भीमकीबाळा ॥ २

तवं हृदइं संचरला तो मुरारी : म्हणौनि सांवरीलें त्या सुंदरी
परीं अवस्ता देखा जीव्हारी : भेदली बाळे ॥ ३

सीशुपाळु वरु आइकौनि रुक्मीनी : वीकळ गेली अंतःक्रनी
तवं फोडी लागली म्हणौनी : रायें सांवरीली ॥ ४

रायें नेत्र सींपीले कपुरोदकें : कुरुळे सरीसीं केलीं नखें
मग डोली आणवीली भीमकें : देवी रुक्मीनि लागी ॥ ५

चांचरीं जातां उठीली सुंदरी : आंगीं वीरहोज्वरु भारी
मग सखियेचा करु धरी : चाले कंपीतु ॥ ६

चालतां पदें पडताती बेंबळें : सद्गदीतु वाचा आणि सान बोले
स्वेदु आला तेणे भरला कंठु कपोळें : जाली दृष्टी वीव्हळ ॥ ७

तवं सखिया म्हणती हळु हळु माये : हे आवचीतें जाले वो काये
येकी म्हणती फोडी लागली आहे : कां वो उगेया[१] नसा ॥ ८

ऐसी डोलीये वाउनि नेली मंदिरी* : तवं आंगीं ज्वरु आला असे भारी
तेनें पोळौनिया भानु अंबरीं : अस्ताचळासि रीगे ॥ ९

काढौनि सतपत्रांची पांती : पलकीं आरुवारावरीं घालीती
सखिया तेथ नीजवीती : भीमतनयेसि ॥ १०

आणौनि कर्पुर चंदन कस्तुरी वीणा : तेणे सर्वांगीं करीताती[1] मर्दना
येणें ज्वरु आधीकु दुणा : चढतु असे ॥ ११

हिवोदक भरौनि हेमकळसिं : सुध बावनें परतुनि तेणेसीं
सींपताती भीमतनयेसी : नारी कळावीदा ॥ १२

जातीकळिकांचे वीजने घेऊनी करीं :
तीया वींजणवारे घालीतातीसुंदरी
वरीं सींपीताती चंदनाचा तुषारीं : भीमतनया ॥ १३

परतुनीयां[1] कर्पुरपुळीका : आणि हरीचंदनाचिया कुस्मकळीका
मुक्ताफळांचे पाणि काढुनि आइका : लेपु करीताती ॥ १४

तेणें आधीका धडाडी सुटली कैसी : ज्वरु पेटला आठां आंगासीं
सखिया पोळती हातासीं : लेपु करीतां ॥ १५

अरळ करपलें अरुवारावरीं : कैसी तळमळीतांये सुंदरी
जैसा मीनु जीवना बाहीरीं : घातला असे ॥ १६

कैसी तापें तापलीं अळंकरणें : हातांचि[1] गळताती कांकणें
काळें जालें ठीकांचें लेणें : रत्नजोती मावळलीया ॥ १७

कैसा ज्वरु तपतो भारी : मोतीये फुटताति आंगावरी
वीरहो उपचारु भीमकुमरी : होववेना ॥ १८

मग सखियां पडलें सांकडें : टकमका पाहाती[1] येकीमेकी कडे
म्हणती आतां अवघड गाढें : मांडलें माये ॥ १९

तवं हीमावती म्हणे कामीनि : हीमग्रह कामवा वो झडकरौनि
तेथ नेउनि घाला हे रुक्मीनी : तरी जाइल ज्वरु ॥ २०

तवं बोले प्रबोधावती सखि स्नेहाळु : म्हणे तें कामवीतां लागैल वेळु
तवं जरी इयेचा आंगीं असैल जाळु : तरी श्रमैल हे ॥ २१

तवं बोले उन्मिषा चातुरी : म्हणे वीश्वकर्मा बोलावा वो झडकरी
तेणें द्वारका रचीली नीसीये माझारीं : तयासीं क्षेणु न लगे ॥२२

मग वीश्वकर्मा बोलाउनि : नीरोपु दीधला सखिजनीं
तेणें हीमग्रह रचीलें ततक्षेणीं : तें कैसें सांघें ॥ २३

गारा पडलीया होतीया अवकाळीं : त्या हीवें बंधा जालीया हींवाचळीं
तेची सुध सोमकांतु झलकती कीळीं : तयाचें मंदीर केलें ॥ २४

तें सैंभ कामवीलें कैसें : तळ भीती खांब± हीरंगणां सरीसें
पुतळीया मीरवती अनायेसें : मदळसा महुटीयासीं ॥ २५

पटीसाळा लेपें कळस झळकती : ऐसें कामावीलें अती नीगुती
क्षेणामाजि घेउनि आला उचीतीं : रुक्मीनि देवीसीं ॥ २६

तेथें कापुर वावी होती भीतरीं : तें तेणें माडीलें तीयेवरीं
मग सखि आणीलें भीमकुमरी : तया हीमग्रहासीं ॥ २७

येक्षदंडाची करुनि डोली : ते वीणली सुक्षमसुतीं मृणाळीं
वरीं दाट थरु घातलीं कुस्मकळीं : पार्यातकांचीं ॥ २८

दाटें मांदारें थरोवरीं : गुंफौनि पंजरु केला वरीं
भवंतें झळंबुके सोडवीले अवधारी : रातोत्पळांचे ॥ २९

तीये डोलीये वाउनि भीमकुमरी : सखि आनीली हींवाचा मंदीरीं
तेथची रचना कळाकुसरी : वर्नु कवन जाणे ॥ ३०

तें कैसें हींवग्रह सुसीतळ : तेथें अग्नीचें नीमालें बळ
म्हणौनि रत्नदीप केवळ : तेथें उजळीले ॥ ३१

तया हींवग्रहा भेन : वीद्युलता वसवीलें गगन
तीया[1] अद्यापी वाजताती दसन : तो गर्जु म्हनीजतांये ॥ ३२

तया हींवग्रहाचा भेदारा : लागला देखा भास्करा
तो मेरु आड रीगौनि अवधारा : राहीला उदयाचळेसीं ॥ ३३

आणि आझुनी उगवतां पुर्व दीसे : अद्यापी थरथरां कांपतु असे
म्हणें झनी तें हींवग्रह अनायेसें : आंगां आदळें ॥ ३४
तेथें पारीयातकाचा वोवरा भीतरीं : भवंते रातोत्पळें रचीली कुसरीं
हरीचंदनाची पालवी समहुरी : तेया सेइलावरी ॥ ३५
कर्पुर कस्तुरी हरीचंदन : हींवावतीयेचेनि जळें* प्रतौन
तयाचा भीतरीं सडा घालौन : वरीं रागौळी[१] मुक्ताफळांची ॥ ३६
तेथची कळाकुसरी सांगतां : तरी बहुत वीस्तारैल कथा
जेथें वीश्वकर्मा वीदानें[१] रचीता : तें वर्णु कवन जाणे ॥ ३७
तेथें भीतरीं सोमकांताचा माचा : पाट सुतें वीनीला कुसरीचा
परागाचें आरुवार म्हणाळ सुतांचा : पासवडा वरीं ॥ ३८
देठ फेडौनियां नीगुती : आणिली पारयातकाची पाती
तया आरळावरीं नीजवीती : भीमतनया ॥ ३९
वरी हांसीरु त्राहाटीले : रत्नांचे दीप लावीले
मग सखियें उपचारु मांडीले : नाना परी ॥ ४०
उदये भास्करु हरीचंदन : कस्तुरी नीकरा मेळउन
चंद्रीचें* आमृत आणौन : कर्दमु केला ॥ ४१
तयाचें करीताती वीलेंपन : सखिया भीमकुमरीसीं जान
येकीं अमृताचें सींपन : करीताती ॥ ४२
गुंफुनि कल्पतरुचिया कळीका : तो करीं वींजणा घउनि नेटका
तेणें वायो घालीताती नायेका : रुक्मीनी देवीसीं ॥ ४३
खांबों खांबीचीया पुतळीया : तयाचे करीं रत्नांचे धोटे चीपुळीया[१]
तीया सत्रावींचेनि जळें भरीलीया : तेंथें धारा सुटताती ॥ ४४
तेथें धारे धार नेहटे[१] कैसी : मग सांन तुसारु फुटे परीयेसी[२]
ते तुसार पडती भीमतनयेसीं : आंगावरीं ॥ ४५

तेनें उपचारें वीरहज्वरु : नीऱ्हां[1] प्रजळला[1] देखा थोरु
जैसा घृतें सींपीला वैश्वांनरु : तेवी जाना ॥ ४६
कैसें ते भीमकीचेनि तापें गाढें : हीमग्रह आवघेंचि उकडे
तेथची वाफ गगनमंडळासीं चढे : तेनें आकास काजळैलें ॥ ४७
भीमकीचेनि संतापें जानै : हींवग्रह वोडवलें जैसा पंचग्नी[1]
आवघीं कुस्में कुमुदें करपौनी : पळवा जालीं ॥ ४८
तापें अळंकृनें गळालीं भीमकुमरी : रत्नें फुटताती वरीं[1]
वीडीया करपताती अवधारी : बोटीं धरीत क्षेवो ॥ ४९
कैसी चटपट सुटली गाढी : आंग टाकीतांये देव्हडी
मग सखियां पडली सांकडी : तये[1]वेळीं ॥ ५०
तवं तीया सखिया मानसीं : धाकींनलीया अतीसयेंसीं
म्हणती आतां वीपायें भीमकीयेसीं : जीवीत्त जाणा ॥ ५१
तवं म्हणे सोमयेक्षीनी : चंद्र आला वो मध्ये[1] गगनीं ॥
तेथ चाला चांदीने[2] नेवों रुक्मीनी : नीववीती चंद्रकळा ॥ ५२
मग आनिली रायांगनां : माचयावरीं नीजवीली रुक्मीनी जाना
तवं पुर्नबींब अमीता कीर्नां : नभीं[1] मीरवत असे ॥ ५३
जैसें गगन इंद्रनीळांचा ताटीं : चंद्रामृताचि वोगरीली वोनेंवाटी
भवंतीं सीतें वीखुरलीं गोमटीं : तैसीं तारागनें ॥ ५४
ना ना कीं तें चकोरां करावया पारनें : इंद्रें पाठवीलें आमृताचें बोनें
तैसें चंद्रबींब आमीता कीर्नें : गगनीं मीरवीतांयें ॥ ५५
जालीं पारनीं चकोरे आनंदले : आनि भुतग्रामां वीश्रामु जाले
अष्ट भोगेसीं कामीनले : वीळासीये ॥ ५६
सुर्येकांत नीवालें चंद्रामृतीं : सोमकांत सप्रेमें द्रवती
पौळीचीया पुतळीया अमृत श्रवती : चंद्रकांताचीया[1] ॥ ५७

कैंसें तें पुर्नबींब सोहज्वळ : अती सुध[1] केवळ उज्वळ[2]
दाही दीसा कोंदले कळाकीळ : सोभताती ॥ ५८
ना ना तें नव्हे चंद्रमंडळ : कीं तो आमृताचा आरीसा उजळला केवळ
मध्यें कळंकु नव्हे ते श्रीकृष्णमूर्ति स्यामळ : प्रतीबींबली ॥ ५९
कीं तें नीववावया भीमकी बाळा : श्रीकृष्णें अंगीकारीलीया चंद्रकळा
आमृत वरीषों आला मेघ सांवळा : मीसें चंद्राचेनि ॥ ६०
कीं तो तापलेयां जीवांवरीं आनंदघनु : गगनीं ओळला* जगजीवनु
भक्तांचे खेद न साहे म्हणौन : वरुषे आमृतधारीं ६१
ऐसें चांदनें सोभे सुहांवे : आनिकही उपचार वरवे
सखि मांडीले सद्भावें : देवीलागी ॥ ६२
आणौनि नंदन[1]वनीचीया कोकीळा :
तयांकरवी वसंतु आळवीती सांनीयां कीळा
म्हणे आतां लागैल डोळा : ये भीमकीयेचा[2] ॥ ६३
साळेयां करवी गाववीती : मुरारीचीं चरीत्रें नीगुतीं
मयोरां करवी नृत्ये करवीती : वीद्याधरी तीया ॥ ६४
श्रृतीकार काहाळीये मधुकर : चक्रवाक केले तोंडें ताळधर
मुखें मृदांग वाती[1] चतुर[1] चकोर : वीचीत्रापरीं ॥ ६५
सुक सारीका पढती कृष्णाचे सुड : चातक आळती[1] करीताती[1] सुघड
राजहंस मात सांघती गोड : ते कथाकर देवाचे ॥ ६६
चास भारीद्वाज पारीवे : आनिकही पक्षीये जे जे उत्तम बरवें
ते वीचीत्रांपरी आघवे : कळा दावीताति ॥ ६७
ऐसी ते रंगदेवता मुर्त[1] जाली : परी भीमकीये अवस्ता आगळी
आधीक वीर हें वेथा दुनावली : तेणें उपचारें ॥ ६८

आधिका धडाडी सुटली रुक्मीनि :
मग तीया हृदइं स्मरीलें श्रीसारंगपानी
म्हणे धांवें जी ततक्षेनीं : श्रीकृष्ण अणांथनांथा ॥ ६९

कां गा अव्हेरीलें दातारा : आर्तादानीं करुणाकरा
शरणागतां वज्रपंजरा : देवा कृपानीधी ॥ ७०

तुं तवं अनाथांचा नाथु : भक्तरक्षपाळ[1] शृष्टीं समर्थु
तरी आतां कीती पाहासी माझा अंतु : सरनागताचा ॥ ७१

तुं म्हनवीसी आर्तांचा दानी : हा भरवसा असे माझा मनीं
म्हणौनि म्यां प्राण राखिला श्रीसारंगपानी : येसील याची आसा ॥

देखौनि भक्तांची अडनी : तु चींतीला पावसी ततक्षेनीं
तरी कां न पवेसी आझुनी : मज अनाथालागी ॥ ७३

तरी वेगीं धांवें[1] श्रीचक्रपानीं : अनाथांचा नाथु कैवल्ये दानीं
हा सीशुपाळ बंदीशाळ फोडुनी : मज नेइ श्रीकृष्णा ॥ ७४

मज देइ आपुलें सन्निधान : सेवा दास्ये आणि होवावे तुझें ज्ञान
आनिक मी न मगें तुझीचि आन : पावें देवदेवा ॥ ७५

तवं आसरनि[1] जाली श्रवनीं : म्हणे ना भी ना भी वो रुक्मीनी
वरु पावसी श्रीचक्रपानी : हें नीभ्रांत जान ॥ ७६

येनें जावेक सावध जाली : आत्मजोती श्रीकृष्णस्नेहें उजळली[1]
मग सखियांसीं कैसें बोलीली : भीमकी बाळा ॥ ७७

सखियातें म्हणे रुक्मीनी : तुम्ही हीतज्ञां[1] नव्हा वो वैरीनीं
जेनें प्राण जाये तें मज लागौनि : कैसें करीत असा ॥ ७८

कां वो सींपीता चंदनजळीं : तें मज आगीये होउनी पोळी
कमळें लागताती जैसी इंगळी : वींजणे भाते फुकीताती ॥ ७९

आणि कां घातलें वो तातवेळे : येणें चांदणेनि आंग पोळे
मळयानीळु जरी आला ये वेळें : तरी प्राण जाइल ॥ ८०
नको वाउ वो सखिये वीणा : हा कोकीळ परता न्यानां
कर्पुर आनीतांये दुना : ज्वरु आंगासीं ॥ ८१
हे अष्ट भोग न्या कां वो परते : हे देखिलेयांची ज्वरु येते
यें वारा वो मयोरनृत्यें : पुस दवडा बाहेरीं ॥ ८२
या साळया वारा वो चरबटा : राजहंसासी द्या वो देसवटा
यें आवघीं पक्षीकुळें लावा वाटा : नंदनवनींचीये[1] ॥ ८३
हा रंगु मोडा वो अघवा : येणें सुख नाहीं माझीया जीवा
उपचारु वीचारा वो बरवा : जेणें प्राण वांचे ॥ ८४
हा वो जो करीतांये उपचारु : तयांचाची होतांये अपकारु
हा कव्हनीपरी न वचे ज्वरु : तरी काइ करावे माये ॥ ८५
तवं बोले भावकळना सखि : म्हणे तुम्ही कैसीया वो उपचारीकी
या ज्वराची वोळखि नीकी± : न कळे तुम्हा ॥ ८६
भुतक्षोभें पावे भौतीकु : आनि आप्रेयेत्नें उपजे आध्यात्मकु
देवताक्षोभें पावे दैवीकु : भोगी प्रानीयातें ॥ ८७
तरी भौतीका भुतभजन हीरन्ये दान :
आध्यात्मकां वोषधेंचि होये समाधान
दैवीका होमु जपु इश्वरासीं करी आर्चन : तेनें तोही समें ॥ ८८
या त्रीवीधा तापांवरीं जान : येकची औषध असे गहन
कीजें परमेश्वरनाम स्मरण : तेणें तीन्ही जाती ॥ ८९
तरी हा तवं न मनीं धावनी : तरी दैवीकु खरा वो जानै सजनी
यासीं इश्वरु जपु वांचुनी : आन उपावो नाही ॥ ९०

तरी या वो करूं ईश्वर जपु : तेणें जाइल इयेचा तापु
आणि आत्मस्वरुपीचा कंपु : काढैल माये ॥ ९१
तें इश्वरस्मरण करीतां सद्‌बुधी : आनंता उपजेती सीद्धी
मा त्रीवीधा तापातें छेदी : हें काइ म्हणावें असे ॥ ९२
यैसें तें करीतां इश्वरस्मरण : भवरोगां पासौनि मुचिजे जाण
तेथें त्रीवीधां तापातें छेदीतां मान[३] : न लगे तयासी[४] ॥ ९३
आणि कर्मजनीत ताप पावती : ते इश्वरस्मरनेंचि नासती
म्हनौनियां हृदइं चींतुं कैवल्येपती : येकें भावें ॥ ९४
आणि आइकै वो येकी वीत्पती : सांघैन कर्मवीपाकींची स्थिती
जे दुस्कृतातवं पावती : त्रीवीध ताप ॥ ९५
तरी तयासी पंचो उपचारीं : कीजेती होम जप औषधें अवधारी
दानें वीवीधें इश्वरआर्चन करी : तरी होइल क्षेमा ॥ ९६
तरी बोलावा वो ब्रह्मवीदु ब्राम्हन : तया करवि करवा कां देवोयेज्ञ
पुरानी जे क्षेत्रीची औषधी आनौन : इयेसीं द्या कां भीतरीं ॥ ९७
आणि बोलावा ब्रह्मवीदु सज्ञान : तयासीं हीरन्ये रत्नें द्या गोदान
आणि करवा सड्रसीं भोजन : देया सुगंधें तांबोळें ॥ ९८
जयासीं ज्ञान भक्ती वैराग्ये यें तीन्हि : त्याग सन्यासु ब्रह्मचर्ये सत्येवानी
तया ब्रह्मवीदां करवी श्रीकृष्ण नामीं : करवा लाखौलीया जपु ॥
आणि सोडसोपचारीं अत्रीसुत : तुम्ही पुजा वो श्रीदत्त
तेणें अळर्कु नीववीला जळत : त्रीवीधां तापां पासौनि ॥ १००
तो आमचें परम दैवत : मातापुरीं असे नांदत
तया वांचौनि आमचें चीत्त : न वैसे आनिकां देवां ॥ १०१
ऐसे पंचोपचारु केले : श्रीदत्तात्रये पुजीले
मग तेहीं वरदान दीधलें : जें देवी चींतीलें पावैल ॥ १०२

श्रीदत्तात्रयाचें चरणामृत आइका :रुक्मीनीसीं दीधली प्रेम कळीका
तेणें सावध जाली ते नायेका : भीमतनया ॥ १०३

तेणें संतापु ज्वरु गेला : परीं आधीका प्रेमाचा संचारु जाला
मग पुडती देवो आठवला : अवस्ता दुणावली ॥ १०४

तवं उठौनियां कैसी : माचेयावरीं बैसली सरीसी
वीकळपणें कंपु आंगासीं : आला सांवरेना ॥ १०५

तवं भावकळना आवेसीं : धरुनीया बैसली आंगेसीं
मग पुसों आदरीलें भीमकीयेसीं : सप्रेमां उतरीं ॥ १०६

भावकळना म्हणे रुक्मीनि : तुज काइ करुं वो धावनी
तुझा जीविं काइ असैल सजनी : तें सांघैवो मज ॥ १०७

आणि जरी भौतीकु म्हणों जान : तरी तुं भुतांसी अभयेदान
आणि अपराधें वीण : वीघ्नचि नाहीं ॥ १०८

आणि जरी आध्यात्मकु म्हणों सजनी : तरी तुं प्रेयेत्नियां सीरोमणि
आणि आप्रेत्नेंवीन जानै : तो ही न बधी ॥ १०९

आणि जरी दैवीकु म्हणीजे : तरी तो देवताक्षोभें उपजे
आणि तुं तरी भीमका आत्मजे : देवता क्षोभवीसी ना ॥ ११०

आणि अपराधेंवीन पाहीं : देवते विघ्न करणेंचि नाहीं
म्हणौनि नीती तयासीं कहीं : भंगुचि नये ॥ १११

आणि भौतिका आध्यात्मका आंतु : दैवीकु असे मीश्रीतु
तो मी तुज सांघैन वृत्तांतु : परीयेसै माये ॥ ११२

सर्व भुतात्मकु इश्वरु : आणि देवतेवीण भुतां नसे व्यापारु
म्हणौनि "भुतक्षोभें करीती ताप संचारु"± : देवता जाना ॥ ११३

आणि आप्रयेत्नें रोग संचरती : तेणें पिंडी± खेदातें पावती
म्हणौनि आप्रेयत्नें केलेया तयांची नीती : भंगली होये ॥ ११

आणि दैवीकु तो देवताचि क्षोभें जान :
म्हणौनि तीहिं तापी देवता करी वीघ्न
आणि पींडीं ब्रम्हांडीं होये भजन : तरी तीहि जाती[1] ॥ ११५
आनि तुं देवतेंसि न करीसी क्षेदु : आनि भुतां न करीसी पींडभेदु[1]
आप्रेयेत्नांचा होऊ न दीसी सबंधु : तरी ज्वरु काइसा हा ॥ ११६
तरी मज ऐसा गमला आभीप्रावो : तुवां वाढवीला असे एकाधा भावो
कीं तुज कव्हनाचा उपनला प्रीती स्नेहो : यैसें वाटत असे ॥ ११७
आणि कालीं सभे भीमका पासीं : कीन्नरें वर्नीला हृषीकेसी
तेव्हेळीं तुज वेधु उपनला मानसीं : गोवींदाचा ॥ ११८
आणि तुझा हृदइं सदा गोवींदु : आणि तयाचाची वाढवीलासी संदु[1]
वरी[2] कीन्नराचेनि बोलें जाला बोधु : तेनें हृदइं ठसावला ॥ ११९
तेव्हांचि तुज सुख जालें हृदां : तवं सवेंचि रुक्मीये केली नींदा
तयावरीं दीधलें चैद्या : तें दुसरें जाना ॥ १२०
तो अंतरला जाणौनि मुरारी : म्हणौणि[1] तुज संतापु आला सुंदरी
आणि सीशुपाळाचा भेदारा तयावरीं : लागला तुज ॥ १२१
तेणें तुं तेव्हांची वीकळ गेलीसी बाळे : फोडी लागली म्हणती सकळें
भीमकें नेत्र पुसीले[1] जळें : तयें वेळी ॥ १२२
परी मज तेव्हांचि गमला भावो :
जो तुझा हृदइं लागला श्रीकृष्ण देवो
म्हणौनि उपनला वीरहो : तेणें तुं सीनलीसी माये ॥ १२३
तरी जें असे जीवींचा अंतरीं : तेंचि प्रकटे बाहीरीं
म्हणौनि हा मानसीकें अवधारी[1] : ज्वरु उपनला ॥ १२४
तरी आतां जीवीचें सांघ मजप्रती : जे मी पुरवीन तुझी आर्ति
तवं ते भीमकी तीये प्रती : बोलीली कैसें ॥ १२५

म्हणे तुं सीहानेयांचा रावो : नीका जाणीतला हा आभीप्रावो
जाणसी पुढीलाचा भावो : म्हणौनि भावकळना तुं ॥१२६
जे पुढीलाचीये जीवीचें नेणें : तयाचें धीग संसारीं जीणें
धन्ये जेतुकें मनुष्यें सज्ञानें : जे सीहानें जगीं ॥ १२७
वरीं माझा थोरु दैवाचें अंगु : जे तुजसीं घडला योगु
दैवेंवीण सुसंगु[१] : केवी जोडे माये ॥ १२८
रुक्मीनी म्हणे भावकळने पाहे :
तुज वांचौनि मज सखि कवनी आहे
हे जैसी का वो सुधामती माये : तैसी तुं गुजालागीं मज ॥ १२९
जरी जीवीचें पुसतासी सजणी : तरी वेगां आणि वो सारंगपानी
नाहिं तरी प्रानासी हानी होइल माये ॥ १३०
तो श्रीकृष्ण सर्वव्याधीगजकेसरी : मज आणौनि देसी जरी
तरीचि वो अवधारी : ज्वरु जाईल हा[१] ॥ १३१
तेणे अनादिची फीटैल तापनि[१] : अन्येथा ज्ञानाची झडपनी
तया देवा वांचौनि कव्हनी : +फेडीता नाहीं ॥ १३२
जरी म्हनसी कामातुरा कामीनी : पुरुषातें चींतीती अंतःक्रनी
तरी तो भावो सर्वथा माझा मनीं : कहिंची न वर्ते माये ॥ १३३
आइकै वो वीषयेशक्तीचा अभीप्रावो :
जो स्त्रियांसीं पुरुषावरीं उपजे भावो
तरी तो वीषयें भावें देवो : कहींचि न पवीजे माये ॥ १३४
आइकै वो मोक्षपदा लागौनि : मुनी ग्रह संपदा तजुनी रीगाले वनीं
तेहीं जरी मी कल्पीं आपुला मनि : तरी तयाचीचि आन ॥ १३५
कैसी नेणों वो माये वेधसक्ति : जे अहेतुक तयाची उपनली प्रीती
जो तोची होवावा कैवल्येपती : आणीकें चाड नाहीं ॥ १३६

माझी[१] कुडी[१] तो आत्मा वो श्रीकृष्ण :
ऐसाचि स्वभावो ठेला वो होउन
तरी आत्मेंवीन कुडी लागौन : उरी कैंची ।। १३७

यैसा जाला जीवाचा स्वभावो : मज वेगीं मेळवी तो देवो
तरीचि प्राण वांचैल हा सत्ये भावो : जाण भावकळने ।। १३८

तवं भावकळना बोले निर्धारु : म्हणे आतां बोलाउं सुदेवो तुझा गुरु
तो आम्हां पीता तया नसे वीकरु[१] : गुज बोलतां ।। १३९

तरी आतां हाचि करुं उपावो : जे द्वारके मुळ धाडुं वीप्रदेवो
तो बोलाउनि आणिल श्रीकृष्णदेवो : तुज भेटावया ।। १४०

असो हें वीप्र बोलावीला : आदरें सीहांसनीं बैसवीला
मग भीमकीये पुढां सांघीतला : आला द्वीजराजु ।। १४१

मग भावकळनेचा हातु धरुनि : सकंपीतु आली रुक्मीनि
चांचरीं जातां चरणीं : आली द्वीजाजवळीं ।। १४२

आपुलेनि सीहांनेपणें करुनी : आंग सांवरौनियां रुक्मीनि
मग वीप्राचीया पायां लागौनि : बैसली चाउरीये वरीं ।। १४३

तवं वीप्र आसीर्वचन असे देतु : म्हणे तुझें मनोरथ सीधी जातु
आणि तुझी वीघ्नें हरो आनंतु : होआवी आयुष्ये वृधी ।। १४४

वोसावली देखौनि ते अबळा : मग सखियांसि प्रस्नु केला
म्हणे हे कां कोमाइली बाळा : काइ आडनी माये १४५

तवं रुक्मीनी म्हणे द्वीजा : वेगीं आणि गा श्रीकृष्णराजा
तरीचि वांचैल प्राणु माझा : मज हेचि आडनी ।। १४६

तो आधींची वसे माझा अंतःकनीं : वरी वाखानीला बंदीजनीं
तयासीं देयावें यैसें आलें पीतयाचा मनीं : तवं बंधुनें मोडीलें ।।

ऐसा वैरी नाहीं कव्हनी : जे योग होतां श्रीचक्रपाणी
जो आड रीगौनी करी वीघडनी : तया आघोर होती ।। १४८
वीप्रा तो श्रीकृष्ण माझा पती जाण : येर राये भीमका समाण
ऐसेंचि सांघावें जाउण : यादवराया ।। १४९
म्हणावे जर सरणांगतां वज्रपंजरु : तरी वेगीं न्यावा आपुला कींकरु
आणि हा सीशुपाळ आवर्तु थोरु : चुकवावा माझा ।। १५०
जरी भक्तां वछळु मुरारी : तरी[१] वेगीं[१] यावें झडकरी
न याल तरी अवधारी : यें सांडावीं ब्रीदें ।। १५१
आनिक येक सांघावें नीर्वान : जें तयाचेनि प्रसादें वीण मी न घे आन
न या तरी प्राणांसि देइन मेल्हवन : हे सत्ये जाना ।। १५२
मग हेम उदक आफाउनी : भुजपत्र कनकाची लेखनी
आणौनि दीघली कासीनि : आक्षेरावतीया ।। १५३
देवी कनकाची लेखणी घेउनि करीं :
हेम उदकें वीनंती लीहीली भुजपत्रावरीं
मुद्रीकेंसी दीधली विप्राचा करीं : ते सीरीं वंदीली तेनें ।।१५४
मग उघडुनि[१] कनकाची पेटी : तेथें वीनंती घातली गोमटी
पदक घालौनी कंठीं : मग मागतो वीडा ।। १५५
तवं देवी रुक्मीनि : खुणांवीली हडपीनी
हडपु आनीला तत्क्षेनीं : सखिया रंगावतीया ।। १५६
कैसी चोखि पानें सतारें : पोगीफळें सतारें सकुमारें
यैसा वीडा आणिला चतुरें : दीधला भीमकीये हातीं ।। १५७
जवं वीडा रुक्मीनी घेतला करीं :
तवं करपौणि पळवा जाला अवधारीं
आणि कापुरासि तये अवेश्वरीं : जोती नीगाली ।। १५८

जैसी कापुराची आरती करीं घेउनीं :
हृदइंचा कृष्ण वोंवाळीतांये रुक्मीनी
ऐसा अवश्वरु वोडवला परी नेणौनि : कोपली हुडपीनीसी ॥ १५९

सकोपें आव्हेरौनियां सुंदरी : त्रीसुधी वीडा घेतला करीं
तवं तो तींही वेळां अवधारी : करपौनि गेला ॥ १६०

मग आतीसें हुडपीनीवरीं कोपली : म्हने कां वो पानें पळवा केली
कीं यासींही परी जाली : माझीचि माये ॥ १६१

तवं वीप्रें वारीली सुंदरी : म्हणे पानें बरवी असती राजकुमरी
परी तुझेनी वीरहज्वरीं : करपौनि गेलीं ॥ १६२

ऐसा तो वीप्रासी देउन वीडा : सपलाणि आणवीला घोडा
जो मनां पासौनि अती वेगाडा : वेंचु[1] आळंकार[1] दीधले ॥ १६३

आणि सवें दीधला बडुवा कन्हेरी श्वारु : हुडपी भांडारी वेंचकरु
मादुरी दीवटा सांतीकरु : दाहावा मर्दनीया ॥ १६४

हे दाही जन घोडे देउनी सरीसे : सुदेवासवें दीधले ते मज गमले कैसे
उपपती येकी देतु असे : ते परीयेसा पां ॥ १६५

जैसी दाहा इंद्रीयें अकरावें मन : पाठवीताये श्रीकृष्णासिं सरन
प्राण राहीला[1] असे रुक्मीनी आपुन : भेटी देवाचीये ॥ १६६

असो हें द्वीजु नमीला रुक्मीनी : म्हणें वीप्रा वेगीं आणि सारंगपानी
सुदेवा म्हणे चौथां दीसीं नयेनीं : दाखवीन[1] श्रीकृष्ण ॥ १६७

मग वीप्र देवो स्मरौनि चढला घोडा : तवं मना उछावो वर्तला गाढा
आणि कैसे सकुन जाले पुढां : ते आइका पां ॥ १६८

दीप[1] आरती[1] घेऊनी करी : सोवासीन[2] भेटली[2] माहाद्वारीं
आणि पुर्न कुंभेसीं सुंदरी : दोघी सन्मुखा आलीया ॥ १६९

पुढां वछ पाजीतां भेटली गाये : सुशब्द मंगळवाद्यें आइकतांये
शंख भेरी वाजींनलीया पाहे : नारी लळीत आळवीले ॥ १७०

पुष्पें झेलेंसि माळीनी : पुढां भेटली येउनी
तीया करीं झेला वोपौनी : वीप्र नमस्करीला ॥ १७१

द्राक्ष नींबुवें कर्दळी फळें करीं : नारीयेळां पोफळांचीया दुरडीया सरीं
ऐसीया सन्मुखा आलीया सुंदरी : गेलीया दक्षीन भागें ॥ १७२

आणि दधी दुधेंसीं नारी : पुढां भेटलीया अवधारी
तीया घालुनीयां दक्षीनें करीं : पुढां नीगता जाला ॥ १७३

पुढां सकुटु भेटला वहुवरीं[1] : आनि हस्ती आले सन्मुख च्यारी
सीसुकें खेळती गुढीया घेउनि करी : देवो आला म्हनती ॥१७४

तवं नगरा बाहीरीं माहाद्वारीं । काकवलि[1] गेली उजवां[2] करीं
खरुही जाला वामकरीं : पींगळे उजवे जाले ॥ १७५

ते वीप्रें वाखानीले : म्हणती हे सुभवाक्यें वंदीले[1]
मनोरथ सीधी जातु[2] वहीले : देवी रुक्मीनीचे ॥ १७६

तवं नगरा बाह्ये प्रदेसीं : चास भारद्वजु गेले वामेंसीं
ते वाखानीले तवं म्हनती रुसीकेशी : देइल चिंतीला दावो ॥

असो हे बहुत सकुन जाले पुढां :
मग नीगाले देश नगरें लंघीतु झडझडां
तवं सोरठ पातला पुढां : तो देसु श्रीकृष्णाचा ॥ १७८

तो कैसा देसु देवाचा बरवा : नांदत देखतांये सुहावा
तेथें नाहीं दैन्यें दुःखां रीगावा : आवघे जन आनंदमय ॥ १७९

तेथेंचे सुखिये श्रीमंत लोक : अवघे धर्मवासनेचे पुन्येवंत
आणि पापा नाहीं रीगावा तेथ : वर्तती कृष्ण आज्ञा ॥ १८०

तें कृष्णनाम उचारीतां अवधारी : त्रीवीध ताप न संचरती सरीरीं
जरा मृत्ये तया देशा माझारीं : देखिजेना ॥ १८१

दीसती[१] क्षीरारें रानेंमाळें चरती :
गोपाळ पावे मोहरीचा नादीं गर्जती
आणि अठराभार वनस्पती : अवघीयां सदाफळ[२] ॥ १८२

मार्गि लागले आंब्र[१]वृक्ष थोर : सदा चालता छाया नीरंतर
आणि ठाइं ठाइं अन्नछत्रे सरोवर : उदकीं बोसंडताती ॥१८३

सरीता भरलीया पाट वाहाती जळें :
श्रृंघारुवाडीया वृक्ष लवताती पुष्पें फळें
चतुर्विधा भुतग्रामां सुखांचे सोहळे : देसीं देवाचा ॥ १८४

मार्गि ठाइं ठाइं गोदोहनीयां अवधारी :
दुधाचीया कावडी नेताती नरनारी
मागीतलेयां वीण धरुनि पदरीं : क्षीर[१] पाजीताती ॥ १८५

देखे पारीं पिंपळीं बैसले जन : आइकताती नृत्यें कीर्तनें पुरान
बरवे लेइले नेसले सधन : गावों गांवीं ॥ १८६

आणि गावोंगावीं नरनारी : देखे लेइलीया नेसलीया दीव्यांबरीं
पटकुळें मुक्ताफळें अवधारी : सकळ जनांसीं ॥ १८७

आणि तयां नाहीं करुभारु देनें : जोडीलें द्रव्ये देवीं धर्मि वेंचनें
मढ मंडप देउळें कीर्ति करनें : आपुलीया इछा[१] ॥ १८८

ऐसा नांदता लोकु देखौनि देसीं : सुदेवो म्हणे सवैलासी△
बापु बापु देवांचा रावो रुसीकेसी : कैसा प्रजापाळकु ॥ १८९

ऐसा देसु देखौनि नांदतां : हरीषु जाला वीप्राचीया चीता
तवं पुढां पावला त्वरीता : पव्हे बळीभद्राची[१] ॥ १९०

ऐसा अहोरात्रांमाजी जाणां : पऱ्हे दीवसु उगवला ब्राम्हणा
तवं तेथीची कैसी देखिली रचना : जे केली बळीभद्र देवें ॥१९१

द्वीजा चमत्कारु[1] जाला थोरु : तवं पुढां देखिला सरोवरु
जो माहा वीस्तीर्न थोरु : उदकीं[2] बोसंडताये ॥ १९२

तो बांधला पद्मरागांचा सीळीं :
कास्मीराचे प्रसाद मीरवताती[1]पाळीं
भवंते ताड केळी नारियेळीं : बनें आंबेयांचीं ॥ १९३

तेथें हंसयुगळें क्रीडा करीताती : चक्रवाकें जळकेळी खेळताती[1]
रातोत्पळावरीं रुंजी करीताती : मधुकर देखा ॥ १९४

ते सरोवरीं रवनीयांवरीं : रुषी मुनि बैसोनि चींतीताती मुरारी
वीप्र वेदध्वनी मंत्रोचारीं : गर्जताती ॥ १९५

तया सरोवराचीये पाळीवरीं पुर्वे : चंद्रकांताची पऱ्हे मीरवे
तेथ छत्र[1] घातलें बळीभद्र देवें : अष्टभोगाचें ॥ १९६

ऐंसी रचना देखौनि : संतोसु जाला वीप्रांचा मनीं
सवैलातें△ म्हणे देखिली करनी : बळीभद्र देवाची । १९७

तेथौनि सामोरा नीगाला : पुढां पऱ्हे जवळीं आला
तवं आपुर्व देखता जाला : सुचना अष्टभोगांची ॥ १९८

येक पाक नीफजवीताती स्वार : नानापरीचे वीचीत्र परीकर
जेणें त्रुप्ती होताती देव रुषी नृपवर : दृष्टीं देखत क्षेवो ॥१९९

उदका वासु देउनि कापुरांचे : रांजन भरींले सोमकांताचे
वरीं कळस ठेवीले कनकाचे : भरुनी धुपीवें जळें ॥ २००

तेथ कढतु[1] तापवीताति[2] पानी : आनलींया[3] मादनेंयां लागौनी
आणि आणौनि अळंकारु वस्त्रें लेनी : ठेवीली नानावीधें ॥२०१

येक करावया वीलेपनें : परतीताती कापुर कस्तुरी चंदनें
येक कुसुमांची आळंकनें : गुंफीताती ॥ २०२
आणि+ संत संन्यासी नीवृत : तयासि आश्रम केले सत्वस्त
ते बैसले असती चींतीत : परब्रह्मातें ॥ २०३
येक वाखानीताती वेदशास्त्रें सीधांत :
येक आध्यात्मीं प्रतीपादीती आद्वैत[1]
येक भक्तीवादी[2] द्वैत : प्रतीष्टीताती ॥ २०४
तेथें ठाइं ठाइं पेखणें : रुषी पढताती पुराणें
यैसें तेथ फुकाचे भोग भोगणें : आपुलीया इछा ॥ २०५
ऐसा तेथें मोकारा केला सकळां जनां :
परी बहुत मान रुषी मुनी ब्राह्मणा
तें देखौनि वीप्राचीया मना : संतोषु जाला ॥ २०६
सवैलातें म्हणे द्वीजवरू : हा देखिला गा बळीभद्रदेवाचा आदरु
सर्व सुखांचा आगरु : मांडीला सकल जनासीं ॥ २०७
ऐसें बोलौनि साउमा नीगाला : तवं छत्रेकारीं हांकारीला
वागें धरुनी उभा केला : द्वीजराजु तो ॥ २०८
छत्रकार बोलीले वचन : म्हनती[1] कां हो सांडीता बळीभद्राचें दान
सामोरे जावया[2] काइ कारन : छत्र आव्हेरुनीयां ॥ २०९
क्षेनु येकु सारीजे मादनें : करूनी इछेची भोजनें
लेउन वस्त्रें आळंकार लेनें : प्रवेसा द्वारकेमाजी ॥ २१०
तवं बोलीला सुदेवो : म्हणे माझा मनीं यैसा भावो
जेव्हेळीं देखावा श्रीकृष्णरावो : तेव्हेळीं घेयावें जळ ॥ २११
देवाचीये[1] पंक्तीवीन : न करी प्रसादेंवीन भोजन
जऱ्हीं गेला प्रान : तऱ्ही न भंगी नेमु ॥ २१२

नेघे आळंकार लेनी लुगडी : तोंडीं न घलीं वीडा फोडी
श्रीकृष्ण आपुलेनी श्रीकरें मोडी : तैं भंगेल नेमु ॥ २१३
तुमचा आम्हां पावला मानु : ऐसा सब्दीं संबोखौनु
पुढां नीगाला देवो ब्राह्मनु : तवं देखिली द्वारावती ॥ २१४
ऐसा आहोरात्रि माझारीं : वीप्र पावला द्वारकापुरी
तेथची रचना कैसी ते झडकरी : सांघै कवी कृष्णदासा ॥ २१५

**प्रसंग नववा समाप्त** * (ग्रंथसंख्या १००२)

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

## प्रसंग दहावा

श्रीपरमात्मने नम:

देहां लंघीलें वैदर्भ आभीर रनांवट : रात्रीं माजी गुजरात सोरठ
तवं आरनोदइ सर्व सुखांची पेठ : पावला द्वारावतीये[१] ॥ १
ते वर्नितां द्वारकेची महंती : मज केवी बोलवे अल्पामती
जेथें[१] श्रीकृष्ण कैवल्येपती : राज्ये करी ॥ २
तीया वैकुंठ जींतलें बरवेपणें : रुपें कैळासा आणिलें उणें
सत्येलोकाची उतरीजेती नींबलोणें : तीये द्वारकेवरीं ॥ ३
तेथें अमरावती[२] काइ सांगे : सरसीं येकवीस स्वर्गें
यें सरी न पवती[१] उतमांगें : द्वारावतीयेसीं ॥ ४
तीये द्वारकेसीं घालीजे सरी : ऐसी त्रीभुवनीं नाहीं दुजी नगरी
जे वसवीली रायें मुरारी : आपनयांसीं क्रीडावया ॥ ५

ना ना कीं ते त्रीभुवनिं वेधवंती : कीं ते श्रीकृष्णाची आदिशक्ती
मृत्येलोकीं आकारली कौतुकीं : आदिपुरुषालागी ॥ ६
वोळगतां कैवल्येपती : स्पर्शे आनंद प्रकटती
म्हणौनि बहुरुपें धरीली आदिशक्ती : जाली आनेकधा ॥ ७
वोळगावया रावो मुरारी : आपनचि जाली सैन्ये△ नारी
उद्यानें वनें मंदीरें नगरी[२] : आपनची जाली आवघी ॥ ८
असो हें ते सर्व प्रकासाचि उतरवेठ : कीं सर्व सुखांचि भरली पेठ
कीं ते मुक्तीक्षेत्र वरीष्ठ : संसारामाजी ॥ ९
ते संसारत्रसलेयां[१] जीवां वीसांवा :
कीं त्रीवीधीं तापीं तापलेयां वोल्हावा
कीं भवरोगीं दाटलेयां जीवां : दीव्ये औसधी ते ॥ १०
कीं ते वीश्वप्रकासाची पेटी : नवरत्नें क्षेंवनीली गोमटीं
तेथ कैवल्ये रत्न जगजेठी : आंतु श्रीकृष्ण असे ॥ ११
तीयेचा आधीक प्रकासु दैवी देखौनि :
चंद्र सुर्यो[१] आपुली करीताती वोंवाळनी
ऐसी ते पवीत्र राजधनि : आदिपुरुषाची ॥ १२
तेज फांकतें दाहीं दीसीं कळस मीरवताती आकासीं
जैसीं चंद्रबींबें ठेवीलीं सरीसीं पोंकळी गगनाचीये ॥ १३
ऐसी देखौनिया ते देवनगरी : वीप्रें दंडवत घातलें धरणीवरीं
मग स्तुती करीतु असे अवधारी : सेवकांप्रती ॥ १४
म्हणे तुमचें धन्ये धन्ये जीवीत : जे हें देखीलें महातीर्थ
आणि सर्व तीर्थें आलीं असती येथ : वोळगावया द्वारकेसीं ॥ १५
जैसीं सर्व द्रव्यें चींतामनी : तैसी हे सर्व तीर्थांची राजधनि
कां जे येथ राज्ये करीतांये श्रीचक्रपानी : सर्व देवादीदेवो ॥ १६

मार्गि हींसा जाली बहुत : क्रीमी कीटक△ पतंगादी जंत
यैसे जे मेले चालत : तें उपसाहीजो जी ॥ १७
आणि अनंता जन्मांचें संचीत : परांन्न[१] परपानीं[१] आलों सेवीत
केलें धर्मनष्टेसीं वागमीश्रीत : तें ही उपसाहीजो जी ॥ १८
म्हणौनि जोडौनि कर दोन्हि : दंडवत घातलें धरनिं
म्हणे त्राही त्राही श्रीसारंगपानि : आदीपुरुषा ॥ १९
ऐसी नमस्कारीली द्वारावती : मग घोडे धरीले हातीं
"यैसा पायींच* पंथीं पुढां नीगुती : चालते जाले" ± ॥ २०
तवं जयाची दीर्घ रुंदी न कळे पारु : जो आंगें[१] वीस्तीर्न थोरु
तोचि जीवां अगड± जाला असे सागरु : द्वारके भवंता ॥ २१
ना ना कीं तें यैसें गमलें माझा मनीं : षट् सागरीं केली आपुली वोंवाळनी
सातवा लवनु नींबलोन करुनी : टाकीला द्वारके भवंता ॥ २२
तेथें लाटा घडघडां वाजती : आणि सावजें धुधुकारीं गर्जती
त्या ध्वनी पडीसादु उमटती : आकासामाजी ॥ २३
असो हें पावला सागरु : मग प्रव्हानिं बैसला द्वीजवरु
वेगीं उतरला पैलपारु : सेवकासीं[१] ॥ २४
तवं जे मेरुपस्ये सोभत : सुध जांबुनदाचे झळकत
ते चहुंकडे क्रीडापर्वत : देखता जाला ॥ २५
तयावरीं आठरा भार वनस्पती : तयाची गनीत सांघैन सकळीती[१]
येऱ्हवीं बोलता वीत्पती : वीस्तारु होइल ॥ २६
राम वछ चंद्रमा भान : भुमी मुनी सुन्यें[१] मेळउन
हे भार संख्या व्यासनंदन : बोलीला असे ॥ २७
तया अठरा भारां माझारीं : फळें पुष्पेंवीन भारु च्यारी
फळें पुष्पें असे सा[१] भारांवरी[१] : वेली आठ[२] भार ॥ २८

आणि बारा मासा आंतु : वर्तती देखा साही रीतु
तेथ तीनीतीनि येकी येकी± आंतु : येती फळपुष्पासीं ॥ २९
यैसीया तयांवरी वणस्पती : अवघीया सदाफळां दीसताती
कल्पतरुमुक्ष सुरतरु असती : येरां संक्षा नाहीं ॥ ३०
तेथें बरविं सीळातळें सीखरें : कपाटें तरु उदकें नीर्झरें
तेथें रुषी मुनी यौगेश्वरें · वस्ती केली पैं ॥ ३१
ते भुमिका मुक्ष पर्वत : अवघे पांच शते गणीत
तया माजी सम[१] स्थळ[१] भुमीका असे मीरवत : सासटी योजनें ॥
तीयेवरीं छतीस योजनें द्वारावती : तीस योजनें वनें उपवनें भवंती
तेथची वीचीत्र रचना वीत्पती : कवन वर्नु जाने ॥ ३३
ते अवघी कनकाची भुमी जाणा : आणि नवरत्नांचे खडे पाषान
तेथचीं झाडें ते अबघे सुरतरु हें वचन : तुम्ही सत्ये मानावें ॥
तेथ आइका उद्यानवनांची नीगुती : आठें आगळीं सोळासहृश्र मीरवती
तेथ फळ पुष्पां वृक्षांचीया* जाती : वर्नु कवन जाने ॥ ३५
जीतकी अंतापुरें जगजीवनां : तीतुकीची उद्यानें उपवनें जाणा
यें वीश्वकर्मा आधींची गेला रचुन : जइं द्वारावती उभवीली ॥
अंतापुरां द्यावया उलीगें : आधींची रचना करवीली श्रीरंगें
तया सर्वज्ञा कवन सांगे : तो बापु ज्ञानीयांचा ॥ ३७
तें सांघतां उद्यान वनें संपती : मज केवी बोलवे अल्पमती[१]
जेथ क्रीडे कैवल्येपती : ते रचना कैसी सांघों ॥ ३८
मागां कवी बोलले वीत्पती : तेथ मज मसकां कैंची मती
परी स्थळ ठाकैल म्हणौनि आरिखां युक्तीं : बोलतु असे ॥ ३९
नगरा भोवंतीं आठाहीं दीसां : आठ शृंघार वनें परीयेसा
तया भवंतीं लागलीं सोळा सहृश्र : सोभताती ॥ ४०

कीं तो वोळगावया रावो मुरारी : आपणची वसंतु आला सपरीवारीं
तेवी उद्यानें वनें चहुंफेरीं : मीरवताती ॥ ४१

कीं उतमांगें टाकावया श्रीकृष्ण देखा :
ब्रह्मांडौनि देवता आलीया असेखा
फळीं पुर्स्पीं पुजावया आदिपुरुषा : जालीया वनस्पती ॥ ४२

तेथ सदा रीतपती आभंग : ऐसा वसंत[१] सहीत आनंग
आला वोळगावया श्रीरंग : सपरीवारीं ॥ ४३

तेथें क्रीडैल श्रीकृष्ण आपण : म्हणौनि वृक्षत्व आकारले देवतागण
तया रुखासि उपमा कवण : देवों जाने ॥ ४४

तेथें च्युत चंपक कल्पतरु : आसोक पार्यातिक मांदारु
हरीचंदनादी हे सुरतरु : यांची लाखारीवें ॥ ४५

येंरा रुखांसि गणना नाहीं : वीचीत्र लागले पाही
जे कां सप्तदीपावतीये नाहीं : ते देवाचीये श्रृंघारबनी[१] ॥ ४६

ते आवघेचि वृक्ष सदाफळ : आणि सुगंध अती रसाळ
तेथें रुषी मुनि देव सकळ · क्रीडा करीताती ॥ ४७

तेथें सरीता[१] सरोवरा[२] नाहीं लेखा : खेडकुळीया अती सुरेखा
आणि उदकांची गोडी देखा : अमृतापस्ये ॥ ४८

तेथें पानि काढावें न लगे राहाटीं :
सरोवरीचें चाले सोमकांताचा पाटीं
आणि दारें धरावयाची कामाठी : तेंही तेथ न लगे ॥ ४९

कैसी बनकरीं कुसरी रचीलीं आळीं :
येक भरीलीया अवधींचि भरे जळीं
न लगे सोडावें बांधावया पाळी : आपसयांचि भरे वोसरे ॥ ५०

सर्वेचि रीतकाळीं पावे मागुतें :
जैसें समुद्रा चढे आवसे पुर्निवेचें भरीतें
नाना कीं तें सागरेंचि उलीग घेतले तेथें : उद्यानें भरावयाचें ॥

आणि कैसें त्या वृक्षाचें डाळपण : गगन चुंबीत आकास प्रमाण
ना तें नीळोत्पळांचें गुढर उभीलें जान : वसंतें आनंगालागी ॥५२

तें सदा पुश्वीं फळीं लवत : सुगंध नाना परीमळीं बाहाकात
दाटपनें सुर्येकर[१] न संचरती तेथ : तया वनांमाजी ॥ ५३

परी तेथ नाहीं आंधकारु : ते दीव्ये तरु तयाचा प्रकास थोरु
म्हणौनि तेथ सदा चाले व्यापारु : तयाचेनि उजीयेडें ॥ ५४

तेथ परीमळें मळेयानीळु लांचावला :
म्हणौनि स्थीर तेथेंचि वासु केला
"सुख मानलें सुरवाडें स्थुळ जाला"± : गती पारुखली ॥ ५५

तऱ्ही वीरहीनीसीं घेताये कवळीं :
भोगीया दावीताये परीमळाची नव्हाळी
यैसी तेथ खेळताये रळी* : तया वनामाजी ॥ ५६

कैसे तया वृक्षांवरीलें पक्षीकुळें : त्रीभुवनींचि क्रीडताती उत्तमें सकळें
आवघीं बोलीकीं श्वादीताती फळें : कल्पतरुंचि ॥ ५७

तें वाखाणिताती वेद शास्त्रें पुरानें : आनि संवादीताती आष्ट व्याक्रनें
उपनीषदां रुप करीताही वीत्पनें : रुषी सीधांत यांसीं[१] ॥ ५८

तेथें कोकीळा पंचमु आळवीती : मयोरयुगमें नृत्ये करीती
पीसीं[१] पसरुनी सोगे सीरींवाती : करीती मल्हार[२] टाहो ॥ ५९

आणीकेंहीं पक्षीकुळें नानापरी : क्रीडा करीताती तया वनां माझारी
ते आवघी सांघतां कळाकुसरी : तरी होइल अती वीस्तारु ॥ ६०

कैसे सरोवर सोभती कमळीं : वरी कुंकुमवर्न रातोत्पळीं
जैसे[१] रीतुरायें पांगुरुवीले सकळीं : दुटीया सेंदुरवर्नी ॥ ६१

तयावरीं भ्रंमर रुंजी करीती : ना ना कीं ते तेहीं गायेन मांडीलें नीगुती
कीं ते आपुलाला आवश्वरु जानवीताती : चक्रवाकांसीं ॥ ६२
ते सरोवर बांधले सोमकांतीं : मध्यें चक्रवाकांचि युगमें शोभती
कीं ते वीनोदें जळकेळी खेळती : येकमेकेसीं ॥ ६३
तयांसीं चपळता मीन वळनें दावीती : आनि राजहंस सराउं करीती
तेथ बैसलेयां जळदेवता तोषती : रवनीयांवरीं ॥ ६४
पाळीं कासमीरांचे प्रसादु मीरवती : सदा पुजा वाधांवन वाजती
मंगळवाद्यें कीर्तनें करीताती : गंधर्वादीक ॥ ६५
आणि तेथ कल्पतरुतळीं : रुषी मुनि बैसोनि सकळी
ते ध्यानस्त चींतीती हृदयें कमळीं : कृष्णा सांवळेयाते ॥ ६६
येक आनिताती हृदयें कमळीं[१] : येक देखताती आपनयां जवळीं
यैसी ते नांदतां वनस्थळीं : देखिली वीप्रें ॥ ६७
तया बना भोवंतें चहुंफेरीं : सोनेंकेतकीचे कुप अवधारी
कैसीं गाभेवनें मीरवताती वरी : जैसी हेमकटें[१] ॥ ६८
तयावरीं भ्रमर देखा भवंती : ते कैसे गमले माझां चीतीं
जैसे रक्षपाळ गंधर्व जागे घालीती : मीषें रुंजीचेनि ॥ ६९
तयामाजी ताड माड तमाळ : कैसे वाढींनले सरळ
गगन चुंबीत धूमंडळ : कवळीतातीं ॥ ७०
तया आंतु उततीया सरळी : आनि वीस्तारलीया कनकजांबुळी
वरी कैसी कनकसरें[१] लागलीं पींवळीं : मुष्टीप्रमानें ॥ ७१
तया आंतु केळी नारीयेळी : अतीमानें वाढींनलीया सरळी
पोफळी घेताती कवळी : चंदन वृक्षेसीं ॥ ७२
चंदनाचेनि स्परीसें परीमळें : कैसीं सुवासें जाली पोफळे
कापुरें घोळीलेयापस्ये आगळें : सुगंधपन ॥ ७३

तयां सेजीं फनस गंभेरी[1] : मधुकांकडीया मातुळंगी जंबीरी
आणि साकर निंबोनी अवधारी : नारंगी पक्व दाळींबया ॥७४

तेथ जाइफळांचे[1] वृक्ष सोभती : वरी जायेफळांचे घड[2] लोंबती
येळां लवंगांचे घोस लवंती : आमीत ठाइं ठाइं ॥ ७५

आणि वीदृमांचीया मंडपावरी : द्राक्षी[1] सासींनलीया आपारीं[2]
नक्षत्रें वोवीलीं सरीं : तैसे घड मीरवताती ॥ ७६

नाना कीं तें वोवीलीं मुक्ताफळें : कीं सटकोन येकवटीले वाटोळे
तयाही पस्ये सोहज्वळें रसाळें : द्राक्षें मीरवताती ॥ ७७

यैसी पाहातां वनस्थळीं : तवं पुढां देखिलीया कापुरकेळी
तया तळीं बैसोनी माळीं : कापुर नीवडीताती ॥ ७८

तवं बोलीले द्वीजें : हे कीती कापुर कवनीयेपरीं नीफजे
तें सवीसेस ज्ञान कीजे : मजप्रती ॥ ७९

" तवं बोलीले माळी "△ : म्हणती पांच कापुर नीफजेती केळीं
ते आतां वीभक्ती सांघों तुम्हां जवळीं : ते परीयेसा पां ॥ ८०

येकु पोतासु दुजा उदये भास्करु : तीसरा भीम चौथा नाथपरु
पांचवा इछावासीया कापुरु : तो दुर्लभु देवां ॥ ८१

पुनिवे स्वाहाती वरुषेती नीसीयेचा भरी :
तें उदक थारे[1] केळीचा पदरीं
तें रात्रीं वीरजे सुधाकरीं : तो पोतासु पोलीजे ॥ ८२

त्याची वरीषती उगवतां दीनमणी : तें केळीचा पदरीं थारे[1] पाणी
बाळाकी[2] वीरजे म्हणौनि : तो उदये भास्करु ॥ ८३

तीयाची स्वाहाती वरुषती दुपाहारीं : तें उदक थारे केळीचा पदरीं
भीमकाळीं वीरजे सूर्येकरीं : तो भीमु म्हनीजे ॥ ८४

सुर्यो आस्थगीरी चंद्र उदयाचळीं : तेव्हां वरुषे तें गाभेवनीं थारे केळी
उभये रस्मीं वीरजे सायंकाळीं : तो नाथपरु ॥ ८५

यां चहुं कापुरांचा नीझरु : कर्दळींचा उदरीं होये संचारु
तेथें इछावासीया नीफजे कापुरु : तो देवांसि योग्ये ॥ ८६

पोतासु श्वेत हरीतु उदयेभास्करु : भीमु स्यामु पीत* नाथपरु
इछावासीया पक्व डाळींब बीजांकुरु : आरक्तु जाणा ॥ ८७

सीतळ पोतासु पीतातें हरी : त्रीदोष सेम्येकु भास्करु अवधारीं
भीम सबळु क्षुधेतें करी : नाथपरु कामातुरु ॥ ८८

यां चहुं कापुरांचे गुण : येका इछावासियाचा ठाइं असती जान
आणिकही बहुत गुण असती ते सांघैन : आतां परीयेसा पां ॥ ८९

तो इछावासीया घरीजे करीं : आणि जो परीमळ इछीजे मनां भीतरीं
तोचि सहश्रधापरीं : उधांवों लागे ॥ ९०

तो इछावासीया जे सेवीती नर : तेणें आवघेचि परीमळाचें होये सरीर
आणि येकसंधी प्रज्ञा होये थोर : मुखि आवलीळा वाणीं ॥ ९१

तोची कल्पु वृक्ष होये तरुणा : आनि वीर्ये स्थंबु कामु सतगुणा
सीहांचें बळ आहारु दसगुणा : नासी सर्व व्याधी ॥ ९२

आणि तो जरी सुइजे नेत्रकमळीं :
तरी नीधानें दीसती जें गते [१] पाताळीं :
आणि वीचरतां देखें मुमंडळीं : देवता भुतजात ॥ ९३

तो इछावासीया नेइजे देवां : मृत्येलोकीं कहीं न जोडे मानवा
यैसेनीहीं जया जोडे सदैवां : तया होती रीधी सीधी ॥ ९४

यैसे कर्दळीपत्रांचे करूनि पुडे : पांचही कापुर ठेवीले द्वीजापुढें
तो म्हणे तुम्हां उचीत देइजे येव्हडें : यैसें मज काइ असे ॥ ९५

तवं बोलीले बनकर : म्हणती तुम्हीं अंगीकरा हेंची उचीत थोर
आम्हां श्रीकृष्णा सारीखि घुर : कांहीं उणें नसे ।। ९६

आणिकही तेथ पुष्पे जाती नाहीं मीती :
जाइ जुइया आमीता△ मालती
बकुळ बचकुंद रायेरेवंती : चंपकु रायेचांपे ।। ९७

आणि पांचीकर बाळमोगरे : पातां वेळीयें वाटोगरे
मध्यें कुंकुमकेसर अती भारें : डोलताती[1] ।। ९८

तेथें सुगंधु पाडळ अतीमाने* : ते भ्रमरांचीं∓ क्रीडास्थानें
तयांचा परीमळु योजनांचेनीं माने : धांवतु असे ।। ९९

या पराकृता पुष्पे जाती : अनिक सुरतरु लागले तया नाहीं मीती
ते मज पराकृत मती : वर्नवतीना ।। १००

तेथें अमीत आसोक : कल्पतरु मांदार पार्यातक
हरीचंदनु संतान हे सुरतरु आइक : तया लक्ष संख्या ।। १०१

तेथें दीव्ये कुसुम तरुची नीगुती : जयाची कुस्में जैसीया दीपजोती[1]
तें न वाळे न कुचुंबे परीमळें भरीली क्षीती : अमर± सहश्र संख्या

आणिक तेथ रीद्धी सीद्धीचे वृक्ष असती :
तयांचा स्पर्शें होये कनकाची क्षीती
आणि इछिली पंचामृतें श्रवती : जे[1] चिंतीली मनें ।। १०३

येकाची पत्रें धरीलेयां नेत्रकमळीं :
नीधानें दीसती जे[1] असती[1] पाताळीं
भांडारें आखुटें होती तयांचा फळीं : मध्यें ठेवीलीया ।। १०४

आणीकही सामर्थ्यांचे असती : जयातळीं इछीले अष्टभोग मीळती
सेवीलीया पीडा△ छेदु भेदु न प्रभवती : न लगे योग साधनें ।।

तेथ कल्पतरुचीं फळें पडीलीं मेदिनीं : ते सेवीलेया वृधें होती तरुणी
आणि होये त्रीकाळ ज्ञान अवलीळा वाणी : नासती रोग दोष ॥

आणि ठाइं ठाइं हरीचंदन : लागले असंक्षांत जान
तयांचेनि वासें वेधलें [१] आवघें वन : जालें सपरीमळ ॥ १०७

तया चंदनातळीं बैसोनि द्वीजें : मग वनकरातें पुसतु असे वोजे
म्हणे हा चंदनु कवनेपरीं नीफजे : तयाची लावनि सांघा ॥१०८

तवं बनकरी बोलती : म्हनती जी हें असे स्थुळ[१] ग्रंथीं
जें ब्रह्स्पती बोलीला सुकाप्रती : तें परीयेसा पां ॥ १०९

"श्वर्गि अमरावती अवधारी : दक्षीण दीसेचेया कडेयावरी
तेथ हरीचंदन वीस्तारला ते थोरी : परीयेसा पां ॥ ११०

तो सतें तीन यौजनें उंच वरीं : भवंता वीस्तारला यौजनें सतें च्यारी
दाटपनें सुर्येकरां भीतरीं : संचारु नाहीं ॥" १११

तयासीं पार वांधला कास्मीरीं : मानिकांची बाळानी चहुंफेरीं
तेथ देवेसीं इंद्र बैसोनि तयावरीं : क्रीडतांये अहींर्निसीं ॥ ११२

तयाचेनि परिमळें वेधली त्रुन झाडें :
अवघी अमरावती परीमळें बोसंडे
आणि क्षीती जळ वेधलें कवनें पाडें : सुवासें भरलें नभ ॥११३

तयाची दक्षींनली खांदी वाढीनली थोरी :
ते आली असे मळयागीरीवरी
साखा पत्रीं महुरीं : सांचीनली ॥ ११४

आश्विन पुर्निमें नीसीयेचा भरीं : नीगतां चंद्र ये हरीचंदनावरीं
तो तयावरीं आमृत वरुषे अधोधारीं : तें भरे साखा पार्लिव ॥

तें आमृत महुरांचें " कण घेउनि झडे "± :
तें वोद मळयागीरी वरी पडे
तयाचे कोंभ फुटती चहुंकडे : दीव्येरुप ॥ ११६

जैसे कास्मीरा कोंभ फुटले मी म्हने : कीं पोतासु वीरुढला[१] कवनें मानें
कीं जैसीं उगवलीं तारागणें : मळयागीरीवरीं ॥ ११७

कीं ते स्फटीका फुटले कोंभ : कीं क्षीरसागरींचें क्षीर वीरुढलें सैंभ
किं ते ठाइं ठाइं उगवले चंद्रबींब : मज पातां ॥ ११८

कीं मळयेगीरीची वनदेवता : कापुरांचे दीप उजळीले मज पातां
कीं नीधानें उगवलीं श्रीमंता : भोगीयालागीं ॥ ११९

तो कोंभु सकोंमळु फुकीलीया मोडे :
तयाचेंनि परिमळें सर्प चालीले गाढे
तयाचेनि स्पर्शे तो रगडे : ठाइं ठाइं ॥ १२०

आवचटें चुके येकाधा येकाधीये कडे : कीं दाटे जाळीमाजी सांपडे
तो सुर्यो उदो होये तवं वाढे : पुरुस प्रमानें ॥ १२१

तो तीसरा दीसीं दृढे पाहीं : मग सर्पाचें केलें न चले कांहीं
तयाचा परीमळु धावे दीसा दाहीं : तेनें वेधलें अवघें वन ॥ १२२

तो वरीं श्वेतु आंतु पींवळा[१] पोटीं : जैसें साडपन्हरें दीधलें पुटीं
बावनेयाची रेव उमटे कसवटी : म्हणौनि बावन म्हनीजे ॥ १२३

कीं बावन पळ तेल तावीजे : पळ उगाळौन तयामाजी घालीजे
तें तेल जरी नीवे सहजें : म्हणौनि बावन तें ॥ १२४

तया सुवर्नापस्ये मोल आगळें : आणि रत्नेंही जींतली नव्हेतीं सीतळें
आणि ये आवघीचि उनी परिमळें : म्हणीनिया ॥ १२५

आणि सुवर्ण जड आंगीं रुपे : आणि चंदनातळीं आंग लपे[१]
आणि तापातें दवडी ह्मनौणि थापें± : करी सीतळता देहीं ॥

हा चंदनु थोरु सर्व आळंकारांवरी : उतमु पवीत्र बहुतां परी
म्हणौनि मान दीधला देवां नृपवरीं : लल्हांट चाउरीये पां ॥

दीवसां[१] श्रृंगारु कीजे तो रात्रीं फेडीजे :
रात्रीं कीजे तो दीवसां[१] सांडीजे
हा चंदनु सदा सर्वदा मीरवीजे : अर्हनिसीं ॥ १२८
सुभकार्यें तीर्थें व्रतें क्षेत्रें दानें : येज्ञु जपु होमु पुजा अनुष्टानें
इयें अवघीं तें सोभायेमानें : जइं चंदनु जोडे ॥ १२९
सदा सीरीं वर्ते अखंड : म्हनौनि यातें म्हनीजे सीरीखंड[१]
आणि राये सदा मनीं चींतीति अखंड : म्हनौनि श्रीखंड म्हनीजे ॥
तें आवचटें नृपां कोरडें जोडे : परी सावेव वोला वृक्षु दृष्टीं न पडे
तये द्वारके हरीचंदन चहुंकडे : सहस्रसंख्या ॥ १३१
तवं सवैल पुसती सुदेवासीं : वीप्रा भुजंग न देखों या चंदनापासीं[१]
कां तजीलें हे वीभक्ती कैसी : ते सांघा आम्हां ॥ १३२
तवं वीप्र म्हणे या चंदनातळीं मयोर :
सदा वीचरताती जवादीमांजर
खांदीयावरी बैसले गरुड कीन्नर : तेथ भुजंगा ठावो कैंचा ॥
वरी याचि क्षीती आधें[१] गेलीं मुळें : तेणें परीमळें भरली सप्तपाताळें
तेणें संतृप्त जालीं अवघीं नागकुळें : मग राहीली जेथचीं तेथ ॥
तयामाजि[१] कस्तुरीये मृग हरीनीं :
सवेला गलीं कुरुवाळीताती बनकर माळीनि
वरी वेधलीं किन्नरा कोकीळांचा गायेनीं : नीवांतें वीचरताती ॥
तया चंदनाचि गळीत पत्रें पडती : तें वेंचुनी कस्तुरीये मृग खाती
म्हणौनि ये कस्तुरीयेची क्षाती : त्रीभुवनी वाखाने ॥ १३६
तेथ आंबेयाचीया लाखारीवां नाहीं मीती :
पाडु लागला तेणें तळीं न दीसे क्षीती
फळ येक सेवीलेयां होये संत्रुप्ती : गोडी अमृतापस्ये ॥ १३७

यैसीं वीप्र वनें उपवनें देखे : जें नीरुपमें अती सुरेखें
तें लावीली आदिपुरुषें : आपणेयां क्रीडावया ॥ १३८

असो हें सांघतां वीचीत्रापरीं[1] : सुदेवो नीघाला बाहीरीं
तवं बना भोवंतीं तांडीं चहुंफेरीं : पानांचि देखता जाला ॥ १३९

जे अष्टभोगांची मुखरनी : आणि सर्व श्रृंगारांची मुख[1] मोहनी[1]
ते नागवेली परी कवनीं : मीरवत असे ॥ १४०

भानुरस्म न साहे वेली कोमळे : म्हणौनि वरी मंडपु सेइले वाळे
भवंते पार्यातक लावीले जवळे : वायो लागैल म्हणौनिया ॥ १४१

तयासि दुधाची जेवनी सकर्पुरीं : सींपीताति जांबुनदाचीये लोटीवरी[1]
देठीं पीकलीं पानें सतारें अवधारी : उज्वळ चंद्रापस्ये ॥ १४२

जगीं मेळवीजे पत्र फोडी कात चुना :
या चौवांचौनि तांबोळु न रंगे जाना
तें नसुधेंची पत्र सेवीलेयां रंग चौगुना : वदनीं कुकुमापस्ये ॥ १४३

आणि उंसरनि[1] उंस लागले गाढे : जयासीं नख रोवीलेया भरती घडे
सूर्येरस्मी आळौनि± साकर पडे : उज्वळ अतीमाने ॥ १४४

यैसीं वनें उपवनें देखौनि : बहुत संतोसु जाला वीप्राचा मनीं
तवं पुढां कैसी देखिली राजधनी : यादवरायाची ॥ १४५

आतां सांघैन द्वारकेचें महीमान : श्रोता△ आइकावें देउनि अवधान
परी न करावी शंका मीं अज्ञान : म्हणे कवी कृष्णदासु ॥ १४६

**प्रसंग दहावा समाप्त** * (ग्रंथसंख्या ११४८)

श्रीकृष्णार्पणमस्तु

## प्र सं ग अ क रा वा

श्रीपरमात्मने नम:

नगरा भवंतें आठांही दीसा सीवें : अष्ट दीसापाळ स्थापिले± बरवे
आणि आठ गनेश भोगभुवनीं सुहांवे+ :
आणि अष्ट भोगांची छत्रें ॥ १

आणि नगरा बाह्ये प्रदेसीं चहुंफेरीं : सागरा समीप गोमतीचा तीरीं
तेथ माहाप्रसाद रचीले अती कुसरीं : कोडि संक्षा ॥ २

गंगा भोगावती+ भागीरथी :
यैसीं अष्टोतर सतें तीर्थें आलीं द्वारावती
तयाची स्थापना केली नगरा भोंवती : प्रसादु प्रतीमां अन्नेकवीधा॥

पुढां सर्व तीर्थांचे संगम : देखिलें माहा उत्तम
मग तेथें करुनिया स्नान नेम : पुढां नीगता जाला ॥ ४

तवं कैसी द्वारका देखिली : जे सर्व सुखांची पेठ रचीली
ना ना ते श्रीकृष्णां कारनें आकारली : वीश्वमोहनी पैं+ ॥ ५

मीती नाहीं पौळी उंचपणा : ज्या धुरुमंडळापस्ये गहना
आवघें नगर वीस्तारलें जाना : छतीस योजनें+ ॥ ६

सेवटील पौळी कनकाची नीघोट : दुजी सोमकांताची चोखट
तीजी कांडारीव वीद्रुमाची नीट : चौथी पद्मरागाची ॥ ७

पेरोजाची पौळी पांचवी : सैंभ हीरेयाची मीरवे साहावी
इंद्रनीळाची पौळी सातवी : आठवी सैंग पांचीची ॥ ८

नवावी सुध मानिकाची पौळी . जे णवरत्नें क्षेवनीली प्रकासतेजें बहळीं
तीये भीतरीं श्रीकृष्णाचीं मंदीरें नेपाळीं : सैंब चींतामनीचीं ॥ ९

कैसी पौळीसि आटाळें चहुंफेरीं : जैसे रत्नांचे लागले उर्धगीरी
तयासीं पाठी रखिया वीस्तिर्णा थोरी : वरीं नवनाग फीरताती ॥

कैसीया रत्नबंधा चरीया तयावरी : जैसीं रविबिंबें ठेवीलीं चहुंफेरीं
कीं ते दीनकर वोळगों आले रावो मुरारी : मीसें चरीयाचेनि ।।

आणि माहा प्रचंड मीरवताती हुडे :
वरीं रत्नाचीया उपरीया बाळानीं माडें
तेथ राखनाइत बैसले गाढे : जैसे सवंगडे काळाचे ।। १२

ऐसीया नवै नीटा नितळा सोह्रोज्वळा :
पातां दृष्टी नीसरें प्रतीबींव दीसे डोळां
रत्नखचीता प्रकास बहळा : उंचा गगन चुंबीती ।। १३

भवंते सातही मीरवती आगड :
तयाची दीर्घ रुंदी न कळे वीस्तीर्न अवघड[१]
तेथ जीवन अमृतापस्ये गोड : भवंते सोमकांतीं बांधले ।। १४

तळीं हेम वरीं पांची नीबंध[१] भुमी[१] : तीयेवरीं नगरीची उभवनीं
तेथेंचि मंदीरें उपरीया वाळाणि : आवघीं रत्नखचीते ।। १५

जैसें उगवलें दीनकर : तैसे कळस मीरवताति नीरंतर
तीये नगरीं रात्री माजी व्यापार : रत्नप्रकासाचेनि ।। १६

असो हें पहीली पौळी पावला द्वीजवरु :
तवं पुढां दारवठा देखिला परीकरू
जेथ वीश्वकर्मा वीदानीं कुसरीकारु : तेणें वोतीला नवरत्नांचा ।।

तेथे मीरवताती माडें बाळानी : वरी सदा गायेनें नृत्यें पेखणीं
आणि मखरां तवंगाची उभवनी : वर्नु कवण जाने ।। १८

तेथ कनक जांबुचीं कवाडें : हीरे झळकतांतीं अतीपाडें
वीद्रुमांचीया भोंगळा देव्हडे : बैसले राखनांइत ।। १९

ऐसे आठांही दीसां पौळी प्रती : आठ आठ दारवठे मीरवती
बतीस खिडकीया आडीं नीगुती : सोळा सोळा ।। २०

ऐसे बाहातरी दारवठे नवां मीळौनि : खिडकीया अठ्यासी शतें
आडीं चौताळीस ± येकशत[१] जानै : हे नीगुती जाना ॥ २१
तया दारवठां पैसु दाहा हाती[१] : गुढरीले येकें वेळें जाती
सत* स्वार वागा जोडौनि प्रवेशती : दाहा रथा सांकडें नाहीं ॥
आडां दोनि गुढरेंसीं जाती कुंजर :
खिडकीया येके वेळे पांच[१] प्रवेसती स्वार
यैसी तेथची रचना पवीत्र परीकर : सांघतां वीस्तारु होइल ॥२३
ते आवघे मानीकांचे दारवठे : इंद्रनीळांचीं आडीं तेजीठें
हिरे कामवीले गोमटे : खिडकीयांसीं ॥ २४
आणि दारवठांप्रती कास्मिराची माडें :
पंचवीसां खनांचि उभविलीं अतीपाडे
तेथ सदा गायेनें नृत्ये सींपनें कोडें : खेळताती देव गंधर्व ॥ २५
ना ना तें भोगभुवन अवधारी : तेथें सदा वसत रावो मुरारी
म्हणौनि सदा सींपनें ते नगरीं : खेळताती सकळही जन ॥ २६
आणि साडापुढां कीर्तिखांब : उंच माहावीस्तीर्न लांब
सोमकांताचे नितळ सैंब : गगन चुंबीताती[१] ॥ २७
आणि दारवठेयांप्रती जांबुनदाचे समोर : कुसरी मनौरे रचीले परीकर
साठी साठी खनांचे वीस्तीर्न थोर : गगन कवळीताती ॥ २८
तया मनौरांचा खनोखनीं : पांचीचिया खिडकीया + बाळांनि
तेथ यादव बैसोनिया सीहांसनीं : नाचवीती विद्यावंतें[१] ॥ २९
तयां आंतुनी वंकद्वारें निवाट . खनोंखनीं कळसांसी चढे नीट
वरी उभे राहीलेया नगर चोखट : अवघें दृष्टीं दीसे ॥ ३०
तया जवळीं वीहीरी तेथचें पानी : कळें करुनी चालवीलें खनोखनीं
ऐसी वीचीत्रें देखा करनी : वीश्वकर्मयांची ॥ ३१

ऐसें नवां पौळीचेयां दारवठेयांप्रती : बाहातरी उभीलें देखा निगुती
आणि राजमाहाद्वारीं कैसा उभवीला वीत्पती : तो सांघैन आतां ॥

तो उभवीला सतां खनांचा : आनि छत्राकारु इंद्रनीळांचा
वरीं रत्नें क्षेवनीलीं प्रकासु तयांचा : न संटे आकासामाजी ॥ ३३

तयांवरीं कैसीं माडें सोभती : जैसीं भानुबींबे ठेवीलीं नीगुती
तयाचा प्रकासीं उजळली द्वारावती : प्रकासु सत्येलोक वेऱ्हीं ॥

तो जैसा वडवानळु वोतीला मुसे :
कीं तो प्रकासांचा दीपु उजळीला असे
तयाचें तेज भरलें दाही दीसे : भासळती△ द्वादस आदीत्ये ॥

तयांचा खनोंखनीं फरारें[1] मीरवती : आनि अमीता घंटा वाजती
कीं तो सहश्रमुखेंचि पढतांये[2] कीर्ति : श्रीयादवेश्वरांची ॥ ३६

तेथ आमीतें बाळानी : आणि पुतळीया नृत्ये करीताती परी कवनी
ते कळा देवां लागौनि : चोजवेना ॥ ३७

तेथ वीचीत्रें माडें अवधारी : वीदृमांची सीहांसनें रचलीं कुसरी
नृपवर बैसौनि तयांवरी : नाचवीती अपसरातें ॥ ३८

यैसी वीचीत्र रचना ते नगरीं : वीश्वकर्मेनी केली अती कुसरी
ते सांघतां अवधारी : होइल अतीं प्रसंगु ॥ ३९

आणि घर नीरंतर अवधारी :
वीष्णुग्रहेंसी वाइलें चौबारीया वीहीरी
तेथचें पानी चाले भानवसा भीतरीं : सकळ जनांसीं ॥ ४०

ऐसे आमीत मढ मंडप बावी वीहीरी :
असो हें तया संक्षा कवन करी
परी मुक्षत्वें बोलीलें व्यासकुमरीं : तें सांघैन आतां ॥ ४१

बाहीरील वाडी योजनें अठरा : तीये मध्यें रत्नखचीत प्रसादु लक्ष बारा
सात लक्ष कुंजरांवरी अवधारा : सीहांवरी पांच लक्ष ॥ ४२

आणि द्वादस योजणें भीतरील वाडी दुसरी :
तेथ नवलक्ष प्रसादु अवधारी
पांच लक्ष कुंजरांवरीं : सीहांवरीं च्यारी लक्ष ॥ ४३

तिये आंतुल षड्[1]योजनें वाडी तीसरी :
तेथें चींतामणी कामउनी कुसरीं
महाप्रसादु रचीले नारी[2] कुंजरावरीं : लक्ष पांच ॥ ४४

यैसी छतीस योजनें द्वारावती :
माजी सवीस[1] लक्ष महाप्रसादु झळकती
येरां कवन करी नीगुती : देउळां घरोंघरीचींया ॥ ४५

आतां असो हे वर्नना : सांघैन पौळीची रुंदी गणना
कवणी ठाइं वासु कवणां जनां : तें परीयेसा पां ॥ ४६

आइका दों दों पौळी भीतरी : रुंदी तीनी तीनि योजनें अवधारी
तेथची रचना वस्ती कुसरी : वर्णु कवणु जाने ॥ ४७

सेवटील दों पौळींमाजी आइका : वसताती अठरा पगड जातीचे लोक
तयांची काइ सांघों नांदनुक : जया तें वोळगती रीधी सीधी ॥

आणि तीयेचि पौळि आंतु : श्रीकृष्णाचा परीवारु असे वसतु
तयांसि गणीत संख्या अंतु : कवण करी ॥ ४९

तया आंतुली तीं पौळींमाजी जाणा :
वसताति थोवेकारु च्यारी प्रयोथें साहानां
तयाचें करीतां वर्णनां : होइल अती वीस्तारु ॥ ५०

तया आंतुलां[1] दों पौळी नीरुपमां : वासु रुषी ब्राम्हणां उत्तमां
सवाये लक्ष ब्रह्मपुरी तयासी उपमा : कवना देवों ॥ ५१

तेथ घरोंघरीं होमसाळा हवनें : सीवाइलें वीष्णुग्रहें प्रशादु भुवनें
चोवीसां मुर्तिची स्थापना अनुक्रमें : देउळें घरोंघरीं ॥ ५२

आणि चौबारीया घरोंघरीं वीहीरी :
रत्नखचीला देउळीया रवणियांवरीं
आठसटी तीर्थांचे वोघ आले भीतरीं : गौमुखें वाहातातीं ॥ ५३

ऐसीं घरोंघरीं सर्व तीर्थे जाना : ब्राह्मण मुख्य सकळही जनां
ऐसी तेथची पवीत्र रचना : वर्णु कवण जाणे ॥ ५४

तेथ जवळींची श्रीकृष्ण परब्रह्मघन[१] : तया न लगे आन देवतीं भजन
परी देवो कर्मासीं मान देताती आपण : म्हणौनि करणें लागे ॥

ते सकळ समृद्धि△ वीद्ये पुर्ण : सर्व संपती देउनि देवें केले संपंन
ते देतां न घेती कव्हणाचें दान : वर्जिला स्वस्ति शब्दु ॥ ५६

आणि रायां मंडळीकां सकळ जनां : प्रतीदीनि देनें लागे दतदक्षेना
मग ते प्रार्थुनि तयां ब्राह्मनां : उबरां पुजौनि जाती ॥ ५७

ऐसे ते सुखिये श्रीमंत संभोग : वेदवीदु[१] पढते वक्ते व्याकर्नि आभंग[२]
कवी ते वीद्वांस बोलीके चांग[३] : ब्रहस्पतीपस्ये ॥ ५८

आतां असो हे ब्रंह्मपुरी : आठवींये पौळी भीतरीं
छतीसां राजकुळीयांचे राये अवधारी : आनि रथहस्ति माळा ॥

आणि नवावीये पौळी आंतु अवधारा : पैंसु योजनें बारा
तेथ वासु सारंगधरा : यादवां सहीतु ॥ ६०

तीये यादवांचीं मंदीरें : अवघीं येकवीसां खनांचीं मनोहरें
वीस्तिर्नें गगन चुंबीतें थोरें[१] : कळसीं गरुडटके ॥ ६१

तया आंतु तेजीयांची पागा : आणि हस्तीचीया हस्तीसाळा सैंगा
रथांचीया मांडलीया[१] अभंगा : कोंडी संक्षा ॥ ६२

तेथ घोडेयांचा हींसीं : कवाडें पडताती श्रवणांसीं
आणि नेहा उठीतांये आकासीं : गगन गर्जितांयें ॥ ६३

आणि हस्तीचे कींकाट थोर : तेणें दाही दीसां गर्जतांये अंवर
जैसे कोडी येक मेघ देताती ढेंकुर : आकासामाजी ॥ ६४

आणि वाजती ढोल संख भेरी : नीसानांचा नादीं फुटती गीरी
यैसा वाद्यंत्रांचा गजरीं : कांनि आइकीजेना ॥ ६५

आतां असो हे बोल परीकर : सेषा न वर्नवे तें नगर
ब्रहस्पती सारीखे बोलके चतुर : परी तयाही न वर्नवे ॥ ६६

ऐसी ते पवीत्र नगरी : कैवल्ये नायेकाची परब्रम्ह पुरी
तेथ राज्ये करीतायें रावो मुरारी : परम पुरुषु ॥ ६७

तेथ अमीता आडबीदी[1] कवनें सांघावीया :
पाहातां तीनि सहश्र हाटवटीया
तयामाजी थोरा राजबीदी परीसावीया : आठांहीं[2] दीसां ॥ ६८

तया तींसहश्रांमाजि परीकरा : पांचा खनांचीया सतें सतरा
तीं खनांचीया सतें तेरा : या बोलीलीया व्यास देवें ॥ ६९

आइका महीमां आठा△ राजबीदींची : कवनी रचीली कवणां रत्नांची
कीती कीति या खणांची उंची : कवनीं कवनीये दीसे ॥ ७०

आइका पुर्वेची राजबीदी प्रसीध : ते मानीकांची उभवीली नीबंध
तेथचे सोळा खन प्रसाद± : गगन कवळीताती ॥ ७१

दुसरी राजबीदी आग्नकोनीं : तेथची मंदीरें पंधरा△ खनीं
तेथ आवर्घी पेरोजांची उभवनी : मीरवे अतीमानें ॥ ७२

तीसरी देखा दक्षीन दीसे : ते पाहातां चौदा खनि असे
पद्मराग कामवीले कैसे : तीये राजबीदीं ॥ ७३

चौथी पातां नैरुत्ये कोनीं : तीये राजबीदींची वीचीत्रें△ तेराखनीं
नीगुती वीदृमांची उभवनी : मग रचली ते ॥ ७४

पांचवी पसीम दीसेची जाना : तेथचीये राजबीदी बारा खन
तेथ पांचि उत्तम कामाउन : उभारीली ॥ ७५

साहावी वायो कोनीची अवधारा : तेथ कामवीला अवघा हीरा
पातां तेथचीया मंदीरा : अवघी अकरा खन ॥ ७६

सातवी उतर दीसेची नीगुती : तेथ सोमकांत कामवीले वीत्पती
तेथची दाहा खनी मंदीरें झळकती : श्वेतें[1] चंद्रापस्ये ॥ ७७

आठवी इसान्यें कोनीं : तेथ आवघी इंद्रनीळांची उभवनी
तेथची मंदीरें नवखनी : सैंग सोभताति ॥ ७८

तीये द्वारकेसीं सुद्रसेन : घरटी करीताये आपन
शतवेळ फीरे जवं नयेन : पातें हालवीतां ॥ ७९

तें श्रीकृष्णाचि कार्यें हेतु जाणौनि : मार्गु सोडी सुष्टां लागौनि
आणि दुष्टभावां[1] करी[2] रीगवनी : तयांचा छेदु करी ॥ ८०

तें माहापापातें करी शतकुट : आनिकां वीघ्नां काळाची मोडी वाट
धारे पडे तयां मोक्षपद दावीतांये नीट : उतरों नेदी मागुतें[1] ॥

तें देवाचें श्रीकरीं सदा असे : आनि नगरा भोंवतें भ्रमता दीसे
ऐसें सक्ती सामर्थ्ये तया असे : जें सहश्रधा होउं सके ॥ ८२

ते नगरीं देव द्वीज रुषी मुनी : आणि प्रजे आडकाठी नाहीं तीये स्थानीं
येरां रायां कृष्ण आज्ञे वांचौनि : रींगावा नाहीं ॥ ८३

असो हें प्रवेसु तेथ जाला सुदेवासीं : भीतरीं उभा राहीला दारवठेणसी[1]
तवं आंतुल रचना देखिली कैसी : वीचीत्र द्वारकेची ॥ ८४

सवील पुसताती सुदेवासी : वीप्रा यें जळावरीं मंदीरें तरताती कैसीं
वीप्रु म्हणे ये द्वारकेसीं : भुमीका पांचीबंध ॥ ८५

कैसें भुमीचें सोहोज्वळपण : प्रतीबींबताती मंदीरें चालतां जाण
आणि सहश्र कीर्नासीं भानु आपण : तळीं उमटला[1] ॥ ८६

ना ना कीं तो दो ठाइं जाला दीनमणी :
येकु द्वारका राहीला सीरीं धरुनी
दुजावरीं आपुली करीताये वोंवाळणी : श्रीकृष्णरायासीं ॥ ८७

कामधेनु कल्पतरु चींतामनी : ये श्वर्गि भोग्ये येका इंद्रा लागौनि
या रीधी द्वारके दीधलीया श्रीचक्रपानी :
भोगावया सकळ जनांसी ॥ ८८

तेथचे जन संपन्न कवणें मानें : आवघेयांसीं चींतामणीचीं भुवनें
द्वारीं कल्पतरु कामध्येंनु गोधनें :
घरोंघरीं सकळ जनांसी ॥ ८९

तयासि वोळगती अष्ट माहासीद्धि : नाहिं जरा मृत्ये दुख व्याधी
सकळां वयेस्थंबनी वीद्या आयुरवृधी : तया संसारु आंकणा ॥ ९०

तेथचे वेव्हारे कैसे असती नांदत : जेही श्वर्ग मृत्ये पाताळ समस्त
ऐसे त्रैलोक्यें केले दर्भस्त[1] : राये रानींयें केले ९१

घरीं वस्तुचे डोंगर अखंड भांडारें :
नवखंडें वसवीति तयांचे वाणींवेव्हारें
श्वर्गि वैकुंठीं जें केणे सरे : तेथें पुरवीताती ॥ ९२

सेवटील पौळीसी पेठ भरली असे थोर :
तेथ सर्व केणी उद्येमी मीनले असती अपार
या नवां खंडीचेया[1] सदा व्यापार : तेथौनि चालती ॥ ९३

ऐसीया नवही बोलतां अती कुसरी :
तरी स्थळ△ चालैल अती वीस्तारीं
आणि जाणते कोपतील अवधारी : अतीरसु बोलतां ॥ ९४

तया नव्हां पौळीसीं नवां खंडीचे राये :
अवघे सपरीवारीं वोळगताति पाहे
तयासीं श्रीकृष्णें उलीगे दीधले ठाये : राखावयाचीं[1] ॥ ९५

ऐसी पहीली पौळी देखौनी : वीप्र म्हणे बापु नगरी धन्ये धन्येनी
हे आम्ही दैवें देखिली राजधनी : भीमकीचेनि प्रसादें ॥ ९६
मग तेथौनि नीगाला सामोरा : तवं जेहीं रुपें जींतलीया अपसरा
तीया सामान्यें वनीता अवधारा : पुढां देखतां जाला ॥ ९७
तीया अती रुपसुंदरा नायेका : जैसा श्रृंगारु मूर्तु[०] जाला नेटका
आपनयासी दावावया कवतुका : मन्मथासीं ॥ ९८
तीये बाळानेयां माडावरीं : बैसलीया देखिलीया सुंदरी
जैसीया कुळदेवता अवधारी : आनंगाचीया ॥ ९९
पुढां वीदृमांचेया चौरंगावरीं : रत्नांचीया मांडौनि सारी
सोमकांताचे फांसे घेउनी करीं : खेळती वीळासीयेसीं ॥ १००
आणि तयांचीया सेवका मांचेगाणी : अती सुंदरा चतुरा जानी
तीया हांसती उर्वसीये रंभे लागौनि : आरीख[१] म्हणौनी[१] ॥
जरीं बोलों अतीरसु बहुळ : तरी तो उदीयांचा उरे काळ
आणि वीप्र असे उतावेळ : श्रीकृष्ण भेटीलागीं ॥ १०२
यैसी ते श्रृंगाराची पेठ देखौनि :
वीप्रें खालौती दृष्टी घातली मेदनीं
मग श्रीकृष्ण नाम△ स्मरौनि : पुढां नीगता जाला ॥ १०३
तीया बोलीलीया कामीनी :
म्हणती वीप्रा कां जाता भोगभुवन सांडोनि
आणि काइ हारपलें मेदीनीं : उतावीळ कवनालागीं ॥ १०४
तवं वीप्र बोलीला वचन : म्हणे हें पाहातां भोगभुवन
जरी हें वोढाळ राहीलें मन : तरी अंतर पडैल श्रीकृष्ण भेटी ॥
आणि येथ हारपले बहुत जन : रुषी मुनी सुरगन
नृप मानवी जे जे सज्ञान : मुढां अंतु नाहीं ॥ १०६

ते पातां तवं कैसी दीसताती बापुडी : पडीली कामभोगाचा आगडीं
ते अद्यापि डहुळीते ठेली दुथडी : तापां दुखार्नवांची ॥ १०७

आनि ये[1] रजभुमीकेवरीं[1] : कामतरूचे * कांटे असती भारी
ते नीरक्षेन करीतां सुंदरी : आम्ही जात आसों १०८

यैसेनिहि जरी येकाधा मोडैल पाइं : तरी उर्धगती कुंठैल पाहीं
मग अद्यापी बुडावें डोहीं : दुखार्नवा माजी ॥ १०९

आणि अम्हां श्रीकृष्णा भेटीची चाड : म्हनौनि हें काहींचि न लगे गोड
आणि येथ गुंपौनि पडती ते मुढ : मुचती परमसुखातें ॥ ११०

तवं तीया हांसील्लीया चतुरा : म्हणती जावोंद्या गे वीप्र म्हातारा
यासीं भेटावें असे सारंगधरा : सोडा देवाचा म्हणौनि ॥ १११

तेथौनि निघाला नीट : तवं पुढां देखिले वानीयांचे हाट
तेथ सर्व केणीयांचि पेठ : भरली असे ॥ ११२

तेथ चौरंगां गादीया वरीं : वाणिपुत्र बैसले असति अवधारी
तयांसि रत्नांचे अळंकार करीं : तराजु[1] कनकाचीया ॥ ११३

तेथ पोतासु उदयेभास्करू चंदन : ग्राहीकांसि देताती तुकेवीन
जवादि कस्तुरी वोपीताति जान : आनुमानें हाताचेनि ॥ ११४

तेथ घरोंघरीं चींतामनीं : तरी घेने देनें काइसया[1] लागौनि[1]
सुशव्द गुण यां दों वांचौनि : आणि बोलों नये ॥ ११५

सुशब्दें गुणें दीजेति राज्यें : सुशब्दें वेवो वऱ्हाडे कीजें भोजे
सुशब्द ब्रम्हवीद्या ज्ञान कथीजे : आणिक काइ थोर असें ॥ ११६

ऐसा सुशब्दें गुणें व्यापारु : तेथ चाले हा सत्ये नीर्धारु
परीं आड केला असे व्यापारु[1] : रत्नांचा तेथ ॥ ११७

पातां कासारांचा हाटीं : आवघी कनकाचीच राहाटी
थाळे झारीया आडनीया वाटी : आवघी रत्नखचीतें ॥ ११८

मुक्ताफळां रत्नांचें हार कुसरी : वोउनि ठेवीले पाटाउवां वरीं
आनर्घ रत्नखचीत चुडे* अवधारी : लेतां देखे सुरंगनां ॥११९

तेथ सीपाटी[१] मीरवे कैसी : सुरंगें वस्त्रें कोडी कापडांचीया रासी
सरुपें पहातां दृष्टी तरळे कैंसी : कांप अंगीं* सुर्याचा ॥ १२०

देव्हडीं बैसली सींपीनी : मध्यें सरुपें ठेवीलीं उकलौनि
देव चमत्करीती* ते देखौनि : मोल करवेना ॥ १२१

पुढां रावनकारु देखिले : जयाचें रावन वीश्वकर्मेनि वाखानीले
कां जे श्रीरंगीं रंगले : म्हणौनियां ॥ १२२

पुढां कल्पतरु लागले दाट : तयातळीं बैसले दुसीहाट
तेथ आमोंलीका वस्त्रांची पेठ : भरली असे ॥ १२३

जेथ आपण कल्पतरु आंगें : वस्त्रें नीफजवी उतम चांगें
म्हणौनि त्रीभुवनीं देवांगें : म्हनीजती-यांतें ॥ १२४

तें उतमें देखोनि सहजें : आपुन वीद्युलता लाजे
आणि तीचा आंगीं दहकत्व सहजें : म्हणौनिं ते उपमुं न ये ॥

आणि तीयें न मैळति कदा : नेसतां व्यापारीं सुरंगें सदा
नव्हेती जीर्णे यैसीं वीनोदा : सारीखि तीयें ॥ १२६

तयापुढां रत्नपारखि ठीकवनी : बैसले रत्नांचिया रासी मांडोनि
आनर्घ्य रूप करीताति नयेनीं : धरीलेयां वीन ॥ १२७

जे न पारीखवती ब्रह्मादीकां : तयासीं ते रूप करीताति देखा
ऐसे ते वीत्पन्न त्रैलोक्या : हांसती वीश्वकर्मेयातें ॥ १२८

तवं पुढां पावला चौबारीं परीकर : तेथ दोहीं सरकोनीं बैसले सोनार
ते घडीताति रत्नखचीत अळंकार : श्रीकृष्णमेचुचे ॥ १२९

ते वीश्वक्रमेयातें हांसती : म्हणती हें न कळे तुमचीया मती
आम्हां अधीक असे श्रीकृष्णयुक्ती : म्हणौनियां ॥ १३०

तवं बैसले पुढां तांबोळी △ तांबोळीनीं : आळंकारेंसिं सुंदरा वानीनि[1]
+पत्रें फोडी कापुर मांडौनि : चुना मुक्तांफळांचा ॥ १३१

त्या वाटे जातां धरीति पदरीं : बळीयां वीडे देताति करीं
येकी कापुरोदकेंसीं सुंदरी : ठाइं ठाइं उभीया ॥ १३२

तया पुढां माळिनी माचेयावरीं : शृंगारु करुनीयां बैसलीया सुंदरी
पार्यातकांचे झेले देखा करीं : घेउनीयां ॥ १३३

तीया पालवीं धरीति वाटे जातां : करीं झेले वोपीती उचीता
आणि वरीं कुसुमें घालीताति माथां : जातां नरनारीसीं ॥ १३४

आणि गंधर्वादि करीताति वीलेपनें : कर्पुर कस्तुरी हरीचंदनें
यैसे फुकाचे भोग भोगनें : जातां राजबीदीं ॥ १३५

ऐसें देखे हाट चौहटे चौबारी : सनादबंद[1] नाना भोग वीचीत्रांपरी
आणि ठाइं ठाइं कीर्तनें नृत्येकारीं : रुषी पुराणें पढताति ॥ १३६

आणि देखे अष्टभोगांचि छत्रें : जें देवें घातलीं पवीत्रें[1]
"तेथ अमृत[2] सीधरसु[2] कामवंते"* : सकळ जनांसि ॥ १३७

चोहटां घोडे नाचवीति राजकुमर : आणि माहामंतु फीरवीताति कुंजर
श्रीकृष्णाचीये वोळगे राये जाताति थोर : डोलीयां सुकासणीं ॥

ऐसे ते नगरीं वीचीत्रु वीहार : विप्र देखतांये परीकर
आतां असो हा वीस्तार : सांघैन पुढील कथा ॥ १३९

आतां नसौनि कैवल्येपती : सांघैन पुढीले स्थिती
वीप्रासी कैसा भेटला श्रीकृष्ण चक्रवर्ति : तें सांघै कवी कृष्णदासा ॥

**प्रसंग अकरावा समाप्त** * (ग्रंथसंख्या १२८८)

श्रीकृष्णार्पणमस्तु

अनुक्रम ८००५.७ वि: ... नों: दि: २८।१९५५

# प्र सं ग बा रा वा

श्रीपरमात्मने नमः

ऐसें पाहातां वीचीत्रापरीं : सुदेवो नवही पौळी क्रमुनि आला भीतरीं
उभा राहिला महाद्वारीं : तेथ रचना देखिली कैसी ॥ १

ते कैसें मीरवतें महाद्वार : जें वीश्वप्रकासाचें काढुनि सार
कैसें नीगुती उभवीलें आरुवार : वीश्वकर्मेनि* ॥ २

तेथें बरवें रचीलें दामोधर△ : पंचवीसा खनांचें मनोहर
तयांचा प्रकासीं भरलें अंबर : भासलेती[२] द्वादसादीत्ये ॥ ३

तेथ मीरवती माडे बाळानी : जैसे कोडी येकी उगवले दीनमनी
तयांचा प्रकासु न संटे गगनीं : कळसीं भानु लोपला ॥ ४

आणि महाद्वारीं देव्हडे परीकर : वीचीत्र चिंतामनिचे लंबोदर
रीद्धी सीद्धि बैसले उदार : वीघ्नें नासावया ॥ ५

ऐसें देखौनि महाद्वार : वीप्रें नमस्कारीलें[१] जोडुनि कर
बाहीरीं कैसें सैन्यें दाटलें आपार : श्रीयादवरायाचें ॥ ६

जे मदोन्मत भद्रजाती : ते दोहीं सुरकोंनि उभे हाती
तयापुढें घोडयांची दाटनी अती : ते काइ सांघो ॥ ७

दांडीया डोळीया सुकासनें खांदीं : भोइ उभे असती दोहींकडे बीदीं
राये जोहारा गेले गोवींदीं : तयांची वाट पाहाताति ॥ ८

तेथ देव द्विज रुषी मुनी : दैत्यां दानवां होतांय दाटणीं
ऐसें येरयेरांचा मुंडपघसनीं : रीगवेना ॥ ९

मग वीप्रें दाही जन घोडेयां सहीत : बैसवीले सुखछत्र होतें तेथ
आपुन नीगाला[१] वो सारींत : मांदीयाळे ॥ १०

यैसा रुषी मुनी देवांतें लोटीतु : रीगाला माहाद्वारा आंतु
तवं सभामंडपु कैसा सोभतु : देखिला तेनें ॥ ११

त्या सभामंडपीं श्रीकृष्ण भुवनीं : तेथ आवघे कामावीले[१] चींतामनि
आणि परीसीं बांधली भुमी : सोभे अतीमाने ॥ १२

तेथ सब्दवेधीया रसु प्रतौनि : आणि सीधरसु कलसौनि
तयेवरीं पत्रवली रेखिली परी कवनीं : वोश्वकर्मेनि पैं ॥ १३

ते भुमीं पवीत्र उतम जान : वरी देवांचेया संबंधाचें सामर्थ्यें गहन
म्हणौनि महापापा करी क्षाळन : दृष्टी देखत क्षेवो ॥ १४

ते आवधी रंगली श्रीकृष्णचरनीं : म्हणौनि वंद्ये जाली त्रीभुवनीं
तीतें सदा चींतीताति रुषी मुनि : हृदयामाजी ॥ १५

तीयेवरी सभामंडपाची उभवनी : तेथ कामवीले नवरत्नें चींतामनी
जयाचा घरीं सागरा सारिखि रत्नांची खानि : तेथ काइ उनें ॥

तळीं इंद्रनीळाचे तोळंबे सैंब : वरी कांडारींव चिंतामनीचे खांब
पेरोजांचीं हीरंगनें सैंब : बंक पद्मरागांचे ॥ १७

वरी सैंब पाचिचे भारवट : आणि वीदृमांचे प्रतिपट
मडळसा हीरेयांचीया पुतळीयांचे लाविले नेट :
तयाचा करीं दीप रत्नांचे ॥ १८

मानिकांचीया बोहटिया सुरंग[१] : भवंते सोमकांताचे भीति अभंग
तेथ वीचीत्र चीत्र लीहीले चांग : वीश्वकर्मेनी ॥ १९

आणि खांबो खांबीचीया पुतळीया : तीया चींतामनिचीया बरवीया
नृत्ये करीताति अवघीया : वीचीत्रांपरी ॥ २०

तें देखौनि रुषी तुकीताति माथे : आणि वीस्मयो करीताति देवते
म्हणती जीयें रत्नें नाहीं हरीहरातें : तें मंडपीं लागलीं ॥ २१

तळीं भुमीचे सोहोजळपनें : कैसीं प्रतिबींबली तारांगनें
जैसे दीप क्षेवनीले कीं ते आलीं निधानें : वोळगे देवाचीये ॥२२

ते कैसी भुमी सोहोजळ आणि सतार : चालतां नृपांचे उमटति ठकार
वीखरले सरीसे करीतात आळंकार: प्रतिबींब देखौनिया ॥२३

ऐसी सांघतां कळा कुसरी : तरी कथा चालैल अती वीस्तारीं
असो हें वीप्रें दृष्टी घातली सामोरी : तवं कैसी स्थानी देखिली[1] ॥

तेथ यादवांची बैसली सभा : ते श्रीकृष्णें पावली सोभा
तीचें बरवेंपण देखौनि लोपली प्रभा : इंद्रसभेची ॥ २५

ते सभे पढते वक्ते पुराणीक : वेदुवीदु वीद्वांश वार्तिक
त्रीलोकींचीं पात्रें कळावंत आनेक : वीप्र बंदीजन ॥ २६

आणि त्रैलोकीचेया रायांचे गुपतीये : मात सांघते अवश्वरीये
बैसले श्रीकृष्णरायाचीये : सभेमाजी ॥ २७

फुल* बडवे आणि कऱ्हेरी : चवरढाळ हडपधरी
हे अवघे राया मुरारी : जवळीकेसीं ॥ २८

आतां कैसे क्षेत्री वानु तये[1] सभेचे :
जेहीं आंकनां घातले राये त्रीभुवनीचे
जे प्रतापीये भद्रजाती श्रीकृष्णाचे : बरवे आनंगापस्ये ॥ २९

तयांची आटीवें मुंडपे रगतांबर[1] दृष्टी :
उफराटीया रोमां मुदगल मुष्टी
प्रतिवाद्याचें यैसे बैसले नीहटी[2] : जे नवनाग सहश्र बळी[3] ॥३०

आणि दैत्ये दानव कैसे सभेसी : जयाचा धाक त्रीभुवनांसीं
ते यादव देखौनि करपे मीसी : भेणें वैरीयांची ॥ ३१

जे रणवीभांड रणराक्षेस : रणरंगधीर रणग्रास
येक रणबागुल रणभयेभीस : आणि रणपीसे जे ॥ ३२

आनि जे रणदीवे रणदावांनळ : येक रणसींहु रणसार्धुळ
येक रणमाहाजाळ : रण कोल्हाळ जे ॥ + ३३

आनि जे राये ठोंसर हातमल : येक राये तडक± राये तोडरमल्ल
एक राये आडसुळ राये हेसल : राये रणबंबाल± जे ॥ ३४

आणि जे जगझडप जगकृदांत : येक जगजोहूरे जगजीत±
जगघडक जगधुमकेत : जगजमजुत जे ॥ ३५

येक जगदळे येक रायेसळे : येक जगसौरे जगजवंजाळे
जग आमुले जगव्याळे : जगझडप जे ॥ ३६

हे आडनांवाचे वीर : आणिकही असती आपार
तयाचा करीतां वीस्तार : होइल अतिप्रसंगु ॥ ३७

आणि जे प्रतापीये सुभट : कोपलेयां त्रीलोक्यांचा भरीति घोंट
ते यादव± दळ नीट : बैसले चहुंकडे ॥ ३८

ऐसे छपनकोडी यादव वीर : आणि छतीसां कुळीयांचे राजकुमर
जे प्रतापीये माहासुर[1] : आंगवीती[2] त्रैलोक्यासीं ॥ ३९

तयांचे प्रताप सांगता अद्भुत : यैंसे राये बैसले अमीत
ते आवघेचि आनंद भरीत : वरीं श्रीकृष्णमेचुचे लेणें ॥ ४०

ते आवघेचि सुंदर श्रीमंत जान : वरी श्रीकृष्णयुक्ती वानीजे वीत्पन्न
देवां रुषीतें हांसती आपन : आरीख आसामर्थ्ये म्हणौनियां ॥४१

ते सभे ब्रम्हादीक देवो सुर पुरंधर : रुषी मुनि यौगेश्वर
आणि सप्तदीपावतीचे बैसले सुर[1] : तयांचीं नांवें कवन जानें ॥

छतीसां राजकुळीयांचेया नृपवरां : ते सीहांसनांवरीं सहश्र बारा
तयावरी कनकदंडें अवधारा : ढळति दोहीं बाहीं ॥ ४३

आणि छतीसा सहश्रां रायां : सभे चाउरी पडली असे तयां
बैसले असती मांडीयां मांडीयां : दाटौनीयां ॥ ४४

आणि आवघे सभेचे लोक सुंदर : जैसे मदनाचे अवतार
आणि बोलीके वीत्पतीसार : नागवती कळीकाळाते ॥ ४५

ऐसीं देखीनि ते स्थानीं : वीस्मो जाला वीप्रांचां मनीं
मध्यें दृष्टी घातली तवं सीहासनीं : देखिला यादवरावो ।। ४६
ते सीहासन वोतीलें प्रकासाचें सेंब : कीं जैसे कामावीलें सुर्येबींब
म्हणौनि सभेचें प्रतिबींब : आंतु उमटे ।। ४७
सभा उजळली प्रकासें तेणें : न लगति दीप लावणें
जेहीं रत्नीं दीनकरा आनिलें उणें: ते सभामंडपीं लागली[१] ।।४८
ऐसें पाहातां तीये सीहासनीं : बतीस सींहाडे सोडवीले जानै
आनि पुतळीया खनोंखनीं : नृत्ये करीताती ।। ४९
आणि चांदवा सोभे वरीं : तयाची वर्णु नेणिजे थोरी
जो कामवीला अती कुसरीं : बीश्वकर्मेनीं ।। ५०
तेथ उपवीष्टु श्रीसारंगपाणी : तयासी उपमा द्यावी कवणी
जे सर्वलावण्याची नीधी खाणि : तेचि मुर्ति आकारीली ।। ५१
तो सीद्ध कैवल्याचा पुतळा : कीं तो आनंदचि आलखैला[१]
ना ना कीं ब्रह्मरसु आकारैला* : आन बोलोंचि नये ।। ५२
हें वीश्व जन्मलें जया पासौनि : तयासि उपमा द्यावी कवनी
श्रीये सारीखि कर जोडौनि : वोळगते[१] जयातें ।। ५३
जरी दुजा असता हृशीकेशी : तरी उपमा होती सरीसि
तया श्रीकृष्णा सारीखे शृष्टीसीं : दुजे पातां न दीसे ।। ५४
पातां श्रीकृष्णाचें रुप लावन्यें : मदनाचे कीजे नींब लोन
आणि सौभाग्यें वेधताति जान : देखौनि नरनारी ।। ५५
जैसीया इंद्रनीळाचीया कीळा : येकवटलीया सकळा
तयापरस्ये आंगकांती गोपाळां : नीन्हां साजे[१] ।। ५६
कुंकुम जींतलें चरणतळें : आंगुळीया जैसीया इंद्रनीळाची कीळे
आणि नखें जैसीं सोभती उजळें : शुक्रापरस्ये ।। ५७

चर्रनि वांकी तोडरु बोभाटी : पीतांबरु कासीला मालगंटी
रत्नखचीतु मेखळा गोमटी : झळके कासेवरीं ॥ ५८

सतेज वोहरतें वर्तुळ : जैसें इंद्रनीळांचें कोळ
तैसे मीरवति करकमळ : गोपीनाथाचें ॥ ५९

आंगुळीया श्रीमंता सरळा : मुद्रीका झळकती रत्नकीळा
नखांतें देखौनि चंद्र लाजीला लोपलीया[१] कळा[१] :
कळंकीया म्हणौनि ॥ ६०

हातीं हातसर आइका : वीरकांकणें तुळबंधीका
भुजेवरीं बासींग देखा : ब्रीदें म्हणवीतो रणनोंवरा ६१

आणि जेणें द्वादशां आदीत्यांतें : तेजें आंकनां घातलें तयातें
तो कौस्तुभु मीरवे सजातें[१] : माळ वैजयंती ॥ ६२

कैसें प्रहसीतु वदन: तयासीं चंद्राचें* कीजे नींबलोण
ब्रीदें पढवीताति दसन : तेजें हीरेयां वरीं ॥ ६३

आधरीं जींतलें पक्व बींबफळ : वदनीं मीरवे सुरंग तांबोळ
आणि नासापुट मीरवे सरळ : वीशाळ नयेन देखा ॥ ६४

कैसी मकरकुंडलें श्रवणीं : जेंहीं तेजें जींतला तरणि
मुगटीं मुगटमणी[१] मीरवे परी कवणी : आनर्घाचा ॥ ६५

सर्वांगीं हरीचंदनाची उटी : कस्तुरीचा टीळा लल्हाटीं
वरी फुटा पांगुरला जगजेठी : सोनेंसळा ॥ ६६

ऐसा सुंदरु रावो मुरारी : श्रृंगारु करुनी वीचीत्रांपरी
उपवीष्ट सींहासनावरीं : मीरवला देवो ॥ ६७

पुढां उधवदेवो मंत्रीयां गुरु : मागां सात्विकी आक्रुरु
वामें रामु रोहीनीकुमरु : दक्षीनें वसुदेव नंद* ॥ ६८

आधीक प्रसन्नता जयावरीं : तो अर्जुन बैसलासे दक्षीनां करीं
तयाचा हात धरुनियां मुरारी : गोष्ठी करीतांये ॥ ६९

जयासीं करीती आजेपनाचा मानु : आपण जगजीवनु
तो देवकु आणि उग्रसेनु : बैंसले जेवनीये भुजे ॥ ७०
वरी ढळतातित कनक दंडें : वगते वार्तिक वानितातित पवाडे
नारद तुंबर आळवितातित कोडें : नृत्यीं अष्टनायेका ॥ ७१
ऐसा समवेतु सुरंगनीं : वीप्रें देखिला श्रीसारंगपानी
आनर्घ नारीयेळ दरुशन करुनी : मंत्रु म्हनीतला ॥ ७२
म्हणे सहस्रसीरषा पुरुषा : हा मंत्रु म्हणीतला देखा
मग आक्षेतीं आर्पिलें आदीपुरुषा : केली पुष्पांजुळि ॥ ७३
ऐसें आर्चन करुनी : साष्टांग घातलें लोटांगनि
श्रीचरण सीरीं धरुनी : राहीला नीश्चळ ॥ ७४
तवं देवें उठवीला वीप्रुराजा : दीव्ये सीहासनीं बैसवीला वोजा
मग आनर्घ्यं करवीली पुजा : श्रीसारंगधरें ॥ ७५
अती सन्मानें* संतोसु जाला द्वीजा : हृदइं प्रकटला श्रीकृष्णराजा
तेणें वीसरला नेणें मी कवनीयां काजा : आलों पैं येथ ॥ ७६
तवं तो श्रीकृष्ण सर्वज्ञरावो : जाणें सर्वांचा मनोभावो
मग आपनचि केला उपावो : श्रीयादवराये ॥ ७७
मग हडपी खुणावीलें मुरारी : सकर्पुरें वीडा चालीला सभे माझारीं
कळावंता दाये पसाये नानापरीं : दीधले देवरायें ॥ ७८
ऐसे पाठवीले मानीये मंडळीक : मग ते अळंचु करीतातित येकमेक
म्हणति आजि वीप्र दरुसन आलौकीक : परी काहीं आपुर्व असे ॥
हा वीप्र आलेयांवरीं[१] : आजि सकाळीं पाठवणी दीधली मुरारी
परी कांहीं असे कुसरी : ते न कळे आम्हां ॥ ८०
तवं म्हणे उधवदेवो वीरु : हा भीमकन्येचा गुरु
येथ गुपतीयें आला परी कांहीं वीचारु : आपुर्व असे ॥ ८१

तेथ मांडला असे वीव्हावो : परणुं[1] आला असे सीशुपाळु रावो
आणि हा येथ आला परी आभीप्रावो : कांही नवल असे ॥ ८२

काली आम्हीं देवासीं गोष्टी केली :
"जी चैद्य भीमका सोइरीक आसे मांडली"△
तवं देव म्हनती तुम्ही आइती करा वहिली : जावों वऱ्हाडीकेसीं ॥

हें तवं देवो बोलीले हांसत : परी हें वाक्ये नव्हे आसत्य
आतां जाणें होइल नीभ्रांत : कौंडनेंपुरासीं ॥ ८४

आतां श्रीकृष्ण प्रनैल भीमकी : हें सत्ये न चुके ब्रह्मादीकीं
तवं रामु म्हणे बरवी वाचा नीकी : तुमची असे ॥ ८५

असो हें सभेसि देउनी पाठवनी : मग वीप्रेसीं श्रीचक्रपानी
आले आपुला नीज भुवनीं : स्वागत सारीलें ॥ ८६

जाली देवासि आरोगन : आनि वीप्रासि पंक्ती भोजन
ते सांघतां रचना : वीस्तारु होइल ॥ ८७

असो हें सकर्पुरें वीडा घेतला मुरारी : मग वीप्रेसीं आले चीत्रसाळेवरीं
तेथ सुदेवासीं अवधारी : पुसों आदरीलें ॥ ८८

तया सर्वज्ञा न लगे पुसणें : तो सर्वांचें अंतर बाह्ये जाणे
परी मनुष्य वेसु धरीला असे तेणें : तो नटु संपादीताति ॥ ८९

यैसी येकांतीं बैसोनि मात : पुसते जाले जगंनाथ
म्हणती सांगावी पा कवणी हेत : तुम्ही आलेति येथें ॥ ९०

तवं वीप्र म्हणे आइकें श्रीसारंगपानी :
जी वैदर्भदेसीं भीमकुमरी रुक्मीनी
आतां तीयेची वीनवणी : अवधारी देवा ॥ ९१

रायें सीशुपाळु वरु पाहीला : तो न मनें तीये बाळा
तुम्हीं वरीलेति गोपाळा : वेगीं बीजें कीजे[1] ॥ ९२

आतां परीयेसी रुषीकेशी : लग्न असे चौथां दीसीं
वेगीं जरी न पवसी : तरी प्राण तजील ।। ९३

मज नीगतां जी अवस्वरीं[1] : यैसें बोलीली भीम कुमरी
जें देवाचेनि प्रसादेंवीण न स्वीकरीं : आनीकें आन्न ।। ९४

मग वीप्रें काढौनि वीनंती : मुद्रीकेंसीं दीधली श्रीकृष्णाचा हातीं
मुद्रीका करीं घेउनी वाचीली वीनंती : तेणें सर्वज्ञरायें ।। ९५

म्हणे श्वस्ति श्रीपरातपरा : परब्रम्हा परमेश्वरा
पुरुषोत्तमा चीदादि[1]परा : श्रीयादवेश्वरा ।। ९६

तुज साष्टांगीं दंडवत△ श्रीसारंगपानी :
मी देवकीदासी वीनवीते रुक्मीनी
ते श्वीकरीजो जी अर्तादानी : श्रीकृष्णा कृपाळुवा ।। ९७

जये जये श्रीवसुदेवो सुता : आर्तादानी श्रीअनंता
येथें येउनीयां सरणांगता : न्यावें वेगीं ।। ९८

जरी भक्तवछळु म्हनवीसी : तरी वेगीं पावै जी रुषीकेसी
नातरीं ब्रीदें सांडावीं येसीं : मग मीं प्राण तजीन ।। ९९

आजी सीशुपाळ बंदीशाळे माझारीं : मी पडलीयें[1]असे तुझी कींकरी
तरी येथें येउनियां झडकरीं : काढावें मज ।। १००

आणि मज भक्तांसि अडनी : जरी मज वेगीं न पावसी सारंगपानी
तरी भक्तवछळु यें ब्रीदें मेंदनीं : देवें पढवावीं ना ।। १०१

तुज सर्वज्ञां न लगे करणें वीनती : तुं सर्वात्मा सर्व जानसि श्रीपती
परी[1]देवें श्वीकरीली उदास वृती : हाही अपराधु माझाचि ।। १०२

म्हणौनि म्यां वीनंती धाडीली देवा : आतां देवें उसीरु न लवावा
वेगीं झडकरीं दाखवा± : आपुले श्रीचरण ।। १०३

मी मसक देवातें वीनउं नेणें : देवां सर्वप्रकारें येथ बीजें करणें
न या तरीं प्राण धाडीन भेटी कारनें : उचीत लावीन देवासि ।।

या बोला "हास्ये केले"± मुरारी :
म्हणती[१] वीप्रा तुम्हां नीगतां अवधारीं
कैसी आवस्ता होती सुंदरी : ते सांघावी वेगीं ।। १०५
वीप्र म्हणे परीयसीं जी मुरारी : मज वीडा देतां करपला देवीचा करीं
यैसी ते वीरहज्वरें सुंदरी : व्यापीली असे ।। १०६
जरी आतां उसीरु लागैल स्वामी : तरी प्राणु न धरी ते रुक्मीनी
म्हणौनि देवें झडकरुंनि : आतां बीजें करावें[१] ।। १०७
तवं म्हणे करुणांकरु : आतां जरी लावीजैल उसीरु
तरी प्राण तजील हा नीर्धारु : देवी वीयोग न साहे ।। १०८
मग रथ बोलाउनी झडकरी : आरुढले रावो मुरारी
नीगाले येकलेचि अवधारी : वीप्रा सहीतु ।। १०९
तो येकलाचि पुरे इश्वरु : जो करुं सके स्वयें श्रृष्टीसंहारु
म्हणौनि न घेचि दळभारु : आपणयां सांघातें ।। ११०
जो न पवीजे येज्ञें तपें संसारीं : तो वीनतीये सवें चाले झडकरी
भक्तां सांकडें पडों नेदी मुरारी : हें ब्रीदें सांच केलें ।। १११
ऐसा तो वीप्रेसीं श्रीकृष्णरावो : वेगीं पावले मुळमाहादेवो
तेथ राहीले तवं अभीप्रावो : मागां वर्तला कैसा ।। ११२
यैसा देवां तेथ जाला मेळीकारु : तवं मागां बळीभद्रदेवो वीरु
कैसा घेउनी आला दळभारु : तो[१] सांघै कवी कृष्णदासा ।। ११३

**प्रसंग बारावा समाप्त** * (ग्रंथसंख्या १४०१)

श्रीकृष्णार्पणमस्तु

# प्रसंग तेरावा

श्रीपरमात्मने नमः

असो हें तवं मागां अवधारीं : रामु उग्रसेनु होते आपुलां मंदीरीं
तवं गुपतीये आले झडकरी : तेहीं वीनवीलें ॥ १

गुपतीयें मातु सांघती : बळीभद्रां उग्रसेणां प्रती
जी जी नीगाले श्रीकृष्ण चक्रवर्ति : वीप्रा सांघातें ॥ २

तवं तो स्नेहाळु बंधुराणा : म्हणे वेगु करा उग्रसेना
नीघाला श्रीकृष्णराणा : कौंडन्येंपुरासीं ॥ ३

ऐसें आइकोनि उधवदेवो आले : मग थोवेकारु हांकारीले
म्हणे नीसाना घावो द्या वहीले : सैन्यें सामदें' करा ॥ ४

मग रायें धडकु नीसांन ला ला : तेणें त्रीभुवना आटु भवीनला
ना ना तो नवखंडांचेयां रायां हांकारा केला :
जे कटकै मांडली श्रीकृष्णा ॥ ५

तेणें थरारीलें भुमंडळ : सनाद बंध जाले सकळै भुपाळ
पालांनलें यादव दळ : नीमीक्षां माजि ॥ ६

कैसे गुढरीले हाति : घोडेयां पाखरा घालीती
रथ संजोगीले सारथी : टके उभारीताति ॥ ७

डोळीकार डोळीयांसीं धांवती : स्वार वज्रांगीया कळासीती
मादुरी घोडे देखा चालवीती : पालाणौनियां ॥ ८

आढाउं घालीताति मालगंठी : आंगीं लावीताति' चंदनाचीया उटी
करीं वोडणखांडीं झळकती : गळां पुस्वमाळा ॥ ९

धाटीया घालीताति धनुवाडे : पाठीसीं दोनि भाते दे‍व्हडे[1]
हातीं कांडारीव कनकाचे मेढे : चवंरें वांनी बांधताति[1] ॥ १०

तवं भालेकारु चालीले भारीं : पाठीसीं कनकबंधें खेडीं अवश्रारीं
चवंरीयें भाले झेलिताति कुसरी[1] : परीवंटीं कटारीया ॥ ११

असो हें दुसरा घावो जाला नीसाना :
तवं धुरा माहाद्वारीं आलीया जाणा
मग अवश्वरीयें वीनवीला राणा : बळीभद्रदेवो ॥ १२

तो म्हणे जी वेगु सैन्यें सामदें[1] जालें :
आतां राउळें[2] बीजें करावें वहीलें
रथेसीं सारथी पावले : आले माहाद्वारा ॥ १३

मग बळीभद्रु नीघाला बाहेरीं : आरुढले रथावरीं
आतां मुदला धुरा अवधारी : सांघे[1] कवनीं कवनीं ॥ १४

मुख्य रामु अर्जुन उधवदेवो : उग्रसेनु नंदु वसुदेवो
आक्रुरु सात्वीकीरावो : येरी आमीती धुरा ॥ १५

आणि सवें येश्वदा रोहीणी देवकी : सुभद्रा साहोदरी सखि
आवघी व-हाडीकेची आइती नीकी : सवें घेतली ॥ १६

तयां सवें चालीलिया साटीसहश्र कामीनी : चढोनी दांडीयां सुकासनीं
आनि कांहीं परीचारीका लागौनि : संख्या नाहीं ॥ १७

ऐसी सांघतां कुसरी : तरी कथा चालैल वीस्तारीं
आतां कैसें सैन्यें नीगालें बाहीरीं : आइका यादवांचें ॥ १८

राजबीदी चालतां थोर : दाटताती पायांचे मोगर
मागां हांकीताति असीवार : म्हणती वेगु रे वहीलें चाला ॥ १९

ते म्हणती हो गा हो कां येता वरीं : थीरु राहा नांवेकु भारीं
दारवठां रीगतां दाटनी थोरी : होतांये पायेदळां ॥ २०

चालतां रथें रथु दाटती : म्हणती मागां थीरु करा हाती
यैसे माहावंतावरीं कोपती : मंडळीक ॥ २१

तेथें घोडेयांचीया लाळा पडती : आनी वरीं गजमदें झरती
तेणें पायांचे नीसरती : चालतां राजबीदी ॥ २२

ऐसें आठांइ राजबीदां अवधारी : सैन्यें नीगाले बाहीरीं
पुढां आवघें येकवटलें तीरीं : सागराचीये ॥ २३

तेथ बोलाउनी सत्येधाना : तयाप्रती बोलीला रामुराणा
म्हणे मागां तुम्ही करावें येत्न : द्वारावतीयेसी ॥ २४

बरवि रात्रीची करावी नीगुती : बहुतीं नीरवडीं राखावी द्वारावती
जवं ये श्रीकृष्णचक्रवती : तवं सावध' असावें ॥ २५

दैत्यां देवां दानवां : बहुतीं वीचीत्रा असती कावा
देवाचेनि रूपें करीती रीगावा : द्वारकेमाजीं ॥ २६

तरी देवाची तुम्हां खुन असे प्रतोती : ते वोळखावी नीगुती
पारकें जाणौनि उठावें' नीर्घातीं : करावी खांडें पुजा ॥ २७

ऐसा नीरोपु देउनी सत्येधाना : पाठवीला द्वारकेमाजी जाना
मग तो सैन्येंसीं रामुराणा : समुद्र उतरला ॥ २८

प्रव्हानें जुंगें माहाजुंगें आइका : नावा बेडीयां डोनि तया नाही संख्या
ऐसें सैन्यें सागर उतरलें देखा : क्षेणांमाजी ॥ २९

ऐसें दळ चालत असे आपार : मधीं बळीभद्रदेवो वीर
नीसानांचा घाइं अंबर : गर्जतांये ॥ ३०

ऐसा सैंन्येसीं लवलाहें : रामु मुळमाहादेवा आला पाहे
तवं तेथ मेळीकारु केला आहे : श्रीसारंगधरें ॥ ३१

श्रीकृष्णातें देखौनि नयेनीं : बळभद्र उतरला रथौनि
साष्टांग घातले लोटांगनीं : स्नेहें उचंबळला ॥ ३२

मग उठउनी * रावो मुरारी : राम अ लंगीला दोहीं करीं
बैसवीला रायें[1] मुरारी[1] : आपणयां जवळां ॥ ३३

उग्रसेनु नंदु वसुदेवो : आक्रुरु अर्जुन उधवदेवो
यां साहींसीं भेटला देवो : यरीं वंदीले चरन ॥ ३४

देवकी रोहीणि येशोदा : तीहींसीं भेटी जाली गोवींदा
तवं कैसें बोलीली सुभद्रा : तें परीयेसा पां ॥ ३५

म्हणे दादो आइकोनि स्त्रीयेचा हांकारा :
मग सांडुनि सखियां-सोहोदरां
येकलाचि निगालासी सारंगधरा : हें स्नेहकार्यें[1] ॥ ३६

तवं म्हणीतलें सर्वेस्वरें : म्हणे सुभद्रे पुरे वो पुरे
संबंधु नव्हतां यें उतरें : कां बोलसील ॥ ३७

तवं कैसें बळीभद्र बोलीला वचन : जी सांडौनियां सकळ[1] सैंन्य
येकलेयां जावया काइ कारण : तें सांघोजो जी ॥ ३८

परी मज ऐसें गमलें देवराया : जें वेचु लागैल सासुरया
म्हणौनि येची अर्था येकलेयां : देवें बीजें केलें ॥ ३९

मग हांसौनि सर्वेश्वरु : बळीभद्रेसीं मेळवीला करें करु
म्हणे दादो सैंवर नव्हतां हें उतर : करुं नये तुम्हां वाउगेंचि ॥

तवं बळभद्र बोलीला तवंकी :
म्हणे तुम्हां आधीं देवों केली होती भीमकी
आतां सीशुपाळु कवनीं बटकी : जो' नेवों' सके ।। ४१

जी मुसळांचा घाइं जाना : मी मारीन सीशुपाळाचें सैन्य
आणि रुक्मीनीसीं द्यावें सन्निधान : तुम्हीं आपुलें देवा ।। ४२

असो हं रामु कृष्णां जाली भेटी : देवीं केली पुष्पवृष्टी
तो आनंदु न समाये श्रृष्टीं : नीरोपमु ।। ४३

आतां सर्वदळसीं मुरारी : कैसें बीजें केलें कौडन्येंपुरीं
ते पुढील कथा झडकरीं : सांघे कवी कृष्णदासा ।। ४४

प्रसंग तेरावा समाप्त (ग्रंथ संख्या १४४५)

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

# प्रसंग चौदावा

श्रीपरमात्मने नमः

जाणौनि नोवरा रावो मुरारी : हांकारा जाला त्रीभुवना माझारीं
ते वऱ्हाडें आले सपरीवारीं : सकळ देवतागन ।। १

ब्रम्हादक देव समस्त : ऋषीमुनी वीद्यावंत
हे आवघे चालीले आनंदभरीत : वऱ्हाडें देवाचेनीं ।। २

सप्त सागर सरीता तीर्थें : अष्टकुळ पर्वतु आनि सर्व देवतें
ये मुर्ति होउनि आलीं समस्तें : वऱ्हाडें देवाचेनीं ।। ३

वोळगावया श्रीसारंगपांनीं : आले कीर्तनीये△ गायेनी¹
नारद तुंबर आदि करुनि : सरस्वती अष्टनायेका ॥ ४
रंभा उर्वसी घृताचीना मेनीका*: तीलोत्तमा ± मंजकेशीमोहनकळिका
तारातुळा* या इंद्रायेनी अष्टनायेका : चालताति देवासवें ॥ ५
पन्नक जाले भुपाळ : सपरीवारीं आले अष्टलोकपाळ
यैसे त्रैलोक्ये मीनले सकळ : वऱ्हाडें देवाचेनि¹ ॥ ६
सैन्यें मीनलें आद्‌भुत : गज रथ घोडे आमीत
पायेदळ असंख्यात : कवन जाने ॥ ७
जेहीं जींतला ऐरावती : आपुलेनि बळें प्राक्रमें शक्ती
ते गजभार चालती : तया उपमा नाहीं ॥ ८
ते जंसे काजळाचे ± पर्वत : कीं काळवखेचि जाले मुर्त
मध्यें चंद्रकीर्न तैसे श्वेतदंत : उज्वळ शोभताति ॥ ९
ते जंसे पालाणले सागर : तैसे गुढरीले मीरवताति कुंजर
ध्वजा सीडें प्रव्हानें पंजर : तारु माहामंत ॥ १०
कीं जैसा भानु उदयें गीरीं : तंसे पंजर मीरवताति वरीं
ध्वजा कीर्नें अवधारीं : झळकती सैन्यांवरीं ॥ ११
तयांचा घंटीं गर्जे अंबर : आणि कुंभस्तळी उधळीलें सेंदुर
ऐसे ते भयांनक कुंजर : भारीं चालताति ॥ १२
जयां कंबोज देसीं उत्पती : तयाचा कुंभस्थळीं नीफजे मोती
ते आमीत भद्रजातीं : लोटीती पर्वतातें ॥ १३
आणि सिंगळदेसाचे गंधहस्ती : तयां पुढें आणीक कुंजर न राहाती¹
घोडे दृष्टी पुढां न रीगती : सदा पाटे डोळां ॥ १४

येक आंगें उजळ श्वेत : येक जटीयाळ कांकडे धगधगीत
झाडवळ देसवळ तयासीं गणीत : कवन करी ॥ १५

यंसा गजभारीं चाले उग्रसेन : जो आरीराये दर्पदहनु[1]
तयासीं मान दे[2] जगजीवनु : आजे पनाचा ॥ १६

आणि जे रागां वागां नीपुन : रुपसु गुणज्ञ± तुरंगम
ते देवाचे घोडे साहृ न : वर्नु कवन जाने ॥ १७

ज उचश्रवयापस्ये गाढे : बळें पराक्रमें दळें± भीडे
आणि मनापस्य वेगाडे : गती चालनें ते ॥ १८

ते जैसे चंद्रबींबाचे वतीले : कीं क्षीरसागरीं क्षीराचे मुर्त जाले
तंसे ते उजळ गांगे मीरवले : तेजी श्रीकृष्णरायाचे ॥ १९

येक तंत्र तांबडे सतेंब : जसे कुंकुमांचे वोतीले सेंब
कीं चुबकळौनि काढीले भानुबींब : संध्यारागांचे[1] ॥ २०

आणि येक पुसे वर्ण नीळे : वरीं जंसीं नीलोत्पळींचीं कीळें
नाना कीं ते पांचीचे केवळें : वोतीले मजपातां ॥ २१

येक घोडे पींवळे कनकवर्ण : जैसें जांबुनद सुवर्ण
पुटीं दीधले तैसे वर्ण : येकां तेजीयांचें ॥ २२

येक काळे कृष्णवर्ण नीखळ : जसे मुसें वोतीलें काजळ
वरीं दर्पणा सारीखि कीळ : येकां तेजीयांसीं ॥ २३

येकां बहुत वर्ण मीश्रीत : श्वेत हरीतु आणि पीत
येक आरधे काळ आरधे लोहीत : तेजी मीरवताति ॥ २४

येक बोर येक जरदे जाल्हौरे[1] : येक मुगसे[2] कुमेत अती खरे
येक करडे कातळे उंचासीरे : येक काळे राजवाहान ॥ २५

आइका हीमगीरीचे[१] कनकवर्न : मान सरोवरीचे मुंगसे तुरंगम
कास्मिरीचे कुमैत उत्तम : करडे काळींगदेसीचे ।। २६

सींधदेसीचे[१] सबळ घोडे : जाजनगरीचे जरदे गाढे
बद्रीकाश्रमीचे बोर "अती वेगाडे"± : चालनें मनापस्य ।। २७

सींगळदेसीचे[१] सुध हांसळे : गंगातीरीचे गांगे उजळे
कासीयचे कृष्णवर्ण काळे : गरुड[२] गुजरातेचे ।। २८

खुरासानीचे खरके कान : मुलतानीचे सबळ र जवाहान
तुडकानदेसीचे तांव्रडे कुकुमवर्न : कातळे कनोजदेसीचे । २९

आणिक जाती सुध तेजी बहुत असती : दीपोदीपीचीया नाहीं मीती
तयांचे गुण माझेया मती : वर्णवेतीना ।। ३०

तयांवरी पाखरा मीरवती : नवही सडका भुइसीं रुळती
सर्वांगीं[१] रत्नें झळकती : जे वोतीले कनकाचे ।। ३१

तयांवरीं असीवार मीरवती : जे लेइले वज्रांगीया△ नीगुती
जीरेटोप राघावळी सोभती : रत्नखचीता ।। ३२

वरी लहुडीं[१] चाळीताति करीं : घोडे नाचवीताति नानापरी
ऐसे ते असीवार अवधारी : श्रीकृष्णरायाचे ।। ३३

तयां घोडेयांचा थाटीं वसुदेवो : जो अरीरायां माहाबाहो
रणझडपु अरीघनघावो : यें ब्रीदें तयाचीं ।। ३४

आणि कैसे रथ मीरवती : जैसी गीरीदुर्गें चालती
ध्वजास्थंब टके उभीले नीगुती : घणघणीती माहाघंटा।। ३५

ते बरवे जांबूनदाचे वोतीले : वरी नवरत्नें क्षेवणीले
आणि छतीस दंडायुधीं भरीले : आवघे नंदिघोषा ।। ३६

तेथें च्यारी घोडे जुंतले रथीं : तयांवरीं पांखरा सडका सोभती
बापु म्हणितलयां सरीसे कवळीताति : गगनमंडळातें ।। ३७

ऐंसे रथ संजोगीले सारथीं : वरीं आयुधें△ भरीनते माहारथी
ते ध्वजास्थंभेसीं बैसले नीगुती : वरीं चवरें ढळताति* ।। ३८

ऐंसे रथ सनादबंध बहुत : अप्रमीत आणि असंक्षांत
आतां पायेदळा अंत तेथ : कवन करी ।। ३९

येंसे रथ गज घोडे आमीत : आणि दांडीया ड ळीया नाहीं गनीत
पायेदळ असंख्यात : आदीपुरुषाचें ।। ४०

ध्वजास्थंभु टके छत्रें श्रीगीरीं : पताकीं आकास लोपतांये वरीं
तेथ धुरा आमीता अवधारी : नावें कवण जानें ।। ४१

छपन कोडी यादव मुख्य धुरा : ते आवघेचि माहारथीये अवधारा
आणि छतीसां राजकुळींयांचेया कुमरां : संख्या नाहीं ।। ४२

आणि चौघे येका रथावरीं : आरुढले अवधारीं
बळीभद्र अर्जुन उधव माहामंत्री : चौथा श्रीकृष्णरावो ।। ४३

तया रथा भोंवते तुरंगम : खांचीले चालताति उतम
जयांसीं कीजे नींबलोन : उंचश्रवेयाचें ।। ४४

जयावरीं परब्रंम्ह आपण : श्रीकृष्णरावो करी आरोहण
तयाचें रुप गुन वर्ण : सांघेन आतां ।। ४५

तयाचे पाये कनकवर्न पींवळे : आणि पोटीं सुध श्वेत उजळे
पुष्टीं हरीत पुसीं वर्ण नीळे : दांडीया कृष्णवर्णा ।। ४६

मोहाडें कान कुंकुमवर्ण : ऐंसे ते पंचकल्याण वारु तुरंगम
तयासीं उदकावरी करीतां गमन : खुरु न भीजती ।। ४७

ते ज्या ज्या म्हणतां सुर्येमंडळा चढती : हो हो म्हणतां सैंब स्थीरावती
सर्वेंची मार्गील वास पाहाती : परतोनियां ॥ ४८

नांवें घेउनी आळवीजती : तरी हींसु करुनि शब्द देती
ऐंसे ते जाती सुध गरुड बोलीजती : ज योग्ये देवासी ॥ ४९

मेरुचीये माळीये गरुडगीरी : तेथ तयां नीफजु अवधारीं
म्हणौनि हे गरुडवर्ण मुनेंश्वरीं : बोलीले असती ॥ ५०

यैसे ते देववहन[१] : मनें चींतीलेयां ठायां करीती गमन
पाउदकांसीधी[२] पस्ये उतम : आधीक सामर्थ्याचे ॥ ५१

ऐंसा तो मृत्येलोकीं कहीं न जोडे : ऐंसेनीहीं देवें जरी हातां चढे
तरी सर्व संपती तयासवें कोडें : घरी[१] रींगती ॥ ५२

तो बांधीजे अश्वाचा सीरीं : आणि सदा पुजीजे नृपवरीं
परीं आरोहण न करावें तयांवरीं : देववहनु तो ॥ ५३

ऐंसे ते देवाचेया रथापुढें : खांचीले चालताति घोडे
सतसहृश्र अतीगाढे : वहन देवरायाचें ॥ ५४

ऐंसा धुरांचा रावो मुरारी : मधीं चाले[१] राजसांपरीं
भंवते मंडळीक अवधारी : सांघैन कवण कवण ॥ ५५

थाटीं चाले वसुदेवो आपण : गजभारीं उग्रसेन राणा
पुढां चाले आक्रुरु आंगवणां : मागां सात्वीकी[१] वीरु ॥ ५६

यसोदा रोहीणी देवकी : सुभद्रा सोहृदरी सखी
या च्या-ही चालती कउतुकीं[१] : श्रीकृष्णा सवें ॥ ५७

आनि आमीतां[१] राये माहाभारीं : सवें चालताति अवधारीं
णायेकां मंडळीकां कवण करी : संख्या तेथ ॥ ५८

श्रृती बोलीतां आइकीली मात : त्या श्रीकृष्णाचें नामची आनंत
म्हणौनि तयाचिया सैन्यासीं अंत : कवण करी ।। ५९

आणि सांतीया आमीता सैन्यांवरीं : तेणें [१] भानु लोपतांये अंबरीं
मेघडंवर धरीलें श्रीकृष्णांवरीं : तें मीरवे कैसें ।। ६०

ना ना तो वोळगावया कैवल्यपती : जैसीया आलीया उतमा वनस्पती
सैन्यावरीं छाया करीतात्ति नीगुती : मीषें छत्रांचेनि ।। ६१

कीं देवाचीये वऱ्हाडीकेसीं : मेघ कुंकुमवर्ण होउनि आले आकासीं
सांतीया सांती मीनली तैसी : मीरवते सैन्यावरीं ।। ६२

तवं लागाले ढोल+ मदन [१] भेरी :
बुरंग राये गीडीगीडीया रणमोहेरी
संख नीसानांचे नाद अंबरीं : कोंडति दाहीं दीसीं ।। ६३

ऐसें सैन्यें चालते क्षीतीवरीं : पृथवी मोडों पाहे भारीं
कुर्म पोटीं पाये सीरी : वोझेंया भेणें ।। ६४

आनि वाराहाचिये± दाढेवरीं : पृथवी भारें थरारी
फडें झांजरलीं अवधारी : आदि सेषाची ।। ६५

धुळीरा चालीला आकासीं : रज कोंडलें दाहीं दीसीं
तेणें देखा रवी बींबासी : देखिजेना ।। ६६

ना ते भुमी भींमकीचेया सरणा वांचीवेंसीं :
तीया गुढी उभीली आकासीं
कृष्ण आला सांघते रुक्मीनीसीं : मीषें धुळींचेनि ।। ६७

ऐसा सैन्येसीं रावो मुरारी : मही उतरले झडकरी
दीनु मावळला भार्गवपुरीं : तेथ जाली रात्री ।। ६८

मग चालतां नीसीये माझारीं : रनांवट लंघीलें रायें मुरारी
आले पुर्नसंगमा तवं अंबरीं : उदैला भानु ॥ ६९
ना ना कीं तो सहस्रजोतीचा दीवा : गगनाचां तांटीं[१] उजलौनि बरवा
पुर्वंदीसा वोंवाळुं आली देवदेवा : श्रीसारंगधरासीं ॥ ७०
तेथ पुर्नसंगमीं तापीचा तीरीं : देवा स्नान जाले संपरीवारीं
नेमु सारीला रायें मुरारी : मग नीसाना दीधला घावो ॥ ७१
पुढां चालतां पावले आळकापुरीं : तवं खरी जाली[१] दुपारी[२]
ऐसे दीढांदीसां माझारीं : देवो आले वैदर्भेसीं[३] ॥ ७२
पुढां चालतां योजन असे कौंडन्येपुरी : तेथें वीप्रें वीनवीला रावोमुरारी
जी मज पुढां पाठवावें भीमकुंवरी : वाट पाहात असे ॥ ७३
जी ते अती उतावीळ रुक्मीनी : तीसीं वाधावा सांघे श्रीचक्रपानी
देवाचें आगमन आइकौनि : देवीसीं होइल हरुष ॥ ७४
मग वीप्रासीं पासावो दीधला रुषींकेसी : तया बहुत संतोसु मानसीं
मग नीगाला गुढीयेसीं : पुढां कौंडन्येंपुरां ॥ ७५
असो हे लापनीका आतां : कैसी वर्तली मागील कथा
कंसें सीशुपाळा नीगतां : वर्तलें तें सांघे वेगीं ॥ ७६
सीशुपाळें बहुतां रायांचे[१] केले हांकारे : येक बोलावीले मानेंसत्कारें
आणि येकासीं आणीले बळात्कारें : आपुलेनी सामर्थ[२]वादें ॥
आणिला जरासंदु पौंडरीकु कासेश्वरु : बलबलु काळिंगु बाणासुरु
मुरुपीठुगुनु भुमासुरु : आणीक आमीत रायें ॥ ७८
जरी बहुत वीस्तारु करीं : तरी तो देवाचा वैरी
म्हणौनि समचांकारीं[१] सांघेन आतां ॥ ७९

आणि जरी वानीजे इश्वराचा वैरी : तोही आधीका तोषु इश्वरीं
कां जे यैसे जींतले हे ही थोरी : देवाचीचि पैं ॥ ८०

नीगतीये रात्रीं पस्यांतु पाहारीं : चैद्यें श्वप्न देखिलें अवधारी
आलीया तीघी वीधवा नारी : हातीं रक्तपात्रें ॥ ८१

तें[1] पात्रें फोडलीं धरनींवरीं[2] : आणि माहाशब्द केलें भारी
म्हणती झनीं जासी कौडन्येंपुरीं : होइल कळपांतु ॥ ८२

आणि पडीलें देखिलें मंदीर :
आनि शृंगारबनीचे देखे मोडले तरुवर
आसुधें भरले देखले सरोवर : तेथ बुडालें सैन्यें ॥ ८३

ऐसा गजबजुनीं उठीला : तवं जरासंदु बोलाउं आला
म्हणे वेगीं राया चाल वहीला : लग्न जवळीं आलें ॥ ८४

ऐसा[1] जवं[1] नीगाला मंदीरा बाहेरीं :
तवं पुढां रडतां देखलीया नग्नकुमारी
आणि सन्मुखचि थटकरी : तेचि सींकींनली ॥ ८५

पावो दीघला पाउडां : तवं तोचि घोडा पडीला पुढां
चैद्यु आदळला गाढा : मुगुटु पडीला भुमीं ॥ ८६

मग डोळीये बैसोनि नृपवरु : आला माहाद्वारा सामोरु[1]
तवं पुढां पडला पाटाचा कुंजरु : तेणें सांडीला प्राणु ॥ ८७

ऐसा आला माहाद्वारा बाहेरी : तवं पुढां आलीया तीघी वीध्वा नारी
रीतीया घागरी सीरीं : भांडती येकमेकीसीं ॥ ८८

मग कोपौनि नृपवरें : घागरी फोडीलीया आपुलेन करें
तवं जरासंदु म्हणे हें दुसरें : तुम्हीं केलें राया ॥ ८९

पुढां चौघे भांडतें आलीं सींबुमुरीं [१] : आड पडलीं नगरा बाहीरीं
ते मारीली कांटीवरी [२] : तेहीं केले माहाशब्द ॥ ९०

डावा जाला पींगळा : कोरडां काष्टीं करकरीला डोंबकाउळा
असो हें मागील पाप आलें फळा : जें संचीत होतें ॥ ९१

जरी म्हनाल कवणाचें : कवणें केलें होतें कवणीये ठाइंचें
तें मी सांघैन याचें : पुर्वकर्म ॥ ९२

तरी हे वीष्णुचे द्वारपाळ जाना : जये वीजयो दोघेजण
तयां श्रापास्तव जालें जन्म : मृत्येलोकीं ॥ ९३

तो हीरणाक्षु हीरंन्येकस्यपु अवधारी : ते मारीले नरसींहु अवतारी
मग ते जन्मले लंके माझारीं : रावण कुंभकर्ण ॥ ९४

तें [१] रावणें केलें सीताहरण : त्या रामाचेनि हातें जालें मरण
तेचि सैल्ये सीशुपाळु जाण : जन्मले असती ॥ ९५

तें सीताहरणीचें रीण संचीत : तेंचि आलें वोढत काढत
तेंची आतां फेडील त्वरीत : सीशुपाळु देखा ॥ ९६

असो हें सीशुपाळ सर्व दळेसीं : परणुं आला कौंडन्येंपुरासीं
भीमकें जानवसा दीधला तयासीं : नगरामाजी ॥ ९७

तयासवें बहुत राये आले : ते नगराभंवते उतरले
ते बहुतें पाहुनरें तोखवीले : भीमकें रायें ॥ ९८

असो हें सीशुपाळु आला यैसें श्रवनीं : आइकीलें देवी रुक्मीनी
तवं अवस्ता लागली अंतःक्रनीं : वीरहो दुनांवला ॥ ९९

म्हणे देवा कां गा न पवसी झडकरी : तुं भक्तांचें सांकडें फेडी [१] मुरारी
तरी देवा तुवां आजि ये आवश्वरीं : कां गा सांडीली ब्रींदें ॥ १००

जी तुं आर्तांचा दानी : ऐसीं ब्रीदें पढवीसी सारंगपानी
तरी कां देवा न पवसी आझुनी : अनाथुनाथा ।। १०१

जरी तुवां ब्रीदें सांडीलीं गोपाळा :
तरी मी उचीता न चुके भीमकी बाळा
हा प्राणु पाठवीन अवलीळा : भेटी देवाचीये ।। १०२

ऐसें बोलौनि रुक्मीनी : धीरु धरीला अंतःक्रनीं
म्हणे नीर्जसु केला श्रीचक्रपानी : आतां उचीता चुकों नये ।।

आतां जावों पाहों माडावरुनीं : जरी दृष्टी न देखों श्रीचक्रपाणी
मग करावी ते आपुली करणी : करुंचि लागे ।। १०४

मग देवी माडावरीं येउनी : पश्चिम दीसा अवलोकीली नयेनीं
तवं गुढी देखिली रुक्मीनी : सुदेवा जवळीं ।। १०५

जैसी गुढी देखिली नयेनीं : तवं आनंदु जाला अंतःक्रनीं
ना ना कीं तो गुढी मीसें श्रीसारंगपानी : हृदइं प्रकटला ।। १०६

मग आंतु बाहीरीं न सामाये : म्हणे वीप्र आला वो माये
मी बरवी गुढी देखतांये : तयापासी ।। १०७

असो हें वीप्र आला माडावरीं : रुक्मीनी वंदीला दोहीं करीं
तो म्हणे आळा आला वो रावो मुरारी : भीमतनये ।। १०८

तवं सुदेवातें म्हणे रुक्मीनी : तुज कैसा भेटला श्रीचक्रपानी
आणि कैसी जाली बोलनी : आला कवनें[१] ठाइं ।। १०९

वीप्र म्हणे भीमकुमरी : सभामंडपीं भेटला मुरारी
मज बहुत सन्मानु केला सुंदरी : तो अनुवादवेना ।। ११०

आनंदें संतोसु जाला मना : वीसर पडला अंतःक्रनां
नेणे मी आला कार्या कवणा : यैसा ठकलाचि ठेला ॥ १११

मग आपणचि देवें जाणौनि : उपावो केला सारंगपानीं
सभे दीधली पाठवनी : आणिलें राजमंदीरा[१] ॥ ११२

तेथ मज पांतीं जाला प्रसादु : मग येकांतीं पुसे गोवींदु
मीयां येथीचा संबंधु[१] : अवघा सांघीतला ॥ ११३

मीयां वीनंती दीधली देवाचां करीं : ते वाचीली श्रीमुरारी
तुझेया चातुर्या सुंदरी : बहुत संतोषले[१] देवो ॥ ११४

मज तुझी वेवस्ता[१] पुसीली श्रीपती :
मीयां सांघीतली जे कापुरां नीगाली जोती
तैसेचि देवो रथीं : आरुढले ॥ ११५

ऐसे नीगाले वेगवंतर : तवं मागां बळभद्रदेवो वीर
घेउनीं आला दळभार : मुळमहादेवासीं ॥ ११६

तेथ सकळां भेटी जाली : आतां आसो हे मागील[१] बोली
वैदर्भेहुनी मज पाठवणी दीधली : आतां देवो आले समीप ॥

असो हें मंगळवाद्यांचा गजरीं : नगरासमीपु आला रावो मुरारी
तवं कैसी देखिली नगरी : भीमकाची ॥ ११८

उधवदेवो म्हणे श्रीसारंगपानी : कैसी जी ये नगरीची उभवनी
अमरावतीयेपस्यें सहश्रगुनी : आधीक दीसे ॥ ११९

कैसी बनें चहुंफेरीं : नगराभंवतीं अवधारी
जैसा वसंतु वोळगों आला सपरीवारीं : आदि लक्षमीतें । १२०

सुरतरु स्वर्गि बोलीजती : तयांची लाखारीवें येथ दीसताति
आणि आवघे सदाफळ मीरवती : लक्षसंक्षा ॥ १२१

आणि कैसे नांदतु असती लोक : आवघे कुबीरापस्ये धनीक
आणि उदारपनें आधीक : चींतामनीपस्ये ॥ १२२

हा राजा करुभारु न घे कहीं : याचा भांडारी चींतामनी असे पाही
तो आपुलेंचि सकळांहीं : द्रव्ये वेंचीतु असे ॥ १२३

सातही पौळी सदटा : अवघीया कास्मिराचीया नीटा
वीद्रुमें कामवले आवघां दारवठां : चरीया मानीकांचीया ॥ १२४

ये नगरीं सकळ जना : अष्टमाहासीद्धी वोळगती जाना
नाहीं दुख व्याधी कव्हना : सुखिये सकळ जन ॥ १२५

कैसा नीतमंतु राजा : बरविया पाळीलीया प्रजा
सोडस उपचारीं सहश्र व्दीजां : पुजीतांये प्रतीदीनीं ॥ १२६

हा भीमु समुद्राचा अवतारु जाना :
कां जे याचा उदरीं लक्ष्मीयेजाले जन्म
आतां असो हे याचे अप्रमीत गुण : वर्णुं कवण जाणे ॥ १२७

पाहातां आदिपुरुषु आपण : अंगीकरील याचें कन्यादान
तया भीमकाचें उदारपण : कांइ सांघों ॥ १२८

आतां असो हे वनंना : "पुढां बहुत असे जाना" ±
देवो पातले नगरासणां : सर्व सैन्येंसीं ॥ १२९

असो हें यैसें वीप्राचें बोलणें आइकोनीं : देवी संतोसु जाला मनीं
आतां तो कैसा पावैल श्रीसारंगपानी : तवं देखिलें सैन्यें ॥ १३०

मग सुदेवातें म्हणे रुक्मीनी : मज वेगीं दावी श्रीचक्रपानी
तरी तुझेनि प्रसादें करुनी : नमीन श्रीकृष्णरावो ॥ १३१

मग वीप्र म्हणे वो माये : हा पैल श्रीकृष्णरावो पाहे
जया ध्वजास्थंभावरीं आहे : देवी गरुड देखा[१] ॥ १३२

तयावरीं मेघडंबर सांती[१] : रथीं हीरे मानीकें झळकती
तेथ सींहासनीं कैवल्येपती : बैसला ध्वजास्थंबेसीं ॥ १३३

मुगुटीं आनर्घ झळकताति कैसीं : जेहीं आकनां घातलें भानुबींबासीं
मकरकुंडलांचीये प्रभेसीं : लोपे सहश्रकीर्ण : १३४

आणिक वैजयंती माळा : कौस्तुभाचीया झळकती कीळा
वरी पांगुरले सोनेसळा : कासे पीतांबरु ॥ १३५

वरीं कनकदंडें ढळती : मेघस्यांमु श्रीमुर्ति
जयातें श्रृती म्हणती नेती नेती : तो मी केवी वर्णु ॥ १३६

तो हा कैवल्याचा दानी : देवी पाहे वो रुक्मीनी
तुझा पती श्रीसारंगपानीं : पैल श्रीकृष्णदेवो ॥ १३७

तेव्हेळीं आपणयां समीप : देवी देखिलें श्रीकृष्णाचें रुप
मग माडावरुनी घातली झेंप : श्रीचरनां लागावया ॥ १३८

तवं वीप्रें धरीली करीं : म्हणे थीरु थीरु वो भीमकुमरी
हें उचीतु नव्हे वो सुंदरी : आजी तुझें ॥ १३९

मग तोषौनीं म्हने भीमकुंमरी :
वीप्रा तुवां मज[१] दाखवीला[१] श्रीमुरारी
ह्मा उपयोगु तुझा मी ये संसारीं : "उतीर्न काईसेन होइन" ॥ १४०

जरी दुसरा असता श्रीकृष्णदेवो : तरी तुज देतीये पासावो
तरीचो उपकारा परउपकारु दावो : समान[१] होता ।। १४१

यैसें म्हणौनि भीमकुमरीं : माथा ठेवीला पायांवरी
तवं वीप्रें धरीली वरींचा वरीं : नेदी पायां लागो ।। १४२

तो म्हणे तुं कां नेणसी वो सुंदरी : तुझाचि उपयोगु मज जाला भारी
जो देखिला रावो मुरारी : माये तुझेनीं प्रसादें ।। १४३

तुज वोळगीलें रुक्मीनी : म्हणौनि देखिले श्रीसारंगपानी
जो न पवीजे येज्ञं तपें करुनीं[१] : तो भेटला श्रीकृष्णदेवो ।। १४४

जो ब्रम्हादीकां दुर्लभु : तो आम्हांसीं जाला सुल्लभु
आतां वोळगों श्रीकृष्णरावो प्रभु : माये तुझेनी प्रसादें ।। १४५

असो हें देखौनि श्रीचक्रपाणी : वीरोहो नीवाला[१] रुक्मीनी
तापु गेला निपानीं : सर्वांगीचा ।। १४६

परी आणीकी येकी चींता मनी : थोर लागली देवी रुक्मींनीं
म्हणें आतां तो देवो श्रीचक्रपांनीं : पावैन कवणींपरी ।। १४७

तवं सैन्येसीं सपरीवारीं : नगरा समीप आले मुरारी
लागले संख नीसाण भेरी : काहाळां अंतु नाहीं ।। १४८

रायेगीडीगीडीया रणमोहरी : ढोल दमामे नीसाण[१] भेरी[१]
ऐसा वाद्यात्रांचा गजरीं : आकास फुटे ।। १४९

वरीं तडक फुटताति भले : म्हणती यादव आले गा आले
तवं वार्तिकार धांवत गेले : सीशुपाळा जवळीं ।। १५०

सीशुपाळु रुकुमीया जरासंदु : तीघै करीत होते वीनोदु
तवं गुपतीं सांघीतला गोवींदु : आला म्हणौनियां ।। १५१

मग सुदेवातें म्हणे रुक्मीनी : मज वेगीं दावी श्रीचक्रपानी
तरी तुझेनि प्रसादें करुनी : नमीन श्रीकृष्णरावो ॥ १३१

मग वीप्र म्हणे वो माये : हा पैल श्रीकृष्णरावो पाहे
जया ध्वजास्थंभावरीं आहे : देवी गरुड देखा[१] ॥ १३२

तयावरीं मेघडंबर सांती[१] : रथीं हीरे मानीकें झळकती
तेथ सींहासनीं कंवल्येपती : बैसला ध्वजास्थंबेसीं ॥ १३३

मुगुटीं आनर्घें झळकताति कंसीं : जेहीं आकनां घातलें भानुबींबासीं
मकरकुंडलांचीये प्रभेसीं : लोपे सहश्रकीर्ण : १३४

आणिक वैजयंती माळा : कौस्तुभाचीया झळकती कीळा
वरी पांगुरले सोनेसळा : कासे पीतांबरु ॥ १३५

वरीं कनकदंडें ढळती : मेघस्यांमु श्रीमुर्ति
जयातें श्रृती म्हणती नेती नेती : तो मी केवी वर्णुं ॥ १३६

तो हा कैवल्याचा दानी : देवी पाहे वो रुक्मीनी
तुझा पती श्रीसारंगपानीं : पैल श्रीकृष्णदेवो ॥ १३७

तेव्हेळीं आपणयां समीप : देवी देखिलें श्रीकृष्णाचें रुप
मग माडावरुनी घातली झेंप : श्रीचरनां लागावया ॥ १३८

तवं वीप्रें धरीली करीं : म्हणे थीरु थीरु वो भीमकुमरी
हें उचीतु नव्हे वो सुंदरी : आजी तुझें ॥ १३९

मग तोषौनीं म्हने भीमकुंमरी :
वीप्रा तुवां मज[१] दाखवीला[१] श्रीमुरारी
हा उपयोगु तुझा मी ये संसारीं : "उत्तीर्न काईसेन होइन" ॥ १४०

जरी दुसरा असता श्रीकृष्णदेवो : तरी तुज देतीयें पासावो
तरीचो उपकारा परउपकारु दावो : समान[१] होता ।। १४१

यैसें म्हणौनि भीमकुमरीं : माथा ठेवीला पायांवरी
तवं वीप्रें धरीली वरींचा वरीं : नेदी पायां लागो ।। १४२

तो म्हणे तुं कां नेणसी वो सुंदरी : तुझाचि उपयोगु मज जाला भारी
जो देखिला रावो मुरारी : माये तुझेनीं प्रसादें ।। १४३

तुज वोळगीलें रुक्मीनी : म्हणौनि देखिले श्रीसारंगपानी
जो न पवीजे येज्ञं तपें करुनीं[१] : तो भेटला श्रीकृष्णदेवो ।। १४४

जो ब्रम्हादीकां दुर्लभु : तो आम्हांसीं जाला सुल्लभु
आतां वोळगों श्रीकृष्णरावो प्रभु : माये तुझेनी प्रसादें ।। १४५

असो हें देखौनि श्रीचक्रपाणी : वीरोहो नीवाला[१] रुक्मीनी
तापु गेला निपार्नीं : सर्वांगीचा ।। १४६

परी आणीकी येकी चींता मनी : थोर लागली देवी रुक्मीनीं
म्हणें आतां तो देवो श्रीचक्रपांनीं : पावैन कवणींपरी ।। १४७

तवं सैन्येसीं सपरीवारीं : नगरा समीप आले मुरारी
लागले संख नीसाण भेरी : काहाळां अंतु नाहीं ।। १४८

रायेगीडीगीडीया रणमोहरी : ढोल दमामे नीसाण[१] भेरी[१]
ऐसा वाद्यात्रांचा गजरीं : आकास फुटे ।। १४९

वरीं तडक फुटताति भले : म्हणती यादव आले गा आले
तवं वार्तिकार धांवत गेले : सीशुपाळा जवळीं ।। १५०

सीशुपाळु रुकुमीया जरासंदु : तीघै करीत होते वीनोदु
तवं गुपतीं सांघीतला गोवींदु : आला म्हणोनियां ।। १५१

ऐसा आला आइकौंणि श्रीकृष्णरावो : तीघां धाकु पडला संदेहो
म्हणती हा यादउ आला परी येकाधा ठावो : मोडेल आतां ॥

सीशुपाळां जरासंदा रुकमयां : तीघां धाकु पडला तयां
येरां वीचारु प्रवर्तले रायां : अरी सैन्यांमाजी ॥ १५३

असो हें येरीकडे भीमकापासीं : वार्तिकारीं मातु सांघीतली कैसी
म्हणती राया यादवरावो आला कौंडन्येंसीं : नगरा तुझेया ॥

ऐसा देवो आला आइकोनि : हरुषु जाला भीमकाचा मनीं
म्हणें आजी माझें दैवं जें श्रीचक्रपानी : येथ बीजें केलें॥ १५५

मग कनकपरियेळ काढीले : ते आनर्घ्य रत्नीं दीव्यांबरीं वीस्तारीले
ते दर्शनां सवें घेतले : भीमकें रायें ॥ १५६

ऐसा आनंदभरीतु वहीला : भीमकु श्रीकृष्णाचेया दर्शनां नीघाला
तवं नगरजनां उछावो जाला : तो काइ सांघों ॥ १५७

आला आइकोनियां रावो मुरारी : नगरीं उछावो जाला भोरी
पाहों धावंती नर नारी : तो वेधु कैसा सांघों ॥ १५८

सांडुनी व्यापारु घरींचे : येकीं पुत्र सांडीले वोसंगींचे'
येकी कोप आंगवीले भ्रताराचे : तीयवेळीं ॥ १५९

तवं भ्रतारु धरीती करीं : म्हणतो क्यें जातासी सुंदरी
ते म्हणे शरीर तुझें परी : हा आत्मा श्रीकृष्णाचा ॥ १६०

म्हणौनि उभेयां' सांडौनि कुडी : आत्मेनि हरसांची उभीली गुढी
नीगाला प्रब्रम्हाची घ्यावया गोडी : नीहप्रपंचु होउनीयां ॥

यैसें नीर्वान जाणौनि भ्रतार : म्हणती घ्या घ्या आपुलें शरीर
आम्हां आन काइ असे थोर : श्रीकृष्णां वांचौनिया ॥ १६२

तुम्हां मनीं आवडला देवो : तरी आम्ही काइ शयनां○ रावो
म्हणौनि तया उपनला तोचि भावो : मग तेही धांवताति ॥
जरीं देरीं भात्री वारावीया : तरी तेही वेधले श्रीकृष्णराया
यैसाहीं लाजाव सासुरेयां : तरी तेही नीगताति ॥ १६४
जरी सासु वारावीया सुनां : तरी त्याही पाहों धांवताति जगजं वना
आतां "सांघा पां" △ लाजावें कवणें कवनां : जगामाजी ॥ १६५
ऐसा पाहावया मुरारी : मुडप घांसुनि धांवताति नर नारी
एंसें राजबीदी माझारीं : लोक दाटताति ॥ १६६
यकी उपरीयांचा[१] खणोखणीं : येकी माडां वळगलीया कामीणी
पाहावया श्रीचक्रपाणी : उन्नत्ता[२] जालीया ॥ १६७
सांडौनि स्नान वीधि षड्कर्में : होम येज्ञ मंत्र अनुष्ठानें
कैसे वीप्र वेधले श्रीकृष्णां कारणें : पाहों धांवताति ॥ १६८
धन पुत्र सांडौनि आंगना : जे नीह्काम होउनि रीगाले वना
तेही आले आइकौनि जगजीवनां : ध्यानें वीसर्जलीं ॥ १६९
ते म्हणती संसारीक सुख सांडौनि : जया कारणें रीगालों वनीं
तें फळा आलें आम्हांलागौनि : जें येथचि आला देवो ॥ १७०
ऐसीं ध्यानें वीसर्जुनीयां मुनी : धांवताति पाहावया श्रीचक्रपानी
श्रीकृष्णदर्शनें नीवाले आंतःकरनीं : जाली योगसीद्धी ॥ १७१
आणि राये मंडळीक भुपती : वेधले पाहावया धांवती
रीपुचीया हरलीया कुमती : पातां श्रीकृष्णरावो ॥ १७२
ऐसे येरयेरां पुढां रीगती : सबळ नीबळातें मागां घालीती
देवो पाहावया आनंदमुर्ति : लोटीती येकमेकातें ॥ १७३

आवघेयां होवावया दरुसन : म्हणौनि देवें बहुरुपें घरीलीं △ आपण
तेव्हेळीं वीश्वतोमुख हें वचन : देवें साच केलें ॥ १७४

मग समस्त नर नारी : आपणयां जवळीं देखताती △ मुरारी
म्हणती या श्रीकृष्णासि भीमकुमरी : अर्धांगी साज ॥ १७५

यैसा नगरजनां सहीतु : भीमकु आनंदें असे धांवतु
तवं देवें थीरु केला रथु : जनु± वोसारीला ॥ १७६

देखौनि श्रीकृष्णाचें रुप लावन्यें : भीमकाचें संतोसलं मन
म्हणे हे वस्तु अनुपम्य[१] : आजी देखिली डोळां ॥ १७७

यैसा सुंदरु श्रीचक्रपाणी : भीमकें देखिला नयेनीं
मग आनघें दर्शन करुनीं : घातलें लोटांगणीं[१] ॥ १७८

मग भीमकु म्हण देवा : मज द्यावी आपुली चरणसेवा
आणि आपराधु उपसाहाव। : जन्मोंजन्मिचा ॥ १७९

तवं उठवीला[१] श्रीपती : भीमकु आळंगीला भावें प्रीती
मग तेणें केली वीनती : कर जोडुनियां[२] ॥ १८०

जी जो देवा आजि माझा घरीं केळवली असे भीमकी नोवरी
तरी गोसांवीं येथ राहुन दिवस च्यारी : सार्थक कीजे ॥ १८१

तवं देवासि आल हांस्य : मग पाहीली उधवदेवाची वास
तवं उधउ म्हणे जी करणें लागे सांच : वाक्यें भीमसेनाचें ॥

तो देवें मानिला सब्दु : तेणें भीमका जाला आनंदु
मग तेणें आर्चिला गोवींदु : केली माहापुजा ॥ १८३

ऐसें पुजा आर्चन करुनी : भीमकु लागला चरणीं
म्हणे सनाथ केलें जी सेवकां लागौनि : देवा दरुसन देउनीयां ॥

तवं बोलीले श्रीसारंगपानी : तरी आम्हां मेळीकारु भुमी [१] कवणी
रावो म्हणे अंबीके बनीं : देवें बीजें करावें ॥ १८५

जी आम्हां नेमु असे जगजीवना : जे प्रतदीनीं जावें अंबीके दरुसनां
म्हणौनि तेथ कव्हनी रावो राना : उतरला नाहीं ॥ १८६

तरी तुम्हां आम्हां नसे दुजेपन :
म्हनोनि तेथें तुम्हीं कीजे [१] जी अवस्थान
आणि देवो जेथें तेथें वीघ्न : असेचि ना ॥ १८७

मग देवें बीजें केलें अंबीकापुरीं : तेथें मेळीकारु जाला राया मुरारी
तेथची रचना कळाकुसरी : वर्णुं कवणु जाने ॥ १८८

तीये आंबीके जवळीं दक्षीण दीसे : यादवांचीं पडलीं दुसें
कुंकुमवर्ण पर्वतु कां जैसे : तेवी सोभताति ॥ १८९

जैसे मेरुसहीतु अष्टकुळ : कुंकुमवर्ण होउनीं आले सकळ
तेवी सेंदुरीं दुसीं गगन मंडळ : मीरवे अतीमानें ॥ १९०

कीं आमीतें भानुबींबें : संध्यारागीं रंगौनि सतंबें
भुमीवरीं उगवलीं सबें : तेवी सोभताति ॥ १९१

तया दुसां श्रीकृष्ण मेचु कैसीं : वरीं गरुड टके मीरवती आकसीं
या खुणां वोळखावी यैसीं : दुसें यादवांचीं ॥ १९२

कैसीया अभंगा बलाळ ताटीया : सेंदुरवर्नी दुसां भवंतीया
मंदवीचे मंडप कापड चौकीयां : क्षीरोदकांचीया ॥ १९३

तेथ कापुरकेळीचीं सांबरीं : मध्यें धाराग्रहें रचीलीं कुसरीं
वरीं सडा घातला सीपनारीं : कुंकुमाचा ॥ १९४

मुक्ताफळांची चुरी : तीचीया रांगवळी भरीली तयावरीं
तेथची कळाकुसरी : वर्नु कवन जाने ॥ १९५

ते गाडेकार भोइ कुसरीकार : वीस्वकर्मेयापस्ये चतुर
तयांची उभवनीं देखौनि रुषी[१] सुरवर[१] : माथें तुकीताति ॥ १९६

ऐसी करुनीयां कुसरी : मग वीनवीला रावो मुरारी
देवें भीमकासहीतु अवधारीं : दुसासीं बीजें केलें ॥ १९७

तेथ मानीकीं मंडपीं दुसांपुढें : कनकजांबूचे खांब देव्हडे
तेथ डोल्हारा लांबीला[१] कोडें : दांडीं बावनेंयांचा ॥ १९८

तो डोल्हारा हरीचंदनाचा : सांकळीं आळीला जांबुनदाचा
वरीं आंकोडा पद्मरागाचा : मीरवतांये ॥ १९९

तो वीनीला पाट सुतांचा पटीं[१] : भवंती बाळाणीं रातोत्पळें[२] गोमटीं
मध्यें आरुवार सूपवती* : सांवेरी[४] दोडयांचे[५] ॥ २००

जैसी क्षीरछाया[१] सकुमार सरळ : तैसे आरुवार मीरवे सकोंमळ
क्षीरोदका पासवडयावरी आरळ : पार्यातकांचें ॥ २०१

ऐसे डोल्हारेयांवरीं : आसन जालें राया मुरारी
तवं भीमकें पाहुनरु वीचीत्रांपरीं : दीधला देवरायां ॥ २०२

मग श्रीकृष्ण भीमकासीं वीचीत्रें : नेसों दीधलीं लेनी वस्त्रें
उंचे उतमें देवांगें पवीत्रें : +नगरजनासहीतु ॥ २०३

ऐसी करुनि पहीरावनी : देवें भीमकां दीधली पाठवनी
मग तो श्रीचरणां लागौनी : गेला नगरामाजी ॥ २०४

तवं भीमकाची दुइता : तीया सुचना केली रुखवता
पाठवावया श्री आनंता : देवी आइत केली ॥ २०५

जीया कामधेनुतें हांसती : कां जे ते आरीख पसुजाती
पाक करुं नीगुती [१] : केवी जाने ॥ २०६

ऐसीया पांचसतें सखिया सुगरणी जाणा :
आमीतु स्वारु⸗ सुपशास्त्रिनीपुण
तयामाजी मुखरणी वीत्पन्न : आपुण रुक्मीनी देवी ॥ २०७

तेथ वीचीत्रें आन्नें नानापरीं : कुसरीं नीफजवीलीं भीमकुंमरी
आरौगणा देयावया मुरारी : प्राणवल्लभा ॥ २०८

मग वीस्तारुनियां [१] आपुला करीं : वीप्रा हातीं ताट दीधलें भीमकुमरी
म्हणे बरवी आरोगणा द्यावी मुरारी : मज प्रसादु मागावा ॥

सवें पाठवीलीया सखिया बहुतीं : वीचीत्रें अन्नें दीधली तयांचा हातीं
म्हणे यादव बैसवावे पंक्तीं [१] : देवरायाचिये ॥ २१०

आणि सवें लेनीं लुगडीं भीमकात्मजा :
ऐसी देवासी पाठवीली महापुजा
म्हणे बरवा पुजावा श्रीकृष्णराजा : यादवां सहीतु ॥ २११

ऐसी देवी गुपतीये कैसी : पुजा आरोगणा पाठवीली रुषीकेसी
वीप्र वेगीं आला मेळीकारासीं : वीनवीला यादवरावो ॥ २१२

म्हणे जी देवासीं आरोगणा : देवी पाठवीली असे जाणा
ते स्वीकरीजो जी जगजीवना : यादवराया ॥ २१३

तवं कैसे बोलीले रुषीकेशी . म्हणती देवी न चुके उचीतासीं
तीयेचीये [१] सीहांनेवेंसीं [२] : देवें रुप केलें ॥ २१४

मग उधवाचा धरुनि हातु : आपुण उठीले श्रीआनंतु
तवं म्हणे धनुर्धरु पार्थु : जी जी बळीये पायें ॥ २१५

सवे वसुदेवो नंदु उग्रसेनु : बळभदृ सात्वीकी आणि अर्जुनु
यैसा रुषी मुनी सहीतु जगजीवनु : आले यादवांसीं ॥ २१६

ऐसा येतु देखौनि मुरारी : बोलती सखिया राजकुमरी
म्हणती हें लावन्यें संसारीं : क्यें[१] देखिजेनां ॥ २१७

देखौनि देवाची श्रीमुर्ति : नेत्र-इंद्रीयां नव्हे संत्रुप्ती
कां जे आड रीगताति पार्ति : म्हणौनियां ॥ २१८

जे आवेवीं दृष्टी असे पडती : ते तेथौनि न नीगे मागौती
परी मनीं हाव भाव प्रीती : आंतु मुरौनि ठेले ॥ २१९

ऐसी लागली दृष्टी आवस्था : चीत चैतन्यें वेधलें गोपीनाथा
प्रेमें वोव्हळा जालीया समस्ता : म्हणती आतां राख[१] श्रीकृष्णा ॥

येकी म्हणती वीषयें भावें सजनी : हा न पवीजे श्रीचक्रपानी
म्हणौनी योगीयें नीहकाम होउनीं : हृदइं चींतीताति ॥ २२१

आणि भक्तु आत्मबुधी जाणा . चींतीताति या देवाचे चरण
तेहीं कैवल्यें परब्रम्ह आपुण : मुर्त जालें ॥ २२२

"जै धर्मातें पराभउनि मेदिनी : अधर्मु बैसे सिंहासनीं"=
तें हा धर्मु कुढावा श्रीसारंगपानी : श्रृजी आपणेयातें ॥ २२३

मग आधर्मातें उछेदुन श्रृष्टीमाजी संवस्थापी धर्मु जान
आणि साधुचा गवसी मान : उधरी भक्तजनांतें ॥ २२४

तो हा देवाधीदेवो साजणी : आम्ही दैवें देखिला नयेनीं
म्हणौनि आवघीया लागलीया चरणीं : देवरायाचीये ॥ २२५

देवा पंक्तीं जालें आसन : बैसले रुषी मुनी सुरगण
उधव अर्जुन आपुण : आणि यादव कुळ ॥ २२६

तवं पालमांडें आणीनीं कन्हेरीनीं : मग श्रीकर प्रक्षाळीले श्रीचक्रपानी
तवं ताट आणीलें कामीनीं : प्रेमकळीका ।। २२७

तें ताट भावकळणां मांडीलें : मग नींबलोण केलें
दंडवत घालुनि म्हणीतलें : जी आमृत कीजे ।। २२८

वीचीत्रें अन्नें नानापरीं : ताटीं[१] वीस्तारीली सुंदरी
मग मांडीलीं+ अवधारीं : समस्तांसीं ।। २२९

चौघां येकी ठाइं आरोगणा : होती असे गा जाणा
नंदा वसुदेवा उग्रसेना : चौथा श्रीकृष्णरावो ।। २३०

कट्व तीक्ष्ण क्षार : आम्ल कठोर मधुर
ऐंसे सड्रस परीकर : ताटीं वाढीताती ।। २३१

आणि अष्टादश पक्वानें : पत्र शाखा संख्या कवणु जाने
पऱ्हीं कालन अनुपम्यें अतीमानें : बाळा वाढीताती ।। २३२

ऐंसी चतुर्विधें आन्नें वीचीत्रांपरी : ताटीं वाढीताती सुंदरी
तेथची सांगतां कळाकुसरी : होइल अतीप्रसंगु ।। २३३

आणि हा तवं चोरीयेचा पाहुंनरु : येथ काइसा वीस्तारु
पुढां कथेसी पडीभरु : बहुत असे ।। २३४

असो हें देवें श्रीमंतु आरोगणा सारुनीं : गुरळा[१] केला* ततक्षेनीं
तवं वीडा वोळगवीला कामीनीं : भावकळनें ।। २३५

ऐंसीं यादवां जालीं भोजनें : गुरळा[१] सारुनि उठीले रानें
मग वीडे जाले अनुक्रमें : आवघेयां पांतीकरां ।। २३६

मग श्रीकृष्णासीं सोडश उपचारीं : पुजीलें तेहीं सुंदरी
माथा ठेवीला श्रीचरणांवरीं : भावकळनें पैं । २३७

आणि सकळांसीं येक्षुकर्दमांचीया भौरी[१] : लेनी लुगडी नानापरीं
यैसीं यादवांसीं वाइलीं अवधारी : रुषी मुनी सहीत ॥ २३८

ऐंसे देखौनि आदर सन्मान : वीस्मो पावताति सकळ जन
तेथें माथे तुकीताति सुरगन : राये मंडळीक ॥ २३९

ऐंसें सकळां सहीतु पुजीलें गोपाळा :
मग देवें उधव बोलावीला जवळां
आळंकारु वस्त्रें देववीलीं बाळा : आणि सुदेवासीं ॥ २४०

मग आनर्घांचा हारु करीं : घेतला रायें मुरारी
तो ताटावरीं ठेवीला अवधारी : येकीकडे ॥ २४१

जो उतमां कौस्तुभावरीं : हारुले रावोमुरारी
तो पाठवीला भीमकुंमरी : रुक्मींनीं देवीसिं ॥ २४२

मग श्रीकृष्ण म्हणे सुदेवा : न्या हा प्रसादु भीमकीयेसीं द्यावा
जा वेगीं पारणें करवा : न लवा उसीरु ॥ २४३

मग नीगतां देवाचीया चरणकमळां : वेळोंवेळां लागताति बाळा
सप्रेमें नेत्र भरीताति जळां : सकळै जनीं ॥ २४४

असो हें वीप्रें नमस्करीला रावो मुरारी :
मग सखियांसीं गेला राज्येमंदीरीं
प्रसादु दाधला भीमकुमरी : रुक्मीनी देवीसीं ॥ २४५

तें देवी ताट घेतलें करीं : मग वंदीलें सीरीं
दंडवत करूनियां अवधारी± : बैसली जेवावया ॥ २४६

ऐंसा प्रसादु घेतला रुक्मीनी : तवं ताटीं हारु देखिला नयनीं
तो कंठीं घातला वंदुनीं : हृदें आळंगीला ॥ २४७

जैसा मीनला रावो मुरारी : तैसा आनंदु प्रकटला सुंदरी
तेव्हां जे सुख पावली भीमकुमरी : तों अनुवादवेना ॥ २४८

"जो कौस्तुभावरीं"± : कंठीं हारुले रावो मुरारी
तो दावो पावली भीमकुमरी : रुक्मीनी देवी ॥ २४९

तो हारु नीकट कृष्णाचा संबंधु : वरी प्रसन्नतेचा प्रसादु
ते दोन्ही दाये पावली तेनें जाला आनंदु : तया उपमा नाहीं ॥

ऐसी सखिजनींसीं [१] रुक्मीनी : प्रसादु भोजन सारीलें ततक्षेनीं
वीडा दीधला देखा हृडपीनीं : मग बैसली माचेयावरी ॥२५१

आतां रुक्मीनी प्रस्नें आनंतु : सखि कैसा देखीला गोपीनाथु
तें आतां श्रोते आइकतु : म्हनें कवी कृष्णदासु ॥ २५२

प्रसंग चौदावा समाप्त (ग्रंथ संख्या १६९७)

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

# प्र सं ग पं ध रा वा

श्री परमात्मने नमः

तवं रुक्मीनी पुसे सखीयांसीं : महणे तुम्हीं कैसा देखिला वो ऋषीकेसी
तो मजप्रतीं सांघा कां वो गुणरासी : कृष्ण लावन्येसींधु ॥ १

तुम्हीं तवं सीहानीया सकळा : वरी जाना चातुर्ये कळा
तरी सांघा पां कैसा देखिला डोळां : यादवरावो ॥ २

तवं सखिया म्हणती भीमकुमरी : ऐसा श्रृतीं न वर्णवे रावो मुरारी
तो आम्हां केवी अवधारीं : बोलवे अल्पमतीं [१] ॥ ३

अवो जो अवयेव पडे नयेनीं : तेथौनि दृष्टी न नीगे वो सजनीं
म्हणौनि तो सर्वांगीं श्रीचक्रपानी : आम्हीं देखिलाची नाहीं ।। ४

ता वर्नितां वो श्रीचक्रपाणी : ये श्रृष्टीसीं[१] उपमा नाहीं सजनी
मदनाची कीजे वोंवाळनी : रुपा श्रीकृष्णाचेया ।। ५

मेळौनि इंद्रनीळांचीया कीळा : मुसे येकवटीलीया[१] सकळा
तयाहो पस्ये मुर्ति अधिक* गोपाळा : सतेजपनें ।। ६

"अतसी पुष्पें आनि नीळोत्पळें± : कैसी हवावें दीसती सुनीळें
परी तेंहीं रंगें उणि नव्हेती सकोमळें : पातां श्रीकृष्णकांतीयेसी[१]।।

आरक्तें चरण कमळें कैसीं : जेहीं कुंकुम जींतलें रातोत्पळेंसीं
कीं जैसे भानुबींब संध्यारागेसीं : चरनिं वीळासलें ।। ८

तयाहीपस्ये सतेजें रंगें बहळें : पातां वो देवाची चरणकमळें
जे लक्षमीयां वंदीलीं नीडळें : आसे आळींगौनीयां[१] ।। ९

ते श्रीचरण प्रक्षाळीतां सजनी : म्यां करकमल ठेवीलें दोन्हीं
तवं माझेंचि रुप म्यां नयेनीं : देखिलें तयामाजी ।। १०

आणिकही म्यां देखिले बहुत : जे सभेचे लोक उमंटले समस्त
आणि सर्वतीर्थें देवता सहीत : म्यां देखिलीं श्रीचरणांमाजी ।। ११

एसें देखौनीं वीस्मो जाला मनीं : मग म्यां नमस्करीले चरण दोन्ही
आणिकेंहीं सांमुद्रीकें सजणी : काइ सांघों ।। १२

ध्वजा वज्र पद्मांकुसु उर्धरेषा : आणि सरळांगोळीया वो सुरेषा
उपमा काये देवों नखा : तया देवरायाचेया ।। १३

तया नखदीप्तीवरीं सजनीं : सुक्र वोंवाळीजे नक्षेत्रें मीळौनी
गुल्फें वर्तुळें घुरां उंचपनीं : सुनीळां सोभतातीं ।। १४

चरणीं घवघवी रणघंगाळ तोडरु :
आणि तळीं बोभाढिये वांकीचा गजरु
तया दोहींचा नादु[1] थोरु : तया उपमा नाहिं ।। १५

सेस श्रृती दोघें जैसीं : श्रीकृष्णाचा पवाडा पढताति सरीसीं
वांकी तोडराची ध्वनी उमटतांये तैसीं : मज पातां ।। १६

जैसे हेमकर्दळीचे गाभे सकोंमळ : वरीं चर्चिलें इंद्रनीळाचे कीळ
तयाहीं पस्ये पोटरीया जंघा युगळ : आधीक[1] सोभे[1] ।। १७

जैसें लावन्येंजळिं तळपत : मध्यें मदनमीन असे झळकत
तयाही पस्ये जंघायुगळ असे मीरवत : गोपीनाथाचें ।। १८

आणि जेथ मनमथा जालें जन्म : ते कैसें वर्णुं[1] कटीस्थान
जें वीश्वबीजाचें सांटवन : घनवट सोभतांये ।। १९

जैसा इंद्रनीळाचा गाभा : वेढीला जांबुनदाचिया प्रभा
तया पस्ये सोनेसळेयाची प्रभा : मीरवे मालगंठी ।। २०

वरी रत्नखचीतु मेखळा : कासेवरीं मीरवे गोपाळा
बरवे सखोल नाभीमंडल : वरी त्रीवळी सोभ ।। २१

नीट नीतळ विसाळ वक्षेस्थळ : वरीं मृदतरु रोमांवळी वेल्हाळ
ना ना कीं तें जैसी भृंगावळीची माळ : लागली नाभीकमळां ।। २२

जैसीया दीगज सोंडा वोहरती : वरी इंद्रनीळांची दीप्ती
तैसे भुजादंड मीरवती : श्रीकृष्णरायाचे ।। २३

तळहातीं कुंकुम जींतले माये : आंगोळीया श्रीमंता सरळा पाहे
नखासि चंद्र उपमों न ये : तो कळंकीया म्हनौनिया ।। २४

आंगुळीयां मीरवती मुद्रीका : कुसरीवां कांडारीवां सलक्षेनीका
बरवीया नंद्यावर्ता आइका : नवरत्नांचीया ॥ २५

बरवीं वर्तुळें मनकटें सोभती : वरीं हातसर बाह्यवटें मीरवती
वीरकांकनें झळकती : रत्नें तुळबंधींयासीं ॥ २६

आणि रत्नखचीतु बासींग भुजेवरीं[1] : बरवें ब्रीदांचें अवधारीं
अरीरायांचा नोवरा मुरारी : म्हणौनिया ॥ २७

जें क्षेणां श्रृष्टीचा ग्रासु करी : तें सुद्रसेन मीरवे दक्षीणकरीं
जयाचीये धारे मोक्षु पावती वैरी : तेजे भानु आंकना ॥ २८

कंठु सुनीळ नीतळ कैसा : सुधलावंन्याचा करंडा जेंसा
त्रीरेखि सोभे शंखाकारु तैसा : मीरवे पदक येकावळी ॥ २९

कैसी मीरवे वैजयंती : जैसे दीप वोवीले नीगुती
पदकीं कौस्तुभु झळके अती : भानुबींबापस्ये ॥ ३०

देवाचीया श्रीमुखसीं उपमां : देतां सरी न पवे चंद्रमां
आधर सुरंग निरउपमां : बींबफळापस्ये ॥ ३१

दसनीं प्रभा जींतलीया हीरेजोती : वरीं मानीक कीळीं रंगले उधांती
कीं पक्व दाळीबबीजापस्ये सोभती : सतेज सुरंगपनें ॥ ३२

हास्ये करीतां दंतपंक्ती : जैसी वीद्योलता असे झळकती
तीचा आंगी दहकत्व म्हणौनी उपपती : सरी न पवे ॥ ३३

बोलतां वो जगजीवनां : कैसी श्रीमुखि मीरवे रसना
तीयेसीं उपमा देतां वो मनां : थार सांकडें असे ॥ ३४

आवो जैसी रातोत्पळांची पांकोळी : कीं कुंकुमें रंगलें पत्रटाहुळी
तयापस्ये रसना सरळी : मीरवे सुरंगपनें ॥ ३५

ते सर्व सीद्धांताची आधीष्ठाती : कीं सब्दब्रम्हरत्नांची खानीं निरुती[1]
कीं ज्ञानशक्तीची रचना* आकृती[2] : ना ना ब्रम्हवीद्या ते ।। ३६

वाचा सुबोध रसाळ अती : मधुरपनें अंमृतापस्ये रशवृती
तेथें वैखरीयेमधीं असे संचरती : परावाणी ।। ३७

ते वाणी शब्दवेधीयापस्ये आधीक :
कां तो करणीयेंचा आणि हे सतसीध आइक
श्ररुणीं पडत क्षेवीं करी कनक : जीवलोहाचें ।। ३८

कैसें प्रहसीतमुखि मीरवे तांबोळ : जें कुंकुमापस्ये रंग बहळ
वाचे परामृताचे कल्लोळ : बोल सुरस मधुर ।। ३९

मीसुरीं सुनीळ कीळ मनोहर : नीळुवटीं[1] सोभतांये परीकर
ना ना कीं तें ब्रम्हीं कोंभैले आंकुर : लावन्याचे ।। ४०

नाशापुट श्रीमंत नीट सरळ : कपोळांवरीं इंद्रनीळांचे कीळ
नेत्र प्रसंन[1] वीशाळ : बरवें प्रेमाथीले ।। ४१

तया देवाचेया नेत्रांसीं पाहीं : द्यावया उपमा श्रृष्टीसीं नाहीं
सुक्र गुरु उपमुं तरी तयाहीं : वरतें देखणें नसे ।। ४२

ते सदा देखताती परावर : सर्व जीव देवताचें बाह्य आंतर
सदा[1] देखती नीरंतर : अनंता ब्रम्हांडीचें ।। ४३

ते कैसी सामर्थ्याची दृष्टी सुंदरी : देवें पडे जयावरीं
तयाची सर्व पापेंहरी : छेदी अवीद्येतें ।। ४४

भृभंग सुरेख वंकट : वरी सोभे नीतळ* लल्हांट
जैस कां इंद्रनीळांचें तकट : तेवी मीरवत असे ।। ४५

जेहीं तेजें जींतला तरणी : तें[१] कुंडलें सोभताती श्रवणीं
भ्रंमर लाजीले कुरुळें देखौनीं : ते अद्यापी रीगाले वनीं ॥ ४६
मुगुटीं मुकटु शोभे वीश्वमोहनु : तो आनघांचा कवणु जाणे वर्णुं
तेणें तेजें जींतला सहृश्रकीर्णु : कीळ* फांकताती ॥ ४७
बरवीं मांदारें पार्यातक कैसीं : चांपेकळीया केतकीदळेंसीं
मुगटीं बीरलीं रुषीकेसी : सुपरीमळें ॥ ४८
सर्वांगीं हृरीचंदनाची भोरी : वरीं भाळीं पत्रवेली रेखिली कुसरीं
कैसी कांती सोहृजळ[१] मुरारी : बींबती दीपमाळा ॥ ४९
सुधतेजांची वीनिली नीगुती : वरी कनकरंगीं घाली उधांती
तैसा[१] हेमवर्नें दीव्यांबरें आदिशक्ती : वाइली देवराया ॥ ५०
ऐसी ते दीव्यांबरें परिधानें* : केली श्रीकृष्णराणें
तें कैसी तेजें झळकताति[२] गहृनें : वीद्युलतेपस्ये ॥ ५१
एसा सुंदरु श्रीमंतु रावो मुरारी : तयाची वेद श्रृती न वर्णवे थोरी
सेषा श्रृतीं रुषी पुराणां सांकडें अवधारी : तो आम्हां केवीं वर्णवे ॥
जीया[१] जैसा भावीला सजनीं : तयासीं तैसाचि जाला श्रीचक्रपाणी
आणि सर्व इंद्रियां धवधणी : जाली आजी ॥ ५३
चैतन्यें वेधलें देखत क्षेवो : आंतु बाहीरीं देखों तो श्रीकृष्णरावो
तुं आपणयां जवळीं पाहे वो देवो : काये पुससी माये ॥ ५४
ऐसें देवाचें आइकौनि रुप गुण : देवीचें संतोसलें मन
म्हणे धन्यें धन्ये वो तुमचें जन्म : जो देखिला यादवरावो ॥५५
तया श्रीकृष्णाचें होये सन्नीधांन : ऐसें कंचें जोडीलें असे पुन्य
जरीं तोचि कृपा करी आपण : तरीचि सेवा लाभे ॥ ५६

तुम्हीं सीहानीया समस्ता : बरवें वर्णिलें श्री आनंता
तुम्हांसीं देइजे उचीता : यैसे मज काइ असे ॥ ५७

ऐसे तोखौनि भीमकुमरी : उचीतीं वारीलीया सुंदरी
म्हणें तुम्हीं धन्यें वो ये संसारीं : जो देखिला यादवरावो ॥५८

तें अतीसें सुंदर श्रीकृष्णमुर्ति : परी मीं बोलीला आरीखां उपपती
तें मज उपसाहावें संतीं : म्हने कवी कृष्णदासु ॥ ५९

प्रसंगु पंधरावा समाप्त (ग्रंथ संख्या १७५६)

श्री कृष्णार्पणमस्तु ।

## प्रसंग सोळावा

श्री परमात्मने नमः

तवं येतुलां आवस्वरीं : फळप्रदान मांडलें अवधारीं
ते कथा सांघेन सांमोरी : ते आइका पां ॥ १

आइका रायें भीमकें कोडें : मंडप सेइले कापडें
ध्वजा फरारे आमीत चहुंकडे : नगर शृंगारीलें ॥ २

मंडपामाजीं चहुंकडे : नारीयेळां पोफळांचीया रासी केलीया कोडें
आणिलीं वस्त्रें कापडें : नानापरींचीं ॥ ३

पत्रें पुश्पें कापुर कस्तुरी चंदन : आणि दतदक्षीणे लागीं सुवर्ण
घेउनि आला सैल्यु आपण : बंधु सीशुपाळाचा ॥ ४

तवं रायें भीमकें अवधारी[1] : राया मंडळीकातें हांकारी[2]
आपण आला श्रीमुरारी[3] : ते वीनवावया ॥ ५

येउनीं लागला श्रीकृष्णाचा चरणीं : मग कर जोडुनि केली विनवणी
जी जी देवें फळप्रदानां लागौनि : बीजें करावें ॥ ६

जी राये मीनले असति बहुत : सोयरे शारीरसंबंधीय आमीत
परीं देवाचेनि आवघेंची सार्थक समस्त : आजि होइल माझें ॥७

तरी देवें तेथ येउनि मातें : सनाथ करावे सेवकातें
आणि हें कार्यें तवं येथार्थें : देवाचेंचि असे ॥ ८

तवं बोले श्रीकृष्णराना : हें तुम्हीं सत्ये बोलीलेती भीमसेना
हें आमचेंचि कार्ये या वचना : काहीं आन्येथा नसे ॥ ९

परी आणिक राया येक : मी तुज सांघेन तें सत्ये आइक
आम्हां तेथ येतां वीरोधीक : असे बहुतेंसीं ॥ १०

मुख्य सोयेरा तुमचा : सीशुपाळु दमघोषाचा
तयासीं आणि आम्हां मुळींचा : वीसंवादु ॥ ११

तयांचा पुढारु जरासंदु : तयासीं आम्हां ठाइंचाचि वैर सबंधु
तो आमतें देखौनि[1] वीषादु : धरील मनीं ॥ १२

पौंडरीकु आपनयांलागी : वीष्णु म्हणवीतांये जगीं
तो आमच्यिये दृष्टीपुढें वेगीं : मरण पावैल ॥ १३

आणि भुमुं त्रानु कासेश्वर : मुरुपीठगनु काळींग बलबलु वीरु
या आवघेयांसीं वैराकारु : ठाइंचाचि असे ॥ १४

मुख्य तुमचा रुकमीया पुत्र जेष्ठ : तो तवं ठाइंचाचि असे नष्ट
यां अवघेयांमाजी सखा चोखट : भीमका तुंची अससी ॥ १५

ऐसेयां दुष्टांमाजि जातां आइका : येकां मत्सरु येकां क्रोधु येकां शंका
म्हणौनि वीसंवादियां मध्यें असतां भीमका : येकाधा आप वो घडे

आणि तुम्हां आम्हांसीं स्नेहो प्रीती : मानु कराल भीमा चक्रव्रती
तें देखौनि येरां उपजैल खंती : मग उठती कुबोलेसीं ।। १७

येसा कुबोलतां जान : आणि हे यादव तबं आसाहान
ऐसें येकाधें उठीलें[1] वीघ्न : तें कवनें मोडावें ।। १८

जरी म्हणाल भ्याले भुपाळां : तरी ते नपुरेति यादवांचेया बळां
परी तुमचा मोडेल सोहळा : तया भीत असों ।। १९

ऐसा अवघेयां सुखासीं होइल भंगु : आनि प्रस्तुतीं मोडेल रंगु
यावरी तुम्हीं सांघाल तो मंत्रु चांगु : तोचि करुं ।। २०

तवं म्हणे भीमसेनु : देवा तुं ज्ञानीयांचा बापु सर्वज्ञु
तुज मंत्रु सांघे यैसा कवनु : दुसरा [1] असे ।। २१

परी तुजवीण सारंगधरा : अवघें अप्रयोजक अवधारा
जैसीया चंद्रेंवीण तारा : नीसीये माजी ।। २२

कीं जैसा दीनकरेंवीण दीवसु : कीं उदकवीण सरोवर वीभंसु
तैसा तुं जेथ नससि रुषीकेसु : ते वृथय्ये कार्यें । २३

तवं श्रीकृष्ण म्हणे भीमका : आम्हां तुमचा मानुं पावला नीका
आम्ही तुम्हां जवळींचि असो हो कां : आण देवकीची ।। २४

तवं भीमकु म्हणें रुषीकेशी : मी आधीं पुजीन देवासीं
पाठींरां[1] जाउनि भीमकीयसीं : करीन सोहळा ।। २५

मग भीमकें श्रीकृष्णां कारणें : वाइलीं दीव्यांबरें अळंकरणें
टीळा वीडा भोंरी कापुरे चंदनें : आणि पुजीलें पुष्पीं फळीं ।।

सकळां यादवां वाइले पाटोळे : मानियां मंडळीकां वीड टीळे
वोटींया भरीलीया पोफळीं नारीयेळें : भारें उठवेनां ।। २७

यैसा सपरीवारीं श्रीकृष्णराणा : पुजौनि भीमकु लागला श्रीचरणां
म्हणे मज आपुलें म्हणावें जगजीवना : न धरी दुर्जेपन २८
तवं बोलीला मेघस्यामा : तुजसीं दुर्जेपण नाहीं भीमा
तुं देह आणि मी आत्मा : हें सत्ये जाणा ।। २९
यैसा प्रीये वचनीं मुरारी : भीमकु पाठवीला अवधारी
तेणें जाउनियां झडकरी : आदरीलें फळप्रदान ३०
मग राये हांकारीले भीमसेनें : देव द्वीज रुषी+ आदरें सन्मानें
आणि नगरजनां कारनें : संभ्रमु केला ३१
आणि बंदीजन कळावंत : पढते वगते पुराणीकां समवेत
यैसे आवघे आणिले समस्त : राये मंडपासीं ।। ३२
असो हें येरीकडे रायें दमघोकें वेगीं : आइती करुनीयां चांगी
फळप्रदानालागी : नीगता जाला ।। ३३
फळों पुरवीं दीव्यांबरीं : परीयेळ वीस्तारुनि दीधले वीप्रांचा करीं :
सर्व राये मंडळीक अवधारी : चालती सोवासीणी ।। ३४
वाजती संख भेरी पौहुरें : यैसा मंगळवाद्यांचेनि गजरें
दमघोषु नीगाला उछायें थोरें : फळप्रदानासीं ।। ३५
तवं मार्गि चालतां+ आंबरीं[1] :पींगळे जाले मस्तकावरीं
तवं रावो जोसीयातें म्हणे सांघारे झडकरी : हे काइ बोलताती ।।
तें जोसीयें वर्णिलें ततक्षेणी : म्हनती णोवरी नेइल श्रीचक्रपाणी
हा मोहोउछावो तुम्हीं वायां लागौणि : करीत असा ।। ३७
ऐसें मनांमाजि जानितलें तेहीं : म्हणती राया पुढीला काजा चीतु देइ
जावों जानवसेया आपुला ठाइं : मग ज्ञान करुं ।। ३८

कैसा रावो खोंचला मनीं : मग नीगाला झडकरुनी
जाउनि भीमकाचां राजभुवनीं : फळ आदरीलें ।। ३९

वरवा पासवडीला पाटु : पुढां ठेवीला पुर्न घटु
चौक भरीला चोखटु : मुक्ताफळांचा ।। ४०

मग म्हणती बोलावा नोवरी . म्हणौनि वीप्र गेले राज्येभुवनांभीतरीं
तयातें देखौनियां येकांती भीमकुमरी : बोले भावकळनेसी ।। ४१

भावकळनेतें म्हणे रुक्मीनी : येकु श्रीकृष्ण वांचौनि
आणिकांचीं वस्त्रें अळंकारु लेनीं : केवी ल्यावी माये ।। ४२

तो येकु वांचौनियां गोपाळु : आणिकांचा न लवी वीटाळु
तवं कैसी बोलीली सखि स्नेंहाळु : भावकळना ते ।। ४३

ते म्हणे तुं न करी वो चींता : तें मी अवधीं पालटीन आतां
मज सारीखि जवळीं असतां : तुज काइसा संदेहो ।। ४४

मी गेलीं होतींये मंडपा भीतरीं : ते[१] देखिलीं आसती सुंदरी
तें मी आतां पालटीन वो भीमकुमरी : देइन भांडारींची ।।

आतां वेगीं मंडपा जाइ : वस्त्रें आळंकारु घेउनी येइ
तें मी आतां काढीन[१] पाही[१] : भांडारींचीं ।। ४६

मग करीं धरूनियां रुक्मीनी : मंडपी आणीली ब्राम्हणीं
ते जैसी कां कुरंगीणी : करीं पारधीयांचा ।। ४७

तैसी सकंपीतु आली : पाटावरीं बैसली[१]
तवं मंगळ वाद्यें लागलीं : वीप्रीं केले मंत्रोच्चारु[२] ।। ४८

तेव्हेळीं दमघोकें रायें : नोवरीचे प्रक्षाळीले पाये
सीरीं पाये[१] वंदीतांये : देवी रुक्मीनीचे ।। ४९

मग फळें पुष्पें वस्त्रें लेणीं : तें परीयेळ करीं लावीलें रुक्मीनी
तवं नग्नकुमारी पुर्वदीसे येउनी : सन्मुख सीकींनली ॥ ५०

आधींची पींगळेयांची कानीं मनीं : वरीं हे दुसरी सींक जाली जानं
तेणें जीवी खोंचला नीर्वानीं : राणा दमघोषु ॥ ५१

आवघीये सभेसीं पडीलें ठक : आळोंची बोलताति येकमेक[१]
म्हणती हें सांघ वोखटें नीसेक[१] : नोवरेया सीशुपाळासीं ॥ ५२

असो हे करूनीं आख्यावनी : मग पुर्नघटीचें करीं सुदलें पाणी
तेने चुळ भरीला रुक्मीनी . ते मज गमलें कैसें ॥ ५३

जैसीं चांडाळाची दृष्टी पडे वरीं :
तरी मुखि पानी "सोउनि घालिजे सीरी"[१]
तैसी ते चुळ भरूनीयां सुंदरी : आली मंदीरासीं ॥ ५४

तें[१] भावकळनं करीं वोपीलें : तयातें ठेउनि आणिकें नेसों दीधलें
पुनरपीं रुक्मीनीसीं आक्षावनें जालीं · मग सभे चालीले वीडे ॥

ऐंसे टीळे वीडे चंदन भोंरी : लेनीं लुगडीं नानापरीं
दान[१] दक्षनें अवधारीं : वीप्र तोषवीले ॥ ५६

ब्रम्हवीदु आणि साही दरुसनें पुजीलीं : कळावंतें आभरीं केलीं
लेनी लुगडीं दीधली : बंदीजनांसीं ॥ ५७

लागले संख नीसांन मदनभेरी : यैसें मंगळवाद्यांचा गजरीं
फळप्रदान जालें घरीं : भीमकाचा ॥ ५८

यैसें फळ प्रदान* जालेयांवरीं : दमघोषु नीगाला झडकरीं
तो जानवसां येउनीयां अवधारी : बैसला येकांतीं ॥ ५९

मग बीलावीले वीद्वांस जाणते : आणि वीत्पंन जे कां श्रोते वक्ते
आणि बैसोनी जोसीयांतें : रावो पुसता जाला ।। ६०

तेथ कैसें बोलीलें भुपाळें : म्हणे कां सींक जाली चीरेंवातीये वेळे
आणि जातां काइ आकासीं वदीनले पींगळे : तें भवीष सांघा ।।

तवं जोसीइं खालौतीया घातलीया माना : म्हणती परीयेसं नृपसेनां
पुस[१] पुससी[१] तरी सांघैन जाना : हें भवीस्ये आम्ही ।। ६२

तवं बोलीलें दमघोके . म्हणे होणार तें ब्रम्हादीकां न चुके
आणि कोपलेयां काइ नीकें : होत असे ।। ६३

तरी राया आतां परीयेसैं : सांघैन तें आइक पुढील भवीस्ये
नोवरी हरीजैल हें सत्ये भाशे : भुवनी अंबीकेचीया ।। ६४

युध्ये होइल माहानीर्वान : रणीं पडल बहुत सैन्य
आणि या रायांसीं होइल आपमान : आइका समस्तांसीं ।। ६५

नोवरी नेइजैल गोवींदें : डाउ कांकन सांडौनियां चैद्यें
हळदी धोउनियां व्रदें : तजील बासींगातें ।। ६६

ऐसी चैद्या होइल ख्याति : मग घालौनियां आपयेशांची बुंथी
जाइल नसुधां हातीं : नोवरी दवडौनियां ।। ६७

ऐसी सांघीतली वेवस्ता : तेथ ठक पडीलें समस्तां
आतां असो हें पुढां कैसी वर्तली कथा :
तें सांघै कवी कृष्णदासा ।। ६८

प्रसंग सोळावा समाप्त ओवी संख्या १८२४

श्रीकृष्णार्पणमस्तु

## प्रसंग सतरावा

श्रीपरमात्मने नमः

आतां पुढील कथा चीत देउनि : आइका सावधां अंतःक्रनि
कैसा देवें मंत्रु सांघीतला रुक्मीनी : आइका पां ॥ १

मग वीप्र बोलाउनी रुषीकेसी : मंत्रु सांघीतला तयासीं
म्हणती सुदेवा जा सांघा भीमकीयेसीं : येकी बुद्धि आमची ॥ २

यात्रे मीषें अंबीके : देवी बीजें करावें कौतुकें
तेथौनि हरितां+ नीकें : कार्य असे ॥ ३

आणि जरी देवी हरुं तेथौन : तरी भीमकासीं होइल बहुत आपमान
आणि खस्ता पावैल नगरजन : मोडतील राउळगनें ॥ ४

यंसें बरवें वीचारावें आपुलां चीत्तीं : देवी म्हणैल तेंची करुं* हें सत्ये
यंसे जा सांघा भीमकीये प्रतीं : बुद्धी आमची' ॥ ५

ऐसें वेगीं सुदेवें जाउनी : मंत्रु सांघीतला रुक्मीनी
म्हणे देवी यात्रामीसें अंबीके भुवनीं : देवें बोलावीलें असे ॥ ६

आणि देवो म्हणती तेथौनि हरीतां : आम्हांसीं सांकडें नाहीं सर्वथा
परी हें नगर पावेल खस्ता : तुमचेयां बंधुसकट ॥ ७

भीमकां अपमानु होइल बहुत : राउळगन मोडैल समस्त
यावरीं जे बुधि सांघाल समर्थ : तेची करुं ॥ ८

जरी सामर्थ्यें नेवों वेगें : तरी मनुस्ये वेषा मानु देनें लागे
आणि हे कथा पढावी असे प्रसंगें : युगानयुगीं ॥ ९

या बोला तोषली रुक्मीनी : नीका मंत्रु सांघीतला सारंगपांनी
येऱ्हवीं हे चींता होती अंतःकरनी : बहुत माझां ।। १०

ते चींता फडीली श्रीकृष्णरायें : आणि माझे चूकवीले आपाये
तया देवासीं काइ नेणीतलें आहे : ये श्रृष्टीमाजी ।। ११

आतां असो हें देवाचें वचन करणें : उदइं[१] काळीं अंबीकेसीं येणें
हा बोलु श्रीकृष्णराणें : सत्ये मानावा ।। १२

आणि वीप्रा माझी सांघावी आप्रमीतें[१] : देवासीं साष्टांग दंडवतें
"मातें न वीसरावें सरनांगतातें"[१] : "चींता न संडावी"[२] ।। १३

मग वीप्रें येउनीयां झडकरीं : वीनती सांघीतली राया मुरारी
जें जें बोलीली भीमकुमरी : रुक्मीनदेवी ।। १४

म्हणे जी प्रातःकाळीं अंबीकेसीं : देवी येइल रुषीकेसी
शरण सर्वभावीं तुम्हांसीं : गोपीनाथा ।। १५

मग तोषौनि श्रीचक्रपानी : वीप्र पाठवीला पसाये देउनी
आतां तेलवनां आइती परी कवनी : मांडीली देवरायासीं ।। १६

ब्रम्हादीक देव समस्त[१] : आणि रुषी मुनी वीद्यावंत
हे आले तेथ समस्त : देवा जवळीं ।। १७

मग मुहूर्त प्रतीष्टीलें चतुराननें : रुषी वीप्र बैसवीले सन्मानें
बरवी आइती मांडीली देवाकारनें : तेलवनाची ।। १८

चंदनाचा पाटु पासवडीला : मुक्तांफळांचा चौकु भरीला
कनकाचा कळसु पुढां मांडीला : अमृतें भरौनियां ।। १९

ते आसनीं उपवीष्ट जाले रावो मुरारी : तवं मंत्र उच्चारु केले द्वीजवरीं
रुषी मुनी जयेजयेकारीं : मंगळें पढताती ।। २०

येउनि देवकी येश्वदा रोहीनी : देवांगना रुषीभार्या मीळौनी
तेल पाडीताती[१] श्रीसारंगपानी : नारी चतुर्विधा ॥ २१
यैसें तेल पडीलें[१] श्रीचक्रपानी : वीप्र संतोषवीले पसाये देउनीं
टीळे वीडे जाले सभे रुषी मुनीं : देवां समस्तांसीं ॥ २२
तेंचि देवाचें तेल नेउनीं : रुक्मीनीसीं लावीताती[१] सुरंगनी
आणि सीशुपाळालागौनि : करीती नाना उपचारु ॥ २३
असो हें इतुलां आवश्वरीं आइका :येउनी जरासंदु म्हणे राया भीमका
मीं मंत्रु येकु सांघैन नीका : तो आइका तुम्हौ ॥ २४
आजि राये बहुत आसती मीनले : परी आवघे आम्हासीं असती भले
हे यादव राम कृष्ण असती आले : यांची नावें कुसंका ॥ २५
हे येकाधी करीतील ख्याती : नगरावरी घाला घालीती
नोवरी काढौनि नेती : हें सत्ये जाना ॥ २६
म्हणौनि यांचा वीश्वासु मनीं : भीमका न धरावा तुम्ही येथुनी
राया द्यावीं उलीगें वांटौनी : नगरा येत्न करावी ॥ २७
मग राये हांकारींले भीमसेनें : आज्ञा दीधली तयां कारणें
आठांहीं दीसां बैसवीले राने : नगरा भंवतें ॥ २८
यैसी नीरवडी आइकोनी : मग वीप्र आला झडकरूनी
भीमकीये जवळीं येउनीं : उभा ठेला ॥ २९
तवं रुक्मीनी वीप्रातें पुसे : म्हणें द्वोजा काइ नगरीं वर्तत असे
कवण कवणु बोलताति कैसें : तें सांघावें मज ॥ ३०
तवं वीप्र म्हने माये : रावो नगरासीं नीरवडी करीतांये
मंत्रु सांघीतला जरासंदें रायें : राया भीमकासीं ॥ ३१

यादव घालीतील घाले : म्हणौनिया नगरा भवंतालें
राये मंडळीक बैसवीले : दळभारेसीं ॥ ३२

तरी कवण कवणांपासीं : सैन्यें मीनलीं कैसीं ॥
तें[1] मी तुज प्रती सांधैन परीयेसी : माये भीमतनये ॥ ३३

आवो पुर्वेचा दारवठां जान : तेथें सैल्ये राहीला असे आपण
सात क्षेवनी[1] देखा सैन्यें : असे तयापासीं ॥ ३४

आणि दंतवक्र माहावीरु : तयापासीं पांच क्षेवणी दळभारु
तो आग्नेचा दारवठां करुनीं भारु : राहीला असे ॥ ३५

आणि त्रीपन क्षेवनी सैन्यें घेउनी सरीसें : वीरु भुमासुरु आला असे
तो यादवांतें दृष्टी सुनीं राहीला असे : दारवठां दक्षीणेचां ॥

आइका सरीसें सैन्यें क्षेवनी दाहा : कासेश्वरु आला असे पाहा
नैरुत्येचा दारवठां तया : मेळिकारु जाला ॥ ३७

आणि सरीसें सैन्यें बारा क्षेवणी : पौंडरीकु आला आंगें घेउनी
तो पश्चिमेचा दारवठां भारु करुनी : राहीला असे ॥ ३८

सर्वे नवक्षेवनी दळभारु : घेंउनि आला बळीचा बाणासुरु
तो वाव्येचा दारवठां करुनि मेळीकारु : बैसला असे ॥ ३९

आइका दारवठां उतरदीसे : तेथें जरासंदु राहीला असे
तेवीस क्षेवनी सैन्यें सरीसें : असे तयापासीं ॥ ४०

आणि आठ क्षेवनीसीं लाठा : काळींगु इसान्येचां दारवठां
येसीया रुंधीलीया वाटा : बैसले आठांहीं दीसां ॥ ४१

येसें येकशतसतावीस क्षेवनी : सन्यें मीनलें असे रुक्मीनी
यादवांचा धाकु धरौनी : राहीले असती ॥ ४२

आणिकही राये आमीता कोडी : देव्हड बैसले असती परीवडीं
ऐसी नगरा केली असे नीरवडी : पवना रीगावा नाहीं ।। ४३

भीमका चैद्याचें सैन्यें : ते आवघे राखताति राउळगन
तेथ मुख्य राहीला असे आपन : रुक्मीया बंधु तुझा ।। ४४

चरयां चरयां कारली धंस देव्हडे : हुलमुखि मांडीलीं भैरवजंत्रें गुंडे
दारवठां तेलें तापताती कढे : गजावरीं टाकावया ।। ४५

आणि ढोल दमामे लागले नीसाण :
भडखळीं हांका वीर गर्जताती जान
तेणें कांहीं नाइकीजे वचन : कानीं पडीलें ।। ४६

आणि रात्री जाली वो सुंदरी : तीपुर लागले वेळुवांवरीं
ते जैसें दुजें ठानें वो अंबरीं : घातलें वैश्वानरें ।। ४७

यैसा वृतांतु आइकौनि : थोरु धाकु पडीला रुक्मीनी
म्हणे आतां देवो श्रीसारंगपानी : कैसा देखैन डोळां ।। ४८

मग उठीं बैसे चिंताग्रस्त भारी : रीगे नीगे आंतु बाहीरीं
रात्रीं न वचे भींमकुमरी : घडी युगा येव्हडी ।। ४९

यैसा देवीसीं कष्टेसीं गेला रामु : आणि दुसरा क्रमला देखा वीरामु
सुत गेला तवं नीशानु : लागला प्रशुत काळीं ।। ५०

ऐसा तो श्रीकृष्णाचा मेळीकारीं : नीसान लागला अवधारीं
उपहुड जाला राया मुरारी : लागलीं मंगळवाद्यें ।। ५१

यैसें पस्यांतुपाहारीं निगुतीं : गंधर्व आवश्वरु जानवीती
आनंद भरीतु गाताति : राया मुरारीतें ।। ५२

नारद तुंबर सरस्वती : ब्रम्हवीणे घेउनीयां हातीं
देवाचे पवाडे गातातिः मंगळरागीं ॥ ५३

सुसंदु ताळ घोळ मृदंग आइका : भेरी काहाळा रणमोहरी शंखा
यैसा वाद्येत्रांचा नादीं आदिपुरुषा : स्तवीतातिः ॥ ५४

ऐंसी ° पस्यांतुपाहारीं जानें : न्हानेयाची आइतु केली देवालागौनीं
मालीमर्दना दीधली सारंगपानी : मादनें सारीलें ॥ ५५

मग वेढीला सोनेंसळा : वरीं सोभे नवरत्नांचा मेखळा
सर्वांगीं हरीचंदनाची भोरी गोपाळा[१] : लल्हाटीं मृगनाभी ॥

बासींगें हीरलगे मनोहरें : मुगटीं बीरलीं पार्यातकें मांदारें
श्रवणीं झुळुंबुकें घातलें दातारें : रत्नखचीतु ॥ ५७

श्रीकंठीं येकावळी वैजयंती : पदकी कौस्तुभ झळके अती
जयाचेया प्रकासाचेया दीप्ती : लोपे भास्करु ॥ ५८

हातीं हातसर तुळबंधीका : वीरकांकन आंगुळीया मुद्रिका
चरनीं वांकी तोडरु नेटका : मीरवतु असे ॥ ५९

ऐंसा शृंघार करुनीयां श्रीसारंगपानी : बैसले दीव्ये सींहासनीं
तेथ करीतातिः आक्षेवनीं× : वीद्याधरी सुरंगना ॥ ६०

वीप्र आसीरवचन देती : शुरगण रुषी मंगळोच्चार पढताती
भक्त जीवें वोंवाळीतातिः : श्रीउद्धवादीक △ ॥ ६१

ऐंसी पस्यांतुपाहारीं : पुजा जाली राया मुरारी
मग उधवदेवेसीं अवधारी : देवें वीचारु कीजे ॥ ६२

देवो म्हणे आइकै मंत्रीपती : सीशुपाळा जवळीं बहुत राये असती
तुम्हीं वेगीं करा आइती : सैन्यें सामुदें[१] करा ॥ ६३

मग बोलाउनि कृतवर्मा दळवइ : तयासीं म्हणीतलें सोसांवीं
तुम्हीं पुढां आंतापुरें न्यावीं : यादवांची ।। ६४

वानीये वेवसाइये दुसें : आणि जें आचल सैन्यें असे
तें तुम्हीं आपनेंयां सरीसें : घेउनीं जावें ।। ६५

सुभद्रा येश्वदा देवकी रोहीनी :
आणि साटि सहश्र यादवांचीं अंतापुरें जानै
यां आवघीयां बैसउनि डोळीयां सुकासनीं : नेइ आपनयांसवें ।।

आणि जा आपुलें सैन्यें घेउनी : जे असे येकी क्षेवनि नारायेनी
पेणेंया येका पुढां राहावें जाउनी : तीरीं तापीयेचा ।। ६७

आतां आंबीके देवीचा भुवनीं : यात्रेसीं येइल रुक्मीनी
ते हरुनीयां[१] ततक्षणीं : आम्ही यत असों ।। ६८

युध्यासि जरी मीळल सीशुपाळ : तरी तयासीं करीन जगबोळु
यैसें बोले गोपाळु : कृतवर्मेयासीं ।। ६९

तवं म्हणे कृतवर्मा : वीनंती परीयेसी मेघस्यामा
मीयां तुजपुढां मीळावें संग्रामा : सीशुपाळेसीं ।। ७०

हें आपुलें सैन्यें आघवें : हें पुढां पाठवावें देवें
आजी क्षेनु येकु कौतुक पाहावें : माझें यादवराया ।। ७१

"आनैन येमाचा"± काळदंडु गोमटा : तयाचा करीन वरुवंटा
सीशुपाळुसैन्यें वाटीन पाटां+ : वसुंधरेचा ।। ७२

नातरीं बाणें येकें जी स्वामी : हें आघवें सैन्यें भुपाळ खिळीन[१] मी
आणि रुक्मीनी हरुनि[२] न्यावीं तुम्हीं : येरी न करावी चींता ।।

कीं गोसांवी भेडपनें मातें : पुढां पाठवीताति ऐसें वाटतें
देवो म्हणती तुम्हां सारीखा क्षेत्री येथें : कवणु असे ॥ ७४

तुझेया क्षेत्रीपणाचा आम्हां : भरवसा असे कृतवर्मा
म्हणौनिचि पुढां तुम्हां : पाठवीतु असों ॥ ७५

जेथें देवकी येश्वदा माता : हें थोरकार्यें असे वीरनाथा
यांसवें तुम्हीं असतां चिंता : आम्हां नलगे कांहीं ॥ ७६

आम्हीं येउनीं[1] भलेतयांपरीं : हे तुं चिंता कांहीं न करी
आतां वेगीं नेइ झडकरीं : न लवावा वेळु ॥ ७७

मग नीसाणा दीधले घाये : सैन्यें पालाणिलें लवलाहें
नीगाली येशोदा देवकी माये : सवें कृतवर्मा ॥ ७८

येरीकडे उधवदेवें अवधारीं : सैन्यें सामुदें केलें झडकरी
म्हणती येतां[1] पाहों भीमकुमरी : म्हणौनि थोकले ठेले ॥ ७९

असो हें सीशुपाळें तेथें : यादव सैन्यां भोंवंतें
गुपतीये राहावीले होते : ते सांघों गेले ॥ ८०

तेहीं सीशुपाळाप्रती : मातु सांघीतली नीगुती
म्हणती यादव नीगाले ± द्वारावती : सकळ सैन्येसीं ॥

---

तवं म्हणे सीशुपाळु : हा कवणां[1] काजा आला गोपाळु
आणि सवेंचि नीगतां वेळु : न लगेचि यासीं[2] ॥ ८२

तवं बोले जरासंदु : देखौनि आमचा कटकबंधु
यादवीं सांडीला मदु : नीगाले न पाहातु वासु ॥ ८३

असो हें आतां अवधारीं : रुक्मीनीसीं न्हानें करीताति सुंदरी
नाना आळंकार लेइली भीमकुमरी : वीचीत्रांपरीं ॥ ८४

तवं तेणें भीमकें रायें : घडीये प्रतीष्टा केली पाहे
मुळन्हानेयाची आइती करीतांये : देवी रुक्मीनीसी ॥ ८५
तें आइकोनि रुक्मीनी : वीकळ गेली अंतःक्रनीं
म्हणें राखै जी श्रीचक्रपानी : भक्तवछळा ॥ ८६
मग इतुला आवश्वरीं : भावकळनेतें म्हणे भीमकुमरी
आतां काइ करावें झडकरीं : सांघै सखिये ॥ ८७
आतां वीवंळलें वो सुंदरी : भानु उदैला अंबरीं
उपहुड जाला राया मुरारी : पाहीलें[1] ज्ञानियां भक्तां ॥ ८८
गाइचें सुटलीं बंधनें : वछां जालीं स्तनपानें
सेजा वीसर्जुनीया प्रीया कारनें : कामीनीं सुखालींगन[1] देताती ॥
सटुकर्मा आवश्वरु जाला द्विजा : करीताति संध्या स्नानें देवपुजा
प्रतिमालिंगा± आदरीलीया पुजा : मंत्रोच्चारीं ॥ ९०
मांडीलीं वैष्णवें कीर्तनें : वाजींनलीं मंगळवाद्यें वाधावणें
ळळीत देशांकांचि आळौंणि मानें* : गाताति पवाडे देवाचे ॥
रायां भद्रीं जालीं आसनें : वोळगे येताती रावो रानें
आरतीया मंगळोच्चारीं पेखनें : मांडलें सभेमाजीं ॥ ९२
ऐसा उदो जाला वो दीणकरु : फीटला वो आंधकारु
गगनभुमीं उधळला सेंदुरु : उजळलीया दाही दीसा ॥ ९३
ना ना तो गगनभुमीसीं सुहांवा : कुंकुमाचा सडा घातला बरवा
कीं रातोत्पळांचा चांदवा : धरीला श्रीकृष्णावरीं ॥ ९४
कीं गगन मानीकांचें ताट करीं घेउनीं : मधीं उजळीला दीपु सहश्रकीर्नि
पुर्वदीसा वोंवाळुं आली चक्रपाणी : मज पातां ॥ ९५

येसें पाहा वो सजनी : आतां कवनें उपायें भेटे श्रीचक्रपाणी
कवनें मंत्रें जाणें होयं[१] अंबीके भुवनीं : हें सांघै प्रानसखियें ।।
तुं तवं मंत्रीया सीरोमणी : त्रीकाळज्ञान वर्ते तुजलागौनी
तरी श्रीकृष्ण भेटे तो मंत्रु सजनी : सांघं भावकळने ।। ९७
तवं भावकळना म्हण सजनी : तुजहुनी कवनी असे सीहांनी
परी मंत्रीणिपणें मजलागौनी : मान देतासि ।। ९८
तो श्रीकृष्ण सर्व ज्ञानियांचा बापु : तुझा हृदइं असे सर्वज्ञदीपु
तेथ रजस्तमां अज्ञानाचा लेपु : कैंचा माये ।। ९९
परीं आइकें मी तुझा ठाइं : मंत्रीणिपणें असे पाहीं
म्हणौनि मान देतासी तरी कांहीं : बोलणें लागैल । १००
तवं भावकळना म्हने देवीसीं : स्वप्नु सांघै वो मातेपीतेयासीं
जे अंबीका आली असे स्वप्नांसी : तरी यात्रे बोलावीले असे ।।
मग तुज अंबीके पाठवीती सजणी : तेथ येइल श्रीसारंगपाणी
तो तुज करील पाटाची राणी : सीधी[१] जाती[१] मनोरथु[२] ।।
तवं देवी बोलोली उतर : म्हणे नीकी होसी वो चतुर
या मंत्रापस्ये थोर : कांहीं न देखों माये ।। १०३
मग देवो धरुनीयां मनीं : झडकरीं णीगाली रुक्मीनी
तेथ होती देखा जननी : सुधामती ।। १०४
तवं माते देखिली कुमरी : उठौनि आळंगीली दोहीं करीं
म्हन कां△ नीद्रा मोडीली सुंदरी : आलीसी कवणां काजा ।।
तवं रुक्मीनी म्हणे माये : मज अंबीका स्वप्नां आली पाहे
त्या मज पुढारु दीधला आहे : यात्रे बोलावीलें असे ।। १०६

ते म्हणें आधी घेयावें माझें दरुशण : मग करावें उदकपान △
तरी करूं जावों पुजन : सांघे ताताप्रती ।। १०७

मग कुमरीसीं सुधामती : येउनीं भीमकेंसि असे बोलती
सांघीतली आवघी स्वप्नस्थीती : म्हणे यात्रे आइत करा ।।

तवं रायें बोलावीला राना : अंबीकादासु पुजारा सिहांना ±
म्हणे जाये आइती करा अंबीके भुवनां : देवी यात्रेसीं येते ।।

बरवा सोधावा गाभारा : क्षेत्री आसेल तो घालावा बाहीरा
आणि रुषी मुनी योगेश्वरा : मानु करावा ।। ११०

मग "रानेनि येउनि" ± झडकरीं : गाभारा देउळ झाडीलें चहुंफेरीं
जन घातले बाहीरीं : बरवी नीरवडी केली ।। १११

मग रुषी मुनी ब्रह्मचारी : तयां दीव्यासने घातलीं पटीसाळावरी
करुनि टीळे वीडे चंदने भोरी : सन्माने बैसवीले ।। ११२

देउळ श्रींगारीलें आइका : सडें संमार्जनें चौक रंगमाळिका
मखरें तवंगें फरारे पताका : बांधलीया माहाघंटा ।। ११३

तळिया तोरनें भरीलीं माहाद्वारीं :
पटकुळीं पौळी कापडीलीया चहुंफेरी
माडीं ' वीचीत्र केली कुसरी : ते वर्नुं कवन जाने ।। ११४

तवंगावरीं चहुंकोनीं कुंजर : तयावरीं सींहाडे ' परीकर
ते नीर्जिउ परी साजीवं अनुकार : दीसताती ।। ११५

माडां तवंगांचा खनोखनीं : ताळ घोळ मृदंग नाचणी
आणिकही सांघीजैल करणी : परी होइल वीस्तारु ।। ११६

ऐसी अंबीकेसीं रचनां करुनी : रायापुढां सांघीतलें येउनीं
आतां कैसी यात्रे नीगाली रुक्मीनी : ते सांघे कवी कृष्णदासा ।

प्रसंग सतरावा समाप्त * (ग्रंथ संख्या १९४१)

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

## प्रसंग अठरावा

श्रीपरमात्मने नमः

आसो हें रुक्मीया आणि प्रधानु : आले बहुतां वीरासीं मीळौनु
तेहीं जुहारीला रावो भीमसेनु : मग आले सभामंडपासीं ।। १

राया भद्रीं जालें आसन : वोळगे आले सकळ जन
रायें कुमरा मंत्रीया केलें ज्ञान : स्वप्न अवस्थेचें ।। २

म्हणें कुमरी स्वप्न असे देखिलें : जें आंबीकेनें यात्रेसि बोलावीलें
तरी आतां आइत करा वहीले : सैन्यें सामुदें करा ।। ३

वेगीं घोडयां घाला पाखरा : रथी माहारथीये सामदे करा
आणि गुढर घाला कुंजरा : हांकारा आढांउ धनुर्धरां ।। ४

यैसी वेगीं[१] झडकरी : यात्रेसीं न्यावी कुमरी
तवं काइ बोलीला तीये आवश्वरीं : कुमरु रुक्मीया ।। ५

मग रुक्मीया म्हणे ताता : वायां यात्रेचें वाढवीता
तीये अंबीकेसीं जातां : थोरु प्रमादु असे ।। ६

तेथें थोरु असे अपावो : जी तेथेंचि उतरला श्रीकृष्णरावो
तयाची[१] वीचीत्रें ढालें हा भावो : न कळे तुम्हां ।। ७

आइका मुळेंवीण राया : जावों नये कव्हणांचेया ठायां
तरीं येथ आपसंयां यावया : यादवां कवन कार्ये ॥ ८

तुम्ही नेणां तया कृष्णाची करणी :
हा न कळे देवां रुषी आदि करुनी
हें आजीची यात्रा वर्जावी[1] रुक्मीनी : जरी सिहाणे असा ॥ ९

तवं बोलीला भीमकु राणा : म्हणे आमुचा कुळधर्मु यैसा असे जाना
आधीं नोवरी न्यावी अंबीके दरुसना : मग लावावे लग्न ॥ १०

आणि जरीं यात्रा वर्जणे : तरी हे हांसती सकळ[1] राण
म्हणती[2] धाकु धरीला भीमसेनें : मनिं यादवांचा ॥ ११

मज श्रीकृष्णेसीं जाली भेटी : काइ सांघों प्रीतीं केलीया गोष्टी
तया देवा वांचौनि ये श्रृष्टीं : नाहीं नीतमंतु[1] ॥ १२

आणि यादवांसीं आम्हां प्रीती असे : ते कदा मजसीं न करीती यैसें
तयांसि कहीं दुर्जेपण नसे : आपनेयांसीं ॥ १३

रुक्मीया म्हणे तया तुम्हां अती प्रीती :
परी सीशुपाळा कृष्णां दंद उभा हातीं
म्हणौनि रुक्मीनी हरुनी नेती : सळें चैद्याचेणी ॥ १४

तवं भीमकु म्हणे माझा घरीं : आमीत वीरु असती भारी
येकु येकु रुसे तरी ग्रासु करी : या त्रैलोक्यांचा ॥ १५

तें मी आवघेचि सैन्य : आतां आपनयां सवें घेइन
मग मीची कुमरी नेइन : यात्रे अंबीकेसीं ॥ १६

तुम्हीं आवघेचि असा नगरीं : मीचि यात्रेसी नेइन कुमरी
तुम्हीं पुरुषत्वें मीरवावीं घरीं : आबुलीयां पुढां ॥ १७

जो पुरुषु आपुला आंतरीं : रणीं± दुजयांचा धाक धरी
जळो जळो ये संसारीं : जीने तयाचें ॥ १८

यैसें म्हणौनि रावो उठीला झडकरीं :
पालाणा पालाणा म्हणौनि लागलीया भेरी
तवं प्रधानें हातु ठेवीला पायांवरीं : मग बोलीला कैसें ॥ १९

तवं सुमती रायातें म्हणें : मज असतां तुम्हीं कैसें जाणें
म्हणती भीमकाचा घरीं कव्हणी रानें : नसती[1] काइ[2] ॥ २०

तया± सवें ब्रीदाइत उभे ठेले : काइ देसीं यादवची दादुले
आणि[1] देखा नाही आमुले : क्षीतीमाजी ॥ २१

काइ यादवचि± जाले सुभट : आणिक± रानीयां व्यालीया खुंट
म्हणौनि भुजा त्राहाटौनियां घालीती आंट : क्षेत्री मीसींयांसीं

यैसें वीरांचें लाठेंपन देखौनि : रुक्मीया संतोसला मनीं
म्हणें यासवें पाठवीतां रुक्मीनी : कव्हणीं आड न रीगे ॥ २३

म्हणे राया हा प्रधानु सीहाना आणि क्षेत्री : यासवें पाठवावी नोवरी
परी सवें सैन्यें द्यावें अवधारी : दुनें यादवांपस्ये ॥ २४

मग नीवडीले वीर अती खरे : जे रणग्रासु रणसोरे
माहाकाळातें करीती पाठमोरे : रणां माजी ॥ २५

कैसा रुक्मीया बोलीला वीरेसीं :
म्हणे नीकी नीरवडी करावी अंबीकेसीं
आणि यादवांचा वीश्वासु मानसीं : न धरावा तुम्हीं ॥ २६

जरीं यैसेनहीं आले चढौनि : तरी हातु न राखावा तुम्हीं
बरवी यात्रा करावी[1] रुक्मीनी : नीकीयांपरीं ॥ २७

ऐसी भीमकें रुक्मीयें मीळोनि : प्रधानासवें पाठवीली रुक्मीनी
सवें सैन्यें दीधलें तींनि क्षेवनी : घरीचें आपुलेंची ॥ २८

आणिकांही रायांचीं सेना± : वहुतासवें पाठवीली जाना
तयासी गनना : कवण करी ॥ २९

मग[१] श्रृंगारु करुनियां भीमकुमरी : सखिजनेंसीं नीघाली अवधारी
रत्नखचीतु डोळीयेवरी : आरुढली पैं ॥ ३०

सवें आमीता दांडीया सोवासीनीं : पांचसतें आंगलगा कामीनी
आणि रुषीभार्या सुकासनी : सवें चालताति ॥ ३१

येकी चवंरें देखा ढाळीती : येकी वींजणवारे घालीती
येकी पुढां नृत्ये करीताति : वाजती मंगळवाद्ये ॥ ३२

सवें रुषी[१] मुनि वीप्र स्तवीती बंदीजन सैंवरें पढताति
जे मागां जाली ख्याती : देवकन्यांची[२] ॥ ३३

आणि जेप डत आकास धरीती : तयाचा करीं वोडनें खांडी झळकती
ते सवें आढाउं देखा चालती : जवळीं सहृश्र दाहा । ३४

सवें रथ घोडे कुंजर : खोलताती[१] पायांचे मोगर
ऐसें चहुंकडे सैन्यं आपार : चाले भीमकीये सवें ॥ ३५

सुदेवो डोळीये जवळीं चाले : तयासीं आळोंची रुक्मीनी बोले
म्हणे ताता हें सेंन्यें आमीत नीगालें[१] : आतां कैसें वर्तेल ॥ ३६

तवं वीप्र म्हणे परीयेसी वो माये : हे काइसें सैन्यें येथें काइ आहे
तो येकुची श्रीकृष्ण मृत्ये[१] पाहे : ग्रासी त्रैलोक्यासी ॥ ३७

आणि हे यादववीर वडवानळ : हें सैन्यें त्रुन ग्रासीती सकळ
जंसें व्योम गीळीं मेघपडळ[१] : क्षेनांमाजी ॥ ३८

ना हें सैन्यें मज गमलें आनारीसें : हे नवसांचे बोकड तुजसरीसे
यांची देवो बळी देतील अन्यायेसें : देवी अंबीकेसी ॥ ३९

तुज देवो करील पाटाची राणी : हें सत्ये जानां आमची ब्रम्हवाणी
तवं उचीतीं वारीला रुक्मीनी : द्वीजराजु तो ॥ ४०

असो हें आंबीके आली रुक्मीनी : उतरली डोळीये वरुनीं
नेटवटा पाउवा चरनीं लेउनीं : माहाद्वारीं उभी ठेली ॥ ४१

तवं कैसी देखिली सैन्याची नीरवडी : नांवनीगेयां वीरांचीया कोडी
तेथ राहीले सात सात परवडी : अंबीके भवंते ॥ ४२

सवें रथ घोडे कुंजर : उभे राहीले आढांउं धनुर्धर
आतां असोतु हे बोलाचे वीस्तार : देवी आली आंबीके जवळीं ॥

यैसी प्रवेसली आंबीकेचा भुवनीं : तवं पुढां अंबिका देखिली नयेनी
मग करसंपुष्ट जोडुनी : केलें दंडवत ॥ ४४

देवीसीं केलें देखा पंचामृतें न्हान : आणि येक्षकर्दमांचें वीलेपन
आणि केली दीव्यांबरें परीधान : देवी आंबीकेसीं ॥ ४५

वाइलीं आळंकरणें रत्नांचीं : लल्हांटी सेंदुर रेषा कुंकुमाचि
मुगुटीं कुसुमें पार्यातकाचीं : बीरीलीं देवी अंबीकेसीं ॥ ४६

बरवीं कनक कमळें गुंफीलीं : तयांचीं वाइली अंबीकेसीं लाखौली
यकी माळ करीं घातली : देवी अंबीकेचा ॥ ४७

कुंकुम आक्षेतीं आर्चन करुनीं : क्षीरबोनें उपहारु[१] दाखउनी[२]
मग दोन्ही कर जोडुनीं : मांडीलें स्तवन ॥ ४८

म्हणे जये जये त्रीभुवन व्यापके : जये सकळ देवता नेमके
जये जये आगाधे अंबीके : वीश्व[१]जननीये ॥ ४९

तुझा पाहातां स्वरुपनीर्धारु : वेदश्रुतीं आगमां न कळे पारु
तेथ पुराणां रुषीचा वीचारु : आरुताचि ठेला ॥ ५०

ऐसी तुं आगाध कवणां न कळेसी :
आणि पींडी ब्रम्हांडीं व्यापुनि वर्तसी
जीव देवतांतें खेळवीसी : सुत्रें आपुलेनि ॥ ५१

आणि प्रळये उत्पती स्थीती : हे आवघी शृष्टी रचना तुझा हातीं
या सकळ देवतांची आधीष्टाती : तुंचि देवी ॥ ५२

ऐसी तुं आदिपुरुषाचि शक्ती : तुंचि संयोगु वीयोगु साह्यं करीती
"तरी मज मेळवी श्रीकृष्णचक्रवर्ति : कैवल्यनीधान"[१] ॥ ५३

मग अंबीका जाली प्रसन : रुक्मीनीसीं दीधलें वरदान
आसरनीं[१] बोलीलि वचन : म्हणे पावसीं मुरारीतें ॥ ५४

तुं वो वरु पावसी मुरारी : हें सत्ये जानँ भीमकुमरी
आतां नको कांहीं चींता करी : मनामाजी ॥ ५५

मग जे माळ होती अंबीकेचा करीं : ते तीयां दीधली भीमकुमरी
म्हणे हे तुं वाये वो श्रीहरी : जाये भीमतनये ॥ ५६

मग थोरु संतोसु जाला रुक्मीनी : देवी वंदीली कर जोडुनी
मग देवांगनां रुषीभार्या बैसौनि[१] : पुजा करीतांये ॥ ५७

पुष्पीं फळीं तांबोळीं नानापरीं : आळंकार भुषणि दीव्यांबरीं
यैसीया पुजीलीयां भीमकुमरीं : रुषीभार्या देवांगना ॥ ५८

मग देव द्वीज रुषी मुनी : ब्रम्हवीद बैसले[१] सन्मानीं
ते आनर्घि रत्नीं पुजीले रुक्मीनी : सोडस उपचारीं । ५९

बहुत दतदक्षनें तोषवीले : षडुरस भोजनीं संतृप्त केले
मग तेहीं आसीर्वचन[१] दीधलें : जे पुरती मनोरथु ॥ ६०
मग भावकळनेचा हातु धरुनीं : माडांवरीं आली रुक्मीणी
जवळीं सदगुरु सीरोमणी : वीप्र सुदेवो ॥ ६१
रुक्मीणीतें पाहावया लागौनि : त्रीलोक्ये आले मीळौनि
देव सुरगण रुषी मुनी : राये भुतळींचे ॥ ६२
देखौनि देवीचें बरवेंपण : वेधलें आवघें त्रीभुवण
म्हणती हें लावन्यें नीरोपम : कैसें मुर्त जालें ॥ ६३
ऐंसें रुक्मीनिचें रूप देखौनि : राये मुर्छा गेले मेदीनीं
हातीयेरु[१] गळाले[२] हातौनिं : क्षेत्रीयांचे ॥ ६४
ऐंसी ते वीश्वमाता [१]जननी[१] : मन्मथा जन्म तीयेपासौनीं
वरीं ते आदिपुरुषाची राणी : वर्नुं कवन जानें ॥ ६५
असो हें माडांवरीं[१] भीमकुमरी : भवंतें पाहीलें चहुंफेरीं
"तवं माहाभार देखिले अवधारी : रायांचे मीनले असती"[२] ॥
म्हणे यामध्यें मुरारी : असे कवनीयें भारीं
मीयां वोळखावा कवनीये परीं : कवनें टकेनिं ॥ ६७
तरीं आतां सुदेवालागौनीं : देवो पुसों परी कवणों
म्हणौनि लाजीली अंत:करनीं : म्हणे सखियांसीं ते ॥ ६८
तरी पुसो हा कवनु रावो : प्रसंगें सांगैल सुदेवो
जरी जानैल माझीये जीवींचा भावो : तरी दाखवील मुरारीतें
मग सुदेवातें म्हणे भीमकुमरी : वीप्रा कवनुं रावो असे कवनीये भारीं
मीयां वोळखावा कवनीं परीं :+ कवनें टकेनीसीं ॥ ७०

तवं तो वीप्र सर्वज्ञानु' सर्वोत्तमुं : तेणें जानितला देवीचा मनोधर्मु
तो म्हण मज पुसतांये मेघस्यांमु : आड करुनीया रायांतें ॥ ७१

तवं बोलीले द्वीजें : म्हणे आतां सांघेन आवघे राजे
ते तुं* वोळखि सहजें : भीमकुमरी ॥ ७२

आसो पैल हस्तीचा माहाभारु : तेथें गजावरीं वळघला महावीरु
ब्रहद्रथा रायाचा कुमरु : तो हा जरासंदु ॥ ७३

पांचसतें नंदीघोष रथ± जयातें : महेशा वांचौनि न मनीं कव्हणातें
तो श्वेतु श्रीगीरीतळीं मीरवे ते± : बानु सहश्रबाहो ॥ ७४

सवें चातुरंग घेउनि सैन्य : युध्याचीये आइतीसीं असती आपुन
ते पैल कुंकुमवर्न सातीये तळीं दोघे जन : साल्ये दंतवक्र ॥ ७५

पैल साटी सहश्र तेजी कृष्णवर्ण : पुढां पंचवीस सहश्र कुंजर जांन
काळभैरउं टका तेथ राहीला असे आपण : बलबलु महावीरु ॥

पैल भुमांसुरु श्वेतु सातीये तळीं : जेने क्षेत्रीभार जींतीले भुजबळीं
सैन्यें वोळगतें तया तळीं : त्रीपण क्षोणी ॥ ७७

तयाचि जवळीं चौघे जन : जयांवरीं सातीया कुंकुमवर्न
तेचि मुरुपीठगनु बानु हे प्रधान : च्यान्ही भुमांसुराचे ॥ ७८

पैल णीळा त्रीसुळ टका : तेथ कासेश्वरु पाहे वो नेटका
तया जवळीं ब्राम्हन आइका : आसीवार साटी सहश्र ॥ ७९

आणि पैल जगझडपु टका पाहे : तयातळीं पौंडरीकुवीरु आहे
तो आपनयातें म्हणवीतांये : वीष्णु क्षेत्रीयांवरीं ॥ ८०

तवं वीचारी द्वीजवरु : म्हणे दीवसु जाला येकु प्रहरु
आतां चौघडीयां आवश्वरु : असे लग्नवेळ ॥ ८१

तरी आतां असो हे भुपती : कां वाउगें बोला वीत्पती
देवीसीं जयाची आसे आर्ति : तोचि सांघों श्रीकृष्णरावो ॥८२

एसें पाहीलें चहुंकड : तवं यादवरावो न देखे[1] पुढें
म्हणें थोर जाल कुडे : देवी सांडील प्रांनु ॥ ८३

जरीं न देखा म्हणौन श्रीकृष्णराणां : तरी देवी रुसैल प्राणां
वोखट जालें जी जगजीवणां : आतां जोगउं कैसी ॥ ८४

ऐसें वीप्रा पडीलें सायास : तवं वरुती पाहीली वास
आंबरी वीमानें देखिली आस्मसास[1] : दाटलीं अंतराळीं ॥८५

म्हणें आतां वीमानें दाखउं रुक्मीनि : तवं येइल श्रीसारंगपानी
तो सरणांगतां लागौनि : नव्हेरी कहीं ॥ ८६

मग म्हणे पाहे वो भीमकुमरी : अंतराळीं दुजी जाली अमरपुरी
हरीहरब्रम्हादीक आले सपरीवारीं : वीमानी बैसौनि ॥ ८७

आणि तेतीस कोडी सहीतु : लोकपाळेसीं आला अमरनाथु
वीमानेंसीं वीमान दाटलें तयासीं अंतु : कवन करी ॥ ८८

एसें अंतराळीं देव पाहाती : गगनीं थीरावले[1] गभस्ती[2]
राहीली पवनांची गती : व्यापार वीसरले ॥ ८९

ऐसें जवं पाहे[1] द्वीजवरु : तवं रायां जाला हाहांकारु
पंचजन्याचा गजरु : आइकोनिया ॥ ९०

तवं रुक्मीणि म्हणे द्वाजवरा : हाहाकारु कां जाला नृपवरां
तवं वीप्र म्हणें आला आला वो नोवरा : मुरारीमल्लु ॥ ९१

पल हीरेलग रथु : वरीं गरुड असे फीरतु
तया मेघडंबरातळीं गोपीनाथु : पाहे वल्लभ तुझा ॥ ९२

या प्रथवीचेयां रायांवरीं : आनंदुभास्करु तपतांये मुरारी
तो तुझा स्वामी भीमकुमरी : कृष्ण लावन्यें सींधु ।। ९३

ऐसा देखौनि श्रीसारंगपानी : दोन्ही कर जोडुनीं वंदीला रुक्मीनि
मग म्हणें आतां पावं जी झडकरुनीं : भक्तवछळा ।। ९४

तुं आरतांदानीं करुनांकरु : आणि सरनांगतां वज्र* पंजरु
तरी आतां नको लाउं उसीरु : पावै देवदेवा ।। ९५

आतां भक्तवछळ रावो मुरारी : रुक्मीनि हरिल[१] कवणींपरी
ते कथा वेगों सामोरी : सांघे कवी कृष्णदासा ।। ९६

प्रसंग अठरावा समाप्त * (ग्रंथ संख्या २०३७)

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

## प्रसंग एकोणिसावा

श्रीपरमात्मने नमः

असो हें यादवदळ[१] संसारलें[२] : गज घोडे सामदे जाले
पायेदळ आमीत नीगालें : आढाउं धनुर्धर ।। १

तवं सारथीय झडकरीं : वागारें सरीसें केले अवधारीं
तया रथावरीं कैसा मीरवला रावो मुरारी : श्रीयासहीतु[१] ।। २

तया रथाचि कळाकुसरी : माझेया मती न वर्नवे अवधारी
जयावरीं आरुढें[१] रावो मुरारी : तो रथु कैसा सांघों ।। ३

त्रीभुवनीं वानीजे रथु नंदीघोषु : तयापस्ये सहश्रधा हा आधीकु
आणि सामर्थ्यें नाहीं आणिकु : रचला श्रृष्टीमाजी ।। ४

तो आन वागउं नेणती कव्हनीं :
म्हणौनि वीश्वकर्मा आला दारकौं होउनीं
तो आवघे'चि जानें खुतखावणीं : श्रीकृष्णरायाची ।। ५

तो रथु न वर्नवे माझीया मती : तया उपमा द्यावया नाहीं क्षीतीं
जो वैकुंठरायें धाडीला उचीतीं : देवरायांसी ।। ६

तो सेंब जांबुनदाचा अवधारी : वीश्वकर्मेनीं वोतीला कुसरीं
नवरत्नें खेवनीलीं वरीं : झळकती चींतामणी । ७

वज्रा वाटां बांधलीया नीगुती : वरीं चक्रीं पत्र वेली झळकती
बरवें कनक तुंब झळाळीती[२] : तुळें मानीकांचे ।। ८

वरी सेंब पंजरु मीरवे बाळानीं : जैसे भवंते उगवले दीनमणी
पांचीचे सीहांडे चहुंकोनीं : सोभती अतीमानें ।। ९

तयासीं कळे पवनु धरीला नीगुती : रथ चालतां सींहुनादीं गर्जती
पुढां गजभारु पळती : ते ध्वनी आइकोनीयां ।। १०

तेथ पंजरीं पुतळीया खणोंखणीं : नृत्ये करीताति परी कवणीं
तीया जडा परी कृष्ण संबंधें करुनीं : आले साजीवं भावो ।। ११

केसा ध्वजास्थंबु नेटका : जैसा आकासा सुदला टेंका
वरी छत्राकारु बरवा आइका : सोभे अतीमानें ।। १२

तो कैसा सोमकांताचा उभा : जैसा कामत्रीला चंद्राचा गाभा
वरीं रत्नें क्षेवनीलीं ते प्रभा : फांकतांये ।। १३

तयावरीं कळसु चींतामनीचा : जैसा वोतीला आग्नीतेजाचा
कीं भानुबींब ठेवीलें सीरीं △ चंद्रांचा : तैसा मीरवतु असे ।। १४

कैसे ध्वजा फरारे तयावरीं : मीरवताती नानापरीं
जैसा मारुतु चढतांये तयावरीं : करी धरुनीयां ।। १५

आमीता घंटा लागलीयां रथीं : च्यारीं ध्वजास्थंबावरीं गर्जती
जैसीया श्रृती पवाडे पढताती : तया आदिपुरुषाचे ।। १६

कैसा गरुड मीरवे ध्वज स्थंबावरीं :
जेनें नवही नागकुळें घातलीं तोडरीं
तो वरीं रीगाला[१] असे फेरीं : तया उपमा कैसी ।। १७

जाणौनि आपुला स्वामी श्रीसारंगपानी :
तयासि करीतांये आपुली वोंवाळनी
"नींब लोण दोंहीं पांखि करुनी : करीतांये देवावरी"[१] ।। १८

तेणें कैसे दृष्टीं सुदले रीपु : तयांचा करुं पातांये झडपु
नाहीं कृष्ण आज्ञा म्हणोनि कोपु : सांवरीतु असे ।। १९

तयां रुंजी करीतां घा ाटें[१] : तो नादु अंबरीं न संटे
आणि आवीसें घेंवों पातांये चांचुपुटें : सीरे[२] वरीयांचीं ।। २०

ऐसा ती स्वामीकाजा वहीला : आद्भुत रूप धरुनीं आला
मग ध्वजास्थंबावरीं राहीला : सेवक म्हणौनिया ।। २१

पुढां सर्वकळानीपुण सारथी : जो श्रीकृष्णाची खावनी जाणे नीरुती
तो वीश्वकर्मा दारुकापती± : रथीं मीरवतु असे ।। २२

उच्चःश्रवा वोंवाळीजे जयावरीं : तैसे रथीं जुंतले वारु* च्यार्‍ही
तयाचें वर्ण नांवें अवधारी : ते मी सांघैन आतां ।। २३

येकु सैन्य दुसरा सुग्रीउं सुरेखु : तीसरा बळाहकु चौथा मेघपुष्पु
येहीं नांवे देखा दारुकु : आळवी चौघांतें ।। २४

ते च्यान्ही सुध श्वेत उजळे : जैसे चंद्रबींबाचे वोतीले
मनांपासौनि वहीले : गती चालणे ते ॥ २५

ते रागा वागां नीपुण असती : डोळेयां पस्ये चंचळता अती
चालतां खुर न लगती क्षीती± : गगन कवळीताति पैं ॥ २६

जरी ते नासापुटें फुरुफुरुती : तरी काळा धाकु पडे चीतीं
आणि हींस करीतां फुटों पाहे क्षीती : तया तेजीयांचेनीं ॥ २७

ते वेगु दावीतां स्वर्गा जावों म्हणती :
तयां त्रीलोकीं वीचरती असे शक्ती
वरी पांखरा देखा मीरवती : रत्नखचीता[१] ॥ २८

मोहाडां हीरे झळकती : नवही सडका भुइंसीं रुळती
ऐसे ते तेजी मीरवती : रथीं देवरायाचोये ॥ २९

तो रथु सैन्येंसींधुचें तारु "माहाजुग"* : मधीं कैवल्ये[१] केणें अती चांग
ना ना कीं ते प्रकाशाचें गीरीदुर्ग : वरीं धुर श्रीकृष्णरावो ॥ ३०

ऐसा मीरवला गरुडध्वजरथु : तयावरी आरुढले गोपीनाथु
तो लावन्येसींधु समर्थु : वर्णुं कवणु जाणे ॥ ३१

तो कैसा शृंघारु करुनीं श्रीचक्रपाणी : ध्वजास्थंबेसीं बैसले सीहांसणी
तयांचा श्रीमुगुटीं मुगुटमणी : झळके अतीमाणें ॥ ३२

श्रवणीं मकरकुंडलें झळकती : कंठीं पदक कौस्तुभु वैजयंती
भुजावरीं बासींगें मीरवती : रत्नखचोतें ॥ ३३

वीरकांकनें तुळबंधीया : हातसर बाहीवटे शोभती तया
झळकती मुद्रीका आंगोळीया : देवरायासीं ॥ ३४

जें क्षेना शृष्टीचा ग्रासु[१] करी : तें सुद्रसेण मीरवे दक्षीणकरीं
प्रजीलें रायें मुरारी : चौहातमल्लें ।। ३५

चरणीं तोडर वांकी बोबाटी[१] : सोनेंसळा कासीला मालगंठी
सर्वांगीं बावनेयाची उटी :+ लल्हाटीं कस्तुरीका[२] ।। ३६

प्रहसीतु मुखि मीरवे तांबोळ : वाचा मेघगंभीर रसाळ
नेत्र सुप्रसन्न[२] वीशाळ : सोभताती ।। ३७

वरीं पांगुरले सोनेंसळा : तो वीद्युलते पस्ये तेजें आगळा
वरीं मेघडंबर मीरवे गोपाळा : चवंरें ढळताति ।। ३८

ऐसा श्रीमंतु सुंदरु : रथीं आरुढला सारंगधरु
रुक्मीनिवल्लभु करुणांकरु : पुतळा कैवल्याचा ।। ३९

सवें ब्रह्मादीक देव रुषी मुनी : भाट वाखानीताती सारंगपानी
वीप्र करीताति वेदध्वनी : लागलीं मंगळवाद्यें ।। ४०

नारद तुंबर गाताति पवाडे : अष्टनायेका नृत्ये करीताति पुढें
आतां कैसा चालतांये कोडें : श्रीयादवरावो ।। ४१

तवं लागले संख नीशान भेरी : सैन्यें चालीलें वाद्यांचा गजरीं
मधी रथीं धुर रावो मुरारी : भवंते सांघन कवन कवन ।।

वामे रामु रोहीणीकुमरु : जो अरीराया त्रुण वैश्वानरु
तो कोपे तरी करी संहारु : क्षेणां त्रीलोक्यांचा ।। ४३

तयाचेया नांगरा नांवें अरीमुळछेदु : आणि मुसळा नांवें रीपुसीरभेदु
तो बळभद्र सोरेयां सींधु : चाले वामकरीं ।। ४४

आइका अरीराया काळ कृदांतु : या त्रीभुवनांमाजी वीक्षांतु
तो सात्वीकी आढाउंवेसीं चाले गर्जतु : मागां सींह नादीं ।।

दक्षोनकरीं चाले घनुर्धरु पार्थु : जो अरीराये रनग्रासु रणधुमकेतु
तो पांडव पागारु असे गर्जतु : शंखें देवदंतेसीं[१] ॥ ४६

पुढां चाले मंत्रीयां गुरु : क्षेत्रीयांचा बापु उधवदेवो वीरु
तो देखा राये रणरंगधीरु : अरीराये[१] प्रतापदहनु ॥ ४७

जो आदटां रायांचा आमोला[१] : जुंझारांवरीं साटु उभारीला
तो प्रतापीया रावो वळघला : थाटीं वसुदेवो ॥ ४८

जो अरीरायां माहाबाहो : वैरीयां म्हणवीतांये घनघावो
तो गजभारीं[१] चाले रावो : उग्रसेनु ॥ ४९

जो येकु[१] येकु[१] त्रीलोक्याचा[१] ग्रासु करी : ऐसे आमीत वीर अवधारी
मानले असती माहाभारीं : छतीसां कुळीयांचे ॥ ५०

तेथ क्षेत्रीयां सीरोमणी : प्रतापीयां रायां तरणी±
तो माहाभारीं केला असे अग्रगणी : आक्रुरदेवो ॥ ५१

जयांचे त्रीभुवनी पवाडे : ते यादव वीर अतीगाढे
भंवते चालताति चहुंकडे : श्रीकृष्णा जवळीं ॥ ५२

आतां असो हा वीस्तारु : सांघतां पुढील कथा ठाकेल आपारु
देवें मामदे[१] देखौनि वीरु : वाइला पांचजन्यु ॥ ५३

तो कैसा संख त्राहाटीला मुरारी : तो नादु गर्जिनला अंबरीं
जैसें आकास फुटलें वरीं : मेरु थरारीला ॥ ५४

तया पांचजन्याचेनि नादें : दाही दीसा ध्वनी कोंदे
मेरु फुटतांये पडीसादें : चालीले यादव वीर ॥ ५५

मग सारथा खुणावीलें मुरारी : म्हणती वेगु रे वेगु झडकरी
वाट पाहातांये भीमकुमरी : वेगीं वहीलें चाला ॥ ५६

तवं सारथीयें झडकरुनीं : साटु भवंडीला गगनीं
तेजी त्राहाटीले बापु म्हणौनि : मग कैसे नीगते जाले ।। ५७
मग सणसणां नीगाले घोडे : धाकें प्रथवी खालीं दडे
"ते न थरे वराहाचीये दाढे"[१] थरथरां कांपतांये ।। ५८
चालतां रथांचा चक्रवाटीं : पृथवीचे पांयें रीगताति पोटीं
फुटों पाहातांये करटी : आदीकुर्मांची ।। ५९
आणि च्यान्ही हींस करीताति तेजी : गरुड आटास फोडीताये ध्वजीं
जेंसे कोडी येकी वीजुंचा गर्जि : आकास फुटे ।। ६०
ऐंसे गर्जताति घोडे : जे दापाइत आती गाढे
मनां पासौनि वेगाडे : गगन कवळीताति ।। ६१
ऐंसा रथु नीगाला पवन वेगें : आरीसैन्यें ठकली पाहाताती उगे
येक म्हणती वाइलें वाइलें रे श्रीरंगें : वेगी सामदी करा ।।६२
आतां युध्याचा[१] वीस्तारु न करी : वाट पाहातांये भीमकुमरी
भेटावया राया मुरारी : उतावेळ असे ।। ६३
जरी येकायेकी झडकरुनी : भेटी करूं श्रीकृष्णां रुक्मीणी
तरी श्रोते हांसती प्रबंधकरणी : सभेमाजी ।। ६४
पुढां सैन्यें मीनलें असे भारीं : येकायेकी कैसी न्यावी भीमकुमरी
युध्यें काहींतऱ्ही अवधारीं : होवावेंची लागे ।। ६५
असो हें पुढां मांदीयाळें वोसरीतु : मोहाळां उधवदेवो असे[१] चालतु[१]
परते सरा रे म्हणतु : भीमसैन्यातें ।। ६६
ऐंसे ते हांकीतु आले : तवं भीमकाचां वीरीं पाचारीलें
म्हणती कां गा जाता[२] वहीलें : थीरु राहा थीरु राहा ।। ६७

येथ आली असे भीमकुमरी : आणि तुम्ही कां येत असा वरीं
वेगीं जांणवा राया मुरारी : सरा सरा मागौते ।। ६८

तवं यादव म्हणती तयातें : तुम्हींची सरा रे मागौते
देवो अंबिकेसि "येत आसे येथें"* : तुम्हींची परते सरा ।। ६९

तवं येक पुसती वोजा : कां गा वरीं येता कवणीयां काजा
आलीयाची वाटा माघौते जा : वायां श्रमाल तुम्हीं ।। ७०

तवं यादव बोलती ते आवश्वरीं : म्हणती आजि तुमचा रे सीरीं
आंबीका पुजील रावोमुरारी : हा नवसु असे ।। ७१

आम्हीं आलों असों याचि काजा : हे भीमकी नेइल श्रीकृष्णराजा
तुम्हीं जाणवा जा चैद्यासीं वोजा : आणि भीमसेनासीं ।। ७२

तवं राया भीमसेनाचा प्रधानु : सुमती बोले उधवेसीं येउनु
तो म्हणे प्रतवी रावो श्रीकृष्णु : वेगीं उधवदेवा ।। ७३

तवं उधवदेवो म्हणें तयासीं
"आनिं रुक्मीनि देवी देवों श्रीकृष्णासी"[1]
येन्हवीं वांयांचि तुं श्रमसी : हा कृष्ण प्रतो नेणें ।। ७४

जरीं सोयरीकें आनसरा : तरी तुम्हां नीके सारंगधरा
येन्हवीं आभीमानें वेसणां थोरा : वरपड होआल ।। ७५

आतां खांडेयाचेनि बळें ।। भीमकी नेइजैल रे गोपाळें
आणि तुम्हीं आवघेचि पावाल फळें : आतां आपयेसाचि ।।

येरु म्हणे तुम्हां भ्रमु पडला असे : मंत्री होउनी घड न विचारा कैसें
हे भीमकी कवना दीधली असे : आनि कन्या कवणाची ।। ७७

आतां भीमकु चैद्यु कोपले[१] जरी : तरी यादवां नाहीं उरी
आणिक काइ बोलों अवधारी : आइका[४] उधवदेवा[२] ॥ ७८

तवं बोलीला उधवदेवो : आजि चद्याचा फेडीजैल ठावो
आणि पाहातां तरी भीमकुरावो : सोयरा आमचा ॥ ७९

आतां तुजचि[१] करीन आपमान : हें तुं सत्ये नीभ्रांत जान
आणि तुज आहे आंगवन : तरी मजसीं संग्रामीं राहे ॥ ८०

तवं मंत्री सुमती संसारला : साहे साहे म्हणौनि बाण घातला
तो सवेंचि उधवें नीवारीला :+ बानें बानुं ॥ ८१

मग उधवें च्यारी बान गुनीं : लावीले अभीमंत्रुनीं
येकें वेळे पातले[१] ततक्षेनीं : सुमतीवरीं ॥ ८२

येके चक्र छदीलें नीसेष : दुजेनीं मोडीलें हातीचें धनुष
तीसरेंनीं सारथी देख : पाडीला रथाखालिं ॥ ८३

चौथेंनिं ध्वजास्थंबु छेदीला : प्रधानु रथाखालिं पाडीला
मग मुख न दाखवीतु पळाला : गेला सैन्यांमाजी ॥ ८४

म्हणती मोडला मोडला रे मंत्री : म्हणौनि उठावले आद्भुत क्षत्री
हांकतु पाचारीतु धांवताती[१] क्षेत्री[१] : घे[२] घे[२] म्हणौनि[३] ॥

तवं उधवे वाइलें पुढें : मोडीले गज रथ घोडे
वीर झोडीले* केले आडमोडे : मोडले पळताती ॥ ८६

सरपंजरीं घातलें आंबीके भुवन[१] : वीर घेउनीं पळताती प्रान
ऐसें आद्भुत योध्ये केलें नीर्वान : श्रीउधवदेवें ॥ ८७

जैसा भानु उदैलयां पुर्वं दीसे : रात्री फीटे अंधकारु नासे[१]
रवी उधवें रीपुतमं नीरसलें[२] तैसें : रणं नीसीये रस्म बाणीं

ऐंसीं वीधळलीं सैन्यां जाला भंगु : प्रेतें भूतें संतृप्ती जाली ग ती श्रीरंगु
नग्ने भैरवीं जोगीनीं मांडीला रंगु : नाचती आंबीके भवंती ॥

ऐंसें खांडेनि झोडीले सुभट : बरवी मोकळी केली वाट
मग रथ आला आंबीके नीट : श्रीकृष्णरायाचा ॥ ९०

तवं वीप्र दाखवीतो खुणां : म्हणें देवी पाहे वो श्रीकृष्णराणा
आला भक्तबंधछेदना : देवाधीदेवरावो ॥ ९१

मग पाहीलें देवीं रुक्मीनि : तवं दृष्टी देखिला श्रीचक्रपानी
आनंदु प्रगटला मनीं : जाली संभ्रमीत ॥ ९२

मग कर जोडौनि जयेजयेकारीं : देवीनें[१] वंदीला रावो मुरारी
म्हणें तुं आर्तदानीं अवधारी : श्रीकृष्णराया ॥ ९३

तुं अनाथुनाथु श्री आनंता : आणि वज्रपंजरु सरणांगता
अनुसरलेयां नव्हेरीसी सर्वथा : यैसी ब्रीदें तुझीं ॥ ९४

तुं भक्तवछळ आर्तदानीं : ऐंसी ब्रीदें तुझीं आइकीजेती श्रवनी
तें आजी सांच केलें जी श्रीचक्रपानी : देवा कृपानीद्धी ॥ ९५

ऐंसी देवी जवं आस्तुती करी : तवं रथेसीं पावला रावो मुरारी
उभे राहीले माहाद्वारीं : तवं आली भीमतनया ॥ ९६

कैंसी कनककमळांची माळ करीं : ज अंबीका दीधली होती अवधारी
तेचि करीं घेउनियां भीमकुमरी : चालीलि हंसागतीं ॥ ९७

एसी आली देवाजवळीं : तवं देवें उचलीली धरुनीं करकमळीं
रथीं वाइली भीमकी बाळी : श्रीकृष्णरायें ॥ ९८

जवळीं देखोंनि श्रीसारंगपानी : कैंसी संभ्रमीत जाली आंतःकनी
सात्वीक प्रकटलें रुक्मीनि : देखा तीये वेळीं ॥ ९९

तटस्त जाली वीसरली आपनपें : आले श्वेदबींदु सर्वांग कांपे
आस्तुती करीतांये प्रळापें : करुणां वचनों ॥ १००

सदगदीतु कंठु पारुखली बोली : पदीं चालतां पुढां गति कुंठली
श्रीकृष्ण देखौनि दृष्टी नीवाली : जाले नेत्र आनंदपुर्न ॥ १०१

देवीचा चांपेगौर वर्णु लोपला : मुर्ति आंतु श्रीकृष्ण प्रतीबींबला
जैसा कास्मीरा जवळीं नीळा ठेवीला : "नीळा आंतुबाहेरी दीसे" [1]

"आत्मा उभवी गुढी"± रोमांच देखा :
जे भेटी जाली [1] जीवा आणि आदिपुरुषा
तेणें आनंदु जाला तया सुखा : उपमा नाहीं ॥ १०३

मांडली देवासीं भेटी : म्हणौनि आनंदलीया दोन्ही श्रृष्ठी
चोखाळली आत्मजोति गोमटी : सबंधें देवाचेनि ॥ १०४

आतां समोवर्तते [1] म्हणति देवतागण :
श्रृती म्हणति सावधांण सावधांण
रुषी आंत्रपटु धरीला असे जाण : श्रीकृष्ण रुक्मीनिसीं ॥ १०५

असो हें फीटली जवनीक : देवा भक्तां जालें अहीक्य
वोपन्यां [1] म्हणौनि ब्रम्हादीक : मंत्र पढताती ॥ १०६

मग आनंदभरीतु देवी रुक्मीनी : माळ घातली श्रीचक्रपानी
जाली श्रीकृष्णाची राणी : पावली समीपता ॥ १०७

देव वरुषताति पुष्पीं± वरीं : दुंदुभी वाइलीयां आंबरीं
वेदध्वनी केलीया द्वीजवरीं : लागलीं मंगळवाद्यें ॥ १०८

रुक्मीनी मणोंरथु गेला [1] सीद्धीं : वामांगीं बैसवीली* श्रीगोवींदीं
श्रृष्टी पुर्न जाली आनंदीं : भोजें≠ नाचतांये [2] ॥ १०९

लागले ढोल नीसान संख भेरी : राये वोंवाळीताति दीव्यांबरीं
वहुवर मीरवतांये[३] रथावरीं : श्रीकृष्ण रुक्मीनी ।। ११०
नारद तुंबर सरस्वती : आणंदें मंगळोच्चार पढताति
देवीं[४] हरुषें नाचताती : रुषी गुढीया उभीलीया ।। १११
ऐसें अंबीके देवीचा भुवनीं : श्रीकृष्णासी माळ घातली* रुक्मीनी
मग कीन्नरुकवच फीटलें ततक्षेनीं : वेदघोषाचें ।। ११२
असो हें वेदघोषा उपश्रापु जाला : आनंदु भरीतु श्रीकृष्णांजवळींआला
मग श्रीचरणां लागौनि अस्तवीला : यादवरावो ।। ११३
ऐसे बंदीजन आणि कीन्नरु दोन्हीं : लागले देवाचा चरनीं
मग देवें आंगसीकें± देउनी : बहुत तोषवीले ।। ११४
मग भाटातें म्हणे रुषीकेशी : योध्ये होइ तवं असा आम्हां पासीं
मग पाठवनीं देउनी तुम्हांसीं : जावे आपुलीया देशा ।। ११५
ऐसी देवरायें मुरारी : समीपता दीधली भीमकुमरी
आतां पुढील योध्याची कथा झडकरी : सांघे कवी कृष्णदासा ।।

**प्रसंग एकोणिसावा समाप्त** * (ग्रंथसंख्या २१५३)

श्रीकृष्णापणमस्तु

---

# प्रसंग विसावा

श्रीपरमात्मने नमः

आतां वीररसीं सांघैन योध्ये : परी झणी कोपती ब्रम्हवीद
हे श्रीकृष्णकथा पवीत्र सुध : सुलभ तीहीं[१] लोकीं[२] ।। १

जैसें अमृताचें उगवले झाड : तें समुळीं सपत्रीं आवघेचि गोड
तैसें श्रीकृष्णचरित्र आइकतां पुरे कोड : उत्तम नवरसीं ।। २

येन्हवीं नवरस पातां : आणिका ठाइं न दीसती सर्वथा
तया येका श्रीकृष्णनाथा : वांचोनीया ।। ३

आइका श्रृंगारु पाहातां आनिकीं ठाइं: तरी आंग उबां वीटताति पाहीं
आणि तया श्रीकृष्णाचेया श्रृंगारासीं काहीं[१] : उपखा देखिजेना ।।

जरी हास्ये रसु वीनोदु : तरी तोचि सुखवीनोदु सदानंदु
ऐसा तो विनोदुमुर्ति गोवींदु : वांचौणि आणिकु △ नाहीं ।। ५

करुणा पातां तरी तोचि करुणाकरु : आणि म्हणवी करुणेचा सागरु
म्हणौनि तया देवा वांचौनि करुणेचा थोरु : कव्हणी देखिजेना

आणि म्हणों रुद्र तरी तोचि कोपें आगळा :
श्रृष्टी संहारु तयाचीया लीळा
ब्रम्हादीकां करी आवकळा : म्हणौनि तोचि रुद्रु ।। ७

आणि वीरु पाहातां ठाइं कव्हनीं : त्रीभुवनीं न देखिजे नयेनीं
आइका सैन्यें बळें जुंझती रणीं : ते काइ वीरु म्हनांवे ।। ८

आणि ऐसाही येकांकीं जुंझती : तरी रणि पडीले कुंथे आक्रंदतीं
बापु बापु वीरशक्ती : बोलतां लाजती ना ।। ९

तो श्रीकृष्ण युधीं पुरे आणि उरे : येकां वीरु संहारे येकां वीरु संचरे
आणि तोचि जरीं वीरत्वें आवतरे : तरीं दुसरा नाहीं ।। १०

तेणें वीरु संचरीला ज्ञानियां भक्तां:तेंहीं पावो दीधला संसारांचा माथां
इंद्रीये मारुनि जींतलीया देवता : हा तयाचाचि वीरु ।। ११

म्हणौनि वीरु तयांचाचि ठांइं : आणि तोचि वीरां[२] रावो पाहीं
  ये-ह्वीं बोलतां आणिकी ठांइं : दुषण असे ।। १२
तया श्रीकृष्णाचेनी भयेभीत : असे देवतावर्ग समस्त
  आवघीं आधीनत्वें आज्ञा न लंघीत : वर्तती जाना ।। १३
जीव देवता संहाराभेंण कांपती : तो संहारु तयाचीयाचि प्रवृती
  म्हणौनि भये आणि आभये शक्ति : हें तयाचेंचि देखा ।। १४
आणि श्रृष्टी रचे तेव्हेळीं सुभ दीसे : आणि मोडे तेधवां वीभंछे[१]
  म्हणौनि सुभ वीभंछ एंसें : करणें तयाचें ।। १५
आणि श्रृष्टी ढीसाळ हें आद्भुत : हें तयाचेंचि करणें समस्त
  तो न कळे नाकळे हेंआद्भुत : म्हणौनि नित्येचि आद्भुतु ।। १६
आणि नित्ये संतोस शाश्वत : हे तयाचेची गुण समस्त
  म्हणौनि शाश्वत्व हें नीत्य : तयाचें भंगलेंचि नाहीं ।। १७
ऐसा नवरसीं रावो मुरारी : वीचीत्र चरीत्रें करी नानापरीं
  ते श्रोतां आइकावें आदरीं : हरती माहापातकें ।। १८
आतां असो हें अंबीका भुवनीं : देवें हरीयेली रुक्मीनी
  मग निगाले श्रीसारंगपानी : तवं वर्तलें कंसें ।। १९
मग पंचजन्युं वाजवीला मुरारी : सैन्यें नीगालें वाद्यात्रांचा गजरीं
  तवं हाहाकारु[१] वर्तला[२] भारीं : आरी सैन्यांमाजी ।। २०
वार्तिकारु आले चैद्यापासीं : तेहीं मातु सांघीतली कैसी
  म्हणती राया रुक्मीनी हरीली रुषीकेशी : भुवनी अंबीकेचा ।।
तेथ बहुत मारीले सैन्य : वेढीलें अंबीकेचें भुवन
  दाटोंदाटी आला आपन : श्रीसारंगधरु ।। २२

तेथ आंबीकेचा माहाद्वारीं . श्रीकृष्णें रथीं वाइली भीमकुमरी
मग नीगाला रावो मुरारी : येश घेउनीयां ॥ २३

ऐसें रुक्मीनि हरण आइकोनि : सीशुपाळ खोंचला मनीं
आपमानसस्त्रें गेली कडतरौनी जीव्हार भेदलें ॥ २४

कैसा सर्वांगा चालीला श्वेदु : जीव्हा बोबडली न बोलवे शब्दु
बुद्धि मांवळली देखा चैद्यु : ठकलाचि ठेला ॥ २५

हळदी उतरली आंगीचि कैसी : आणि तोंडासि पडली मसी
आधमुख पाहातांये भुइंसी रेघा काढितांये ॥ २६

मग बोले दमघोषाचा सुतु : म्हणे धीग जीनें या रायां आंतु
आजि आपमांनु जाला बहुतु : त्रैलोक्यामाजी ॥ २७

तवं बंधु संल्यु जाला बोलता : म्हनें नको कांहीं करी चींता
मी रुक्मीनि आणिन आतां : क्षेनांमाजी ॥ २८

मग नीसानां घाये दीधले : आनि आवघे राये हांकारीले
मग ठाइं ठाइं वीचारुं लागले . येकमेकेसीं ॥ २९

येक म्हणती तेणें श्रीकृष्णेंसीं जुंझतां : कहींची न पुरवीजे सर्वथा
उगेयां जाइजे नीवांता : तरीचि वांचिजे ॥ ३०

जरी तो कोपला रावो मुरारी : तरी जीणें नाहीं ये संसारीं
मग कवनीये मायेचा उदरी : रीगावें तेव्हां ॥ ३१

तरी आतां पळावें कवनीये परी : डांगीये मारीती डांगवेऱ्ही
घोडीं हीरौनि नेती चाऱ्ही : मग करावें कैसें ॥ ३२

हे कृष्णेसीं जुंझा मीळती जरी : तरी आपुन राहों मागीलां भारीं
आवघे कोसळों याचिवरीं : मग नीगौनीं जावों ॥ ३३

येक म्हणती तेव्हां कैसें रे नीगावें : हे यादव तवं आपुलेनि नावें
गवसुनि घेतील जीवें : काढीती पाताळौनियां ।। ३४

तरीं चालारे आतांचि पळी उठाउठी : ऐसेनीहो जरीं लागती पाठी
तरी या रीगो दाटोंदाटीं : तया यादवांचि आंतु ।। ३५

तो सरणागतां वज्रपंजरु : आम्हां राखैल सारंगधरु
मग नीका भोगों[१] हा संसारु : तया देवाचेनि बळें ।। ३६

आतां असो हे भेडांची बोलनी : हांकारा[१] जाला माहावीरां लागौनि
मग जरासंदेसीं आले मीळौनी : सीशुपाळापासीं ।। ३७

मग बोले जरासंदु वीरु : "म्हणे पालानां रे णको करुं[१] उसीरु"[२]
हा दाटोंदाटीं जाइल सारंगधरु : वेगु वहीले पालाणां ।। ३८

तवं लागले शंख नीशान भेरी : रायेगीडीगीडीया रणमोहरी
दमामे ढोलांचा गजरीं : आकास फुटे ।। ३९

यैसीं वाद्यंत्रें लागलीं उदंडें : राये राने धांवताति चहुंकडे
तवं कैसी युध्याची आइती पुढें : मांडिली देवें ।। ४०

मग उधवदेवें श्रीकृष्णातें वीनवीलें : जी पारके वीर वःवाळले[१]
युध्याचि आइति करुं म्हनीतलें : राउळें आज्ञा द्यावी[२] ।। ४१

तवं म्हण रावो मुरारी : तुम्ही आवघेचि असा माहाभारीं
आतां मीं सुद्रसेन घालीन यांवरीं : तें ग्रासील[१] यांतें ।। ४२

तवं अर्जुन म्हणें जी रुषीकेशी : तुम्हां पाडु नाहीं जुंझतां यांसीं
मी आतां घेववीन वीवसी+ : बाणीं गां जीवांचां ।। ४३

तवं बोले सात्वीकी सुभटु : जी यांसी काइसा येसणां नेटु
मीच या अवघेयांचा भरीन घोटु : क्षणांमाजि ।। ४४

तवं बोले उग्रसेनु राणा : म्हणे हे आवघे मारीण क्षेणां
या सकळ सैन्यांचा करीन घोळाणां : न लगतां वेळु ।। ४५

तवं वसुदेवो म्हणे सारंगधरा : मीं आतां यासीं लावीन भेदारा
या अवघयांचा झाडीन गारा : घाइं खांडीयाचेनी[१] ।। ४६

तवं आक्रुरु म्हणें जी मुरारी : मग वेगीं आज्ञा दीजो जी अवधारी
आतां या सकळांचा संहारु करीं : तरीं मी आक्रुरु होथे ।। ४७

तवं उधवदेवो म्हणें जी श्रीपती हे आवघे मींचि मारीन तुझेया शक्तीं
हे आवघी पृथवी नीक्षेत्री नीरुती : करुनी[१] ठेवीन[१] ।। ४८

तवं देवो म्हणे आम्हीं जवळीं असतां : तुम्हांसी काइसी येसनीं चींता
माझें सुद्रसेन चक्र आतां : क्षेनां ग्रासु करील ।। ४९

तवं रामु म्हणे जी अवधारीं : आजी कांकण असे तुझा करीं
खांडें धरूं नये राया मुरारी : तुं तवं नोवरा ।।* ५०

देवो म्हणे आम्हां सदा बासींग कांकण : नीत्ये न भंगे नोवरेंपण
आजी खांडेनसीं लावीन लग्न : हे भुतळीचेया रायां आठवरां ।।*

हे आजी प्रणीन वीरश्री : ये रुक्मीनी वरीं दुसरी
जे इसाळे आली सैंत्ररीं : भीमकीयेचा ।। ५२

तवं बळीभद्र म्हणे जी सारंगपाणी :
स्वामीचें म्हणीयें करावें जी स्वामीनिं
आणि सेवकाचें सेवका लागौनि : देणेंचि लागे ।। ५३

हा जी केरु पडीला असे आंगणीं : तें काइ फेडुं न सके जी राणी
परी तें म्हणीयें जी सारंगपाणी : दासीं[१] करावें ।। ५४

तैसा मी सेवकु असतां जी मुरारी :
आणि स्वामीनी उनि[१] म्हणीयेंकरी
रामु म्हणें जी हे मज न साहेकु परी : वेगां आज्ञा दीजो ।। ५५

आतां मीं भुमीचा घाणा करुनीयां अवधारीं :
आणि भवंडीन नांगराचीये कातरी
या चैद्या सैन्यांचे तीळ गाळीन भीतरीं : लाटीं[१] मुसळांचीये ।।५६

या बोला मानवले सारंगधरु : मग सर्व दळवै केला बळीभद्रवीरु
येथौनि योध्याचा बडीवारु[१] : आइका पुढां । ५७

यैसे वीर पैजा घेताति नानापरीं :
तवं कैसी वाद्यात्रें लागलीं यादवांचा भारीं
अति वीचीत्रें पैं अवधारीं : नानापरींचों ।। ५८

वाजताति रायेगीडीगीडीया मदनभेरी : काहाळा रनमोहरी
ढोल दमामे वीचीत्रांपरीं : वाजती सैन्यांमाजी ।। ५९

कैसा नीसानु लागला राये धडकु : तेनें कांपतांये त्रीलोकु
आणि फुटों पातांये ब्रम्हांड गोळकु : नादें तयाचेनीं ।। ६०

आणि वीवीधां संकाचेनि नादे : आकास फुटतांये पडीसादें
दाही दीसा ध्वनी कोंदे : त्रीलोक्ये बहीरावलें ।। ६१

आइका कुहु कुहु करीतु : देवदंतु असे वाजतु
येनें नादें रनिं असे गर्जतु : अर्जुन वीरां रावो[१] ।। ६२

आणि तगंनग[१] तगंनग[१] करीत : यैसा पांचजन्युं असे गर्जत[२]
तो श्रीकृष्णें त्राहाटीला वीक्षांत : तो वाजीनला[३] कैसा ।। ६३

तया पांचजन्याचेनि नादें प्रचंडें : फुटों पाहातातित ब्रम्हांडें
आणि पृथवी जाली नवखंडें : वाराहो कांपींनला ॥ ६४

कुर्मे पाये सुदले पोटीं : धाकें सेसाची वळली पुटी
वळसे भवंतातित सागरांचा पोटीं : तो हेलावे अद्यापी ॥ ६५

मेरु गर्जतांये भुमीवरीं : पडीसादु पडताति' आंबरीं
स्वर्गी आणि तीहीं देवांचा नगरीं : आटु भवंताये ॥ ६६

प्रळयेभंरव देताति किंकळी : गुढें केलें अष्ट लोकपाळीं
नाग खळबळीले पाताळीं : फोडुं पाहातातित भुमीं ॥ ६७

येसा हाहाकारु जाला आइका : गडबडीले इंद्रब्रम्हादीक
सप्तदीपावतीचे म्हणती लोक : चाला रीगों पाताळीं ॥ ६८

देव गजबजीले आंबरीं : म्हणती पळारे पडीलों संहारीं'
आतां ब्रम्हेयांतें पुसा झडकरी : काइ हा कल्पांतु मांडला ॥ ६९

ऐसा त्रीभुवनीं वीख्यातु : पंचजन्यु असे गर्जतु
तेव्हेळीं चैद्याचेया सैन्यांतु : वर्तलें कैसें ॥ ७०

येक मुर्छना पडीले रथौनि : येकांचा उभयांची प्रानु गेलानीगौनि
चांग क्षेत्री ते हृदयें' फुटोंनीं : क्षीती पतीतु जाले ॥ ७१

येकाचें हातींचें हातीयेरु गळालें : येक ब्रीदें सांडौनि पळाले
येक वोढुनीं बाहीरीं टाकीले : जे आदकेंचि मेले ॥ ७२

येकां चालीलि हींवें थरथरां कांपती :
येकांची खटखटां दांतौरीं वाजती
तडतडां रथ फुटती : गज घोडे बंबाळले ॥ ७३

येक भलतेउते पळती : "तवं डांगीये डांगवेरीं मारीती"[१]
म्हणनी कां गा पळालेती : घावो न लगतां आंगीं ।। ७४

येक म्हणती आतां पुरलें रे जीवीत : कैसे यथ आलों न वीचारीत
वळसां पडलों देखा येथ : आतां उरी कैंची ।। ७५

येक बोलतां थरथरां कांपे : म्हणे मज नीगतां वारीलें रे बापें
परी कैसें वोढीलें हो पापें : जे आलों येथ[१] ।। ७६

येक म्हणती मज वारीलें रे मायां : म्हणे कां गा जासील रे पुत्रराया
उद्यां यादव तया ठांयां : येतील पाहे ।। ७७

येक म्हणती मज वारीलें रे नारीं : कैसें नीगतां धरीलें करीं[१]
म्हनें राहे प्रीया △ तेथ मुरारी : येइल ैडन्यांसी[२] ।। ७८

ऐसा पंचजन्यांचा गजरीं : हाहांकारु जाला भारी
सीशुपाळा सैन्यां भीतरीं[१] : आटु भवंतांये ।। ७९

आतां असो हें भेडांचें बोलणें : चांगवीरां आलीं फुरांनें
ते कैसे जुंझोनले आंगवनें : येकमेकेसीं ।। ८०

जे चांगवीर आसाहाने भले : यैसे दोहीं दळांचे पुढां धांवीनले
ते येक मध्यचि तुंबळ मांडलें[१] : कैसें धुरांवीन ।। ८१

यैसे ते दोहीं दळींचे उन्मत्तु± जाले : हांकीतु पाचारीतु धांवींनले
कैसें आंगवणां जुंझींनले : ते परीयेसा पां ।। ८२

जैसीं आकासा प्रथवी झटे± : तैसीं आदळलीं दोन्हीं थाटें
कव्हनीं कव्हनां न लोटे : केश धरुनीं जुंझताति ।। ८३

येक म्हणती राहा रे राहा जाल कोठें :
आम्हीं आलों चद्याचे वीर अतीलाठे
आतां तुमचीं सार्हनि[१] थाटें : सांडा भीमकीबाळा ।। ८४

तवं यादव म्हणती थीरु राहा : तुम्ही चांगु तरी आमतें साहा
पैल भीमकी श्रीकृष्णाचीय पाहा : वामांगी बैसली असे ।। ८५

डाऊ कांकण होरीलें[१] चद्यात्रा हातीं : आणि नोवरी नेली हो श्रीपती
आझुनीं अवकळा कीती : कग्वाल तुम्हीं ।। ८६

यैसीं बोलतां देखा उत्तरें : तवं उताडेयांचे[१] वीर अती खरे
पाचारुनी जुंझताति सौरे : कैसे येकमेकेसीं ।। ८७

येक म्हणती सांभाळी सांभाळीं रे आवो : म्हणौनि उभारीताति घावो
येक वोडनीं झेलुनि पाहा हो : हुळी घालीताति ।। ८८

येक आवेसें काढोती सुरी : चौताळौनि हानताती उरी
येकां मुदगलांचे घाये सीरीं[१] : वाजताति ।। ८९

तवं वाइलें[१] चैद्याचा भालेकारीं . आले सावळ झेलीत △ आंबरी
उसळोनि हांनताति उरीं : आसीवारातें ।। ९०

तवं यादवांचे धनुवाडे चालीले भारीं : ते वरुषताति बानवेऱ्हीं
तेहीं सैन्यें घातलें सरपंजरीं : सीशुपाळाचें ।। ९१

स्वारें स्वारु जुंझती उसीणां घाइं : करें करु धरुनि पाहीं
आसडुनीं पाडिताति भुइं : घोडें सैंग[१] पळताति ।। ९२

घोडें धरुनि कडीयाळांचा गोटीं : येकमेकातें हानताति उरपुटीं
तोडौनि पाखरा दुपटीं : पाडीताति भुमींत्ररीं ।। ९३

येक सबळक्षेत्री सांधों काइं . राउत घोडा येकेंचि घांइं
तोडुनि पाडीताती भुइं : ऐसे आंगवनेचे ।। ९४

"तवं रथ चालीले झडाडे" : आदळताति मकरतोंडा मकरतोंडें
आणि भडभडां वाजतांये खांडे : माहारथीयांवरी ।। ९५

तवं लाउनि दंतासुळ कांती : ह्राती लोटीले देखा माहामंती
तेथें रथावरीं रथ पडती : मांडलें गजयोध्ये ॥ ९६

येकमेकां दंतासुळ रोवीताति पोटीं : सोंडा सोंडा घालीती गांठी[१]
तेथ वरीं माहामंतु हातपीटी : जुंझताति ॥ ९७

सत्राणें आसडुनीं उपटीती सोंडा : कडकडां वाजती[१] दांत दाढा
तेणें आकास गर्जते गडगडां : कींकाटीयां आकास फुटे ॥ ९८

ते श्रीकृष्णांचे ह्स्ती अती गाढे : तेहीं येरांचे केले रगडे
तेथ मोडले रथ गज घोड : भंगलें सीशुपाळसैन्यें ॥ ९९

ऐसें यादवीं सैन्यें मोडीलें : पीटोनि चैद्या तळिं घातलें
मग सांवरौनि कंसे जुंझींनलें : तें आइका पां ॥ १००

आतां येकमेकेसीं इडपाडे[१] : कंसे वीर जुंझींनले गाढे
ते आतां कथा नीत्राड : सांघै कवी कृष्णदासु ॥ १०१

प्रसंग विसावा समाप्त * (ग्रंथ संख्या २२५४)

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

## प्रसंग एकविसावा

श्रीपरमात्मने नमः

मग जरासंदु म्हनें सीशुपाळा : पहीलें योध्यें मोडलें थोरी गेली कळा
आणि हा जुंझतां कळीकाळा : नागवे कृष्णु ॥ १

आइका सतरा वेळां याचिपरीं : आम्हींचि हारवीले अवधारी
"परी जुंझाची कळा कुसरी : न कळे याची" ॥ २

कैसा वीरु नीधडा नीसंकु मानसीं : आम्हां न लेखिचि कन्हणांसीं
कंसी भीमकी हरीली अंन्यासी : न लगतां क्षेवो ॥ ३

हा जुंझतां नाटोपे कन्हणांसीं : आंगवेना माहाकाळेसीं[1]
आतां हा कसेनि आंतुडे रुषीकेशी : तें वीचारा पां ॥ ४

तवं बोलीले सीशुपाळें : म्हणे तुंबळीं जुंझतां आपुलें परावें न कळे
हे आवघेंचि जुंझ कुडें मो ळें : म्हणौनियां ॥ ५

आतां नीवाडे[1] क्षत्री अती लाठे : येकाकीं जुंझ मांडा पां नेटें
मग यादव जातील कोठें : तें पाहींन मीं ॥ ६

मग चैद्यें पाचारीले माहावीर : जे जे प्रतापीये जुंझार
मीनले राये थोर थोर : "ते काइ सांघों"[1] ॥ ७

सीशुपाळ सैल्ये कासेश्वर : दंतवक्र काळींग बांनासुरु
जरासंदु मुर पीठु गनु बानु भूमांसुरु : आणि बलबलु पौंडरीकु ॥

हे मुक्ष राये माहाधुरा : येरां लेखा नाहीं माहासुरां
कैसे आभीमानें मीनले कैंवारा : सीशुपाळा जवळीं ॥ ९

मग सीशुपाळ बोलीला तयांप्रती : तुम्ही माहावीरु वारवांनलेती
आणि आमचेया कैंवारा आलेती : आपुले पनें ॥ १०

तरी आजि आम्हांसीं मांडलें असे काज : वरीं तुम्हीं अंत:कर्नाचे नीज
तरी आभीमानें मांडा पां जुंझ : आजी यादवेसीं ॥ ११

तुम्ही आवघे सखे सुहृद माझे :
तरी ये आंडनीं आपनयां[1]वोडवीजें
तुम्हांपस्ये आनिक दुजे : मज कवनु असे ॥ १२

आवश्वरु पडीलेयांवरीं बंधु मंत्रु स्मरीजे अवधारी
तो उचीता चुके तयें अवश्वरीं : तरी पुर्वज हांसती ॥ १३
दुर्भक्षीं स्मरीजे अन्नदाता : आणि आकांतीं कुळदेवता
तरी आजी माझेया अडनीं उचीता : तुम्हीं चुकों नका ॥ १४
तवं जरासंदु म्हणे : आतां बहुत न लगे बोलणें
चैद्या तुझा काजीं प्राण वेंचणें : हें सत्ये जाना ॥ १५
तवं म्हणे पौंडरीकु राजा मीं तवं मृत्येलोकीचा वीष्णु दुजा
तरी तुझेया वेसनां आजि△ भुजा : वोडवीन मीं ॥ १६
तवं बाणासुरें बोलीजे : म्हणे सीशुपाळा मैत्राचेनि काजें
या सहश्र भुजांचें वोझें : वाहातु असे ॥ १७
तवं कासेश्वरु म्हणे : जरी यादवांतें न जीनणे[१]
तरीं कासीये माजी नाहीं दाखवणें : मुख मज ॥ १८
तवं भुमासुरु बोलीला : म्हणे सीशुपाळा यादवांवरीं भला
मींची जाइन येकला : ने घे दळभारु ॥ १९
तवं बंधु संल्यु म्हणें हें नलगे कऱ्हणां कांहीं करणें
ये त्रीभुवनीं मजसीं पुरे आंगवणें : ऐसा कवणु असे ॥ २०
यंसा देखा नानांपरीं : वीर पैजा घेताति भारीं
तवं काइ बोलीला तये अवश्वरीं : राजा सीशुपाळु ॥ २१
म्हण तुम्हीं आवघेचि माहावीर : प्रतापीये जुंझार
आंतां वेगीं वहीले[१] करा भार : आपुलाले ॥ २२
मग प लांनीलें माहावीरीं : येदुसैन्यें वेढीलें चहुंफेरीं
आठांहीं दीसां राहीले अवधारीं : दळभारेसीं ॥ २३

यैसें जाणौनियां वहीलें : यादवांचे गुपतीय आले
तेहीं श्रीकृष्णांपुढां सांघीतलें : सैन्यें सीशुपाळाचें ॥ २४

जी जी यादवां भवंते माहाभार : चैद्ये केले असती आगार
आइका नांवंनीगे जुंझार : राहीले आठांहीं दीसां ॥ २५

जी जी येकांकीचें जुंझ+ अवधारी : चैद्यें मांडीलें असे भारी
माहाधुरा मीन्नलीया राया मुरारी : तया[१] आइका पां ॥ २६

जी पैल सीशुपाळ आपुन : माहाभारीं राहीलासे जान
पंचवीस क्षेवनी देखा सैन्यें : असे तयापासीं ॥ २७

जी पैल पुर्वदीसे : तेथ सैल्यें* राहीलें असे
सात क्षेवनीं सैन्यें सरीसें : घेउनियां ॥ २८

आणि पैल आग्नी कोणिं दंतवक्र : तयापासीं पांच क्षोणी दळभारु
आणि पैल दक्षीने जी भुमासुरु : त्रीपन क्षेवनींसीं ॥ २९

कासेश्वरु नैरुत्ये कोनीं : तयापासीं सैन्यें दाहा क्षोनीं
पौंडरीकु राहीला असे पस्यमे जानें : क्षोणी द्वादसेसीं ॥ ३०

नव क्षेउणीं सैन्य घेउनि सरीसे : वाव्ये कोणीं बांनु राहीला असे
आणि उतरे जरासंदु असे : क्षोणी तेवीसेसीं ॥ ३१

आइका काळींग इसांन्ये कोनीं : तयापासी सन्यें आठ क्षोणीं
तो जुंझारांवरीं आंक्रनीं : पढवीतु असे ॥ ३२

आणि बलत्रलु वीरु आपुण : सात क्षोणी घेउनींयां आला असे सैन्य
तयासीं बहुत असे आंगवन : जुंझावेयाची ॥ ३३

आणि मुरु पीठू गनु+ हे तीघै जण :
द्वादश द्वादश क्षोणिघेउनि आले असती सैन्य
एसीया छतीस क्षोणि जाण : तीघां मीळौनियां ॥ ३४

ऐसेंयां आवघेयां रायां मीळौनि : सैन्ये मीनलें येक सतपंच्यांनौ क्षोनि
यादवां भवंतें श्रीसारंगपानी : राहीले असती ॥ ३५

आइका आनिकां रायां नाहीं मीती : या मुदला धुरा श्रीपती
सीशुपाळा जवळीं असती : माहासुर क्रोदाइत ॥ ३६

हें इतुकें सैन्ये नीगुती : माहावीर नीवडीले असती
येरां सैन्यां नाहीं मीती : आइकै श्रीकृष्णराया ॥ ३७

ऐसें आइकोनी मुरारी : आव्हेरुणि हांस्ये केलें कवनीं परीं
जैसें कां न लेखिजे केसरीं△ : थाट जंब्रुकांचे ॥ ३८

तवं उधवदेवो म्हणे जी मुरारी : आतां आज्ञां[1] दीजे अवधारीं
युध्याची आइती करुं झडकरीं : नीवडुं माहावीर ॥ ३९

तवं देवोरावो म्हणे : हें तुम्हांसी कांहींची नलगे करणें
आतां मींची नीवारीन सुद्रसेनें : क्षेणांमाजी ॥ ४०

जयासीं नाहीं पराक्रमु शक्ती : ते राये भृत्यांची दुर्गें करीती
तयामाजी आपण राहाती : रणीं क्षेत्रीयां भेणें ॥ ४१

ऐसे ते आपुन राहाती तयामधीं : आणि पुढां पाइकातें घालीतीयोधीं
यापरी राखती बुधीं : रणीं आपुले प्राण ॥ ४२

आणि अजये आलेयांवरीं : क्रोध कोपती सेवकांवरीं
ऐसे राये क्षेत्री या भुवनां माझारीं : देखिजताति ॥ ४३

आपुन उभे राहाती पाठीसीं : युधीं पुढां घालीती सैन्यांसी
घ घे म्हणौनि हांकीति भृत्यासी : परमांसु÷ लाठे ॥ ४४

ऐसें आवघडी* जुंझतां रणी : पाइकी राखिजेती पाठीसी घालुनी
आपन पढवीती आंकनी : जोडीलें सेवकांचे ॥ ४५

तैसें आमचें नव्हे देवो म्हणे : श्वयें श्रृष्टी श्वयें संहारु करणें
आम्ही आरी जीनौंणि आणि पढवीं आंकनें : येंस देवो सेवकांसी ।।
तुम्हीं आवघेचि असा नीवांत : क्षेण येकु पाहा माझें कवतुक
हें आतां मीचि नीवारीन समस्त [१] : वायां श्रमांल तुम्हीं ।।
हें सुद्रसेण घालीन यांवरीं : तयांतें ग्रासील क्षेणां माझारी
मागौतें येइल करी : येस घेउनिया ।। ४८
तवं बळीभद्र देवो म्हणें : जी हें सत्येचि देवाचें बोलणें
परीं आपुला पाडु लागैल पाहाणें : श्रीयादवेश्वरा ।। ४९
हा जी जंबुकावरीं पंचाणणें कोप धरुंणि युध्ये करणें
तरी तेंचि [१] तयासी [२] उणें : जाण श्रीकृष्णराया ।। ५०
हां जी स्वामीं आणावें जीवन : तरी सेवकाचें काम कवण
केरु फेडुनी आंगण : तें दासीचि झाडावें । ५१
की स्वामीं आणावें पाणी : आणि सेवकें बसावें सीहांसणी
हें उफराटें श्रीचक्रपाणी : देवराया ।। ५२
तैसें सेवकाचें जें करणें : तें सेवकांचि करवी करवणें
आपुण दृष्टीचि पाहाणें : देवा राणेंपणें ।। ५३
आजी पाठींसीं राहुनि देवें : भृत्यां करवीं रीपुतें जीनवावें
आपुलीचि शक्ती देउनी येश द्यावें : आपुणचि सेवकांसीं ।। ५४
तवं श्रीकृष्ण बळीभद्रातें म्हणे : तरी युध्ये नीवाडें बरवें करणें
तुम्हीं जरासंदेसीं जुंझणें : नीकीयांपरीं [१] ।। ५५
आइकें पंडुनंदना : आगा ये माहावीरा अर्जुना
तुवां जुंझावें नीकीया आंगवना : वीरें पौंडरीकेसी ।। ५६

आतां उठा ° उग्रसेना झडकरी : तुम्ही आपुला पुरुषार्थ धरा अंतरीं
प्रजावें या भुमासुरावरीं : वेगा आमुलेपनें ॥ ५७

उठी उधवदेवा झडकरुनीं : घे घ पल सैल्याचा मानु नीर्वानीं
सात्वीका तुवां जाणावा बानुं नेमुनी : प्रताप खांडयाचेनि ॥

मग देवो वसुदेवातें म्हणे : तुम्हीं काळेगसीं जुंझणें
आक्रुरा तुवां आजी प्रजण : दंतुवक्रेसी ॥ ५९

आइका आणिक वीर आपार : जे मीणले असती थोर थोर
तयांचे ठाइं ठाइं केले भार : वेगळ वेगळाले ॥ ६०

ऐंसें सैन्यें वांटीले मुरारी : अ पुण राहीले माहाभारी
आतां पुढां युध्ये अवधारीं : मांडलें कसें ॥ ६१

तवं कैश बोलीले मुरारी : म्हणती तुम्हीं उगचि असा माहाभारीं
यांचा यावा[1] कवणीं परी : यइल तो पाहों ॥ ६२

ऐंसें सैन्यें देखौनि नीवांत : मग चैद्ये* वीर वरवाळले आद्भुत
देखौनि तयांचे तीव्रत्व± : रुक्मीनि बीहाली मनीं ॥ ६३

म्हणती यादवी सांडीलें रे बळ : म्हणौनि वीर वरवाळले भुपाळ
तेव्हेळीं रुक्मीनी जाली व्याकुळ : नेत्र भरीले जळीं ॥ ६४

यंसी भीमकीयेची देखौणि आवस्था : तवं कोपु आला आणंता
म्हणती ना भी ना भी देवी आतां : क्षेनां नीवारीन हें ॥ ६५

तवं देवें सारंगा चढवीला गुनुं : आनीं वाइला पंचजन्यु
तो नादु आइकौनु : सैन्यां सुटला पळ ॥ ६६

तया पंचजन्याचा गर्जु : जैसी आवचीतीं पडली वींजु
सैन्यें वीदुळलें येक गेले चैद्या उजु : सांघावया ॥ ६७

तवं चैद्ये बोलीला वचन : म्हणे घाये पाथरें वीन
काइ तुम्हां वर्तले वीघ्न : कां पळालेती ॥ ६८

तवं राये बोलती सकळ : आहो जी जैसें फुटलें मेघमंडळ
ठाइं ठाइं वीजुचे गुंडाळ : देखों आपणेयां जवळीं ॥ ६९

कवाडें पडीलीं श्रवणीं : आपुला परावा न कळे[1] रणीं
घोडे जाताति कवनीकडें ऐसें मनीं : आंवाकेनां ॥ ७०

भुमींची फुटली म्हनों काये : पाहों तव ते जैसीतेसीं दीसतायें
कवणें कवणां करावे घाये : आवो[1] भुली जाली ॥ ७१

तवं बोलीले चैद्यें : जरीं पळालेती शंखाचेणीं नादें
तरी आतां कैसीं कराल युध्यें : तें जाणवेना ॥ ७२

असो हे येकवटले नृपवर : मग बोलताती बडीवार
म्हणती येकांकीं पाचारुं यादव वीर : मांडु नीर्वानियुध्ये ॥

मग पहीला वीडा घेतला पौंडरीकें : पालाणीनि आला तवकें[1]
म्हणें जी मजसी युध्ये द्यावें नीकें : श्रीसारंगधरा ॥ ७४

तवं वीडा घेउन पंडुकुमरु : कैसा आला अर्जुन वीरु
मग म्हणें राहे राहे थीरु : वीरा पौंडरीका ॥ ७५

अरे आधी नदी मग इश्वरु : तुजसीं केवी जुंझे सारंगधरु
आइका खद्योतेंसीं दीनकरु : पाडु कैसा ॥ ७६

आणि खद्योताची जोती : तवंचिवरीं असे वर्तती
जवं तो नुगवे दीनपती : पुर्वदीसे ॥ ७७

तो उदैलेयां दीनकरु : तेथ[1] लोपौनि जाये आंधकारु
तेथ खद्योत प्रकास धरुं : केवी सके ॥ ७८

तसा मीं अर्जुन माहावीरु : तपतेयां वीरां प्रतापु दीनकरु'
जरीं होसी चांग वीक्षांतु वीरु : तरीं युध्यीं राहे ॥ ७९
तवं पौंडरीकु म्हणे अर्जुना : मीं मृत्येलोकीचा वीष्णु जाणा
तुं मजसीं न पुरेसी संग्रामा नीर्वाणां : मी तवं चतुर्बाहु ॥ ८०
तवं म्हणें वीरु अर्जुनु काइरे दोनि काष्टाचीया भुजा बांधौनु
लाजेसी ना म्हणवीतां वीष्णु : सर रे दुलाकुडा ॥ ८१
आरे काष्टाचेया गरुडा : वरी बैससी रे मुढा
जीतांची घातलें रे खोडां : तुवां आपनेंयांतें ॥ ८२
तरी मज△ अर्जुनाची पैज जाणां : तुझें मीं नेघे रे प्राणां
परी△ आजी करीन आपीमाणां . या रायां माजी ॥ ८३
तवं पौंडरीकें वहीला : बानुं गुणीं लावीला
म्हणें आतां सांभाळी रे भला : वीरा धनुर्धरा ॥ ८४
तवं माहावीरें अर्जुनें : नीवारले बाण बाणें
मग म्हणे आतां साहे रे संधानें : माझी धनुर्धराचीं ॥ ८५
गरुड आणि काष्टाचीया भुजा दोन्हीं : बाणीं नईन रे खंडुणीं'
परी जीवें न मारी रे जाण : वीरा पौंडरीका ॥ ८६
मग अर्जुनें नाराजु वहीला : पौंडरीकावरीं घातला
तेणें तो गरुड वीध्वंसीला . तोडालीया भुजा काष्टांचीया ॥
मग म्हणे वीरु अर्जुनु : जरी तुं म्हनवीतु होतासी वीष्णु
तरी काष्टाचीया भुजा नलाया छेदौनु' : आतां बोल कांहीं ।
मग पौंडरीकु म्हणे अर्जुना : आतां मी पेटलो नीर्वानां
ब्रम्हशक्ति आली रे पंडुनंदना : ते साहे माझी ॥ ८९

तीयेसीं सहश्र[1] येक पाये सहश्र हात :
येकचि सीर दोनिंचि माहाप्रचंड दांत
वदन पसरीलें आद्‌भुत : जीव्हा लाळीतांये ॥ ९०

येकु दांत आकासीं भवंडी : दुजेनि प्रथवी देखा खरवडी
वदनीं पर्वतांचीया कोडी : सामावताति ॥ ९१

आणि भुजा कातिया* वीशाळा : घडधडा नेत्रींहुनी नीगताति जाळा
कोपें ग्रासु करुं पाहे सकळां : भुगोळकांचा ॥ ९२

एंसी धगधगीतु आंतराळीं : पेटली[1] देखा माहाकाळी
ना ना ते प्रळयेकाळिची मातावळी : आली अर्जुनावरी ॥ ९३

तवं सारथी म्हणे धर्नुधरा : शक्ती आली रे माहावीरा
आतां ग्रासु करील रे अवधारा वेगीं संधान करी ॥ ९४

तवं तेणें अर्जुनें वहीलें : भैरव सस्त्र अभीमंत्रुनि घातलें
मग घे घे जाये म्हणीतलें : पैल शक्ति तें ॥ ९५

तवं तो नग्न भैरउ रक्तपाळु[1] : धगधगीतु जैसा आग्निचा कलोळु
कीं प्रळयेकाळींचा वडवानळु : प्रकटला कल्पांती ॥ ९६

येकीं हातीं डीर दुजे हाती त्रीसुळ : तीसरा हातीं गदा वीशाल
चौथा करीं झेलीताये सीरकमळ : गजवदनाचें ॥ ९७

जे गणेशाचें छदीलें त्रीपुरारीं : तें उसळलें देखा आंबरीं
तें जाउंणि पडीलें भैरवाचां करीं : ते[1] मीरवत असे ॥ ९८

बाबरझांटि डोळे वीशाळ : धडधडां नेत्रींहुनि नीगती ज्वाळ
आणि गदा प्रजिली देखा वीशाळ : तेणें दक्षीण करीं । ९९

यंसा तो माहादीर्घ वीशाळु : खेचरु धगधगीतु पीशाळु
ना ना कीं तो प्रळयकाळींचा माहाकाळु : प्रकटला आंतराळीं ॥
बाबरझांटिचें भीश पसरीलें : जंसें आकाशीं मेघ वोळले±
मधीं रोंहकीं बुबुळें मीरवलें : जंसी वीद्युलता ॥ १०१
कंसे करकरां वाजति दशन : जेसें कोडी येकी वींजु गर्जे गगन
तंसा तो भैरउं मीरवला जान : तीयेकाळीं ॥ १०२
ऐंसा हांकीतु पाचारीतु : शक्तितें सांवरी सांवरी म्हणतु
ते म्हणे तुझा आजी पुरवीन अंतु : रक्त भैरवा ॥ १०३
मग पसरुनीयां वदन : शक्ति धांवींनली आपुन
करकरां वाजती दसन : हांकां आकास फुटे ॥ १०४
तवं तो गदा प्रजौनियां करीं : भैरउं हांकीतु आला वरीं
मग म्हनें सांवरी सांवरी वो खेंचरी : तुं आतां आपणयातें ॥ १०५
मग गदेनि हांणौनि देखा : सहश्र कांतीया मोडीलीया नीमीक्षां
तवं ते खिकाउर्णि आइका : झोंबींनली तयासीं ॥ १०६
तवं तेणें गदेनें हाणितली : सवेंची गदा हीरौनि गीळीली
मग तेणें त्रीशुळें हाणींतली : तवं तेहीं गीळीलें ॥ १०७
मग डौरें हाणींतली नीहटीं : तवं तेहीं तीया घातलें पोटीं
सीसाळें हाणींतली ललाटीं : तवं तेही गीळीलें ॥ १०८
मग रोखें मुष्टीघातें हाणींतली : तवं मुर्छा येउनि पडीली
सवेंची तेणें पोटौनीं काढीलीं : आपुलीं आयुध्यें ॥ १०९
मग पाइं धरुनीयां अंबरीं : भैरवें भवंडीली वेढे च्यारी
टाकौनि घातली पौंडरीकावरीं : घे घे आपुली म्हणौनियां ॥

आसो—दोघे जालो आदृस्य : मग पौंडरीका पडिलें सायास
म्हणे हें नीर्वानिशस्त्र आवीनास : कैसें वायांचि गेलें ॥ १११
मग म्हणे ये१ संग्रामीं१ नसे जीणें : आजि पळीजे तरी वांचीजे प्राणें
परीं धीरुची धरीला तेणें : गुणीं लाविला बाणु ॥ ११२
तवं साहे साहे रे म्हणौनि : अर्जुनें वींधीला चौं बाणिं
येकें आंकु छेदीला ततक्षेणीं : दुजेनी ध्वजास्थंबु ॥ ११३
तीसरेनि घोडे देखा च्यान्हीं : चौथेनि सारथी अवधारी
ऐसा वीरथु केला क्षणां माझारीं : वीरु पौंडरीकु ॥ ११४
मग पौंडरीकु पांइंचि पळाला : तवं हांकीतु अर्जुन धात्रींनला
म्हणे प्रतें प्रतें पौंडरीका तुं तवं भला : वीक्षांतु वीरु ॥ ११५
तवं पौंडरीकाचें सैन्यें चालीलें : ते हीं अर्जुनें वीभांडीलें
रथ घोडे आणिले . असंख्यात ॥ ११६
एसा येसेसीं आला श्रीकृष्णापासीं : तया मांनवले रुषीकेशी
सन्मानु केला अर्जुनासीं : वाइलीं दीव्यांबरें ॥ ११७
ऐसा पौंडरीकु मोडला देखौनि : मग भुमांसुरु आला पालाणौनि
तो म्हणें सांग कवणें ठाइं श्रीचक्रपाणी : मज दाखवा डोळां ॥
तवं म्हणें उग्रसेनु : तुजसीं काइ जुंझैल श्रीकृष्णु
हां रे जंबुकावरीं पंचाननु : केंवी कोपे ॥ ११९
तवं भुमांसुरु म्हणें उग्रसेना : माझा प्रतापु तुम्हीं कां नेणा
म्यां बहुती हरीलीया नृपकन्या : रायां आपमांनु केले ॥ १२०
उग्रसेनु म्हणे तयांची कुढावणीं : आजि करील श्रीचक्रपाणी
तुतें मारुनीयां तत्क्षणीं : फेडील बंदीसाळ ॥ १२१

तीया सोळा सहस्र नारी : प्रणील रे रावो मुरारी
तया वडील हे भीमकुमरी : जाण भुमांसुरा ॥ १२२

भुमासुरु म्हणे हे सत्तीं[1] : जरी वांचाल माझा हातीं
तरी पुढील व्यावृति : कराल तुम्हीं ॥ १२३

आतां मीं रुसलों रे तुम्हांवरीं : उग्रसेणा सांवरी रे सांवरी
हा घे घे बाणु आला[2] अवधारी : सांवरी माझा ॥ १२४

तवं तो सर्वेचि वहीला : उग्रसेनें बाणु वारीला
सर्वेचि दुसरा मोकलीला : भुमांसुरावरीं ॥ १२५

तो भुमांसुरें नीवारीला : मग रथ सामोरा केला
तो येउनि आदळला : मकरतोंडेसीं ॥ १२६

ऐसे दोघै देखा[3] बाणवेऱ्हीं : जुंझताति वीचीत्रांपरीं
उसीणां घांइं अवधारीं : येकमेकेसीं ॥ १२७

कैसे दोघै साधक अती : "येरायेरांचे बांनें बांनु नीवारीती"[1]
येकमेकां जुंझतां न लोटती[2] : मग नीहटले कैसे ॥ १२८

सांडुनीं ध्वजास्थंबु सारथी : वोडनखांडी घेतली हातीं
मग येकमेकां नीर्घाती : पेटले देखा ॥ १२९

घाइं वोडनें जाली सतकुटें : खांडीं मोडोंनि जालीं थोंटें
मग करी कटारे घेतले गोमटे : दोघे माहावीरु ॥ १३०

मग येकमेकेसी नीहटले : मकरतोडांवरी पाये ठेवीले
करें करु धरुनीयां भीडले[1] : वीर जुंझताती ॥ १३१

आंगी वज्रांगीया नीटा : घाइं न फुटेति सदटा
तेव्हेळीं वीरु सुटले सुभटां : तयां दोघां ॥ १३२

म्हणती जरीं प्राण नीगुनी जाती : तऱ्हीं करें करु न सुटती
आणि वज्रांगीया न फुटती : आतां करावें कैसें ।। १३३

तवं म्हणें भुमांसुरु : उग्रसेना सोडी रे करें करु
मज तुज हातीयेरु . आंगीं रुपेति ना ।। १३४

मग दोघें सोडीले कर : नावेकु जाले थीर
मग कैसे बोलताति उतर : येकमेकेसीं ।। १३५

"उग्रसेन म्हनें भीमासुरा : फेडूं वज्रांगीया जडा थोरा
मग उघडा आंगीं आवधारा : जुंझों परस्परें÷" १३६

तवं बोलीला भुमांसुरु : म्हणे दोघें घेवों मुदगलु हातीयेरु
मग घाइं जो होय सतचुरु : तोचि हारवी± ।। १३७

मग मुदगल घेतले करीं : नीरघातां पेटले येरयेरां वरीं±
उग्रसेणें मुदगल घरीला वरीच्या वरीं : भुमांसुराचा ।। १३८

मग सामोरेयां नीगौनीं भीतरीं : उग्रसेणें हानींतला उरावरीं
तेणें घाये आली गीरीरी : भुमांसुरासीं ।। १३९

मग तो मागीलां पांइं गेला चांचरी : मुरुकुंडी पडीली रथावरीं
तेव्हेळीं सारथीयें झडकरीं : रथु प्रतवीला ।। १४०

म्हणती पडीला पडीला रे भुमांसुरु : सैन्यांमाजी वर्तला हाहांकारु
त्रीपण क्षोणींमाजि येकुही वीरु : मागुता प्रतेचिनां ।। १४१

यैसा भुमांसुराचा घेतला मांनु : रथ गज घोडे आणीले वळीनु
यैसेसीं आले उग्रसेनु : तेणें जोहारीला श्रीकृष्णरावो ।। १४२

असो हें भुमांसुरें तवं भांजीली : पाहे तवं सैन्यां वीधुळि जालीं
बहुतां रायां माजि लाज लागली : गेला आपमांनेंसीं ।। १४३

तवं जरासंदु माहावीरु : आपुला पालाणौनि दळभारु
तो आला वेगवंतरु : यादवेश्वरा पुढें ।। १४४

मग जरासंदु बोले श्रीकृष्णासीं : म्हणे बहुतां दीसां सांपुडलासी[१]
आतां मी तुज न सोडी कैसा जासी : पाहों सारंगधरा ।।

मीयां[१] सांडीवीलो मथुरा नगरी : आणि वसवीलासि सागरीं
तो मी जरासंदु अवधारीं : आजी आला[२] येथ[२] ।। १४६

तवं बळीभद्र म्हणे जरासंदा . तुज कहीं लाज नाहीं रे सदा
आणि तुज बांधतां गावींदा . हात भागले ।। १४७

तुज बांधतां सतरां वेळा : मथुरेचा दोरें दोरु आटला[३]
मग देवें सागरु वसवीला : तुज दोरां लागीं ।। १४८

दीपां पाठवीली रे प्रव्हाणें : दोर मेळवीले जगजीवनें
आजि बांधावया तुजकारणें : आणीले असतो ।। १४९

तवं जरासंदु म्हणे हळधरा : आतां मजसीं प्रजी होइ सौरा
आजी जाणवैल अवधारा : तुमचा पुरुसार्थु ।। १५०

मग कोपला वळीभद्रु : वामकरीं झेलोतांये नांगरु
मुसळ प्रजौनि दक्षीणकरू : उभारीला तेणें ।। १५१

मग म्हणे जरासंदा पाहे पाहे : आतां आलें मुसळ घे घे साहे
आजि तुझा कवनु राखता आहे : तो स्मरें रे आपुला ।। १५२

कैसा नांगरें धरीला रथु : वरीं मुशळें दीधला नीर्घातु
तो घावो चुकउनीं जरासुतु : चढला आणिकीं रथीं ।। १५३

तो रथु सतचुर्न जाला येकेंचि घाइं : सारथी घोडेयां सकट पाहीं
जरासंदु पळाला येन्हवीं ± तो ही : धाडीजतांये मोक्ष पदा ।।

मग जरासंदें बोलावीलीया माहाधुरा :
म्हणे आवघे मीळौनि करा घावरा
येन्हवीं येकांकीं हलधरा : पुरवीजे[४] ना ।। १५५

मग जे नांवनीगे वीरु अती गाढे : तेहीं रथ घातले मागधां पुढें
बळीभद्र वेढोला चहुंकडे : सीहंणादीं गर्जताती ॥ १५६
कैसे आमीतां बानीं वरीषतांये वरीं : येकला रामु मुशळें नीवारीं
नांगरु भवंडोतो अंबरी : बापु येकांग वीर ॥ १५७
कैसा रामु रणीं जुंझतांये : रथावरीं रथु घालीतांये
आणि मुसळें कुपोळे[१] फोडीतांये : भद्रजातीची ॥ १५८
करीं धरुनी गज टाकी अंबरी : दुजेणी एता* आदुळि वरीचांवरीं
स्वारें स्वारु उपटी भुमींवरीं : पेटला माहामारी ॥ १५९
कैसें नांगरे रीपु सैन्ये सांवडी : आणि आवेसें मुशळवरीं झोडी
यापरीं दैत्ये दानवांचीया कोडी : मारीलीया राणांमाजी ॥
कैसा बळीभद्र गर्जतांये हांका : फुटती पाताळ धाकु पडीला सेषा
आणि आक्रांतु वर्तला तीहीं लोकां : कांपे भुगोळकु ॥ १६१
ऐसें बळीभद्रें वीरें येकलें : आमीत सैन्यें रणांसीं अणिलें
आणि येकलेंयां देखा उरवीलें : जरासंदासीं ॥ १६२
मग बळीभद्र चालीला सामोरा :
म्हणें सांवरी रे सांवरी जरासंदा वीरा
आतां मी रांमु कोपलों रे होइ पुढांरा : स्मरें स्मरें आपुला ॥
तेथ जरासंदें बळीभद्र कैसा देखिला :
जैसा प्रळइं माहाकाळ खवळला ±
नाना कीं तो प्रळये वडवानळु पेटला : चंडें कल्पांतिचेनीं ॥
ऐसा बळीभद्र देखिला नयेनीं : मग धीरु नव्हेचि मागधा लागौणीं
वेगीं गेला देखा पळौनी : सीशुपाळा जवळीं ॥ १६५
ऐसा पळवीला जरासुतु : बळीभद्र जाला येसवंतु
तयासीं मानवले आनंतु ! श्री यादवरावो[1] ॥ १६६

आइका सीशुपाळासीं : जरासंदु उत्तरें बोलतांयें कैसीं
म्हणे येकांकीं जुंझतां यादवांसीं : कहीं पुरवीज़ेना ॥ १६७
म्हणौनि आवघ येकें वेळें: मीळौनि चाला प्रतापें सळे
मग योध्ये मांडा पां सवं फळें : या यादवांसी ॥ १६८
मग सालड दंतवक्र वीरु : काळींगु आणि बाणांसुरु
हे चौघे करुनियां भारु : चालीले यादवांवरीं ॥ १६९
तवं सात्वीकी उधवदेवो : आक्रुरु आणि वसुदेवो
हे चौघे चालीले द्यावया घावो : येकें वेळे ॥ १७०
ऐसी सवंदृष्टी जाली येरयेरां : तवं सात्वीकी म्हणे बाणांसुरा
आतां प्रजी होइ सौरा : मज सात्वीकेसी ॥ १७१
तवं बानु म्हणें सात्वीका वीरा : मज तुज पाडु नाहीं अवधारा
मज असती सहश्र करां : तुज दोनि हात ॥ १७२
तवं सात्वीकी म्हणे बाणातें : मागां सहश्रबाहो दोहींचि हातें
मारीला रे जमदग्नि सुतें : फरशाभिरामें ॥ १७३
म्हणौनि नको रे बाणांसुरा याचा[१] : आनि भरवसा या भुजांचा
मीं आजि अंतु पुरवीन तुझेयां[२] भुजांचा[२] : जाण बाणांसुरा ॥
मग तेणें बाणांसुरें तवंकें : वाइलीं पांचसतें धनुकें
च्यारी च्यारी बाण लाउनि कौतुकें : येकीं येकीं धनुषीं ॥१७५
ऐसी कोपोनियां कांनाडी : कैसी तेणें वींधोली गाढी
दोनि सहश्र बाणां येकीं वढीं[१] : पडती सात्वीकावरी ॥१७६
तवं तो सात्वीकी वीरु गाढा : तेणें वाइला अरी ग्रासु मेढा
च्यारी बाण लाउनीं टाकीले पुढां : बाणांसुरावरीं ॥ १७७
त्याचे दोनि सहश्र बाण ± बाणें येकें : नीवारीले देखा सात्वीकें
दुजेनि बाणें तोडीलीं देखा धनुखें : पांच सतें ॥ १७८

तीसरेंनि ध्वजास्थंवू छेदीला : चौथेंनि रथांचा आंखु मोडीला
ऐसा क्षेणांमाजी वीरथु केला : बाणासुरू ॥ १७९

ऐसा वीरथु देखौनिया बाणासुरू : मग उठावला दळभारु
तयासीं जूंझतांये सात्वीकी वीरु : वीचीत्रांपरीं ॥ १८०

आणि सैल्येसीं उधवदेवो जुंझे कैसा : काळ कल्पांती रुसला जैसा
कीं प्रळये भैरुऊं चढला आवेशा : भुतजातांवरी' ॥ १८१

रथाचीं+ मकरतोंडे मीळौंणि' : सारथीया पुढां उभया राहुणि
कैसे जुंझतांये केंश धरुनी ± : सैल्ये उधवदेवो ॥ १८२

आणि आक्रुरु दंतुवक्रेसी : कैसा जुंझतांये आवेसीं
जैसा माहाकाळु काळेसीं : रुसला असे ॥ १८३

कैसे दोघै सब्रळ लाठे : येकमेकेसीं जुंझताति नेटें
तयांचा हांकीं' आकास फुटे : सींहनादीं गर्जताति ॥ १८४

आइका काळींगु वीरु माहावाहो : तयासीं यूधीं मीनला वसुदेवो
तयाचेया संग्रामीं उपमा देवों : आतां काइसेयांची ॥ १८५

जैसें पर्वतें पर्वत आदळती : कीं दोन्हीं समुद्र मीनले कल्पांति
ऐसे आवेसें जुंझताती दोघै माहावीर ॥ १८६

बलबलु कासेश्वरु मुरु पीठु गनु : ऐसे बहुत राये मिळौन
आवेसें आले सैन्येंसीं चालौन : यादवांवरी ॥ १८७

मग यादवांचे ± मंडळीक : जे जे नांवनांगें नावंयेक
ते आवघे मीळौंनि आइक : आले तयांवरीं ॥ १८८

ऐसे अवघे आवेसले सुभट : मग मीनले येकवट'
तुंवळ मांडलें आलोट : तें काइ सांघों ॥ १८९

असो हें आणिका वीरां नाहीं मीती : कैसें युध्यें मांडलें अती
खांडयांचा कींकसीं पाये रुपती : चालतां रनांमाजि ॥ १९०

कैसे तेथ खांडेयाचेनि खणाणें : तीडकीया हुंसळताती[१] गगनें
  वरीं भानु पोळताये तेणें : आकास काजळैलें ॥ १९१
ऐसें तें तुंवळ मांडलें कैसें : तुटौनि पडताति सीसें
  आणि धडें जुंझताति आवेसें : येकमेकेंसीं ॥ १९२
येक आपुलीं तुटलीं सीरें झेलीताती करीं :
  घेवे म्हणौनि टाकीताती वरीं
  येकाची करकरां दांतौरीं : वाजताती ॥ १९३
येकांचीं सीरें हांका देताती अंब्ररीं : येकमेकां दांतीं झोंब्रताती वरीं
  प्रांण गेलेयांहीं अवधारीं : परीं नवचे आवेसु ॥ १९४
येकांची सीरें पडलीं[१] धरणीं : नसुधीं धडें धांवतीं[२] रणीं
  करीं खांडीं भवंडीताती गगनीं : वीर आवेसले ॥ १९५
येक आपुलीं सीरें धरुंणि करीं :
  म्हणती[३] राहे वीरा जासील कवंनि परी
कैसें हृदैं सळु अवधारीं : आमुलेपणांचें ॥ १९६
ऐसें आवेसें युध्ये होतांये भारीं : धडें जुंझताति खंडवीखंडवेरीं
  वीरीं खांडेंनि सीरें रणां माझारीं : चेंढुफळी[१] खेळताती १९७
कैसा वीररसु मांडला अती : आवेंसें वीर खांडेयावरीं घालीती
  जैसे पतंग झेंपावती : दीपकावरीं ॥ १९८
ऐसी रणीं प्रकटली आद्‍भुत शक्ती :
  सुभटां भरला आवेसु तो न मांये क्षीतीं
त्रैलोक्यातें ग्रासुं पातांती : वीसरले आपें परु ॥ १९९
येक भुका खांडीं खाताती रणीं : तान्हैले गजरुंडावरीं बैसौणीं
  रुधीर पीतालि परी कवणीं : जीवन म्हणौनियां ॥ २००
ऐसा आद्‍भुतरसु आपार : रणि प्रकटला असे थोर
  रुधीरांचा रणीं[१] वाहताये पुर : तया सैन्यांमाजी ॥ २०१

तेथ रथांचीं तारुवें चालती उदंडें : ध्वजास्थंबु टके वरीं तेंचिसीडें
वीर भवसींधु उतरताति कोडें : वरीं बैसौनियां ।। २०२
ऐसे ते देवाचेनी सबंधें : भवसींधु उतरताति वीनोदें
आवघे वैकुंठा नीगाले आनंदें : वीरगंगें न्हांउनीयां ।। २०३
ऐंसा तेथें रणसींधु भरला असे भारी : मधीं क्षेत्री मीनु जाले अवधारी
प्रेतांचि आवेसें घेताति कवनींपरीं : भुकां खांकावले ।। २०४
तेथ मेदमांसांचा जाला चीखलु : केशांचा जाला सेवाळु
मुक्तें आळंकार तेचि वाळु : जळु करांगुळीया ।। २०५
आतां असो हा वीररसु अती : रणीं जुंझतां आपुला परवा नेणती
तो आवेसु कैसा हरीला श्रीपती : यादवेश्वरें ।। २०६
मग पांचजन्यु वाजवीला मुरारी :
तेणें रीपुचा आवेसु हरला क्षेणां मांझारीं
आणि रथ सांमोरा केला अवधारी[१] : सीशुपाळाकडे ।। २०७
ऐसा आइकोंनि पंचजन्याचा नादु : म्हणती आला आला गोवींदु
वीर मोडले रावो चैद्यु : भेणें कांपीनला ।। २०८
ऐसा आला जाणौनि गोपाळु : अरीसैंन्यां सुटला पळु
वाग[१] वाळुनीयां[१] सीशुपाळु : नीगता जाला ।। २०९
तवं देवें रथु आड[१] घातला : पळतां चैद्यु पाचारीला
म्हणती तुं तवं क्षेत्री जुंझारु भला : कां पळतोसी योध्येवीण ।।
रणीं जुंझतां हारवीजे : घायें पोळलेयां पळीजे[१]
आणि युध्येंवीन चैद्या जाइजे[२] : हें आपयेस थोर ।। २११
आतां मजसीं योध्ये करी : क्षेत्रीपणांचा पुरुषार्थु धरी
तवं काइ करीता जाला तीये आवश्वरीं : वीर सीशुपाळु ।। २१२
मग सांवरीनियां सीशुपाळें : पन्नका[१] सस्त्र[१] मंत्रुणि घातलें
तेनें आमीत भुजंग चालीले : येदु सैन्यांवरीं ।। २१३

येक दाटले देखा अंबरीं : गरळा वरीषताती वरीं
    येक धुदाती[1] सैन्यां माझारीं : काळीयांने ॥ २१४
येक लोंबताती वारुवांचा क्रंठीं : येक पायांसीं घालीताती मीठी
    येकांचीया धुदातीं पुटी : बैसले रथावरीं ॥ २१५
येक सारथीयांचा गळां : येक पाइं जाले सांखळा
    येक धुधुकार फुकीती जाळा : येक कर चरणां झोंबताती ॥ २१६
यैसें घारैलें देखोनियां सैन्य : मग श्रीकृष्णें केलें संधान
    गरुडा सस्त्र आभीमंत्रीलें जांण : तीये वेळीं ॥ २१७
ऐसें देवें गरुडा सस्त्र घातलें : तेणें आमीत गरुड[1] चालीले[1]
    तेहीं ते भुजंग ग्रासीले : क्षेनांमाजी ॥ २१८
मग ते गरुड आवेसले भारीं : कोपें चालीले चैद्या सैन्यांवरी
    कैसे पेटले देखा रणीं माहाभारीं : खगपती ते ॥ २१९
कैसे धुधुकारें झडपीताति पांखि : माहावीराते वीदारीताति नखि
    सगळे गज घोडे मुखि : घालीताति ॥ २२०
घेतां गज आवेसा न पुरती : मग रथु मुखामाजि घालीती
    कोपें ठणठणां फोडीती : चंचुपुटीं[1] ॥ २२१
तवं वीर म्हणती सीशुपाळा : या गरुडांचेया कवळा
    घेतां पर्वतु न पुरे सगळा : आतां कैसें वर्तेल ॥ २२२
तवं तेणें माहावीरें सीशुपाळें : पावका सस्त्र घातलें तीयेवेळें
    तयाचेनि गरुड नीवारीले जाळें[1] : वन्हीं प्रकटला ॥ २२३
ऐसा प्रकटला जाणौनि वन्ही : मग काइ करीते जाले श्रीसारंगपाणी
    मेघा सस्त्र घातलें ततक्षेणीं : अग्नी वीझवीला ॥ २२४
मग ते मेघ वरुषताति भारीं : सीशुपाळाचेया सैन्यांवरीं
    वावधानें[1] रथ देखा आंबरीं : उडताती ॥ २२५

गर्जे फुटों पाहे क्षोती : गज घोडे बंबाळलें न सवंरती
आणि सणसणां वींजा पडती : चैद्ये सैंन्यांवरीं ॥ २२६
वरीं वरुषताती सोंडाधारीं : प्रचंडा गारांचिया सीःळांवरीं
जैंसा प्रळयें मेघु आवधारी : वरीषतो कल्पांतीचा ॥ २२७
तवं वीर सोशुपाळातें म्हणती : हा माहाप्रळयो मांडला क्षीती
परी तो सीशुपाळ चीतीं : कांटाळेंचि ना ॥ २२८
मग सीशुपाळें अवधारीं : पर्वता सस्त्र घातलें वरीं
तेणें पर्वत दाटले आंबरीं : तो वरीं जाला मंडपु ॥ २२९
तेणें वरमनां[1] मेघ धरीले : आणि चहुंकडे वारे कोंडीले
तवं येरीकडे काइ केलें : श्रीयादवेश्वरें ॥ २३०
मग इंद्रा सस्त्र घातलें मुरारी : तेणें आमीत इंद्र चालीले भारीं
वज्र झेलीताती आंबरीं : पाहीलें पर्वताकडे ॥ २३१
मग तेहीं वज्रा[1] करुणीं : पर्वत कुटले ततक्षेणीं
मग सोशुपाळ सैन्यें दृष्टीं सोडुनीं[2] : चालीले वज्रें झेलीतु ॥
तवं सीशुपाळें तयांवरीं : मदनमोहना सस्त्र घातलें अवधारी
तेणें आमीनु चालीलीया नारी : शोडस वरुसांचिया[3] ॥ २३३
तीया अती रुपे सुंदरा सुरेखा : तेहीं मोहीले भुपाळां[1] देखा
येकयेका यादवां जवळीं आसेषा : पातां दीसताती ॥ २३४
तीहीं कंवाडीं कवणींपरीं : आवघे वीर मोडीले[1] तीये आवश्वरीं
वैमीक लाउनियां नानापरीं : हीरीती[2] आभरणें ॥ २३५
येकी घ्याहो जी उदकें म्हणती : येकी कवतुकें हातीयेरु घेती
येकी माथांचे टोप फडीती : येकी कुस्में वीरीताती[1] ॥ २३६
येकी प्रीया सींणलेति म्हणतो : येकी वज्रांगीया फेडीती
येकी आंगीं चंदन र्चचिती : येकी कर्दमें सींपीताति ॥ २३७

येकी वींजणवारे घालीती : येकी कुशुमांचे आळंकारु वाती
येकी चवरें ढाळीती : येकी करीती सेवा ॥ २३८
येकी व्रह्मवीने वाती : येकी सुरस मधुर गाती
येकी रगीं प्रवर्तलीया नृतीं : येकी धरीती ताळ ॥ २३९
येकी सुगंधा फोडी वोळगवीती[१] : येकी वीडीया करुनी देती
येकी कामसास्त्रें वाखांणीती : जवळीं बैसोनियां ॥ २४०
येकी बैसौणियां जानुवरीं : रळीया खेळताति वीचीत्रांपरीं
यापरीं आवघे मोहीले देखा नारीं : सैन्यें यादवांचें ॥ २४१
ऐसे ते वैसीकपासीं गोवीले : महावीर कामीनीं मोहीले
ऐसे कवण आसती दादुले : जे नांगवेति आस्त्रीयांसीं ॥ २४२
जो वीरु येकांकीं सीहेंसीं कासी : तयासीं तापवरीं[१] मारीती दासी
ऐसीं आवघींचि केलीं कामपीसीं : बापु बळीया मन्मंथु ॥ २४३
ऐसें वीसयें आपस्मारीं व्यापीलें : कीं मदनमदीं उन्मत्त जाले
वैसीका रुपें डोळस भुलले : वीसरले स्वामीकार्यें ॥ २४४
येकु श्रीकृष्णां उधवा वांचौणीं : येर आवघेची वीर मोहीले कामीणीं
कां ते न जींणवेति रजगुणी : म्हणौनियां ॥ २४५
तो देवो सर्व पुर्नकांमु : वरीं स्वयें आत्मांरामु
येरें तोवि देवो आपुला केला प्राणनेमु :
तया भक्ता रजचि नाही ॥ २४६
तवं उधवदेवो म्हणेजी मुरारी : पाहा आवघेंचि सैन्यें मोहले नारीं
तें देखोनि हांसीला रावो मुरारी : मग बोलीला चैद्येसीं ॥
श्रीकृष्ण म्हणे चैद्या तुं देखणां भला :
आजी नीका सैन्यांसीं उपेगु केला
जो यादवांचा श्रमु हरीला : जुंझतां रनांमाजी ॥ २४८

आणि तुं भला होसी संपतीमंतु रावो :
जो आवघेयां यादवांचा केला वीव्हावो
या स्त्रीदानापस्ये दावो : कवनुं थोरु असे ॥ २४९
मग रुद्रा सस्त्र घातलें मुरारी : आमीत रुद्र चालीले तीये आवश्वरीं
तेहीं तीया पीटीलिया साटवरीं [१] : जालीया आदृस्येमांणां ॥
सर्वेचि सैन्यें जालें सनादबंध : येकमेकेसीं करीताति वीनोद
आवघे तुटले कामांचे वंध : आठवलें स्वामीकार्यें ॥ २५१
ऐसें फीटले कामांचे घारान [१] : मग हृदइं प्रकटलें श्रीकृष्ण ध्यान
म्हणौनि रज तमु सांडलीयां वीन : न लगे इश्वरुसेवा ॥ २५२
असो हें मग चैद्यु पाचारीला मुरारी : म्हणें आतां सांवरी रे सांवरी
हे मीयां खेळवीलें तुज अवधारी [१] : जाण सीशुपाळा ॥ २५३
परी आजी तुज जीवें न मारी : पुढां आम्हांसीं कार्यें असे अवधारी
येज्ञु होइल युधीष्टीराचा घरी : ठेवीलासी तयालागी ॥ २५४
मग घे घे म्हणौनिं श्री सारंगपानी : च्यारी बाण लावीले गुणीं
येकें वेळे घातले अभीमंत्रुनी : तया सीशुपाळावरीं ॥ २५५
येकें बाणें आंकु मोडीला : दुजेनीं वारुवांचा वागारा तोडीला
तीसरा धगधगीतु आला : तेणें मोडीले धनुस्ये ॥ २५६
चौथा चैद्यावरीं घातला [१] : तेणें माथांचा मुगुटु नेला
मग मोकळां केंसीं पळाला : दमघोपसुतु ॥ २५७
देव म्हणती परत दृष्टीं पाहे मज : येकवेळ ये पां मागुता जुंझ
मीयां लाज आणोली तुज : नेतो रुक्मीनीदेवी ॥ २५८
तवं चैद्यु म्हणे आजि फावलें जाये कृष्णां :
ये वेळेचें येंश म्यां दीधलें तुम्हांसि जाणां
देवो म्हणे आजी उदारु तुज येसणां : कवन असे ॥ २५९

आणि तुं ठाइंचाचि उदारु : तुज येंस देतां न लगे उधारु
मग थीरु जाले श्री सारंगधरु : धनुश ठेवीलें रथीं ॥ २६०

असो हें सीशुपाळाचें सैन्यें मोडलें : बहुत वीर रणांसी आले
चैद्यु साल्यु जरासंदु मोडले [1] : येरांचा ठावो नाहीं ॥ २६१

मग यादव धांवंती चहुंकडे : तेहीं बहुत वीर केले आडमोडे
सांडवीले गज रथ घोडे . असंक्षांत ॥ २६२

तेथ येक जीउ घेउनी पळती : येक नको मारु म्हणती
येक म्हणती पळतां मारीजे हे नव्हे नीती : क्षेत्रीयांची ॥ २६३

येक दांती धरीताति तृण :येक म्हणती राखा राखा प्राण
येवेळेचें द्या कां जीवदांन : आलों शरण तुम्हां ॥ २६४

येक वोडन खांडीं सांडुनि : कर जोडिताति दोन्हीं
येक म्हणती आम्ही तुमची पोसणीं : राखा राखा जीवें ॥ २६५

येक म्हणती आम्हां लागौणी : घरीं स्त्री आसे तरुणी
नको करुं वीघडणीं : अवंदाचि वीव्हावो जाला ॥ २६६

येक म्हणती आम्हा लागौनीं : घरीं लेकुरवें असती दोनी दोनी
तयासी पोसीते नाहीं कव्हणीं : हो कां माते पीतेयाची[1] आंन॥

येक म्हणती आम्ही मायेबापाचे येकले: वरीं बापु आसेती आक्षेमु जाले
जरीं आमतें आइकती मेलें : तरीं तेहीं सांडीती प्रांणु ॥

येक म्हणती आम्ही क्षेत्री रजपुत : आमचें नीकें मरण जीवित
परीं असों ब्राह्मणांचे रीणाइत : सोडा उत्तीर्ण होआवेया ॥

येक म्हणती या होउं बंदीजन : करुं यादवांसी ब्रह्मावो जान
मग ते राखती आमचे प्रांन : भेटों लेंकुरुंवांसीं ॥ २७०

म्हणौनि थोवां थोवां करीताति ब्रंह्मांवो :
राखा आम्हीं भाट मागों आलों दावो
तरी कैसा उदारपनें देतां पासावो : आम्हां खांडेयांचा ॥ २७१
येक म्हणती आम्हीं वैष्णव गुरव राणें :
म्हणौनि ठाइं ठाइं मांडीलें गाणें
येक टाळ म्हणौनि वोडणें : वाजवीताति ॥ २७२
येक मोडलें ध्वजास्थंबु आणीती : तेचि गरुडटके उभारीती
येक नाचती नाना वागडी धरीती : म्हणती राखा वैष्णवांते ॥
तवं यादव हांसीनले : म्हणती आजी नवल वैष्णव देखिले
कैसे टाळें घोळें वीण मीरवले : रणांमाजी ॥ २७४
तवं यादव म्हणती तयासीं : कां गां वांयां श्रमतासी
गोडा यैसें कां न म्हणां आम्हांसीं : काइ नेनितले असा ॥
ते म्हणती हें लटीकें नव्हे बापा : तुम्हांवरीं आम्हीं आलों कोपा
तेणें दोषें भरलों पापा : तें हें प्राश्चीत घेतों ॥ २७६
मग ते सोडीले समस्त : आनीक रायें धरीले आमीत
आणौनि उभे केले त्वरीत : श्रीकृष्णां पुढें ॥ २७७
मग ते कंठीं पागा घालुनीं : आवघे वीनवीती कर जोडुनि
म्हणती आजिचें राखें श्रीचक्रपाणी : येतुलेनि सेवक तुझे ॥
मग देवें सोडीले+ समस्त : गज± घोडे तयासीं दीधले रथ
ऐसे आवघे केले आनंद भरीत : श्रीयादवेश्वरें ॥ २७९
मग नीगतां लागले देवाचा चरणीं :
तयासीं ना भी म्हनीतलें श्रीसारंगपानीं
ऐसे सोडीले आभयें देउनी : गेले जेथचे तेथ ॥ २८०
मग पाठींलाग करीत : यादव वारीले समस्त
म्हणती चाला आतां नीवांत : कां गा श्रमत असा ॥ २८१

ऐसे अरी जींतले मुरारी : मग लागले संख नीसांन भेरी
सैन्यें येकवटलें अवधारी : जाले येसवंत ।। २८२

येतुला आवश्वरीं भीमकुमरु : कैसा घेउनी आला दळभारु
तया योध्याचा वडीवारु : तो सांघै कवी कृष्णदासा ।। २८३

प्रसंग एकविसावा समाप्त * ग्रंथसंख्या २५३७

श्रीकृष्णार्पणमस्तु

—०—

## प्रसंग बावीसावा

श्रीपरमात्मने नमः

तवं वार्तिकार गेले लवलाहें : म्हणती राया भीमका पाहे
रुक्मीनी हरीली श्रीकृष्णरायें : मारीले आमीत सैन्यें ।। १

सीशुपाळु सल्यु कासेश्वरु : काळींगु पौंडरीकु बाणासुरु
जरासंदु दंतवक्रु बलबलु भुमासुरु : हे भंगले पळताती ।। २

ऐसी मातु आएकौनीं : भीमका हरीषु जाला मनिं
जीवीं म्हणें दैवाची ते रुक्मीनी : जे पावली श्रीकृष्णरावो ।। ३

म्हणे जो न पवीजे योग अभ्यासीं : सहश्र जन्में तपें केलेंयां कासी
तो आणांसें देवो रुषीकेसी : पावली रुक्मीनी देवी ।। ४

ऐसें सुख जालें भीमकाचा मनीं : म्हणें धन्यें धन्यें हे रुक्मीणी ।।
जो वरु पावली श्रीसारंगपानी : देवादीदेवो ।। ५

असो हें आइकोनि रुक्मीनी हरण : रुक्मीया बहुत कोपला जाण
मग कैसें बोलीला वचन : राये भीमकेसी ॥ ६
म्हणे आइकै भीमका ताता : आम्हीं तुम्हां वर्जिलें याचि अर्था
परीं न येची तुमचेया चीता : तयासीं काइ कीजे ॥ ७
तुम्हीं बहुतें सन्मानें आदरें : तया कृष्णासीं गेलेति सामोरे
थोर तोषवीलें पाहुणरें : तयासीं हें लागलें फळ ॥ ८
तुम्हीं तया यादवां लागौनि : मेळीकारु दीधला अंबीका भुवनीं
आणि तेथचि पाठवीली रुक्मीनी : आम्हां वारीतां ॥ ९
तुम्हीं आपनेयांतें सीहानें म्हणां : तरी हें पुढां यैसें होइल काइ नेणां
परी काइ असे तुमचिया मनां : हे हीं नेणवे ॥ १०
आणि तुम्हां तया श्रीकृष्णां अती प्रीती :
मां नेनीजे काइ जालि वीभक्ति
कीं तुम्हींचि तया अनुसरलेती : तें हीं न कळे ॥ ११
आतां काइ येनें हातें या हातासीं : ताता मोडावें गा परीयेसी
उचलला घावो [१] तवं पोटासीं : येतु असे ॥ १२
आपुली मांडी घालीतां उघडी : आपुलेयांसीची लाज येतांये फुडी
आतां असो हे आमचि × बुधि [१] कुडी : तुम्हां काइसा बोलु ॥
तवं रावो भीमकु म्हणे : कीती रे बोलसी पातळ उणे
बळीयां फाटकां पावो सीरनें [१] : हें करणें आकुशळाचें ॥ १४
आजि हे नव्हेरे तुझें बोलणें : काइ पडलेयां पांपर [१] देणें
"वर्मे बोलतांसी नेणती सीहानें" [२] : तया पापा मीति नाही ॥
हा रे कवनु आपणेंयांलागी : बळीया लेइल आपेसांची वाज्रांगी [१]
हें अजये मीरवी जगीं : ऐसा कवनु असे ॥ १६
आरे कर्मा आनुसारणी बुद्धी [०] : ऐसी धर्मशास्त्रीं बोलीजे प्रसीद्धी
हा आधींची लीहीला असे वीधी : ललहाटीं धात्रेंणि ॥ १७

ते लल्हाटीची रेखा : न चुके ब्रह्मादीकां आसेखा
तेथ काइ करीतील देखा : माता पिता ॥ १८
माता पीता चींतीती आन : आणि सहश्र गोत्र बंधुजन
परी दैवाचें कर्तुत्व करण : तें दैवें करुंचि लागे ॥ १९
आणि तीया दैवं केलें होतें जैसें : ते आपुलें देवी [१] पावली तैसें
हें वाउगें बोलनें काइसें : जाण रुक्मीया ॥ २०
जरीं आकुळीं हीन वरीं कन्यां नेइजे : तरींचि पोतयासीं लाज बोलीजे
जो देवो ब्रह्मादीकीं न पवीजे : तो पावली रुक्मीनदेवी ॥ २१
हें मज ऐसेंचि आले रे आन्यांयेसें : आतां भलता बोलो भलतैसें
हें मीं भुसन मीरवीन आन्यायेसे[२] : या जगामाजि ॥ २२
ऐसें बोलीलें राये भीमकें : तवं रुक्मीया उठीला तवकें
म्हणे माझेया खांडेयाचेनि धाकें : कांपे त्रीलोकु हा ॥ २३
तेथ यादव काइसे अवधारी : उजु हातियेरु नेणती धरुं करीं
म्हणौनि चक्र वाहे रावो मुरारी : सुद्रसेन ॥ २४
ऐसा रुक्मीयांसीं कोपु आला आद्भुतु :
म्हनें वेगीं पालाणां रे आणां रथु
आतां कैसा [१] जाइल तो आनंतु : मजपासौनियां ॥ २५
तवं भीमकें रुक्मीयांसीं म्हनीतलें : यादवीं बहुत वीरातें वीभांडीले
तयापस्ये तुझें बळ केतुलें : असैल आगळेंची[१] ॥ २६
आतां न व्हावें तें जालें ये आवस्वरीं :
सोइरीकें आनुसरों राया मुरारी
आणि वीनउनीं आणु कौंडन्येंपुरीं : करुं सोहळा येथ ॥ २७
तवं रुक्मीया म्हणें ताता : मीं रुक्मीनी आणिन आतां
आणि जगबोळु करीन समस्तां : यादवांसीं ॥ २८

आणिन सीशुपाळ राजा ; सेस पाटु भरीन वोजा
नाहींतरीं लाज आली पुर्वजा : आजी माझेया ॥ २९

तवं भीमकु म्हणें राहे कां वांयां श्रमसी : जुंझतां यादवांसीं[1] न पुरेसीं
वायां[2] आपयेस पावसी : बहुतां रायां माजी ॥ ३०

जैसे पालथीये घागरी वरीं पाणी : घालीजे घट सहृश्र दोणि
तें वायांचि जाये नीगोणीं : आंतु कोरडी असे ॥ ३१

तैसे ± भीमकें वारीलें बहुत तयासीं : परी तें न प्रभवे[1] रुक्मीयासीं
मग तो नीगाला आवेसीं : सैन्यें घेउनियां ॥ ३२

मग नीसांना घावो दीधला : कोपें यादवांतें टाकीतु[1] पावला
तवं श्रीकृष्णें रथु प्रतवीला : धनुष्यें हातवसीलें ॥ ३३

तवं यादव म्हणती हृशीकेसी : तुम्हां पाडु नाहीं रुक्मियासीं
आम्हीं आतां हा जोनौन आन्यांयासीं : कुंमरु भीमकाचा ॥,

तवं देवो म्हणे तुम्ही कराल नीर्घातु :
आणी हा वधुं न ये वडील भीमसुतु
आतां होरवाचि धरीन त्वरीतु : मींची यासीं ॥ ३५

आतां यासीं धरुन अपीमांनु[1] करूं : यैसयां[2] वीक्षेपा हाचि पुढारूं
म्हणौनीं कोपले सारंगधरु : रथु सामोरा केला ॥ ३६

तवं रुक्मीयां म्हणे श्रीकृष्णराया : सांडी सांडी भीमतनया
नाहीं तरीं मज कोपलेयां : यादवां उरी नाहीं ॥ ३७

तवं वोले देवो सौरेयां ± सींधु : म्हणे घडी न लगे रे तुझा करीतां वधु
परी भीमकीचा वडील बंधु : म्हणौनि साहिजतायें ± ॥ ३८

आणि भीमकाचा कुमरु : तयाचा बोल लागेल थोरु
येऱ्हवीं तुझा करीतां संहारु : क्षेनु न लगे ॥ ३९

आतां जाये रे माघारा झडकरीं : नाहीं तरी यादव कोपले जरी
तरी तुतें मारीती अवधारी : जीवें न सोडीती ।। ४०

येनें बोलें तवंकला : धनुषीं बांनु लावीला
म्हणे मी रुक्मीया कोपला : आतां राख कृष्णां ।। ४१

आभिमंत्रुणियां सुर्यो सस्त्र नीभ्रांत : यादवांवरीं घातलें धगधगीत
तेणें सुर्यो आमीत : चालीले यादवां वरीं ।। ४२

खडतर तपती सहश्र कीर्णि : तेणें पासांण फुटताति धरणीं
आणि भुमीका तापली तयांचा रस्मीं : जालीं सेंदुरवर्नां ।।४३

मग गज घोडे धापा जीव्हा काढीती : धडधडां पताका छत्रें जळती
माहारथीये रथाखालीं रीगती : तवं तेहीं तापलें ।। ४४

प्रकासीं भरले डोळे : रणीं आपुला परावा न कळे
ताहानां कंठु सोषले : भवंतीं जळें पाहानाति ।। ४५

ऐसें व्यापीलें देखौनि सैन्य : मग देवें केलें संधान
राहो सस्त्र आभीमंत्रुणीं घातलें जाण : तयेवेळीं' ।। ४६

तीये धडेंवीण कैसीं : नसुधीं सीरें दाटलीं आकासीं
वदनें पसरुनि आवेसीं : धांवती दीनकरावरीं ।। ४७

आवघीं काळीं कृष्णवर्नें नीखळे : रक्तवर्न डोळे जैसीं भानुमंडळें
यैसीं भयानकें नसुधी सीसाळें : आकास दाटलें ।। ४८

तेया राहोचें धड म्हणौनि वहीलां : सवेंचि केतु धांवींनला
बहुतें रुपें धरुनीं आला : तयेवेळीं ।। ४९

तीये सीरेंवीण कैसीं : नसुधीं धडें धांवंताति आवेसीं
ऐसीं ते देखौनि वीवसा : दीनकरा पळु सुटला ।। ५०

तवं तो धावोनियां केतु : दीनकरातें कवळीया धरीतु
घे घे म्हणौनि पुढां वैरणें असे घालीतु : सीसाळां राहोचेयां ।।

मग तेण राहोनें वहीलीं : सुर्ये मंडळें गीळीलीं
नीकी सुर्ये पर्वणी मांडीली : तीयवेळीं ॥ ५२

मग दीनकर काकुळतीं येती : श्रीकृष्णाचा धांवा फोकारती
म्हणती आजीं राखें गा श्रीपती : पावै देवराया ॥ ५३

आहो जी आघासुरें माहाकाळें : गोपवछें गीळीलीं सकळें
तें देवा तुवां राखिलीं भक्तवछळें : उदर फोडुनीयां ॥ ५४

तैसें या राहोचेया मुखा बाहीरीं : आम्हासीं काढी गा श्रीमुरारी
तत्र कृपा उपंनली यादवेश्वरीं : तयेवेळीं ॥ ५५

तवं म्हणे देवांचा राणा : तुम्हीं आवघे कृष्ण कृष्ण म्हणा
तेणें करुनियां काळवदनां : बाहीर पडाल ॥ ५६

मग राहोचेया भीतरीं : कृष्णनाम उचारीलें दीनकरीं
तेणें संतोसु जाला राहोचा अंतरीं : वीसरले[१] वैरभावो ॥ ५७

ऐसें वीसरौनि वैरभावातें : राहोनें सोडीलें दीनकरातें
मग दोन्हीं येउनि देवरायातें : वंदीते जाले ॥ ५८

ऐसा तेहीं वंदुनि श्रीकृष्णराणा : उभये वर्ग गेले गगणा
परीं अद्यापीं वरषां दीसां दोघां जणां : भेटी होति असे ॥ ५९

ऐसे दोघै जाले आदृस्येमांन : आनि देवें दृष्टीं नीववीलें सैन्य
मग म्हणितलें आणिक करी संधान : वेगीं रुक्मीया ॥ ६०

तवं तेणें रुक्मिये वानि कैवाडीं : क्षेनौनि± भुतावळी आहुटकोडी
यैसें भुतास्त्र± धरुनीया कांणाडीं : घातलें यादवांवरीं ॥ ६१

येकें खांकाळें[१] येकें वेताळें : येकें दीर्घे वीशाळें
येकें नसुधीं सीसाळें : धडेंवोन ॥ ६२

येंकें तांबडी रक्तवर्ने : येकें उजळीं श्वेतें अतीमांनें
येकें काळी नीखळ△ कृष्णवर्नें : येकें प्रकासकें तेजरुपें ॥ ६३

मग तेण राहोनें वहीलीं : सुर्ये मंडळें गीळीलीं
नीकी सुर्ये पर्वणी मांडीली : तीयेवेळीं ॥ ५२

मग दीनकर काकुळतीं येती : श्रीकृष्णाचा धांवा फोकारती
म्हणती आजीं राखें गा श्रीपती : पावै देवराया ॥ ५३

आहो जी आघासुरें माहाकाळें : गोपवछें गीळीलीं सकळें
तें देवा तुवां राखिलीं भक्तवछळें : उदर फोडुनीयां ॥ ५४

तैसें या राहोचेया मुखा बाहीरीं : आम्हासीं काढी गा श्रीमुरारी
तवं कृपा उपंनली यादवेश्वरीं : तयेवेळीं ॥ ५५

तवं म्हणे देवांचा राणा : तुम्हीं आवघे कृष्ण कृष्ण म्हणा
तेणें करुनियां काळवदनां : बाहीर पडाल ॥ ५६

मग राहोचेया भीतरीं : कृष्णनाम उचारीलें दीनकरीं
तेणें संतोसु जाला राहोचा अंतरीं : वीसरले[१] वैरभावो ॥ ५७

ऐसें वीसरौनि वैरभावातें : राहोनें सोडीलें दीनकरातें
मग दोन्हीं येउनि देवरायातें : वंदीते जाले ॥ ५८

ऐसा तेहीं वंदुनि श्रीकृष्णराणा : उभये वर्ग गेले गगणा
परीं अद्यापों वरषां दीसां दोघां जणां : भेटी होति असे ॥ ५९

ऐसे दोघे जाले आदृस्येमांन : आनि देवें दृष्टीं नीववीलें सैन्य
मग म्हणितलें आणिक करी संधान : वेगीं रुक्मीया ॥ ६०

तवं तेणें रुक्मिये वानि कैवाडीं : क्षेनौनि± भुतावळी आहुटकोडी
यसें भुतास्त्र± धरुनीया कांणाडीं : घातलें यादवांवरीं ॥ ६१

येकें खांकाळें[१] येकें वेताळें : येकें दीर्घें वीशाळें
येकें नसुधीं सीसाळें : धडेंवोन ॥ ६२

येकें तांबडी रक्तवर्नें : येकें उजळीं श्वेतें अतीमांनें
येकें काळी नीखळ△ कृष्णवर्नें : येकें प्रकासकें तेजरुपें ॥ ६३

येकां सतमुखें येकां सहश्रमुखें : येकां सात येकां पांच येकें येकमुखें
येकां पाठीकडे सीरें वीमुखें : येकें सीरेंवीन ।। ६४

येकांचे वीसाळ नेत्र वर्तुळ : येकांचे आरक्तु जैसें उटीलें गंगाळ
येकांचे लांब वांकोडे येकांचे वेंभळ : येकांचे उरीं डोळे ।। ६५

येकें आकासीं चालीलीं खेंचरें : भुमींवरीं चालीलीं तीयें भुचरें
आनि येकें उदकींची जळचरें : ऐसीं नाना परींचीं ।। ६६

धांवंती वेताळ भैराळ हांकीत : झोटिंग धांवंताति कींकळीया देत
आणि ब्रंह्मग्रहो चालीले असंख्यात : हांकीतु पाचारीताति ।।

धांवंती जोगीनीं रक्तपात्रें घेउणि करीं : सवें अपस्मार फेंपरीं
हीरवीं प्रेतें± हांकीती वीचीत्रापरीं : धांवती सैन्यांमाजी ।।

येकें आवाळुवें आकासीं : खालीलें लाउनीं भुमीसीं
माहाभुतें चालीलीं आवेसीं : जीव्हा लाळीताती[1] ।। ६९

ऐसीं खांउं गीळुं करीतें : भुते चालीलीं आसंख्यातें
तवं काये केलें श्रीकृष्णनाथें : तें आइका पां ।। ७०

मग नरसींहां सस्त्र आभीमंत्रुनीं : देवें घातलें ततक्षेणीं
तवं नरसींहु चालीले जानें : भुतांतें ग्रासावया ।। ७१

वोंवीये खालुतें नर : वरुतें सींहाचें कळीवर
ऐसे नरसींहु चालीले आपार : देखा तीयेवेळीं ।। ७२

आवेसें कींकळीया देती : तेणें फुटों पाहे आकास क्षीती
कोपु न समाये त्रीजगती : नरसींहु[1] वीरांचे[2] ।। ७३

ऐसे हांकीत पाचारीत : नरसींहु पावले आमीत
मग कैसा आटु भवंताये तेथ : तीये भुतावळीसीं ।। ७४

येकां भुतातें दाढेतळीं घालती : येकांचीं सीसाळें ठणठणां फोडीती
येकां नखांवरीं[1] वीदारीती : नरसीहु ते ।। ७५

ऐसा नरसीहांचा देखौनी मारु : भुतावळीसीं सुटला हाहाकारु
म्हणति आजी मांडला संहारु : ये भुतश्रुष्टीचा ॥ ७६

मग कैसीया आंगुळीया धरीति दांतें : कृपा भाषीती वीनवीतें
म्हणती राखै गा आमतें : नरसीहां वीरा ॥ ७७

तु तवं आमचा आदिगुरु : आणि तुंची ये भुतावळीसीं पुढारु
तरी कां करीतासी संहारु : सेवकांचा ॥ ७८

ऐंसी भाखौनियां कांकुळती : आपणयांतें सोडउनियां पळीती
येकें जळीं थळीं आडीं वीहीरीं रीगती : येकें गेलीं आकासा ॥

ग्रहो झोटींग पीसीं : धरुनि राहीलीं तरुवरांसीं
तैं लागौनीयां लोकांसीं : जाली आदृस्येमांने ॥ ८०

ऐसें नरसीहुं आणि भुतें : आदृस्यें जालीं समस्तें
मग काइ केले श्रीकृष्णनाथें : तें आइका पां ॥ ८१

देव म्हणती रुक्मीया : हें तुज नांवेक खेळवीलें मीयां
परीं आतां बानु घालीन तया : जतनं करी ॥ ८२

परीं तुज आजि न मारी रे जीवें : हें सत्ये नीभ्रांत जानावें
परीं तुज आठवावेयां बरवें : करणेंचि लागे ॥ ८३

मग जंभणा[१] सस्त्र मुरारी : घातलें रुक्मीयांचेया सैन्यांवरीं
कडकडां जांभैया देताति अवधारीं : वीर नीद्रीस्तु केले ॥ ८४

तेथ बैसले गज घोडे ढुलताति : रनि नीद्रीस्तु[१] वीर वोसणती[२]
म्हणती यादव आले रे मारीती : वेगु पळा वहीले ॥ ८५

मग कोपला रावो मुरारी : गुणि लावीले बांन च्यारी
येकें वेळे घातले रुक्मीयां वरीं : तें परीसा पां ॥ ८६

येकें सरपंजरीं घातलें सैन्यें : दुजेनि धनुस्ये मोडीलें[१] जान
तीसरेनों ध्वजास्थंबासीं केलें वीघ्न : चौथेनि मोडीला आंकु॥८७

ऐसा रुक्मीयां वीरथु केला : देवें पळत पळतां केंशीं धरीला
मग वोढुनि रथेसीं बांधला : मागील[1] हातीं ।। ८८

ऐसा दीनु बंधु देखौनि रुक्मीनि : थोर[1] चींता लागली मनीं
ते बळीभद्रें ग्लांदि± रूप देखौनि : मग बोलीला कैसें ।। ८९

रामु म्हणें आइकें रुक्मीनी : ज्ञनि सीनु धरीसील मनिं
यातें सोडील श्रीसारंगपानी : हें सत्ये जाणां ।। ९०

पाहातां संसारू रचनां मीथ्या : कवणाचा बंधु गोत्र माता पीता
नीदानिं या जीवातें सोडवीता[1] : इश्वरु येकु ।। ९१

पुत्र कळत्र संपती : हे चाळीतां वीषयें वेव्हारु स्थीती
येणें जीवासीं दुरावला कैवल्येपती : मग पडीला भ्रंमणांमाजी ।।

जैसी सर्पिनीं पीलीं वीये : तेचि आपुलीं भ्रतौनि मागुती खाये
तैसी ममता अवीद्या लागली आहे : जीवातें ग्रासावेया ।। ९३

म्हणौनि हे सांडौनि अवीद्या ममता : योगीये शरण रीगाले अच्युता
तेहीं तारीलें पुर्वज माता पीता : आणि आपणेंयातें ।। ९४

जयाचा पुत्रु जाण : होये योगीया रीगे ईश्वरा सरण
तयाचेया पुर्वंजा होये उधरण : सबंधें तयाचेनि ।। ९५

म्हणौनि हे सांडी ममता वावो : हा हृदइं चींतावा श्रीकृष्णदेवो
हाचि तुज देइल प्रेमांचा दावो : आणि उधरील वंसातें ।। ९६

ऐसें आइकोनि रुक्मीनी : "मग लागली राम कृष्णांचा चरणीं"[1]
"थोरु संतोषु जाला मनिं"[2] : जाली जीवन मुक्त ।। ९७

मग बळीभद्र म्हणें देवा : आतां भीमकुमारु सोडावा
देवो म्हणे आतां तुम्हीं यासीं वोपुमानु[1] द्यावा : सालेपनाचा ।।

मग सीरीं काढीले पांच पाट :
उतरीले आर्ध खांड हनवटींपासौनि नीट
आणि येकी मीसी भाद्रौनि केलें वीकट : श्वांग आर्धनारी ।। ९९

वरीं माथां वोतीला सेंदुरु : ऐसा आदरु केला थोरु
बळीभद्रें सोडीला[1] भीमकुमरु : मग बोलीला कैसें ॥ १००

म्हणे तुवां मागां सीशुपाळा लागौनि :
बोलीला होतासी जें द्यावी रुक्मीणी
तें तुज प्राश्चित दीधलें श्रीसारंगपानीं : आपुलीये दृष्टीपूढां ॥ १०१

तुवां देवाची नींदा केली थोरी : तें आवघें उपसाहीलें मुरारी
आणि हें सालेपणें अवधारी : सीनु न धरीतु ॥ १०२

हें सालेपनें तुजसीं : आम्हीं रळी केली म्हणे रुषीकेशी
मग लेणीं लुगडीं वाइलीं रुक्मींयासीं : देवें कंठीचा दीधला हारु॥

ऐसा रुक्मीयां सन्मानेंसीं सोडीला :
तो परबाहीरा श्रृंगारवनासीं गेला
मग तेथें सामासु राहीला : रुक्मीया आपमानेसीं ॥ १०४

मग तें आवघेंचि वपन केलें : सामास मुख नाहीं दावीलें
जवं तें आवघें सरीसें बाणलें : सीर खांड मीसीया ॥ १०५

ऐसा रुक्मीया सोडीलेयांवरीं : जवं पाहे भीमकुमरी
तवं बहुत वीर रणां माझारीं : पडीले आसती ॥ १०६

तयाचे घाये रणां माझारीं : वाजती वीचीत्रांपरीं
तें भयेरुप अवधारी : काइ सांघों ॥ १०७

"जैसे सर्पाचे फुत्कार : कां भुड भुड उदकाचे उद्‌गार
नानापरीचे हुंकार : ते काइ सांघो ॥" △ १०८

कीं जैसे महीष रेहुंकती[1] : कीं नानापरीं खर भुंकती
तैसे तयांचे घाये वाजति : रणि वीचीत्रांपरी ॥ १०९

ऐसी ग्लादि ± देखौनि : तवं ते कृपाळु जननि
कणव उपनली मनि : भींमतनयेसीं ॥ ११०

मग ते वीश्वमाता : म्हणे परीयेसी जी आनंता
यांचीया स्त्रीया बाळें माता पीता : दु:खें आक्रंदती ।। १११

तरी तुं कृपाळु गोपाळु : करीसी जीवां आनंदाचा सुकाळु
तुं आर्तादार्णि[१] दयाळु : देवो देवा ।। ११२

तरी वीनती परीयेसी जी जगजेठी : करी आमृताची दृष्टी
सकळै आनंदाची श्रृष्टी : करी देवदेवा ।। ११३

श्रृष्टी संहारु रचना : तुझीये प्रवृतीसवें होये क्षेणां
तरी हे सैन्यें उठवावें जी जगजीवना : देवा कृपाळुवा ।। ११४

तवं देवो बोलीले वचन : देवी जीतुकें पडीलें सैन्य
तीतुकें आतां वैकुंठीं अमृतपान : आवघे करीताती ।। ११५

देवी वैकुंठापस्ये मृत्येलोकु : हा तंव आधपातु येकु
येथीचे जन्म चुकावया हा लोकु : सुकृत आचरताती ।। ११६

तरी तेथौनि आणावे : आणि बळयां आधोपातीं घालावें
ऐसें देवी वीचारी बरवें : म्हणसील तेंचि करुं ।। ११७

तवं बोले वीश्वजननि : यांसीं वैकुंठसुख भोगवांवें सारंगपानी
आणि हें संसारीकु सुख देउनि : सुखिये करी ।। ११८

तवं बोलीले दैत्येवीभांडें : म्हणती देवी घातलें थोर कोहृडें[१]
आतां उभयें सुख जेणें घडे : तें करणें लागे ।। ११९

तवं तो कृपाळु देवोरावो : दृष्टीं केला आमृताचा वरुषावो
सैन्यें आवघें उठवीलें हा नवलावो : वर्तला तीहीं लोकीं ।।१२०

जैसीं नीद्रीस्तें होतिं जागीं : तैसें सैन्यें उठवीलें वेगीं
पाहाती तवं घांवो सर्वांगीं : कोठें देखिजेती ना ।। २२१

नर तुरंग भुपाळ : ऐसें सैन्यें उठवीलें सकळ
हीं देवाचे वंदीले चरण कमळ : तीयेवेळीं ।। १२२

मग देवें तयांसि देउनि गज तुरंग रथ : ऐसे पाठवीले समस्त
गेले जेथचे तेथ : ठायां आपुलीया ॥ १२३

ऐसें केलें हृशीकेशी : आनदु जाला तो न माये श्रृष्टीसीं
देवीं दुदुंभी वाजवीलीया आकासीं : पुश्वीं वरीषताति ॥ १२४

ऐसा येसवतु जाला मुरारी : वेदध्वनि केलीया द्वीजवरीं
भाट पवाडे पढताति नानापरीं : लागलीं मंगळवाद्यें ॥ १२५

जे जे पवाडे केले मुरारी : ते भाट वाणिताति वीचीत्रां परीं
ते उचितीं वारीले स्वयें करीं : आपण देवराये ॥ १२६

मग बोलांउनि भाटु कल्याणकीर्ति : वेदघोषेसीं आदरें प्रीती
तयासि आंगसीके दीधलीं उचीती : आणि पासाया मीति नाहीं॥

गज रथ घोडे सांडवीले रणि :
ते कल्याणकीर्तिसीं दीधले सारंगपाणि
द्रव्यें आभर करौनि : पाठवीला कासोयेसीं ॥ १२८

असो हें येरीकडे रावो मुरारी : लाउनि संख नीसांन भेरी
मंगळवाद्यांचा गजरीं : सेन्यें नीगतें जालें ॥ १२९

वैदर्भ लंघीले रुशीकेशी : मग पुढां बंदीजनु पाठवीला गुढीयेसीं
येशोदे देवकीये मातेसीं : हृराषु सांगावेया ॥ १३०

तवं येशोदा देवकीये लागौनि : थोर चींता वर्ततांये मनिं
म्हणतां श्रीकृष्णांसि हरीतां रुक्मीनि : थोर आवघड असे ॥ १३१

राये मीनले आसती बहुत : तेथ युध्ये होइल आद्‌भुत
ऐसी चींता असे करीत : देवकी माता ॥ १३२

तवं बंदीजनु गुढीयेसीं : येउनि सांघे देवकीये मातेसीं
म्हणे रुक्मीनि हरौनियां रुशीकेशी : येताती येसेसीं ॥ १३३

रुक्मीयासीं आपमान केला बहुत : आणि राये जींतले समस्त
सीशुपाळा सहीत : श्रीयादवेश्वरें ॥ १३४

आणि जेतुकें सैन्यें पडीलें होतें रणि :
तीतुकें उठवीलें श्रीसारंगपाणीं
सोडीले आभयेकर[१] देउनि : ते गेले जेथचे तेथ ॥ १३५

आणि आपुलेयां सैन्यांमाजी कव्हणां : कांटाही मोडला नाहीं जाणा
ऐसें आइकौनि देवकीया बंदीजनां : दीधलीं लेनि लुगडी ॥ १३६

आसो हें इतुला आवश्वरीं : नीसानांचा घांइं मुरारी
आले तापीयेचा तोरीं : पुर्न[१] संगमांसि ॥ १३७

मग येशोदा देवकी रोहीणि : तोघीं आळंगीला श्रीचक्रपाणि
तीहीं रुपसु देखौनियां रुक्मीनी : मनिं संतोसलीया ॥ १३८

आणि कृतवर्मेयांसीं जाली भेटी : तयाप्रतो सांघीतली आवघी गोष्टी
मग मेळीकारु जाला जगजेठी : तीरीं तापीयेचा ॥ १३९

तेथौनि पाहाटांचि पालानिले रुशीकेशी :
रणांवट लंघुनि आले भार्गवपुरीयेसीं[१]
तवं गुढीया उभालीया गुजराते सोरठ देसीं : देवो आले म्हणौनियां॥

पुढां[१] मुळमाहादेवो पावला : तेथें मेळीकारु केला
तवं मागां काइ करीता जाला : राजा भीमसेनु ॥ १४१

आतां दुजी माळ श्रीकृष्णां लागौनि :
मुळमाहादेवीं घालील रुक्मीनी
ते पुढील कथा झडकरुनि[१] : सांघे कवी कृष्णदासा ॥ १४२

प्रसंग बावीसावा समाप्त * (ग्रंथसंख्या २६७९)

श्रीकृष्णार्पणमस्तु

—०—

# प्रसंग तेवीसावा

श्रीपरमात्मने नमः

असो हें रुक्मीयां जींतला समरंगणि :
आणि श्रीकृष्ण घेउनि गेला रुक्मीनि
ऐसे वार्तिकारु सांघती येउनि : भीमकापासीं ॥ १

आणि रुक्मीयासीं बहुत अपिमांनु केला :
तो परबाहीरा श्रृंगारवनासि गेला
तवं भीमकु म्हणे मीयां वर्जिला : परीं गेला वारीतु वारीतां ॥ २

कें दीपु कें पतंगु : कें पंचाननुं कें मातांगु
कें आडवोहळाचा वोघु : लोटी सागरातें ॥ ३

कें मसकु कें गरुड खगपती : कें दीनकरु कें खद्योताची जोती
तैसी तया आदिपुरुषाची शक्ती : दीनु रुक्मीया केवी पुरे ॥ ४

असो हें रावो वोलीला[१] प्रधाना प्रती : म्हणें परीयेसै मंत्रीया सुमती
घेइ आवघीये वऱ्हाडीकेची आइती : सैन्यें सामदें[२] करा ॥ ५

मीं जें चिंतीत होतों[१] मनिं : तेंचि पावली रुक्मीनि
आतां वेगीं जावें झडकरुनि[२] : भेटों श्रीकृष्णराया ॥ ६

मग सर्व दळेंसि भीमसेनु : वऱ्हाडीकेची आइत घेउनु
नीशांनाचा घांइ आला झडकरुनु : मुळमाहादेवासिं ॥ ७

ऐसा करुनि माहोछावो : आनंदभरीतु चाले भीमकुरावो
तवं देखिला मुळमहादेवो : प्रशादु शंकराचा ॥ ८

ऐसा देखौनि मुळमाहादेवो : भीमकें नीशांनां देववीला घावो
तो गर्जिनला निहावो[१] : आकाशामाजी ॥ ९

नाना ढोल दमामें शंख भेरी : ऐसा वाद्यांत्रांचा गजरीं फुटती गीरी
तो नाद आइकीला अवधारी : येदु सैन्यांमाजि ।। १०

तवं यादव म्हणती येकमेकां : हे काइसेरे नीशांनाचे नादु आइका
येक म्हणती येतु असैल देखा+ : सीशुपाळु ।। ११

ऐसें येदुसैन्यां माझारीं : हांक फुटली तीये आवश्वरीं
येक म्हणती पालाणा रे पालाणां झडकरीं : आले सीशुपाळ सैन्ये

आइका गाडेकार भोई : दुसें उभारती होते लवलाहीं
नीशानांचें नाद आइकौनि ते ही : दचकले ठेले ।। १३

आणि रथ होते सोडीले : ते मागुते सारथीं संजोगीले
वज्रांगीया लेउणि+ आरुढले : माहारथी आयुध्येसीं ।। १४

घोडेयां घातलीया पाखरा : गज गुढरीले अवधारा
डांगीये आढाउंवां धनुर्धरा : हांकितातीं ।। १५

ऐसा गजबु[१] जाला कटका आंतु : तें आक्रुरु देवापुढें असे सांघतु
जी जी नीशांन असे आइकीजतु : पुर्व दीसे ।। १६

आणि कटकामाजी बोली ऐसी : जें चैद्यु येतु असे सैन्येंसीं
ऐसें आइकौनि रुषीकेसी : हांस्ये केलें ।। १७

श्रीकृष्ण म्हणे अक्रुरासीं : चैद्यें बुडी देउनियां वृंदेसीं
हळदी धोउनी डाउ कांकणांसीं : रुसला देखा ।। १८

बासींगें सांडीली क्षीती : माथां घालौनि अपयेंशाची बुंथी
ऐसी वऱ्हाडाची जाली ख्याती : गेला आपुलीया देशा ।। १९

तो आतां केवी ये मागुता : हे कांहीं न करावी चिंता
आणिक वीचारुनि पाहातां : तर होइल भीमकु रावो ।। २०

तवं उठीला अर्जुन माहावाहो :
जी जी मीं हा पाहोंनि येइन कवण रावो
असैल सीशुपाळु तरी छेदीन ठावो : बांनिं गांजीवांचा ।। २१

जरी येतु असैल भीमकु राणा : प्रतापें युध्याचीया आंगवणा
तरी बांधौनि आणिन जी जगजीवणा : भेटी तुमचिये ।। २२

सोइरीकें येतु असैल जरी : तरी आपिन संन्मानें आदरीं
हें सत्ये जी राया मुरारी : वेगीं आज्ञा दीजो ।। २३

ऐसी आज्ञा घेउनि ± : सवें सैन्यें घेतलें येकी क्षोनि
मग नीगाला रथीं आरुढोनि : अर्जुन प्रतापीया माहावीरु ।।२४

ऐसा घडघडां+ नीगाला राहावरु : अर्जुन प्रतापीया माहावीरु
तवं पुढां देखिला दळभारु : भीमकाचा ।। २५

तवं कैसा तेणें अर्जुनें : देवदंतु त्राहाटीला सत्रानें
वीरां आलीं फुरानें : सीहंनादि गर्जताति ।। २६

आणि ध्वजास्थंबावरीं : हनुमंतु रीगाला असे फेरीं
पुस वाउनियां सीरीं : रोमावळी पींजारीली ।। २७

तेणें रोहंकीं सुदलें असे सैन्य : कोपें करकरां वाजवी दसन
वरीं भुभकारें गगन : गर्जतांये ।। २८

आधिचि देवदंताचा गजरु : वरीं हनुमंताचा भुभकारु
तया दोहिंचा नादि गर्जतांये मेरु : आकास फुटों पाहें ।। २९

तो आइकोनीयां गजरु : भीमसैन्यांमाजि' प्रवर्तला' हाहांकारु
पुढां येत होता दळभारु : तो माघारां प्रतला ।। ३०

तेथें रथावरीं रथु पडती : आणि गजें गज आदुळती
घोडेयांचा खुरु रवींजाती [१] : रगडती पायांचे ।। ३१

तवं म्हणे रावो भीमसेनु : थीरु रे थीरु हा येतु असे अर्जुनु
पैल ध्वजास्थंबावरीं प्लवंगमु [२] : वोळखिला या खुणां ।। ३२

ऐसा सैन्यांमाजि भवंतु असे आटु : तवं अर्जुनें पुढां पाठवीला भाटु
म्हणे हा सोधुनि ये पां' सुभटु : येतांये कवनियां काजा ।।३३

जरी येतु असैल संग्रामा कव्हनि : तरी तुवां कुचा भवंडावा गगनि
आणि भीमकु येतु असैल सोइरीके लागौनि :
तरी गुढीयेसीं यावें ।। ३४

मग वानितु अर्जुनाचा पवाडा : भाटें घोडा टाकीला फुडां
तो झडकरी आला वेगाडां : भीमका जवळीं ।। ३५

मग ब्रंह्मावो म्हणौनि बंदीजनें : पुसीलें भीमका कारणें
म्हण राया मज पाठवोलें अर्जुनें : जे तुं येतासी कवणियां काजा ।।

जरी असैल जुंझावयाचि चाड : तरी अर्जुन पुरवील[१] कोड
नाहीं तरी करुं येतसा[२] वऱ्हाड : तरा सन्मानें नेइल ।। ३७

ऐसी जे मनि असे चिंता : ते झडकरी सांघ नृपनाथा
मीं सांघों जाइन पार्था : म्हणे बंदीजनुं ।। ३८

तवं बोलीला भीमनृपती : म्हणें मी भेटों येतांये स्नेंहप्रीती
सेस भरीन आपुला स्वहस्ति : श्रीकृष्णरुक्मीनीसीं ।। ३९

यैसा मी येतु असे या काजा : हे सत्यें जाण बंदिराजा
जाउनि वेगीं सांग आत्मजा : पडुचीया ।। ४०

आणिक येक वीनवणि : करावी अर्जुनां लागुनि
जें मातें करी धरुनीं : न्यावें देवा जवळीं ।। ४१

मग बंदोजनासीं देउनि लेनीं लुगडीं : गज तुरंग द्रव्ये शतकोडी
मग तो उभौनि हरीषांचि गुढी : आला अर्जुना जवळीं ।। ४२

भाटु म्हणे पंडुनंदना : हा येतु असे भीमसेनु राना
सेस भरावया जगजीवनां : रुक्मीनीदेवीसीं ।। ४३

तुम्हांसीं आदरें प्रीती : रायें पाठवीली असे जोहारु वीनती
म्हणे मज करीं धरुनीयां सुभद्रापती : न्यावें देवा जवळीं ।।४४

येसें आइकोनि धनुर्धरु : मग सामोरा केला राहावरु
तो जवळीं देखौनि भीम नृपवरु : पुढां सामोरा आला ।। ४५

असो हें येकमेकां सवंदृष्टी जाली : दोघै उतरले रथाखालि
मग क्षेमांळीगनें जालि : येकमेका ॥ ४६

मग अळंकारु लेणिं दीव्यांबरें : उभये वर्गासीं जालि परस्परें
भीमकु करीं धरुनियां धनुर्धरें : बैसवीला आपुला रथीं ॥ ४७

ऐसे दोघै येक होउनियां अवधारी : लाउनि शंख नीसांन मृदांग भेरी
वेगीं आले राया मुरारी : जवळीके ॥ ४८

तवं दृष्टी देखिले श्रीसारंगपानी : मग भीमकें घातलें लोटांगणीं
तो देवें वरीच्यावरीं उचलौनि : स्नेहें आळंगीला ॥ ४९

नंदु वसुदेवो सात्वीकी उग्रसेनु : बळीभद्र उधव आक्रूर बोलाउनु
या सातांसीं भेटवीला भीमसेनु : मग बैसवीला सीहांसनिं ॥५०

असो हें मेळीकारु जाला सैन्यां :
श्रीकृष्णें लेनिं लुगडीं दीधली भीमसेनां
सन्मांनें आनंदु जाला तयाचेया मना : वीसरला आपेपरु ॥ ५१

ऐसें भेटलेयांवरीं श्रीसारंगपाणि : भीमकु लागला श्रीचरणिं
मग वीनवी तो कर जोडुनिं : श्रीसर्वेश्वरासीं ॥ ५२

म्हणे वीनंती परीयेसी मेघस्यामा : मीयां तुमतें वंचीलें पुरुषोत्तमा
तया अपराधा कीजो क्षेमा : आदिपूरुषा ॥ ५३

जी जी मीयां वरु पुसीला कींन्नरातें : तेणें वीशेसें वर्निलें देवातें
श्रीकृष्णां मीयां रुक्मीनी देयावी तुमतें : ऐसें आलें माझीया मनां

तें मज वारीलें रुक्मीयें दुष्टें : आणि वरीलें सीशुपाळ करंटें
परी इयेसीं जें घडलें गोमटें : तेनें पावली देवातें ॥ ५५

परी जी माझा मनोर्थु गेला सीध्दि : जे रुक्मीणी योग्ये जाली गोवींदिं
आतां सांधीजो जी बरवि बुद्धि : जेणें सनाथु होयें ॥ ५६

आतां वीनती परीयेसी जी मुरारी :
येथचि च्यारी दिवस सोहळा अंगीकारी
मग जी वीजें करावें द्वारकापुरीं : श्रीयादवराया ।। ५७

आणि जी भीमकी मज जवळि पाठवावी : ऐसें रावो देवातें वीनवी
आणि च्याऱ्ही दी सोहळया गोसांवीं : मानु देयावा ।। ५८

येणें मीसें[१] सनाथ होइन गोपाळा : आणि भीमकीये होइल सोहळा
आणि देवासीं वीनउं तरी नोवरकळा : सदा बाणली असे ।।५९

मग देवें पाठवीली भीमकी : म्हणीतलें वेगीं आइती करावी नीकी
तेणें भीमका हरुष चीत्ति[१]तो तीहीं लोकीं : सामायेना ।। ६०

मग देवो वीश्वकर्मयातें म्हण : आतां वेगीं दोन्हीं मंडप करणें
तव वीश्वकर्मा म्हणे : जी तें सीद्धचि असे ।। ६१

मग वीश्वकर्मेनी मांडव दोन्हीं : कैसे रचीले ततक्षेनिं
जें नसे स्वर्गीं वीष्णुभुवनीं तें दळवाडें उभीलें ।। ६२

जो मंडपु उभीला श्रीकृष्णभुवनिं : तेथ कांमवीले नवरत्न चिंतामनिं
असो हें तेथीची सांघतां उभवनिं : वीस्तारु होइल ।। ६३

आतां भीमकांना मेळीकारीं : मंडपु रचीला कवनिये परीं
तेथची रचना कळा कुसरी : वर्नु कवन जानें ।। ६४

ध्वजा फरारे कळसवरीं : मखरें तवंगें वीचीत्रांपरीं
भीतरीं बौलें रचीलें अती कुसरी : नवरत्नांचें ।। ६५

बौलिया भवंतें अवधारी : इंद्रनीळांचे खांब अतीं कुसरी
तळीं तोळंबे मांडीले च्याऱ्ही : पद्मरागाचे ।। ६६

उथाळीं हीरकनें परोजांचि : मदळसा कांमवीली पांचिची
वरीं चौकटी देखा हीरेयांचो : सोभे अतोमानें ।। ६७

चहुं खांबावरीं च्याऱ्ही : मानिकांचे कळस केले कुसरी
मधीं पांचवा कळसु झळके वरीं : चिंतामनीचा ।। ६८

मधि मानिकांचा वोटा सोभे अती :
पाठीसि चितामनिचीया पांचमुर्ति
व्रह्म विष्णु हर रवि शशीं निगुती : आकारीले± ॥ ६९

तेथें नव्हां खणांचें सीहासन :
वीश्वकर्मेनीं कुसरी राचिलें अनुपम जान
तयावरीं होइल आसन : श्रीकृष्ण रुक्मीणिसीं ॥ ७०

मग श्रृष्टीकर्तेन आपन : वइ[1] आणौनि मांडीला[2] जान
तें अनुपम्यें तीयेसीं उपमा कवन : देवो जाने ॥ ७१

चितामणि कांमउनियां कुसरी : तयाचिया उतरडी घडीलीया च्यान्ही
नव नव भांडी अवधारी : येकयेकीसीं ॥ ७२

सीधरसाचें सत्व काढौणि : तेणें पांचही रंग आणिले प्रतौनि
हरीत पीत मंजीष्ट श्वेतु आणि : पांचवां कृष्णवर्नु ॥ ७३

या रंगाचेया रंगा[1] : नव्हांही भांडां लीहीलीया नवदुर्गा
तयांचे भेद उघडे जगा : सांघों नयेती ॥ ७४

आंतु भरीलीं वीचीत्रें उत्तमें फळें : वरीं कस्पतरुचे पालव कोंवळे
"वरीं वोपु सारीले सांवळे : ते कीळ फांकताति ॥"[1] ७५

तळि कनकांचे पडीघे अवधारीं : उतरडी मांडीलीया वरीं
चहुं खांबेसि च्यान्ही : बौलीयां भवंतीया ॥ ७६

आणीक मंडपीं असे बहु कुसरी : ते सांघतां कथा चालेंल वीस्तारीं
असो तेथ केळवली नोवरी : भीमतनया ॥ ७७

आतां नोवरा रावो मुरारी : केळावीताति नानापरीं
मीळौनि रुषीभार्या अवधारी : आणि सुरगणां[1] ॥ ७८

हळदी सोभे श्रीसारंगपाणि : "लवन पडीलें सुरंगणि"[2]
डाउकांकन श्रीकृष्णां लागौनि : वाइलें चतुराननें ॥ ७९

याचिपरीं केळवली नोवरी : नाना उपचारीं भीमकुमरी
आतां कैसा प्रनु येतांये रावो मुरारी : भीमतनयासीं ।। ८०

तवं वरुमुळाची आइती : करीतांये भीमनृपती
दांडीया डोळीयां नारी बहुतीं : बैसलीया ।। ८१

तयांचा करीं कनक परीयेळ दीधलें : मधीं रत्नदीप उजळीले
फळीं पुश्वीं वीस्तारीलें : आणि कुंकुमआक्षेतीं ।। ८२

तयावरीं कनकदंडें ढळती : पुढां वीप्र मंत्रोच्चारु करीति
आणि सवें बंदीजन पवाडे वाखाणीति : श्रीसर्वेश्वरा रायाचे ।।

"आणि गुढर घातले कुंजरा : घोडेया मीर्वेत्याति पाखरा
तेयावरी राने राय अवधारा : आरुढले" ± ।। ८४

तयावरीं सांतोया मोरवती : आणि कनकदंडे चंवरें ढळती
सुसुहांवीं मंगळवाद्यें वाजती : शंख नीसांन भेरी ।। ८५

ऐसें वरमुळ नीगालें गजरीं : मंगळवाद्यें[1] मंत्रोपचारी[2]
प्रवेसले देवाचा राज्यमंदीरी : राय रानें सोवासीनिं ।। ८६

मग रायें उग्रसेनें : तया बैसों घातलिं दीव्यांसनें
मुंडें गादीया चाउरीया जाली आसनें : समस्तांसीं ।। ८७

मग तेहीं आदरें सन्मानें : टीळे लावीले चंदनें
आणि उचलणि केली तयां कारणें : फळीं पुष्पीं तांबोळिं ।।८८

मग न्हानें करीतातो राया मुरारी : वीप्रांचा वेदध्वनि मंत्रोचारीं
मंगळवाद्यांचा गजरीं : नारी चतुर्विधा ।। ८९

येकी आपुला श्वहस्तीं : देवाचे चरण उटीती
तेणें स्पर्शें आनंद प्रकटती : कांमीनि जनां ।। ९०

तो दृष्टीं पाहातां देवो : होतांये अमृताचा वरुषावो[1]
म्हणौनि येकीमेकी आड रीगौनिं श्रीकृष्णरावो:नारी पाहाताति।

येकी श्रीकृष्णांलागौनि : आळिंगनें चिंतीताति मनि
येकी तटस्ता होउनि : वीसरलीया आपणपं[१] ॥ ९२

कैसी सांघों तया देवाचीं वेधशक्ती :
जे आवयेविं हातु पडती तेथेंचि राहाती
नारी व्यापारु वीसरलीया चौंति : भरला श्रीकृष्णरावो ॥ ९३

ऐसीया वेधलीया देखौनि सुंदरा : मग गर्गु± आला सामोरा
तो म्हणें वेगु वो वेगु करा : आली लग्न वेळा ॥ ९४

मग पुर्नं[१] कळसु ढाळीले नारी : येकी वोंवाळीताति रावो मुरारी
देवें पीतांबरु वेढीला झडकरीं : तवं आणीले आळंकारु ॥ ९५

मग श्रृंगारु करुनि मुरारी : करीं कांकन बाशींग सीरीं
कंठीं डाउ कौस्तभु+ वरीं : मीरवतुसे ॥ ९६

सोभे बासिंगावरीं मुगटु[१] थोरु : अनर्घाचा परीकरु
मकरकुंडलें करीताति बिरारु : सुर्ये बींबेंसि ॥ ९७

मीरवे येकावळी वैजयंती : हातसर बाहीवट सोभती
आंगुळीया मुद्रीका उधांता : नवरत्नांचिया ॥ ९८

वीर कांकन तुळबंधीया : रत्नें क्षेवनिलिं तया
भुजेवरीं मीरवे देवराया : आदि पुरुषाचिये ॥ ९९

चरणि तोडरु वांकी बोब्राटी[१] : सर्वांगीं हरीचदनाची उटी
मळीवटु रेखिला लल्हाटीं : सोभे हरीचंदनाचा ॥ १००

श्रीमुखि सुरंग तांब्रोळ : नेत्र सुप्रसन्न वीशाळ
ऐसें तें श्रीमुख पातां जन सकळ : जाले आनंदमये ॥ १०१

आणि वस्त्रें वेढीलिं हेमवर्णें : बरवीं दीव्यपुष्पांची अळंकरणें
तियें उत्तमें अती सगुणें : निरोपमें सोभताति ॥ १०२

ऐसा श्रृंघारु करुनि श्रीअनंतु : उभे ठेले उध्दवदेवाचा धरुनि हातु
जनां आनंदु होतांये अद्‌भुतु : देवो अवलोकितां ॥ १०३

ऐंसी तयाचिया[१] लावन्यां नाहिं मीती :
आणि तया उपमा देतां न दीसे क्षीती
म्हणौनि श्रृती नेति नेति : म्हणताती ॥ १०४

मग कुंजरु गुढरौनि आणिला कोडें : जो ऐरावतीतें जीनें होडें
तयाचिया श्रृंघाराचा उजीयेडु पडे : गगन मंडळासि ॥ १०५

गुढरु क्षेवनिला नवरत्नि : हीरे झळकताति दर्शनि
सोंडेसि मीरवे गवसनि : मुक्ताफळांचि ॥ १०६

पाइं कडीं नेपुरें± घवघवीती : आणि घणघणां माहाघंटा वाजती
जैसीया श्रृती पवाडे पढती : आदिपुरुषाचे ॥ १०७

माणिकांचा झळंवु कुंभस्थळावरीं : माहावंतु[१] विश्वकर्मा बैसला वरीं
कनकांचा अंकुशु तयाचा करीं : मीरवे रत्नखचीतु ॥ १०८

जैसें सुर्येबींब आकारलें कुसरीं : तैसा पंजरु मीरवे वरीं
ध्वजा फरारे झळकती अंबरीं : जैंसि कीर्नें फांकताती ॥ १०९

तयावरीं आरुढला रावो मुरारी : मागां करौली सुभद्रा सोहदरी
कैसा कळसु मीरवे तीयेचा सीरीं : चिंतामणिचा ॥ ११०

तो भरीयेला सत्राविंयेचा जळिं : वरी कल्पतरुची पालवी कोंवळी
आणि वोटी△ भरीली मुक्ताफाळिं : देवो आर्चावया ॥ १११

वरीं "सोभे छत्र"± श्रीगीरीं : कनकदंडें ढळतो वरीं
विंजणें जांणवीताती नाना परीं : श्रीसर्वेश्वरासि ॥ ११२

आणि गजावरीं आरुढावया हेंची कारण :
जें समस्तां होआवया दरुशन
आवघे जन आनंदपुर्न : करावेया ॥ ११३

तुरंगमांवरीं करुनि[१] आरोहण : सवे चालीलें यादव सैंन्य
भवंते दाटले रुशी मनि जन : पढती मंगळ उच्चार ॥ ११४

नंदु वसुदेवो उग्रसेनु : बळीभद्र अक्रुरु अर्जुनु
ते तुरंगमांवरीं आरुढौनु : सर्वे चालताती ॥ ११५

ऐसे हे आंगाजवळि चालती : पुढां वारावया उचीतिं
चालताये आपुन मंत्रियांपति[१] : श्री उधवदेवो ॥ ११६

पुढां नृत्ये करीताती अष्टनायेका : आणि गायेन नारद तुंबर आइका
येरां कळावंता अन्येंकां : संख्या नाहिं ॥ ११७

वीप्र करीताति मंत्रोचारु : भाट वानिताति पवाडे आपारु[१]
मंगळवाद्यांचे गजरु : देव पुष्पीं वरीसताति ॥ ११८

वोंवाळणीयां वरीषताति नृपवर : तें वरीचावरीं झेलीताति द्विजवर
कळावंतांवरीं पासाये आपार : पडताति नवरत्नांचे ॥ ११९

बाळा प्रौढा चतुर्विधा नारी : धवळिं गाताति रावो मुरारी
कनक परीयेळ आरतीया घेउन करीं:चालीताति श्रीकृष्णांपुढें ॥ १२०

ऐसा नोवरा रावो मुरारी : थीरें थीरें आले मंडपांचा द्वारीं
तेथ भीमकुमरु मंडपांवरीं : चंदनें सिंपीताति ॥ १२१

तवं यादव हांसति तयातें :
म्हणती रुक्मीयाचेया यैसें देया कां यातें
मग पासायें वारीलें तेथें : श्रीउधवदेवें ॥ १२२

तेथ पुढां नारी△ पुर्नकुंभेंसिं : सरंगणां वोंवाळिताति रुषीकेशी
आळंकारु वस्त्रें दीधलीं तयांसि : नानांवीधें ॥ १२३

येउर्णि वहुमाया सुधामती : तीया देवासि केली आरती
हरुष बहु जाला चीत्ति : वरु देखौनियां ॥ १२४

म्हणे या लावन्यां नीरुपमां : झर्नि दृष्टी होये जगजीवनां
म्हणौनिं नींबलोण करुनि लागली चरना : राणि भीमकाची ॥ १२५

ऐसा नोवरा देखौनि श्रीकृष्णदेवो : सकळ जनां जाला मोहो छावो
मग वऱ्हाडीयां मांन करीतांये रावो : भीमसेनु ॥ १२६

कैसें[१] आदरें सन्मानें : आवघेयां घातलि सीहांसनें
यापरीं बैसवीले राये राणे : रायें मंडपामाजी ।। १२७

वऱ्हाडीयांचे पाये प्रक्षाळिले वीव्हळिं :
उचलणि केली फळीं तांबोळिं
मग देवा लागौनि आइती केली : मधुपर्काची ।। १२८

पदक कुंडलें मुगुट हार : वांकी तोडरु सांकळें हातसर
वीर कांकणें मुद्रीका आनेक आळंकार : आनि दीव्यांबरें ।।१२९

ऐसे श्रृंगारीले श्रीसारंगपाणि : तया रुपासि उपमा द्यावी कवणि
कोडी येकी मदन वोंवाळौणिं : सांडिजेति ± श्रीकृष्णांवरुनियां

ऐसा मधुपर्कु वीचीत्रांपरीं : भीमकें पुजीला रावो मुरारी
मग म्हण जि बीजें कीजे भीतरीं : गौरीहरासिं ।। १३१

मग गर्गाचा धरुनियां करु : सरीसा नंदु वसुदेवो बळीभद्र वीरु
यैसे उधवदेवें अर्जुनेंसि सर्वेश्वरु : आले गौरीहरा ।। १३२

ऐसे देवो आले गौरीहरीं : तेथ नवरत्नांचेया पाटेवरीं
उपवीष्ट जाले रावो मुरारी : जवळिं उधवदेवो ।। १३३

आणि तेथ कवणिं कवणिं सोवासीनि :
सावीत्रि उमा कमळजा[१] जांनैं
आणि अनुसया अत्रीची रानि : उभीया हातिवेसीं ± ।। १३४

वीष्णु आणि वज्रपाणि : दोघे उभे असती अंतरपटु धरुनीं
पुढां असे देवी रुक्मीनी : करीं माळ घेउनियां ।। १३५

मग गजबज[१] वारीली तीयेवेळीं : वचीष्टें[२] येउनियां जवळिं
म्हणें दतचीतु द्या कां सकळै : लग्नसमो वर्ततांये ।। १३६

घडीये जवळिं गर्गाचार्ये आपुण : म्हेशु म्हणे सावधांण
मग वोपन्यां[१] म्हणितला जाण : तेणें चतुराननें ।। १३७

मग जवनीक फीटली : देवा भक्तां सवंदृष्टी जाली
रुक्मीनी सप्रेमें माळ घातली : श्रीकृष्णरायांसि ॥ १३८

देवें दुदंभी वाइलीया अंबरीं : कनकपुष्पीं वरुसताती वरीं
मंगळवाद्यीं जये जयेकारीं : सुहावीं प्रवर्तलीं ॥ १३९

ऐसे तेथ हरी हर ब्रम्हांदीकि मीळौनि :
सेश (स) भरीले[१] श्रीकृष्णा रुक्मीनी
शेषु आपण सहश्रवदर्णि : वेदुघोषु करीतांये ॥ १४०

वीप्र मंत्रोच्चारु करीताति : अपसरा प्रवर्तलीया नृतिं
भाटु पवाडे पढताति : लागले नीसांन भेरी ॥ १४१

तेथ वोंवाळीताति सुरंगणा : आक्षेवणें करौनि लागती चरणां
ऐसा तो देखौनियां यादवराणा : जालीया आनंदभरीता ॥

तीया वोंवाळितातितिदेवोरायातें : कर न येती मागौते
आलिंगनांचेनि स्वार्थे : श्रीकृष्णरायावरीं ॥ १४३

तेथ लज्जा आपुन येउन : बखलीतांये आड रीगौन
परी मन चोरटें गेलें वावरौन : तें धरेचि ना ॥ १४४

तेथ वोंवाळणिचेनि मोसें : येरी आड येरी रीगती असे
श्रीकृष्णचरणां लागताति मीसें : करुनि आक्षेवनाचीं ± ॥

ऐसिं प्रेमपीसिं जालिं : अंत:करनें वेडावलिं
आपपरु वीसरलिं : देवो देखौनियां ॥ १४६

ऐसें लग्न लागलेयांवरीं : भीमका थोर सुख जालें अंतरीं
मग हरुषें कन्यादांन करी : श्रीकृष्णरायासि ॥ १४७

कैसें तया भीमकाचें सदैवपण : जयाचें देवो अंगीकरी कन्यादाण
तयाचेयां दैवां प्रमांण : कवण जाणें ॥ १४८

मग भीमकु म्हणे हरी : माझें कन्यारत्न अंगीकरीं
आजि मनोर्थ सोधी मुरारी : जाली मज ॥ १४९

मग नंदु वसुदेवो उग्रसेनु येउनि : सर्वे वीप्र रुषी सोवासीनि
आळंकार वस्त्रें रुक्मीनीं : आणियेलिं ॥ १५०

नेपुरें आंदु बाहेवटें[१] दसांगुळें : कांकणें कळावींया मुद्रीका सरळें
तुळबंधोया पदक सरी मुक्ताफळें : हार वीचित्रांपरोचे ॥ १५१

चिंताकु चौसरा ब्रेगचांपे येकावळी : झाली भंवंरीया फुलें चांपेकळी
नाग फनियां नंदी ± मोतीयांचीं जाळी : सिसफुलें भांगटीळा ॥

मुक्ताफळ दांडा फरा : आणि वांकी तोडरु अवधारा
ऐसें येरां वीचीत्रां अळंकारा : लेखा नाहीं ॥ १५३

आनि दीव्यांबरें वर्णु कवणु जाणें : ऐसें सातां आंगाचें लेणें
पेरीयेळीं वीस्तारालें[१] उग्रसेणें : लावीलें रुक्मीनि हातीं ॥ १५४

मग पालवां गांठी घालौनि : आंगुळीये देवो धरीला रुक्मीनीं
ऐसे झडकरीं आले श्रीसारंगपानि : होमां जवळीं ॥ १५५

तेथ मंत्रयुक्ति[१] वहीलीं : देवें होम[२] येग्न[२] वीधी[३] सारीली
मग ब्राम्हणिं[४] वीनवनिं केली : श्रीसर्वेश्वरासीं ॥ १५६

जी आर्थे च कामे च धर्मे च स्वामिं ·
या आर्था पुरुषें स्त्री न वंचावी
देवो म्हणतो न वंचु हे रुक्मिणि देवी : केलें दधी प्रमाण ॥ १५७

तवं रुक्मीणिचे बंधु येउनियां तेथें : सुख* मागताति देवरायातें
म्हणतां सुख द्यावें जी आमतें : श्रीयादवेश्वरा ॥ १५८

तवं तेथ "बळभद्र देवो" ± बोलीले :
म्हणतो वीचारा तुम्ही सुखीये भले
आम्हीं सुख दीधलें रुक्मीसीं भलें : पानिवठां कौडन्यांचा ॥ १५९

तुम्ही पुसा तयातें : जरीं तो म्हनैल नाहिं दीधलें मातें
तरी आकरगुणें देउनु± तुमतें : हें सत्ये जानां ॥ १६०

ऐसेया वीनोदावरीं : उधवदेवों तयातें पासाये वारी
द्रव्यें आळंकार दीव्यांबरीं : सुखिये केले ॥ १६१

आणि सैंग रणांवट पुर्नसंगमा वेऱ्हीं : सांजा वींझा जीतुकें वसे भीतरीं
तीतुकें सुखीयांसीं मुरारी : देववीलें सुख ॥ १६२

मग सभा पुजीली उग्रसेनें राये : जो जें मागे तें तयासि दीधले दाये
रुषी मुनि देवातें पुजीतांये : वोचे त्रांपरीं ॥ १६३

मग मांडीलें पाणिग्रहण : तेथ भीमकु बोलीला आंदण
मग वहुवरां जालें आसण : बौलयावरीं ॥ १६४

कैसी दैवाची ते रुक्मीनि : परब्रम्हेंसि गांठी घालौनि
बैसली देवाचा येकासनि : पावलो समीपता ॥ १६५

आइका जो देवो दुर्लभ् ब्रम्हांदीकां : तो आफाउनी नीमीक्षां येकां
करें करु धरुनि नायेका : खेळ मांडीला असे ॥ १६६

असो हें रायें वरमाया केलि मुळें : पायेघडीयालागी ठेवीले पाटोळे
सडे△ संमार्जनें चौकु मुक्ताफळें : भरीले राजबीदिं ॥ १६७

पुढां देवकी येसोदा पाहे : मागां रोहीणि सापत्नमायें
तयासि घडीयांवरीं देतां पाये : आणितांये मंडपासिं ॥ १६८

तयावरीं श्रीगीरी चवंरें ढळताति : वीप्र वेदध्वनि भाट पवाडे पढती
आणि ठाइं ठाइं धवळीं गाताति : नारद तुंबरादीक ॥ १६९

आणि मंगळवाद्यें वाजती गहीवरें : ढोल निसांन शंख भेरी पहुरे
ऐसें नानापरीं सोहळे होताति गजरें : वरमायासि ॥ १७०

आणि वरमाया सोहळें करी सुधामति :
कुंकुमें पाये रावीले आपुला हातीं
घडीयावरीं रत्नें ठेवीतो : उग्रसेनु रावो ॥ १७१

यापरीं वरमाया कौतुकें : वोजें आणिलीया रायें भीमकें
मग वोघमांनु[१] दोधले तया असीकें[२] : तयांचे तयासि ॥ १७२

मग वहुवरां जवळि तयां : दीव्यांसनें घातली बैसावया +
तीया विल्हळीं सामोरीया आलीया : तवं देखिलें वहुवरु ॥

तेथ बौलेयावरीं सीहांसनि : उपवीष्ट नोवरा सारंगपानी
वामें नोवरी रुक्मीनी : लावन्येनिद्धि ॥ १७४

तो आदिपुरुषु लावन्याचा गाभा :
रुक्मीनी आदिशक्ति लावन्यें प्रभा
तया दोघांचि देखोनि शोभा : वेधलें त्रीभुवन ॥ १७५

तो सर्वज्ञु मुर्त जाला क्षीती :
ते पराशक्ति वीत्पती जाली वीग्रहवंती
जीवांची फेडावया भ्रांती : संयोगें अवतर्लि ॥ १७६

ते संचरौनि जीवांचें फेडी अज्ञानपडळ[१] :
तो आपुलें स्वरुपसुख दे केवळ
म्हणौनि तें माहीयेर सकळ : जीवजातांचें ॥ १७७

तो करुणांकरु ते करुणा : तो कृपासागरु ते कृपा जाणा
यैसी ते त्रेगळीक दोघांजनां : देखिजेंनां ॥ १७८

तो जगद्वंद्यु ते जगद्वंद्या : तो परब्रम्ह ते ब्रम्हवीद्या
एंसे तया दोघांचेया संवादा : कहिं वीसंवादु नाहिं ॥ १७९

तो नीरोपमु तीसि नाहिं उपमा : आणि पातां ते देह तो परमात्मा
यैसि येक्ये होउनि चहुं भुतग्रामां : तें उधरीताति ॥ १८०

ऐसी घेउनि मनुस्येवेषांचि बुंधि :
नीराकारु[१] स्वयें* साकारत्वें क्रिडा करीति[२]
तें देखौनि ज्ञांनीयेभक्त वीस्मो पावति : श्रीउध्दवार्जुनादिक ॥

ऐसीया वहुवरातें कवनु जाणे वर्नु : वर्नितां सिनला सहश्रवदनु
आणि श्रृती नेति नेती म्हणौनु : परतलीया ॥ १८२

ऐसें तें सुंदर वहुवर जाणा : रुक्मीनि श्रीकृष्णराणा
बौलेयावरीं उपवीष्ठ दीव्य सीहांसणां : वरीं दोघें' ॥ १८३

तो देवो इद्रंनीळाचा△ पुतळा :
ते भीमकी चांपेगौर कळा
तया दोघांचेया रुपाचो फांकते कीळा : तेनें सभा उजळली ॥१८४

'ऐसेयां वहुवरावरीं जाणा : चवरें ढाळीताति सुरपति+ जाणां
पवनु जाणवीतांये विंजणां : देवरायासिं ॥ १८५

साही रीतु भार्यासहीतु : आपुण येउनि माळी वसंतु
तो देवालागी आळंकार असे गुंफीतु : पुष्पांचे सभेमाजि ॥१८६

वोळगावया श्रीअनंतु × श्रीरंगु : तेथ उभा असे रतीकांतु आनंगु
शृगारु द्यावया चांगु : श्रीयादवरायासिं ॥ १८७

आणि उदधीपति' अवधारी : तो वरुण श्रीकृष्णाचा कन्हेरी
कर्पुरोदकांचा कळसु घेउनि करीं : उभा असे देवाजवळीं ॥

द्रव्याचा ± निद्धि घेउनि करीं : जवळि उभा असे कुबीरु भांडारी
वेचुकरावेया अवधारी : सभेमाजि ॥ १८९

वोळगावया रावो मुरारी : आपण इंद्र आला अवधारी
तो हडपु घेउनियां करीं : उभा देवा जवळीं ॥ १९०

आणि दोवटे तीघैजन : वामें चंद्र दक्षीणें सुर्यो जांण
तीसरा सामोर आपण : वैश्वानरु ॥ १९१

वेद मीमांसा शास्त्रें पुराणें : आगम नीगम काव्यें व्याकृणें
यादवां पुढां करीताति पेखणें : मुर्ते होउनियां ॥ १९२

आइका शेष सहश्रवदनु : तो आपुन जाला बंदिजनु
वाखाणितांये देवालागौनु : सहश्रवदनिं ॥ १९३

नारद तुंब्रर सरश्वती जाणां : कमळ श्वतरु ± गंधर्वगणां
हे घवळि गाताति यादवराणां : जवळि बैसौनियां ॥ १९४

ऐसें तें सुंदर वहुवर जाणा : रुक्मीनि श्रीकृष्णराणा
बोलेयावरीं उपवीष्ठ दीव्य सीहासणां : वरीं दोघैं' ॥ १८३

तो देवो इद्रंनीळाचा△ पुतळा :
ते भीमकी चांपेगौर कळा
तया दोघांचेया रुपाचो फांकते कोळा : तेनें सभा उजळलो ॥१८४

ऐसेयां वहुवरावरीं जाणा : चवरें ढाळीताति सुरपति+ जाणां
पवनु जाणवीतांये विंजणां : देवरायासि ॥ १८५

साही रीतु भार्यासहीतु : आपुण येउनि माळी वसंतु
तो देवालागी आळंकार असे गुंफीतु : पुष्पांचे सभेमाजि ॥१८६

वोळगावया श्रीअनंतु× श्रीरंगु : तेथ उभा असे रतीकांतु आनंगु
शृगारु द्यावया चांगु : श्रीयादवरायासि ॥ १८७

आणि उदधीपति' अवधारी : तो वरुण श्रीकृष्णाचा कऱ्हेरी
कर्पुरोदकांचा कळसु घेउनि करीं : उभा असे देवाजवळीं ॥

द्रव्याचा± निद्धि घेउनि करीं : जवळि उभा असे कुबीरु भांडारी
वेचुकरावेया अवधारी : सभेमाजि ॥ १८९

वोळगावया रावो मुरारी : आपण इंद्र आला अवधारी
तो हडपु घेउनियां करीं : उभा देवा जवळीं ॥ १९०

आणि दीवटे तीघैजन : वामें चंद्र दक्षीणें सुर्यो जांण
तीसरा सामोर आपण : वैश्वानरु ॥ १९१

वेद मीमांसा शास्त्रें पुराणें : आगम नीगम काव्यें व्याकणें
यादवां पुढां करीताति पेखणें : मुर्ते होउनियां ॥ १९२

आइका शेष सहश्रवदनु : तो आपुन जाला बंदिजनु
वाखाणितांये देवालागौनु : सहश्रवदनि ॥ १९३

नारद तुंबर सरश्वती जाणां : कमळ श्वतरु± गंधर्वगणां
हे घवळि गाताति यादवराणां : जवळि बैसौनियां ॥ १९४

उमा सावीत्री "रानादेवी जानै"* : आनसुया पतिव्रता सीरोमणि
रुषी भार्या सुरंगणा मीळौनि : वोवाळितातिं वहुवरातें ॥ १९५

तेथ उधवदेवो भक्तसीरोमणि : जीवें वोवाळितांयें श्रीकृष्ण रुक्मीनी
ऐसे वहुवर देखौनि : वरमाया हरुषु जाला ॥ १९६

मग रोहीणि येसोदा देवकी : सामोरीया येउनि कौतुकीं
जीवें वोवाळितांये श्रीकृष्ण भींमकी : चरणां लागलीया ॥

दीव्यांबरीं आनर्घ्यं रत्नीं : वहुवर वोंवाळीलें तीघिजणि
मग बैसलीया दीव्या[१] सीहांसनि[१] : वहुवरा जवांळ ॥ १९८

मग रायें ताटें केलि समस्तां :
सीरां आसनि आसन जालें श्रीआनंता
रुषी मुनि यादवां समस्तां : देतांये आरोगना ॥ १९९

लहियें[१] पहियें[२] चोखें[३] भक्षनें[३] : उत्तमे[४] आष्टदश पक्वांन्नें
वीचित्रें पन्हि कालनें : शाखा अंतु नाहिं ॥ २००

ताटाप्रति देव्हडीया : उजळीलिया ठांनदीवीया
आणि ठाइं ठाइं नारी उभीया : कर्पुरोदकेंसीं ॥ २०१

आणि तैसेचि उभे असती स्वरु : पक्वानेंसिं पातांति अवश्वरु
जया पाकावरीं पडेति करु : तेंचि वाढितातिं ॥ २०२

ऐसी पंक्तिची वोडव देखौनि : राये राणें संतोषले मनिं
तवं स्वारीं रत्नदीप उजळौनि : आले पंक्ति वोंवाळुं ॥ २०३

तेहिं आरतिया निंबलोणें : केलिं देवा कारणे
वोंवाळिलें देवो* रुषी मुणिजणें[१] : यादवां सहित ॥ २०४

तवं तेणें रायें उग्रसेणें : आळंकार वस्त्रें दीधलिं स्वाराकारणें
मग भीमकु नमस्करुनि म्हणे : जी जि देवा "आरोगना कीजो"*

मग सकळांसि देवें दीधली आज्ञा : रुक्मीनी सहितु श्रीकृष्णराणा
दोघै येकि ताटिं करीतातिं आरोगणां : येकि ठांइं ॥ २०६

ऐसें वहुवरां जेवण येकी ठांइं : हें वीचित्र नवल पाहिं
जयाचें उचिष्ट ब्रंम्हादीकां नाहिं : तया येक्येत्व केवी जोडे ॥

परीं कवण दैवं केलें रुक्मीनी : नेणिजे पुर्विल करणिं
जें परब्रंम्ह गृहस्त धर्मि : वर्ते जीयेंसि ॥ २०८

ऐसें रुक्मीनि सहीतु श्रीकृष्णराणा : रुचि करीताति आरोगणा
तेथ प्रसादु मागताति जाणा : उधवा अर्जुनादीक ॥ २०९

तवं भीमकु येउनि निडां' : म्हणे जी मि देवाचा ताटकाढा
म्हणौनि कर जोडुनि पुढां : मागतो प्रसादु दांन ॥ २१०

ऐसी देवासिं जाली श्रीमंत आरोगणा :
पांति प्रसादु जाला उधवार्जुणां
ताट घेउनि भीमकुराणा : सीरीं वंदीतांये ॥ २११

म्हणें जे दुर्लभ ब्रम्हादीकां : तें आजि मज जोडलें भीमका
मजपर्स्यें दैवाचा या त्रैलोक्या : माजि नाहि दुसरा ॥ २१२

असो हें सुपरिमळ± जळ आणिलें :
देवें कर प्रक्षाळौनि उदक स्वीकरीलें
मग चंदन दीधलें : तेणें उलळीलें[१] कर ॥ २१३

मग सकर्पुरें वीडा जाला वहुवरां : रुषी मुनि यादवां वीरां
मग सीहांसनांवरीं दातारा : आसन जाले ॥ २१४

तेथ कळावंतें पात्रें वीचीत्रापरीं : रीझवीताति राया मुरारी
तयासि पासावो देउनियां अवधारी : मग आले जानवसेया ॥

रात्रि प्रकाळलीया उपरीं : प्रातःकाळीं राया मुरारी
मंगळवाद्यांचा गजरीं : उपहुडु जाला ॥ २१६

मग मर्दनां मादनें△ सारीलें : सर्व श्रींगारु लेइले
मग वौलेयासिं बीजें केलें : सकळ परीवारेंसीं ॥ २१७

तेथ बौलां अवधारी : रुक्मीनि सहीतु रावो मुरारी
दीव्या सीहासनावरीं : उपवीष्ट जाले ॥ २१८

तेथ ब्रम्हादीक देव सुरगण : यादव वीप्र रुषी मुणिजण
ऐसी सभा बौलेया जवळि[१] जाण : घनंदाटली ॥ २१९

तेथ आपसरा नृत्ये करीती : वीचित्रें गायेनें मांडीलि कळावंतीं
भाट पवाडे पढताति : आदिपुरुषाचे ॥ २२०

लागलि मंगळवाद्यें वाधावणि : सख भेरी निशांन जानें
सरस्वति नारद मुनि : धवळि गाताति देवा ॥ २२१

सुरंगणा करोति आक्षेवनि : आरतिया निंबलोनें वहुवरा लागौनि
देवकी येसोदा वोंवाळिति आनर्घा रत्नि : तया वहुवरातें ॥

कोडें वीडीया तोडवीति : आणि गुळभेलिया चाखवीति
कौतुकें लोणें वांटविति : तयां वहुवरां करवि ॥ २२३

यैसा वीचित्रु खेळु जाला वहुवरांसि : मग रायें तीसरां दीसि
आइति केली रासेसि : पुजावया देवकादेवो ॥ २२४

झाडौनि चौबारीं राजबीदि : कुंकुमाचा सडा घातला मध्यीं
रगडौनि मुक्ताफळे आविधि[१] : चौकु भरीले ॥ २२५

तेथ मखरें तवंगें उभारौनि : ध्वजा फरारे मीरवति गगनि
ठाइं[१] ठाइं[१] नाचणि : नृत्ये करीताति ॥ २२६

मध्यें कापुरकेळिचे खांब : उभीले च्यान्ही माहाप्रचंड लांब
वरीं ध्वजा फरारे भवंते झळंब : सोभताति[१] ॥ २२७

ते कापडीले दीव्यांबरीं : चांदोवा बांधला वरीं
तळियां तोरणें भरीलि चहुंफेरीं : सोभताति अतिमांनें ॥ २२८

मधि मांडीलि दीव्ये सीहासनें : मुडे△ गादिया अळंकार लेणें
कंचोळि भरुनि कापुर कस्तुरी चंदनें : ठेविलीं मध्ये ॥ २२९

भवंते चौक भरीले मुक्ताफळिं : कळसु मांडीले भरुनीं गंगाजळिं
मग मुळें केलिं वील्हळि : वरुमायासिं ॥ २३०

भीमकांचि राणि पढीयेति[१] : जे रुग्मीनीची माता सुधामति
ते सखिया घेउनिं बहुतीं : नीघाली वरुमाया मुळ ॥ २३१

पुढां नृत्ये करीताति आपसरा : ब्राम्हणांचे वेदध्वनि मंत्रोच्चार
मंगळवाद्यांचे गजर : आकाश गर्जे ॥ २३२

ऐसी सुधामती मंगळवाद्यांचा[१] गजरीं : आलि जानवसया भीतरीं
सोहळे करीतांये नानापरीं : वरमायासिं ॥ २३३

तयांचे कुंकुमें रावीले[१] पाये : कस्तुरीया मळीवटु रेखितांये
लेंणि लुगडीं वातांये : नानापरींचि ॥ २३४

यापरीं तीघीं लागौनि : पुष्पां फळीं तांबोळिं करुनि उचलणि
वरमाया येसोदा देवका रोहीनि : माता रामकृष्णांचिया ॥

जानवसेया पासौनि रासेवरींया : मांडीलीया पाटाउंवांचिया घडीया
वरमाया पाये ठेवावया : चालतां राजबीदीं ॥ २३६

तीया घडीयावरीं पाये ठेवीति : वरमाया चालीलीया हंसागतीं
तयासवें यादवांचि अंतापुरें चालती : सहश्र साटि ॥ २३७

पुढां नृत्ये करीताति नाचणिं : धवळिं गाताति माहामुनि
मंगळवादिं नीसांनिं : आकास कोंडे ॥ २३८

ब्राम्हण करीताति वेदध्वनि : मंगळ उचारु पढताति रुषी मुनि
यापरीं वरमाया तीघीजनि : चालतो घडीयावरीं ॥ २३९

यापरीं वील्हाळीं नानापरीं : वरमाया आणिलीया[१] रासे भीतरीं
तेथ दीव्ये सीहांसनांवरीं : बैसवीलिया ॥ २४०

तयाचे पाये रावीले कुंकुमें : वाइलिं दीव्यांबरें उत्तमें
खोंपे भरीले[१] कुशुमे : पार्यातकांचे ॥ २४१

"तीया आर्चिलिया" ± चोखां तांदुळि : आणि आनर्घा मुक्ताफळीं
मग करुनि पुष्पांजुळि : रत्नदीपें वोवाळिलिया ।। २४२

ऐसा सोहळा करुनि रासेसि : रायें मोहोछायें तयासि
आणिलिया माहामंडपासि : बहुतें सन्नमानें ।। २४३

ऐसा वीचित्रां गतीं : सोहळा जाला श्रीपती
मग रायें मांडिली आइती : साडेयासि ।। २४४

मग उग्रसेनें झडकरीं : हांकारीले भांडारी
वस्त्रें आणवीलीं अवधारी : तया करवि ।। २४५

तेहि आणीलि वस्त्रें चांगें : दीपोंदीपिंचि अती सुरंगें
आणिली[१] उत्तमें देवांगें : श्रीकृष्ण मेचुचि ।। २४६

तें वीस्तारुनि परीयेळावरीं : आणिलि मंडपा भीतरीं
तें पातां दृष्टी तरळे अवधारीं : सहश्रकीर्नाची ।। २४७

मग चंदनाचा पाटु पासवडीला : मुक्ताफळांचा चौकु भरीला
पुढां कळसु मांडीला : आमृतें[१] भरौण ।। २४८

तेथ सांति पाटिं मगळ उच्चारीं : बैसोनि श्रीकृष्णाचि आंतौरी
रुक्मीनीसि साडे वाइले अवधारी : श्रीउधवदेविं[१] ।। २४९

ऐसे साडे जालेयांवरीं : मग भीमकें मांडीलि परी
वस्त्रें वावों आदरीलि तीय अवस्वरीं : वऱ्हाडीयां यादवांसि ।।

आणिले दीपोदीपीचे पाटोळे : ते कनक परीयेळीं वीस्तारीले
मंडपा भीतरीं ठेवीले : भीमकें रायें ।। २५१

मग आदरें सन्मानें : वरमाया घातलि दीव्ये सीहांसनें
रोहिणी येसोदे कारणें : आणि देवकीये देवीसि ।। २५२

असो हें बहुतें आदरें : वरमायांसीं वाइलि दीव्यांबरें
आणि करौलीयेसि वीचीत्रें लेनि × नागरें : सुभद्रा देवीसि ।।

मग तेणें चक्रवर्ति : गौरउ वीस्तारीला परा बहुती
नवरत्नें क्षेवणिलि तें झळकती : ऐरनि कनकांचिये ॥ २५४

साटी सहश्र अंतापुरें : यादवांचि कन्या कुमरे
तेहिं पुजीलिं भोमें नृपवरें : वीचित्रांपरीं ॥ २५५

आणि राम कृष्णां लागीं हेमवर्ने : दीव्यांबरें नाना अळंकारु भुषणें
ऐसे पूजीले रायें भीमसेणें : कुमर वसुदेवाचे ॥ २५६

उग्रसेनु देवकु नंदु वसुदेवो : सात्वीकी आक्रुरु अर्जुनु उधवदेवो
यांसि दीव्यांबरीं पुजीतांये रावो : भीमसेनु ॥ २५७

मग रायें यादवां केलि पहिरावनि : पुजीले देवो द्वीज रुषिमुनि
भाटु कळावते पात्रें आणौनि : रावो पुजीतांये ॥ २५८

पुनरपि पुजौनियां सारंगपानि : उसंगीयें घातली रुक्मीनि
माता पीता वीनवीती कर जोडौनि : देवरायांसि ॥ २५९

जी जि आम्हीं उतराइ जालों वीउनिं :
आतां तुम्हां लागे हे रुक्मीनि
इयेचा आभारु देवा लागौनि : आम्हीं घातला असे ॥ २६०

जी हे आमचा आत्मा रुक्मीनि : आम्हीं दोघें कुडी वागउं इयेचेनि
तरी हा जीवांचा जीवनु तुम्हां लागौनि : आम्हीं वाइला देव ॥६

जरीं हे क्षेनुभरीं न देखों नयेनिं :
तरी प्रान जांवों पाहे श्रीसारंगपानि॰
आतां वरीषें लोटावि परीं कवनिं : सांघे चैतन्येंनाथा ॥ २६२

आतां ये भीमकीचा सर्वप्रकारीं : तुम्हां आभारु जी मुरारी
जी जि इयेंचि आम्हीं मावेंचि सोयेरीं : देवा नीजाचा तुं ॥

ऐसे दोघै कर जोडौनि : लागलिं देवांचा चरणिं
ते संबोखिलिं श्रीसारंगपाणि : म्हणती न करावी चिंता ॥

मग देवकी येसोदा रोहीणि : नंदु वसुदेवो उग्रसेनु देवकु ± बैसौनि
या सातांचा उसंगां घातली रुक्मीणि : भोमकरायें ।। २६५

मग तेहिं[1] पाये वंदीले सीरीं : म्हणती माये तुं आमची कुळेश्वरी
आम्हीं तुझा येउनि[2] उदरीं : स्तनपान करावेंया ।। २६६

देवी तुं आणि सारंगपाणि : आमचा जीवाचा जीवनु जाणै
आम्हीं आपुला जोउ वोवाळौनि सांडौणिं : तुम्हां वरुनी ।।

ऐसें आर्चोनीं अभीवंदौनि चीत्ति : पायां लागती "पुडती पुडती"△
वरमाया हरुष बहु चीतिं : वहुवरु देखौनियां ।। २६८

ऐसें श्रीकृष्णां रुक्मीनि सहीत : भीमकें वऱ्हाड पुजीलें समस्त
मग रायें पंक्ति केली त्वरीत : वऱ्हाडीयां यादवांसि ।। २६९

कैसें परीयेळ काढीलें कनकाचें : रत्न खचित बतीसां आडवाटीयांचे
तेथ वीचीत्र पाक कुसरीचे : वोगरीताति ।। २७०

स्वार आणौनि देताति आन्नें : बाळा वोगरीताति अनुक्रमें
तेथ वोचीत्र पाक शाखा कालनें ± : संक्षा कवन करी ।। २७१

ऐसीं ताटें वीस्तारीलिं निगुतीं : मग रायें देवासि केली वीनती
जी जि स्वामि बोजें करावें पंक्ति : आरोगणें ।। २७२

मग रुषी मुनि देवासहीतु : यादवां पांडवां समवेतु
पंक्ति उपवीष्ट जाले श्रीआनंतु : रुक्मीनि सहीत ।। २७३

असो हें निंब लोण करुनि : भीमकु लागला चरणिं
तो म्हणे आरोगीजोजी△ श्रीचक्रपाणि : देवदेवा ।। २७४

ऐसा रुक्मीनी सहीतु श्रीकृष्णराणा : करीताति आरोगणा
तो आवश्वरु सहश्रवदना : शेषा वर्नवेना ।। २७५

स्वार वाढीताति वीचीत्रें आंन्नें : जें जया रुचे ते तया कारणें
ऐसें पंक्ति जेवीताति राणे : देवरायाचिये ।। २७६

तेथ उधव अर्जुन नारदु : भीमकेंसि करीताति वीनोदु
तयांसि खुणांवीतांय गोविंदु : हास्यें करीतु असे ॥ २७७

ऐंसि वीनोदेंसि सपरीवारीं : आरोगणा जालि राया मुरारी
मग सुपरीमळ जळें अवधारी : गुळळा* केला ॥ २७८

मग वीडे जाले सकर्पुरीं : यादवांसहीत सपरीवारीं
तवं उग्रसेनेंसि अवधारी : भीमकु बोलीला कैसें ॥ २७९

म्हणें आइकै राया उग्रसेना : ये कुमरीचेनि प्रसादें जाणा
मज सोइरा जोडला राणा : श्रीकृष्णरावो ॥ २८०

जो न पवीजे तीर्थें व्रते क्षेत्रदानें : यज्ञें जपें तपें अनुष्ठानें
तो रुक्मीनिचेनि [१] प्रसादें मजकारणें : जोडला देवो ॥ २८१

मज कुमरी जाली आदीलक्ष्मी पाहि :
देवादिदेवो आदिपुरुष जांवांइ
उग्रसेना तुम्हीं नंदु वसुदेवो वीव्हाइ : आजि जोडलेति मज ॥२८२

आइका इश्वर परायेण समर्थ[१] : हे उधवार्जुनादीक महंत
हेही जोडले मज समस्त : यादव छपन कोडी ॥ २८३

ऐंसे तुम्हीं समस्त आघवे : मज जोडलेति दैवें
वरीं देवासि वीनवावें बरवें : मजकारणें ॥ २८४

मग भीमकु कर जोडुनि : देवासि करीतांये वीनवणि
जी मीं आंदन देइन तें कृपा करुनि : देवें आंगीकरावें ॥ २८५

जी रुक्मीनि देवीसिं आंदन : मुख्य परीचारीका सुधामति जाण
आणि मिंहि सेवकु होउनि वर्तेन : देवाजवळीं ॥ २८६

जी माझें सपतांग [१] राज्ये आवघे : देवें आपुला हातीं* करावें
आणि मज सेवादास्ये देयावें : आपुलें देवा ॥ २८७

मीं ताटकाढा होउनि असेन देवा :
आणि करीन तुझी श्रीचरणसेवा
हें सत्ये जरी बोलें मावा : तरीं स्वामीं तुझीचि आंन ॥ २८८

तवं संतोसौनि बोले मुरारी : म्हणे तें राज्ये माझेंचि अवधारी
आतां आमचिं होतीं राणीवें करी : राया भीमका ॥ २८९

आइकै भावें आणि भक्ति : नसतेन पदार्थें मज मनोर्थं[१] आर्पिती
तेनें मिं आधिचि होयें संत्रुप्ती : भावें तयांचेनि ॥ २९०

येऱ्हवीं सदा संत्रुप्तु जो आत्मारामु :
तयां सारीखा दुसरा कैंचा कांमु
परी आवडी भावो वाढवी उत्तमु : तोचि पढिये मज ॥ २९१

म्हणौनि भावें आणि भक्ती : मी जीवां सुल्लभु भीमचक्रवती
येऱ्हवीं काइ असे जीवा संपती : ते आर्पिल [१] मज ॥ २९२

तैसा भावाचा मिं भोक्ता : हें सत्ये जांण नृपनाथा
तुझें राज्ये तें माझें न करी चिंता : आतां भोगी आमचे होतें॥

ऐसा देवांचा प्रीये वचनिं : भीमका बहुत संतोषु जाला मनी
मग लागौनि देवाचा चरणिं : आंदन देवों आदरीले ॥ २९४

रायें आंदन दीधलें आद्भुत : गृहस्त राहांटी समस्त
परीचारीका सतें सात : आणि क्षीरारं दुभतीया धेनु ॥ २९५

दीधले रथ गज घोडे : रायें आदरें बहुतें कोडें
देसु दीधला झाड [१] खंडग्राम गाढे [२] : वळिता सहीत ॥ २९६

ऐसी गजरीं बोळवीलि वरात : त्रिजगतिं जालि आनंदु भरीत
• +देव पुष्पीं आसती वरीषत : लागलि मंगळवाद्यें ॥ २९७

"तवं देवी रुक्मीनीचीया सखीया सांघातीनी :
पांचसते आंगलगा कामीनी
तीया राहीलीया रथ वेढाळोनी : देवरायाचा पैं ॥ २९८

ढळढळा आंसुवे पडती उरावरी :
त्या म्हणतीं आम्हां कां सांडीते सुंदरी
आतां हे जीवीत न धरवे नीर्धारी : भीमकीये तुजवीनें ॥ २९९

मग त्या म्हणती जी देवदेवा : ऐ भीमकीऐसी वीघड न करावा
नीत्ये संमध जी दयावा : आपुला जी तुम्ही देवा ॥ ३००

मग त्या देवी रुक्मीनीं : माथा ठेवीला श्रीचरनीं
जी जी या सखीया सांघातीनी : देवे या सवें चालवावीया ॥

जी याही करतील देवाची सेवा : हे सत्ये जाणे जी देवदेवा
सवे देवो म्हणती पांडवा : सवें चालवा यातें ॥ ३०२

ऐसे देवाचेनी वचनें : तेणें माहावीरें आर्जुनें
रथासवें चालवीली सोकासनें : पांच सत कामीनी''* ॥ ३०३

भीमकुरावो सपरीवारीं : बोळवीतु गेला जानवसेवरीं
मग तेथ सीहांसनि मुरारी : उपवीष्ट जाले ॥ ३०४

ऐसा सोहळा करुनि थोरु : मग बोले भीम नृपवरु
जी जि देवां दैवि तुं इश्वरु : जोडलासि मज ॥ ३०५

देवा आतां वीनती अवधारी : मज आज्ञा दीजे झडकरी
आणि गोसांवी द्वारकापुरीं : बीजे करावें ॥ ३०६

तवं बोलीले लक्षमींपती : म्हणें भीमका तुम्हीं पाहावी द्वारावती
तें वचन मांनिलें नृपती : वैदर्भेश्वरें ॥ ३०७

आतां भीमकेसिं रावो मुरारी : निगाला देखा सपरीवारीं
तो द्वारकेप्रती प्रवेसु झडकरी : सांघे कवी कृष्णदासा ॥ ३०८

प्रसंग तेवीसावा समाप्त * (ग्रंथसंख्या २९८७)

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

# प्रसंग चोवीसावा

श्रीपरमात्मने नमः

असो हें भीमकें आइती केली अवधारा : घोडेया घातलीया पाखरा
गुढर घातले कुंजरा : रथ संजोगीले ॥ १

भीमकाचे कुमर अंतापुरें अवधारी : बैसती° डोळीया सुकासनांवरीं
तयावरीं[१] छत्रें श्रीगीरीं : चवरें+ ढळताति ॥ २

वाद्येंत्रें आमीतें लागलि पाहे : वाजती शंख नीशांना दीधले घाये
एँसें आपुलें सैन्ये सांमदें केलें रायें : भीमसेनें ॥ ३

तवं देव म्हणती पालाणां रे पालाणां :
म्हणौनि घावो दीधला नीसांनां
सैन्यें सामदें जालें जाणा : यादवरायाचें ॥ ४

गुढरीले भद्रजाती : घोडेयां पाखरा मीरवती
रथ संजोगीले सारथी : लवलाहें ॥ ५

वरमाया डोळीया सुकासनि : छत्रें श्रीगीरीं तया[१] लागौनीं
कनकदंडें वीजयेमानि : विजणें जांणवीताति ॥ ६

आणि वहुवर मीरवे± पहुपाकि[१] : श्रीकृष्णरावो भीमकी
मंगळवाद्यें लागलि निकि : जये जयेकारीं ॥ ७

ऐसें वहुतें मोहोउछायें गजरीं : लाउनि संख नीशांन भेरी
भीमकेसहीतु रावो मुरारी : नीगते जाले ॥ ८

असो हें सैन्यें नीघालि दोन्हीं : तेणें भारें दाटली मेदनि
आणि धुळीरेंनि लोपला दीनमणि : आकासामाजी ॥ ९

ध्वजा फरारे छत्रें श्रीगीरीं : तेनें आकास लोपलें वरीं
नीसांनांचें नाद आंबरीं : कोंडताति ।। १०

ऐसा वाद्यात्रांचा गजरीं : भीमकेसिं रावो मुरारी
आले द्वारकापुरीं : क्षेणांमाजी ।। ११

ते रत्नखचीत द्वारका : देखौनिं राया भीमका
बहुत संतोसु जाला आइका : मनांमाजी ।। १२

म्हणे या त्रीभुवना माझारी : ऐसी दुजी नाहिं नगरी
हे वीस्वकर्मेनी कुसरी : आकारीली असे ।। १३

सत्येलोकु वैंकुंठ कैळास : याहिंपस्ये द्वारकेचा प्रतापु बहुवस
कां जे माहाकल्मक्षा करी नास : दर्सनमात्रें ।। १४

पौळिं प्रसादिं रत्नें झळकती : भवंतिं वनें उपवनें मीरवती
तेथ पुर्वेचा श्रींगारुवनिं श्रीपती : मेळीकारु केला ।। १५

ऐसा मेळीकारु जाला राया मुरारी :
पुढां उग्रसेनु गेला द्वारके माझारीं
वरात△ मुळाचि आइती अवधारी : करावेया ।। १६

तो प्रवेसला द्वारका भुवनिं : मग सत्येधानी बोलाउनिं
नीरोपु देतांये तयालगौनि : रावो उग्रसेनू ।। १७

म्हणे आइकै सत्येधाना : बरवि द्वारकेसिं करावी रचना
आणि वरात△ मुळाचि सुचना : वेगिं करा पां ।। १८

आधिंचि माहाउछावो द्वारकानगरी :
वरीं वीसषें आला रावो मुरारी
मग कैसी श्रृंघारीलो अवधारी : ते द्वारावती ।। १९

गुढीया उभीलीया घरोंघरीं : ध्वजा मीरवताति पौळिं पागारीं
फरारे चरीयां चरीयावरीं : सोभताति ।। २०

दारवठे शृंगारीले वीचीत्रांपरीं : मखरीं तवंगे[१] अती कुसरी
तोरण भरीलें तया भीतरीं : कल्पतरुचें ।। २१

वरीं मीरवताति गरुडटके : अतीमानें नेटके
ध्वजा फरारे पताके : आकास लोपे ।। २२

कालउनि सुरंग जांवडें : विद्याधरी घालीताति सडे
मुक्तांफळांचि रांगौळि कोडें : वरीं भरीताति ।। २३

नगरीच्या सकळ नारी : शृंघारु करुनि नानापरीं
पंरीयेळीं आरतीया घेउनि करीं : दोहिं वोळि[१] उभीया ।। २४

ऐसी वीचीत्रांपरी आइका : शृंगारीली नगरी द्वारका
जे जगदवंद्ये तींहि लोका : ते वर्नूं कवनु जांनें ।। २५

ना ना तो आला जाणौनि कैवल्येपती :
नगर[१] मीषें आकारली आदिशक्ति
तैसी मीरवली द्वारावती : तोयेवेळीं ।। २६

जैसा वडवांनळु वोतीला मुसे :
आणि वरीं क्षेत्रणिलि भानुबींबें बहुवसें
तैसें द्वारकेचेनि प्रकासें : आकास उजळलें ।। २७

असो हें मावळला दीनु जालि निसी : आइती करुनि वराते मुळासि
शृंगारु करुनि चढलोया डोळीयासि : सुरगणां सोवासीनी ।। २८

गज गुढरीले उत्तम : पाखरीले तुरंगम
त्यावरीं आरुढले यादव सैन्य :
आणि राये छतोसां कुळियांचे ।। २९

वरीं सांतीया छत्रें मीरवती : कनकदंडें चवरें ढळती
बंबाळ दीवीया आमिति : तीपरु वेळुत्रांवरीं ।। ३०

आणि द्वारकेमाजि निरंतरीं : कळसि तीपर उजळीले घरोघरीं
उपरीया माडांवरीं उभीया सुंदरी : पहावया वहुवरातें ।। ३१

तवं लागले संख भेरी नीसांन : मंगळमंत्रि गर्जताति रुषी ब्राह्मण
पवाडे पढताति वदिजन : श्रीसर्वेश्वराचे ॥ ३२
पुढां नृत्ये करीताति आपसरा[१] : नारदु धवळि गाती श्रीसर्वेश्वरा
ऐसा मंगळवाद्यीं उग्रसेनु आला सामोरा : देवाजवळि ॥ ३३
ऐसा येउनि उग्रसेनु मुरारी : भावें वंदीला दोहिं करीं
मग बहु आदरु करी : वऱ्हाडोयांसि ॥ ३४
मग टीळे वीडे भोंरी चंदणें : केलीं सकळ वऱ्हाडीयां कारणें
आणि आदरें सन्नमाणें : राया भीमकासि ॥ ३५
मग भीमकाचेया अंतापुरांलागौनि : सोहळे करीताति सोवासिनि
सुधामतीलागौनि : नाना उपवारु ॥ ३६
पत्रें पुष्पें फळें△ तांबोळें : आळंकार दीव्यांबरें पाटोळे
कापुर कस्तुरी* परीमळें : उचलगि केली ॥ + ३७
मग नाना अळंकार भुषनि : वहुवर श्रृंगारौनि
आरतीया निवलोण करुनि : बाळा चरणां लागताति ॥ ३८
ऐसा सर्व श्रृंगारु करुनि मुरारी : आरुढले तुरंगमांवरीं
पुढां नोवरो भीमकुमरी : मीरवतांये ॥ ३९
पुष्प नारीयेळ उभयांकरीं : धरीलें रायें मुरारी
मागां करौली सुभद्रा सोहोदरी : वोंवाळिति देवातें ॥ ४०
मेघडंबर धरीलें देवावरीं : वींजणें जांणवीताति भवंते[१] मुरारी[१]
कनकदडें ढळताति अवधारी : दोहिं बाहिं ॥ ४१
वामें चाले उग्रसेनु भीमकुरावो : दक्षीणें नंदु वसुदेवो
मागां सैन्येंसि बळीभद्रदेवो : पुढां उधवदेवो देखा ॥ ४२
ब्रह्मादीक करीती जयेजयेकारु : देवो पुश्वीं वरीशताति आपारु
वीप्र करीताति मंत्रोचारु : रुषी स्तवीताति ॥ ४३

पुढां अष्ट नायेका नृत्यें करीति : गंधर्व धवळि गाताति
भाट अतीमानें[५] गर्जतो : वांणिताति ब्रीदावळी ।। ४४

तवं धिमढमां ढोल वाजिनले : दमदुमितु दमामे गर्जिनले
सनसनां संख त्राहाटीले : येकें वेळें ।। ४५

घुनघुणिति राये गीडोगीडीया घोहरीं[१] : रुणझुणिताति रणमोहरी
झणझणां वाजलोया ÷ भेरी : तीयेवेळीं ।। ४६

बंबाळले बुरंगांचे नाद : काहाळा धरीताति नाना छंद
सुड भरुनि मृदंगामाजि दाविताति भेद : राणे वीचित्रांपरी ।।

वाजताति ताळ घोळ कासोळि पाहि : येरां वाद्यांत्रां संक्षा नाहिं
ऐसे नाद कोंदले तेणं नाइकीजे कांहिं : कांनि पडीलें ।। ४८

तवं निसांना दीव्रले घाये : ते घणघणां गर्जिनले पाहे
तेणें नादें फुटतांये : आकास वरीं ।। ४९

ऐसे मंगळवादि जयेजयेकारीं : वीप्रांचा वेदध्वनि मंत्रोच्चारीं
वहुवर चालतें नगरा माझारीं : रुक्मीनी श्रीकृष्णरावो ।। ५०

तवं नगरामाजि सकळ नारीं : उभीया उपरीया माडांवरीं
नोवरा पाहाताति रावो मुरारी : लावन्यें सिंधु ।। ५१

आणि वांनिणि[१] ब्राम्हणि : उभीया माडांचा खणोंखणिं
नोव्ररा पाहाताति सारंगपाणि : आनंदभरीता ।। ५२

ऐसीं[१] वेधें वेधलि नर नारी : पाहावया धांवताति मुरारी
तेणें नगरामाजि दाटो थोरी : होतांये देखा ।। ५३

छतीस योजनें नगरी द्वारका : तीनि सहस्र हाटवटीया आइका
अठरा राजवीदी इतुकेयां लोकां : पाहातां पवाड नाहिं ।। ५४

तो पाहातां श्रीसारंगपाणि : सर्व इंद्रीयां होये धवधांणि
म्हणौनि येरां[१] येर[१] बखलौनि : पुढां रीगताति ।। ५५

ऐसा जाणौनि जनांचा भावो : मग काइ करीता जाला देवो
बहुरुपें धरुनि जनां देतांये पासावो : दरुसनांचा' ॥ ५६

जीतुकीया हाटवटीया राजबीदी :
तीतुकीया ठाइं चाले वहुवरांचि मांदी
ऐसि बहुरूप धरुनि गोविंदीं : जनां आनंदु दीधला ॥ ५७

सकळ वऱ्हाड द्वीज रुषी मुनिजन : मंगळवाद्यें यादव सकळ सैन्य
ऐसा सर्वत्र देवो जाला आपुण : रुक्मीनि सहीतु ॥ ५८

ऐसा सर्वव्यापकु होउनि : जनासीं करीतांये आनंदाचि धवधनि
द्वारकेमाजि चालतांये श्रीसारंगपानि : भीमकीये सहीतु ॥ ५९

ऐसें देखावया कौतुक : वहुवर पाहों आले त्रीलोक्य
पाताळिचे पन्नक सनकादीक : मानवी भुतळीचे ॥ ६०

आंबरीं थीरावलीया तारा : आणि वेधु संचरला सुधाकरा
तो गगनिं थीरु होउनि अवधारा' : पाहे वहुवरातें ॥ ६१

देव बैसौनियां वीमानिं : येउनिं अवघे दाटले गगनिं
पाहातातिं उन्मीषां लोचनिं : तया वहुवरातें ॥ ६२

तेहीं व्यापकु देखीनिं कैवल्येपती : मग देव येकमेकेंसि बोलती
म्हणती हे देवाचि व्यापक शक्ती : नसे आणिकी ठाइं ॥ ६३

जो श्रृतिं बोलीला नीर्धारु : जो नीर्वेउं' आणि निराकारु
सर्व भुत व्यापकु सर्वेश्वरु : परम पुरुषु जो ॥ ६४

तेणें मनुस्ये वेषाचि घेउनिं बुंथी : मायावेषें क्रीडतांये क्षीती
जीवांसि द्यावया ज्ञान भक्ति : "परानंद सुख" ± ॥ ६५

याचें पावावया सन्निधांन : येसनें कैचें जोडलें पुन्य
हाचि जरी कृपा करी आपण : तरींचि लाभे ॥ ६६

याचें जे पावले सन्निधान : तयाचें चुकलें जन्ममरन
आणि पावले नीर्वाण : परम[१] सुख ।। ६७

ऐसें देखौनीं आगाधपण : कर जोडौनि करीताती नमन
मग मांडीलें आस्तवन : श्रीसर्वेश्वराचें ।। ६८

म्हणती जये जये आगाधा आनंता : आव्येक्ता आपारा अच्युता
करुणाकरा आर्तीदानि समर्था : श्री आदिपुरुषा ।। ६९

जये सर्वाधारा ± अनादि सीध्दा : जये सर्व आगोचरा अगाधा
जये सर्वज्ञा श्रृष्टि आदि कंदा : परमेश्वरा ।। ७०

जये शरणागतां वज्रपंजरा : जये जये कृपेचेया सागरा
जये सर्वजीवो उधरणा उदारा : कृष्णा जी कृपानिद्धि ।। ७१

ऐसा आनेकि स्तुति[१] नानापरीं : स्तवीताति रावो मुरारी
मग पुष्पें वृष्टी करीताति वरीं : श्रीयादवेश्वरासि ।। ७२

ऐसा स्तवीजतु सुरवरीं : मंगळवादिं जये जयेकारीं
म्हणौनि[१] वोंवाळीताति अवधारी[२] : सुरंगणां[३] ।। ७३

ऐसें वेधलें त्रैलोक्ये नरनारी : पाहावेया आलीया रावो मुरारी
. कैसा मोहोउछावो द्वारकापुरीं : वर्ततु असे ।। ७४

ऐसें बहुतें मोहोछायें गजरीं : वहुवर चालेतें[१] राजसांपरीं
वोंवाळितात वीद्याधरी : तयासि पासाये देताति ।। ७५

गौरा कृष्णा सांवळीया : बाळा प्रौढा चतुर्विधा नारी तीया
वहुवरासि करीताती आरतीया : निंबलोनें ।। ७६

यैसे नगरीचे नर नारी : वोंवाळिताती नानापरी
वहुवर देखौनियां अवधारी[१] : जालि आनंद पुर्नें ।। ७७

ऐसा समस्तां आनंदु जाला : देवो मंडपाचेया द्वारा आला
तेथ सुरंगणि वोंवाळिला : श्रीसर्वेश्वरु ।। ७८

कनकाचा परीयेळु करीं घेउनि : मधिं रत्नदिप उजळौनि
वहुवर वोंवाळितांये जननि : देवकादेवी ।। ७९
आतां नीज मंदीरा प्रवेसु करी : रुक्मीनी सहितु रावो मुरारी
तवं सुभद्रा बहिनि द्वार धरी : राहीली उभी ।। ८०
म्हणे दादु[१] लेंकासि लेंकी देइ : आन मि तुज न मगें काहिं
देवो म्हणे रुक्मीनि देवी काइ : द्याल इसिं ।। ८१
रुक्मीनि म्हणे सातां धारी : होइल जरी कुमरी
तरी देइजे अवधारीं : हें अन्येथा नव्हे ।। ८२
असो हें प्रवेसु जाला निज भुवनिं : रुक्मीनि सहीतु श्रीसारंगपानि
तेथ करीताति आक्षेवनि : निंब्रलोणें ।। ८३
देव करीताति पुश्पि वरुसावो : ब्रम्हादीक म्हणताति जये जये देवो
रुक्मीनी पावली श्रीकृष्णदेवो : जाली मनोर्थ सीद्धि ।। ८४
भीमकु नंदु वसुदेवो : तिघिं वोंवाळिला देवोरावो
तयासिं जाला बहु उछावो : वहुवर देखौनियां ।। ८५
मग देवकीया न्हानिलि सुवर्नरत्नि : घिउंदे[१] पाजीलें रुक्मीनी
पाया लागौनियां केली वोंवाळणि : नवरत्नांचि ।। ८६
ऐसी येउनि नीज भुवनिं : सुवर्ण रासीवरीं बैसवोलीं दोन्हि
मग सर्व राज्याचि धनिनि : जालि रुक्मीनीदेवो ।। ८७
तवं सामोरा येउनि कवी शंतोशमुनि :
जीवें वोंवाळितांये श्रीकृष्णरुक्मीनि
मागतांये श्रीचरणां लागौनि : सेवा सन्निधान ।। ८८
आतां रुषी मुनि देवासहीतु : आरोगणां करील श्रीकृष्णनाथु
ते कथा सांघैन श्रोते आइकतु : म्हणे कवी कृष्णदासु ।। ८९

प्रसंग चोवीसावा समाप्त * (ग्रंथसंख्या ३०७६)

**श्रीकृष्णार्पणमस्तु**

# प्रसंग पंचविसावा

श्रीपरमात्मने नमः

मग सभामंडपिं येउनिं : रुक्मीनिसहित श्रीसारंगपानि
उपवीष्ट जालि सीहासनिं : दोघेंजणें ।। १

तेथ वीप्रे[2] केलीया वेदध्वनि : वोवाळिताति चतुर्विधा सोवासीनि
आणि गंधर्व मीळौनि : धवळि गाताति ।। २

तवं लागली मंगळवाद्यें नानापरीं : संख निसांन मृदांग भेरी
ब्रह्मादिक रुषी जयंजयेकारीं : स्तवीती देवातें ।। ३

असो हें इतुलां आवश्वरीं : पांतिकरु हांकारीले झडकरीं
मग पंक्ति वीस्तारीली स्वारीं : ततक्षेणिं ।। ४

बरवि करुनिं आइती : मग वीनविले श्रीपति
जी वेगिं बांजें कीजे[1] पंक्ति : आरोगणेंसि ।। ५

ब्रह्मादिक देवो रुषी मुनि : सकळै सैन्यें यादव विप्र बंदिजनि
ऐसा सपरीवरीं श्रीसारंगपानि : पंक्ति उपविष्ट जाले ।। ६

मग आपणयां जवळि मुरारी : येकवट बैसवीले चाऱ्ही
नंदु भीमकु वसुदेवो अवधारी : आणि चौथा उग्रसेनु ।। ७

दुजिये पांतिचा सोरां बैसवीला रामु :
पुढां उधवदेवों तया जवळिचि अर्जुनु
येर राये पाहुनिं आपुलाला अनुक्रमु : बैसले पंक्तिमाजि ।। ८

तेथ अन्नें वर्णावि परी कवणिं :
अष्ट माहासिद्धी जयाचिया भांणवसिंनिं
आणि आपणचि अन्नपुर्णा येउनिं : षड्रसिं वोळलि ।। ९

आणि जे शाक पाक आधीष्टाति : तेचि होउनियां वीग्रहोवंती
पाक करीतांये अति निगुति : भांणवसि देवांचा ॥ १०

त्रीभुवनिं कामधेनुतें वानिति : तीयेसि स्वारु पसुपणें हांसती
तेथ पाकांचि निगुती : वर्णू कवणु जांने ॥ ११

स्वयें बुधि[1] जयाचा स्वारु : पाक करीताति आती चतुरु
तेणें[2] कांमउनि आवघा क्षीरसागरु : आणिला पंक्तीमाजी ॥

मग बतीसां आडवाटीयांचा ताटीं : रत्नें क्षेवणिलीं न लगे दीवटी
तें वोगरौनि जगजेठी : देवापुढां ठेवीलें ॥ १३

तळि ठीकलग मीरवे आडणीं : वरीं चवरी जांणवीताति कामीनी
तवं कऱ्हेरी आले कळस घेउनि : चिंतामणिंचे ॥ १४

जें अमृतापस्ये गोड सहश्रगुणि : तें उदकें भरीलि धुपौनि
रत्नखचितें वाटीये[1] घेउनि : सनमुख जाले ॥ १५

येरां कनकांचे परीयेळ देखा : आडवाटीया अती सुरेखा
तेथ वोचित्रें अन्नें पत्रशाखा : नावें कवण जानें ॥ १६

जगीं वानिजे अमृत थोर : तेणें हात धुताति देवाचे पांतीकर
तेथ अन्नाचो रुची कुसरीकार : काइ वानिती ॥ १७

तया आमृताचि उपमा अन्नां लागौनि : लोक देताति त्रीभुवनिं
तरी तें देवाचिये पंक्ती गुळळिया भरुनि : राये सांडीताति ॥

म्हणौनि उपमा तया अन्नांसि : देतां न दीसे श्रृष्टीसिं
जे आरोगणा करुनि रुषीकेसी : तें अन्न वर्नवेना ॥ १९

ऐसीं तीये पंक्तीचि अन्नें वर्णू नेणिजेती :
तऱ्हीं येक दोनि पराक्रतें[1] बोलांवि लागति
येंऱ्हवि कथा ठाकैल म्हणौनि हांसती : श्रोते सभेमाजी ॥ २०

आइका रायेभोग गरूड रामकेळि : श्रीमंतु आंबेघड जोरेसाळी
सुत्रसाळी कमोद देसवळी[१] : आनिकि वीचीत्रा जाणा ॥ २१

ऐसेया साळिचे चोखां तांदुळ : तयाचे भात वेळोले उज्वळ
मालि दाटौनि परीयेळ : वीस्तारोलें ॥ २२

आणि उभयां पांगुरों पुरेती ± देव्हडें : तेसनें थोर उज्वळ साकरमांडे
ते घडीया करुनि येकीकडे : मांडीले ताटिं ॥ २३

मधीं भरूनियां पंचधारा : तीयां मांडेपुरीया अती थोरा
उजळा अती सपुरा : ताटिं ठेवीताती ॥ २४

क्षीरघारीया साकरपुरीया : बरविया गुळोरीया ±
तीया चंद्रमंडळापस्ये उजळिया : ताटिं सोभताति ॥ २५

आणि साकरलाडु उजळ बरवे : करंजीया कडकणें तीळवे ±
खाजि आरुत्रारें साकर घोळीवे : वीरति जीव्हेवरीं ॥ २६

चंद्राचेया गाभेयापस्ये उजळे : ताटिं मीरवताति अमृतफळें
भीतरीं साकर भीरीलि तीयें कोळें : बाहीरीं फांकताति ॥ २७

आइका आंबवडे चिंबवडे : बरवे दहिंवडे गुळवडे
येक चिंचवनियें भीजले[१] गाढे : येक कोरे गवसनियेंचे ॥ २८

येक साकरें घोळौनि तळीले : येक आंतु गुळें भरीले
येक आरधे कोरे आरधे भीजले : आंबामाजि ॥ २९

ऐसे वीचित्रांपरींचे वटक : ताटिं वाढीलें चोखट आनेक
उजळपणें दृष्ठीचा मळ आइक : तयां लागों पाहे ॥ ३०

नखत्रंलि गहुलि रवे मालतियां : मोगरदेठ आणि श्रवळेयांचिया[१]
वीचित्रा खिरी रांधीलीया : आळित्रां दुधामाजि ॥ ३१

जैसें आमृत आळीलें कुसरीं :
ना ना कि तो क्षीरसागरु आलखला अवधारीं
तैसिया चोखां तांदुळांचिया खिरी : ताटिं वाढिताति ॥ ३२

पातां दृष्टीचा मळु लागे जया :
किं पाटसुतापस्ये सकुमार[१] उजळीया
अति सपुरा साकरें घोळिलीया सेवया : ताटिं वाढिताति ।। ३३

पन्हि कालनें नानापरीचिं केलिं कुसरीं :
तयासिं कापुराचे वास दीधले भीतरीं
तें[१] वाटिं भरुनि ताटावरी : ठेवीताति ।। ३४

आइका सुर्योकांताचिया वाटिया : बोसंडेति गौघृतें भरीलीया
तोया सरोसीया मधिं मांडीलीया : ताटावरीं ।। ३५

आळिवें दुधें भरौनि कनकाचि वाटी :
तीये सरीसें मधि मांडीली ताटीं
वरी पंचधारा घातलिं गोमटिं : मांड़सीं जेवांवेया ।। ३६

आळिवां दुधाचि साये गोमटिं : ते भरोनि कनकाचि वाटि
वरीं पंचधारा घालोनिं ताटिं : ठेविताति ।। ३७

आणि आंवेरसु कुंकुमवर्ण : ते वाटि[१] भरुनि ठेवीले जाण
येकें वाटिं कर्दळीफळें केलिं चुर्ण : बरवि सोलेनियां ।। ३८

पक्व राइने[±] गौल्यें आति : तोये बीजें काढोनि[१] साकरा घोळोति
तोयें वाटी भरौनि मांडीति : ताटावरीं ।। ३९

आणि दधी तक्र वाघारौनि : आंब चिंब गुळवणि
तेहिं भवंति वाटि मांडोलो भरौनि : ताटिं प्रभावळि ।। ४०

चीरीवां तळीवां चनक वडीया :
आनिकिहि साका विचीत्रांपरीचिया
आणि पद्दीति[२] काढोलेया[१] निवळीया : ताटिं कनकवर्न ।। ४१

आणि वाढिलीयां कुसंवीरी : भाजीया वीचित्रांपरीं
लवन साकासिं कवन करी : संख्या तेथ ।। ४२

झाडिचि निंबें सुरण± आलें : आंवळे भंवरसाली बेलें
कोंवळि वाळुकें आंबे खारले भले : कोंवळिया कांकडिया ॥४३

मीरीयां पिपळियां द्राक्षांचे घड : कुहीरीया कांकडांसि चविवाड
करवंदें फांपटें उततीयां कुंकुमांड : टेंटु सिळकंदें सेडगे मुळें ॥

सांड़ेया कुरवंड़ीया कोहळवड़े : तळिवं पापड मीरगोंड़े
आणिकेंहि असति उदंड़ें : नावें कवणु जाणे ॥ ४५

ऐंसेया बहु शाका नावें[1] कवन[1] जाणें[1] :
चहुंमतीची अष्टदश पक्वान्नें
ल्हियें[2] पहीयें[3] पन्हि कालणें : नाना[4]वीधे[4] ॥ ४६

ऐंसि नाना शाखा वीचित्रें अन्नें : कनक परीयेळि केलें कुसरी बोनें
ख्वारीं वोगरौनि[1] कुशळपनें : ठेवीलि समस्तांसि ॥ ४७

ठांनवया ठेवीलिया ताटाप्रती : बरविया उजळौनियां रत्नजोति
येकी नारी चवंरीया जांणविता : येकी घालीति वींजणवारे ॥

सोमकांताचिया झारीया : तीया कापुरोदकें भरीलीया
कनकांची वाटी घेउनि उभीया : ताटाप्रति ॥ ४९

ख्वारु पाकु आणौनि देती : येकी बाळा अन्नेंसीं उभीया असती
पांतीचा आवख्वरु पाहाती : रुचे तें वाढावया ॥ ५०

ऐसे ख्वारु बाळा ताटाप्रतिं : पृथक पृथक उभीयां असती
ऐंसी वोडव देखौनि संतोसु जाला चीत्तिं : राया भीमकांचा ॥

5

मग ताटें करुनि उजळिली आरती : कनक परीयेळि रत्नजोती
वोंवाळिले लक्ष्मीपती : भीमकेंसहीत ॥ ५२

मग तेणें भीमकें अवधारा : वोंवाळौनियां वहुवरां
लेनिं लुगडिं सोवासीनिं श्वारां : दीधलीं वीचित्रांपरी ॥ ५३

श्वार उभे ठेले निंबलोन करुनि : मग आज्ञा दीधली सारंगपानि
दृष्टा आमृतें सुध करुनि : आरोगीताति देवो ॥ ५४

कैसे ते वीत्पतीकार श्वारु : गुढांन्नि केलें वीचित्र परीकारु
ते जेउं जाणती चतुर : सेवक देवरायाचे ॥ ५५

तें आणिकां न कळे जाणा : कवण शाकेंसि कवन अन्न
आणि आदिं जेवांवें कवण : कवण रुचि कवणां रसिं ॥ ५६

ऐसें कृष्णजनां कळलें समस्त : येर[१] ठकले ठेले निवांत
भीमकु मुख्य+ तेथ : टकमकां पाहाति ॥ ५७

जेउं पाहाताति आपुलीया युक्ती : तवं तें न कळे वीत्पती
तवं यादवं खुणां दाउनिं हांसती : येकमेकेंसि ॥ ५८

ऐसें षडुरस चतुर्विधें अन्नें : स्वारीं वोगरीलिं वीत्पति कुशळपणें
तो अनुक्रमु न कळे मग हांसती राणे : गुढ न कळे तयां ॥

मग खुणां दाखविती येकमेकां : तवं स्वारु हांसती नायेकां
त्रीकाळज्ञान रुषि आइका : परीं तयां न कळे ॥ ६०

म्हणती रुषि तुम्हां तवं त्रीकाळज्ञान :
तरी कां जेवीतां न कळे हें अन्न
ते म्हणती देवाचि शक्ति वीश्वमोहन : त्या मोहिलें पैं[१] ॥ ६१

आणि हा देखौनिं श्रीसारंगपानि :
मन संत्रुप्त होउनिं रीगालें चरणीं
आणि सर्व इंद्रीयां धवधनी : म्हणौनि वीसरलों बापा ॥ ६२

एंसें+ गुढांणें[1] जया न कळे : तयांसि तें आपें आप उमंटलें
ऐसें देवें दृष्टीं आवलोकुनि ज्ञान केलें : पंक्ति सकळ जनां ॥

ऐसे आनुभवा आलें सकळिकां :
मग कव्हणांचि कव्हणां नाहिं शंका
आवघे सज्ञान वीद्वांस[1] आइका : पंक्ति जेवितातिं ॥ ६४

हें भोजन आम्हीं भोक्ते हे मती : ऐसी सकळां जाली प्रतीति
तयांमाजि येकु आनंदुभरीत जेवीतातिं : आपपरु वीसरले ॥

तें अन्न नवनित मधुर सारासार : सेवीतां आधिक आधीक रुचिकर
ऐसें भोजन आणि भोज्येशक्ति आपार :
देवें सकळांसि दीन्हली ॥ ६६

परी तें भोजन न लगे चीत्तिं : नेत्र श्रीकृष्णांकडे धावति
तेव्हेळिं आवघांचि ठाइं जाला श्रीपती : सर्वज्ञरावो ॥ ६७

आवघे आपनेयां जवळिं देखतीं :
परीं सर्वत्रु होउनि उरला ऐसें नेणतीं
म्हणती हा आम्हांसि फावला श्रीपती : ऐसी प्रतीति सकळां ॥ ६८

ऐसा ठाइं ठाइं मुरारी : सपरीवारीं आरोगना करी
तया भोजनाचि रुचि थोरी : वर्नु कवन जाने ॥ ६९

कैसे पांतीकर[1] अन्नें[2] जेविती : जया पाकावरीं हात पडती
तेंचि स्वारु आदरें वाढीति : रुचलें म्हणौनियां ॥ ७०

वीप्र जेवीतां देताति ढेकुर : धोत्र ढीलें करुनि पाहाताति उदर
म्हणती नावेकु होतें कां थोर : तरीं बहुत जेवीतों ॥ ७१

म्हणती माथां द्वार आसतें कां हरी :
तरीं आणिक सामांवते घांस च्यारी
कटकटा सानें उदर अवधारीं : आलें अन्न उरलें हें ॥ ७२

कैसे जेवीले कंठ प्रमाण : खालौति[1] भुमें[2] न पाहावें जांण
वरुतेंचि पाहाती गगन : श्वासु सांमात्रेनां ।। ७३

भाट जेवितां अन्नें वानिति : म्हणती जें ब्रम्हांदिकां न मीळती
तें आजि तुझीये पंक्ति लाहीजेती : श्रीयादवेश्वरा ।। ७४

काइं हें वीहिंती भरीं उदर : तुवां सडुरसाचे मांडीले डोंगर
आणि देवा तुझा देखौनि आदर : भुक आधिंचि गेली ।। ७५

आजि पोटाचें फीटलें पारणें : देवा तुझेंनि प्रसाद दानें
आणि क्षुधेचें नीसेंस[1] ठाणें : उठौनि गेलें ।। ७६

आणि जे तृष्णा ब्रम्हांडें असे कवळीतु :
ते तुझेंन प्रसादें जाली संत्रुप्तु
आणि भुतें अद्यापि होति जळतु : तें आजि नीवालि देवा ।। ७७

तुं सोमवंसि राया सुधांकरु : आवघा ठाइं ठेविला क्षीरसागरु
आन्नपुर्णा आपणचि जाला स्वारु : तुझीये पंक्तीं वाढीतांये ।।

जरी वर्णु म्हणों अती रसु : तरी हे जीव्हा मांगतांये ग्रासु
तवं हांसौनिं बोले परेसु : म्हणितलें थीरु जेवां ठाकुरा ।। ७९

ते म्हणती आजि तुवां थीरु केलें दातारा :
येऱ्हविं वहुत करोतां मेलों येरझारां
जवं वोळगीलिया आणिकी धुरा : तवं भ्रंमत होतों ।। ८०

असो हें देवा आरोगण जालि श्रीमंत :
कपुरोदकें गुळळा जाला त्वरीत
रुक्मीनीसहित : देवरायासि ।। ८१

ऐंसि समस्तां जालि भोजनें : गुळळा सारुनि उठीले राणे
तव तातें काढोलि ततक्षेणें : येउनि ताटकाढा ।। ८२

मग कर उलळावेया कारणें : बरविं चौखें आणिलिं चंदनें
तेणें श्रीकर उलळोले जगजोवनें : आणि दीधलें समस्तांसिं ॥

मग सकपुरें वीडा जाला गोपाळा : येरां तांबोलें जालि सकळां
तवं देवें उधवदेवो बोलावीला जवळां : वस्त्रें देववीलिं ॥ ८४

टीळे वीडे चंदनें भोंरीं : वस्त्रें आळंकारु नानापरीं
यादवांसहीतु मुरारी : आणि सकळ सैन्यांसि ॥ ८५

नगरीचे सकळ नरनारी : तयांसि बोलाउनि मानें सत्कारीं
वस्त्रें आनेकें आळंकारु नानापरीं : केलिं आनंदभरीते ॥ ८६

मग ब्रह्मादीक समस्त : रुषी मुनि वीद्यावंत
हे दीव्या अलंकारीं त्वरीत : पुजीले देवरायें ॥ ८७

आणि वीप्र बंदीजन कळावंत : तेही बोलाउनि समस्त
तयांसि देस ग्राम वळीत : द्रव्यें आभर केले ॥ ८८

मग बोलाउनि भीमकाचें सैन्यें : तयां दीधलि वस्त्रें आळंकरणें
तें भीमकासहीत जाणें : कुमरां अंतांपुरांसि ॥ ८९

ऐसी समस्तांसिं करुनि पहीरावनिं : मग भीमकु जवळि बोलाउनि
कौंडन्यांसि देवों आदरीलि पाठवणि : श्रीकृष्णरायें ॥ ९०

मग देवो बोले भीमकाप्रती : म्हणे राया तुमचि वाट पाहाती
तरी आतां कौंडन्यांसि जावें नृपती : वेगिं वैदर्भेश्वरा ॥ ९१

तवं भीमकु म्हणें जी चक्रपाणि :
ते कौंडन्याचि राणीव सांभाळावी तुम्हीं
आणि देवें श्रीसारंगपाणि : मज द्यावें सन्यंधान ॥ ९२

देवा तुझा राउळंगणिं : असेंन द्वारपाळ होउनि
आतां मि तुज न विसंबें श्रीसारंगपाणि : नको अव्हेरुं देवा ॥

तवं हांसोनि बोलीलें आनंतें : राया तुम्ही तेथचि असा आमचे होते
आम्हीं तुम्हां जवळि असों हो कां माते : देवकोचि आण ॥

ऐसा देवांचा प्रीयें वचनिं : भीमकु संतोसला मनिं
मग श्रीकृष्णांसि क्षेमांळिंगण देउनि : लागला श्रीचरणां ॥९५
तया नीगतां भीमकासि जांण : देवें करुं आदरीलें आनुवर्जन
तवं तो कैसें बोलिला वचन : रावो वैदर्भेश्वर ॥ ९६
म्हणें जी सीष्यु पुरस्कारीं बोलावीजे : आणि सेवकासि मांनु दीजे
हाहि येकु कोपु बोलिजे : जांन यादवराया ॥ ९७
जी जी गोसांवि बैसावें सीहांसनिं : आणि मज पाहावें प्रसन्ना नयेनिं
हाचि थोरु सन्मानु श्रीसारंगपाणि : मज सेवकासि ॥ ९८
मागौतें देवें दीधलें क्षेमालिंगन : भीमकें वंदीले श्रीचरण
म्हणे जी वेगिं द्यावें पुनर्दरुसन : देवदेवा ॥ ९९
देवें बोळवीति दीधलीया आमिति धुरा :
मीति नाहि तया आदरा
परी न वचवे भीमां नृपवरा : मग बोलीला कैसे ॥ १००
म्हणे देवातें सांडौनि न वचति [१] पाये :
आणि हे मागौते वळताति पाहे
आणि हे आवघेंचि सैन्यें वेधलें आहे : कां या अव्हेरीसि स्वामि ॥
ऐसा जाणौनि तयांचा [१] मनोभावो :
आवघेयांचा हृदइं प्रकटला देवो
सकळां वर्तला आनंदाचा पासावो : मग नीगते जाले ॥ १०२
असो हें नीसांनां दीधला घावो : +नीगाला भीमकु रावो
पुढां पावला आपुला ठावो : कौंडन्येंपुरु ॥ १०३
ऐसी भीमकासि देउनि पाठवणि :
मग राउळासि आले श्रीसारंगपाणि
जेथ असे रुक्मीणी राणि : तीया [१] मंदीरासि ॥ १०४

तें राजमंदीर वर्नु कवनु जांणें :
जें बहुती कुसरीं उभवीलें[१] विश्वकर्मेंने :
श्रीकृष्णां रुक्मीणिं कारणें : नीरोपम ॥ १०५

सकळ प्रकाश आटौनि मुसे : तया दीव्ये तेजाचें रचिलें असे
तयासि उपमा देतां न दिसे : त्रैलोक्यामाजी ॥ १०६

तोचि सुधप्रकाशु जांनें : आपुनचि जाला नवरत्नें चिंतामणि
लागावेया देवाचा भुवनिं : बहुतें रुपें धरीलिं ॥ १०७

तळिं मानिकांचें तोळंबे मांडौणि :
वरीं आवघें दळवाडें कांमवला चिंतामणि
तेथ असे देवाचि देखा राणि : रुक्मीनी देवी ॥ १०८

तेथ भंवरपालका मांचेयावरीं[१] : उपवीष्ट जाले रावो मुरारी
तवं जवळीं आली भीमकुमरी : रुक्मीनी देवी ॥ १०९

मग देवा जवळीं येकासनीं : वामांगी बैसली रुक्मीनी
तवं जवळीं आली हृडपीनी : रंगावती ॥ ११०

तीया सकर्पुरा फोडी घेउनिं : दोघां दीधलीया श्रीकृष्णां रुक्मींनी
वीडीया देताति[२] कामीनि : भावकळना ॥ १११

येकी जांनविताति विंजणें : येकि वाताति ब्रंह्मवीणें
येकी सुरस मधुर करीताति गाणें : येकी नांचताति[१]॥ ११२

ऐसा रुक्मीणि सहीतु श्रीसारंगपाणि : चीत्रसाळे बैसले दोन्ही
तवं कवी येउनि संतोषुमुनि : लागला श्रीचरणांसिं ॥ ११३

ऐसा रुक्मीनी सहीतु : कविं नमिला श्रीकृष्णनाथु
मग कर जोडौनि असे मागतु : श्रीचरणसेवा ॥ ११४

म्हणे आतां वीनती परीयेसी स्वामी :
मीयां आरीखें वाकपुष्पें वाइलीं तुम्हां लागौनि
ते[१] स्वीकरीजो जी श्रीचक्रपानि : देवा कृपाळुवा ॥ ११५

जी जी तुज नीत्येमुक्तां नीरोपमां :
तया तुज मी बोलिला आरीखां उपमां
तया अपराधा कीजे [१] क्षमा : देवदेवा ॥ ११६

तुज वर्णितां श्रुती म्हणती नेती नेती : तेथ मज मसकां कैंची मती
परी देवा सुख नाहिं आनिकी स्तुती :
तुझी चरित्रें वांचौनियां ॥ ११७

जी जी मिं बोलीला प्राकृत देसिं : आणि आसळगै केली देवेंसि
ते मज उपसाहिजो जी हृसीकेसी : देवराया ॥ ११८

आतां देवा मजवरीं प्रसंना [१] असावें :
आणि माझे सर्व अपराध उपसाहावे
आणि आपुलें सेवा संनिधान देयावें : कृपानिधि ॥ ११९

मग देवें कवींसि प्रसन्न होउनि : तांबुळ देउनि लावीला चरनिं
पाठींवरीं श्रीकरु [१] ठेवीला श्रीसारंगपानि :
आणि म्हणितीलें ना भी ना भी ॥ १२०

ऐंसा देवोरावो श्रीमुरारी : नाभीकारु दीधला अवधारी
रुक्मीनीं हातु ठेवीला पाठींवरीं : आणि दीधलें तांबोळदान ॥

ऐंसें श्रीकृष्ण रुक्मीनि : दोहिं तांबोळ दीधलें कवीलागौनि
तेणें आनंदें धाला तो संतोषुमनि : हरुषें नांचतांये ॥ १२२

ऐंसें शुभमंगळ परीकर : बरवें जालें रुक्मीनी संवर
आतां द्वारके राज्ये करीतांये निरंतर :
श्रीकृष्ण रुक्मीनीसहित ॥ १२३

आतां शुभ मंगळ नमुं श्रीअनन्त : पढते आइकते वीजये होत
ये ग्रंथि+ नायेक श्री कृष्णनाथ : "तो रक्षो समस्तांते" ± ॥

"कुंकुमठान ग्राम गंगातीरीं : तेथ ग्रंथ आरंभिला श्रीगेश्वरीं
तो संपुर्न सीद्धी गेला श्रीनगरीं : भीलमठीं जांना ॥ १२५

गुरुवार सुद्ध फाल्गुनु : द्वितीया तीथी आनंद दीनु
तें श्रीनगरीं ग्रंथ जाला संपुर्नु : श्रीरुक्मीनी सैंवर ॥" ± १२६

"ऐसा दोनी सत तीन सहस्र ग्रंथु :
सीधी पावला माघ मासा येकांतु
कवी संतोषमुनी म्हने श्रीकृष्णनाथु :
पावो प्रीति स्वामि माझा" ॥* १२७

प्रसंग पंचविसावा समाप्त * (ग्रंथसंख्या ३२०३†)

"इति श्री कवि कृष्णदास शिष्य मुनि संतोष विरचित
रुक्मिनी-सैंवर : नाम ग्रंथु समाप्त" ±

श्रीकृष्णार्पणमस्तु

---

† मूळ ग्रंथ ओव्या ३२०० आणि अंतिम स्थलकाल निर्देशक ओव्या ३, अशी एकंदर ग्रंथाची ओवी संख्या ३२०३.

# परिशिष्ट १.

## मंगळाष्टकें †

(प्रसंग २३ ओंवी १३७ नंतर)

आतां मंगळ अष्टकें हरिकडे गर्गरुषी बोलत ॥
श्रीमद्देव परात्पर प्रकळ जो तो नोवरा अच्युत ॥
ब्रम्हा शंकर विष्णु लक्षमि उमा सावित्रि संध्यावळी ॥
आत्रीची निज भारया अनुसया कुर्यात्सदामंगलं ॥ १ ॥

: सुलग्न सावधान

**विधि उवाच**

रुक्मीणीकडे तो विधी वदता आद्या मुळस्वामिनी ॥
व्यक्ताव्यक्त आव्यक्त होउनि स्वयें ब्रह्मांड विस्तारिणी ॥
देवी ईश्वर प्रवृत्ति निजकळा आंबारुपा रुक्मिणी ॥
सर्वाक्षी शुभमंगळा गुणनिधी कुर्यात्सदामंगलं ॥ २ ॥

सुलग्न सावधान

---

† ही मूळमहादेवाजवळ श्रीकृष्ण विवाहाचे वेळीं म्हटलेलीं मंगलाष्टकें, सटाण्याच्या चांदोरकरांच्या दप्तरांतील दोन्ही प्रतींत, छापील प्रतींत व शके १७६२ मधील एका हस्तलिखितांत आढळतात. इतर कोणत्याहि प्रतींत आढळती नाहींत. पौंपदाख्य [illegible] वापरा [illegible] प्रतींत सुद्धां नाहींत.

गर्ग उवाच

धन्य यादव-वंश-भूशन-मणी वसुदेव राजा भला ।।
धन्ये देवकि उदरीं घननिळ श्रीकृष्ण हा जन्मला ।।
विश्वा तारक व्यापक सकळ ही कृपा करा चिद्घना ।।
तो हा होउनि नोवरा उभा असे कुर्यात्सदामंगलं ।। ३ ।।

सुलग्न सावधान

विधि उवाच

धन्या भीमकभारिया शुभ्रामती पुन्येशिळा माउली ।।
चित्सवतीमणिमंडित रुक्मीणी हे कन्यका जन्मली ।।
रूपें सुंदर साजिरी सुकमळा ते नोवरी जाहली ।।
आर्पीली येदुनायका घननिळा कुर्यात्सदामंगलं ।। ४ ।।

सुलग्न सावधान

गर्ग उवाच

माथा कीरिट कुंडले झळकती नौरत्नहारावळी ।।
शोभे चंदन तिल्लकु मृगमद मूर्ति दिसे सांवळी ।।
ठानें मांडुनि वेनु घेउनि करीं वृंदावनीं श्रीहरी ।।
गोपीवेष्टित सुंदरा व्रजवधु कुर्यात्सदामंगलं ।। ५ ।।

सुलग्न सावधान

विधि उवाच

भाळी कुंकुम कस्तुरी मळिवट भांगटिळा लाविला ।।
जाळी मौक्तिक बांधिले शिवफुल चंद्र शिरी सोभला ।।
कर्णी कुंडल वाळिया झळकती नाकी सुमुक्ताफळें ।।
हार शोभत रुक्मिणी नवरिसी कुर्यात्सदामंगलं ।। ६ ।।

सुलग्न सावधान

**गर्ग उवाच**

इंद्रश्चंद्र रवीगने सरस्वती विद्याधरा तुंबरा ॥
येक्षे किन्नर नारद हरिकथा गाती महा सुंदरा ॥
सुरांच्या निज कामिनी अरतिया घेऊनि उभ्या करी ॥
दिव्ये वर्षंत सुमनें बहुविधा कुर्यात्सदामंगलं ॥ ७ ॥

सुलग्न सावधान

**विधि उवाच**

देवो रुषि मुनि नारद गौतम भारद्वज वाल्मिक ॥
दुर्वासा भृगु आस्तिक कपिल जो काश्यप व्यास शुक ॥
विश्वामित्र वशिष्ट भुषनकवी पाराशर देवल ॥
पौलस्ती सनकादिक बगलभ्या कुर्यात्सदा मंगलं ॥ ८ ॥

सुलग्न सावधान

**गर्ग उवाच**

ॐ पण्यां वदताचि रुक्मिणि हरी प्रेरीलिया अक्षता ॥
ऐसा तो पट काढुनी श्रीकरी दीधली ते रुक्मिणी तत्वता ॥
धार घालित भीमक सुधामती सर्वस्व अर्पूनिया ॥
लग्न लागलं संभ्रमे वधुवरा कुर्यात्सदामंगलं ॥ ९ ॥

सुलग्न सावधान :

———

(या मंगलाष्टकांची रचना, भाषा, विचार, कल्पना वगैरे कशा विषयींच लिहिण्याची आवश्यकता नाहीं. खेडोपाडीं अशाच तऱ्हेच्या अष्टकांवर लग्नें भागवून नेलीं जातात हें सहज लक्षांत येईल.)

# परिशिष्ट २.

## प्रतकारांचे समाप्ति लेख

१. भारत इतिहास संशोधक मंडळांतील ज्या प्रतीस मूळ म्हणून स्वीकारिली तिच्या प्रतकाराचा लेख :—

" ग्राम गांधली माझारीं : कल्यांनपुरें अवधारीं
श्रीदत्त तुळसीपुरी नीरंतरीं : असे तेथ ॥ १

तेथें गुरुमठा माझारी : ग्रंथु लीहीला अवधारी
प्रीती पावो श्रीमुरारी : श्रीकृष्णरावो ॥ २

हे हस्ताक्षर अवधारीं : वीप्र पदमांजी मुढ नीरंतरी
गेलें अक्षेर वाचावें चातुरी : चुक सेवकासीं क्षेमा कीजे ॥ ३

संवत १७७१ जयेनाम सवतसरे : माघमासे शुक्लपक्षे
तोथौ द्वीतीया भोमे दीनें : ग्रंथ संपुर्न शुभं भवेत् ॥ ४

वांचिता आइकता वीजेया भवेत्
इति श्रीकृष्ण रुक्मीनिं सैंवर संपुर्नमस्तु "

२. जोशी प्रतीच्या प्रतकाराचा लेख :—

" सके सोळासे सत्याहातरी : वीवा नाम संवत्सरी
पवीत्र डोमेग्राम नगरी : तीए स्थळीं सपुर्न जालें ॥ १

मलें उपनाम जयाचें : राज्येधर मुनी सेवकाचे
हस्ताक्षेर दामोधराचें : जानीजे भीमसेनो ॥ २

आस्वीन वद प्रतीपदा तीथी : सोमवारी प्रथम प्राहारी
संपुर्न जाली पोथी : हे जानावी प्रतीती : भीमसेन मुनी ॥" ३

३. गोपीराज प्रतीमध्यें प्रतकाराच्या लेखनकालाच्या ओव्या नाहींत.

४. पौषदाख्य मुनी गोपालदासानें रुक्मिनी सैंवरांत शके १६४१ मध्यें वाढावा केला. त्याच्या शेवटी त्यानें स्वतःसंबंधी माहिती व रचनाशक वगैरे दिलेल्या ओव्या :–

" शके साळासे येकेचाळीसें : वीकारी संवत्सरी आनि माघें मासें
सुक्ले पक्षीं प्रतीपदा तीथीसें : सुक्रवारी जये प्रहरी ॥ १

बीडकीण ग्रामाहूनी वाव्ये कोणी :
मालेवीहीरें कोशप्रमाणे असें तीये स्थानी
तेथें पौसदाख्यें मुणी गोपाळें वास्तव्ये करूनी :
ग्रंथें शोधीला तत्रें स्थळीं ॥ २

पौसदाख्यें कृष्णराजात्मजू : ज्ञाणें भक्ती वैराग्यें वीराजे नरेंस राजु
तत्सुत मुनी गोपाळ सहजु : ग्रंथें शोधीला बहूतें प्रयत्नें करुणी॥

ऐसें हे रुक्मिनि स्वयंवरें : साते सते आणि तीणे सहश्रें
अधीक चाळीस वोवीया असती णीधारे : शोधणीचेणि अर्थे ॥"

५. पौषदाख्य गोपाळदासाच्या ग्रंथाची प्रत करणाऱ्याचा लेख :–

" वराडदेसी अमरावती पेठें: त्या समीप नवसार कोश उत्तरा नीटें
आडी अंतो लीखण जालें नीटें : श्रीकृष्ण रुक्मिणि सैंवरें ॥ १

माणोपसंज्ञीक बल्लाळें णामणा : तत्सुत अवधुत लीखीक जाणा
अक्षेरें गेले ठलें आणा वो मणा : श्रोतेही सर्व ॥ २

सुमासण ११८२ तागाईत चांद्रे णौमीसी :
कथा संपली बुद्धवार दीवेसी : आदी अंती जाणा ॥ ३

प्रगाणें नांदगाव वराडातें : मौजे नवसार पेठें वसतें
चौ मासी राहूनी तेथें : ग्रंथें संपुर्ण लीहीला ॥ " ४

———

# परिशिष्ट ३.

## छापील प्रतीतील २८ वा अनुक्रमणिकाध्याय

( प्रस्तावना पृष्ठ २५ पहा )

जय जय चिदानंदा मुरुमर्दना : जय आमोघमूर्ति नीलवर्णा
जय कैवल्यदानी जीवोध्दारणा : भुवनी मुंचना जगधीश ॥ १

ऐसे झाले रुक्मिणी स्वयंवर : अष्टदश पुराणीचे कथासार
गुरुवदे परांपर : कैवल्येंपुर वसविले ॥ २

आता अठावीसवे अध्यायीं : सर्व कथासार निवडिला पाही
तो श्रोते विमळदेहीं : श्रवणद्वार करशीजे ॥ ३

प्रथम अध्यायीं मंगळाचरण : कथा महत्वी पूर्ण
देववाणी मौन करून : देशभाषा निर्धारली ॥ ४

दुसरे अध्याई रुक्मिणी : सखीया सहीत सभांगनी
किन्नर कल्याण उभयालागुन : राये आदर केला बहु ॥ ५

तिसरे अध्यायीं त्रिताल : त्रिजग वर्णिले देव सकळ
अष्टाचळ क्षीराब्धपाळ : उपांगीसह वर्णिला ॥ ६

चवथ्या अध्याई देशगणती : पांचवे अध्यायी भूपती
शष्टमोध्यायीं यदुपती : लिलेसह वर्णिला ॥ ७

सातवे अध्याई वैदर्भेश्वर : सभा महत्त्व न्यायोपचार
दायेपसाये नृपवर : देता झाला भाटाप्रती ॥ ८

आठव्या अध्यायी जाण : बहु कोपला नृपनंदन
कृष्णरायांचे दुशन : चैद्यें वर प्रतीष्टिला ॥ ९

नववे अध्यायीं वीरह भरी : व्यापली वैदर्भ कुमरी
विप्र पाठविला द्वारकापुरीं : प्राणवल्लभाकारणें ॥ १०

त्यांतच वर्णिला देश : बलीभद्राचे पव्हेर सुरस
शब्द अपशब्दी विप्रेस : बोळविले समस्ता ॥ ११

दाहव्या अध्यायीं वन उपवन : येकादश अध्यायीं पूर्ण
नगररचना सांगुन : सर्वजन वर्णिलें ॥ १२

द्वादशाची कथणूक : सभामंडपीं जगनायक
भेट पाठवनी सभालोक : या पांती प्रसाद भोजन ॥ १३

जगत्पती देखून विनंती : येकलाच नीघे कौंडण्याप्रती
ज्याचिये अज्ञे नासोत्पत्ती : मुळमहादेवी पावला ॥ १४

लागताची त्रयोदशा : यादव सेनाबलाधिशा
बलीभद्रे मेळउन सर्वशा : प्रभू चरणीं पावले ॥ १५

चतुर्दशाचे कथन : देव कौंडण्यपुरा प्रयाण
नगरजना आनंद पूर्ण : शिशुपाळ पावला ॥ १६

भीमकराये भेटून : बहुत केला आदर सन्मान
पाहूनर चोरी करून : वैदर्भ हृदयेरत्न पाठवी ॥ १७

पंचदश अध्यायीं रुक्मिणी प्रश्न : सखीयावमुखें मूर्तवर्तन
रुक्मिणी आल्हाद पाऊन : केलें स्तवन तयाचें ॥ १८

शट्दश अध्यायांत : भीमक पूजिला जगन्नाथ
चैद्यें फळप्रदानार्थ : आपशकुन सुचविला ॥ १९

सप्तदेशांचें सार : जरासंधादि सकळ नृपवर
राखिते झाले वैदर्भनगर : यादव देव करूनी ॥ २०

तयांतच उपाक कथन : तुम्ही करावें देवपूजन
तेथे करुनया हार्ण : नेउ आम्ही निर्धार ॥ २१

अष्टादशाध्यायीं भीमक नृपती : कुमरासचीकामंत्रस्थीती
देऊन सैन्य यदु द्विगुणति : देवी पूजना पाठवी ॥ २२

येकावरी नव युगळीत : तेथील यदुसैन्या काळकृत
उभये प्रधान रणीं जुंझत : वैदर्भ अजय पावला ॥ २३

दाटोदाटी शारंगपाणी : करें उचली वैदर्भनंदनी
प्रेमदानें रथीं वाहुनी : केली समीपता ॥ २४

विसाव्या अध्यायीं नवरस : युध्दें बडीवार विशेष
चैद्येसना आबळरहीश : आजई माघारली ॥ २५

येकवीसाध्यायीं जाण : सर्व युध्दे निवाडा पूर्ण
चैद्ये विरा अपयश पूर्ण : दोन्ही दळ अवेशले ॥ २६

तो बावीसव्यांत : आवेश हारी त्रिगुणातींत
चैद्ये सेना माघारत : स्वयं शीशुपाळ निघाला ॥ २७

तेवीसाव्यांत जाण : अपमानीला वैदर्भनंदन
दृष्टी प्रेमवर्षाव करून : मृत सेना जीवविली ॥ २८

चोविसाव्याचे सारांश : भीमक आला मूळमहादेवास
यदुसैन्यासी भास : चैद्य आला म्हणोनी ॥ २९

तव अर्जुन शोधून : भीमक देवास प्रार्थून
विश्वकर्मे द्वयमंडप रचुनी : लग्न आरंभिले ॥ ३०

पंचवीसावेयाचे अनुसंधान : मंगळाष्टका झालें लग्न
भीमकें केलें पाणीग्रहण : पांती भोजन राजेंद्रा ।। ३१

सवीसाव्याध्यायीं वरात : भीमकासह द्वारके मिरवत
सर्व राजबिदी विशमूर्त : देव स्तवती आनंदे ।। ३२

सत्तावीसाव्यांत : पदार्थाचें नाम उक्त
नगर भोजन ग्रंथ समाप्त : इतक्यांत जाहला ।। ३३

त्यांतच कवीचें नाम : मांडिलें ग्राम आणि धाम
संवत्सर मास दिन नाम : वोवी संख्या सांगितली ।। ३४

अठावीसव्यात : सर्व अध्यायांचा सारांश यथार्थ
वाचिता श्रोतेयांचे मनोरथ : पूर्ण होती सद्भावें ।। ३५

इति श्रीभागवतेमहापुराणे दशमस्कंधे
रुक्मिणीस्वयंवरें कथावर्णनोनाम अठ्ठाविसमोध्याय: ।। †

**श्रीकृष्णार्पणमस्तु**

---

† एका ओळींत असलेलें शब्द स्वतंत्र केले याशिवाय कोणताहि बदल न करता हा अध्याय यथाप्रति येथे दिला आहे.

# पाठभेद

पुढे पाठभेद दिले आहेत त्यांत वापरलेल्या खुणांचा व पद्धतीचा खुलासा येथेंच करणें योग्य वाटते.

* ही खूण शब्द, शब्द समुच्चय अथवा ओव्या जोशी हस्तलिखित प्रतीतून घेतल्यास. ही खूण देऊन खाली भेद दिला नसल्यास हा शब्द अथवा शब्द समुच्चय मूळांत नसून ते जोशी प्रतीतून घेतले असे समजण्याचे.

± ही खूण गोपीराज संग्रहातील हस्तलिखितास असून बाकी वापराची पद्धत वर लिहिल्या प्रमाणेच.

△ ही खूण जोशी व गोपीराज दोन्ही प्रतींत एकच पाठ असल्या-वेळची आहे. बाकी वापराची पद्धत वरील प्रमाणे.

" " एका पेक्षां जास्त शब्द, चरण अथवा ओवी ज्या प्रतीतील असते त्या प्रतीच्या खुणेच्या अगोदर " " ही खूण आहे त्या मधील मजकूर त्या त्या प्रतीतील समजा-वयाचा. १ हा १ या आकड्याबद्दल पडलेला आकडा आहे. निराळी विशिष्ट खूण नव्हे.

० ही खूण असलेला पाठ स्वतंत्र रीत्या सुचविलेला आहे.

\+ ही खूण कमी जास्त शब्द अथवा ओव्या संबंधी असून त्याचा खुलासा पाठभेदांत दिला आहे.

# पाठभेद

(प्रारंभीचे अंक ओवीक्रमांकांचे व पुढील अंक व चिन्हे, त्या त्या ओवीतील पाठभेदाची आहेत)

| ओवी क्र. | पाठभेद |
|---|---|
| | **प्रसंग पहिला** |
| १४ | १ जो. तयाशि |
| १८ | १ जो. शप्तशमुद्रिका. |
| | २ गो. नवावर्तं |
| २१ | १ जो. जोडे. २ जो. पावती |
| २३ | * मूळांत पढतया वाचा होये शुफळ: |
| २५ | १ जो. दावीन ; गो. दावौन |
| २८ | १ गो. म्हनौनी. २ गो. श्लोकाचीया. |
| २९ | * मू. अकर्शे |
| ३१ | १ जो. भाडनी. २ गो. जो. जाली |
| ३८ | १ जो. वाखानीताती |
| ३९ | १ जो. कृष्णपदासी |
| ४० | १ जो. आइकती; गो. आइकतु |
| ४१ | १ जो. संस्कृता वानी |
| ४२ | १ जो. आनीक; गो. आनिकि |
| ४६ | १ जो. सटु. २ जो. हे |
| ४९ | १ जो. गो. वाइक |
| ५० | १ जो.गो.मऱ्हाटी. २ जो.हीरद |
| ५१ | १ जो. गो. मऱ्हाटिया भाषा. |
| | २ जो. गो. सैंवर कथा |
| ५२ | १ जो. वरवी |
| | **प्रसंग दुसरा** |
| ६ | १ जो. कऱ्हनी |
| | २ जो. देखीजेना |
| ७ | १ जो. आदशक्ती |
| ९ | १ जो. कुसळ लक्षन |
| १० | १ जो. शिधरशाची मुश |
| | २ जो. दीसे |
| ११ | १ जो.कामावीला. २जो. दीशे. |
| | ३ जो. सोभा |
| १२ | १ जो. आरक्त |
| १३ | १ जो. भीमकन्येचा. |
| १४ | १ जो. गाढिली |
| | २ जो. नवरत्नाची |
| १६ | १ जो. बोरलीयाचा |

| | |
|---|---|
| १९ | " ईद्रुम...देरवौनी" * मूळांत 'विदुलमे लाजीली आंत देखौणि' |
| २१ | १ जो. आपैसें |
| २३ | * मू. सुखें |
| २४ | १ जो. णंद |
| २५ | १ जो. लवतील २ जो. ० चा. ३ जो. कळासीले |
| २६ | १ जो. प्रतीबिंबती |
| २७ | १ जो. मोतीयाचा. |
| २८ | १ जो. कीळ कीळीती |
| २९ | १ जो. वेनी *मू.णीहटी. २जो. वीरलीया ३ जो.पार्यतिकांची |
| ३० | १ जो. फीरती |
| ३१ | १ जो. शिहासनी |
| ३३ | १ जो. श्रीमंत |
| ४३ | * मू. निगुतीं |
| ४७ | १ जो. साध * मू. श्रौनीं |
| ५० | १ जो. खालोती |
| ५१ | * मू. मुकली |
| ५३ | १ जो. देखोनी |
| ५५ | १ जो. बाळीये २ जो. पसरीले |
| ५६ | १ जो. होती |
| ५९ | १ जो. प्रधानाची. |
| ६१ | १ जो. नोवरी. २ जो. लवकरी |
| ६२ | १ जो. खाडीश्रीये |
| ६६ | * मू. सबळें णीबळें |
| ६८ | * मू. रुनी |
| ७० | १ जो. मारवीजे |
| ७१ | १ जो. राया |
| ७६ | १ जो. भीष्में |
| ७८ | १ जो. तिये कुमरी |
| ७९ | * मू. लक्षा |
| ८० | १ जो. गंगानंदनें |
| ८१ | १ जो. आपनया |
| ८२ | १ जो. कवन |
| ८३ | १ जो. वहुतापरी |
| ८४ | १ जो. गोत्रा |
| ८५ | १ जो. करावा. २ जो. जीवां |
| ८६ | १ जो. थोकले |
| ८८ | १ जो.वंदीजन. २ जो.शास्त्रज्ञ |
| ९१ | * मू. योधु. * मू. जोध |
| ९३ | १ जो. चालताती |
| ९६ | * मू. चतुर सीहानें |
| ९९ | * मू जाण |
| १०० | १ जो. आमीत |
| १०२ | १ जो. गेले |
| १०३ | १ जो. म्हनोनी. २ जो. आश |
| १०४ | १ जो. डोळीये * मू. क्षेमा आलिंगनें |
| १०५ | १ जो. शिहासनी |
| १०७ | १ जो. प्रतापीया संकीर्ती |
| १०९ | * मू. धरीला |
| ११० | १ जो. आती |
| १११ | १ जो. दी. |

११६ * मू. इश्वरेंसीं सरी तया

११७ १ जो. गानीयेपनें. २ जो. वाखानीजेती. ३ जो. मुखाचीया

११८ * मळांत 'कमळ श्वरतरु गायेन'

११९ * मूळांत 'प्रायेन'

१२१ १ जो. होशि

१२२ १ जो. परी

१२३ * मू. वर्नावया. १ जो. रूप० २ जो. घे. ३ तया

१२४ १ जो. तयाचेनी

१२८ १ जो. पवित्रें. २ जो. सकळ० ३ जो. सुत्रें. ४ जो. नीश्चळ

१३० १ जो. पावला. २ जो. देखिजेना

१३३ १ जो. आईकती

## प्रसंग तिसरा

१ १ जो. रंगस्तानी

३ १ जो. योगें

४ १ जो. आभरनें.

५ * मू. पादउका * मू. अंगीकां

१० १ जो. उतरीये पवतें

११ १ जो. केले

१५ १ जो. दृपदागें

१७ १ जो. पर्वत

२२ * मू. आठां

२३ १ जो. कोस

२५ १ जो. मुनीणें

२७ * मू. वळनि

२९ * मू. पुसीरदीप

३२ १ जो. पातां उंच * मू.पद्मावर्त

३५ १ जो. परीक्ष

४४ १ जो. उधाश

४६ १ जो. दक्षारन्ये

४७ १ जो. मनुस्यारन्ये

४८ १ जो. योगेस्वरी

४९ १ जो. श्रीगीरीवर

५१ १ जो. शिर. २ जो. शदावृत

५२ १ जो. क्षेत्री

५७ * मू. वह्नी

६२ १ जो. पुस्पमाळा

६४ १ जो. नारी

६६ १ जो: तीयेचेनी. २ जो. ध्नी ३ जो. बांधली

६९ १ जो. नीधी

७० १ जो. पडली. २ जो. श्रापें

७१ * मू. सर्वांगी

७४ * मू. सीता

७६ १ जो. नरा

७७ १ जो. येका लागुनि

७८ १ जो. वण्ही. * मू. आपुलीया

७९ १ जो. पावलीया

८० १ जो. येकयेका. २ जो. पर शेवीती ना
८१ १ जो. मधुरापान
८२ १ जो भीती
८६ १ जो. वीभस्ये
८८ * मू. आणि. १ जो. वंदी
९१ * मू. सीकरी. * मू. सेवती
९३ १ जो. जाचीजताये
९६ १ जो. कोपलया
९७ * मू. आंसु
१०० * मू. आहीळ
१०३ १ जो. नाभी मंडळी
१०४ १ जो. घर. २ जो. नीगीजे
१०५ १ जो. घडली

**प्रसंग चौथा**

१ १ जो. आळवीला २ जो.तुज
३ १ जो. आदी आंत शेवटीं
१२ १ जो. ऐंशे वीकट जे.
१४ १ जो. लांबकानी
१५ * मू. वाळुनि
१६ १ जो. भेडु लावीती
२० * मू. क्षेउद्धेते
२१ १ जो. कन्नोज
२२ १ जो. माळवा
२४ * मू. सगोत्र
२६ १ जो. बकुळ
२७ १ जो. चातुर्याची
२८ १ जो. पडीपर
३२ १ जो. आनीक
३४ * मू. जया युग युक्तु. * मू. क्रमी जती
३८ १ जो. मनी
४० १ जो. तयाशि
४६ १ जो. सुंदर २ जो. तयाशी
४७ १ जो. करनाट. २ जो. उमेठ
४९ * मू. वेडर
५१ १ जो. चौतीस
५२ १ जो. आठ
५३ १ जो. शत. २ जो. जाजना. ३ ही दोन नांवे जो. मध्यें नाहींत
५४ १ जो. चौशटी. २ जो. गौड
५६ १ जो. श्वेत
५७ १ जो. भद्रखानी. २ जो. ग्रंथी
५९ १ जो. कामीक्षारन्ये
६० १ जो. भुगपुर
६१ १ जो. वशतो. २ जो. प्रगाने ३ जो. शुवीये
६२ +ही ओवी जो. मध्यें नाहीं
६४ १ जो. भुवाश
६५ १ जो. चीनाश कुळ
६६ १ जो. मालपाचोर. २ जो. पाडी. ३ जो. येक्यानव
६७ १ जो. आठरा. २ जो. आकरा
६८ १ जो. आठ्याशी. २ जो.

सहीश
७० १ जो. कुरमंडल. २ जो. हाजी
७२ १ जो. जाकनौर. २ जो. लक्ष. ३ जो. त्रीगुन
७४ १ जो. मलीवाड
७५ १ जो. सहस्त्र. * मू. अस्त्रि-यांचे
७६ १ जो. शुबोध कामीनी
७९ १ जो. चालैल
८० १ जो. कवळीते.

**प्रसंग पांचवा**

३ १ जो. उत्तर. २ जो. दीशेचा ३ जो. लोक
६ १ जो. परीवार
७ * मू. गीतसंकु
८ १ जो. उत्तर २ जो. गुहे
९ १ जो. आज्ञाचीत्र. २ जो. दधीकोळश
११ १ जो. हींग
१४ १ जो. मेघनाथ
१६ १ जो. जानोनी. २ जो. आइका
१७ * मू. प्रस्तु लोहीत. १ जो. शयेनादी
१८ १ जो. बहीरदेसीचे. २ जो. शमर्थ
१९ १ जो. प्रजी
२० १ जो. गर्जत
२१ १ जो. भौमाशुराचा
२२ * मू. वैद्ये
२४ * मू. मल्ये.१जो. सयेवनाचा
२५ १ जो. म्हनवीताये
२६ १ जो बळ
२८ १ जो प्सुट २जो. शुध
२९ १ जो. महेशवतीचा २ जो. हैराजु ३ जो. अरीराये
३१ १ जो. प्रतापनयन २ जो. रनामजी
३२ १ मूळांत धुर्तराष्टराचा
३४ १ जो. पृदक्षनरावो
३७ १ जो. पदी घालोनि
३९ * मू. वानु
४२ * मू. कांति १मू. पांनीद्राते
४५ १ जो. कोश
४६ १ जो. प्रौड्रीक
४७ १ जो. पुर्शे
४९ * मूळांत 'जे पांच नीज वारु पळ कुंकुम जान'
१ जो. शिंग
५१ १ जो. जरासंद
५२ १ जो. राया २ जो. ईक्षातु
५४ १ जो. चव्हान
५७ १ जो. वाहावले
५८ १ जो. ब्रम्हध्वज
६३ १ जो. सुतश्रवा

६५ १ जो. आगधत्वाचा
६६ * मू. तया सारिखा
७० १ जो. बंधुवर्गासी
७१ १ जो. गो. दिसे
७४ * मू. मज्ञार्नवीचा
७७ १ जो. आंगरागु
८० १ जो. गो. राये
८२ १ जो. आपनया
८५ १ जो. सकल कला. गो. ० कले
९० १ जो. शिसोळीचा गो. सींसौलिचा
९१ १ जो. त्रीपुरारीलागी
२ जो. साचें ३ जो. जोतीवट केशा
९३ * मू. उदारें
९६ * मू. रनसेखरें
९७ १ जो. गो. द्राक्षरामाचा
२ जो. सेकर गो. सेखरु
९९ * मू अवंग गो. अंव्र
१०० * मू. ऐसाची बुधीं गो.० बुंधि
१०७ ± मू. आज्ञ
१०८ १ जो. गो. पागारीचा
१०९ १ गो. आही २ गो. अनार्ते
११० * मू. कोळमीचा * मू. इंद्र ही ओवी गो. मध्यें नाहीं
१११ मू. से
११२ १ गो. चातुरंग
११४ १ जो. आक्षीर कीर्तीचा
११६ १ जो शुल
११७ ± मूळांत 'रनयोध्यु'
१२० १ गो. येकैक २ गो येकैका
१२२ १ जो. शंपन्न
१२३ १ जो. कडे
१२९ १ गो. भीमकीची आर्त
१३० ± मू. आइकतां

## प्रसंग सहावा

४ १ जो. गो. आयो
६ १ जो ऋेत; गो. ऋेथी
७ १ जो. भृत्य; गो. भुर्तु
९ * मू. वसुदेवाचा
१० △ मू. सुरा
११ * मू. फेडी
१५ १ गो वर्नवेना
२२ १ गो. जो जुंझो २ गो. पुढिलेयावरि
२३ १ गो. पुढां दे
२४ १ गो. पुरौनि
३२ १ गो. धिकु
३४ १ गो. पाया
३५ △ मू. अस्त्रिया
४१ १ गो. सुंदरु
५० १ जो. शजन साळांका
५७ १ मू. दाहाढां
६० १ जो. गो. चोरुन
६१ १ गो. धरौनिया

६४ १ गो. जो. वरठा
६५ १ जो गो. आले
६७ १ जो. उपटोनी २ जो. टाकिला. ३ जो. गो. सतचुर्न
६८ १ गो. मदनोन्मत्त
६९ १ जो. कुळें
७० १ जो. सळशि. २ जो. बळिभद्र
७३ १ गो. जो. दृष्टिसवें
७५ ० मूळांत 'सौन्ये'
७७ १ गो. निसंकु., जो. नीशंग
७९ १ जो. वशवीली
८० १ जो. वशवीली
८२ △ मू. 'अंकना'
८३ १ जो. गो. पावावेया २ गो जो. देव
८७ १ गो. मध्ये 'अद्यापी' शब्द नाहीं
९० १ गो. चुकत्रै
९७ १ गो. फेडीसी
९८ १ गो. महात्मा
१०२ १ जो. 'अज्ञाना ब्रम्हविद्या नेनती'
१०४ १ गो. गुंफोनिया
१०५ △ मू. हिणौनि

**प्रसंग सातवा**

१ १ जो. महत्त्व
८ १ गो. होइल
१४ ० मूळांत व गो. मध्यें 'सांगीती'
१८ १ जो. नाश
१९ १ गो. जो. भुतें
२१ १ गो. जो. गोठन
२३ १ गो. धुतु
२५ १ जो. गुरु
२६ १ जो. नटवे
२८ १ गो. तुडपाड. २ गो. अंकने जो आईकने. ३ गो. छदरास ४ गो. कैवारू
२९ ० मू. सभे
३१ १ जो. बहुत
३२ १ जो. शाध्ये., गो साराध्य
३४ १ जो. आशेचो
३६ १ गो. साता. * मूळांत 'वानीया'
३८ * मू. 'तया'
३९ १ गो, सु०
४१ १ जो. भुमि
४३ १ गो. जिये
४९ १ जो ना तुं; गो. तुं.
५० △ मूळांत 'श्रृतां'
५७ १ जो. हरीचंदन
६२ १ जो. जन
६७ १ गो. सामान्य
७३ △ मूळांत 'स्थितु'

७७ △ मूळांत 'चरन'
८२ १ गो अभार
८३ * मूळांत 'जया'
८७ १ गो. जो. तेजीयासी
८९ १ गो.खेडलेन.२ गो. मतियांतु
९३ १ जो. हातें
९४ १ गो. मागतेयासि

## प्रसंग आठवा

३ १ जो. मध्यें हा शब्द नाहीं १-२-३ गो. 'श्रित्वाचें वोसान'
५ १ जो. गो. ज्वाळा २-३ जो. शाडीताये वेगें
४ जो. किन्नराकडे
६ १ गो. वरनें
८ १ जो. गो. बहुतां
१४ १ जो. हाशीनला
१८ १ गो. व जो. मध्यें हा शब्द नाहीं. २ गो. जीभे
२० १ जो. पातीयेना. गो. पातीजेना
२१ १ जो. आती जीभटाचा
२३ १ जो. कौशाल्ये. गो. कौसल्याचा. * मू. असे
२४ १ जो. जन
३१ १ जो. गो. तेयाचेनी नामें
३३ १ गो. जो. पुरुषचि
३४ १ गो. रुषी इछिति
* मू. अस्त्रीत्व △ मू. नर
३६ १ जो. तयाते
३७ १ गो. जो. फेडी. २ गो. जो. आपणपें
४४ ± मू. मोडीला
४६ १ जो. गो. अघु
५० २ जो. आज्ञुनि
५५ १ जो. गो. नीधान
५६ १ जो गो. लावीला
६१ * मूळांत 'गराळा'
६३ * मूळांत 'वैसेचीया'
६७ १ नीस्यान
७० १ जो. सोहोद्रा २ जो. शोयेरयाशी. गो. सुहृदासी
७१ १ जो. गो. वीरहो

## प्रसंग नववा

१ १ जो. आसंका
८ १ गो. उगीया
९ * मू. सुंदरी
११ १ गो. करीत्याती
१४ १ गो. प्रतौनि
१७ १ जो. गो. हातौनि
१९ १ गो. पाहाताती
३२ १ गो. तीचे
३६ * मू. वळें १ गो. रांगोळी. जो. रांगवळी
३७ १ गो. विदानी

४१ * मू. चंदीचें
४४ १ गो. पळिया
४५ १ गो. निहटे. २ जो. आती-
सयेशी. गो. अंसी
४६ १ गो. विग्हो प्रकटला
४८ १ गो. जो. पंचाग्नी
४९ १ गो. आंगावरी
५० १ गो. जो. तीथे
५२ १ गो. मध्य. २ गो. चांदिना
५३ १ मूळांत 'नाभी'
५७ १ गो. चंद्रकांतिचिया. जो.
इंद्रकांताचीया
५८ १ गो. सुभ्र २ गो. उज्जळ
६१ * मूळांत 'वोवंळला'
६३ १ गो. चंदन. २ गो. भीम-
तनयेचा
६५ १ गो. वाजवीती
६६ १ गो. आळवीताती
६८ १ गो. मुर्ति
७१ १ गो. भक्तां रक्षपाळ समर्थ
७४ १ गो. पावै
७६ १ गो. अशरिरी
७७ १ गो. झळंवली
७८ १ मूळांत 'हीतक्षा'
८३ १ गो. नंदनवनाचिये
९३ ३व४ हे दोन चरण जो
मध्यें
'तेथें त्रीवीधताप छेदी हे
नामः नवल तयासी'
११३ ±मूळांत 'भुत क्षो करीतां
संचारु'
११५ १ गो. समति
११६ १ गो. पीडा दग्धु
११९ १ गो. जो छंदु
१२१ १ गो. मद्दों हा शब्द नाहीं
१२२ १ गो. जो. सींपीले
१२४ १ गो. निरधारी
१२८ १ गो. संसर्गु
१३१ १ गो. माझा
१३२ १ गो. 'तवनी' शब्द जास्त
१३७ १ जो. गो. 'माझा जीव
कुडी'
१३९ १ गो. जो. विकारु
१५१ १ गो. एथ
१५५ १ गो. उघडौनिया
१६३ १ जो. गती चालने तयाचें
१६६ १ गो. राखिला
१६७ १ गो. दावीन
१६९ १ गो. दीपार्तिया. २ गो.जो.
'सवासीनी भेटलीया'
१७४ १ गो. ओहरवरी
१७५ १ गो. कावली २ गो.
दक्षिण. जो. वाम
१७६ १ गो. वदिनले. २ गो.
जातील .
१८२ १ गो. रात्री दिवस. २ गो.

सदाफळा

१८३ १ गो. अमृत
१८५ १ गो. क्षोरें
१८८ १ गो. इछे
१८९ △ मूळांत 'सवीलासी'
१९० १ गो. बळीभद्राचीया
१९२ १ जो. सन्मानु २ जो. उदकें
१९३ १ गो. मीरवती
१९४ १ गो. खेळती
१९६ १ जो. आन्नछत्र
१९७ △ मूळांत 'सवीलाते'
२०१ १ जो. गो. कढे. २ जो. गो. तावीताती. ३ गो. जो. आलेया
२०३ + गो. मध्यें 'साधु' शब्द जास्त
२०४ १ जो. द्वैत २ गो. भक्तिवादीये
२०९ १ गो. म्हनेति. २ गो. जावेयाचे
२१२ १ गो. सह पंक्तीवीन (१ आंकडा पंक्तीवीन जवळ)

## प्रसंग दहावा

१ १ गो. द्वारावती
२ १ गो. जेथ
४ १ गो. पवेती २ गो. अंबरावती
८ △ मूळांत 'नगर नारी' २गो.

परोपरी

१० १ गो. संसारे सीनलेया
१२ १ गो. जो. चंद्र सुर्ये
१७ △ मूळांत 'की:कादी'
१८ १ गो. जो. परंपरा
२० * हा शब्द मूळांत नाहीं φ गो. 'मग पारीचि पंथीं : पुढां नीगता जाला'
२१ १ गो. जो. आगाध
२४ १ गो सेवकेंसीं
२७ १ जो. सैन्ये
२८ १ गो. आठावरी. २ गो. सा
२९ φ गो. मध्यें 'येकीं' शब्द जास्त
३२ १ गो. समस्त
३८ १ गो. जो. अल्पामती
४३ १ गो. वसंते
४६ १ गो.० वनीं
४८ १ गो. सरि
५३ १ गो. सुर्ये कीर्नें
५५ φ गो. मध्ये 'सुखाचेनि स्थुल जाला'
५८ १ गो. मध्यें चरण मागे पुढें झाला आहे.
५९ १ जो. पाली. २ जो. गो. मम्हार
६१ १ गो. जें
६८ १ गो. हेमकुटें

७१ १ गो. जो. सरें
७४ १ गो. जो. गंभीरी
७५ १ गो. जातिफळांचे. २ गो. घोस
७६ १ गो. द्राक्षे. २ गो. जो. अवधारी
८० △ मूळांत 'तंव म्हने बनकरी माळी'
८२ १ गो. थांबे
८३ १ गो राहे. २ गो. 'बाळार्क सुर्यें करीं'
८७ * मूळांत 'सीपेत'
९३ १ गो. जो असेति
९७ △ मूळांत 'नाही मीती'
९८ १ गो. डोलताये
९९ ± मूळांत 'भ्रमरांचें'
१०२ १ गो. दीव्यजोतो., जो. चंद्रजोती ϕ मूळांत 'भरीली'
१०३ १ गो. जीये
१०४ १ गो. जिये गेलों
१०५ △ मूळांत 'पींडा'
१०७ १ गो. धालें
१०९ १ गो. स्थळ
१११ + गो. मध्यें ११० व १११ मधील कांहीं चरण गाळून एकच ओवी केली आहे.
११६ + मूळांत 'कालउनी'
११७ १ गो. उधवला., जो. विखुरला
१२३ १ गो. सपींवळ
१२६ १ गो. जो. लोपे. ± मूळांत 'तापें'
१२८ १ गो. देहां
१३० १ गो. जो. श्रीखंड
१३२ १ गो. चंदनासी
१३४ १ गो. अधो
१३९ १ गो. वीपरीतापरी
१४० १ गो. मोहनी जो. राजधनी.
१४२ १ गो. लोटेवरी
१४४ १ गो. उसरानि
१४६ △ मूळांत 'श्रृतां'

## प्रसंग अकरावा

१ + गो. 'आठ गण संभौग भुमीं सुहावे'
३ + गो. रेवती तापी
५ व ६ + या दोन ओव्या गो. मध्यें नाहींत
१४ १ गो. अवजड
१५ १ गो. बंध मेदनी
२१ ϕ गो. चौताळीस सतें १ जो. चेयेताळीस येकशे
२२ १ गो. हस्ती * मूळांत 'सात स्वार' गो. शत असिवार
२३ १ गो. दाहा

२७ १ गो. जो. चुंबीत
२९ + गो. जो. 'माडे' शब्द जास्त. १ गो. विद्यावतितें., जो. विद्यावंतातें
३५ △ मूळांत 'भासती'
३६ १ गो, हीरे. २ गो. वानितायें
४४ १ गो. लक्ष २ गो. हरि
४५ १ गो. वसीणली
५१ १ गो. आंतु
५५ १ जो. गो, परब्रम्ह जान
५६ △ मूळांत 'स्मृती'
५८ १ गो. जो. वेदवीद. २ गो. चांग. ३ गो. सुआंग
६१ १ गो. सधरें
६२ १ गो. मंडळीया
६८ १ गो. अगडबीदी. २ गो. आठ आठां
७० △ मूळांत 'अठरा'
७१ φ मूळांत 'प्रसीध'
७२ △ मूळांत 'पन्हरा'
७४ △ मूळांत 'राजबीदी वीचीत्रें'
७७ १ गो. सतेज
८० १ गो. जो. दुष्टभावें २ गो. जो. करीती
८१ १ गो. जो. मागौते
८४ १ गो. दारवंठेया पासी
८६ + गो. मध्यें 'दीसे' शब्द जास्त
९१ १ गो. द्रभस्त
९२ १ गो: अफाटे
९३ १ गो. खंडीचेया
९४ △ मूळांत 'स्थुळ'
९५ १ गो. राखावयासी
९८ ० मूळांत 'मृंर्तु'
१०१ १ गो. आरीखपनें
१०३ △ हा शब्द मूळांत नाहीं
१०८ १ गो. येचि भुमिकेवरी. * मूळांत 'कांमतुराचे'
११३ १ गो. जो. ताजुवा
११५ १ गो. जो, काइसेनि
११७ १ गो. आधारु
११९ * मूळांत 'पुडे' सांकेतिक पु (=चु) तसाच राहून गेला आहे
१२० १ मूळांत 'सीपाटी'
१२१ * मूळांत 'चमंत करती'
१३१ १ गो. जो. सोवासिनी + गो. जो. मध्यें 'तबकीं' शब्द जास्त
१३६ १ गो. सनादे
१३७ १ गो. जो. वीचीत्रें. २ गो. अमृतसिंधु * मूळांत चरण 'तेथ अमृत सीधरसु कामवेतें अन्नें वीचीत्रें'

## प्रसंग बारावा

२ * मूळांत 'क्रमेणि'
३ △ मूळांत 'दामोदर'
६ १ गो. जो. नमस्करीलें
१० १ मूळांत 'रींगाला., गो. चालीला
१२ १ गो- कामवीले
१९ १ गो. सुरंगा
२४ १ गो. देखिलीया
२९ १ गो. तीये
३० १ रक्तांबरा. २ जो. नेहटी. ३ गो. जो. बळ
३३ + ही ओवी जो. मध्यें नाहीं
३४ ± मूळांत 'चौडक'. ± मूळांत 'रणबागुल'
३९ १ गो. महाशूर २ गो. जो. नागवति
४२ १ गो. सुंदर
४८ १ गो. लावीली., जो. सींहासनीं लागली
५२ १ गो. अलखला * मूळांत 'आंकुरैला'
५३ १ गो. वोळगे
५६ १ गो. शोभे
६० १ गो. जो. मध्ये हे दोन्ही शब्द नाहीत
६२ १ हा शब्द गो. जो मध्यें नाहीं
६३ * मूळांत 'इंद्राचें'
६५ १ जो. गो. मुगुट
६८ * मूळांत 'नंदनु'
७१ * मूळांत 'नृती'
७६ * मूळांत 'सरानें'
८० १ गो. जो. भेटलेयावरीं
८२ १ गो प्रनुं
८३ △ हा चरण मूळांत गळला
९२ १ गो. कीजोजी
९४ १ गो. जो. आवस्वरीं
९६ १ गो. वेदादिपरा
९७ △ मूळांत 'प्रनीपातु'
१०० गो. जो. पडली
१०२ १ गो. तरि
१०३ ± मूळांत 'दाखवावा'
१०५ ± मूळांत' मानवलें' १ गो. म्हनेति. जो. म्हने
१०७ १ गो. कीजे
११३ १ जो. ते

## प्रसंग तेरावा

४ १ गो. सावध
९ १ जो. गो. लेताति
१० १ गो 'चवरें बानिताति'., जो. चवरें बाधीताती
११ १ गो. जो. करी
१३ १ गो. सन्नाध. २ गो. साउमें
१४ १ गो. जो. सांघैन
२५ १ गो. सावधया

२७ १ गो. जो. वळावें
३३ * मू. उठौनि. १ गो. जो. सिंहासनावरी
३६ १ गो. स्नेहेकार्ये
३८ १ गो. जो अवघे
४१ १ गो. जे नेंउ

## प्रसंग चौदावा

४ △ गो. मध्यें 'आनि' जास्त. १ गो. गानी
५ * मूळांत 'नांताचीना' ± मूळांत 'कीळीतमा'
६ १ गो जो. श्रीकृष्णाचेनी
९ ± मू 'काळाचे'
१४ १ गो. न्हाती
१६ १ गो. दर्पहरनु., २ गो. करीताये
१७ ± मू. 'गुन'
२० १ गो. संध्यारागीचे. जो. संध्यारागी
२५ १ गो जो.जाल्होर २गो मूंगसे
२६ १ गो. हेमगीरोचे
२७ – १ गो. सागर देसीचे, जो. सिंधुदेसीचे ± मूळांत 'गती वेडे'
२८ १ गो जो सींगळदीपीचे. २ गो. जो. गरुवे
३१ १ गो. आवघे, जो. आनर्घ
३२ △ मूळांत 'वरांगिया'
३८ △ मूळांत 'योध्ये'
५१ १ गो. जो. देववाहान २ गो. जो. पादुकासिद्धी
५२ १ गो. घर
५५ १ गो. चालताति
५६ १ गो. सात्यकी
५७ १ गो. जो पुस्वकी
५८ १ गो. आमीत
६० १ गो. तेथ
६३ + गो. जो. मध्यें 'दमामे' शब्द जास्त. १ गो. दमंक
६५ ± मूळांत 'वान्हांवयांचिये'
७० १ गो. तळीं
७२ १ गो. जो. भरली. २ गो. जो. दुपाहारी
३ गो. जो. वैदर्भदेसासि
७७ १ गो जो. राया. २ गो.जो. समर्थ
७९ १ गो. समुचाकारीं
८२ १ गो. तीयें २ गो. धरनीयेवरी
८५ १ गो. मग
८७ १ गो. जो. समोर
९० १ गो. सिमुरिं. जो शामोरी. २ गो. काठीवरी,. जो. काठोयावरी
९५ १ गो तेनें. जो. तेथें
१०० १ गो जो. न साहेसी

१०९ १ गो. कवनीं
११२ १ गो. राज्यमंदिरा
११३ १ गो. संबंदु
११४ १ गो. जो. तोसला
११५ १ गो. व्यवस्ता
११७ १ गो. जो. मधील
१२९ ± 'जो. पुढे आसे कथा आनु शंधान' मूळांत हें चरण नाहीं. १ जो. आमराशन
१३२ १ गो. जो. देखे
१३३ १ गो. जो. साती
१४० ± गो. 'उमचो काइसेनि'
१४१ १ गो. सामान्य
१४४ १ गो. करौनि
१४६ १ गो. जो. निवर्तला
१४९ १ गो. तुररी जो. कुशरी
१५९ १ गो. उसंगाचें
१६१ १ गो. उभिया
१६३ ० मूळांत 'सेयाणां'
१६७ १ गो. उपरिया. २ जो. उन्मेसा
१७४ △ मूळांत 'धरीलें'
१७५ △ मूळांत 'देखे'
१७६ ± मूळांत 'जण'
१७७ १ गो. अनुपम्यु
१७८ १ गो. जो दंडवत
१८० १ गो, उठौउनी २ गो. जोडौनिया
१८७ १ गो. कीजो
१९६ १ जो. रुशेश्वर
१९८ १ जो. लांबवीला
२०० १ गो. जो. पाटीं २ जो. रातोत्पळाची. * मूळांत 'सुटी' ४ जो. त्यावरी., गो. सावैरी. ५ गो. दोदेयांचा
२०१ १ जो, न्नीर शयाश
२०३ + जो. 'देवें देववीली' जास्त
२०६ १ गो. निरुति
२०७ ± मूळांत 'अघारु'
२०९ १ गो. वीस्तारुनि
२१० १ गो. पांती; जो. सहपंक्तीं
२१४ १ गो तेयाचियें; जो. तीचीया २ गो. जो. सीहानीवेसी
२१७ १ जो. कही.
२२० १ जो. राखै
२२३ ± मूळांत 'जैसें धर्मं तै प्रभवौनीं मेदीनी: आनि आधर्मु बैसे सीहांसनी'
२२४ ही ओवी गो. मध्यें नाहीं
२२९ १ गो. ताटें + गो. 'अनुक्रमें' शब्द जास्त
२३५,२३६ १ गो. जो. गुळळा
२४६ ϕ मू. 'सीरीं'
२४९ ϕ मू.'जो उमां कौस्तंभावरीं'

२५१ १ गो. सखिजनेंसीं

## प्रसंग पंधरावा

३ १ गो. जो. अल्पामतीं
५ १ गो. जो. सृष्टी
६ १ गो. जो वोतिलीया.
* मूळांत हा शब्द नाहीं
७ ϕ मू. 'आतां सिफुटलें आणि नीळोत्पळें' १ गो.०कांतीसी
९ १ गो. वोळगौनीयां
१५ १ गो. झणकारु
१७ १ गो. आसे मीर्वत
१९ १ गो. जो वानु
२७ १ गो. जो. भुजांवरी
३६ १ गो. नीगुती * हा शब्द मू. नाहीं. २ गो प्रकृति
४० १ गो. निगुती
४१ १ गो. सुप्रसन्न
७३ १ गो. विशइ. जो. विशेष
४६ १ गो तैसी
४९ १ गो. शोभे
५१ * मूळांत 'प्रधाने' २ गो. झळाळीताति
५३ १ गो. जो जेहीं

## प्रसंग सोळावा

५ १ गो. जो. अवधारा २ गो. जो. हांकारा. ३ गो. जो. श्रीसारंगधरा
१२ १ गो. जो. देखिलेया
१८ १ गो. जो. उठैल
२१ १ गो दुजा
२५ १ गो. पाठींघरा
३१ + गो. मध्यें 'मुनी' शब्द जास्त
३६ १ गो. जातां अंबरीं +मूळांत 'आंतरीक्षु' शब्द जास्त
४५ १ गो. तिये
४६ १ गो. पालटीन मीं
४८ १ गो. बैसवीली २ गो. मंगलोच्चार
४९ गो पायेवणी
५२ १ गो. जो. लोक २ जो. वाक्य
५४ १ गो 'सुनि घालिजे वरी'
५५ १ गो. तिये
५६ १ गो. जो. दत
६२ १ गो जो न कोपसी

## प्रसंग सतरावा

३ + गो जो. 'पुढां' शब्द जास्त
५ १ गो. जो. विप्रराजा
१२ १ गो. जो. उषे
१३ १ गो. अपरमीतें '...' १ गो. मातें सरनागतातें २ गो. न विसरावें देवा
१७ १ गो. जो, आमीत
२१ १ गो. जो. लागलें
२२ १ गो. जो. लावीलें
३३ १ गो तियें

३४ १ गो. जो. क्षोनीं
३७ + मूळांत '०जाला आहे : मेली कारु'
५५ १ गो. आसो
५६ १ गो. सीतला
६० + मू 'वोवाळनी०'
६१ △ मू 'उद्धवार्जुण'
६३ १ गो. सन्नद्ध
६८ १ गो. हरौनियाँ
७२ φ मू 'आणि नेमांच' + गो. 'ये' जास्त
७३ १ गो. खोळैन. २ गो. हरौनि
७७ १ गो. येउन
७९ १ गो. येतु
८१ φ मू. 'पावले'
८२ १ गो. जो कवनीया २ गो. जो. देखा
८८ १ गो पाहालें
८९ १ गो. मुखालिंगन
९१ * मू. 'मनें'
९६ १ गो. होइल
१०२ १ गो. सिद्धीती; जो पुरती २ गो. मनोर्थ
१०७ △ मू 'उदपांण'
१०९ φ मूळांत 'अंबिकादासु पुजाणा'
१११ φ मूळांत 'मग रानेंयेनि'
११४ १ गो माजि
१५ १ गो. स्याहाडे

## प्रसंग अठरावा

५ १ गो आंता
७ १ गो. तया
९ १ गो. वर्जा
११ १ गो. सकळै
१२ १ गो नीतीमंत; जों नीत्ये-मंत
१८ φ मूळांत 'मनीं'
२० १ गो. जो. क्षेत्री नाहीं
२१ φ मूळांत 'तव' १ गो. जो. आणिक
२२ φ मूळांत 'यादव देसीं'
φ मूळांत 'आनिक'
२७ १ गो करवावी
३० १ गो जो. ऐसी
३३ १ गो रुषीभार्या २ गो. जो. देवकन्यांसीं
३५ १ गो. खोलती
३६ १ जो. मीनले
३७ १ गो. जो. भृत्यु
३८ १ गो. मेघपटळ, जो. मेघ-मंडळ
४८ १ गो. उपाहरु २गो दाखौनि जो. दाउनि
४९ १ गो जो. जीव
५३ १ गो. जो. 'तरी मज मेळवी कैवल्यपती : श्रीकृष्णरावो

५४ १ गो. अशरीरी. जो. आश्रनी
५७ १ गो. जो. मेळउनी.
५९ १ गो. जो. वैसत्रीले
६० १ गो जो. आसीर्वाद.
६४ १ गो. हातीयेरे २ गो गळाली
६५ १ गो विश्वजननी.
६६ १ गो. जो माडावरौनी. २ गो. जो. 'तत्रं माहाभार नेत्रीं : देखिले रायांचे'
७० + गो. मध्यें 'कवन' शब्द जास्त
७१ १ गो. जो. सर्वजाण.
७४ ϕ मूळांत 'मीरवेतो'
८३ १ गो. दखे.
८५ १ गो. असमसास
८९ १ गो. थीरावला २ जो बृहस्पती.
९० १ गो. जो जोगावी.
९५ * मू. 'वर'
९६ १ गो. हारीली

## प्रसंग एकोणिसावा

१ १ गो यादव २ जो. सरसावलें
२ १ गो. श्रीयादवांसहीतु
३ १ गो आरुढले.
५ ϕ मूळांत' द्वारका ' * मूळांत 'खुती'
८ १ गो. वरीं २ गो. सोभती.
१४ △ मू 'रस्मीं'
१७ १ गो करीत.
१८ १ गो. 'दोहीं पांखी करौणि देवा करीनाये नं वलोन'
२० १ गो जो घाघाटे २ गो. जो. क्षीनी.
२२ ϕ मू. 'द्वारुकापती'
२३ * गो तुरंग मू 'वारु तुरंग'
२६ ϕ हा शब्द मू. नाहीं.
२८ १ गो. जो. नवरत्नांचीया.
३० १ गो कैवल्याचें.
३५ १ गो. संहारु.
३६ १ गो. जो. वोभाटी. + गो. जो 'टीळकु 'शब्द जास्त २ गो. कस्तुरीचा.
३७ १ गो. सुनीळ.
४६ १ गो. जो. देवदत्तेंसीं.
४७ १ गो. अती
४८ १ गो आमुला
४९ १ गो गंभोरों
५० १ गो. एकैकाचा
५३ १ गो. सन्नध्द
५८ १ गो 'तेथ वाराहाचि ो दाढे' जो. मध्ये हा चरण गळला आहे.
६३ १ गो योध्याचा
६६ १ गो जो चाले गर्जतु
६७ २ गो. जो धात्रता

६९ * मू. 'येते'
७४ १ जो. 'आजि रुक्मीण णेईल रुशीकेसी'
७८ १ गो कोपक्ले ४.२ गो. उद्धवदेवा
८० १ गो. तुमचा
८१ + गो जो. 'येतां' शब्द जास्त
८५ १ गो. जो धांवती २ गो. जो घ्या घ्या ३ गो जो. म्हनौनिया
८७ १ गो जो. भुवनीं.
८८ १ गो जो. नीरमे २ गो जो. नासीले
९३ १ गो. जो. देवी
१०२ १ गो जो 'आंतु बींवला दीसे'
१०३ * मू ठांत 'आतमा उभिते गती' १ गो. मांडिली
१०५ १ जो समोव्रर्तते
१०६ १ गो वोगुन्यावो.
१०८ φ हा शब्द मू. नाहीं
१०९ १ गो नेला * मू. 'वैसलो' φ मू भोगे' २ गो नाचती देवो
११० १ गो जो. सोभताती
१११ १ गो. म्हणताति, जो. गाताति २ गो. जो. देव.
११२ * मू 'घालील'

**प्रसंग विसावा**

१ १ गो. जो. नवरसीं
४ १ गो जो. कहीं
१२ १ गो. जो. वीरु.
१५ १ गो विभत्से जो वीभस्ये
२० १ गो. हाकारा २ जो जाला.
२४ १ गो. भेदोनीयां
२५ १ गो जो माळवली
२६ १ जो. मेहेसी (महसी?)
२८ १ गो. करुं
३६ १ गो. भुजों.
३७ १ गो. हाहाकारु.
३८ १ गो. करा २ जो 'तो म्हने पालाना रे पालाना दळभारु'
४१ १ गो. वोळले २ गो. देयावी
४२ १ गो ग्राशील.
४३ + गो. मध्यें 'यांसी' शब्द जास्त.
४६ १ गो. खाडेयाचां, जो. बानी गां जीवाचा
४८ १ गो. करीन मीं
५०, ५१ * या दोन ओव्या गो. मध्यें नाहींत.
५४ १ गो. जो. दासीचि
५५ १ जो. उन, गो. उनें-
५६ १ गो. लाठी.
५७ १ गो. विस्तारु.
६२ १ गो. जो. वीररावो.
६३ १ गो. तुगंण तुगंण २ गो.

वाजत ३ गो. जो. गर्जताये

६६ १ गो. फुटती, जो. उमटताति

६९ १ गो. सागरीं

७१ १ गो. हीयें

७४ १ गो. जो. 'तवं डांगीए मागौते वळताती'

७६ १ गो. जो. न वीचारीत

७८ १ जो पदरीं △ हा शब्द मूळांत नाहीं २ गो. यादवेसी

७९ १ गो. माझारी

८१ १ गो. जो. जालें

८२ ɸ मूळांत 'उनंतु'

८३ ɸ मूळांत 'मटे' जो. झगडे

८४ १ गो. मारौनी, जो. मानी

८६ १ गो. जो. राहिले

८७ १ गो. उत्ताडाचे, जो. चैद्याचे

८९ १ गो. वरी

९० १ जो. वारीले △ मूळांत 'झेलीताती'

९२ १ गो. जो. सैरा

९५ १ जो. 'तवं रथाचेनी घड घडाटें'

९७ १ जो. मीठी

९८ १ गो. जो. मोडती

१०१ १ गो. इडेंपाडें, जो. वीडेंपाडें

## प्रसंग एकत्रिसवा

२ १ गो. जो 'परी जुंझता याची कळाकुसरी न कळे कन्हणा:

४ १ गो. जो महाकाळासी

६ १ गो. नीवडा

७ १ गो. जो. 'ते आइका पां'

१२ १ गो आपनयांसी

१८ १ गो. जो. जीर्णें

२२ १ गो. सन्नद्ध

२६ + गो मध्यें 'घेयावेया' शब्द जास्त १गो त्या

२८ * मूळांत 'सैन्ये' गो. 'सैल्यु राहिला असे'

३४ + मूळांत 'बानु' एक जास्त, अर्थात् चुकीनें

३८ △ मूळांत 'केशरीं' सांकेतिक 'श' चा 'स' न केल्यामुळें

३९ १ गो. जो. आनोझा

४४ ɸ मूळांत 'परमानु' जो. मध्यें ही ओवी अर्धवट व चुकीची

४५ * मूळांत 'आवडीं'

४७ १ गो. सकळिक

५० १ गो. तें २गो. कवणासीं

५५ १ गो. जो. नीकीया प्रौढी

५७ १ गो. उठै

६२ १ गो. जो. यावाका

६३ ɸ मूळांत 'तीवरत्व'

७० १ गो. देखों

७१ १ गो. आवो, जो. ऐसी

७४ १ गो जो. कवतुकें
७८ १ गो. जो. जेथ
७९ १ गो. जो भास्करु
८६ १ गो. जो. खुडौनि
८८ १ गो जो खुडौनु
९० १ गो जो. शत
९२ * मूळांत 'केलीया'
९३ १ गो. जो. प्रकटली
९६ १ गो क्षेत्रपाळु
९८ १ गो. तेंचि
१०१ १ गो. जो. अवकाळीं
φ मूळांत 'वोंवळले'
१०२ १ गो. जो. गर्जताये
१११ φ मूळांत 'ऐसें'
११२ १ गो. एथ
१२३ १ गो. जो. सत्य
१२४ १ गो आपुला
१२७ १ गो. वीर ही ओवी जो मध्यें नाहीं
१२८ १ गो बाणें बाण नीवारीतीः २गो. लगती
१३१ २ गो. जो. भले
१३६ φ ही ओवी मूळांत नाहीं
१३७ φ मूळांत 'हारवील'
१३८ φ मूळांत 'येरांयरीं'
१४५ १ गो. आतुडलासी
१४६ १ गो मागां २ पावला कृष्णा
१४८ गो. सरला
१५५ १ गो. जो. पुरिजे
१५८ १ गो कपाळें जो. कुंभस्तळ
१६६ १ गो. आळंकारु वस्त्रें
१७४ १ गो. जो यांचा२गो तुमचा जो. रे तुझा
१७६ १ गो जो. वोढी
१८२ +जो. मकरतोंडेसी १गो. मेळौणि; जो. मेळउनी
φ मूळांत "धरणी"
१८४ १ गो. जो. हाहाकारीं
१८८ φ मूळांत "यादवांचा"
१८९ १ गो. येकवाट
१९१ १ गो. हींसळताती जो. उशाळताती
१९५ १ गो. पडताती २ धांवताती
१९६ १ गो जो. म्हनें
१९७ १ गो. जो. चेंडुफळी
२०१ १ गो. व जो. मध्यें 'रणी' नाहीं
२०७ १ गो. झडकरी
२०९ १ गो. वागें वाळौनिया
२१० १ गो. जो. आडवा
२११ १ गो. जो. पळतां साजे २ पळिजे
२१३ १ गो. पन्नकास्त्र
२१४ १ गो धुधाती जो. धुधुवाताती
२१८ १ गो. गरुडची जाले

२२१ १ गो. जो. चांचपुटीं
२२३ १ हा शब्द गो. व जो. मध्यें नाहीं
२२५ १ गो वाउधनें
२३० १ गो. वरिषत
२३२ १ गो. वज्रें २ गो. जो सुनीं
२३३ १ गो. वरुषिया, जो. वर्सीया
२३४ १ गो. जो. इंद्र यादव
२३५ १ गो. जो मोहीलें २ हीरती
२३६ १ जो तुरंबीताती
२४० १ गो वोपिती
२४३ १ जो. थापवेऱ्ही
२४४ ϕ मूळांत "उन्नंत"
२५० १ गो. जो. साटवेऱ्ही
२५२ १ गो. पारणे जो. घारणें
२५३ १ गो क्षणभरी
२५७ १ गो. आला
२६१ १ गो. पळाले
२६४ ϕ मूळांत "तण"
२६७ १ गो जो. मातेची
२७९ + गो. जो "नृप" शब्द जास्त ϕ मूळांत "मग"

## प्रसंग बावीसावा

१२ १ गो दावो
१३ × जो तुमची १ गो. मती
१४ १ जो. सारवनें
१५ १ गो. जो. घावो २गो वर्म बोलतां सीहानें जो. वर्म बोलतां सीने सीहानें.
१६ १ गो. जो. आंगी
२० १ गो. दैवा
२२ २ गो जो येसचि
२५ १ गो. कें
२६ १ गो. वेगळेंची
३० १ गो. यादवेंसी २ वृथा
३२ १ गो. प्रऱ्हायेचि
३३ १ गो. जो हाकीतु
३६ १ गो. जो. आपमान २ गो
३८ * मूळांत "सोयरेया" ϕ मूळांत "हांसीजताये"
४६ १ गो. जो. तीये वेळीं
५७ १ गो. जो. वीसरला
६१ ϕ मूळांत "क्षेवनुणीं" ϕ गो. मूळांत "भूताश्व"
६२ १ गो. जो. खांखाळे
६९ १ गो. लाळित, जो. लाळिताये
७३ १ गो. नरसींहा २ वीराचा
७५ १ गो. नखेंवरीं, जो. नखें
८४ १ गो जृंभकास्त्र
८५ १ गो. जो. निदसुरेचि २ वोसनाती
८७ १ गो. जो. तोडीले
८८ १ गो. मागुतां, जो. मागीला
८९ १ गो.थोरीϕ मूळांत 'गलांदि'
९१ १ गो. जो. तारीता
९७ गो. व जो. मध्ये ३रा चरण अगोदर २रा नंतर
१०९ १ गो. रेंकती
११२ १ गो. आनंद

११९ १ गो. जो. कुवाडें
१३० १ गो. द्यावेया
१३५ १ गो. अभयदान, जो. पासाये
१३७ १ गो. पुर्व
१४१ १ गो. जो. पुढे
१४२ १ गो. जो. झडकरौनि

## प्रसंग तेवीसावा

५ १ गो. जो. बोले २ गो. सनाद्ध
६ १ गो. जो. होता, २ झडक रौनि
९ १ जो. नेहो
११ + गो. 'रावो', जो. 'राजा" शव्द जास्त (+ खूण 'सीसुपाळा, चे अगोदर पाहिजे, देखा पुढे नको)
१४ + गो. जो. 'वरी' शब्द जास्त
१६ १ गो. जो. गजंवु
२४ φ मूळांत 'देउर्नि'
२५ + मूळांत 'रथु' शब्द जास्त
३० १ गो. भीमसैन्यां जाला
३१ १ गो. रवी पडताति
३२ १ गो पल्वगमू, मूळांत 'पलवंगु मनु'
३३ १ गो. पाहा कवन
३७ १ गो. पुरवैल २ येत असाल
५९ १ गो. जो. मी
६० १ गो. जो जाला
६५ १ गो. कळसांवरी
६९ φ मूळांत 'ब्रम्हा वीष्णु हरी हर वीसेशीं णीगुती: तेथें न व्हा खणांचे आकारीले:"
७१ १ गो वये २ मांडीली
७४ १ गो. जो सुरंगा
७५ १ गो. जो. 'वरी वोप सारिली तिये कीळे: फांकताति:'
७८ १ गो सुरंगना जो. सुरगना नारी
७९ १ गो. "तेल पाडीले सुरंगनी" जो. "तेथ तेल पाडीताती सुरगनी"
८४ φ ही ओवी मूळांत नाहीं
८६ १ गो. मंगळवाद्यीं २ मंत्रोच्चारीं
९१ १ गो. वरिषावो
९२ १ गो. जो. आपपरु
९४ φ मूळांत "गजु"
९५ १ गो. पुन्य
९६ + जो 'पदक' शब्द जास्त
९७ १ गो. मुकुटु
१०० १ गो. जो. बोभाटी
१०४ १ गो. त्या, जो. जयाचीया
१०७ φ मूळांत 'णेउरें'
१०८ १ जो. माहामंत
११४ १ गो. करावेया
११६ १ गो. जो. मंत्रीपती
११८ १ गो. जो. थोर

१२७ १ गो. ऐसें
१३४ φ मूळांत 'हातवेणसीं'
१३६ १ गो. जो. गजंब २ वसिष्ठ?
१३७ १ गो. वोपन्यावो
१४० १ गो. जो भरीली
१५१ १ गो. जो पायेवटे
१५२ φ मूळांत "नादिं"
१५४ १ गो. जो. विस्तारौनि
१५६ १ जो. मंत्रोक्ति २ होमाग्न ३ सामग्री
१५८ * मूळांत "सुक"
१५९ φ मूळांत "उधवदेवो"
१६० φ मूळांत 'देउणि' जो. देउनी
१७२ १ गो. जो. वोगमानु २ गो. असकें जो. आसीके
१७३ φ मूळांत "तया"
१७७ १ गो. ०पटल
१८१ १ गो. नीराकारें २ क्रीडीती
१८४ △ मूळांत "परब्रह्माचा"
१८५ + गो. चतुरानना जो. ब्रह्म
१८७ × गो. जो. मध्ये हा शब्द नाहीं
१८९ φ मूळांत 'दर्व्याचा'
१९५ * मू. "कमळानयेणि" गो. रानादेवी रोहिणी
१९८ १ गो. दीव्यासनीं, जो सीहां सनों
२०० १ गो. जो. लेहे २ पेहे ३ चतुर्विधें अन्नें ४ चोखें भोज्यें
२०४ * मू. "यादव" १ गो राणें, जो. सन्मानें
२०५ * मू. "आरोगण कीजे"
२१० १ गो. नीडा, जो. पुढां
२१३ φ. मू. "सपरीमंगळ" १ गो. उलगिले, जो. वोळगवीले
२१७ △ मू. "मार्जनें"
२१९ १ गो. वरि
२२५ १ अवीधीं, जो. आवधी
२२६ १ गो जो. खनोखनी
२२७ १ गो सैंभ ठाइं ठाइं
२२९ △ मू. "मुंडें"
२३३ १ गो जो मंगळोच्चारी
२३४ १ गो. रावीति
२४० १ गो. आलीया
२४१ १ गो. बीरीले
२४६ १ गो. आणि
२४८ १ जो. सुधजळ
२४९ १ गो. जो. उधवदेवें
२५३ × लेनि शब्द गो. जो. मध्यें नाहीं
२६२ १ गो. ततक्षेनी
२६६ १ गो. तिहीं २ गो. येउनु
२६८ १ △ मू. "पुणती पुणती"
२७१ φ मू. "कारनें"
२७४ △ मू. "आरोगीजो"

२८१ १ गो. कन्या
२८३ १ गो. समस्त
२८७ १ जो. गो. सप्तांग
२९० १ गो. मानोर्थे
२९२ १ गो. जो. अर्पिती
२९६ १ गो. जो. झाडी २ गो. गडे
२९७ + मू. 'ऐसे' शब्द जास्त
३०३ * २९८ ते ३०३ या ओव्या मू. नाहींत त्या जो. मधून घेतल्या आहेत

## प्रसंग चोवीसावा

२ ० जो. चढोनिया १ गो. बैस उनि + गो. वरी
६ १ गो. तेया
७ φ जो. चाले १ गो. जो. पुष्पकीं
१६ व १८ △ मूळांत "वरातें"
२१ १ गो. तवंगी
२४ १ गो. वळीं
२६ १ जो. गो. नगरी
३३ ६ गो. अप्सरा
३७ * गो. जो. "हरीचंदने" जास्त + या ओवी नंतर गो. मध्यें एक अनावश्यक ओवी जास्त
४१ १ गो. जो. भवंतीया श्रीगीरी
४४ १ जो. पवाडे
४६ १ गो. बौरी जो. थोरी
५२ १ गो. वाणिनियां जो. वानणी
५५ १ गो येरांते येर जो. येक मेकांतें
५६ १ जो. "परमाणंद सुखाचा
६१ १ गो. सपरिवारा
६४ १ गो. निरवयउ जो. नीर्वेव
६५ φ मूळांत "परमाणंद पुरुष" जो. "पराणद सुखाते देतु"
६७ १ गो. प्रेम
७० φ मूळांत "सर्वधा" जो. सर्वज्ञा
७२ १ गो. जो. स्तोत्री
७३ १ जो. गगनोनी २ गो. अंवरीं ३ जो. सुरवर देवो आपन.
७५ १ गो. चालते जो. चालती
७७ गो. बाह्यांतरी
८१ १ गो. जो. दादो
८६ १ गो. पुजीली

## प्रसंग पंचविसावा

२ १ गो. जो. विप्रीं
५ १ गो. जो. कीजो
१२ १ गो. बुद्धि २ जेनें
१५ १ गो.जो. वाटीं
२० १ गो. जो. प्राकृते
२१ १ गो. जो. देवसाळी
२५ + गो. जो. गुळोरा सांजोरिया
२६ φ मू. 'थीळवे'
२८ १ गो. भीजविले

३१ गो. सर्वळेयाचिया
३३ १ गो. सकुमारा
३४ १ गो. तीये. जो. तेथ
३९ $\phi$ मू. 'रानि' जो. राएने १ गो. फोडौनि, जो सोलोनी.
४१ १ गो. पहि वाढिलिया, जो. पहीती वाटी भरलीया.
४६ १ गो न वाखाने, २ लेहें ३ पहे ४ तया अंतु कवन करी:
४७ १ गो. वोळग करौनि
५७ १ गो. जो. येक + करौणिया
६१ १ गो. जो. वापा
७० १ गो. पांतीं २ राणे
७३ १ गो. खालति २ भुमि
७६ १ गो. जो. निशेष
१०१ १ गो. चलति
१०२ १ गो. तयाचा
१०३ + जो. 'वैदर्भी' जास्त
१०४ १ गो. तेयाचा, जो. तया
१०५ १ गो. उभिलें
१०९ 'मांचेया' शब्द गो. मध्यें नाहीं.
१११ १ गो. देताये
११२ १ गो. जो. नृत्ये करीत्याति
११५ १ गो. तियें
११६ १ गो. कीजो
११९ गो. जो. प्रसन्न.
१२० गो. जो. हात
१२४ + गो. मध्यें 'कथा' शब्द जास्त $\phi$ मू. 'म्हने कवी. कृष्णदासु'
१२६ $\phi$ १२५ व १२६ दोन ओव्या गो. व जो. मधील.
१२७ * ही ओवी जो. मधील

**विशेष सूचना :—**

± हे चिन्ह छापतांना कमी पडल्यामुळे त्याऐवजी $\phi$ हे चिन्ह वापरावे लागले, तेव्हां हे दोन्ही चिन्ह समानार्थक समजावे.

# रुक्मिनी - सैंवर

## शब्द-कोश

(प्रथमचा आंकडा प्रसंगाचा व पुढील आंकडा ओवीचा आहे)

### अ

अगड - खंदक १०.२१
अडनी- संकट, अडचण ९.७३
अन्यासी- अनायासें, विनाश्रम. २१.३
अरळ- नाजुक फुलें ९.१६
अरुवार- नाजुक ९.१६
अवलीला- सहज,लीलेनें १ १२
अवस्था- इच्छा ७ २ तळमळ, तगमग १४.९९
असीवार- शस्त्रधारी १४.३२

### आ

आइति-तयारी, सामुग्री ८.६८
आइल-अलिकडे, अगोदर,पूर्वी, ३.९१
आंकणा घालणे- अंकित करणे, शरण आणणे २.८०
आकारणे- घडविणे २.१२९
आख्यावनी- आक्षवानी, ओंवाळणें व डोकीवर अक्षता टाकून मंगल व दीर्घायुष्य चिंतणे १६.५३
आखुट- आखुड, एकत्र १०.१०४
आंगवण- शक्ति, धैर्य १९.८०
आंगवन- खुमखुमी २१.३३
आंगसी (सि)कें- पोषाक १९.११४
आजयें- अजय, अपयश ६.२१
आंट- पीळ (मिशीला) १८.२२
आटास- आक्रोश, उंचध्वनि १९.६०
आटाळ- अट्टाल, माडी, गच्ची, माळा ११.१०
आटु- त्रास, नाश १३.५
आडणी-तिपाई २५.१४
आडनी- अडचणीची वेळ, संकटाचा प्रसंग २१.१२
आडबीदी- मोठया रस्त्यास मिळणारे लहान रस्ते ११.६८
आडमोडे- पांगापांग, मोडझोड २१.२६२
आडी- अडसर ११.२४
आढाउ- पायदळांतील सैनिक १३.९
आणासें- अनायासें २२.४
आणिकी- इतर २५.८०
आं (अं) तौरी- भार्या, अंतुरी २.४
आदक- नाउमेद, धसका २०.७२
आनुवर्जन- वांकून नमस्कार (सं. आवृजन वांकणे) २५.९६
आनौति-दुसरीकडे, अन्यत्र ५.१२३

आफावणे- बोलावणे, म्हणणे ५.१०३
आभर करणें- आभारपूर्वक बक्षिस देणे १६.५७
आभारु· भार, संभाळण्याची जबाबदारी २३·२६०
आमुलेपण- वर्चस्व ५·३४ (आमुला=नवरा)
आर्तादानी-आर्तांना ज्ञान व प्रेम देउन संतुष्ट करणारा १·५
आर्ति- इच्छा ९·१२५
आरी (रि) ख-आर्ष, खेडवळ २५·११५
आरोगना-मेजवानी, जेवण १४·२०९
आलखणे- हलणे, डोलणे १२·५२
आवर्त- भोंवरा, संकट, अनर्थ ९·१५०
आवश्वरी- हरकारा, जासूद २·८९
आवस्वर- प्रसंग, वेळ २१·१३
आवाळु ओंठ,जबडा २२·६९
आवेशें- उत्साहाने ९·१०६
आवे (वि) स- आमिष, मांसाचा लचका २१·२०४
आवेसु- आवेश,जोर,त्वेश २१·२०७
असडणे- हिसका देणे, जोराने ओढणे २०· ९२
आसरनी- अशरीरिणि, आकाशवाणी १८·५४
आसलगै- सलगी, लगट २५ ११८
आसा- इच्छेने, आशेने ९·७२
आसीस- आशिर्वाद आशिर्वादात्मक मंत्र २.१०३
आस्वादणें- सेवन करणे १.३५
आसुध- अशुद्ध, रक्त १४.८३
आळती-आलाप ९.६६
आळंचु· कान गोष्टि, कुजबुज १२.७९
आळिव- आटविलेलें

## इ

इडपाड- आवेश, जोर, ईर्षा २० १०१
इसाळे- स्पर्धा करणारे २०.५१

## उ

उचित- पारितोषिक बक्षिस २.१२५
उतति- खारीक (कानडी उत्तत्ति)
उताडा-ताठर, उद्धट २०·८७; १०.७१
उयाळी-खांबाचा खालील आधार २३.६७
उधांत- शोभून दिसणारें २३.९८
उपखा- ओहोटी, कमी होणे २०.४
उपनणे- उत्पन्न होणे १.३३
उपयोगु- उपकार १४.१४०
उपरी- उंच जागा ११.१२
उपरीया- वरच्या मजल्याच्या २४.५१
उपहुड- जाग २३.२१६
उपाय- युक्ति, खुबी २.११२
उभड- मोठ्या लाटा, पूर ७.४२
उभवनी-रचना, उभारणि १४.११९
उमटणे-प्रतिबिंबणे, आंत दिसणे १५.११

उमेट-उर्मट ४.३७
उरपुट-छातीचा भाग २०.९३
उष्ठर-उंट ७.८८
उळीग-चाकरी, सेवा १०.३७

क

कटक-सैन्य १३.५
कडीयाळ-घोड्याचा कांटेरी लगाम २०.९३
कहेरी-पाणी देणारा सेवक ९.६४
कर्दम-सुवासिक लेप २१.२३७
कलसणें-कालवणें, एकत्र करणें ३.७७
कल्मक्ष-कल्मष, पाप, दोष.७.११
कवळ-घांस २१.२२२
कवाड पडणे-मार्ग बंद होणे, कानठळ्या बसणे २१.७०
कसा-बंद. अंगरखा चोळी वगैरेंचा वंद. २.१५ (कानडी-कशी)
कळासणें-अडकविणें, लावणें, २.२५
कांडारीव-कोरलेलें, नक्षीकाम केलेलें, पैलू पाडलेलें. ११.७
कांति- एकप्रकारचें शस्त्र २१.१०६
कामविणें-तयार करणें, कीत व स्वच्छ करणे. २.११
काली-काल ७.११८
कासार-भांडी विकणारा ११.११८
कासणे-सज्ज होऊन युध्दास उभा राहणे ५.२५ धरून.
लोळविणे २१-२४३ नेसणे २.१४
काहाळा-एक चर्मवाद्य २.४८
किळ-प्रभा, तेज. १.१९
कींकस-हाड २१.१९०
कुजांतर-खोटेपणा, कुप्रयोग, कुवेड ८.३२
कुड-खोटे ४.२३
कुढावणि-रक्षण २१.१२१
कुमंडल-कमंडलु १.३७
कुवाड-वाईट मार्ग, संकट, विघ्न २.६४
केणी-व्यापाराच्या वस्तु, सामान ११.९३
कैवाड-कैवार, जवळीक २१.२३५

ख

खरी-रखरखीत १४.७२
खांचणे-सज्ज करणे, १४.५४
खांड-कल्ले व दाढी २२.९९
खांडेश्वर-खड्गश्री धारण करणारे, प्रतापि योध्दे. २.६२
खावणि-तऱ्हा, हेतु, मनोधर्म ३.१०६
खुंट-लांकडाचा ठोकळा. १८.२२
खेडकुळि-ओढे, पाण्याचे पाट, १०.४८
खेडी-ढाल १३.११
खेवणें-लावणे, लटकावणे, क्षेवणे १९.७
खोंचणें-कष्टि होणें, विरमणे. २०.२४
खोंपा-वेणीचा बुचडा २३.२४१

### ग

गजबु- गडबड, गहजब. २३ १६
गवांर- वाईट, खेडवळ. २.८१
ग्लांदि-म्लान २२.८९
गळाळा-चूळ, घोंट ८.६१
गाभेवन-कोभ, सूक्ष्म अंकुर १०.६८
गारा-गिलावा, दिखाउपणा २० ४५
गीरीरी–घेरी २१.१३९
गुढर–तंबू, डेरा १०.५२
गुण–धनुष्याची दोरी १९.८२
गुरव–पुजारी २१.२७२
गुल्फ–पायाचा घोटा २.१३
गुळळि (ळा)-चूळ २५.१८
गोमटें–चांगलें, हित ३.८४

### घ

घरवात–संसार, प्रपंच ३.६७
घाइं–घावामुळें, मारण्यानें २०.९४
घाराने घेरणे, व्याप, मोह २१ २५२
घिउंदे–घीवंदें, दुधाचा बासुंदी प्रमाणें एक पदार्थ २४.८६

### च

चतुरानन–चतुर्मुख ब्रह्मदेव ७.६१
चवरढाळ–चवऱ्या ढाळणारे १२.२८
चाउरी–आसने, चौरंग १२.४४
मंडप, गर्दी ७.३६ वक्ष स्थळ छाती १०.१२७
चांचरी–लटपटत, कांपत २१.४०
चाळणें-चालविणें, वर्तणे ?.६७
चितांग–गळयांतील पट्टयासारखा एक दागिना, टिका २ १८
चिपुळि–लहान पिचकारि ९ ४४
चौदंत–ऐरावत, हत्ती २.१००
चौवारी–चार बाजूनें पाणी काढण्याची व्यवस्था असलेली विहीर ११.५३
चौहातमल्ल–चतुर्भुज वीर ६.४९

### ज

जगबोळु–जगाचा नाश, संहार २२.२८
जटामासी–हिमालयांत सांपडणारी पुष्कळ दिवस टिकणारी एक वनस्पति ४.५७
जवनी (नि) क–पडदा, अन्तर्पाट–विवहसमयीं धरतात तो १९.१०६
जवादीये मांजर–ज्याच्या अंडयांत कस्तुरी असते असें एका जातीचें मांजर १०.१३३
जानवसा–वरपक्षास राहण्यास दिलेली जागा १६.३८
जांबुनद–सोनें २.११
जांवडें–कुंकू २४.२३
जीभटु–बडबड करणारा, लांब जीभ करून बोलणारा ८.२१
जीवन–पाणी ११.१४
जुंग–होडीचा एक प्रकार १३.२९
जोधे–योद्धे २.९१
जोहर–आग, दाह २.८१

झ

झडाडा–जोराने, वेगाने २०.९५
झणि–तात्काळ, कदाचित् १.४७
झनि–नको हो (नकारार्थी शब्द) २.६४
झळंवुक–झुबके, गुच्छ ९.२९
झांजरणे–जर्जर होणे, पीडा होणे १४.६५
झाडणी–भाडनी–सततोच्चार, जप, गजर १.३१
झेला–पुष्पगुच्छ ९.१७१

ट

टका–ध्वज, पताका १८.७०

ठ

ठकलाचि ठेला–गांगरून गेला, मुग्ध झाला तटस्थ झाला १४.१११
ठकार–सुन्दर, ऐटदार १२.२३
ठाइंचा–मूळचा, जात्याच १६.१४
ठाकणे–थांबणे ४.४३

ड

डांग–काठी ७.२३
डोली–पालखी २.९३
डोल्हारा–झोंपाळा १४.२०२
डौर–डमरु, एक वाद्य विशेष २१.९७

ढ

ढाल–तऱ्हा १८.७
ढी (ढि) साळ–अगडबंब पण ठिसूळ, पाण्यांत विरघळण्यास योग्य, अफाट २० १६

त

तकट–दागीने करण्या करितां ठोकून तयार केलेला पातळ पत्रा, वर्ख, मुलामुलींच्या करगोट्यांत घालावयाचें पिंपळपान १५.४५
तरणी (णि)–नाव, नौका, होडी १.९
तरनी–सूर्य १५-४६
तवक–जोर, आवेश १२.४१
तवंकणें–आवेश येणें, क्रुद्ध होणें २१.४१
तवंग–उंच माचा, उंच कट्टा २३.६५
तातवेळा– त्रासाची वेळ ९.८०
ताळ, घोळ–ताल ठेका धरण्याकरितां लोखंडाच्या सळईस कड्या अडकवून तयार केलेलें एक वाद्य २.४८
त्राहाटणें–घालणें ९.४० आपटणे६.६७ भुजा त्राहाटणे-शड्डु ठोकणे, कुस्तींत पैलवान आवाहन करतांना करतात तसें
तिडकी–ठिणगी २१.१९१
तिपरु–त्रिपुर, वेळवाच्या तीन कामट्या मध्यें लावलेला दिवा अथवा पणति
तिर्यंच–पक्षी, तिर्यक् योनीतील ६.१८
तुळबंदी–तोळबंदी, रट्टयांत घालावयाचा एक दगिना, वाकी २.१७ (कानडी-तोळुरट्टा)

तेजी–घोडा १४.१९
तोळंबा–खांवाखालील उथळी, तळ–खडा १२.१७

थ

थटकरी–थाटामाटांत चाललेली स्त्री? १४.८५
थाट–गर्दी, मेळावा, समूह, पायदळ १४.३४
सज्ज असलेलें सैन्य १८.७
थीरु–स्थिर १४.१७६
थोवेकारु–पथकाचे नाईक १३.४

द

दंतासुळ–शूळ, हत्तीच्या गंडस्थळावर मारण्याची लोखंडी टोंचणी २०.९६
दळवइ–सेनापति, दलपति १७.६४
दाटोदाटीं–पहातां पहातां २०.३८
दादुला–नवरा, मोठा २१.२४२
दापाइत–धाक दाखविणारा १९.६१
दामोधर–मंदिर, घर १२.३
दारवठा–वेस, दरवाजा १७.३४
दावो–इच्छा, इच्छित वस्तु, प्रसाद ९.१७७
दीधडी–उभट, उंच ४.५
दीवटा–मशाल अथवा दिवटी घेऊन मार्ग दाखवीत जाणारा ९.१६४
दुस–तंबु १४.१८९
देव्हडा(डी-डें)–मोठें, लांब, विस्तीर्ण ५४१
वांकडे धनुष्याकार ९.५०
देसाउर–देश व गांव २.९६
देहां–(दिह=दिवस) दिवसा १०.१
दोडा–कोंवळें बोंड १४.२००
सावेरी दोडेयांचें=शिवरीच्या कोंवळ्या बोंडांतील कापसाचें

ध

धनुवाडा–धनुर्धारी ,धनुष्य बाणानें लढणारा वीर, धनुर्योद्धा १३.१०
धवधनी–समृद्धि, वर्षाव १.५
संतोष, तृप्ति १५.५३
धाकीनणें–भिणें, दचकणें ९.५१
धाकुटि–दासी २.३१
धाटी–पट्टा १३.१०
धाडी–स्वारी करणे,चाल करून जाणे ५.४३
धारा (री)–वयाने लहान पाठीवरचें अपत्य
धावनी–उपचार ९.१०७
धीस्ये–धिःकार, तुच्छ ६.३२
धुदाती–फूत्कार सोडतात २१.२१४
धुनी–धुऊन जाणे, स्वच्छ होणे, मुक्तता होणे ७.९८
धुर–पुढारी १०.९६
धुरुमंडळ–ध्रुव मंडल ११.६.

धुपीव–स्वच्छ ९–२००
धोटा–मोठी पिचकारी ९ ४४

न

नद्यावर्त–चौकोनी? १.१८
नराजु–बाण, तीर २१ ८७
नवनाग–नऊ हत्ती ११.१०
नाथणें–नाश करणे, ठार करणे ८.४७
नाभीकार–आश्वासन २५.१२१
नांवनिगे–गाजलेले, नांवाजलेले १८.४२
निडें–जवळ, निकट २३.२१०
निहावो–नेहो–आवाज, नाद २३.९
नीकर–संचय, ढीग ९.४१
नीका–योग्य १७ १०
नीगुती–कौशल्य १३.२५
नी (नि) घोट–संपूर्ण, परिपूर्ण, शुद्ध ११.७
नीडळ–कपाळ, मस्तक, ललाट ६.९४
नीतळ–चकचकीत,गुळगुळीत, स्वच्छ, शुद्ध–१५.२२
नीधान–जमीनीतील गुप्त धन
नीमासुर–सुंदर, तरुण ६.३०
नीरय–नरक ३.७९
नीरवडी–काळजीपूर्ण, कौशल्यपूर्ण बंदोबस्त, सावधानता १७.२९
नीर्घात–युद्ध १३ २७
नीऱ्हा–विशेपत्वानें, पूर्णपणें २ ८१
नीवाडे–निवडक २०.६
नीसांकु–निर्लज्ज, नि:शंक ६.७७
नीहटीं–जवळ, निकट, लागून ६ ९९
नेतवट–नेटका, योग्य, मऊ, नाजुक ३.५

प

पटकुळें–वस्त्राचा पदर व कांठ ९.१८७
पटीसाळा–पडवी (कानडी-पडसाले)
पडीभरु–अवकाश,जागा १४.२३४
पढता–वाचणारा २५.१२३
पनकसर–कानांतील वरच्या बाजूचा एक दगिना २.२४
पन्हरे–सोनें २.११
परमांसु–दुसऱ्याचा जीव
परमांसुलाठे–दुसऱ्याच्या जीवावर आपण प्रौढि मिरविणारे २१.४४
परीकर–सुसंबद्ध २५.१२३
परीवंटी–कमरेभोंवती बांधलेल्या पट्ट्यांत अथवा वस्त्रांत १३.११
परीसी–फरशी १२.१२
परीहारु–खुलासा, शंका निरसन १.४८
पळवा–करपलेली ९.४८
पहीरावनी–पेहराव,पोषाक २५ ९०
पहुपकीं-पुष्पक विमानांत
प्रजी-युद्धास उभा, शस्त्र परजणारा ५.१८

प्रतिपट-पटई १२.१८
प्रतीति-अनुभव १.२५
प्रधान-परिधान १५.५१
प्रह्वान-होडी १०.२४
पव्हा-पाणपोई ९.१९१
पसावो-प्रसाद १.१३
पस्यात पहार-उत्तर रात्र. मोठी पहांट १४.८१
पाउड- रिकीब. १८.८६
पाकविस्तार-निरनिराळ्या प्रकारचे खाद्य पदार्थ १.४३
पाखर-खोगीर
पागा-शरण आल्याचे चिन्हार्थ गळयांत बांधावयाची दोरी. २१.२७८
पागार-रक्षक. सुरक्षित अशी. ६ ८०
पाट-वस्त्र १४.१४
पाटसुत-वस्त्राचा वारीक धागा.२५.३३
पाटाउ-उंची वस्त्र. ११.११९
पाटाची- मुख्य, पट्ट. २.४
पाटी-चिकटून, एकासएक लागून. एकाच पाटावर. ३.१०५
पाटोळा-उंची रेशमी वस्त्र. २.१४
पाठोरखी-मागील बाजूचे रस्ते.११.१०
पातायेना-मानीत नाहींत. ८ २०
पांति-पंक्ति, पंगत. २५.८
पांतिकरु-जेवण्यास पंक्तींत बसलेला २५ ४
पान-सर्पदंश १.३०
पान लागणे-सर्पदंश होणे.
पांपर-लाथ. २२.१५
पालखति-मांडीवर. २.५६
पालमांडे-पाय धुण्याकरितां भांडें, तस्त. १४.२२७
पालानणे-सज्ज करणे-होणे १३.६
पालव-पदर. २३.१५५
पासवडणे-वस्त्रानें आच्छादणें १६ ४०
पाळी-कांठ, तीर ९ १९६
पेखणी-नर्तकी, वेश्या ११.१८
पोसणी-पोसलेले, आश्रित, आश्रयास आलेले. २१.२६५
पौळी-दोन तटांमधील जागा. ६.८० भित ६.६७

फ

फळप्रदान-वाङनिश्चय विधि वाङनिश्चयाचे वेळीं वधूच्या ओटींत वरपित्यानें फळें नारळ वगैरे घालण्याचा विधि. १६ १
फावणे- पावणे, मिळणे १.३५ प्राप्त होणे.
फिटणे- संपणे, नाहींशी होणे १९ ८८ गळून पडणे ७.९८
फुटा- शेला. उपरण्या प्रमाणे घेण्याचें उंची वस्त्र. १२.६६
फुरान-स्फुरण २३ २६
फुलवडवा-फुलें हार वगैरे देणारा १२.२८

फेडणें-काढून बाजूला ठेवणें २.१२३
मुक्त करणें, नाश करणें १.२
फोडी-सुपारीचें खांड ९.४

ब

बंक-हिरगणें व तुळई यांच्यामधील गोल आकाराचा भाग. १२.१७
बखलणे-कोंपराने हळूच ढकलणें २३.१४४
बटकी-दासीपुत्र, वेश्यापुत्र, रांडलेक. (ही एक शिवी आहे.) १३.४१
बडिवार-थाट २.९५
बडुवा-हातांत काठी अथवा बडगा घेऊन गर्दी हटवीत पुढें चालणारा, रक्षक.९.१६४
बंदीजन-भाट २.१०३
बंदीशाळा-कैदखाना, तुरुंग ९.७४
बंबाळदिवि-मशाल, मोठी पणाति २४ ३०
बंबाळणें- तेजानें दिपून जाणे, लखलखाटानें भांबावणें २१.२२६
निनादणें, दुमदुमणे २४.४७
ब्रम्हावो-आशीर्वाद. २१.२७०
बळियाडें-बलवान्, शूर, बलिष्ठ ५.८१
बळियेपाये -नीट बळकटपणे पाय ठेवीत २.५५
बहुबस-पुष्कळ, वांयफल. ८.१६
बाउलीं-खांद्यावर, बाहूंवर. ३.५
बांदवडी-कैदखाना, बंदिवास, ३.८३
बाबरझांटी-बाबर झोटिंग नांवाची पिशाच्चाची एक जात. २१.९९
बलाळ-मजबूत, वळकट. १४.९३
बावन-बावन नांवाच्या जातीचें चंदन ९.१२
बावी-लहान विहीर (कानडी-बावी) ११.४१
बाळा-तरुणदासी १४.२३२
बाळानी-सज्जा ११.१२
बिराइ-स्पर्धा २३.९७
बीक-बोलवाला, महत्त्व. ८.४७
बीजे करणे-जाणे, निघणे, गमनकरणें १२.९२
बीरडें-गुंडी, चोळीची गळ्याजवळील गुंडी, गाठ. २.१६
बीरणें-खोंवणें २१.२३६
धारण करणें १५ ४८
ब्रीदें-प्रतिज्ञा १.५०
बुंथि-बुरखा, पडदा, वेष. २३.१८१
ब्रीदाईत-पदव्या असलेले, रणांत शौर्य गाजविलेले योद्धे १८.२१
बुरंग-शाहीर वाजवितात तें वाद्य डफ?
बैकार-खुषमस्करे? ७.८२
बोने-अन्न, मेजवानी, भोजन ९.५५
बोबाटी-मंजुळ ध्वनि करतो-ते २३.१००

भ

भकाळ- पोटभरु ८.१७
भडखळ- रणभूमि, रणांत दबा धरुन बसण्याची जागा. १७.४६
भांगटीळा- डोक्यांत भांगामध्यें लावलेला कुंकवाचा अथवा शेंदराचा टिळा. २.९७
भांडारी- खाजीनदार, कोठारी९.१६४
भाण (न)वसिनी- स्वयंपाक करणारी २.५९
भानवस- स्वयंपाक घर.
भार- त्रास १.२ सैन्य १४.१२
भावी- भाबी, भावजय. १४.१६४
भारवट- तुळई. १२.१८
भावो- इच्छा. २.१
भिगुळवाणे- भयानक. ४.६
भीति- भिंत १२.१९
भीश (स)- भिवया २१.१०१
भौरी-भोरी- उटी, मुद्रा. ३.१०

म

मकरतोंड- रथाचा मकराकार अग्रभाग, रथाची दांडी. २१.१३१
मंत्रु- सल्ला, उपदेश. १७.१०
मदळसा- छताचा मध्यभाग २३.६७ छताच्या मध्यभागांतील चांदणी ९.२५
मंदवीयेचे- मेंदीच्या रंगाचें २.३२
मर्दनीया- मालीश करणारा. ९.१६४
मयंकरेखा- चंद्राची कोर. २.२७
मसी- काळोखी (कानडी-मशी = शाई)
मळीवटु- कपाळा वरील कुंकू. २.२२
महंती- मोठेपण १ २५
महानीर्वानि- अटीतटीचें, घनघोर. १६.६५
महुट- छपराचा अग्रभाग. ९.२५
माड- माडीवरील गच्ची, सज्जा १४.१०५
माडा-खिडकी (कानडी माड=कोनाडा)
मांदियाळी- गर्दी. १९ ६६
मांदुरी- मोतद्दार, घोडे संभाळणारा ९.१६४
मानी- मानकरी ७.३६
मालि- गोळा, भाताची मूद २५.२२
माली मर्दना- स्नानापूर्वी अंगाचें तेलानें करावयाचें मर्दन, अंग चोळणे, मालिश. १७.५५
मावा- कपट १३.२६
माहामंत- माहूत, महात, हत्ती चालविणारा (सं. महामात्र)
मीनणे- एकत्र येणे, जमणे. १६.७
मुचगे- मुकणे, पारखे होणे, तुटणे, दूर होणे. ८.३९
मुडा- लोड, तक्कया. २३.२२९
मुंडप- खांदा, मुंडा.
मुंडपघसणी-खांद्याला खांदा घाशीत. दाटीवाटीनें १२ ९
मुंढये- डोकी. ४.१६

मृणाल- कमलाचें देंठ ९.२८
मुदला- मुख्य १३.१४
मुळींचा- पूर्वीपासुनचा १६.१२
मेखळ- कमरपट्टा ३.६
मेढा- धनुष्य १३.१०
मेढावहाणें- प्रतिज्ञा करणें २१.१७७
मेलीकार- वास्त १३.३१
मोकारा-मुक्कामाची जागा महत्त्वाचें ठिकाण ९.२०६
मोगर-सैनिक. पायांचे मोगर=पायदळ १३.१९
मोहटि- कठडा नसलेला गॅलरीवजा लहानसा भाग १२.१९
मोहाड- मस्तक १९.२९

य

यावा- येण्याचा प्रकार, हल्याचा रोंख २१.६२
येत्न- जतन; सांभाळ, संरक्षण १३.२४
येर- दुसरा; इतर
येसणे- येवढे; ४.७ या प्रकारचे २०.४८
येक्षुकर्दम-कुंकू, कापूर, कस्तुरी, चंदन वगैरे मिश्रित एक उटी १४.२३८
येक्षदंड- इक्षुदंड; ऊंस ९.२८

र

रति-भोग; संग; कामपूर्ति २.१२०
रवनी-कांठा जवळचा चौथरा अथवा पटांगण १०.६४
रळी- खेळ; थट्टामस्करि १०.५६
राउत- स्वार २०.९४
राउळगण- मंदिरें, राजवाडे २५.९३
राणीव- राज्य करण्या बाबत २.३
रामगिरी- रामाग्री नावाचा एक राग ५.१०३
रावो- राजा; श्रेष्ठ १.३८
रास- रासन्हाणे करण्याची जागा २३.२३६
राहांवर- रहंवर; रथ २.९१
रुसणें- वैर करणे; संतापणे २.६९
रूप करणें- स्पष्ट करणें; शब्दाची फोड करणे १०.५८
प्रशंसा करणे; वर्णन करणें १४.२१४
रोहकणें- रोंखणे; अडविणे २३.२८

ल

लग्नसमो- लग्नाचा समय; लग्नाची वेळ, मुहूर्त २३.१३६
लहुडी- लोखंडाचे अग्र बसविलेलें काठी प्रमाणे शस्त्र १४.२३
लाखारिव-लक्षावधि; लक्षसंख्येने १०.४५
लापनिका-शब्दांचा विस्तार; बडबड; चऱ्हाट १४. ७६
लाहाणे-मिळणे; प्राप्त होणे ६.८३

लेखा-गणित; मिति २१.९
लेप-रंग २.५१ रंगाने काढलेलें चित्र ९.२६
लोटणे-दूर होणे; संपणे १ २२

व

वई-बोहल्याच्या चारी बाजूंनी करावयाची रचना २३.७१
वज्रांगि-चिलखत, पोलादाचा अंगरखा
वयसायुक्त-वयाने योग्य; जोडा शोभेल अगा २.६२
वरपड-आधीन; तोंड देण्यास पात्र १९ ७५
वरमूळ-वरास बोलावणे २३.८१
वरवाळणे-सिद्ध होणे, चालून येणे २०.४१
व्रर्दे-उटी सुध्दां, वर्त=उटी (शब्दकोश पा. २७५७)
वळी (ळि) त-शेत; जागा; आगर २५.८८
वहीला-खरा ६.९१
वहिले-सज्ज; तयार २१.२२
वहुमाया-वधूची आई २३.१२४
वहुवर-वधु व वर ९.१७४
वृंद-समाज; समुदाय २३.१८
व्रर्दे- लाजून? लाजिरवाण्या अवस्थेनें? १६ ६६
वाग-लगाम ९.२०८
वाग वाळणे-लगामानें घोडा फिरविणे; घोड्यास वळद देणे २१ २०९
वागार-लगाम १९.२
वाघारणे-एकत्र करणे; घुसळणे २५.४०
वाधावन-शुभवाद्य, मंगलवाद्य १०.६५
वाधावणें-मंगळ कार्यापूर्वी वाजविण्याचे मंगल गीत. वराचें आगमन सूचित करणारें मंगल वादन
वाधावा- शुभागमनाची पूर्वसूचना १४.७४
वारणे-पाठवणी करणे; निरोप देणे उचीतीं वारोलीया=पारितोषिक देऊन निरोप दिला १५.५८ पुरे म्हणणे; थांबविणे; निराकरणे २.१०७
वालीप-तलम रेशमी वस्त्र २.३३
वावधान-सोसाट्याचा वारा; वावटळ २१.२२५
वावी-विहीर (कानडी-बावि) ९.२७
वास-बाजू २.५९
विखार-विषारी प्राणि १.२२
विंजणवारा- पंख्याचा वारा २.४८
विडुडणें-उधळणें; फाटाफूट होणें; धूळधाण होणे २१.६७
विळासणे- विलास करणे १५.८
विज्ञान-युक्ति २.६४

वीग्रहो(ह) वंति-कुशल; तरबेज २५ १०
वीघड-ताटातूट २३.३००
वीतराग-ज्यानीं आसक्ति सोडली आहे असे
वीदानें-विदानें- कौशल्यानें ९.३७
वीद्यामार्ग-ज्ञानमार्ग १.३
महानुभाव पंथांत ज्ञान व भक्ति मिळून विद्या १.३
वीभंसु-उजाड व भयानक १६.२३
वीरुळा-विरोळा; पाण सर्प ८.४७
वीवसी- भीति. ५.५९
वीसंवादु- वैर, भेद. १६.१२
वेंकट- वांकडें २.२३
वेंचकरु- खर्च करुन त्याचा हिशोब ठेवणारा ९.१६४
वेधवंति- वेध लावणारी, रति ६.३१
वेसण- व्यसन, संकट, त्रास. १९.७५ संताप ८.३
वेळणें- हलवून पाणी काढून टाकणे. विशेषतः भातांतील, शिजतेवेळीं. २५.२२
वेळाउळ- बंदर. ५.१०४
वोघ (ग)मान- मानपान २३.१७२
वोज- थाट, यथासांग. ७.८०
वोडन- ढाल ४.५१
वोडव- आदर सत्कार २३.२०३
वोप-तेज येण्या करितां दिलेला मुलामा २३.७५
वोल्हावा- वोलावा, आश्रयस्थ, शांत होण्याची जागा. १०.१०
वोवरा- खोली, ओरी ९.३५
वोस- ओस, शुष्क, निःसंग, उदासीन ८.१६
वोसावणे- क्षीण होणे. ९.१४५
वोसंग- उत्संग, मांडी. १४ १५९
वोळग- सेवा, चाकरी. ५.४
वोळगणे- पूजा करणे, मान देणे, शरण जाणे, सेवा करणे. ६.६२
वोहरणे-शोभणें, विलास करणे १५.२३

श

शयनां रावो- झोंपेचा राजा, अत्यंत आळसी. १४.१६३

स

संटे-मावत, सांठत. ११.३३
संटणे-मावणे. सांठणे
सडका-वस्त्राच्या दशा. १४.३१
पल्ल-सडका=पदराच्या दशा
सतार-ताजा-जी-जें., रसरशीत ९.१५७
सती-सत्य, खरोखर. ८.२
सत्रावी-ही चंद्राचो पोडशकलांच्या पलीकडील कला. ज्या कळेवर चंद्राच्या कळा अधिष्ठित असतात तीं मूळ कळा
स्तंबु-स्तंभन. १०.९२

सनाथु-पूर्णकाम, कामना पूर्ति २३.५६
सपतांग-सप्तांग. २३.२८७
सपलानि-खोगिर घालून सज्ज केलेला. ७ ८६
सपुर-संपूर्ण, भरगच्च. २.१४
समसान-स्मशान. ७.१९
समचाकार-संक्षेपाने, थोडक्यांत, सारांशरूपानें. १४ ७९
संवफळ-समोरून मारलेली धड़क, टक्कर. २१ १६८
सवैल-बरोबरीचा, सहचर, सोबती. ९ १८६ २२.४८
संसारणें-सिद्ध होणे, सरसावणे. १९.१
सळ-नेट, जोर, सामर्थ्य. ८ ५१
साउमा-समोर, पुढे. ९.२०८
सांकडी-संकट, पंचाईत, अडचण. ९.५०
साटु-चाबुक. १९.५७
साडे-लग्नांत लुगडी वगैरे वस्त्रें देतात ती. २३.२४९
सांती-छत्र. १४.६०
सांतीकरु-बाजारहाट करणारा. (कानडी संते=बाजार) ९.१६४
स्थानि-सभा. १२.२४ स्थान २.५३
सापें-आतांच, नुक्तेंच. सध्यां २ ७५
सांबरी-क्रीडागृह, कुंज. १४-१९४
सामदे करणे-सज्ज करणे, तयार करणे; जमविणे. १३.४
सामुद्रिक-शरीरावरील चिन्हें. १५.१२
सामोरा-री-रें-पुढे; समोर. १८.९६
सारी-सोंगट्या. ११.१००
सावज-क्रूरप्राणि; मोठे सर्प. १०.२३
सांवडणे-एकत्र करणे, गोळा करणे. २१.६०
सांवळें-साधें, सौम्य. २३.७५
सांवेरी-एक प्रकारचें कापसाचें झाड, शिवरीचें झाड़
स्वारु-स्वारु-वाढपी, स्वयंपाक व इतर कामें करणारा. ९.१६४
सितरणे-जिंकणें, मागे टाकणें. धिक्कारणें. २.११६
सिद्धरस-अमृत. २.१०
सीध-सिद्ध, निश्चित, ठरलेला, २.७४
सोपणे-चर्चिणे, अंगास लावणे. २१.२३७
सीपहाटी-शिप्यांची दुकानें असलेला बाजारांतील भाग. सीप=शिंपि ११.१२०
सीबुमुरी-शिमुरी, नकट्या नाकाची, विद्रूप.१४.९०
सी (सि) साळ—फक्त डोकें, शिर. २२.४८
सीहानीव-शहाणपण, चातुर्य. २.८७
सुड-प्रबन्ध गायनाचा एक प्रकार, पोवाडा.३.१६

सुद्रसेन-सुदर्शन चक्र.६.५१
सुरकोन-पुढील कोंपरा. ११.१२९
सुसंदु-चांगला छंद. १७.५४
संदु-छंद (काव्यातील)
सुहावि-आल्हाद दायक, मधुर १.४५
सूपत्रती-गादी. १४ २००
सेस-शेष.१५.३
सैंग-भरपूर, पुष्कळ. ३.४०
सैंव-सैंभ-स्वयंभ, स्वतःसिद्ध. १४.२०
सोनेसळी-ळा-जरीच्या धारा असलेलें वस्त्र. भरजरी वस्त्र

ह

हडपिणी-विडे देणारी दासी, विड्यांचा डबा घेऊन नेहमी जवळ असणारी दासी. २.५०
हडपी-विडे देणारा. ९.१६४
हरळ-खडा ४.८३ (कानडी.हरळु)
हसतलग-हंसाचे पिलु
तलग-पिलु. २.२५
हांकारा-निमंत्रण, बोलावणे, हांक देणे. १४.७७
हाटवटी-लहान दुकान.
हाटवटीया-लहान लहान दुकानांच्या रांगा. ११.६८
हीरंगणें-खांब व तुळई यांचे मधील+ आकाराचा भाग. १२.१७
ही (हि) रवा-कच्चा, जसा आहे तसा. शस्त्राचा घाव न लागतां. २२.३५
हुडा-बुरूज ११.१२
हेमसळ-डोळ्यांत अंजन घालण्याची सोन्याची बारीक सळई. २.२२
हांसीरु-पांचरूण ९.४
हेळामात्रें-तात्काळ वेळ न लागतां. ८.१०
होड घालणे-पैज मारणे. ८.३५

क्ष

क्षांती-ख्याति, उपद्व्याप १७.२६
क्षीरबोनें-दुधाचा आहार. १८.४८
क्षीरारे-खिल्लार, गाई बैल वगैरेंचा समुदाय. ९.१८२
क्षेत्री-योद्धा १७-७४
क्षेवनी-अक्षौहिणी. १७.३४
क्षेवो-क्षण न लागतां, तात्काळ ६ ८६
क्षोनि-अक्षौहिणी. २.९२

ग्रा. क्र. —

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| | | **प्रकाशकाचे निवेदन** | |
| १ | १३ | असाल्यामुळेच | असल्यामुळेच |
| २ | ३ | अविष्कार | आविष्कार |
| ४ | ६ | वङ्मयाचे | वाङ्मयाचे |
| ५ | १७ | प्रसंगच्या | प्रसंगाच्या |
| ५ | १८ | पाहिला | पहिला |
| ७ | २५ | प्राकाशन | प्रकाशन |
| | | **पुरस्कार** | |
| १ | ६ | ना. ब. | नी. ब. |
| ४ | ५ | कव्याच्या | काव्याच्या |
| ६ | १८ | चक्रधारांनी | चक्रधरांनी |
| ७ | ५ | अद्वेताचा | अद्वैताचा |
| ७ | ६ | नहीं | नाहीं |
| | | **संपादकीय निवेदन व ऋणनिर्देश** | |
| ९ | ३ | पथ्यांच्या | पोथ्यांच्या |
| ९ | १३ | जनता जनादनास- | जनता-जनार्दनास, |
| ९ | १४ | सुपूर्त | हातीं सुपूर्त |
| १० | ६ | सैंवरा'चा | सैंवरा'ची |
| १० | १८ | दुख | दुःख |
| १० | २५ | काव्याचा | काव्याची |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | १ | साचा | सांचा |
| १३ | ६ | बराच | बरीच |
| १३ | १९ | भामाजी | भीमाजी |
| १३ | २५ | रहात | हैदराबाद येथें रहात |
| १४ | १ | मथील | मधील |
| १४ | ११ | पंथीय | त्यांचा पंथीय |
| १४ | १४ | १९६४ | शके १८८६ |

## आवश्यक सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | ४ | परिशिष्ट दिले | परिशिष्टें दिलीं |
| १६ | ६ | एक | फक्त एक |

## प्रस्तावना

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | ४ | संतोषाचाय | संतोषाचार्य |
| १९ | २६ | संशोघ नकेलें | संशोधन केलें |
| २० | १३ | काला | काल |
| २० | १४ | कल्पन- | कल्पना |
| २३ | ६ | संवायी | संवयी |
| २५ | १० | रचना, | रचना- |
| २७ | १९ | विविध | विविध- |
| २८ | २२ | १५२४ | १५२४ ? |
| ३७ | १६ | फरवाईट | फार वाईट |
| ४४ | ६ | वचितांची | वाचितांची |
| ४५ | २४ | देऊन | दिलें व |
| ४६ | ६ | सम | समग्र |
| ,, | १० | कृतींच्य | कृतींच्या |
| ,, | १४ | घेतलाला | घेतलेला |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | १६ | भैवी | भैरवी |
| ,, | २० | किनर | किन्नर |
| ,, | २१ | उदाहरणर्थ | उदाहरणार्थ |
| ,, | २७ | कालतो | घालतो |
| ४८ | ६ | त्वांची | त्यांची |
| ५१ | १५ | उगे | ओ |
| ५५ | ११ | सांगातो | सांगतो |
| ,, | १३ | सांगितलेल्य | सांगितलेल्या |
| ,, | १६ | श्रीकृष्णदिकांची | श्रीकृष्णादिकांची |
| ५६ | २४ | देवच्या | देवाच्या |
| ५९ | १३ | दुःख | दुःखें |
| ,, | १६ | आंमृतचो | आंमृताची |
| ६५ | १० | वैगेरेंचो | वगैरेंची |
| ६६ | ३ | दौर्बरूया | दौर्बल्या |
| ,, | २२ | कर्तत्व | कर्तृत्व |
| ६९ | १३ | उल्लेस | उल्लेख |
| ७० | १९ | संतोषमुमीने | संतोषमुनीनें |
| ,, | २५ | (३६५) | (प्र. ४ ओ. ७३) |
| ,, | २६ | (३६४) | (प्र. ४ ओ. ७२) |
| ७४ | ५ | अतांस | असतां |
| ,, | १९ | याथार्थ | यथार्थ |
| ७५ | ३ | (प्र. ५ | (प्र. १५ |
| ७८ | ११ | (७५) | (प्र. २ ओ. २३) |
| ,, | १२ | (प्र १ १०) | (प्र. १ ओ. १०) |
| ,, | १४ | बलवंत | बळवंत |

## रुक्मिनी-सैंवर मूळ

| ओवी | चरण | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| | | **प्रसंग २ रा** | |
| १९ | २ | ईंद्रुम...देखोनी | "ईंद्रुम...देखोंनी" * |
| ७३ | ४ | परस | फरस |
| ११६ | ४ | स्वरेंसि तरी | स्वरें सितरी |
| ११८ | १ | कमळ स्वरतरु गायेन | "कमळ स्वेतर दोघेजन" * |
| | | **प्रसंग ३ रा** | |
| ४६ | १ | पांजवें | पांचवें |
| ८९ | १ | घुणे | घुणें |
| | | **प्रसंग चौथा** | |
| ४ | ३ | अणि | आणि |
| १९ | ३ | रुषीमुनि | रुषी मुनि |
| ४२ | २ | अनिलें | आणिलें |
| ८० | १ | मृत्यलोक्रीं | मृत्यलोकीं |
| | | **प्रसंग सहावा** | |
| ४३ | १ | मीघ्नी | नीधी |
| ७६ | २ | सारंगधारा | सारंगधरा |
| | | **प्रसंग सातवा** | |
| ९ | १ | मांगता | मागता |
| ,, | २ | मांगता | मागता |
| १७ | ४ | उरो | उरों |
| ७८ | २ | ब्रह्मां ो | ब्रह्मांवो |

### प्रसंग आठवा

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | १ | सभ | सभे |
| ५१ | ४ | कीजे ,, | कीजे" ± |

### प्रसंग नववा

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | २ | चंट्र | चंद्रु |
| ६८ | ३ | वीर हें | वीरहें |
| ७० | ३ | बज्र | वज्र |
| ७७ | १ | जावेक | नावेक |
| ८९ | ३ | कींजें | कीं जें |
| १०१ | ४ | वैसे | वैसे |

### प्रसंग दहावा

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | ३ | अबघे | अवघे |
| ४६ | १ | यॆंरा | यॆरां |
| ५१ | २ | पुंनिवेचें | पुनिवेचें |
| ,, | ३ | नाना | ना ना |
| ,, | ३ | सागरेंचि | सागरेंचि |
| ७७ | १ | नाना | ना ना |
| ९६ | ३ | घु र | घुर |
| १११ | ४ | ,, | ,, + |

### प्रसंग अकरावा

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | २ | शतें | शतें दोनी |
| २७ | १ | साडा | माडा |
| ९२ | १ | अखंड | अखंड' |

### प्रसंग बारावा

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | ४ | दृप्टी | दृष्टी |
| १५ | १ | आवघी | आवघीं |

| | | | |
|---|---|---|---|
| ७१ | ४ | नृत्यीं | नृत्यीं * |

## प्रसंग तेरावा

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | १ | ला ला | लागला |
| २६ | २ | कावा | मावा |
| ३३ | २ | अ लंगीला | आलंगीला |
| ४४ | २ | दळसीं | दळेसीं |

## प्रसंग चौदावा

| | | | |
|---|---|---|---|
| २ | १ | ब्रह्यादक | ब्रह्मादीक |
| २४ | ३ | काळ | काळे |
| २९ | २ | र जवाहान | राजवाहान |
| ७८ | २ | काळिगु | काळिंगु |
| १२६ | ३ | द्वीजां | द्वीजां |
| १५३ | १ | रुकमयां | रुक्मयां |
| १६४ | ३ | लाजाव | लाजावे |
| २३२ | ३ | कालन | कालनें |
| १४८ | ४ | तों | तो |

## प्रसंग पंधरावा

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | महणे | म्हणे |
| ५ | १ | ता | तो |
| ७ | १ | “...± | “...”± |
| २१ | ४ | सोभ | सोभे |
| ३४ | ४ | थार | थोर |
| ३८ | ३ | श्ररुणीं | श्रवणीं |

### प्रसंग सोळावा

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ३ | श्रीमुरारी | श्रीमुरारी– |
| १४ | १ | कासेश्वर | कासेश्वरु |
| १८ | २ | तबं | तवं |
| २३ | २ | उदकवीण | उदकेवीण |
| २५ | ३ | भीमकीयसीं | भीमकीयेसीं |
| २७ | २ | वीड | वीडे |
| ५२ | ३ | नीसेक १ | नीसेक २ |

### प्रसंग सतरावा

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | १ | फडोली | फेडोली |
| ४२ | २ | सन्ये | सैन्ये |
| ४८ | ४ | कसा | कैसा |
| ६४ | २ | सोसांवीं | गोसांवीं |
| १०५ | ३ | म्हुन | म्हणे |
| १०९ | २ | पुजारा सिह्ाना ± | "पुजारा सिह्ाना" ± |

### प्रसंग अठरावा

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | २ | आणिक | आणिका |

### प्रसंग एकोणिसावा

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | १ | वज्रा | वज्रा १ |
| २० | ४ | सीरे १ वरीयांचीं | सीरे २ वैरीयांचीं |
| १११ | २ | पढताति | पढताति १ |

### प्रसंग विसावा

| | | | |
|---|---|---|---|
| ९५ | ३ | "..." | "..." १ |

### प्रसंग एकविसावा

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ३,४ | "..." | "..." १ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३८ | २ | येरयेरां वरीं ≠ | "येरयेरां वरीं" ≠ |
| १६० | ४ | राणांमाजी | रणांमाजी |
| १६९ | १ | सालड | सालउ |
| १८८ | २ | नावंयेक | नायेक |
| २४८ | १ | म्हणै | म्हणे |

## प्रसंग बावीसावा

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | २ | वाज्रांगी | वज्रांगी |
| ७१ | ३ | जान | जानैं |
| १२२ | १ | नर | गज नर |
| ,, | ३ | हीं | तेहीं |
| १२४ | १ | आनदु | आनंदु |
| १२५ | १ | येसवतु | येसवंतु |
| १२८ | ४ | कासायेसीं | कासीयेसीं |
| १३२ | ३ | करात | करीत |

## प्रसंग तेवीसावा

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ४ | गांजीवांचा | गां जीवांचा |
| २३ | २ | आपिन | आणिन |
| ४० | ४ | पडुचीया | पंडुचीया |
| ७० | २ | राचिलें | रचिलें |
| ७५ | २ | कस्पतरुचे | कल्पतरुचे |
| ८४ | ३ | राय | राये ! |
| ८६ | ४ | राय | राये |
| ८७ | ३ | मुंडें | मुडें |
| ९२ | ४ | आपणप | आपणपें |
| ९८ | २ | बाहीवट | बाहीवटें |

| | | | |
|---|---|---|---|
| १११ | ३ | मुक्ताफाळि | मुक्ताफळीं |
| ११४ | ३ | मनि | मुनि |
| १३१ | ३ | म्हण | म्हणे |
| २०२ | १ | स्वरु | स्वारु |
| २२१ | २ | सख | संख] |
| २२५ | ३ | आर्विधि | आर्विधि |
| २३१ | १ | पढीयेति | पढीयंति |

## प्रसंग चोवीसावा

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | १ | पहुपार्कि | पहुपर्कि |
| २५ | ४ | जांन | जांनें |
| ३२ | ३ | बदिजन | बंदिजन |
| ५५ | २ | घवघार्णि | घवघर्णि |

## प्रसंग पंचविसावा

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ३ | सपरिवरीं | सपरिवारीं |
| २० | १ | वर्णं | वर्णूं |
| ३७ | ४ | ठेवि ति | ठेविताति |
| ३८ | २ | ठवीले | ठेवीले |
| ३९ | ३ | तोयें | तीयें |
| ४२ | २ | भाजी ॥ | भाजीया |
| ४४ | २ | चविवाड | चवि वाड |
| ६७ | २ | धावति | धांवति |
| ८२ | ३ | तव | तवं |
| १०३ | ४ | कौंडन्येंपुरु | कौंडन्येंपुरु |
| ११० | २ | वामांगी | वामांगीं |

## परिशिष्ट २

[४ खालील ओवी ४ चरण ४ णीवारे णीर्वारें]

## परिशिष्ट ३

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | १ | उपाक | उपाय |
| ,, | ३ | हार्ण | हाण |
| २२ | २ | कुम...स्थीती | कुमराचीया मंत्रस्थीती |

### पाठभेद

पान ३०७ ओळ १५ अशुद्ध १ शुद्ध २

### पाठभेद

### प्रसंग बावीसावा

| पान | रकाना | ओवी | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ३२९ | १ | १३ | जो | जो. |
| ,, | १ | १५ | २ गो | २ गो. |
| ,, | २ | २२ | २ गो जो येसचि | २ गो. सार्से. जो. वीशेर्से |
| ,, | २ | ३२ | १ | १ जो. प्रभवे |
| ,, | २ | ३६ | २ गो | २ गो. येसनेया |
| ,, | २ | ६८ | प्रेतें ± – | मू. हीरवी वारी प्रेते (वारी=चारी ?) |

### प्रसंग तेवीसावा

| पान | रकाना | ओवी | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ३३० | १ | ६ | २ झडवरोनि | झडकरोनि |
| ,, | १ | ३७ | २ असाल | २ आसाल |
| ,, | २ | ९६ | जो | जो. |
| ,, | २ | १११ | | △ मूळांत 'वटि' |
| ३३१ | १ | १५८ | * मूळांत 'सुक' | * मूळांत सर्व ठिकाणीं 'सुख' चे ऐवजीं 'सुक' |
| ,, | १ | १८८ | | १ गो. जो. उदकाधिपती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३१ | २ | २३४ | राबीति | रावीति |
| ३३२ | २ | ६५ | पराणद | पराणंद |

शब्दकोश

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४३ | १ | ८ | खाजीनदार | खजिनदार |
| ३४४ | १ | ७ | वास्त | वस्ति |
| ,, | १ | ८ | जागा | जागा, |
| ,, | २ | ७ | नावाचां | नांवाचा |
| ३४५ | १ | ११ | अगा | असा |
| ,, | २ | २ | वळद | वळण |
| ३४६ | २ | २० | पल्ल | पल्लव |
| ,, | २ | २७ | तीं | तीं |
| ३४७ | २ | १७ | सापण | सींपणे |
| ३४८ | २ | ११ | तात्काळ | तात्काळ, |

REFBK-0014078

मराठी स्थळप्रत

अनु: ४००५०

गठाळ

सरकारमान्य होमिओपॅथिक आणि बायोकेमिक मेडिकल कॉलेजस
करितां D. H. B. च्या पाठ्यक्रमांत स्वीकृत
मराठी आणि हिन्दी

# ग्रंथ

## लेखक : विद्वद्रत्न कै. डॉ. के. ल. दप्तरी

१. सच्चिकित्साप्रकाशिका (मराठी)
प्रथम खंड-पूर्वार्ध (चतुर्थावृत्ति)
रहस्य-वर्णन किमत रु. ३.२५ न. पै.

२. सच्चिकित्साप्रकाशिका (मराठी)
प्रथम खंड-उत्तरार्ध (तृतीयावृत्ति)
रुग्ण-परीक्षण
आणि द्वितीय खंड
लौकिक-रोग-चिकित्सा किमत रु. १५.०० न. पै.

३. होमिओपॅथिक निबंध पंचक (मराठी)
लेखक—डॉ. के. ल. दप्तरी,
डॉ. रु. कु. सिन्हा, डॉ. सि. व्हि. जोगी. किमत रु. २.२५ न. पै.

४. ऑर्ग्याननूचे हृद्गत (मराठी)
ले. डॉ. के. ल. दप्तरी किमत रु. १.५० न. पै.

५. सच्चिकित्साप्रकाशिका (हिन्दी)
प्रथम खंड-पूर्वार्ध
रहस्य-वर्णन किमत रु. ३.०० न. पै.

६. सच्चिकित्साप्रकाशिका (हिन्दी)
प्रथम खंड-उत्तरार्ध
रुग्ण-परीक्षण किपत रु. ३.२५ न. पै.

७. होमिओपॅथिक निबंध पंचक (हिन्दी) किमत रु. २.२५ न. पै.

८. स्त्री-रोग-विज्ञान (हिन्दी)
ले. डॉ. एस्. सेन, एम्. डी. किमत रु. १.०० न. पै.

---

पता :—कृ. मु. महानुभाव (प्रकाशक)
श्री गीता-आश्रम, तिलक रोड, हैदराबाद–१ (आंध्र प्र.)

# आध्यात्मिक साहित्य प्रकाशन : प्रकाशित ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १. | + श्रीमद्भगवद्गीता : हिंदी-दोहा चौपाई | १.०० |
| २. | + स्तोत्रसमुच्चय : सं. श्री. कृष्णदास महानुभाव | धर्मार्थ |
| ३. | महानुभाव-पंथ : ले. महंत श्री. बाळकृष्ण शास्त्री | ३.५० |
| | महानुभाव-पंथ : हिंदी-भाषांतर श्री. बालमुकुंद 'प्रभाकर' | ४.०० |
| ४. | + श्रीचक्रधर व महानुभाव : ले. श्री. गं. म. ठवरे | १.०० |
| ५. | + स्तोत्र-संग्रह : सं. श्री. कृष्णदास महानुभाव | ०.३७ |
| ६. | + मूर्तिवर्णनें, आरत्या, स्तवनें भजनें आणि स्तोत्र-संग्रह : सं. श्री. कृष्णदास महानुभा | २.५० |
| ७. | + आरति-संग्रह : हिंदी सं. श्री. कृष्णदास महानुभावव | ०.५० |
| ८. | + एकमुखी दत्तात्रेय : ले. महन्त श्री. बाळकृष्ण शास्त्री | ०.३१ |
| ९. | + भारतीय दर्शन शास्त्र में धर्म की धारणा : ले. श्री. वसंत पवार एम. ए. | १.२५ |
| १०. | + सुबोधामृत : श्री. नारायणराव दादासाहेब तडस | ०.१२ |
| ११. | + गीताप्रणीत व्यवहारशास्त्र : हिंदी श्री. वा. गो. मंडपे | ५.५० |
| १२. | + काळसमुद्रांतील रत्ने : ले. बॅरिस्टर गो. वि. देशमुख | ३.०० |
| १३. | महानुभाव दैनिक उपासना : ले. श्री. व. स. तोंडोळीकर | ०.७५ |
| १४. | + अनन्य भक्ति : ले. श्री. बाळकृष्ण शास्त्री | ०.५० |
| | + अनन्य भक्ति : हिन्दी-भाषांतर श्री. बालमुकुंद 'प्रभाकर' | धर्मार्थ |
| १५. | ज्ञान-प्रबोध : हिंदी-ले. महंत श्री. गोविंदराज द. महानुभाव | ४.०० |
| १६-१७. | आत्मतीर्थ-प्रकाश : आणि स्ववृद्धाचारप्रबंध : सं. श्री. कृष्णदास महानुभाव | १.२५ |
| १८. | रुक्मिणी-स्वयंवर (संक्षिप्त प्रस्तावना व शब्दकोशासह) | ५.०० |
| १९. | रुक्मिनी-सँवर : (प्रस्तावना, पाठभेद व शब्दकोशासह) | ८.०० |

दोन्ही, सं. श्री. ना. व. जोशी

प्रकाशक : श्री. कृष्णदास महानुभाव
श्रीगीता-आश्रम : तिलकरोड, हैदराबाद–१ (आंध्र प्रदेश)

+ या चिन्हांकित ग्रंथ सध्या उपलब्ध नाहींत. मागणी करूं नये.